सत्यमेव जयते

अमरावती महानगरपालिका

लेखा परीक्षण अहवाल

2014-2015

उप संचालक,(मनपा लेप) उपविभाग - 3, स्थानिक निधी लेखापरिक्षा, औरंगाबाद

लेखा कोष भवन, तिसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालया जवळ

अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे अमरावती महानगरपालिका यांनी 2014-2015 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण 1

कलम ९ अ खालील आक्षेप 3

4 महसुलाचा प्रमुख स्त्रोत असलेल्या मालमत्ता कराच्या थकीत मागणीबाबत. 4

5 शासनाने विहित केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे वार्षिक लेखे तयार करून ते लेखापरीक्षणास प्रमाणिकरणाकरिता सादर न करणे. 5

8 आरोग्य विभागातील कार्यरत श्रीमती वैशाली व.भुयार (शेंडे) प्रयोगशाळा तंतज्ञ यांची वेतननिश्चिती करताना चुकीची वेतनवाढ देवून मूळ वेतनात रु.58440/- व त्यावरील भत्ते एवढे अतिप्रदान केल्याबाबत. 7

12 आयकर अधिनियम 1961 कलम 192 च्या तरतूदीनुसार मनपा सेवेतून सेवानिवृत्ती झालेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनातून आयकर कपात न करणेबाबत. 8

27 स्थानिक संस्था कराची एकाच व्यापा-यांनी दुबार नोंदणी केल्याबाबत. 9

37 प्रथम कालबद्ध पदोन्नती अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणी मध्ये वेतन निश्चित न करता चुकीची वेतनश्रेणी लागू केल्याने झालेल्या रु.70600 व त्यावरील भत्त्याचे अतिप्रदानाबाबत. 11

40 पदे मंजूर नसल्यामुळे दवाखान्याच्या दोन (सुतिकागृह) इमारती बंद अवस्थेत पडून असतांना व पद निर्मिती संबंधाने नियोजन न करता नविन दवाखाना इमारती वरील खर्च झालेला रु. 83.56 लाख एवढा 13 व्या वित्त आयोगातील निधी अडकवून ठेवण्याबाबत. 13

41 मंजूर अभिन्यासातील खुल्या जमिनीच्या वाटपाची प्रक्रिया पूर्ण झाली नसतांना स्वयंसेवी संस्थेद्वारे सदर जमिनीचा वापर सुरु असणेबाबत. 14

44 वैद्यकीय अधिकारी यांना नियमबाहय व्यवसाय रोध भत्त्याचे रु. 4,18,053/- एवढे अतिप्रदान झाल्यामुळे. 16

47 कर विभागातील कार्यरत श्रीमती सविता भगवंत पाटील, कनिष्ठ लिपिक यांची वेतननिश्चिती करताना चुकीची वेतनवाढ देवून मूळ वेतनात रु35400/- व त्यावरील भत्ते एवढे अतिप्रदान केल्याबाबत. 18

53 महानगरपालिका अमरावती येथे शासन निर्देशानुसार बंधनकारक असलेल्या दुहेरी नोंद पध्दतीने लेखे न ठेवणेबाबत. 20

54 मा.राज्यमंत्री यांच्या सत्कार समारंभासाठी गरजेपेक्षा अधिक व अवास्तव दराने शाल खरेदी केल्यामुळे वित्तीय औचित्याचा भंग होणेबाबत. 22

60 श्री. सुधीर श्यामराव कडू, आरोग्य कर्मचारी यांना चुकीची वेतननिश्चिती केल्यामुळे अतिप्रदान झाल्याबाबत. 23

63 कु. उर्मिला एम. कासदेकर ए.एन.एम. आरोग्य विभाग यांना चुकीची वेतनवाढ लागू केल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत तसेच उपभोगलेली रजा खात्यात कमी खर्चीटाकण्यातील अनियमितता. 24

64 रमाई आवास योजनेतंर्गत पेव्हटेक कन्सल्टंट, पुणे यांना निविदा मुल्यापेक्षा जादा रकमेचे नियमबाहय प्रदान तसेच बांधकामातील त्रृटया व करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याबाबत. 26

71 श्री. अविनाश कात्रे लसटोचक यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ नियमबाह्य लागू केल्याने झालेल्या अतिप्रदान तसेच अर्हताकारी सेवेबाबत. 29
72 श्री. टि. एस. भोसले से. नि. क्रीडा अधिकारी यांना बडतर्फ कालावधीतील नियमबाहय वेतनाचे प्रदानाबाबत.33
76 आर्थिक क्षमतेपेक्षा तिप्पट मुल्यांची शासन निधीतील बांधकामे एकाच कंत्राटदारास मंजूर करणेबाबत. 36
78 तातडीची बाब नसताना तसे दर्शवून निविदा न मागविता रु.8.25 लाख मूल्याचे आराखडा तयार करण्याचे व समन्वयक पदाचे काम एकाच सल्लागारास देण्याबाबत. 38
80 शासनास भरणा करावयाच्या रॉयल्टी रकम कंत्राटदाराकडून वसूल करावयाची असताना मनपा/शासन निधितून 2014-2015 मध्ये रु. 74.16 लाख खर्च करण्याबाबत. 40
81 10% पेक्षा कमी दराच्या निविदेचे दर विश्लेषण व अंदाजपत्रकाची पुन:मांडणी न करता 15 ते 37% ने कमी दराच्या निविदा स्विकृत करणेबाबत.....46
91 खोदकामातील मातीचे जादा परिमाण दाखवून वाहतुकीवर झालेल्या अतिप्रदानाबाबत. 50
96 विभागीय आयुक्तांच्या सक्षम प्रशासकीय मान्यतेशिवाय शासन निधीतील शिल्लक रकमेतून रु.45.32 लाखाचे रस्ता डांबरीकरणाचे काम करण्याबाबत.....51
99 मनपा नाक्याची इमारत व्यावसायिक प्रयोजनासाठी दीर्घमुदतीसाठी नाममात्र दराने देणेबाबत. 53
100 प्रशासकीय प्रस्ताव नसताना वेळेवरील विषय म्हणून तसेच वित्तीय मर्यादेनुसार अधिकार नसताना दुकान गाळ्यांचे हस्तांतरण या अर्थविषयक बाबीस स्थायी समितीने मान्यता देण्याबाबत.....54
102 रु. 44.17 लाख मूल्य असलेल्या भूखंडाचे स्वयंसेवी संस्थाना नियमबाह्यपणे वाटप करणेबाबत.....56
104 मंजूर आकृतीबंधानुसार उपलब्ध पदोन्नतीचे पद डावलून पदोन्नती व त्यानुषंगाने त्या वरील वेतनश्रेणी मध्ये सुधारित आश्वासित प्रगती योजनेंतर्गत चुकीचे ग्रेड वेतन मंजूर केल्यामुळे दि. 01.03.1993 पासून वेतनाचे झालेले अतिप्रदानाबाबत.....59
108 मनपा शाळेतील गरीब मुला-मुलींसाठी पटसंख्येपेक्षा जादाची टाय व बेल्ट खरेदी केल्याने अवाजवी खर्च झाल्याबाबत.....61
114 कोंडवाडा विभागांतर्गत प्रत्यक्ष खरेदी झाली नसताना रु.19.43 लाख एवढा खर्च संबंधित लेखाशिर्षाखाली नोंदविल्याने खर्च केलेल्या रकमेच्या गैरविनियोगाच्या शक्यतेबाबत.....63
115 आरोग्य व पर्यवेक्षण विभागातील स्वास्थ/स्वच्छता निरीक्षक यांना रु.4300 ऐवजी रु.4800 असे चुकीचे ग्रेड वेतन देऊन अतिप्रदान केल्याबाबत. 64
124 GIS DATABASE तयार करणे या योजनेच्या अंमलबजावणी मधील अनियमिततांमुळे 13 व्या वित्त आयोगातील रु.1.33 कोटी एवढया खर्चाची उपयोगिता शून्य ठरणेबाबत.....65
125 कनिष्ठ अभियंता या पदावरून शाखा अभियंता पदावर दर्जावाढ मंजूर केली असताना पदोन्नती समजून वेतन निश्चिती केल्याने मूळ वेतनात झालेले रु.143520 व त्यावरील भत्ते एवढ्या अतिप्रदाना बाबत. 70
129 कर अधिकाऱ्याच्या कक्षासाठी दरपत्रके न मागविता नियमबाह्य अग्रीमातून वित्तीय औचित्याबाहेरील अवाजवी खर्च करणेबाबत.....72

137 शासन निर्णय वित्त विभाग दि. 03.07.2009 नुसार दि. 01.01.2006 नंतर आगाऊ वेतनवाढ अनुज्ञेय नसताना श्री मिराणी व.ली. तथा श्री भूषण पुसनकर,क. लि. यांना आगाऊ वेतनवाढ दिल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत.....73

138 गांधी चौक वाहनतळ पार्किंगची जागा स्वस्त दराने भाडेतत्वावर देऊन मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत.....75

141 31 नालाकुली(वर्ग-4) कर्मचा-यांना पुर्वलक्षी प्रभावाने नियमबाहयपणे वरिष्ठ पदावर सेवेत सामावून घेणे व या प्रभावावरील सेवा आश्वासित प्रगती योजनेसाठी विचारात घेऊन प्रारंभापासून वेतनाचे अतिप्रदान होत असल्याबाबत.....76

148 शिक्षण विभागातील वर्ग 4 च्या कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता विचारात न घेतल्याने नियमबाहय आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करणेबाबत.....81

153 मनपा अमरावतीच्या आर्थिक वर्ष 2014-15 चा अर्थसंकल्प, जमा-खर्च व आर्थिक स्थितीवरील अभिप्राय....84

कलम ९ ब खालील आक्षेप.....89

6 समाजमंदिरा पासून रु. 70 लाखाच्या अवैध वसुली प्रकरणावर कार्यवाही न होणेबाबत. 90

9 कर निर्धारणानंतर स्थानिक संस्था कराची रु.23.46 लाख एवढी रक्कम अद्याप वसूल न होणेबाबत. 90

11 सन 2014-15 मध्ये महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिरातीसाठी संबंधित वृत्तपत्रांना शासन मान्य दरापेक्षा अधिक दराने रक्कम अदा केल्याने मनपाचे झालेले नुकसान रु.104076/- बाबत.....92

13 सन 2014-15 मध्ये शासनाच्या वतीने शिक्षण कर,रोजगार हमी उपकर व मोठया निवासी इमारतीवरील कर अंतर्गत नागरिकांकडून वसूल केलेली रक्कम रु.5.01 कोटी शासन खात्यात विलंबाने भरणा करण्यात आल्याबाबत. 96

14 सन 2014-15 या आर्थिक वर्षात प्रदान केलेल्या रु.11.57 लाख इतक्या अग्रीमाचे प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या बिजकांसह समायोजन न झाल्याने मनपा निधीच्या झालेल्या संभावित हानीबाबत.....98

16 कर्जनिवारण निधी खात्यातील जमा रकमा दीर्घ मुदतीसाठी गुंतवणूक न करता बचत खात्यात ठेवल्याने 2014-15 मध्ये अंदाजे रु 48843/ व्याजाचे नुकसान होणेबाबत.....100

19 मनपाचे कर विभाग/म्यु.नगर रचना विभागातील कर्मचा-यांचे सेवापुस्तकातील अनियमिततेबाबत.....101

20 स्थायी समिती ठरावाद्वारे निश्चित केलेल्या परवाना शुल्काच्या रकमेपेक्षा कमी दराने वसुली केल्याने रु.22000/- च्या महसुलाच्या हानीबाबत. 105

21 सेवाकराची आकारणी न केल्यामुळे व विहित मुदतीत सेवाकराचा भरणा न केल्यामुळे रु. 29.00 लाख एवढ्या संभाव्य दंडनीय व्याजाची जबाबदारी निश्चित करून वसुली होणेबाबत. 107

22 जाहिरातीवरील कर वसुलीचे काम कंत्राट तत्वावर दिल्याने विहित मुदतीत कराची रक्कम मनपास प्राप्त होत नसल्याने त्यावर आकारण्यात येणाऱ्या व्याजाची एकूण रक्कम रु. 10048500/- चे मनपाचे नुकसान होणेबाबत. .108

26 स्थानिक संस्था कराच्या प्राप्त रकमेतील आढळून आलेल्या तफावतीचा ताळमेळ न घेणेबाबत. 110

29 भाडेपट्टीने दिलेल्या दुकान, गाळेधारकाकडून विलंबाने वसूल केलेल्या थकबाकीच्या रकमेवर शास्तीची आकारणी न केल्यामुळे मनपाचे रु. 70123/- चे नुकसान होणेबाबत. 112

31 आयुर्विमा महामंडळाकडून घेतलेल्या कर्जाची हमी शुल्क रक्कम तसेच त्यावरील व्याज व दंडणीय व्याजाबाबत. 114
33 शहरातील अनाधिकृत मोबाईल टॉवर्समुळे अंदाजे रु. 2. 27 कोटी एवढे मनपाचा महसुल, वाढीव मालमत्ता कर तसेच पर्यावरणविषयक हानी होणेबाबत....116
34 श्रीमती उर्मिला अटाळकर सेवानिवृत्त कनिष्ठ लिपीक यांना सेवेत सामावून घेताना आवश्यक असणा-या प्रमाणपत्राची पुर्तता न करता वरिष्ठ पदावर सेवेत सामावून घेणे व इतर अनियमिततेबाबत. 118
35 दैनदिन साफसफाईच्या कामाला मुदतवाढ देणे तसेच विहित मुदतीत नविन निविदा प्रक्रिया न राबविणे व सेवा शुल्काचे प्रदानातील अनियमिततेबाबत....120
36 झोन क्र. 1 मधील कार्यक्षेत्रात येणा-या मालमत्तेचे करनिर्धारण तसेच खुल्या भुखंडावर आकारणी न केल्याने मनपाच्या होत असलेल्या हानीबाबत....124
38 मनपाच्या नगर सचिव विभागाकडील चहापान खर्च, आकस्मिक खर्च, सादिल खर्च तसेच सदस्यांचे मानधन व वाहन भत्यावरील खर्चातील अनियमितता व अख्रिचा त निधीबाबत. 126
39 सन 2013 व 2014 च्या शीघ्र सिद्धगणकातील दराच्या तफावतीनुसार जमीनवापर मूल्याची अतिरिक्त रक्कम रु. 1.17 लाख वसूल न करणे व विशिष्ट हेतूसाठी प्राधिकृत नसलेल्या संस्थेस त्या हेतूसाठी भूखंड वाटप करणे बाबत. 128
42 बांधकाम परवानगी देताना भूखंडधारकाकडून प्राथमिक विकास खर्चापोटी रु. 90/- प्रती चौ.मी. ऐवजी रु.20/- प्रमाणे वसूल केल्याने रु. 2.72 लाखाच्या महसुलाची हानी होण्याबाबत. 130
43 मनपाच्या नुकसान भरपाईच्या रु. 240825/- पैकी रु. 140489/- एवढी रकम कर्मचाऱ्यांकडून वसूल न होणेबाबत....132
45 न्यायालयीन प्रकरणात महानगरपालिकेला सेवा देणाऱ्या अधिवक्त्याच्या शुल्कातून आयकराची कपात न केल्याबाबत. 133
49 सन 2014 -15 मध्ये कंत्राटदार, पुरवठादार यांच्या देयकातून कपात केलेल्या रु.1.82 कोटी एवढया कार्यकंत्राट कर रकमेचा शासन खात्यात विलंबाने भरणा करण्यात आल्याबाबत. 134
50 कारखाना विभागाकडील भंगार ठरलेल्या वाहनांच्या विक्री प्रक्रियेतील विलंबामुळे मनपाचे झालेले नुकसान रु. 1,53,000/- बाबत. 136
51 महानगरपालिकेच्या हद्दीतील प्रवेश नाक्यावर खाजगी सुरक्षा रक्षक पुरविण्याचे आदेश होण्यापूर्वीच्या कालावधीतील पारिश्रमिक अदा केल्याने झालेले अतिप्रदान रु.67560/-बाबत. 137
52 अधिकच्या दराने सुरक्षा रक्षकांची नेमणूक केल्याने मनपाचे दरमहा होत असलेले नुकसानीबाबत. 138
55 सन 2014-15 मध्ये महानगरपालिकेच्या अधिकारी वर्गाकरिता भाडेतत्वावर घेतलेल्या खाजगी वाहनांच्या मासिक भाडे देयकांच्या तपासणीत आढळून आलेल्या अनियमिततांबाबत. 139
58 अतिक्रमण विभागातील मजूरांना रोखीने प्रदान केलेल्या मजूरीसंबंधी मजूरांच्या स्वाक्षऱ्या नसतांना दर्शविण्यात आलेल्या रु.47352/- एवढया प्रदानातील अनियमिततेबाबत....143

65 मनपा हद्दितील प्रभागनिहाय दैनदिन साफसफाईचे कामाचे कंत्राटदारांना मासिक देयकाचे प्रदानातील अनियमिततेबाबत. 147
66 दैनदिन साफसफाईचे कंत्राटदारांना प्रदान करतांना 13.5% सेवा शुल्क अदा केल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत. 151
67 नाली कामगार व सफाई कामगारांना लागू करण्यात आलेल्या नियमबाहय ग्रेड-पे बाबत. 153
69 रमाई आवास घरकुल योजनेतंर्गत लाभार्थ्यांना निवास वाटपातील अनियमितता. 156
70 मनपाच्या कर्मचा-यासाठी सेवानिवृत्तीनंतरच्या दायित्वासाठी तसेच मासिक निवृत्ती वेतनाची अदायगीसाठी निवृत्तीवेतन अशंदान निधीची स्थापना न करणेबाबत. 159
73 अतिक्रमणाचे काम केले नसलेल्या (कामावर अनुपस्थित असलेल्या) दिवसांची रु.1.18 लाख एवढे मजूरीचे प्रदान करणेबाबत. 161
77 कंत्राटपध्दतीने चालविण्यास दिलेल्या सांस्कृतिक भवनापासून ठराविक रकमांच्या तुलनेत दोन स्वतंत्र अभिलेख्यानुसार वेगवेगळी व कमी रकम प्राप्त होणेबाबत. 167
79 ऑप्टीकल फायबर केबलचे जाळे टाकणे व अन्य भूमिगत कामासाठी वापरलेल्या जमिनीवरील भाडे रकमांवर रु. 5.87 कोटीचा सेवाकराची आकारणी व वसूली न करण्याबाबत. 169
82 राजापेठ उड्डाणपूलच्या बांधकाम सल्लागारास होणाऱ्या प्रदानातील अनियमितता मुळे शासननिधीचे होत असलेल्या नुकसानीबाबत. 170
83 दीर्घमुदतीसाठी भाडेपट्टीवर दिलेल्या वडाळी तलाव व छत्री तलावापोटी कंत्राटदाराकडून सेवाकराची रु.5.18 लाख एवढी रकम वसूल न करणेबाबत. 175
84 छत्री तलाव सुशोभित व सौंदर्य करण्यासाठी दिलेले एजन्सीद्वारे रक्कम उशिराने मनपा खात्यात जमा केल्याबाबत. 176
85 मनपा अमरावती क्षेत्रा अंतर्गत मोकाट जनावरे पकडण्याकरिता वाहन भाडे यावरील केलेल्या अनावश्यक खर्चा बाबत. 178
93 रमाई आवास योजनेतंर्गत शासनाकडून प्राप्त निधीवरील व्याज तसेच अखर्चित निधी शासनाकडे जमा न करणे व इतर अनियमिततेबाबत. 180
94 सार्वजनिक शौचालयाच्या साफसफाईच्या कामाच्या कंत्राटाची निविदा प्रसिध्द न करता जुन्याच कंत्राटदाराला मुदतवाढ देण्याबाबत. 185
95 व्यावसायीक प्रतिष्ठानांतील कचरा गोळा करणा-या कंत्राटदाराने करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार रॉयल्टी रकमेचा भरणा न केल्यामुळे मनपाच्या झालेल्या हानीबाबत. 187
101 जमीन वापर मूल्याची तफावतीची रकम रु.2.15 लाखाच्या वसुलीकडे दुर्लक्ष करणेबाबत. 190
103 सर्वसाधारण सभेचा धोरणात्मक निर्णय असताना नविन अभिन्यासातील विकास कामासाठी त्यामधील दर्शनी भागातील भूखंडाचे अधिग्रहण न करण्याबाबत. 192
106 मनपातील पदाधिकारी/अधिकारी यांना सन 2014 व 2015 मध्ये पुरविण्यात आलेल्या दैनदिनी छपाईतील अनियमितेबाबत. 194

107 सक्षम मान्यता प्राप्त न करता 80 वर्ष व त्यावरील निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना निवृत्तीवेतनात 10% वाढ लागू करण्याबाबत.....196
110 मनपा शाळेतील वर्ग 1 ते 7 मधील गरीब मुला-मुलींसाठी गणवेश शिलाई करुन वाटप करण्यातील अनियमितता. 198
112 मनपातील पदाधिकारी यांचेकडील खाजगी सचिवांच्या नियमबाह्य नेमणुकीबाबत. 203
113 मनपा शाळेतील वर्ग 1 ते 7 मधील गरीब मुला-मुलींसाठी गणवेश कापड खरेदी करतांना गरजेपेक्षा जादा कापडाची खरेदी केल्याने मनपावर रु.893923/- एवढया अनावश्यक खर्चाचा भार पडल्याबाबत. 205
116 मनपा शाळेचे इमारत बांधकाम, देखभाल व दुरूस्ती यावरील खर्चाचे नस्त्या व अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न देणेबाबत. 209
117 पशुसवंर्धन विभागाने लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे तसेच पाळीव प्राणी परवाना शुल्क वसुल न केल्याने मनपा निधीची हानी झाल्याबाबत. 213
118 मनपाच्या शाळेतील वर्ग 9 व 10 च्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके पुरविणेबाबत.....215
122 अतिक्रमण विभागाने घेतलेल्या अग्रिमाचा वापर प्रलंबित कालावधीतील मजूरी प्रदानाकरिता करणेबाबत तसेच मोठया प्रमाणात रोख काढून त्याचा गैरवापर करणेबाबत. 216
127 बाजार ओटयांच्या भाडे रकमेत स्थायी समितीच्या ठरावानुसार भाडेवाधीची अंमलबजावणी न केल्याने 2014-2015 मध्ये मोठ्या महासुलाचे चे नुकसान होणेबाबत. 218
128 बांधकाम परवानगी धारकाकडून स्थानिक संस्था कर वसूल न करता प्रतिज्ञापत्रे प्राप्त न केल्याने कराच्या महसुलाची हानी होणेबाबत.....220
134 जिल्हा नियोजन विकास निधीमधील सन 2014-15 अखेर रु.50.78 लाख एवढी अखर्चित रक्कम शासनास परत न केल्याबाबत. 221
139 महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविण्यासाठी महसुली उत्पन्नाच्या 5% तरतूदीमधून खर्च करण्यातील अनियमितता. 223
140 अमरावती शहर बस वाहतुक उपक्रम अभिकर्त्याने रॉयल्टीचा भरणा विलंबाने करणे तसेच वाहतुक उपक्रम हस्तांतरणबाबत. 224
144 मनपाच्या मालकीच्या जागेवरील बस पार्किंगचे भाडे वसुल न केल्याने मनपाची हानी झाल्याबाबत. 226
145 मनपा अमरावतीची पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावती यांचेकडे सोपविली असतांना आस्थापना खर्चावर तसेच सार्वजनिक नळाच्या पाणीपुरवठा देयकावर फार मोठया प्रमाणातील खर्चाबाबत. 228
146 शालेय पोषण आहाराबाबत प्राप्त तांदुळाची प्राथमिक शाळेच्या साठा नोंदवहीत नोंद नसणे तसेच अंदाजपत्रकातील खर्चाबाबत. 230
147 भांडार विभागाने मनपाच्या विविध विभागासाठी खरेदी केलेल्या साहित्य खरेदीतील अनियमितता.....232
149 सामान्य प्रशासन विभागातील कर्मचा-यांना वाढीव ग्रेड-पे दिल्याने झालेले अतिप्रदान तसेच सेवापुस्तकातील अनियमिततेबाबत.....237

150 शिक्षण विभागाने शाळा इमारत भाडयाचे केलेले अतिप्रदान व आकस्मिक खर्चाचे मंजूरीतील अनियमिततेबाबत. 242
152 जिल्हापरीषदेकडून समायोजनाने मनपाकडे वर्ग झालेल्या शिक्षकांच्या संबंधाने जिल्हापरीषदेकडून सेवानिवृत्ती अंशदान प्राप्त न करणे व प्रदानातील इतर त्रृटयांबाबत. 243

कलम ९ क खालील आक्षेप 246

142 मनपा शाळेतील वर्ग 1 ते 10 पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिता डेस्क व बेंच खरेदीतील अनियमिततेबाबत. 247

कलम ९ ड खालील आक्षेप 256

7 वेतनातून आयकराची दरमहा कपात न करता एकत्रित कपात करणेबाबत. 257
10 सहकारी बँकेकडून अथवा पतसंस्थेकडून कर्ज घेतांना कर्मचा-यांची एकूण वित्तलब्धी तसेच सहकार कायदयातील तरतूदी विचारात न घेता विभाग प्रमुखाने बेजबाबदारपणे हमी देण्याची अनियमितता. 258
15 सन 2014-15 च्या भांडार तथा छपाई विभागाचे लेखापरीक्षणात आढळून आलेल्या अनियमिततांबाबत. ...261
17 मनपाच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या सेवापुस्तकातील नोंदी अद्ययावत नसणे तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार आवश्यक नोंदी न घेणेबाबत. 265
18 क्रिडा विभागातील क्रिडा रत्न पुरस्काराच्या खर्चामधील अनियमिततेबाबत. 269
23 बांधकाम परवानगी जारी करण्यापूर्वी स्थानिक संस्था कराच्या बँकेत परस्पर भरलेल्या रकमांची बँक स्क्रोलवरून तपासणी न केल्याने मनपा महसुलाच्या हानीच्या शक्यतेबाबत 271
24 स्थानिक संस्था कर निर्धारण रक्कम विलंबाने भरणा केल्यास व्याज व दंडाची रक्कम न आकारणेबाबत..273
25 महानगरपालिका अमरावती कार्यालयातील आरोग्य विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतनामधून भविष्य निर्वाह निधी किंवा डीसीपीएस ची कपात न केल्याबाबत. 274
28 अधिकारी/कर्मचारी यांनी संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर न करताही नियमित वेतनवाढी मंजूरीबाबतची अनियमितता. 275
30 महात्मा गांधी संकुल नुतनीकरण / नवीन लीजप्रक्रिया न राबविता 30 वर्षापेक्षा कालावधी होऊनसुद्धा सुरूच असणेबाबत. 278
32 रमाई आवास (घरकुल) योजनेसाठी शासनाकडे निधी मागणीचा प्रस्ताव सादर न केल्याने योजनेपासून लाभार्थी वंचित राहणेबाबत. 278
46 विवाह नोंदणी शुल्काची रक्कम तसेच विवाह मंडळाचे नोंदणी शुल्क व नुतनिकरणाची रक्कम शासनाकडे जमा न केल्याबाबत. 280
48 आरोग्य विभागातील कर्मचारी यांना निलंबित केल्यानंतर त्यांचा निलंबन कालावधी नियमित केला नसताना त्यांना कालबद्ध पदोन्नती व नियमित वेतनवाढी प्रदान करण्यात आल्या. 280
56 स्थानिक संस्था करनिर्धारण कंत्राटदाराचे देयकातून आयकराची वसुली न करणेबाबत. 282
57 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या मानधनाचे देयकातील अनियमिततेबाबत. 283

61 महानगरपालिकेच्या आरोग्य तसेच कर विभागातील आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार परिपूर्ण व आवश्यक नोंदी न घेतल्याबाबत. 284
62 सार्वजनिक संडासाची दुरुस्तीमधील अनियमिततेबाबत....289
68 रमाई आवास योजनेतंर्गत मंजूर प्रकरणातील अनियमिततेबाबत. 290
74 बांधकाम विभागातील सन 2014-15 चा आकस्मिक खर्चाचा अभिलेख लेखापरीक्षणास सादर न करणे तसेच मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च करणेबाबत. 292
75 महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी मनपास बंधनकारक असलेल्या प्रशासकीय सुधारणात्मक बाबींवर अंमल न होणेबाबत....293
86 अपंगाकरीता वैयक्तिक लाभ योजनावर विहित प्रमाणात खर्च न करण्याची अनियमितता....295
87 ऑप्टीकल फायबरसाठी मार्गांच्या हक्काच्या परवानगीचे नुतनीकरण न झाल्याने रु.1.54 कोटीच्या परवाना शुल्काची हानी होणेबाबत व 2014-15 मध्ये या प्रयोजनावरील प्राप्त रु.18.37 कोटीच्या महसुलाचे उचित लेखांकन न होणेबाबत. 296
88 मनपाकडील बांधकामाचा व त्यावर लावलेल्या कामगाराचा विमा न काढल्यामुळे मनपाच्या आर्थिकहिताचे व कामगारांचा विमा संरक्षण न होणेबाबत. 299
89 शासन अनुदानाच्या शिल्लक रकमेवर बँकेकडून प्राप्त व्याज रु. 37.75 लाख शासनास परत न करणेबाबत. 300
90 उचित स्पर्धा न होता बांधकामाच्या एकल निविदा (SINGAL TENDER) स्विकारणे बाबत व रु. 50 लाखावरील निविदांना स्थायी समितीने स्विकृती देणेबाबत. 301
97 एकाच कामाच्या नऊ देयकांच्या मोजमापाच्या नोंदी एका मोजमाप पुस्तिकेत व त्याच्या गोषवाऱ्यांसह प्रदानाच्या नोंदी अन्य पुस्तिकेत घेण्याबाबत. 303
98 श्री.सुहास चव्हाण, उपअभियंता यांना पूर्वलक्षी प्रभावाने दिलेल्या पदोन्नतीबाबत. 304
105 राष्ट्रीयकृत बँके ऐवजी सहकारी बँकेचे रु. 1 कोटीचे हमीपत्र स्विकृत करणेबाबत. 305
109 महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील तरतूदीनुसार निवृत्तीवेतन प्रदानासंबंधीच्या विहित नमुन्यातील नोंदवहया न ठेवणेबाबत. 307
111 मनपा अमरावतीच्या भांडार विभागाने साहित्य खरेदी करताना शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही न केल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झाल्याबाबत. 308
119 मनपाच्या शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध मंजूर नसणे व वेतन देयकातील त्रृटयाबाबत. 311
120 महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिराती प्रसिद्ध करण्याचे आदेश, संबंधित वृत्तपत्रांना जाहिराती प्रसिद्ध झाल्यानंतर निर्गमित केल्याने झालेली अनियमितता. 313
121 बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंत्यांना पूर्वलक्षी प्रभावाने नियुक्तीचा लाभ प्रदान करणेबाबत. 315
123 अतिक्रमणाचे कामावरील वाहनांच्या वापरातील अनियमितता तसेच लॉगबुकावरील दैनंदिन नोंदीसमोर स्वाक्षऱ्या नसणेबाबत. 317

126 खाजगी बांधकामाचे संबंधात कामगार कल्याण उपकराची रकम शासनाचे बँक खात्यात परस्पर भरणा केल्यानंतर मनपाकडून त्याची सत्यता व तपासणी न होण्याबाबत. 319
130 अखेरच्या शिलकेचा ताळमेळ न घातल्याने व बँक खात्यातील शिल्लक रोखपुस्तकापेक्षा कमी असल्याने अंदाजे रु. 125.94 कोटीचा खर्च रोखपुस्तकात न नोंदविता थेट बँकेतून झाल्याच्या शक्यतेबाबत.....321
131 महानगरपालिकेच्या मोटार कार्यशाळा विभागाकडील दहा वर्षाहून अधिक कालावधी झालेली वाहने निर्लेखित करून नविन वाहने खरेदीकरिता सुयोग्य नियोजन करणेबाबत.....325
132 सामान्य प्रशासन विभागामधील कर्मचाऱ्यांना चुकीच्या दराने स्थानिक पूरक भत्त्याचे प्रदान व वेतन देयकातून भविष्य निर्वाह निधी/डीसीपीएस वर्गणी कपात न करणे. 326
133 अनुदान नोंदवही विहित नमुन्यात न ठेवणे,नोंदवहीत अपूर्ण नोंदी घेणे व योजनानिहाय स्वतंत्र रोखपुस्तक न ठेवणे याप्रमाणे आढळून आलेल्या त्रुट्याबाबत.. 329
135 महानगरपालिकेच्या सर्व चल व अचल संपत्तीवर घसारा आकारून घसारा निधीची उभारणी न केल्यामुळे निर्लेखनयोग्य चल व अचल संपत्तीची नव्याने उभारणी करण्यास आर्थिक अडचण येत असलेबाबत. 330
136 कर्जनिवारण निधीमध्ये रकम जमा न करणे,उपलब्ध रकमांची गुंतवणूक न करणे याप्रकारे निधीच्या चुकीच्या व्यवस्थापनाबाबत.....332
143 JNNURM अतंर्गत शहर बस खरेदीस मंजूरी प्राप्त असून मनपाकडून बस खरेदीस विलंब झाल्याने शहर बसेसचा लाभ नागरिकांना न मिळणेबाबत. 333
151 अभिलेखे / माहिती उपलब्ध न करण्याबाबत.....334
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र 336
परिच्छेदनिहाय अनुक्रमणिका.....337

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण

विभाग	९अ	९ब	९क	९ड
इतर	76, 81, 96, 99	43, 77		57, 126
आयुक्तालय				151
सामान्य प्रशासन	47, 54, 60, 72, 137, 148	11, 19, 34, 51, 52, 149		17, 28, 98, 132
नगर सचिव		38, 106, 112		
शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम	40, 64, 78, 80, 91, 125, 129	79, 82, 83, 116		74, 75, 87, 88, 89, 90, 97, 121
शहर अभियंता आणि विद्युत विभाग				
पाणी पुरवठा व मल निसा:रण		31, 145		
लेखा विभाग	12, 53, 153	13, 14, 16, 49, 70, 107, 134		46, 109, 130, 133, 135, 136
लेखापरीक्षण	5			
नगर रचना	41, 102, 104	33, 39, 42, 58, 73, 101, 103, 122, 128		7, 62, 123
जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर	27	26		23, 24, 56
कर निर्धारण व संकलन	4	36		
आरोग्य	8, 44, 63, 71, 115, 141	9, 35, 65, 66, 67, 94, 95, 147		25, 48, 61
भूमी व मालमत्ता विभाग		6		105
वाहन विभाग	114	50, 55		131
नागरी वाहतूक		140, 144		143
जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी				10

DRAFT

नुतनीकरण मोहिम				
माहिती आणि जनसंपर्क				120
विधी विभाग		45		
घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प				
भांडार			142	15, 111
परवाना व मंडई विभाग	100, 138	20, 21, 22, 29, 127		30
संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान	124			
पर्यावरण किंवा प्रदूषण नियंत्रण विभाग		84		
शिक्षण विभाग किंवा शिक्षण मंडळ, प्राथमिक शिक्षण मंडळ किंवा माध्यमिक शिक्षण	108	110, 113, 118, 146, 150, 152		119
महिला व बालकल्याण विभाग		139		
क्रिडा विभाग				18
अग्निशमन विभाग	37			
समाज विकास किंवा सामाजिक न्याय विभाग		69, 93		32, 68, 86
पशु वध गृह		85, 117		

DRAFT

गंभीर अनियमितता

कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

कलम ९ अ खालील आक्षेप

DRAFT

4 महसुलाचा प्रमुख स्त्रोत असलेल्या मालमत्ता कराच्या थकीत मागणीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :01 मनपा निधी
अनियमितता कलम : 9अ

मनपा अमरावतीमधील कर विभागाने 2014-15 मध्ये जुन्या थकीत मागील पैकी केवळ 49.26% व चालू मागणीपैकी 80.66% एवढी वसुली केली आहे. तसेच अंदाजपत्रक पुस्तक व विभागाकडील विवरणानुसार प्रत्यक्ष वसुलीच्या रकमेत रु.80.33 लाख एवढी तफावत दिसून येते.

मनपा अमरावतीकडील एकूण उत्पन्नाच्या स्त्रोतांपैकी मालमत्ता कर हा एक प्रमुख स्त्रोत असून त्यामध्ये पुढील घटकांचा समावेश आहे. त्या संबंधाने अंदाजीत जमा व प्रत्यक्ष जमा महसूल पुढीलप्रमाणे आहे.

कर	अपेक्षित वसुली (रुपये)	प्रत्यक्ष वसुली (अंदाजपत्रकाप्रमाणे) (रुपये)
सामान्य कर	40,00,00,000/-	18,32,91,620/-
अग्नी कर	2,00,00,000/-	11,51,12,880/-
पाणीपट्टी कर	80,00,000/-	24,79,190/-
मोठया ईमारतीवरील कर	20,00,000/-	17,01,150/-
पथकर	2,65,00,000/-	1,53,52,550/-
वृक्ष कर	2,00,00,000/-	61,15,830/-
शिक्षण कर	6,00,00,000/-	4,35,28,840/-
रोजगार हमी कर	1,00,00,000/-	6706500/-
एकूण	**54,65,00,000/-**	**27,06,88,560/-**

या संदर्भात मूल्य निर्धारक-नी-करसंकलन अधिकारी यांनी सादर केलेल्या एकत्रित विवरणपत्रानुसार मालमत्ता कराची एकूण मागणी रु.39,33,95,648/- एवढी असून प्रत्यक्ष वसुली रु. 26,26,55,364/- एवढी

आहे.

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1.आकडेवारीत विसंगता :-

मालमत्ता करासंदर्भातील अंदाजपत्रक पुस्तिकेतील प्रत्यक्ष रकम व कर विभागाने सादर केलेल्या प्रत्यक्ष रकमांचे विवरण यात पुढीलप्रमाणे विसंगती आढळते.

बाब	अंदाजपत्रकाप्रमाणे (रुपये)	विवरणप्रमाणे (रुपये)	तफावत/विसंगती (रुपये)
अपेक्षित मागणी	54,65,00,000/-	39,33,95,648/-	15,31,04,352/-
प्रत्यक्ष वसुली	27,06,88,560/-	26,26,55,364/-	80,33,196/-

2.जुन्या थकीत मागणीची अल्प वसुली :-

कर विभागाकडील विवरणपत्रात थकीत व चालू मागणी स्वतंत्रपणे दर्शविलेली असून थकीत मालमत्ता करापैकी केवळ 49.21% एवढीच वसुली करण्यात आली आहे. मनपाकडील एकूण पाच झोन पैकी पश्चिम झोन (क्र.5) कडील अशी वसुली सर्वात कमी 30.83% एवढीच आहे.

3.चालू मागणीची वसुली :-

कर विभागाकडील विवरणपत्रानुसार सन 2014-15 मधील चालू मागणी रु.21,93,09,301 असून त्यापैकी रु.17,69,03,564 एवढी म्हणजे 80.66% एवढी आहे. त्यामध्ये पश्चिम झोन (क्र.5) यांनी केवळ 71.38% एवढीच वसुली केली आहे.

थकीत वसुली व सन 2014-15 मधील नियमित वसुली या संदर्भात प्रभागनिहाय सहाय्यक आयुक्त व त्यांचे अधिपत्याखाली वसुली निरीक्षक यांना दरमहा वसुलीचे उद्दिष्टे निश्चित करण्यात आल्याचे सन 2015-16 च्या मूळ अंदाजपत्रक पुस्तिकेतील प्रस्तावने वरून दिसून येते. असे असताना वसुलीची कमी टक्केवारी लक्षात घेता मनपा निधीतून वेतन घेणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांची उपयोगिता व कार्यक्षमतेमध्ये वाढ होणे गरजेचे वाटते.

DATABWM6901 (Ref No : 42)

5 शासनाने विहित केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे वार्षिक लेखे तयार करून ते लेखापरीक्षणास प्रमाणिकरणाकरिता सादर न करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 00 निधी

अनियमितता कलम : 9अ

वित्त विभागाचा शासन निर्णय, नगर विकास विभागचे परिपत्रक व NMAM मधील तरतुदीनुसार विहित केलेल्या पद्धतीप्रमाणे मनपाच्या वित्तीय विवरणपत्रासह, वार्षिक लेखे व त्यावरील महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, मनपा आयुक्त व स्थायी समिती यांचे मंजुरीसह अहवाल लेखापरीक्षणास प्रमाणिकरणाकरिता उपलब्ध् झाले नाहीत.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.स्थानिले-1010/प्र.क्र.26-ब/विमाप्रशा, दिनांक 31.3.2011 व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.लेखाप-2016/संक्र 25/ नवि-31, दिनांक 18.6.2016 नुसार तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीस अनुसरुन महानगरपालिकाकडील स्थायी समितीने मंजूर केलेले वार्षिक लेखे प्रमाणिकरणाकरिता मनपा लेखापरीक्षण विभागाकडे सादर करावयाचे बंधनकारक केले आहे. (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 107-अ)

नॅशनल म्युनिसिपल अकाऊंट मॅन्युअल (NMAM) मधील प्रकरण 31 (31.4 ते 31.8) मध्ये व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 106 (3) मध्ये वार्षिक लेख्यावरील स्थायी समितीची मंजूरी प्राप्त करणे पर्यंतची कार्यपध्दती स्पष्ट केली आहे.

या संदर्भाने अर्धसमास पत्र क्र.183, दिनांक 27/06/2017 अन्वये पुढील प्रमाणे वार्षिक लेखे प्रमाणीकरणासाठी सादर करण्याची सूचना मनपा प्रशासनाकडे सादर करण्यात आली होती.

1) Annual financial statement consisting of -
   i) Balance Sheet
   ii) Income & Expenditure Statement
   iii) Statement of Cash flows
   iv) Receipts & Payment account
   v) Notes to accounts
   vi) Financial performance indicators

2) Report of Municipal Chief Auditor

3) Municipal Commissioner's Reports on the Annual Financial Statement & the qualifications & comments made in the Report of the Municipal Chief Auditor.

4) Standing Committee's Action Taken Report on qqualification and comments made in the rreport of the Municipal Chief Auditor & the report of the Municipal Commissioner.

DRAFT

परंतु मनपाचे स्थायी समितीने मंजूर केलेले व त्यांचे ॲक्शन टेकन रिपोर्टसह असलेले पूर्ण वार्षिक लेखे प्रमाणिकरणाकरिता उपलब्ध नसल्याने विहित पद्धतीने तयार केलेल्या वार्षिक लेख्याची आवश्यक तपासणी करता आली नाहीत.

DATABWM6901 (Ref No : 9)

8 आरोग्य विभागातील कार्यरत श्रीमती वैशाली व.भुयार (शेंडे) प्रयोगशाळा तंतज्ञ यांची वेतननिश्चिती करताना चुकीची वेतनवाढ देवून मूळ वेतनात रु.58440/- व त्यावरील भत्ते एवढे अतिप्रदान केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 58440.00/-

मनपाचे आरोग्य विभागातील कर्मचा- यांच्या वेतननिश्चिती व वेतनवाढीमध्ये त्रुटया आढळल्या असून श्रीमती वैशाली भुयार यांना मुळ वेतनात रु.58440/- (व त्यावरील भत्त्ते) एवढे अतिप्रदान झाले आहे.

मनपा, अमरावतीचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणात आरोग्य विभागात कार्यरत श्रीमती वैशाली वसंतराव भुयार (शेंडे) यांची प्रथम नियुक्ती प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदावर रु.5500-175-9000 या वेतनश्रेणीत झाली असून त्या दिनांक 22.02.2008 रोजी सदर पदावर रुजू झाल्या.

सहाव्या वेतन आयोगानुसार शासन अधिसूचना वित्त विभाग क्र.आरपीएस/1209/सीआर/ 27/एसईआर, दिनांक 22.4.2009 मधील परिशिष्ट-3 मध्ये दर्शविल्याप्रमाणे त्यांना रु.9300-34800 + ग्रेड पे 4300 या वेतनबॅण्डमध्ये दिनांक 22.02.2008 पासून प्रथम नियुक्ती असल्यामुळे वेतन रु.10100/- व ग्रेड पे रु.4300 असे वेतन निश्चित केल्याची नोंद सेवापुस्तकामध्ये आहे. उक्त शासन अधिसूचनेतील क्रमांक 10 मध्ये नमुद केल्याप्रमाणे पुढील 30 जून पर्यंत सहा महिने सेवा पूर्ण होत नसल्यामुळे त्यांची पुढील वेतनवाढ 1 जुलै 2009 मध्ये देय राहील. परंतु श्रीमती भुयार यांना जुलै-2008 मध्ये रु.10100 + 440 = रु.10540 + 4300 ग्रेड पे अशी वेतनवाढ मंजूर करुन प्रदान करण्यात आले.

अनुज्ञेय व दिलेल्या वेतनाचा लाभाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	महिना व वर्ष	मंजूर व दिलेल्या	प्रत्यक्षात अनुज्ञेय	मुळ वेतनातील

		वेतनवाढी	वेतनवाढ	वार्षिक अतिप्रदान
1	2	3	4	5
1	जुलै-2008	10540+4300	10100+4300	440x12=5280
2	जुलै-2009	10990+4300	10540+4300	450x12=5400
3	जुलै-2010	11450+4300	10990+4300	460x12=5520
4	जुलै-2011	11930+4300	11450+4300	480x12=5760
5	जुलै-2012	12420+4300	11930+4300	490x12=5880
6	जुलै-2013	12930+4300	12420+4300	510x12=6120
7	जुलै-2014	13450+4300	12920+4300	530x12=6360
8	जुलै-2015	13990+4300	13450+4300	540x12=6480
9	जुलै-2016	14540+4300	13990+4300	550x12=6600
10	जुलै-2017 ते मार्च-2018	15100+4300	14540+4300	560x9=5040
			एकूण	58440

वरीलप्रमाणे आरोग्य विभागातील कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणीत चुकीच्या वेतनवाढी लागू केल्यामुळे मुळ वेतनात दिनांक 01.07.2008 ते 31.03.2018 पर्यन्त रु.58440/- व त्यावरील देय भत्ते एवढे अतिप्रदान झाल्याचे दिसून येते. सदर अतिप्रदानाची संपूर्ण रक्कम संबंधितांकडून वसुल करावी व वेतन नियमित करावे.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.38, दिनांक 15.02.2018 नुसार अनुपालन मागविले असता कोणतेही अनुपालन / खुलासा प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 38)

12 आयकर अधिनियम 1961 कलम 192 च्या तरतूदीनुसार मनपा सेवेतून सेवानिवृत्ती झालेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनातून आयकर कपात न करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :105 मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 206336060.00 /-

महानगरपालिका, अमरावती कार्यालयाने महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा-प्र5 दिनांक 22 फब्रूवारी 2008 तसेच आयकर अधिनियम 1961 कलम 192 च्या तरतूदीनुसार केन्द्र शासन वित्त विभाग अधिनियम 2013 नुसार विहीत दराने आहरण व संवितरण अधिकारी

यांनी आयकर कपात करणे बंधनकारक असतांना सुध्दा आयकर पात्र निवृत्तीवेतनधारकांच्या मासिक निवृत्तीवेतनातून नियमानुसार आयकराची कपात करण्यात आली नाही.

अमरावती महानगरपालीकेचे लेखापरीक्षणा दरम्यान सन 2014-15 या आर्थिक वर्षात प्रदान करण्यात आलेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या माहे जाने. 2015 चे मासिक निवृत्ती वेतन देयकाची पडताळणी केली असता निवृत्ती वेतनधारकाच्या निवृत्ती वेतनातून नियमानुसार आयकराची रक्कम कपात करुन शासनाकडे भरणा केली नसल्याचे दिसून आले.

1. वित्त विभाग शासन निर्णय क्र. आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा-प्र 5 दिनांक 22 फेब्रूवारी 2008 तसेच आयकर अधिनियम 1961 कलम 192 च्या तरतुदीनुसार केन्द्र शासन वित्त अधिनियम 2013 नुसार विहित दराने आहरण व संवितरण अधिकारी यांनी आयकर कपात करणे बंधनकारक आहे.
2. या संबंधाने मनपाकडील मासिक निवृत्तीवेतनाचे माहे जाने. 2015 चे देयके तपासतांना आयकर रकमांची कपात केल्याचे किंवा नमुना-16 निर्गमित केल्याचे व पर्यायाने केंद्र शासनाकडे कराचा भरणा केल्याचे अभिलेख्यावरुन दिसून आले नाही.
3. सन 2014-15 या वर्षात निवृत्तीवेतन धारकाच्या निवृत्तीवेतनातून कपात करण्यात आलेला आयकर व आयकर विभागाकडे भरणा करण्यात आलेला आयकर याबाबतची माहिती अर्धसमास पत्र क्र. 48 दिनांक 22/02/2018 नुसार उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु माहिती प्राप्त झाली नसल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 48)

27 स्थानिक संस्था कराची एकाच व्यापा-यांनी दुबार नोंदणी केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :392 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9अ

स्थानिक संस्था कर विभागाने एकाच व्यापा-याला दोन नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित केले असून संबंधित व्यापा-यांनी दोन्ही नोंदणी प्रमाणपत्रावर वेगवेगळा एल.बी.टी.शुल्काचा भरणा केलेला आहे. व्यापा-यांचे नियम 17 नुसार एक नोंदणी प्रमाणपत्र रद्द करुन मूळ प्रमाणपत्र ताब्यात घेवून सुधारित कर निर्धारण करुन स्थानिक संस्था कराच्या दंडासह रकमा संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

मनपा, अमरावतीचे स्थानिक संस्था कर विभागाचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणात स्थानिक संस्था कराची नोंदणीकृत व्यापा-यांची यादी तपासली असता एकाच व्यापा-याला दोन एल.बी.टी. नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित केल्याचे दिसून येते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील नियम क्र.9 नुसार व्यापा-यांनी आपल्या धंद्याची संपूर्ण माहिती सादर करुन नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे. तसेच नियम क्र.17 नुसार जादा असलेले नोंदणी प्रमाणपत्र रद्द करणे आवश्यक असताना तसे न करता व्यापा-यांनी दोन्ही क्रमांकावर एल.बी.टी.शुल्काचा भरणा केल्याचे दिसून येते.

तपशील खालीलप्रमाणे :- **सन 2014-15**

अ.क्र.	नोंदणी क्रमांक	व्यापा-याचे नाव	ठिकाण	एल.बी.टी.भरणा रक्कम
1	AMT020100310	HASMUKH TEA COMPANY	Amba Peth	31703
2	AMT020101917	HASMUKH TEA COMPANY	Amba Peth	16526
3	AMT020101770	RAJRASIK SADI CENTER	Amba Peth	312006
4	AMT020102178	RAJRASIK SADI CENTER	Amba Peth	123030
5	AMT020100850	SANJAY ELECTRICALS	Amba Peth	465850
6	AMT020101860	SANJAY ELECTRICALS	Amba Peth	4000
7	AMT020103308	SHREE MANGALAM	Amba Peth	5498
8	AMT0201052	SHREE MANGALAM	Amba Peth	266710
9	AMT020100497	BEAUTY COLLECTION	Amba Peth	3783
10	AMT020103554	BEAUTY COLLECTION	Amba Peth	9355
11	AMT030200083	GANDHI INDUSTRIES	Nemani Godaun	17133
12	AMT030200387	GANDHI INDUSTRIES	Nemani Godaun	2056
13	AMT020101298	JAGDAMBA AGENCIES	Amba Peth	5000
14	AMT020102039	JAGDAMBA AGENCIES	Amba Peth	56871
15	AMT020100269	PRIYA COLLECTION	Amba Peth	5857
16	AMT020102122	PRIYA COLLECTION	Amba Peth	8274
17	AMT020102356	R S TREADERS	Amba Peth	31124
18	AMT020103049	R S TRADERS	Amba Peth	587
19	AMT010200121	RAJ ENTERPRISES	Morbag	109036
20	AMT010200479	RAJ ENTERPRISES	Morbag	12200
21	AMT020300475	SHRI AGENCIES	Gourakshan	100899

DRAFT

22	AMT020300917	SHRI AGENCY	Gourakshan	3552
23	AMT030200224	SHRIRAM UDYOG	Nemani Godaun	3194
24	AMT030200554	SHRIRAM UDYOG	Nemani Godaun	13610
25	AMT020100763	SOMANI SONS	Amba Peth	64102
26	AMT020102043	SOMANI SONS	Amba Peth	2228
27	AMT020300372	SWASTIK TRADERS	Jawahar get	3551
28	AMT020101944	SWASTIK TRADERS	Jawahar	110513
29	AMT020101597	VYANKTESH TRADERS	Amba Peth	529594
30	AMT020101881	VYANKTESH TRADERS	Amba Peth	7853
			TOTAL	**2325695**

मनपाने वरील तक्त्यातील नमुद व्यापा-यांचे नियम 17 नुसार एक नोंदणी प्रमाणपत्र रद्द करुन मूळ प्रमाणपत्र ताब्यात घेवून व्यापा-यांचे सुधारित कर निर्धारण करुन स्थानिक संस्था कराच्या दंडासह रकमा संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

व्यापा-यांना दुबार नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित केल्याबाबत अर्धसमास पत्र क्र.130, दिनांक 16.4.2018 नुसार खुलासा मागविला असता "आक्षेपात नमुद व्यापाऱ्यांची नोंदणी व्हॅट रजिस्ट्रेशन असल्यामुळे व नंतर पुन्हा स्थानिक संस्था विभागात रजिस्ट्रेशन केल्यामुळे दोनदा प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. अशी दोन नोंदणी प्रमाणपत्रे रद्द करण्याची कार्यवाही सुरु आहे" असे दिनांक 19.4.2018 रोजी उत्तर प्राप्त झाले आहे. वास्तविक दोनदा प्रमाणपत्रे निर्गमित करण्याचे खुलाशात नमूद कारण संयुक्तिक नाही व प्रमाणपत्रे रद्द करण्याची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही, असे दिसते.

DATDSTM7301 (Ref No : 130)

37 प्रथम कालबद्ध पदोन्नती अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणी मध्ये वेतन निश्चित न करता चुकीची वेतनश्रेणी लागू केल्याने झालेल्या रु.70600 व त्यावरील भत्त्याचे अतिप्रदानाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 मनपा निधी
अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 70600.00/-

अग्निशमन विभागात कार्यरत श्री. विजयसिंह नैनासिंह चौहान, वाहन चालक यांना पाचव्या वेतन आयोगानुसार प्रथम कालबद्ध पदोन्नती अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणी मध्ये वेतन निश्चित न करता रु. 4500-125-7000 या वेतनश्रेणी मध्ये वेतन निश्चिती करून वेतन प्रदान केल्यामुळे दि.7.5.1996 ते 31.12.1995 पर्यंत रु 70600 व त्यावरील भत्त्याचे अतिप्रदान झाले आहे. दि.1.1.2006 व पुढील अतिप्रदान मनपाने निर्धारित करून वसूल करणे आवश्यक आहे.

श्री. विजयसिंह चौहान यांची अमरावती महानगरपालिका येथे वाहनचालक पदावर प्रथम नियुक्ती दिनांक 7.05.1984 रोजी झाली असून त्यांना 12 वर्षानंतर म्हणजे दिनांक 7.05.1996 पासून प्रथम कालबद्ध पदोन्नतीचा लाभ मंजूर करण्यात आला. त्याअनुषंगाने शासन निर्णय वित्त विभाग आरपीएस/1293/एसईआर-10 दि.10 डिसेंबर1998 नुसार त्यांना 4000-100-6000 ही वेतनश्रेणी मंजूर करून त्यांना दि 7.05.1996 पासून मंजूर करण्यात आली.

परंतु नंतर वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन 2000/प्रक्र10/सेवा- 3/ दिनांक 3 आगस्ट 2001 चा उल्लेख करून व आयुक्त मनपा अमरावती यांचे दिनांक 23.4.2002 चे मंजुरी आदेशानुसार प्रथम कालबद्ध पदोन्नती अंतर्गत 4500-125-7000 ह्या वेतनश्रेणीत सुधारित वेतन निश्चित करून दिनांक 7.5.1996 पासून सुधारित लाभ दिल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली आहे.

तद्नंतर सहाव्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार दि.1.01.2006 पासून वित्त विभाग अधिसूचना दि.22/4/2009 मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेतन 5200-20200 व ग्रेडवेतन रुपये 2800 एवढे प्रदान करण्यात आले व पुढे त्यानुसार वेतनवाढी देण्यात आल्या.
यावरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

शासन निर्णय वित्त विभाग क्र आरपीजी /1298/सीआर/1393/एस ईआर-10 दि.10 डिसेंबर 1998 नुसार पाचव्या वेतन आयोगानुसार वाहन चालक या पदाची मूळ वेतनश्रेणी रुपये 3050-75-3950-80-4590 ही असून कालबद्ध पदोन्नती/आश्वासित प्रगती योजनेंतर्गत त्या पदाला सुधारित वेतनश्रेणी 4000-100-6000 ही देय ठरविण्यात आली आहे. त्यामुळे श्री. चौहान वाहन चालक यांना वर दर्शविलेली व दिलेली वेतनश्रेणी चुकीची दिली असल्यामुळे त्यांना अनुज्ञेय वेतनश्रेणीत वेतन निश्चिती करून त्याबाबतची वसुलीची कार्यवाही करावी व अनुपालन सादर करण्यात यावे.

अनुज्ञेय व दिलेल्या वेतनाच्या लाभाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

महिना व वर्ष	मंजूर व दिलेली वेतनवाढ	प्रत्यक्षात अनुज्ञेय वेतनवाढ	मूळ वेतनात वार्षिक अतिप्रदान
7.5.1996	4500	4000	500x12=6000
1.5.1997	4625	4100	525x12=6300
1.5.1998	4750	4200	550x12=6600
1.5.1999	4875	4300	575x12=6900
1.5.2000	5000	4400	600x12=7200
1.5.2001	5175	4500	625x12=7500

1.5.2002	5250	4600	650x12=7800
1.5.2003	5375	4700	675x12=8100
1.5.2004	5500	4800	700x12=8400
1.5.2005	5625	4900	725x8 =5800
		एकूण	70600

वर दर्शविल्याप्रमाणे दिनांक 31.12.2005 पर्यंत एकूण मुळ वेतन रु.70600/- व त्यावरील भत्ते याचे अतिप्रदान करण्यात आले असून त्यापुढील दिनांक 01.01.2006 पासून सहाव्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय वेतनश्रेणीत वेतननिश्चिती करुन तसेच त्यानंतर दिनांक 7.5.2008 पासून दुस-या कालबध्द पदोन्नती अंतर्गत अनुज्ञेय वेतनश्रेणी वेतनाची गणना करुन झालेल्या अतिप्रदानाची वसुली करुन अनुपालन सादर करावे.

सदर प्रकरणाव्यतिरिक्त विभागातील अन्य कर्मचा-यांच्या वेतननिश्चितीचाही आढावा घेवून उचित सुधारणा व अतिप्रदानाबाबत आवश्यक कार्यवाही करुन त्याच्या तपशिलासह अनुपालन सादर करावे.

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 18, दि.30.1.2018 नुसार कार्यवाहीसह खुलासा मागविला असता तो प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 18)

40 पदे मंजूर नसल्यामुळे दवाखान्याच्या दोन (सुतिकागृह) इमारती बंद अवस्थेत पडून असतांना व पद निर्मिती संबंधाने नियोजन न करता नविन दवाखाना इमारती वरील खर्च झालेला रु. 83.56 लाख एवढा 13 व्या वित्त आयोगातील निधी अडकवून ठेवण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :360 शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 8356536.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 8356536.00/-

मनपाच्या मालकीच्या चार दवाखान्यापैकी दोन मोठे दवाखाने शासनाकडून पद मंजुरी अभावी बंद अवस्थेत पडून असताना पद निर्मितीचे नियोजन न करता तेराव्या आयोगांतर्गत रु. 1 कोटी प्राकलनमूल्याच्या दवाखाना बांधकामास मंजुरी देण्यात आली व त्यावर 2014-2015 मध्ये रु. 83.56 लाख एवढा खर्च करण्यात आला. सदरचे बांधकाम चालू असतांना कामात आवश्यक वाढ दर्शवून 2014-2015 मध्येच रु. 1.78 मूल्याच्या सुधारित प्राकलनासही मंजुरी देण्यात आली. परंतु पदेच उपलब्ध नसल्याने शासनाचा निधी अकारण अडकून पडण्याची शक्यता आहे.

मनपा अमरावती मालकीच्या आंतररुग्ण दवाखान्याच्या पुढीलप्रमाणे चार इमारती शहराच्या हद्दीत अस्तित्वात आहेत -

1) मोदी दवाखाना (सुतिकागृह) (12 खाट)- चालू अवस्थेत
2) आयसोलेशन दवाखाना (12 खाट) - चालू अवस्थेत
3) सावित्रीबाई फुले सुतिकागृह, बडनेरा - 2000-2001 मध्ये बांधकाम झाले तेव्हापासून बंद अवस्थेत. (क्षेत्र 2565 चौ.फुट)
4) तारखेडा दवाखाना - (मा. आमदार रावसाहेब शेखावत यांच्या आमदार निधीतून बांधकाम) बांधकाम वर्ष अनुपलब्ध, मनपा अमरावतीस हस्तांतरित (वर्ष अनुपलब्ध), हस्तांतरणापासुनच बंद अवस्थेत

वरील पैकी क्रं. 1 व 2 वरील सुतीकागृह चालू अवस्थेत असून क्र. 3 व 4 वरील सुतिकागृह व दवाखाना (अनुक्रमे) त्यांचा बांधकामापासूनच शासनाकडील पद मंजुरी अभावी बंद अवस्थेत आहेत. तथापि, नागरिकासाठी शहरात जिल्हा रुग्णालय व लॉर्ड डर्फरीन रुग्णालय (महिलांसाठी) सेवेस उपलब्ध आहेत.

<u>या वरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहे –</u>

राज्य शासनाने 1995 मध्ये मान्यता दिलेल्या सावित्रीबाई फुले सुतीकागृहसाठी दि 23.07.1999, 04.06.2001, 25.05.2002, 03.10.2002, 25.04.2003, 05.04.2003, 20.07.2004व 17.02.2014 च्या पत्रान्वये शासनाच्या नगर विकास विभागाकडे पद मंजुरीसाठी पत्र व्यवहार करण्यात आल्याचे नस्ती वरून दिसून येते. तथापि, त्यावर निर्णय न झाल्याने मनपाकडून स्थायी समितीच्या ठराव क्र. 89, दि. 07.11.2014 व सर्वसाधारण सभेच्या दि. 20.04.2015 च्या ठरावान्वये सदर सुतीकागृह सेवाभावी संस्थेस "ना नफा ना तोटा" तत्वावर चालविण्याच्या प्रशासकीय प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने Expression of Interest मागविण्याची कार्यवाही सुरु झाल्यावर मार्च 2018 पर्यंत अंतिम निर्णय झालेला नाही.

त्याचप्रमाणे वरील अ.क्र. 4 वरील दवाखान्याची इमारत मनपास हस्तांतरित झाल्याचे समजते. परंतु अद्याप ते सुरु झाले नसल्याचे संबंधीताकडून कळले. त्या संबंधीचे अभिलेख प्राप्त न झाल्यामुळे बांधकाम व हस्तांतरणाचा दिनांक, दवाखाना सुरु न झाल्याचे वास्तविक कारण समजू शकले नाही.

कर्मचारी अनुपलब्धतेमुळे वरील मोठे दवाखाने बंद असताना 13 व्या वित्त आयोगाच्या निधीतून रु. 1 कोटी प्राकलन मूल्याचे काम मंजूर करून स्थायी समितीचे ठराव क्र. 40, दि. 08.08.2014, 89 दि. 31.10.2014 व 150 दि 18.02.2015 अन्वये 5% अधिक दराच्या मे. जुझार सैफी यांच्या एकमेव प्राप्त निविदेस अंतिमतः मंजुरी देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. (सदर कामावर प्रमाणक क्र. 11959 दि. 25.02.2015 अन्वये रु. 83,56,536/- चे प्रदान कंत्राटदार मे. जुझार सैफी यांना झाल्याची लेखा शाखेकडील संगणकीकृत विवरणात आढळते.)

उपरोक्त दोन दवाखान्याच्या इमारतीप्रमाणेच नवीन दवाखान्याच्या अनुषंगाने सुध्दा पदे मंजुरीसाठी शासनाकडे प्रस्ताव मंजूर न करणे किंवा सुधारित आकृतीबंधाद्वारे (2014-2015 मध्ये 2005 मधील आकृतिबंध लागू) नवीन पदाच्या निर्मिती संबंधाने कोणतेही नियोजन करण्यात आल्याचे दिसत नाही.

सदर वस्तूस्थिती लक्षात घेता पूर्वीच अस्तित्वात असलेल्या दवाखान्याच्या दोन इमारतीसह नव्याने शासननिधीतून बांधकाम करण्यात येत असलेल्या दवाखान्याच्या इमारतीवर स्विकृत निविदेनुसार मूळ प्राकलन मूल्य रु. 1,00,31,214 /- मध्ये वाढ होऊन सुधारित प्राकलन मूल्य 1,78,21,412 /- यास स्थायी समिती ठराव क्र. 159, दि. 24.02.2015 अन्वये मंजुरी प्राप्त झाल्यामुळे होणारा संभाव्य एकूण खर्च रु. 1.78 कोटी (त्यापैकी 2014-15 मध्ये प्रत्यक्ष खर्च 83,56,536/-) निरर्थक ठरणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावरील शासन निधी निरर्थक बांधकाम खर्चाच्या स्वरुपात अकारण अडकवून ठेवण्यात आल्याचे स्पष्ट होते.

DATABWM6901 (Ref No : 30)

41 मंजूर अभिन्यासातील खुल्या जमिनीच्या वाटपाची प्रक्रिया पूर्ण झाली नसतांना स्वयंसेवी संस्थेद्वारे सदर जमिनीचा वापर सुरु असणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 2

DRAFT

लेखा शीर्ष :12 शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 614101.00 /-

मनपा अमरावतीच्या मौजा तारखेडा येथील मंजूर अभिन्यासातील खुल्या भूखंडाच्या वाटपास सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली असली तरी प्रत्यक्ष ठराविक कालावधीचा करारनामा न झाल्याने संबंधित स्वयंसेवी संस्थेस अधिकृतपणे वाटप झाले नाही हे स्पष्ट आहे . असे असतांना सदर भूखंडाचा विनियोग सबंधित संस्थेकडून सुरु असून व्यायामशाळेचे अनधिकृत बांधकाम केल्याची शक्यता आहे.

मनपा अमरावतीने मंजूर अभिन्यासातील खुल्या जमिनीचे वाटप विविध प्रयोजनाकरिता स्वयंसेवी संस्थांना केले आहे. मौजा तारखेडा सर्व्हे क्र. 50 मधील भूखंड क्र.2 या जागेची राजे छत्रपती बहुउद्धेशिय संस्था, विलास नगर, अमरावती यांनी व्यायामशाळेसाठी मनपास प्रस्तावाद्वारे मागणी केली. या प्रस्तावानुसार सर्व साधारण सभेने ठराव क्र.9, दि. 18.02.2014 अन्वये जमीन वापरमूल्य, भूयारी गटार अधिभार व ट्री गार्ड शुल्काच्या आकारणीसह भूखंड वाटपास मान्यता दिली.

1) जमीनवापर वार्षिक भाडे	- रु. 24,564
भूखंडाचे क्षेत्र	- 151.63 चौ.मी.
जमिनीचे मूल्य = 151.63 x रु. 4050 (2013 चारेडीरेकनरदर)	= रु. 614101
जमीनवापर मूल्य = 614101 x 50%	= रु. 3,07,050
जमिनीचे वार्षिक भाडे = 3,07,050 x 8%	= **रु. 24,564**
2) भुयारी गटार अधिभार	= **रु. 10,000**
3) ट्री गार्ड शुल्क	= **रु. 10,000**

नस्ती मधील टिपणीनुसार वरीलप्रमाणे दि. 11.07.2014 ते 10.07.2015 या एका वर्षाच्या कालावधीचे भाडे रक्कम रु. 24,564/- व अन्य शुल्काचे पावती क्र. 39 (पावती पुस्तक क्र.564) दिनांक (अनुपलब्ध) अन्वये सबंधित संस्थेने मनपाकडे भरणा केला.

<u>या वरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहे</u> -

1) वरील विवेचनानुसार सबंधित संस्थेला भूखंडाचे रितसर वाटप झाले नसल्याचे स्पष्ट होते. परंतु प्रथम वाचनालय व नंतर व्यायामशाळेसाठी केलेल्या मागणीच्या बदलासह 30 वर्षाकरिता भूखंडाचे वाटप व्हावे या जागा निरीक्षकांच्या प्रस्तावाच्या प्रकरणात अंतिम करारनामा अद्याप झाला नसल्याचे दिसून येते. आयुक्त मनपा यांनी या संदर्भात ‘ नियमासह चर्चा करा ’ अशी सूचना दिल्याचे नस्तीमध्ये दि. 17.02.2018 ची शेवटची नोंद आढळते.

असे असताना दि. 11.07.2014 ते 10.07.2015 या प्रथम वर्षाच्या भाडेकराराच्या कालावधी संपुष्टात

आल्याने मनपाने पुढील 3 वर्षासाठी म्हणजेच दि. 11.07.2015 ते 11.07.2018 साठी वार्षिक भाडे रक्कमेचे मागणी पत्रक दि. 01.08.2017 या पत्रान्वये निर्गमित केले. यावरून सदर जमिनीचा वापर अनधिकृतपणे संबंधित संस्थेकडून करण्यात येत असल्याची स्पष्ट होते. या जमिनीवर व्यायामशाळेच्या इमारतीचे अनाधिकृत बांधकाम झाल्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

2) सदर भूखंडाचे वाटप मंजूर करतांना सर्वसाधारण सभेने कोणत्याही अधिनियम/शासन निर्णयाचा आधार घेतल्याचे ठरावाच्या कार्यवृतामध्ये नोंद नाही. वास्तविक नगर विकास विभागाने शासन निर्णय दि. 10.06.1996 अन्वये संबंधित अभिन्यासातील भूखंडधारकांच्या गृहनिर्माण संस्थांनाच खुल्या जमिनीचे वाटप करता येते. त्यामुळे त्रयस्थ संस्थेची मागणी व सभेने घेतलेला ठराव शासन निर्देशास अनुसरुन नाही असे दिसते.

DATABWM6901 (Ref No : 137)

44 वैद्यकीय अधिकारी यांना नियमबाह्य व्यवसाय रोध भत्त्याचे रु. 4,18,053/- एवढे अतिप्रदान झाल्यामुळे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :157 मनपानिधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 418053.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 418053.00/-

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. मवैअ-2011/93.626/11/सेवा-3 दि. 07 ऑगस्ट 2012 नुसार महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक आरोग्य सेवेत ज्यांची नियुक्ती रुग्ण सेवेशी सबंधित वैद्यकीय अधिकारी पदावर झालेली आहे अशा सर्व रुग्णसेवेशी सबंधित केवळ सार्वजनिक आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनाच सदर शासन निर्णयातील तरतुदी लागू राहतील असे स्पष्ट नमूद केले असताना महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियमबाह्य व्यवसायरोध भत्ता लागू करण्यात आल्याने रु. 4,18,053/- एवढे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

महानगरपालिका. अमरावती येथील आरोग्य विभागात कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतन देयकाची तपासणी केली असता एकूण 5 वैद्यकीय अधिकारी/ सहाय्यक अधिकारी यांना मूळ वेतन अधिक ग्रेड पे च्या एकूण रकमेवर 25% दराने व्यवसायरोध भत्ता अदा करण्यात आल्याचे निदर्शनास आले. शासन निर्णय क्र. मवैअ-2011/93.626/11/सेवा-3, दि. 07 ऑगस्ट 2012 मधील तरतुदीनुसार केवळ राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनाच सदर शासन निर्णयातील तरतूद लागू असल्याचे स्पष्ट नमूद केले आहे. असे असताना मनपाचे आस्थापनेवर कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांना 25% दराने व्यवसायरोध भत्त्याचे नियमबाह्य प्रदान करण्यात आले.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत रुग्ण सेवेशी सबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना व्यवसायरोध भत्ता लागू करणेबाबत शासनाचे नगर विकास विभागाकडून शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक आहे. परंतु महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे मनपाचे आस्थापनेवर कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांना व्यवसायरोध भत्ता लागू करणेबाबत शासन निर्णय तपासणीत आढळले नाही.

परिणामी पुढे दर्शविलेल्या एकूण 5 वैद्यकीय अधिकारी / सहाय्यक वैद्यकीय अधिकारी यांना नियमबाह्यपणे प्रदान करण्यात आलेला. व्यवसायरोध भत्याची रकम त्यांना लागू करण्यात आलेल्या कालावधीपासून वसूल करणे आवश्यक आहे.

खालील दर्शविलेल्या वैद्यकीय अधिकारी यांना लेखापरिक्षण कालावधीत 2014-2015 यावर्षात पुढील प्रमाणे व्यवसाय भत्ता प्रदान करण्यात आला.

वैद्यकीय अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेला व्यवसायरोध भत्ता

अक्र.	वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव	कालावधी	एकूण वेतन (मूळ वेतन + ग्रेड पे) (रुपये)	अदा करण्यात आलेला 25% व्यवसायरोध भत्ता (रुपये)	व्यवसायरोध भत्य एकूण प्रदान (रुप
1	डॉ.सुषमा सुभाष ठाकरे	एप्रिल 14 ते जून 14 जुलै 14 ते मार्च 15	35810 36890	8952 9222	8952 x 3 = 26 9222 x 9 = 82
2	डॉ.सीमानामदेव नेताम	एप्रिल 14 ते जून 14 जुलै 14 ते मार्च 15	26250 27040	6562 6760	6562 x 3 = 19 6760 x 9 = 60
3	डॉ.श्यामसुंदर सोनी	एप्रिल 14 ते जून 14 जुलै 14 ते मार्च 15	28320 29170	7080 7292	7080 x 3 = 21 7292 x 9 = 65
4	डॉ. देवेंद्र गुल्हाने	एप्रिल 14 ते जून 14 जुलै 14 ते मार्च 15	26620 27420	6655 6855	6655 x 3 = 19 6855 x 9 = 61
5	डॉ. अजय दे. जाधव	एप्रिल 14 ते जून 14 जुलै 14 ते मार्च 15	19280 19860	4820 4965	4820 x 3 = 14 4965 x 9 = 44
	एकूण				**418**

वर दर्शविलेल्या तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे वैद्यकीय अधिकारी यांना सन 2014-2015

वर्षात एकूण रु.4,18,053/- एवढा व्यवसायरोध भत्ता प्रदान करण्यात आला असून त्यांना ज्या कालावधीपासून व्यवसायरोध भत्ता लागू करण्यात आला तेव्हापासूनची अतिप्रदान झालेली व्यवसायरोध भत्याची गणना करून त्यांचे मासिक वेतनातून अतिप्रदानाची वसुली करून मनपा निधी मध्ये जमा करावी.

तसेच मनपा आस्थापनेवर कार्यरत तसेच सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी यांना व्यवसायरोध भत्ता अदा केला असल्यास उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार अश्या सर्व वैद्यकीय अधिकाऱ्याकडून व्यवसायरोध भत्याची वसुली करून वसुली विवरणपत्रासह अनुपालन करावे.

या संदर्भात लेखापरिक्षण पथकाने त्यांचे अर्धसमास पत्र क्र. 62, दि. 27.02.2018 नुसार खुलासा मागविण्यात आला होता. परंतु याबाबत कोणताही खुलासा प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

DATVVBM6301 (Ref No : 62)

47 कर विभागातील कार्यरत श्रीमती सविता भगवंत पाटील, कनिष्ठ लिपिक यांची वेतननिश्चिती करताना चुकीची वेतनवाढ देवून मूळ वेतनात रु35400/- व त्यावरील भत्ते एवढे अतिप्रदान केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 35400.00/-

मनपाचे कर विभागातील कर्मचा-यांच्या वेतननिश्चिती व वेतनवाढीमध्ये त्रुटया आढळल्या असून श्रीमती सविता पाटील,कनिष्ठ लिपिक यांना मुळ वेतनात रु. 35400/- (व त्यावरील भत्ते) एवढे अतिप्रदान झाले आहे.

मनपा, अमरावतीयेथील कर विभागात कार्यरत श्रीमती सविता पाटील यांची प्रथम नियुक्ती कनिष्ठ लिपिक या पदावर रु.3050-75-3950-80-4590 या वेतनश्रेणीत झाली असून त्या दिनांक 21.05 2007 रोजी सदर पदावर रुजू झाल्या.

वेतनवाढीतील अतिप्रदान :-

सहाव्या वेतन आयोगानुसार शासन अधिसूचना वित्त विभाग क्र.आरपीएस/1209/सीआर/27/एसईआर,दिनांक 22.4.2009 मधील परिशिष्ट-3 मध्ये दर्शविल्याप्रमाणे त्यांना रु.5200-20200+ ग्रेड पे 1900 या वेतनबॅण्डमध्ये दिनांक 21.05.2007 पासून प्रथम नियुक्ती असल्यामुळे वेतन रु.5830 /- व ग्रेड पेरु.1900 असे वेतन निश्चित करण्यात आले. उक्त शासन अधिसूचनेतील क्रमांक 10 मधील तरतुदीनुसार

पुढील 30 जून पर्यंत सहा महिने सेवा पूर्ण होत नसल्यामुळे त्यांची पुढील वेतनवाढ 1 जुलै 2008 मध्ये देय होती. परंतु श्रीमती पाटील यांना प्रथम वेतनवाढ जुलै 2007 मध्येच दिल्याने त्यापुढील सर्व वेतनवाढी चुकीच्या मंजूर झाल्या आहेत.

अनुज्ञेय व दिलेल्या वेतनाचा लाभाचा तपशील व मूळ वेतनातील अतिप्रदान पुढीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	महिना व वर्ष	मंजूर व दिलेल्या वेतनवाढी	प्रत्यक्षात अनुज्ञेय वेतनवाढ	मुळ वेतनातील वार्षिक अतिप्रदान
1	2	3	4	5
1	जुलै-2007	6070+1900	5830+1900	240x12=2880
2	जुलै-2008	6310+1900	6070+1900	240x12=2880
3	जुलै-2009	6560+1900	6310+1900	250x12=3000
4	जुलै-2010	6820+1900	6560+1900	260x12=3120
5	जुलै-2011	7090+1900	6820+1900	270x12=3240
6	जुलै-2012	7360+1900	7090+1900	270x12=3240
7	जुलै-2013	7640+1900	7360+1900	280x12=3360
8	जुलै-2014	7930+1900	7640+1900	290x12=3480
9	जुलै-2015	8230+1900	7930+1900	300x12=3600
10	जुलै-2016	8540+1900	8230+1900	310x12=3720
11	जुलै-2017 ते मार्च 2018	8860+1900	8540+1900	320x08=2880
			एकून	35400

वरीलप्रमाणे कर विभागातील कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणीत चुकीच्या वेतनवाढी लागू केल्यामुळे मुळ वेतनात दिनांक 01.07.2007 ते 31.03.2018 पर्यन्त रु.35400 व त्यावरील देय भत्ते एवढे अतिप्रदान झाल्याचे दिसून येते. सदर अतिप्रदानाची संपूर्ण रक्कम संबंधितांकडून वसुल करावी व वेतनवाढी नियमित कराव्यात.

2) निलंबन :-

तसेच श्रीमती सविता पाटील यांना मा.आयुक्त ,मनपा अमरावती यांचे क्र.अमनपा/आयु/417 दि.13.6.2014 चे आदेशानुसार निलंबित करण्यात आले होते. निलंबनानंतर परत सेवेत घेतल्याची नोंद सेवापुस्तकामध्ये नाही.परंतु त्यांचे मूळ सेवापुस्तकानुसार त्यांना जुलै 2014पासून नियमित वेतनवाढी मंजूर केल्या आहेत.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.57, दिनांक 23.02.2018 नुसार अनुपालन मागविले असता कोणतेही अनुपालन / खुलासा प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे. सबब निलंबनाचे प्रकरणातील चौकशी, शिक्षा,

पुनर्स्थापाना या संबधीच्या आदेशाची सेवापुस्ताकामध्ये नोंद घेऊन त्याचा परिणाम वेतनवाढीवर होत असल्यास क्रमांक 1 वरील अतिप्रदान वसूल करावे व उपरोक्त आक्षेपास अनुसरून संपूर्ण वेतन वाढी नियमित कराव्यात.

DATVVBM6301 (Ref No : 83)

53 महानगरपालिका अमरावती येथे शासन निर्देशानुसार बंधनकारक असलेल्या दुहेरी नोंद पध्दतीने लेखे न ठेवणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :00 मनपा निधी
अनियमितता कलम : 9अ

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक लेखासं-10/2004/71/प्र.क्रं.5/04/नवि-31 दिनांक 6 जुलै 2005 नुसार महानगरपालिकेने दि. 01/04/2005 पासून लेखे दुहेरी नोंद पध्दतीने (Accrual based double entry accounting system) ठेवण्याबाबत सुधारणात्मक बाब म्हणून आदेशीत केले आहे. तथापि, महानगरपालिका अमरावती येथे लेखे दुहेरी नोंद पध्दतीने ठेवलेले आढळून आलेले नाही.

1) नागरी प्रशासनात सुधारणा घडवून आणणे व स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, त्याकरिता त्यांची पत वाढ होईल यादृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र शासनाने ज्या सुधारणा करणे बंधनकारक केले आहे, त्यातील अनिवार्य सुधारणामध्ये आधुनिक दुहेरी नोंद पध्दतीने लेखे ठेवणे होय. त्यानुषंगाने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक, लेखासं-10/2004/71/प्र.क्रं. 5/04/नवि -31 दिनांक 6 जुलै 2005 मध्ये नमूद असल्यानुसार स्थानिक संस्थांचे लेखे एकल नोंद पद्धती ऐवजी दुहेरी पध्दतीने (Accrual Based double entry accounting System) ठेवण्याबाबत आदेशीत केले आहे. सदरील नोंदवहया राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियमपुस्तिका (NMAM) मधील विहित नमून्यात महानगरपालिकेने ठेऊन दैनंदिन नोंदी घेणे आवश्यक आहे, परंतू पुढील नोंदवहया विहीत नमुन्यात ठेवण्यात आल्या नाहीत.

Sr. No.	Contents	Form
1.	Cash book	GEN - 1

2.	Journal book	GEN - 2
3.	Ledger	GEN - 3
4.	Cash bank receipt voucher	GEN - 4
5.	Cash bank payment voucher	GEN - 5
6.	Contra voucher	GEN - 6
7.	Journal voucher	GEN - 7
8.	Receipt	GEN - 8
9.	Receipt register	GEN - 9
10.	Statement on status of cheque received	GEN - 10
11.	Collection register	GEN - 11
12.	Summary of daily collection	GEN - 12
13.	Registers of bills for payments	GEN - 13
14.	Payment order	GEN - 14
15.	Cheque issue register	GEN - 15
16.	Register of advance	GEN - 16
17.	Register of permanent advance	GEN - 17
18.	Deposit register	GEN - 18
19.	Summary statement of deposits adjusted	GEN - 19
20.	Demand register	GEN - 20
21.	Bill of Municipal income	GEN - 21
22.	Summary statement of bills raised	GEN - 22
23.	Register of notice fee, warrants fees, other fee	GEN - 23
24.	Summary statement of notice fee, warrants fees, other fee	GEN - 24
25.	Register of refunds, remissions and write off	GEN - 25
26.	Summary statement refunds and remissions	GEN - 26
27.	Summary statement write - off	GEN - 27
28.	Statement of outstanding liability for expenses	GEN - 28
29.	Documents control register + stock account of receipt / cheque book	GEN - 29

2) उपरोक्त शासन निर्णयनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांना आपले लेखे दुहेरी नोंद पध्दतीने अद्ययावत ठेवण्याबाबत स्पष्ट सुचना आहेत. महानगरपालिकांना अशा दुहेरी नोंद पध्दतीची अंमलबजावणी दिनांक 1 एप्रिल 2005 पासून अनिवार्य केली असतांना अमरावती महानगरपालिकेणी सन 2016-17 या वित्तीय वर्षाच्या अखेर पर्यंत उपरोक्त लेखे दुहेरी नोंद पध्दतीत ठेवले नसल्याचे आढळून आले.

3) उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांनुसार दुहेरी नोंद लेखा पध्दत अंमलबजावणी साठी राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता तयार होईपर्यंत राष्ट्रीय लेखा नियमपुस्तीकेचा वापर करणे व

DRAFT

राष्ट्रीय नियमपुस्तीकेतील तत्वांना बाधा न आणता नगरविकास संचालनालयातील लेखा सुधारणा कक्षाचे पूर्ण संमतीने आवश्यक असल्यास त्यात किरकोळ बदल करणे व त्या अनुसार कोडींग पध्दतीचा वापर करणे अनिवार्य केले असून वार्षिक अंदाजपत्रक, ताळेबंद व Income and Expenditure Statement हे उपरोक्त सुचनेनुसार ठेवावयाचे आहे.

अर्धसमास पत्र क्रमांक 139 दिनांक 1 6/04/2018 अन्वये दुहेरी नोंद पध्दतीनुसार तयार केलेले लेखे उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली असता असे लेखे उपलब्ध झाले नाहीत. तथापि, उपलब्ध झालेल्या नोंदवह्या या पद्धतीनुसार नसल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 139)

54 मा.राज्यमंत्री यांच्या सत्कार समारंभासाठी गरजेपेक्षा अधिक व अवास्तव दराने शाल खरेदी केल्यामुळे वित्तीय औचित्याचा भंग होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 67560.00/-

मा.राज्यमंत्री यांच्या दि.27/12/2014 रोजीच्या सत्कार समारंभासाठी मनपाने रु.3499/- प्रत्येकी या अवाजवी तथा अवास्तव दराने शाली खरेदी केल्याचे दर्शविल्यामुळे महानगरपालिकेकडून वित्तीय औचित्याचा भंग झालेला आहे.

महानगरपालिकेने मा. राज्यमंत्री श्री प्रवीण पोटे व श्री रणजीत पाटील यांचा दि.27-12-2014 रोजी सत्कार समारंभासाठी रु.3499/-प्रती नग या दराने एकूण 7 शाल खरेदी करून त्यावर एकूण रु. 24493/- खर्च करण्यात आले. शालीचा उपरोक्त दर्शविलेला प्रती नग दर अवास्तव आहे.तसेच गरजेपेक्षा अधिक शाली खरेदी केल्याचे दिसून आले. गरजेपेक्षा अधिक शाली व त्याही अवास्तव दराने खरेदी करून महानगरपालिकेने मुंबई वित्तीय नियम-1959 मधील नियम क्र.58 मधील वित्तीय औचित्याचा भंग केलेला आहे असे लेखापरीक्षणाचे मत आहे. खरेदी केलेल्या वरील साहित्याची नोंद साठा नोंदवहीत आढळून आलेली नाही.

याबाबत अर्धसमास क्र.35 दि.12/02/2018 अन्वये खुलासा मागविण्यात आला.मात्र खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 35)

DRAFT

60 श्री. सुधीर श्यामराव कडू, आरोग्य कर्मचारी यांना चुकीची वेतननिश्चिती केल्यामुळे अतिप्रदान झाल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी निधी
अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 29880.00/-

महानगरपालिका अमरावती येथील आरोग्य विभागातील कार्यरत कर्मचाऱ्याना महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 (वेतन) मधील कलम क्र.11(1) अ नुसार वेतन निश्चिती न करता चुकीची वेतन निश्चिती केल्याचे आढळले असून श्री सुधीर शामराव कडू यांना मूळ वेतनात रु. 29880 व त्यावरील भत्ते एवढे अतिप्रदान झाले आहे.

आरोग्य विभागातील श्री सुधीर श्यामराव कडू, आरोग्य कर्मचारी हे दिनांक 7.1.1985 पासून कार्यरत आहेत. पाचव्या वेतन आयोगानुसार त्यांना दि.4.1.1997 पासून 4000-100-6000 या वेतनश्रेणी मधुन रु.4500-125- 7000 या वेतनश्रेणीमध्ये कालबद्ध पदोन्नती झाल्यामुळे वेतन निश्चिती करण्यात आली. दि.4.1.1997 रोजी विद्यमान वेतनश्रेणीमध्ये त्यांचे वेतन रु.4500 एवढे होते त्यानुसार वेतन रु. 4500 + 100 = 4600 व पुढील वेतनश्रेणी रु.4500-125-7000 यामधील पुढील टप्पा रु.4625 एवढे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 (वेतन) मधील कलम क्र.11 (1) अ नुसार वेतन देय होते परंतु त्यांना रु.4750 एवढे वेतन निश्चित करून प्रदान केल्याची नोंद सेवापुस्तकामध्ये आहे.

त्यामुळे श्री सुधीर शामराव कडू यांना दि.4.1.1997 पासून पाचव्या वेतन आयोगातील वेतन श्रेणीनुसार दि.4.1.1997 रोजी 4750 एवढ्या वेतनाऐवजी रु.4625 एवढे वेतन निश्चित करून त्याप्रमाणे पुढील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे दि. 30/06/2000 पर्यंतचा मूळ वेतनातील फरक रु.29880/- व त्यावरील भत्ते वसूलपात्र ठरते.

दि.01.07.2009 पासून त्यांना आश्वासित प्रगती योजने अंतर्गत रु.9300-34800+ग्रेडवेतन रु.4300 मंजूर केले आहे. मनपा अमरावती येथील एमपीडब्लू या पदास पदोन्नतीचे पद उपलब्ध नाही असे दिसते (असल्यास खुलासा व्हावा) नसल्यास हे पद एकाकी स्वरूपाचे असल्यास आश्वासित प्रगती योजने अंतर्गत मूळ पदाचे ग्रेड वेतन अधिक अतिरिक्त ग्रेड वेतन देय होईल. त्यामुळे रु.4300 या ग्रेड वेतनाचा व दिलेला अनुषंगिक लाभ अतिरिक्त व वसूल पात्र ठरेल. तरी दि. 01.07.2009 पासून पुढे

अतिप्रदानाची गणना करून अतिप्रदान झालेल्या रकमेची वसुली करावी व अनुपालन सादर करावे.

अनुज्ञेय व दिलेल्या वेतनाचा लाभाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

महिना व वर्ष	मंजूर व दिलेली वेतनवाढ	प्रत्यक्षात अनुज्ञेय वेतनवाढ	मूळ वेतनात वार्षिक अतिप्रदान
4.1.1997	4750	4625	125 x 12=1500
1.1.1998	4875	4750	125x12=1500
1.1.1999	5000	4875	125x12=1500
1.1.2000	5125	5000	125x12=1500
1.1.2001	5250	5125	125x12=1500
1.1.2002	5375	5250	125x12=1500
1.1.2003	5500	5375	125x12=1500
1.1.2004	5625	5500	125x12=1500
1.1.2005	5750	5625	125x12=1500
1.1.2006	10700+2800	10470+2800	230x6=1380
1.7.2006	11110+2800	10870+2800	240x12=2880
1.7.2007	11780+2800	11280+2800	500x12=6000
1.7.2008	12220+2800	11710+2800	510x12=6120
		एकूण	**29880**

याबाबत अर्धसमास पत्रा क्रमांक 38 दि.15.2.2018 नुसार अनुपालन मागविले असता कोणताही अनुपालन/खुलासा प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 38)

63 कु. उर्मिला एम. कासदेकर ए.एन.एम. आरोग्य विभाग यांना चुकीची वेतनवाढ लागू केल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत तसेच उपभोगलेली रजा खात्यात कमी खर्चीटाकण्यातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :157 मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन अधिसुचना क्र. वेपूर 1209/प्र.क्र.27/सेवा-9 दि.22.04.2009 नुसार कर्मचा-यांची नियुक्ती अथवा पदोन्नती दि.2 जानेवारी ते 30 जून या कालावधीत झाली असेल तर त्यांना त्यानंतरची देय होणारी वार्षिक वेतनवाढ त्याच आर्थिक वर्षात लागू न करता त्यानंतरच्या वर्षात 1 जुलै ला लागू होईल अशी नियमात तरतूद आहे. कु. उर्मिला एम. कासदेकर यांची नियुक्ती दि.23.05.2007 ला झाली असल्याने त्यांना त्यानंतरची वेतनवाढ दि.1.07.2008 ला देय असताना दि.1.07.2007 लागू केल्याने अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आले. तसेच त्यांनी उपभोगलेल्या अर्जित रजा व परावर्तीत रजा रजा लेख्यात कमी नोंदविण्यात आल्या आहे.

महानगरपालिका, अमरावतीचे आदेश क्र.अमनपा/साप्रवि/उपा/606 दि.23.05.2007 नुसार कु. उर्मिला एम. कासदेकर यांची नियुक्ती आरोग्य विभागात ए.एन.एम. या पदावर अनुकंपा तत्वावर वेतनश्रेणी 4000-100-6000 मध्ये झाली. त्यांना 6 व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी रु.5200-20200 ग्रेड-पे 2400 लागू करण्यात आली असून कु. उर्मिला एम. कासदेकर यांची नियुक्ती दि.23.05.2007 असल्याने उक्त शासन निर्णयातील तरतूदीनुसार त्यांना देय होणारी वार्षिक वेतनवाढ दि.1.07.2008 ला देय असतांना दि.1.07.2007 ला लागू करण्यात आल्याने एका वेतनवाढीचे अतिप्रदान होत असून त्यामुळे पुढे देण्यात येणा-या वेतनवाढी प्रभावीत होत आहे. तसेच संबंधीत कर्मचा-याने उपभोगलेली अर्जित रजा रजा लेखा खात्यात कमी नोंदविण्यात आली. व प्रसुती रजेची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आलेली नाही. याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे.

1. 6 व्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय वेतनश्रेणी रु. 5200-20200 ग्रेड-पे 2400 मध्ये देय असलेल्या व देण्यात आलेल्या वेतनवाढीचा लाभ पुढीलप्रमाणे -

अ.क्र.	वेतनवाढीचा दिनांक	अनुज्ञेय वेतनवाढ व ग्रेड-पे	अदा करण्यात आलेले वेतन व ग्रेड-पे
1	दि.23.05.2007 प्रथम नियुक्ती	7510+2400	7510+2400
2	1.07.2007	7510+2400	7880+2400
3	1.07.2008	7810+2400	8120+2400
4	1.07.2009	8120+2400	8440+2400
5	1.07.2010	8440+2400	8770+2400
6	1.07.2011	8770+2400	9110+2400
7	1.07.2012	9110+2400	9460+2400
8	1.07.2013	9460+2400	9820+2400
9	1.07.2014	9820+2400	10190+2400
10	1.07.2015	10190+2400	10570+2400

वार्षिक वेतनवाढ चुकीची लागू केल्याने त्यानंतर लागू केलेल्या वेतनवाढी प्रभावित होऊन वेतन तसेच त्यानुषंगाने मुळ वेतन व ग्रेड-पे वर लागू करण्यात आलेला महागाई भत्ता तसेच घरभाडे भत्त्यामध्ये अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास येते. तेव्हा अतिप्रदानाची वसुली करुन अनुपालन करावे.

DRAFT

2. उपभोगलेल्या अर्जित रजा व परावर्तीत रजा रजा लेख्यात कमी नोंदविण्याची अनियमितता-

अ. कु. उर्मिला एम. कासदेकर ए.एम.एन. यांनी वैद्दयकीय कारणास्तव दि.23.11.2009 ते 31.12.2009 एकुण 39 दिवस अर्जित रजा उपभोगली असून रजा लेख्यात मात्र 9 दिवसाची अर्जित रजा खर्ची टाकण्यात आली. त्यामुळे रजा लेख्यात 30 दिवस जास्तीच्या रजा दिसून येत आहे. रजा लेखा अद्यावत करून सेवापुस्तकात आवश्यक नोंदी घेवून अनुपालन करावे.

ब. उक्त महिला कर्मचा-यांने दि.21.05.2013 ते 21.11.2013 या कालावधीत एकुण 180 दिवस प्रसुती रजा उपभोगली असून याबाबतची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 74 नुसार तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्र. अरजा1409/प्र.क्र.-8/09/सेवा-6 दिनांक 24.08.2009 नुसार कमीत कमी दोन वर्ष अखंड सेवा झालेल्या महिला कर्मचा-यास दि.24.08.2009 पासून 180 दिवसाची पूर्ण वेतनी रजा अनुज्ञेय आहे. मात्र प्रसुती रजेचा अर्ज केल्याच्या तारखेस दोन पेक्षा कमी हयात मुले असलेल्यांनाच ही सवलत मिळते. सदर प्रकरणामध्ये संबंधीत कर्मचा-याने यापुर्वी प्रसुती रजेचा किती अपत्यासाठी किती वेळ लाभ घेतला याबाबतची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही. विभाग प्रमुखाने याप्रकरणी आवश्यक अभिलेख्याची पडताळणी करुन नियमानुसार आवश्यक त्या नोंदी सेवापुस्तकात नोंदवून अनुपालन करावे.

याप्रकरणी अर्धसमास पत्र क्र. 184 दिनांक 21/05/2018 नुसार आवश्यक अभिलेख खुलासा करण्यास सुचविले होते. परंतु खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे

DATDUBM6401 (Ref No : 184)

64 रमाई आवास योजनेतंर्गत पेव्हटेक कन्सल्टंट, पुणे यांना निविदा मुल्यापेक्षा जादा रकमेचे नियमबाहय प्रदान तसेच बांधकामातील त्रृटया व करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 07

लेखा शीर्ष :363 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 2574510.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 457563.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 6900.00/-

सामाजिक न्याय, विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.बीसीएच-2009/प्र.क्र.159/मावक-2 दिनांक 9.03.2010 नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी अमरावती मनपा क्षेत्रामध्ये घरकुल योजना राबविण्यासाठी पात्र लाभार्थ्यांचे Biometric Survery व लाभार्थ्यांचे प्रकरण तयार करणे तसेच Technical Supervision करण्यासाठी पेव्हटेक कन्सल्टंट, पुणे यांची एकूण 1293 घरकुलाचे कामासाठी रु.79 लक्ष ची निविदा मंजूर करण्यात आली होती. पेव्हटेक कन्सल्टंट, पुणे यांनी ठरवून दिलेल्या घरकुल संख्येपेक्षा जास्त घरकुलाचे काम केले असून स्थायी समितीच्या मंजूरीशिवाय प्रदान करणे, दोन वर्ष कालावधीचा लेखापरिक्षण अहवाल सादर केला नसतांना निविदेस मंजूरी देणे, कमी रकमेच्या मुद्रांक शुल्कावर करारनामा केल्याने शासन महसुलाची हानी होणे इत्यादी अनियमितता आढळून आल्या.

अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकासाठी घरकुल योजना राबविण्यासाठी पात्र लाभार्थ्यींचे Biometric Survery व लाभार्थ्यांचे प्रकरण तयार करणे व Technical Supervision करण्यासाठी दि.28.12.2011 ला अल्पमुदतीची (5 दिवस) निविदा सुचना प्रकाशित करण्यात आली. निविदा सुचनेतील अटी व शर्तीनुसार सल्लागारास अशा प्रकारचे काम केल्याचा कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव, राज्य शासन/केन्द्र शासन योजने अंतर्गत बांधकाम संबंधी Project Managrment Consultant म्हणून काम केल्याचा अनुभव तसेच सल्लागाराचा दोन वर्षाचे लेखापरिक्षण उलाढाल रु. 50.00 लक्षाचा अहवाल व तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते. परंतु याबाबतची पुर्तता न करताच निविदा मंजूर केल्याचे दिसून येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) नुसार करारनामा करण्यास मनपा स्थायी समिती ठराव क्र.223 दि.3.01.2012 नुसार मंजूरी देण्यात आली. मे. पेव्हटेक कन्सल्टंट, पुणे यांचेसोबत रु.6109/- प्रति घरकुल या दराने एकूण 1293 घरकुलाचे काम करणेबाबतचा करारनामा करण्यात आल्याचे नस्तीत नमूद आहे. परंतु त्यापेक्षा जादा घरकुलाचे काम केल्याने जादा कामाबाबत स्थायी समितीच्या मंजूरीशिवाय प्रदान करणे, तसेच कमी दराचे मुद्रांकावर करारनामा केल्याने शासन महसुलाचे नुकसान होणे इत्यादी अनियमितता आढळून आल्या.

यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत-

1. सदर प्रकरणी प्रकल्प सल्लागारांच्या नियुक्तीसाठी दि.28.12.2011 ला अल्पमुदत (5 दिवस) निविदा सुचना प्रकाशित करण्यात आली. कमीत कमी दोन वृत्तपत्रात जाहिरात देणे आवश्यक असतांना दि.28.12.2011 ला दैनिक लोकपथ हया एकाच व स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात दिल्याचे नस्तीतून दिसून येते. जाहिरातीमध्ये किती घरकुलाचे काम करावयाचे व त्यासाठी निश्चित केलेला दर नमूद केलेला नाही. तसेच सदर काम किती कामावधीत पुर्ण करावयाचे आहे, हे सुध्दा नमूद केलेले नाही. निविदा सुचना अल्पमुदत कालावधीची असल्याने पुरेसा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून येत नाही. असे असतांना मे. पेव्हटेक कन्सल्टंट यांची एकमेव निविदा मंजूर करण्यात आली. त्यामुळे शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि. 2 जाने.1992 मधील तरतूदीचे उल्लंघन झाले.

2. सल्लागारास निविदा सुचनेत नमूद काम केल्याबाबत अशा प्रकारचे कामाचा कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव तसेच राज्य शासन/केन्द्रशासन योजने अंतर्गत बांधकाम संबंधी Project Management Consultant म्हणून काम केल्याचा अनुभव आवश्यक आहे. परंतु असे प्रमाणपत्र नस्तीत आढळून आले नाही. सल्लागाराने अशा प्रकारच्या कामाबाबत मागील दोन वर्षाचे लेखापरिक्षण अंतीचे उलाढाल रु.50.00 लक्षचा अहवाल व तसे प्रमाणपत्र निविदा सादर करतांना जोडणे आवश्यक होते. परंतु सल्लागाराने लेखापरिक्षण सुरू असल्याचे निविदेत नमूद केले असून अशा प्रकारचे लेखापरिक्षण अहवाल व प्रमाणपत्र सादर केले नसतांनासुध्दा निविदा मंजूर केल्याने निविदा सुचनेतील अट क्र. 2 व 3 चे उल्लंघन झाले आहे.

3. करारनाम्यातील अट क्र. 2 नुसार योजनेच्या कामासंबंधी लाभार्थीचे सर्वेक्षण करणे, कच्च्या घराचे फोटो घेवून मोजमाप करणे व तसेच बायोमेट्रीक सर्व्हे करणे, लाभार्थी घर बांधण्यास स्वतःहून तयार

असल्यास त्याच्या उपलब्ध जागेनुसार आराखडा/नकाशा तयार करुन लाभार्थ्यांना पुरविणे व शासन निर्णयानुसार घरकुलाचे करुन घेणे तसेच त्या प्रकारचे अंदाजपत्रक लाभार्थ्यांना पुरविण्याची याबाबतची संपूर्ण जबाबदारी पेव्हटेक कन्सल्टंट, पुणे यांची होती. परंतु सदर कंपनीचे काम समाधारकारक नसल्याने मा. आयुक्त यांनी करारनाम्याती अट क्र.7 नुसार करारनामा रद्द केल्याचे दि.22.11.2016 च्या टिपणीत नमूद आहे. असे असतांना मे. पेव्हटेक कन्सल्टंट पुणे या एजन्सीने करारनामा रद्द केल्यावरही अतिरिक्त काम केल्याचे नमूद करुन अतिरिक्त कामाबाबत देयकाची मागणी केली आहे. परंतु संबंधीत एजन्सीने कोणते अतिरिक्त काम केले. याबाबतचा अहवाल सादर केलेला नाही. एजन्सीने किती घरकुलाचे सर्व्हेक्षण केले किंवा किती घरकुलाचे बांधकामाची पाहणी केले याबाबतचा अहवालही सादर केलेला नाही, असे दिसून येते. एजन्सी सोबत एकूण 1293 घरकुल बांधकामाकरीता करारनामा करण्यात आला असून असे असतांना एजन्सीने जास्त काम केल्याने अतिरिक्त मोबदल्याची मागणी केली. वाढीव कामाच्या अनुषंगाने अंदाजपत्रकात वाढीव तरतूद करुन घेण्यात आली नाही. तसेच अशा अतिरिक्त कामाबाबत मनपाच्या स्थायी समितीची मंजूरी घेण्यात आली नाही किंवा सुधारित आदेश काढण्यात आले नाही. त्यामुळे अशा कामासाठी प्रदान केले असल्यास ते नियमबाहय ठरते.

4. करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे बांधकामाची मोजमापे तंतोतंत राहतील याची जबाबदारी एजन्सीची राहिल. कोणतेही आगाउ देयक देण्यात आल्यास त्याची भरपाई महाराष्ट्र भूमी महसूल अधिनियमाप्रमाणे एजन्सीच्या मिळकतीतून करण्यात येईल. तसेच एजन्सीला प्रत्येक कामाचे दैनदिन प्रगतीचे मासिक अहवाल मनपास सादर करणे बंधनकारक होते. परंतु अशा प्रकारचे अहवाल नस्तीत आढळून आले नाही.

5. करारनाम्यातील अट क्र. 9 नुसार अंदाजपत्रकाशिवाय कोणतेही काम करावयाचे झाल्यास मनपा, स्थायी समिती ठरावाचे मान्यतेशिवाय आणि तांत्रिक मंजूरीशिवाय एजन्सी करणार नाही अशी अट नमूद असून ती सल्लागारास मान्य होती. असे असतांना मे.पेव्हटेक कन्सल्टंट, पुणे यांचेसोबत 1293 घरकुलांचे काम पुर्ण करण्याबाबत करारनामा करण्यात आला होता. परंतु मनपाचे कार्यकारी अभियंता यांनी जास्तीचे काम करणेबाबत आदेशीत केल्याने एजन्सीने वाढीव कामाचे देयकाची खालीलप्रमाणे मागणी केली असून त्यांचे प्रदान करण्यात आल्याची नोंद नस्तीत आहे.

63 x 6109 x 0.15 = रु. 57730/-
47 x 6109 x 0.20 =रु. 57424/-
92 x 6109 x 0.40 = रु. 224811/-
77 x 6109 x 0.25 = रु. 117598/-
एकूण रु.4,57,563/-

वाढीव कामास तांत्रिक मंजूरी नाही. तसेच वाढीव कामाचे अनुषंगाने प्रदान करण्यात आलेल्या रकमेस मनपाचे स्थायी समितीची मंजूरी घेण्यात आली नाही. त्यामुळे एजन्सीस प्रदान करण्यात आलेली रक्कम रुपये 4,57,563/- चे नियमबाहय प्रदान ठरते.

6. रमाई आवास योजनेतंर्गत एकूण 1293 चे घरकुलाचे कामाचा करारनामा मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 मधील परि. क्र. 1 नुसार व महसूल व वन विभाग, शासन अधिसुचना

DRAFT

दि.23.04.2006 नुसार करारनामा हा कार्यकंत्राटाची रक्कम रु.10 लाखापर्यंत रु.100/- चे मुद्रांकावर व पुढील प्रत्येक लाखासाठी रु. 100/- प्रमाणे अधिकतम रु. 5 लाखापर्यंतच्या मुद्रांकावर करणे आवश्यक आहे. रु. 79 लक्ष च्या कामासाठी रु.100/- चे मुद्रांकावर करारनामा केल्याने रु.6900/- एवढया महसुलाची हानी झाली.

7. मे.पेव्हटेक कन्सल्टंट, पुणे यांनी रमाई आवास योजनेतंर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलाचा ताबा संबंधीतांना देण्यात आलेला नाही त्यामुळे ब-याच लाभार्थींना विद्युत मिटर घेण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या. लाभार्थींच्या प्रकरणाची तपासणी केली असता निधीचा 5% चा 3 रा हप्ता मंजूर करतांना सादर केलेल्या घरकुलाच्या फोटोवरुन घरकुलाचे काम पुर्ण झाले नसल्याचे दिसून आले असे असतांनासुध्दा अंतिम हप्त्याचे प्रदान करण्यात आले. तसेच करारनाम्यातील अट क्र.12 नुसार डिफेक्ट लाएबिलीटीचा कालावधीत बांधकाम पडल्यास किंवा तांत्रिक चुकांमुळे नादुरूस्त झाल्यास सदर काम कंत्राटदाराकडून स्वत:चे जबाबदारीवर पुर्ण करुन देण्याची जबाबदारी संबंधीत एजन्सीची होती. परंतु घरकुलाचे काम पुर्ण झाले नसतांना डिफेक्ट लाएबिलीटीच्या कालावधी संपुष्टात आला नसतांनासुध्दा एजन्सीच्या चालू देयकातून कपात करण्यात आलेली 10% सुरक्षा ठेव रक्कम परत करण्याबाबत संबंधीत विभागाने प्रस्तावित केले. मे. पेव्हटेक कन्सल्टंट पुणे, यांचेकडून पुर्णत्वाचा अहवाल प्राप्त करुन तसेच Defect libelity period संपुष्टात आल्याबाबतची खात्री न करताच रु.789830/- एवढी सुरक्षा ठेव परत करण्याबाबतची नोंद नस्तीत आहे. परंतु प्रत्यक्षात सुरक्षा ठेव परत केली किंवा कसे? याबाबतचे प्रमाणक लेखापरिक्षणास प्राप्त झाले नाही.

उपरोक्त नमूद मुद्याचे अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.188 दि.25.05.2018 नुसार माहिती सादर करण्यात तसेच खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले होते. परंतु संबंधीत विभागाकडून माहिती व खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत असून रु.4,64,463/- एवढया रकमेची संबंधीताकडून वसुल करुन अनुपालन करण्यात यावे.

DATDUBM6401 (Ref No : 188)

71 श्री. अविनाश कात्रे लसटोचक यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ नियमबाह्य लागू केल्याने झालेल्या अतिप्रदान तसेच अर्हताकारी सेवेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :178 महानगरपालिका स्व-निधी निधी
अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 153594.00/-

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही 1095/प्रक्र-1/15/बारा दिनांक 8 जून 1995 नुसार गट क व ड कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने आलेली कुंठीतता घालवण्यासाठी दि.1आक्टो.1994 पासून कालबध्द पदोन्नती योजना लागू करण्यात आली. तसेच वित्त विभाग शासन निर्णय

क्र.वेतन1109/प्रक्र-44/सेवा-3 दि.1 एप्रिल 2010 नुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि.1 आक्टों. 2006 पासून लागू करण्यात आली. मनपाच्या आरोग्य विभागात कार्यरत श्री. अविनास यशवंत कात्रे लसटोचक (एकाकी पद) यांना सुधारित सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ नियमबाह्यपणे लागू केल्याने रु.153594/- चे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आले.

महानगरपालिका अमरावतीचे नियुक्ती आदेश क्र. निरंक दि.30.03.1979 नुसार श्री. अविनाश यशवंत कात्रे यांची ड्रेसर या पदावर 6 महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात आली. त्यांचे सेवापुस्ताकाची पडताळणी केली असता संबंधीत कर्मचा-यांस कालबध्द पदोन्नतीचे पदावर नियमित पदोन्नती देतांना पुनच्छ: वेतन निश्चिती करणे तसेच आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ लागू करताना ग्रेड-पे चुकीचा लागू करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

नियुक्तीचे दिनांकास लागू करण्यात आलेली वेतनश्रेणी रु.825-15-900EB20-1200

दि.1.10.1995 ला लागू केलेली कालबध्द पदोन्नतीची वेतनश्रेणी रु.950-20-1150EB25-1400

दि.1.1.1996 ची 5 व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी रु.3050-75-3950-80-4590

दि.6.02.2001 ला नियमित पदोन्नती देतांना लागू केलेली वे.श्रेणी रु. 3200-85-4900

मनपा आदेश दि.6.02.2001 नुसार वेतनश्रेणी 3200-85-4900 मध्ये लसटोचक पदावर दि.8.2.2001 नियमित पदोन्नती देण्यात आली. उक्त शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार कालबध्द पदोन्नतीच्या पदावर वेतननिश्चिती केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदावर पुनश्च: वेतननिश्चितीचा लाभ देय नसतांना संबंधीतास लसटोचक(एकाकी पद) पदावर प्रत्यक्ष पदोन्नती दिल्यानंतर पुनश्च: पदोन्नतीचा लाभ देण्यात आल्याने वेतननिश्चिती चुकीची ठरत असून वेतनात अतिप्रदान झाले आहे.

याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत:-

1. कालबध्द पदोन्नतीचा प्रथम लाभ दि.1.10.1995 पासून वेतनश्रेणी रु.950-20-1150-EB25-1400 (सुधारित वेतनश्रेणी रु.3050-4590) मध्ये लागू करण्यात आला. त्यानंतर आरोग्य विभागाने मनपा आदेश दि.6.02.2001 नुसार दि.8.02.2001 ला रु.3200-85-4900 मध्ये नियमित पदोन्नती मंजूर केली. संबंधीतास वेतनश्रेणी रु.3200-85-4900 देय ठरत नसतांना कालबध्द पदोन्नतीचे पदावर पुनच्छ: वेतननिश्चिती केल्याने अतिप्रदान झाले. श्री. कात्रे यांना एकाच पदावर नियमित 12 वर्षाची सेवा झाल्याने पदोन्नतीचे पद उपलब्ध नसल्याने एकाकी पदावरील कुंठीतता घालविण्यासाठी लसटोचक वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी दि.7.02.2013 ला (दुसरा लाभ) वेतन बँड रु.4440-7440 ग्रेड-पे 2000 मध्ये नियमबाहय लागू करण्यात आला. वरिष्ठ पदावर नियमित पदोन्नती देतांना यापुर्वीच वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी लागू केल्याने पुन्हा वेतननिश्चिती करणे नियमसंगत नाही.

पदोन्नती पदाचा तपशिल	अदा करण्यात आलेले वेतन (3200-85-4900)	देय असलेले वेतन (3050 - 4590)	अतिप्रदान रक्कम
दि.8.02.2001 ची वेतननिश्चिती	रु.4315	रु.4030	285x 7म.21दि. =रु.2209/-
दि. 1.10.2001	रु.4315	रु.4110	205x 4महिने

			=रु.820/-
दि. 1.02.2002	रु.4400	रु.4110	290x 8 महिने =रु.2320/-
दि. 1.10.2002	रु.4400	रु.4190	210X 4 महिने =रु.840/-
दि. 1.02.2003	रु.4485	रु.4190	295x 8 महिने =रु.2360/-
दि. 1.10.2003	रु.4485	रु.4270	215x 4 महिने =रु.860/-
दि. 1.02.2004	रु.4570	रु.4270	300x 6 महिने =रु.1800/-
दि. 1.08.2004(50%महा. वेतन)	रु.4570+रु.2285	रु.4270+रु.2135	450x 2 महिने =रु.900/-
दि. 1.10.2004	रु.4570+रु.2285	रु.4350+रु.2175	330x 4 महिने =रु.1320/-
दि. 1.02.2005	रु.4655+रु.2328	रु.4350+रु.2175	458x 8 महिने =रु.3664/-
दि. 1.10.2005	रु.4655+रु.2328	रु.4430+2215	338x 3 महिने = रु.1014/-
	एकूण		रु.18107/-

2. 6 व्या वेतन आयोगानुसार चुकीची वेतनश्रेणी व ग्रेड-पे लागू केल्याने झालेले अतिप्रदान-

श्री. अविनाश कात्रे लसटोचक यांची 5व्या वेतन आयोगानुसार रु. 3050-75-3950-80-4590 या वेतनश्रेणीला 6 व्या वेतन आयोगामध्ये 5200-20200 ग्रेड-पे 1900 देय असतांना वरीलप्रमाणे चुकीच्या 3200-85-4900 या वेतनश्रेणीच्या अनुषंगाने पर्यायाने चुकीचा वेतन बँड 4440-7400 ग्रेड-पे 2000 लागू करण्यात आल्याने अतिप्रदान झाले.

वेतननिश्चिती व वेतन वाढीचा तपशिल	अदा करण्यात आलेले वेतन 4440-7440 ग्रेड-पे 2000	देय असलेले वेतन 5200-20200ग्रेड-पे 1900	अतिप्रदान रक्कम
दि.1.1.2006 ची वेतननिश्चिती	5200-20200 ग्रेड-पे1900 रु.8660+2000	रु.8240+1900	520x 6महिने =रु.3120/-
1.07.2006 वेतनवाढ	रु.8980+2000	रु.8550+1900	530x 12महिने =रु.6360/-
1.07.2007 वेतनवाढ	रु.9310+2000	रु.8870+1900	540x 12महिने =रु.6480/-
1.07.2008 वेतनवाढ	रु.9650+2000	रू.9200+1900	550x 12महिने

			=रु.6600/-
1.07.2009 वेतनवाढ	रु.10000+2000	रु.9540+1900	560x 12महिने =रु.6720/-
1.07.2010 वेतनवाढ	रु.10360+2000	रु.9890+1900	570x 12महिने =रु.6840/-
1.07.2011 वेतनवाढ	रु.10730+2000	रु.10250+1900	580x 12महिने =रु.6960/-
1.07.2012 वेतनवाढ	रु.11120+2000	रु.10620+1900	600x7म.22दि. =रु.4671/-
	एकूण		रु.47751/-

3. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. आप्रयो1014/प्र.क्र.41/सेवा-3 दि. 5.07.2010 नुसार पदोन्नतीच्या संधी नसलेल्या एकाकी पदांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतंर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेड वेतनात सुधारणा करण्यात आली आहे. सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ (24 वर्ष) दि.1.10.2007 ला देय ठरते. लसटोचक हे पद आरोग्य विभागाच्या आस्थानेवरील एकाकी पद असून सदर पदास रु.1900+300=रु.2200 ग्रेड-पे देय असतांना रु.2300 ग्रेड-पे लागू केल्याने दि.7.02.2013 पासून अतिप्रदान झाले.

सुधा. आश्वा. प्रगती योजनेच्या पदावर वेतननिश्चिती	अदा करण्यात आलेले वेतन 4440-7440 ग्रेड-पे2000	देय असलेले वेतन 5200-20200ग्रेड-पे1900	अतिप्रदान रक्कम
दि.7.02.2013 आश्वासित ची वेतननिश्चिती	रु.11850+2300	रु.11000+2200	950x4 म.22 दिवस=रु.4546
1.07.2013 वेतनवाढ	रु.12280+2300	रु.11000+2200	1380x 12 महिने=रु.16560
1.07.2014 वेतनवाढ	रु.12720+2300	रु.11400+2200	1420x 12 महिने=रु.17040
1.07.2015 वेतनवाढ	रु.13170+2300	रू.11810+2200	1460x 12 महिने=रु.17520
1.07.2016 वेतनवाढ	रु.13640+2300	रु.12230+2200	1510x 12 महिने=रु.18120
1.07.2017 वेतनवाढ 31.03.2018 पर्यंत	रु.14120+2300	रु.12670+2200	1550x 9 महिने =रु.13950
	एकूण		रु.87736/-

वरील विवरणानुसार वेळोवेळी करण्यात आलेल्या चुकीच्या वेतननिश्चितीमुळे मुळ वेतनात रु.153594/- एवढे अतिप्रदान झाले असून मुळ वेतनावर महागाई भत्ता व इतर देय असलेले भत्ते याबाबतचे फरकाचे विवरणपत्र तयार करुन सर्व भत्त्यासह थकबाकीची वसुली करावी. उपरोक्त प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.170 दि.5.05.2018 नुसार आवश्यक अभिलेख तसेच आक्षेपित मुद्यावरील खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत

आहे.

DATDUBM6401 (Ref No : 170)

72 श्री. टि. एस. भोसले से. नि. क्रीडा अधिकारी यांना बडतर्फ कालावधीतील नियमबाहय वेतनाचे प्रदानाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 07

लेखा शीर्ष :253 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 500487.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 178908.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2475.00/-

महानगरपालिका, अमरावती अंतर्गत क्रीडा विभागातीत श्री. टि. एस. भोसले से. नि. क्रीडा अधिकारी यांना दि. 05.06.2004 ते 02.03.2007 या कालावधीकरीता बडतर्फ करण्यात आले होते. मनपा प्रशासनाने बडतर्फीचे आदेश रद्द करुन त्यांना दोषमुक्त करण्यात येत आहे, असे आदेश काढणे आवश्यक होते. परंतु आयुक्त यांनी सक्षम मंजूरीशिवाय संबंधीत कर्मचा-यास बडतर्फ कालावधीतील थकबाकी वेतनाचे प्रमाणक क्र. 12880 दि.17.03.2015 रु.178908/- नुसार प्रदान करण्यात आले. संबंधीत कर्मचा-यास मनपा ठराव क्र.169 दि.20.02.2007 चे आदेशान्वये मनपा सेवेत रुजू करून घेण्यात आले. त्यांना बडतर्फीच्या कालावधीत वाहतूक भत्ता देय नसताना अदा करणे, निर्वाह भत्ता अदा केला असल्यास त्याचे समायोजन न करणे, बडतर्फीच्या कालावधीत कुठेही सेवा दिल्याचे प्रमाणपत्र न घेणे इत्यादी प्रकरणी नियमानुसार कार्यवाही न केल्याने अनियमितता घडून आली.

मनपा अमरावती मध्ये कार्यरत क्रीडा अधिकारी श्री. टी. एस. भोसले यांना दि.5.06.2004 रोजी सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. त्यावर श्री. भोसले यांनी स्थायी समितीकडे दाखल केलेल्या अपीलावर विचार करुन स्थायी समितीने दि.12.10.2006 च्या ठरावानुसार व सर्वसाधारण सभेने ठराव क्र.169 दि.20.02.2007 अन्वये त्यांना सेवेत पुर्ववत सामावून घेण्याचा निर्णय घेतला. त्यास अनुसरून 24.06.2004 ते 2.03.2007(दिनांकात विसंगती) हा सेवाबाहय कालावधी सेवाकाळ समजण्यात येणार नाही. परंतु सेवानिवृत्ती वेतनासाठी ग्राहय असेल असे आयुक्तांनी दि.3.03.2007 च्या आदेशात नमूद करुन श्री. भोसले यांना सेवेत परत घेतले. तथापी, बडतर्फीच्या कालावधीचे वेतन मिळण्यासाठी श्री. भोसले यांनी विनंती केली. तत्कालील कार्यालय अधिक्षक व विधी

अधिकारी यांच्या शिफारशीच्या आधारावर तत्कालील आयुक्त यांनी क्र.508 दि.6.08.2014 च्या आदेशान्वये उपरोक्त कालावधी सेवाकाळ गृहीत धरुन त्या कालावधीचे वेतन व सेवानिवृत्ती वेतनास मंजूरी दिली. त्यानुषंगाने त्यांना जून 2004 ते फेब्रू.2007 या कालावधीच्या रु.178908/- या थकीत वेतनाचे प्रदान केले.

यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत-

1. या प्रकरणात खालील मुद्यावरील माहिती, आदेश, ठरावाची प्रत, सेवापुस्तक व वैयक्तीक नस्त लेखापरिक्षणास सादर करणेबाबत अर्ध. पत्र क्र.189 दि.28.05.2018 नुसार कळविण्यात आले होते. परंतु खाली मुद्यावरील माहिती व अभिलेख लेखापरिक्षणास प्राप्त झाले नाही.

अ. श्री. टि. एस. भोसले यांना कुठल्या कारणास्तव सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. याप्रकरणी त्यांचे विरुध्द करण्यात आलेली विभागीय चौकशीचा अहवाल तसेच त्यांचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप याबाबतचा अहवाल

ब. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56 (4) नुसार केलेली कार्यवाही, तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 451(1)(2)(3) नुसार केलेली कार्यवाहीचा अहवाल

क. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 451(3) नुसार अमरावती मनपाचे सर्वसाधारण सभेने घेतलेला ठराव क्र.169 दि.20.02.2007 प्रशासकिय दृष्टया योग्य नसल्याने मनपा प्रशासनाने विखंडीत करण्यासाठी शासनाचे नगर विकास विभागास सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत

ड. सदर प्रकरणी मनपा प्रशासन, स्थायी समिती व सर्वसाधारण सभेने वेळोवेळी केलेली कार्यवाही याबाबतच्या संपूर्ण नस्ती इत्यादी.

2. श्री. भोसले से. नि. क्रीडा अधिकारी दोषमुक्त झाले नसतांना त्यांना अंतीमत: कोणत्याही प्रकारची शिक्षा न होता बडतर्फीचा कालावधी थेट सेवाकाळ गृहीत धरून या कालावधीचे वेतन व भत्ते तसेच पुढील सेवा निवृत्तीवेतन मंजूर करण्यात आले, ते लक्षात घेता त्यांना अप्रत्यक्षपणे कोणतीही फेरचौकशीची आवश्यक कार्यवाही न करता त्यांना सर्व लाभ मंजुर करुन अप्रत्यक्षपणे दोषमुक्त घोषीत केल्याचे दिसते. ही बाब महाराष्ट्र विभागीय चौकशी नियमपुस्तीकेतील विविध तरतूदींच्या विरुध्द आहे.

3. महाराष्ट्र नागरी सेवा नियम, 1981 च्या नियम 70 नुसार बडतर्फीची, सेवेतून काढून टाकण्याची किंवा सक्तीच्या सेवानिवृत्तीची कारवाई अपिलाच्या किंवा पुनर्विलोकनाच्या निकालानुसार रद्द ठरविण्यात येऊन कर्मचा-यास पुन्हा सेवेत घेण्यात आले असेल तेव्हा वेतन व भत्ते आणि कामावरील अनुपस्थितीचा कालावधी नियमित करणे आवश्यक आहे. संबंधीत कर्मचा-यांस बडतर्फ केले असल्याने बडतर्फ कालावधीतील वेतन भत्ते अदा करणेबाबत आदेश काढणे आवश्यक होते. परंतु तसे आदेश नस्तीत आढळून आले नाही. असे असताना बडतर्फ कालावधीतील वेतन भत्त्याची थकबाकी प्रमाणक क्रमांक 12880 दि. 17/03/2015 रु.178908/- नुसार अदा केली.

4. महाराष्ट्र नागरी सेवा (निलंबन, बडतर्फी व सेवूतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, 1981 च्या नियम 66 नुसार सेवेतून बडतर्फ करण्यात आलेल्या किंवा काढून टाकण्यात आलेल्या कर्मचा-याचे वेतन व

भत्ते, त्याला सेवेतून बडतर्फ केल्याच्या किंवा काढून टाकल्याच्या तारखेपासून देणे बंद होते. बडतर्फ कर्मचा-यास दोषमुक्त होऊन सेवेत पुन्हा सामावून घेतले असेल अशा प्रकरणी बडतर्फीच्या कालावधीतील संपुर्ण वेतन भत्त्याचे प्रदान करण्यासाठी सक्षम अधिका-यांनी रितसर विभागीय चौकशीमध्ये दोषमुक्त आढळल्यास त्यांना दोषमुक्त करण्यात येत आहे, असे स्पष्ट आदेश काढून थकबाकीचे प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु आयुक्त मनपा अमरावती यांनी रितसर कार्यवाही न करता 2007 चे तत्कालीन आयुक्तांचे आदेश पुर्णत: बदलून 2014 मध्ये नियमबाहय आदेश जारी केले व बडतर्फीच्या कालावधीचे संपूर्ण वेतन मंजुर केले. महाराष्ट्र नागरी सेवा (निलंबन, बडतर्फी व सेवूतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, 1981 च्या नियम 70(2) नुसार बडतर्फ कर्मचा-यास तो दोषमुक्त असल्यास संपुर्ण वेतन भत्त्याचे प्रदान देय ठरते. या प्रकरणात दोषमुक्त करण्यात आले किंवा नाही, याबाबत दस्ताऐवज लेखापरिक्षणास सादर केले नाही.

5. मनपा आयुक्त अमरावती यांचा आदेश क्र.अमनपा/साप्रवि/आयु/508/14 दि.06.08.2014 चे मंजूरी आदेशान्वये दि.05.06.2004 ते 2.03.2007 या बडतर्फ कालावधीतील थकबाकी प्रमाणक क्र.12880 दि.17.03.2015 रु.178908/- नुसार प्रदान करण्यात आली. देयकासोबत जोडलेल्या अभिलेख्यावरून बडतर्फीचे कारण स्पष्ट होत नाही. याबाबत मुळ नस्ती मागणी करुनही लेखापरिक्षणास प्राप्त झाली नाही. परिणामी सखोल तपासणी करता आली नाही. सदर आक्षेप नोंदविण्यात येत आहे. मनपा प्रशासनाने सर्वसाधारण सभेचा बडतर्फ कर्मचा-यास पुन:श्च सेवेत घेण्याचा घेतलेला निर्णय हा सविस्तर चौकशाअंती संबंधीत कर्मचारी दोषमुक्त सिध्द न होता घेतला असल्यास तो रद्दबातल करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56 (4) नुसार कार्यवाही केली नाही. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 451(1) (2)(3) नुसार कुठलीही कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी मनपा प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरिक्षणास प्राप्त झालेला नाही.

6. बडतर्फीच्या कालावधीत वाहतूक भत्ता देय नसतांना अदा करण्यात आला. त्यामुळे वाहतूक भत्याची रु.2475/-प्रदान करण्यात आलेली रक्कम वसुलपात्र ठरते. वसुलीची कार्यवाही करुन मनपा खात्यात भरणा करण्यात यावी.

7. महाराष्ट्र नागरी सेवा (निलंबन ,बडतर्फी व सेवूतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, च्या 198: नियम 70(8) नुसार कर्मचा-यास पुन्हा सेवेत घेण्यात आल्यानंतर कर्मचा-याला या नियमाखाली करण्यात येणा: कोणतेही प्रदान, त्या कर्मचा-याला सेवेतून काढून टाकल्याची, त्याच्या बडतर्फीची किंवा यथास्थिती त्याला पुन्हा सेवेत घेतल्याची तारीख यामधील काळात कोणतीही नोकरी करून काही रक्कम मिळविली असल्यास रकमेशी समायोजीत होणे आवश्यक असते. संबंधीत कर्मचा-यांने बडतर्फ कालावधीत कुठेही शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी संस्थेत सेवा केली नाही, याबाबतचे प्रमाणपत्र घेण्यात आले नाही. बडतर्फ कालावधीत निर्वाह भत्त्याचे प्रदान करण्यात आले किंवा कसे, याबाबत नस्तीत नोंद नाही. निर्वाह भत्ता अदा केला असल्यास त्याचे समायोजन होणे आवश्यक आहे. परंतु निर्वाह भत्त्याचे समायोजन केल्याचे देयकात आढळून येत नाही.

उपरोक्त मुद्याचे अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.189 दि.28.05.2018 नुसार मागणी केलेले अभिलेख

व खुलासा सादर करण्यात आला नाही. परिणामी बडतर्फीच्या कालावधीतील प्रदान करण्यात आलेली थकबाकीची रक्कम रु.178908/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत असून तसा आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 189)

76 आर्थिक क्षमतेपेक्षा तिप्पट मुल्यांची शासन निधीतील बांधकामे एकाच कंत्राटदारास मंजूर करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :353 शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमानुसार मे. वऱ्हेकर या कंत्राटदारास वर्षभरात रु. 1.50 कोटी मूल्याच्या त्यांच्या वार्षिक आर्थिक क्षमतेच्या मर्यादित मंजूर करणे आवश्यक असताना 2014-2015 मध्ये रु. 4.22 कोटी मूल्याची शासन निधीतील तब्बल 29 कामे स्थायी समितीच्या ठरावानुसार मंजूर केल्याने नियमाचे उल्लंघन होवून झालेल्या कामाची गुणवत्ता राखता आली नसल्याची शक्यता नाकारता येत नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील नियम 197 नुसार बांधकाम कंत्राटदाराची नोंदणी करण्यात येते. त्यांच्या नोंदणी प्रमाणपत्रात त्याची वार्षिक कामे करण्याची आर्थिक क्षमता नोंदविण्यात येऊन वर्षभरात त्यास दिलेल्या कामाचे मूल्य त्याच्या क्षमतेहून अधिक असता कामा नये असे त्याद्वारे निर्देशित करण्यात येते.

परंतु अतिवृष्टी रस्ते दुरुस्ती विशेष अनुदानांतर्गत दि. 08.05.2014 रोजी निविदा सूचना प्रसिद्धी मधील 43 कामापैकी रु. 4.70 कोटी मूल्याची एकूण 29 कामे तुलनात्मक विवरणातील सर्वात कमी दर या तत्वानुसार मे. आर.एस. वऱ्हेकर या एकाच कंत्राटदारास देण्यात आले.

<u>यावरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.</u>

मे.आर.एस. वऱ्हेकर यांना मनपा अमरावतीने दिलेल्या क्र. अमनपा/बावि/शअ/नों./15/2013 दि. 29.09.2013 या नोंदणी प्रमाणपत्रानुसार त्याची 'वार्षिक कामे करण्याची आर्थिक क्षमता रु. 1.50 कोटी पर्यंत (वर्ग-4)' अशी निश्चित करण्यात आली आहे. सदरचे प्रमाणपत्र दि. 10.09.2013 पासून 3 वर्षे म्हणजे 09.09.2016 पर्यंत वैध असल्याने या कालावधीत दरवर्षी त्यांना रु.1.50 कोटी पर्यंतचीच कामे देणे आवश्यक होते.

परंतु मे. आर.एस. वऱ्हेकर 2014-2015 मध्ये रु. 1.50 कोटीच्या मर्यादेत काम करण्यास पात्र असताना

त्यांना रु. 4.70 कोटी मूल्याची एकूण 29 कामे स्थायी समितीच्या (ठराव क्र.99 दि. 15.11.2014) मंजुरीने देण्यात आली.

(रकम रुपयांत)

अ.क्र.	कामाचे नाव	स्विकृत निविदा दरानुसार कामाची किंमत
1	पंचवटी चौक ते ITI कॉलोनी मिनीबायपास पर्यंत रस्ता डांबरीकरण	1380594
2	कॅप शॉर्ट रोड वरील सौरभ कॉलोनी पासून वलगाव रोड वरील दुर्गा शॉ मिल जंक्शन पर्यंत रस्ता डांबरीकरण	1184934
3	पॅरॉडाईज कॉलोनी ते नौवोद्य विद्यालय पर्यंत डांबरीकरण	1154968
4	कृषी उत्पन्न बाजार समिती ते पाठ्यपुस्तक महामंडळ HTL रोड जंक्शन ते महेंद्र कॉलोनी पर्यंत रस्ता डांबरीकरण	1540251
5	महेंद्र कॉलोनी पासून पॅरॉडाईज कॉलोनी वलगाव मुख्य रस्त्या पर्यंत कडबी बाजार पर्यंत रस्ता डांबरीकरण	1386025
6	कलेक्टर ऑफिस चौकपासून गजानन महाराज विद्यालय ते मिनीबायपास डांबरी रस्ता दुरुस्ती करणे.	1439747
7	पवार फोटो स्टुडिओ HVPM भूतेश्वर चौक साईनगर जंक्शन पर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती करणे.	1379103
8	HVPM पासून मुधोडकर पेठ दिपार्चन डांबरी रस्ता दुरुस्ती करणे	1455179
9	रेल्वे स्टेशन चौक बेलपुरा राजापेठ पर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती करणे	1179488
10	राजकमल चौक ROB जोगडेकर प्लॉट ते चांदूर रेल्वे रोड पर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती करणे	1179488
11	नागपुरी गेट पठान चौक गेट ते अकोलकर यांच्या घरापर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती करणे	1189990
12	एसआरपी क्वार्टर मधील डांबरी रस्ता दुरुस्ती करणे	1774567
13	आदर्शनगर ते सिपना इंजिनीरिंग कॉलेज पर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती करणे	2652171
14	साईनगर येथील साई मंदिर पासून ते उदय कॉलोनी ते रेल्वे स्टेशन डांबरीकरण करणे (संतोषी माता मंदिर, अबुमिय्या दर्गा क्रांती कॉलोनी कृष्णार्पण कॉलोनी, गुप्ता चक्की, विठ्ठल मंदिरापर्यंत, अंबाडकर ते कोहडे 60 फुट रस्ता दुरुस्ती करणे)	2145980
15	नेमाणी गोडाऊन भरतनगर पुरे ले ऑउट पारिजात कॉलोनी भागातील डांबरी रस्ते दुरुस्त करणे.	2107334
16	प्र.क्र.33 मध्ये दीपनगर न.1 व 2 शुभम कॉलोनी दस्तूर नगर प्रभाग परिसरातील डांबरी रस्ते दुरुस्त करणे.	2262951
17	नवसारी येथील महेशनगर साकोम यांचे घरासमोरील रस्ता कॉशिक	1280494

DRAFT

	विहार येथील वाटाणे यांचे घरासमोरील रस्ता, काळे व पाटील यांचे घरासमोरील रस्त्याची डांबरी दुरुस्ती करणे.	
18	जोगडेकर प्लॉट येथील वर्धासा आप्पा यांचे दुकानापासून डॉ. डफळे यांचे दवाख्यान्यापर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती	1920915
19	कॅम्प सर्किट हाउस ते जेल ते महापौर बंगला पर्यंत रस्ता दुरुस्ती करणे.	1244636
20	फ्रेजरपुरा येथील तशशिला महाविध्यालय ते भगतसिंग चौक ते मिनीबायपास पर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती करणे.	2237657
21	सूदर्शन बिल्डींग ते गणेशनगरपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	1023752
22	प्र.13 विद्या कॉलोनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे	957143
23	इतवारा बाजार ते मटन मार्केट ते रतनगंज मस्जिद समोर ते अन्सार नगर ते फ्रेंड्स स्कूलचे गेटपर्यंत रस्ता दुरुस्ती करणे	1504802
24	अनवळनगर श्री धावडे ते तेल्मोरे ते देशमुख कॉम्पलेक्सपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	890971
25	कलोती नगरा बेनोडा भागातील डांबरी रस्त्याची दुरुस्ती करणे	3227045
26	प्र.13 मधील पारश्री दवाखाना ते इर्विन चौकापर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती करणे	1574886
27	रहाटगाव गावठाण ते रहाटगाव मस्जिदपर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे	1092689
28	प्र. 10 विलासनगर ते वीरशौव वसतीगृहापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे (प्रा.सो.सू.2012-2013)	680000
29	बिच्छु टेकडी मिनिबायपास गेट पासून अंध विद्यालयापर्यंत ते चांदूर रेल्वे रोड पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे	3995132
एकूण		**4,70,42,892**

कंत्राटदारास वरीलप्रमाणे त्याच्या आर्थिक क्षमतेच्या पलीकडे तिप्पट मूल्याचे कामे दिल्याने त्याने केलेल्या कामाची गुणवत्ता परिपूर्ण नसल्याची व त्यामुळे शासन निधीतून झालेल्या खर्चाची उपयोगिता परिपूर्ण नसल्याची शक्यता नाकारता येत नाही.

DATABWM6901 (Ref No : 219)

78 तातडीची बाब नसताना तसे दर्शवून निविदा न मागविता रु.8.25 लाख मूल्याचे आराखडा तयार करण्याचे व समन्वयक पदाचे काम एकाच सल्लागारास देण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 मनपानिधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 825000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 825000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 74250.00/-

प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापनाचा आराखडा तयार करण्याचे कामाचा प्रस्तावित कालावधी 5 महिने एवढा प्रदीर्घ असताना ती बाब तातडीची दर्शवून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 मध्ये कलम 2 (2) मधील "कार्यवृत्तांतामध्ये कारण नोंदवून निविदा न मागविता काम देण्याच्या" तरतुदीचा स्थायी समितीने गैरवापर केल्याचे दिसते. सदरचे काम 5 महिन्याऐवजी 17 महिन्यात पूर्ण झाले तसेच वरील काम मिळालेल्या सल्लागारासच त्यापूर्वी निविदा न मागविताच समन्वयक पदावर नियुक्त करण्यात आले. याशिवाय सल्लागाराकडून 10% ऐवजी 2% दराने आयकराची कपात करण्यात आली.

अमरावती महानगरपालीकेचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा अद्यावत करणे व मनपाच्या पाचही झोन करिता स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे यासाठी स्थायी समिती ठराव क्र.73, दि.15.06.2013 अन्वये डी.एस.के. टेक्नोलॉजीस, प्रा.लि. अमरावती यांना रु.6.5 लाख प्रतिवर्ष दराने काम देण्यात आले.

आराखडे तयार करण्याचे काम तातडीचे असल्याचे दर्शवून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 मध्ये कलम 2 (2) चा उल्लेख करून 'निविदा न मागविता' मे.डी.एस.के. टेक्नोलॉजीस प्रा.लि. अमरावती यांचेकडून सरळ पद्धतीने रु.6.25 लाखामध्ये करवून घेण्यास स्थायी समिती ठराव क्र.73, दि.15.06.2013 अन्वये मान्यता देण्यात आली. त्या अनुषंगाने 'Updation of Disaster Management plan and preparation of zone leval disaster management plan.' तयार करण्यासाठी पाच महिन्याच्या मुदतीसह दि.28.06.2013 रोजी कार्यादेश देण्यात आला.

तत्पूर्वी, अमरावती प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्रावरील समन्वयक या पदावर मे.डी.एस.के. टेक्नोलॉजीस, अमरावती यांची स्थायी समिती ठराव क्र.274, दि.01.03.2013 अन्वये तातडीचे प्रयोजन म्हणून निविदा न मागविता वरील कलमाचे आधारे रु.2.00 लाख प्रतिवर्ष दराने तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली होती.

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :-

1) 1. तातडीचे काम असल्याचे प्रस्तावित असलेलल्या कामास (निविदा प्रक्रियेशिवाय) पाच महिण्याची मुदत देणे व प्रत्यक्ष कार्यान्वयनास 15 महिने लागणे -

सदर काम तातडीचे असल्याचे नमूद करून निविदा प्रक्रियेशिवाय कंत्राटदाराने सादर केलेल्या रु.6.50 लाख मूल्याच्या प्रस्तावावर वाटाघाटी करून रु.6.25 लाख शुल्कासह दि. 28.06.2013 च्या कार्यादेशाद्वारे देण्यात आले. परंतु या तातडीच्या कामासाठी 5 महिन्याचा कालावधी का देण्यात आला याचा बोध होत नाही. शिवाय हे काम मार्च 2015 मध्ये म्हणजे तब्बल 17 महिन्यामध्ये 12 महिन्याच्या विलंबासह पूर्ण झाल्याचे सहाय्यक आयुक्त / विशेष कार्यकारी अधिकारी यांनी दि.09.03.2015 रोजी देयकाच्या प्रदानासाठी सादर केलेल्या टिपणीवरून लक्षात येते. या विलंबापोटी कोणतेही शुल्क आकारण्यात आले नाही. (लेखापरीक्षणास आराखडे तयार करण्यात आले किंवा कसे याचा अहवाल

उपलब्ध करण्यात आली नाही.) म्हणजेच ते काम तातडीचे नव्हतेच हे स्पष्ट होते.

2. निविदा न मागविता समन्वयक म्हणून नेमणूक करणे -

याच पध्दतीने स्थायी समिती ठराव क्र.274, दि.01.03.2014 अन्वये तातडीच्या सबबीवर निविदा न मागविता वर नमूद आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणाऱ्या मे. डी.एस.के. टेक्नोलॉजीस, प्रा.लि. या सल्लागारासच प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र, अमरावतीच्या समन्वयक पदावर रु.2 लाख प्रती वर्ष या शुल्कदरावर नियुक्ती करण्यात आली. परंतु समन्वयक म्हणून त्यांनी कोणते काम केले त्याचा पुरावा उपलब्ध करण्यात आले नाही.

म्हणजेच मे. डी.एस.के. टेक्नोलॉजीस, प्रा.लि यांनाच दोन्ही कामे देण्याच्या हेतूने ते तातडीचे काम असल्याचे भासवून निविदा प्रक्रिया डावलण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही. यावरून महाराष्ट्र मनपा अधिनियमातील प्रकरण 5 मधील कलम 2 (2) (परंतु क) प्रमाणे कार्यवृतांतमध्ये कारण नमूद करून निविदा न मागविता (रु.8.25 लाख मूल्याची) कामे देण्याच्या तरतुदीचा गैरवापर करण्यात आला असे दिसून येते.

3. आयकराची कमी कपात करणे - सदर सल्लागार फर्मला वरील दोन्ही कामापोटी सन201415 मध्ये पुढीलप्रमाणे प्रदान करताना त्याच्या देयकातून 2% आयकर कापण्यात आला.

प्रमाणक क्र.12579, दि.11.03.2015 रु. 2,00,000/- (सल्लागार फी)
प्रमाणक क्र.12580, दि.11.03.2015 रु. 6,25,000/- (आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे व अद्यावत करणे)

परंतु आयकर अधिनियमाचे कलम 194 (J) नुसार आराखडा तयार करण्याचे व सल्लागाराचे काम ' तांत्रिक व व्यावसायिक ' स्वरूपाचे असल्याने देयकातून 2% ऐवजी 10% आयकर कपात होणे आवश्यक होते. परंतु तसे न केल्याने केंद्र शासनाच्या महसुलाचे पुढीलप्रमाणे नुकसान झाल्याचे दिसते.

अ.क्र.	देयकाची रकम (रु.)	आयकराची केलेली कपात (रु.)	आयकराची करावयाची कपात (रु.)	तफावत (रु)
1	2,00,000/-	आयकर 2% = 4000	10% = 20000	16000
		अधिभार 12.5% = 500	12.5% = 2500	2000
2	6,25,000/-	आयकर 2% = 12500	2% = 62500	50000
		अधिभार 12.5% = 1563	12.5% = 7813	6250
	आयकराची कमी कपात / अतिप्रदान			**74250**

याप्रमाणे रु.74250/- एवढया आयकराची संबंधिताच्या देयकातून कमी कपात करण्यात आली आहे.

DATABWM6901 (Ref No : 17)

80 शासनास भरणा करावयाच्या रॉयल्टी रकम कंत्राटदाराकडून वसूल करावयाची असताना मनपा/शासन निधितून 2014-2015 मध्ये रु. 74.16 लाख खर्च करण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 2

लेखा शीर्ष :343 मनपानिधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 7416385.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 7416385.00/-

महसूल व वन विभागाचे शासननिर्णय दि. 18 ऑक्टोबर 2001 मधील निर्देशानुसार कंत्राटदाराने कामावर वापरलेल्या गौण खनिजावर स्वामित्व धनाचा (राजशुल्क) शासनास भरणा केला पाहिजे तसा पुरावा सादर न केल्यास मनपाने कंत्राटदाराच्या देयकातून तसी कपात करून शासनखाती त्याचा भरणा करणे अपेक्षित आहे. परंतु मनपाने याप्रमाणे कार्यवाही न करता खोदकामातून निघालेल्या मातीच्या परिमाणावर स्वामित्व धन निश्चित करून सन 2014-15 मध्ये रु. 74,16,385/- एवढा मनपा/ शासननिधीतून शासनास भरणा केला आहे. परिणामी मनपा/ शासननिधीची हानी व कंत्राटदारांना अतिप्रदानाची अनियमितता घडली आहे.

मनपाच्या क्षेत्रात मनपाकडून कंत्राटदारामार्फत विविध प्रकारच्या करण्यात येणाऱ्या बांधकामावर रेती,खडी,मुरूम इत्यादी गौण खनिजांचा वापर करण्यात येतो. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौ. ख.नि.1088/433/3592/ख दि. 18.10.2001 नुसार कंत्राटदारांने या गौण खनिजांच्या वापरापोटी शासनास स्वामित्व धन (रॉयल्टी) च्या स्वरुपात महसुलाचा (राजशुल्क) भरणा करणे जरुजी आहे. मनपाकडील बांधकामाचे बाबतीत कंत्राटदाराने खरेदी केलेल्या गौण खनिजावर रॉयल्टीचा शासनास भरणा केला असल्याचा पावती व जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र प्राप्त करून मनपास सादर करणे आवश्यक आहे अन्यथा बांधकामावर वापरलेल्या साहित्याचे परिमाण (Quantity) निश्चित करून त्यावर प्रचलितदराने रॉयल्टीची आकारणी करून व त्याची देयकातून कपात करून तीचा मनपाने शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

यावरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :-

2) बांधकामांच्या प्राकलनासोबत जोडलेल्या दर पृथ:करणानुसार कंत्राटदारांना केलेल्या प्रदानात सी.एस.आर. दरासोबत गौण खनिजापोटी रॉयल्टीचा दराचे (रु. 70.65 प्रती घन मिटर) समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे कंत्राटदाराने वापरलेला गौण खनिजावर रॉयल्टीचा शासनास भरणा करण्यात आला आहे. याबाबतचा पुरावा देयकासोबत नसल्याने मनपाने देयकातून या प्रयोजनासाठी रॉयल्टीची कपात करून शासनास भरणा करणे अपेक्षित होते. परंतु त्यप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) मनपा अमरावती मध्ये कंत्राटदाराच्या देयकातून सन 2014-15 या वर्षात रु.11,42,113/- (मनपानिधी) व रु.52,74,272/- (शासननिधी) याप्रमाणे रु. 74,16,385/- एवढ्या रॉयल्टीची कपात केली असून राज्य शासनाकडे मनपाने भरणा केला आहे. परंतु बांधकाम प्रकरणाचे

लेखापरिक्षण करताना वर नमूद कार्यवाही न करता खोदकामातून निघालेल्या मातीसाठी रॉयल्टीचे प्रदान व कपात करण्यात येत असल्याचे कंत्राटदाराच्या देयकवरून दिसून आले. पुढे हीच कपात केलेल्या रकमेचा शासनास भरणा करण्यात येतो.

यावरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत :-

रस्ता व अन्य बांधकामाच्या कामात विविध खोदकामात (Excavation) कार्यान्वित केलेल्या परिमाणावर रु. 70.65 प्रमाणे रॉयल्टी (Royalty for excavation) या सीएसआर मध्ये अनुसूचित न केलेल्या बाबींचा प्रथम समावेश करून सकल देय रकम (Gross payable amount) निश्चित करण्यात येते. त्यानंतर सदर रॉयल्टीची रकम सदर देयकातून कपात म्हणून दर्शविण्यात येते याप्रमाणे देयकात रॉयल्टीच्या अधिक व उणे रकमेचा कंत्राटदाराच्या देयकात शून्य प्रभाव दिसून येतो.

Royalty for excavation (payable to contractor) → (+) रु. क्ष
Royalty deduction (from contractors bill and payable to government) → (-) रु. क्ष

कंत्राटदाराच्या देयक रकमेवरील प्रभाव → रु. 0/-

वरील वस्तुस्थितीचा विचार केल्यास वापरलेल्या गौण खनिजावर कंत्राटदारांकडून रॉयल्टीची वसुली न करता खोदकामातून निघालेल्या मातीवर मनपा रॉयल्टी निश्चित करून मनपा/शासननिधीतून शासनास भरणा करीत आहे असे दिसून येते.

या संदर्भात अर्धसमासद्वारे खुलासा मागितला असता मनपाने तो लेखापरिक्षणास सादर केला नाही. यावरून मनपाने 2014-15 मध्ये शासनास भरणा केलेल्या रॉयल्टी एवढ्या रकमेचे मनपा/ शासनास अकारण नुकसान सहन करावे लागले असून विविध बांधकामावर वापरलेल्या साहित्यावरील रु.70.65 दराने रॉयल्टीच्या रकमेएवढे सबंधित कंत्राटदारांना अतिप्रदान झाले आहेत.

उदाहरणादाखल प्रकरणे पुढीलप्रमाणे आहे.

अ क्र	कामाचे नाव	निधी / योजना	प्रमाणक क्र. दिनांक व रकम	प्रमाणकानुसार खोदकामाचे एकूण परिमाण (घनमिटर)	कंत्राटदारास Royalty for excavation साठी देय केलेली	शासनास भरणा करण्यासाठी देयकातून कपात	मनपा / शासन निधीचे नुकसान (रु.)

					रकम (दररु. 70.65) (रु.)	केलेली रॉयल्टीची रकम (रु.)	
1	सेन्ट्रल बँकेजवळ चपराशीपुरा येथे सिमेंट रस्त्याचे बांधकाम (प्राकलन रु.20 लाख)	शासन / प्राथमिक सोयी सुविधा	1608 06/06/14 रु.1602263/- (प्रथम व धावते)	484.72	34213.67	34213.67	34213.67
2	सेन्ट्रल बँकेजवळ चपराशीपुरा येथे सिमेंट रस्त्याचे बांधकाम (प्राकलन रु.20 लाख)	शासन / प्राथमिक सोयी सुविधा	दुसरे व अंतिम देयक	65.50	4627.58	4627.58	4627.58
3	चपराशीपुरा येथे सिमेंट नाली बांधकाम (प्राकलन रु.18 लाख)	शासन / प्राथमिक सोयी सुविधा	3204 23/07/14 1779779/- (प्रथम धावते देयक)	488.76	34530	34530	34530
4	चपराशीपुरा येथे सिमेंट नाली बांधकाम (प्राकलन रु.18 लाख)	शासन / प्राथमिक सोयी सुविधा	(दुसरे व अंतिम देयक)				
5	प्रभाग 6 श्री कंठाळे ते प्रवीण मणिपूर यांचे घराजवळ सिमेंट पेव्हीग ब्लॉक बसविणे	शासन / प्राथमिक सोयी सुविधा	405 24/04/14 1455915/- (प्रथम धावते देयक)	87.75	6201	6201	6201

DRAFT

	(प्राकलन रु.30 लाख)						
6	प्रभाग 6 श्री कंठाळे ते प्रवीण मणिपूर यांचे घराजवळ सिमेंट पेव्हीग ब्लॉक बसविणे (प्राकलन रु.30 लाख)	शासन / प्राथमिक सोयी सुविधा	1204 21/05/14 971955/- (दुसरे धावते देयक)	443.20	31320.77	31320.77	31320.77
7	बालाजी गार्डनचे सौंदर्यीकरण (प्राकलन रु. 15 लाख)	शासन / प्राथमिक सोयी सुविधा	1358 23/05/14 1004163/- (प्रथम धावते देयक)	145.21	10257.63	10257.63	10257.63
8	बादशाहभाई ते रसीद ते अलमारीवले अलीम नगर प्रभाग 29 मध्ये सिमेंट रस्ता बांधकाम (प्राकलन रु. 1022620)	शासन / अतिवृष्टी रस्ते दुरुस्ती शीर्ष	1357 23/05/14 102917/-	151.50	10701.96	10701.96	10701.96
9	कालोटी नगर ते मंगलधाम नाल्यावर रिटेनिंग वालचे बांधकाम (प्राकलन रु. 13142000/-)	शासन / नगरोत्थान महाभियान (शीर्ष 362)	1211 22/05/14 1207298/- (चौथे व अंतिम देयक)	7025 (अंतिम देयकापर्यंत एकूण)	496274.25	496274.25	496274.25
10	नागपुरी गेट ते जैन मंदिर पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम (प्राकलन 70 लाख)	शासन / प्राथमिक सोयी सुविधा (शीर्ष 343)	1208 22/05/14 2307657/- (दुसरे धावते देयक)	478.06	33770.15	33770.15	33770.15

DRAFT

1	प्रभाग 18 गांधी नगर येथे रस्ता व नाली बांधकाम (प्राकलन रु.35 लाख)	शासन / प्राथमिक सोयी सुविधा	1359 23/05/14 2521701/- (प्रथम धावते देयक)	1859.21	131334.59	131334.59	131334.59
1	महापौर बंगल्या जवळील नाल्यावर रिटेनिंग वालचे बांधकाम (प्राकलन रु.31944440/-)	शासन / नगरोत्थान महाभियान	824 08/05/14 3795716.94 (तिसरे व अंतिम देयक)	18467.48 (अंतिम देयका पर्यंत)	1304727.46	1304727.46	1304727.46
1	चिल्ड्रन बरिअल ग्राउंड येथे सिमेंट रस्ता बांधकाम (प्राकलन रु.2847383/-)	शासन / अतिवृष्टी	12619 13/03/15 2944244.96 (प्रथम व अंतिम देयक	572.24	40428.75	40428.75	40428.75
1	खोलापुरी गेट ते बाबा चौक रस्ता दुरुस्ती (प्राकलन रु. 2350000)	शासन / अतिवृष्टी	13391 26/03/15 1344182.44 (प्रथम धावते देयक)	375.17	26261.90	26261.90	26261.90
							2164649.71

वरीलप्रमाणे उदाहरणादाखल नोंदविलेल्या 14 प्रकरणात रॉयल्टीपोटी शासननिधीतून रु.21,64,650/- अकारण खर्ची पडले असून त्रुटीपूर्ण पध्दतीचा अवलंब केल्याने सन 2014-15 मध्ये उपलब्ध माहितीनुसार सर्व लागू प्रकरणात रु.74,16,385/- एवढी मनपा व शासननिधीची हानी झाली आहे.

DATABWM6901 (Ref No : 205)

DRAFT

81 10% पेक्षा कमी दराच्या निविदेचे दर विश्लेषण व अंदाजपत्रकाची पुन:मांडणी न करता 15 ते 37% ने कमी दराच्या निविदा स्विकृत करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :353 शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 47042892.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 47042892.00/-

सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेनुसार 10% ने कमी मूल्याची निविदा स्विकारणेपूर्वी होणाऱ्या कामाची गुणवत्ता राखली जावी या करिता कमी निविदा दराचे विश्लेषण करणे आवश्यक असताना तसे न करता एकाच कंत्राटदारास 15 ते 37% ने कमी दराच्या 29 कामाचे वाटप करण्यात आले.

सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील नियम 187 टिप 6 (बी)(तीन) नुसार बांधकामाची सर्वात कमी दराची निविदा प्राकलन किंमतीपेक्षा 10% ने कमी दराची असल्यास ती स्विकारणेपूर्वी निविदाधारकाने सादर केलेल्या कमी दराचे विश्लेषण मागवून त्याचा नफा व होणाऱ्या कामाची योग्यता व गुणवत्ता राखली जाणार किंवा नाही याची खात्री करणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु अतिवृष्टी रस्ते दुरुस्ती विशेष अनुदानांतर्गत एकाच निविदा सूचनेतील 33 कामापैकी तब्बल रुपये 4.70 कोटी मूल्यांच्या एकाच निविदाधारकाच्या 15 ते 37% कमी दराच्या 29 निविदा स्विकृत करताना दर विश्लेषण मागविण्यात आले नाही.

तसेच नियम 150 नुसार 10% कमी दर असलेल्या निविदाचे प्रकरणात अंदाजपत्रकाची पुन:मांडणी करणे आवश्यक असतांना असे करण्यात आले नाही.योजना :- अतिवृष्टी रस्ते दुरुस्ती
प्रशासकीय मान्यता : विभागीय आयुक्त अमरावती यांचे आदेश क्र. विआअ/प्रासंनप्र/सलेअ/कावि-197/2014, दि. 27.01.2014 (123 कामे)

प्रशासकीय मान्यता मूल्य रु. 24,05,17,414/-
123 पैकी 43 कामासाठी निविदा सूचना दि. 08.05.2014
प्राप्त निविदा - 33 कामे,
33 पैकी 32 निविदा स्विकृती - स्थायी समिती ठराव क्र. 23, दि. 27.6.2014
32 पैकी स्विकृत 29 निविदाधारकाचे नाव - मे. आर. एस. वऱ्हेकर

मे. वऱ्हेकर यांच्या 29 निविदाचे स्विकृत दर - 15 ते 37% कमी
या वरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

दि. 08.05.2014 रोजी जाहीर केलेल्या 43 निविदा पैकी 33 कामासाठी निविदा प्राप्त झाल्यात. निविदाच्या तुलनात्मक विवरणानुसार 29 कामाचे सर्वात कमी दर मे. आर. एस. वऱ्हेकर यांचे होते असे दिसून आले परंतु सर्वच निविदा 15% ते 37% ने कमी दराच्या होत्या, वरील नियमानुसार कमी दराचे विश्लेषण करणे

आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष करून स्थायी समितीच्या ठराव क्र.23, दि. 27.06.2014 अन्वये त्या थेट स्विकृत करण्यात आल्या.

निविदा दर (प्राकलन मूल्यापेक्षा निविदांची संख्या कमी)

15%	1
19%	2
21%	3
23%	3
25%	4
27%	3
29%	1
31%	7
32%	1
33%	3
37%	1
एकूण	**29**

या निविदाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

(रकमा रुपयांत)

अ. क्र.	कामाचे नाव	प्राकलन मुल्य	कंत्राटदाराचे नाव	स्विकृत निविदा दर व निविदा मूल्य.	
1	पंचवटी चौक ते ITI कॉलोनी मिनीबायपास पर्यंत रस्ता डांबरीकरण	20,00,860	मे. आर.एस. वऱ्हेकर	31%	1380594
2	कॅप शॉर्ट रोड वरील सौरभ कॉलोनी पासून वलगाव रोड वरील दुर्गा सॉ मिल जंक्शन पर्यंत रस्ता डांबरीकरण	14,99,916	मे. आर.एस. वऱ्हेकर	21%	1184934
3	पॅरॉडाईज कॉलोनी ते नवोद्य विद्यालय पर्यंत डांबरीकरण	14,99,958	मे. आर.एस. वऱ्हेकर	23%	1154968
4	कृषी उत्पन्न बाजार समिती ते पाठ्यपुस्तक महामंडळ HTL रोड जंक्शन ते महेंद्र कॉलोनी पर्यंत रस्ता डांबरीकरण	20,00,326	मे. आर.एस. वऱ्हेकर	23%	1540251
5	महेंद्र कॉलोनी पासून पॅरॉडाईज कॉलोनी वलगाव मुख्य रस्त्या	18,00,032	मे. आर.एस. वऱ्हेकर	23%	1386025

DRAFT

	पर्यंत कडबी बाजार पर्यंत रस्ता डांबरीकरण				
6	कलेक्टर ऑफिस चौकपासून गजानन महाराज विद्यालय ते मिनीबायपास डांबरी रस्ता दुरुस्ती करणे.	20,86,589	मे. आर.एस. वऱ्हेकर	31%	1439747
7	पवार फोटो स्टुडिओ HVPM भूतेश्वर चौक साईनगर जंक्शन पर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती करणे.	19,98,700	मे. आर.एस. वऱ्हेकर	31%	1379103
8	HVPM पासून मुधोडकर पेठ दिपार्चन डांबरी रस्ता दुरुस्ती करणे	21,08,955	मे. आर.एस. वऱ्हेकर	31%	1455179
9	रेल्वे स्टेशन चौक बेलपुरा राजापेठ पर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती करणे	17,09,403	मे. आर.एस. वऱ्हेकर	31%	1179488
10	राजकमल चौक ROB जोगडेकर प्लॉट ते चांदूर रेल्वे रोड पर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती करणे	17,09,403	मे. आर.एस. वऱ्हेकर	31%	1179488
11	नागपुरी गेट पठान चौक गेट ते अकोलकर यांच्या घरापर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती करणे	13,99,988	मे. आर.एस. वऱ्हेकर	15%	1189990
12	एसआरपी क्वार्टर मधील डांबरी रस्ता दुरुस्ती करणे	24,99,390	मे. आर.एस. वऱ्हेकर	29%	1774567
13	आदर्शनगर ते सिपना इंजिनीरिंग कॉलेज पर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती करणे	33,57,179	मे. आर.एस. वऱ्हेकर	21%	2652171
14	साईनगर येथील साई मंदिर पासून ते उदय कॉलोनी ते रेल्वे स्टेशन डांबरीकरण करणे (संतोषी माता मंदिर, अबुमिय्या दर्गा क्रांती कॉलोनी कृष्णार्पण कॉलोनी, गुप्ता चक्की, विठ्ठल मंदिरापर्यंत, अंबाडकर ते कोहडे 60 फुट रस्ता दुरुस्ती करणे)	28,61,307	मे. आर.एस. वऱ्हेकर	25%	2145980
15	नेमाणी गोडाऊन भरतनगर पुरे ले ऑउट पारिजात कॉलोनी भागातील डांबरी रस्ते दुरुस्त	26,67,511	मे. आर.एस. वऱ्हेकर	21%	2107334

DRAFT

	करणे.				
16	प्र.क्र.33 मध्ये दीपनगर न.1 व 2 शुभम कॉलोनी दस्तूर नगर प्रभाग परिसरातील डांबरी रस्ते दुरुस्त करणे.	27,93,767	मे. आर.एस. वऱ्हेकर	19%	2262951
17	नवसारी येथील महेशनगर साकोम यांचे घरासमोरील रस्ता कौशिक विहार येथील वाटाणे यांचे घरासमोरील रस्ता, काळे व पाटील यांचे घरासमोरील रस्त्याची डांबरी दुरुस्ती करणे.	17,54,102	मे. आर.एस. वऱ्हेकर	27%	1280494
18	जोगडेकर प्लॉट येथील वर्धासा आप्पा यांचे दुकानापासून डॉ. डफळे यांचे दवाख्यान्यापर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती	28,67,038	मे. आर.एस. वऱ्हेकर	33%	1920915
19	कॅम्प सर्किट हाउस ते जेल ते महापौर बंगला पर्यंत रस्ता दुरुस्ती करणे.	18,57,666	मे. आर.एस. वऱ्हेकर	33%	1244636
20	फ्रेजरपुरा येथील तशशिला महाविद्यालय ते भगतसिंग चौक ते मिनीबायपास पर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती करणे.	32,42,981	मे. आर.एस. वऱ्हेकर	31%	2237657
21	सूदर्शन बिल्डींग ते गणेशनगरपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	14,02,400	मे. आर.एस. वऱ्हेकर	27%	1023752
22	प्र.13 विद्या कॉलोनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे	14,28,572	मे. आर.एस. वऱ्हेकर	33%	957143
23	इतवारा बाजार ते मटन मार्केट ते रतनगंज मस्जिद समोर ते अन्सार नगर ते फ्रेंड्स स्कूलचे गेटपर्यंत रस्ता दुरुस्ती करणे	20,06,403	मे. आर.एस. वऱ्हेकर	25%	1504802
24	अनवळनगर श्री धावडे ते तेल्मोरे ते देशमुख कॉम्पलेक्सपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	10,99,964	मे. आर.एस. वऱ्हेकर	19%	890971
25	कलोती नगरा बेनोडा भागातील डांबरी रस्त्याची दुरुस्ती करणे	43,02,726	मे. आर.एस. वऱ्हेकर	25%	3227045
26	प्र.13 मधील पारश्री दवाखाना ते	24,99,819	मे. आर.एस.	37%	1574886

DRAFT

	इर्विन चौकापर्यंत डांबरी रस्ता दुरुस्ती करणे		वऱ्हेकर		
27	रहाटगाव गावठाण ते रहाटगाव मस्जिदपर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे	14,96,834	मे. आर.एस. वऱ्हेकर	27%	1092689
28	प्र. 10 विलासनगर ते वीरशौव वसतीगृहापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे (प्रा.सो.सू.2012-2013)	10,00,000	मे. आर.एस. वऱ्हेकर	32%	680000
29	बिच्छु टेकडी मिनिबायपास गेट पासून अंध विद्यालयापर्यंत ते चांदूर रेल्वे रोड पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे	53,26,843	मे. आर.एस. वऱ्हेकर	25%	3995132
एकूण					**4,70,42,892**

या प्रमाणे रु. 4.70 कोटीची कामे दर विश्लेषण न करता एकाच कंत्राटदारास देण्यात आल्याने कामाची तत्कालिक व दीर्घकालीन गुणवत्ता योग्य नसल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वरील सर्व निविदा 10% व त्याहून कमी दराच्या असूनही कामाच्या अंदाजपत्रकाची पुनर्मांडणी करण्यात आलेली नाही. यावरील खुलासा व झालेल्या कामाचे प्रत्यक्ष मूल्य यांचे विवरण विभागाने लेखापरीक्षणास उपलब्ध केले नसल्याने (अर्धसमास पत्र क्र.181, दि.15.05.2018) आक्षेप नोदविण्यात येत आहे.

DATABWM6901 (Ref No : 181)

91 खोदकामातील मातीचे जादा परिमाण दाखवून वाहतुकीवर झालेल्या अतिप्रदानाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :362 शासननिधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 1207298.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 406911.00/-

नगरोत्थान महाअभियानांतर्गत पलोटीनगर ते मंगलधाम नाल्यावरील रिटेनिंग वालच्या बांधकामात 4507.80 घनमिटर खोदकाम करण्यात आले असून त्यामधून निघालेल्या मातीच्या वाहतुकीपोटी प्राकलनाप्रमाणे तेवढ्याच परिमाणावर वाहतुकीच्या दराचे प्रदान होणे आवश्यक होते. परंतु वाहतुकीच्या आकारणीत 4507.80 ऐवजी 7025.40 घनमिटर गृहीत धरल्याने जादा 2517.60 घनमिटरसाठी रु147/- या दराने रु. 4.07 लाखाचे अतिप्रदान करण्यात आले आहे.

पलोटीनगर ते मंगलधाम नाल्यावर रिटेनिंग वालच्या बांधकामाचे रु.3142000/- प्राकलन मूल्याचे काम मे. आनंद कंस्ट्रक्शन्स यांना 9.95% जादा दराने दि.07.05.2013 च्या कार्यादेशान्वये देण्यात आले. सदरचे काम दि.30.10.2013 रोजी पूर्ण करण्यात येवून प्रमाणक क्र.1211, दि.22.05.2014 या चौथ्या व अंतिम देयकाद्वारे रु.1207298/- चे अंतिम प्रदान करण्यात आले.

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे.

मोजमाप पुस्तिका क्र.151 मधील नोंदी व देयकातील नोंदीनुसार या कामावर बाब क्र.4, 5 व 6 मिळून एकूण 4507.80 घनमिटर एवढे खोदकाम करण्यात आले असून बाब क्र.20 वरील त्यांच्या वाहतुकीसाठी (Transportation of stuff) 4507.80 ऐवजी 7025.40 घनमिटर एवढे परिमाण दर्शवून रु.147/- प्रती घनमिटर दराने प्रदान करण्यात आले.

अ. क्र.	बाब क्र.	बाब	कार्यान्वित परिमाण (घनमिटर)
1	4	Excavation in soft murum	1396.46
2	5	Excavation in morshy soil	464.50
3	6	Excavation in hard murum	2646.90
		एकूण खोदकाम	4507.86
4	20	Transportation of stuff (खोदकामातील मातीची वाहतूक)	7025.40
		जादा वाहतुकीचे परिमाण (घनमिटर)	2517.54
		वाहतुकीचे दर (प्रती घनमिटर) (रु)	147
		जादा आकारणी	370087.20
		स्विकृत निविदा दर (9.95% जादा)	36823.68
		एकूण अतिप्रदान (रु)	**406910.87**

याप्रमाणे 2517.54 घनमिटर एवढ्या न खोदलेल्या परिमाणावर वाहतूक दराची आकारणी करून रु.4.07 लाखाचे कंत्राटदारास अतिप्रदान झाले आहे.

DATABWM6901 (Ref No : 221)

96 विभागीय आयुक्तांच्या सक्षम प्रशासकीय मान्यतेशिवाय शासन निधीतील शिल्लक रकमेतून रु.45.32 लाखाचे रस्ता डांबरीकरणाचे काम करण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 2

लेखा शीर्ष :353 शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 4532341.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4532341.00/-

शासन निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांकडे असताना निधीतील शिल्लक असणाऱ्या रकमेतून रु.45.32 मुल्यांच्या कामाच्या प्राकलनास मनपा आयुक्तांनी नियमबाह्यपणे प्रशासकीय मान्यता प्रदान केली. तसेच या कामाची निविदा उघडताना व कार्यादेश देताना पुरेसा वेळ घेतला असताना मात्र निविदा सूचनेचा कालावधी 15 ऐवजी 9 दिवसाचा ठेवून निविदा प्रसिध्द करण्यात आली.

अतिवृष्टी रस्ते दुरुस्ती विशेष अनुदानांतर्गत राज्य शासनाने दि.06.12.2013 च्या शासन निर्णय अन्वये रु.20 कोटी निधी मंजूर केले असून मनपाच्या सहभाग रकम रु.3,86,71,779/- सह एकूण रु.23,86,71,779/- मूल्याच्या एकूण 123 कामांना विभागीय आयुक्त यांनी क्र.का.वि.197/2014, दि.27.01.2014 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली.

या 123 कामाच्या वेळोवेळी निविदा प्रसिध्द करण्यात आल्या. त्यातून झालेल्या कामाचा व खर्चाचा एकत्रित तपशील उपलब्ध झाला नाही. तथापि, या शासन निधीतील शिल्लक रकमेतून पुढील रस्ता डांबरीकरणाच्या रु.46.59,714/- प्राकलन मूल्याच्या कामाच्या प्रस्तावास tender clause-14 चा आधार घेऊन मनपा आयुक्तांनी दि.02.09.2014 रोजी प्रशासकीय मंजुरी दिली. या कामावर माहे.जानेवारी 2015 मध्ये रु.45,32,341/- चे अंतीम प्रदान करण्यात आले.

<u>कामाचे नाव</u> : शंकरनगर ते बालाजीनगर, सुदर्शन बिल्डींग ते लक्ष्मणनगर कॉलनी ते द्वारकनाथ कॉलनी ते मिनीबायपास येथील डांबरीकरणाच्या कामाची दुरुस्ती व नुतनीकरण करणे.

यावरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

4) <u>सक्षम प्रधिकाऱ्याची मान्यता नसणे</u> :-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय दि.29.08.2008, 06.12.2013 नुसार अतिवृष्टी अनुदानातर्गत कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे प्राधिकार अमरावती प्रशासकीय विभागाच्या विभागीय आयुक्तांकडे विहित असून त्यांनी एकूण 123 कामांना दि.27.01.2014 च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. या अनुदानातून कमी दराने स्विकृत केलेल्या कामाच्या अपेक्षित शिल्लक निधीतून रु.46,59,714/- मूल्याच्या उपरोक्त कामास मनपा आयुक्तानी नियमबाह्यपणे प्रशासकीय मान्यता देवून कामाचे कार्यान्वयन करण्यात आले आहे. (नियमाप्रमाणे प्राथमिक अहवाल, आराखडा, प्रस्ताव, कामाचे प्रयोजनासह परिपूर्ण अर्ज सादर करून सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक होते.

यामुळे सक्षम प्रशासकीय मान्यतेअभावी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील नियम 133 मधील तरतुदीचे उल्लंघन झाले आहे.

2. <u>अल्पमुदतीची निविदा सूचना</u> :-

सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.CAT10/2006 / प्र.क्र.133/इमारती-2, दि.02.11.2006 नुसार 5 ते 50 लाख किमतीच्या कामांच्या निविदांचा प्रथम सूचना कालावधी 15 दिवसाचा असणे आवश्यक आहे. परंतु सदर प्रकरणात दि.05.09.2014 रोजी प्रसिध्द केलेल्या निविदा सूचनाचा कालावधी 9 दिवसाचा ठेवून

दि.14.09.2014 हा निविदा सादर करण्यास अंतिम दिनांक ठेवण्यात आला. सदर काम तातडीने करावयाचे (नस्तीतील दि.01.08.2014 च्या टिपणानुसार) असल्याने दि.14.09.2014 पर्यंत निविदा प्राप्त होवूनही तब्बल दीड महिन्यानंतर दि.01.11.2014 रोजी निविदा उघडण्यात आल्या या प्रक्रियेत एकूण चार निविदा प्राप्त होवून मे. वीर हनुमान कंन्सट्रक्शन कंपनी यांची 12.89% ने कमी दराची निविदा स्थायी समितीच्या ठराव क्र.99, दि.15.11.2014 अन्वये स्विकृत करून दि.12.12.2014 रोजी कार्यादेश देण्यात आला. तथापि, निविदा सूचनेच्या कालावधी संदर्भात शासन निर्णयाचे उल्लंघन करण्यात आले आहे.

3. <u>गैरलागू असलेल्या टेंडर क्लॉजचा आधार घेणे</u> :-

मनपा आयुक्तांनी सदर कामास दि.02.09.2014 रोजी अनियमितपणे प्रशासकीय मान्यता देताना Tender clause 14 च्या आधार घेतल्याचे दिसते. परंतु clause 14 'Alteration in specification and designs not to invalidate contracts' आणि Rate for work not entered to estimate or schedule of rates of the corporation' या संदर्भातील असून त्यानुसार मूळ कंत्राट व प्राकलनात ते अग्राह्य ठरणार नाही असे दरातील व कामाचे वर्णन व आराखड्यात बदल करणे एवढेच अपेक्षित आहे, परंतु सदर प्रकरणात संपूर्ण कामच नव्याने प्रस्तावित व स्विकृत करण्यात आल्याने आयुक्तांनी प्रशासकीय मान्यतेसाठी clause-14 चा घेतलेला आधार गैरलागू ठरतो.

DATABWM6901 (Ref No : 212)

99 मनपा नाक्याची इमारत व्यावसायिक प्रयोजनासाठी दीर्घमुदतीसाठी नाममात्र दराने देणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 मनपानिधी निधी
अनियमितता कलम : 9अ

मनपाची मालमत्ता दीर्घकालावधी देण्याची बाब धोरणात्मक असताना व मालमत्तेचे मूल्य रु.50,000/- असल्याने सर्वसाधारण सभेच्या एवजी स्थायी समितीने सदर इमारत दीर्घकालावधीसाठी नाममात्र दराने भाडेपट्टीवर दिली.

स्थायी समिती, मनपा अमरावतीने दि.06.03.2013 ते 01.03.2014 या कालावधीपर्यंत मंजूर केलेल्या ठरावाच्या पुस्तिकाचे वाचन करताना पक्क्या स्वरुपाची मालमत्ता व्यावसायिक प्रयोजनासाठी प्राप्त अर्जानुसार संबंधितास केवळ रु.42/- प्रतिमहिना दराने 10 वर्षाकरिता देण्यास मंजुरी दिली.

ठरावाच्या इतिवृत्तानुसार श्री सैय्यद हारून सैय्यद अहमद यांनी मनपास बडनेरा कारंजा रस्त्यावरील मनपाची पक्क्या स्वरुपाची नाक्याची इमारत व्यावसायासाठी अर्जाद्वारे मागितली. या अर्जानुसार केलेल्या प्रस्तावास आयुक्त मनपा यांनी दि.17.02.2014 मंजुरी प्रदान केली आहे. त्या

अनुषंगाने सदर मालमत्ता रु.500/- प्रतिवर्ष (रु.42/- प्रतिमहिना) या दराने 11 महिन्या ऐवजी 10 वर्षाकरिता दर 3 वर्षानी 10% भाडेवाढ या तत्वावर संबंधितास देण्यास स्थायी समितीने ठराव क्र. 280, दि. 01.03.2014 अन्वये मान्यता दिली.

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे.

1. सदरच्या इमारतीबाबत मंजुरीची नस्ती लेखापरीक्षणासाठी उपलब्ध केली नसली तरी अमरावती क्षेत्रातील सर्वसाधारण वार्षिक मुल्यदर तक्त्यानुसार इमारतीचे रु.50000/- पेक्षा अधिक किंमत गृहीत धरल्यास तसेच सदर बाब धोरणात्मक असल्याने महाराष्ट्र मनपा अधिनियमाचे कलम 79 (क) नुसार सदर मालमत्ता भाडयाने देण्यास सर्वसाधारण सभा सक्षम असून स्थायी समीतीने दिलेली मान्यता नियमबाहय ठरते.
2. अधिनियमाचे कलम 79 (5) नुसार मनपाची कोणतेही मालमत्ता चालू आधार किमतीपेक्षा कमी मोबदल्यात भाडेपट्ट्याने देता येत नसताना सदर इमारत रु.42/- प्रतिमहिना या अत्यल्प दराने भाडे रकमेने 10 वर्षासाठी देल्याने मनपाचे मोठे नुकसान झाल्याचे दिसते.

या संदर्भातील इमारतीचे क्षेत्र, सर्व्हे क्र. व अन्य तपशील वाटपा संबंधाची मनपा व संबंधित व व्यावसायिक यांच्यातील प्रत्यक्ष करारनामा इत्यादी बाबत अभिलेख उपलब्ध करण्यास सुचविले होते. परंतु ते सादर करण्यात आले नसल्याने इमारतीचे वार्षिक मुल्यदरानुसार बाजारमूल्य व भाडे रक्कमेबाबत हानीची रकम निश्चित करता आली नाही.

DATABWM6901 (Ref No : 16)

100 प्रशासकीय प्रस्ताव नसताना वेळेवरील विषय म्हणून तसेच वित्तीय मर्यादेनुसार अधिकार नसताना दुकान गाळ्यांचे हस्तांतरण या अर्थविषयक बाबीस स्थायी समितीने मान्यता देण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 04

लेखा शीर्ष :07 मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9अ

रु. 50000/- पेक्षा जास्त मनपाच्या मालमत्तेच्या अभिहस्तांतरण, भाडेपट्टीने देणे इ. बाबीसाठी सर्वसाधारण सभा प्राधिकृत असताना स्थायी समितीने वेळेवरील विषय म्हणून स्विकृत करून मौलाना आझाद मार्केट मधील दुकान क्र.28 च्या रु.30/- प्रतीमहिना या अल्प भाडेदराने हस्तांतरणास ठराव क्र.53, दि. 22.08.2014 अन्वये मंजुरी प्रदान केली आहे. तसेच नवीन गाळे धारकाने सदर दुकान अनधिकृत हस्तांतरणाद्वारे ताब्यात ठेवल्याच्या ठराव व करारनाम्यापूर्वीच्या कालावधीबाबत दंडनीय रकमेची आकारणी केली नाही.

DRAFT

महाराष्ट्र मनपा अधिनियमाचे कलम 79 (ब) नुसार रु. 50 ,000/- पेक्षा अधिक मूल्य किंवा अधिमुल्य नसलेली स्थावर मालमत्ता भाडेपट्टीवर देण्याचे अधिकार स्थायी समितीकडे आहेत. परंतु त्यावरील मुल्यासह कोणत्याही मालमत्तेचा विनियोग करण्याचे अधिकार कलम 79 (क) नुसार महानगर पालिका म्हणजेच सर्वसाधारण सभेकडे विहित आहेत.

मनपा अमरावतीच्या मालकीच्या मौलाना आझाद मार्केट मधील दुकान क्र.28 , दि.20.01.2005 रोजी 25 वर्षाच्या भाडेपट्टीने पिपल्स नागरिक सेवा सहकारी संस्था मर्यादित यांना प्रथमतः वाटप करण्यात आले होते. सदर संस्थेने श्री जगदीश मुलचंद हेमनानी यांचे सोबत दि. 02.06.2012 रोजी रु. 4 लाखात विक्रीचा लेखी करार केला. दि. 22.09.2012 रोजी या दोन्ही पक्षामध्ये 'आपसी करारनामा ' होऊन दुकान गाळ्याचे परस्पर हस्तांतरण करण्यात आले. या हस्तांतरणास मान्यता देण्यासाठी श्री हेमनानी यांनी बराच विलंबाने म्हणजे दि. 04.03.2014 रोजी मनपाकडे अर्ज सादर केला. त्या अनुषंगाने स्थायी समितीने ठराव क्र.53 , दि. 22.08.2014 अन्वये या हस्तांतणास मान्यता दिल्यावर बाजार अधिक्षक व श्री हेमनानी यांचे मध्ये दि.15.01.2015 रोजी पूर्वलक्षी प्रभावात दि.19.12.2014 ते 19.01.2030 या उर्वरित 16 वर्षासाठी रु. 500/- च्या मुद्रांकावर करारनामा करण्यात आला.

यावरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.

1. मनपाने दि. 15.01.2015 रोजी केलेला करारनामा नोंदणीकृत नसणे -

सदरची मालमत्ता मनपाची असल्याने आयुक्त मनपा किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्याने गाळेधारकासोबत विहित पद्धतीने करारनामा करणे आवश्यक होते. या संदर्भात आयुक्तांनी एखाद्या अधिकाऱ्यास प्राधिकृत केले असल्याबाबतचे आदेश उपलब्ध करण्यात आले नाही. परंतु बाजार विभागातील अधिक्षकाने गाळेधारक श्री हेमनानी यांचा सोबत रु. 500/- मूल्याचे मुद्रांकावर शासनाकडे नोंदणीकृत नसलेला करारनामा केला असल्यामुळे सक्षम प्राधिकाराअभावी तो अवैध ठरतो.

2. सक्षम प्राधिकरणाची मान्यता नसणे -

सदर करारनामा मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 मधील कलम 79 (क) (5) च्या उल्लेखासह करण्यात आला असे दिसते. परंतु कलम 79 (क) नुसार रु. 50 ,000/- पेक्षा अधिक मुल्य असल्याने सर्वसाधारण सभेची मंजुरी सदर प्रकरणात घेण्यात आली नाही. सक्षम मंजुरी प्राप्त न करता स्थायी समितीने वेळेवरचा विषय म्हणून आवश्यक असलेली स्विकृत करून त्यास घाईघाईने मंजुरी देण्यात आली असे दिसते.

3. अनधिकृत हस्तांतरण -

श्री हेमनानी यांचेकडे दि. 22.09.2012 ते करारनाम्याच्या दि.19.12.2014 पर्यंत सदर दुकानाचा अनधिकृत हस्तांतरणासह ताबा होता. या अनधिकृत हस्तांतरणासंबंधाने कोणताही दंड, शुल्क आकारण्यात आलेला नाही. तथापि रु. 2 लाख अनामत रकम व मूळ भाडेधारकाकडील थकीत भाडे रकम रु.39,240/- श्री हेमनानी यांनी मनपाकडे भरणा केल्याचे नस्ती वरून दिसते.

4. अल्प भाडेदरामुळे मनपाचे नुकसान -

सदर करारनाम्यानुसार रु. 363/- हे एकत्रित वार्षिक भाडे रकम निश्चित करून त्यावर 5% वार्षिक वाढ मान्य करण्यात आली आहे. प्रत्यक्षात भाडे रकम निश्चित करताना MRTP Act 1966 नुसार चालू वर्षीच्या बाजार मूल्यदराचा आधार घेणे आवश्यक होते. मनपा अधिनियमाचे कलम 79 (5) नुसार चालू बाजार दरापेक्षा कमी नसेल असा मोबदला घेऊनच मनपाची मालमत्ता भाडयाने देता येते किंवा अभिहस्तांतरित करता येते. त्यामुळे केवळ रु.30/- दरमहा भाडे रकम निश्चित करून मनपाचे नुकसान करण्यात आले आहे.

DATABWM6901 (Ref No : 179)

102 रु. 44.17 लाख मूल्य असलेल्या भूखंडाचे स्वयंसेवी संस्थाना नियमबाह्यपणे वाटप करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :210 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 4417235.00 /-

मंजूर अभिन्यासातील खुली जागा नगर विकास विभाग ज्ञापन क्र. TPB4396/114/प्र.क्र.89/नवी-11, दि.10/06/1996 नुसार संबंधित अभिन्यासातील भूखंडधारकांच्या गृहनिर्माण संस्थांनाच विकासासाठी देण्याचे बंधनकारक असताना मनपाने त्या त्रयस्थ संस्थांना वाटप केल्या आहेत. असे वाटप करताना घ्यावयाचा मोबदला चालू बाजार दरास अनुसरून असला पाहिजे. परंतु प्रत्यक्ष वाटपाच्या दिनांकास असलेले चालू बाजारदर दुर्लक्षित करुन जमीन वापर मूल्याची आकारणी केल्याने मनपाच्या रु. 4417235/- एवढ्या महसुलाची हानी झाली आहे. तसेच उदाहरणादाखल तपासलेल्या नऊ प्रकरणांत प्रत्यक्ष वाटपाच्या दिनांकास असलेले चालू बाजारदर दुर्लक्षित करुन जमीन वापर मूल्याची आकारणी केल्याने मनपाच्या रु. 4417235 /- एवढ्या महसुलाची हानी झाली आहे.

मनपा क्षेत्रातील मंजूर अभिन्यासातील सार्वजनिक वापरासाठी आरक्षित असलेल्या भूखंडाचा मनपाद्वारे विकास करण्यासाठी आवश्यक तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात करण्यात आलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 मधील परंतुक "ग" नुसार केवळ महाराष्ट्र गलिच्छ वस्ती (सुधारणा व पुनर्विकास) अधिनियम 1971 च्या तरतुदीनुसार गलिच्छ म्हणून घोषित करण्यात आलेली मनपाच्या मालकीची जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा वैद्यकीय आणि

शैक्षणिक प्रयोजनासाठी नोंदणीकृत संस्थांना भाडेपट्टयाने देता येते. नगर विकास विभाग शा.नि. क्र. TPS 1094/DR-14/94/नवी-9, दि.07/04/1994 नुसार व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 मधील तरतुदीप्रमाणे मंजूर विकास योजनेतील आरक्षणाखालील जमिनीच्या विकासासाठी प्राधिकृत संस्थांना त्या भाडयाने देता येतात. मंजूर अभिन्यासातील खुली जागा अशा संस्था सार्वजनिक संस्थांना विकासासाठी देण्याचे धोरण नगर विकास विभाग ज्ञापन क्र. TPB4396/114/प्र.क्र.89/नवी-11, दि.10/06/1996 अन्वये स्पष्ट करण्यात आले असून अशी जागा केवळ संबंधित अभिन्यासातील भूखंडधारकांच्या गृहनिर्माण संस्थांनाच विकासासाठी देण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने असे भूखंड स्वयंसेवी संस्थाना तीन वर्षासाठी वाटप झालेल्या पुढील प्रकरणांची तपासणी करताना या तरतुदीचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले आहे.

1. पुढील तक्त्यामधील संबंधित अभिन्यासातील भूखंडधारकांच्या गृहनिर्माण संस्थांऐवजी त्रयस्थ संस्थांना नियमबाह्यपणे भूखंडांचे विकासासाठी वाटप करून शासन निर्देशांचे उल्लंघन करण्यात आले आहे.

2. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियममाचे कलम 79 (ड) नुसार मनपाच्या कोणत्याही मालमत्तेचे हस्तांतरण चालू बाजार किंमतीपेक्षा कमी मोबदल्यात करता येत नाही. पुढील नऊ प्रकरणांत प्रत्यक्ष वाटपाच्या दिनांकास असलेले चालू बाजारदर दुर्लक्षित करुन जमीन वापर मूल्याची आकारणी केल्याने मनपाच्या रु. 4417235 /- एवढ्या महसुलाची हानी झाली आहे.

अ.क्र.	सर्वसाधारण सभेचा ठराव	ठरावाद्वारे वाटप केलेल्या जागेचा अभिन्यास	वाटप झालेली संस्था	वाटपाचे प्रयोजन	वाटप केलेल्या जागेचे क्षेत्र (चौ.मी,)	ठरावाद्वारे जमीन वापर मूल्याची केलेली आकारणी (बाजार मूल्याच्या 50%) (रु.)	प्रत्यक्ष वाटप करारनाम्याचे दिनांकास लागू बाजार दरानुसार जमीन वापर मूल्य रु. (2015)	तफावत रु.
1	9 18/02/14	मौजा-तारखेडा सर्व्हे क्र.50, भूखंड क्र. 2	राजे छत्रपती बहुउद्देशीय संस्था, विलास नगर (स्वतंत्र	व्यायाम शाळा	151.63	307050x 50%= 153525	2650	401820 x 50%= 200910

			परिच्छेद)					
2	60 20/09/13	मौजा -पेठ अमरावती सर्व्हे क्र.33/3,33/4, 33/5 येथील भूखंड क्र.195, 175,196	संकटमोचन हनुमान मंदिर ट्रस्ट, अमरावती (स्वतंत्र परिच्छेद)	बालक मंदिर	334.57	802968 x 50%= 401484	6600	2208162 x 50%= 1104081
3	7 18/02/14	मौजा -शेगाव सर्व्हे क्र. 44	समता गृहनिर्माण संस्था, कठोरा रोड, (स्वतंत्र परिच्छेद)	व्यायाम शाळा	200	990000 x 50%= 495000	7000	1400000 x 50%= 700000
4	6 02/12/14	मौजा-तारखेडा सर्व्हे क्र. 24	संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था अमरावती	कम्युनिटी हॉल बांधकाम	133.60	190380 x 50%= 95190	3950	527720 x 50%= 263860
5	58 13/08/14	मौजा-शेगाव सर्व्हे क्र. 14 भाग व 29 भाग राठी नगर	संत गाडगेबाबा सार्वजनिक वाचनालय, गाडगे नगर	वाचनालय / योगभवन बांधकाम	200	890000 x 50%= 445000	10700	2140000 x 50%= 1070000
6	14 20/12/14	मौजा-राहटगाव सर्वे क्र. 137/2 (मोर्शी रोड ते राहटगाव रस्त्या लगतचा परिसर)	संत रविदास जीवन विकास बहुउद्देशीय संस्था कॉग्रेस नगर	व्यायाम शाळा बांधकाम	200	400000 x 50%= 200000	4800	960000 x 50% 480000
7	4 20/01/15	मौजा-सातुर्णा सर्वे क्र. 22, पवन नगर	सरयुपरिण ब्राम्हण सभा , अमरावती	व्यायाम शाळा बांधकाम	200	375000 x 50%= 187500	4500	900000 x 50%= 450000
8	17 20/03/15	मौजा-तारखेडा सर्वे क्र. 76, (जाकीर कॉलोनी)	प्रियदर्शनी उर्दू प्राथमिक	बालवाडी बांधकाम	93.40	233500 x 50%= 116750	5750	537050 x 50%= 268525

DRAFT

			व माध्यमिक शाळा					
9	27 20/03/15	मौजा-गंभीरपुर सर्व्हे क्र. 14/3 इमाम नगर जवळ अकोली वळण रस्ता	जोहा.एज्यु. व वेल्फेअर ट्रस्ट जमील नगर	बालवाडी बांधकाम	164.25	98550 x 50%= 49275	1750	287438 x 50%= 143719
एकूण								**4417235**

DATABWM6901 (Ref No : 136)

104 मंजूर आकृतीबंधानुसार उपलब्ध पदोन्नतीचे पद डावलून पदोन्नती व त्यानुषंगाने त्या वरील वेतनश्रेणी मध्ये सुधारित आश्वासित प्रगती योजनेंतर्गत चुकीचे ग्रेड वेतन मंजूर केल्यामुळे दि. 01.03.1993 पासून वेतनाचे झालेले अतिप्रदानाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनि यमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :205 शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9अ

नगररचना विभागातील श्री कुत्तरमारे, अनुरेखक यांना 01.03.1993 रोजी 4500 – 7000 ऐवजी 5500 – 9000 या वेतनश्रेणीत आकृतीबंधात उपलब्ध नसलेल्या पदावर पदोन्नती देण्यात आली. यापुढे 01.10.2006 रोजी आश्वासित प्रगती योजनेंतर्गत पर्यायाने त्रुटीपूर्ण वेतन निश्चित झाले. या नियमबाह्यतेमुळे दि. 01.03.1993 पासून त्यांना वेतनात अतिप्रदान होत असल्याचे आढळुन येते.

नगररचना विभागातील मनपा अमरावतीच्या श्री. जी.के. कुत्तरमारे यांची अनुरेखक (Tracer) पदावर दि. 01.11.1986 रोजी नियुक्ती होवून त्यांना आदेश दि. 02.08.1995 अन्वये दि. 01.03.1993 पासून पुर्वलक्षी प्रभावाने जागा निरीक्षक / सहा. आरेखक पदावर पदोन्नती देण्यात आली. त्यानंतर उपायुक्त यांचे क्र. 1847 / 2011 दि. 08.08.2011 नुसार आश्वासित प्रगती योजनेचा दि. 01.10.2006 लाभ मंजूर करण्यात आला.

या प्रकरणात लागू करण्यात आलेल्या वेतनश्रेण्या वेतनबँड पुढीलप्रमाणे आहेत.

वेतन निश्चितीचे टप्पे (i) मुळनियुक्ती	**दिलेली वेतनश्रेणी /बँड**	**देय वेतनश्रेणी/ बँड**
01.11.1986 (अनुरेखक)	260-10-390-15-420-15-495	

	सुधारित 950-20-1150-दरो-25-1500	
(ii)पदोन्नती 01.03.1993 पासून पूर्वलक्षी प्रभावाने (जागा निरीक्षक तथा सहा. आरेखक)	1400-400-1800-दरो-50-2300 सुधारित 5500-150-9000 (01.01.1996 पासून) सुधारित **9300-34800+ग्रे,वे. 4300** (01.01.2006 पासून)	4500-125-7000 **5200-20200+ग्रे.वे. 2800** (पदोन्नतीचे पद उपलब्ध नसल्याने)
(iii)आश्वासित प्रगतीयोजना 01.10.2006 पासून	9300-34800+ ग्रे.वे.-4300 + अ.ग्रे.वे.600 म्हणजेच, **9300-34800+ ग्रे.वे. 4900**	5200-20200+ग्रे.वे. 2800 +अतिरिक्त ग्रे.वे. 300 म्हणजेच,**5200-20200+ग्रे.वे. 3100**

यावरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

5) उपलब्ध असलेल्या आकृतिबंधानुसार पदोन्नती साखळीतील पदे पुढीलप्रमाणे आहेत.

i	अनुरेखक(ठराव क्र.9 दि.03.06.1986अन्वये मंजूर पदे)	रु. 3050-4590 रु. 5200-20200+ग्रे.वे.1900 (सुधारित)
ii	आरेखक (ठराव क्र. 37 दि.18.09.1984 अन्वये मंजूर पद)	रु. 4500-7000 रु. 5200-20200+ग्रे.वे. 2800 (सुधारित)
iii	कनिष्ठ अभियंता (ठराव क्र.26, दि.28.05.1984 अन्वये मंजूर पद)	रु. 5000-7000 रु. 9300-34800+ग्रे.वे.4300

वरील पदे पदोन्नती साखळीतील अर्हताप्राप्त कर्मचाऱ्यांना मंजूर करता येतात. सदर प्रकरणी अनुरेखक या पदास आरेखक या पदाची वेतनश्रेणी/ बँड देय असताना उपलब्ध नसलेल्या व मंजूर नसलेल्या जागा निरीक्षक तथा सहा. आरेखक या पदावर पुर्वलक्षी प्रभावाने अनियमितपणे पदोन्नती देण्यात आली आहे. परिणामत: पदोन्नती मध्ये पदोन्नती श्रृखलेतील आरेखक वेतनश्रेणीस ओलांडून कनिष्ठ अभियंत्या पदाची समकक्ष पदाच्या वेतनश्रेणी व बँड मंजूर झाल्याने अनियमितता घडली आहे.

याच अनुषंगाने दि. 01.10.2006 पासून दिलेल्या आश्वासित प्रगती योजनेतर्गत अंतिमत: ग्रे.वे. 3100 देय असताना ग्रे.वे. 4900 च्या लाभ देण्यात आला आहे.

याप्रमाणे श्री. कुत्तरमारे यांना दि. 01.03.1993 या प्रथम पदोन्नतीच्या दिनांकापासून अतिप्रदान होत असल्याचे दिसून येते. त्यानुसार अर्धसमासाद्वारे खुलासा करण्याची सूचना सामान्य प्रशासन विभागास

देण्यात आली होती. परंतु त्यावरील अनुपालन अद्याप अप्राप्त असल्याने दि. 01.03.1993 पासून सुधारित वेतन निश्चिती व अतिप्रदानाचे निर्धारण करून आवश्यक कार्यवाही करावी.

DATABWM6901 (Ref No : 95)

108 मनपा शाळेतील गरीब मुला-मुलींसाठी पटसंख्येपेक्षा जादाची टाय व बेल्ट खरेदी केल्याने अवाजवी खर्च झाल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 05

लेखा शीर्ष :243 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 533633.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 469695.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 63938.00/-

महानगरपालिका अमरावती शहरातील मनपाच्या शाळामधील वर्ग 1 ते 7 च्या गरीब विद्यार्थ्यांना मोफत टाय व बेल्ट खरेदी करुन वाटप करणे इत्यादी प्रकरणी प्रत्यक्षात एकूण विद्यार्थी संख्येपेक्षा जादा विद्यार्थ्यांकरीता टाय व बेल्ट खरेदी केल्याने रु.63938/- चे अतिप्रदान झाल्याचे लेखापरिक्षणादरम्यान निदर्शनास आले. सदर खरेदी प्रकरणात नियमानुसार कार्यवाही न केल्याने महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस-1088/ (2512)उद्योग-6 दिनांक 2 जानेवारी 1992 मधील निर्देशांचे उल्लंघन झाले आहे.

महानगरपालिका अमरावतीच्या सन 2014-15 या आर्थिक वर्षात शिक्षण विभागासाठी खरेदी केलेल्या साहित्याकरीता महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक 34/39 दिनांक 6.08.2010 नुसार मनपाच्या भांडार विभागाने ई-निविदा कार्यप्रणालीनुसार कार्यवाही करणे अपेक्षित असताना ई-निविदा कार्यप्रणालीचा वापर न करता स्थानिक वृत्तपत्रात नियमबाहरित्या जाहिरात देणे, पुरवठादारांना निविदा भरण्यासासाठी कमीत-कमी 3 आठवडयाचा कालावधी न देणे, शासन निर्णय परिपत्रक दि.3.09.2011 नुसार मागणीपत्र प्राप्त झाल्यापासून 6 आठवडयाच्या आत मालाचा पुरवठा न झाल्यास उशिरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर 0.5% प्रती आठवडा प्रमाणे दंड न आकारणे, शाळेची पटसंख्या कमी असतांना शाळेला जादा संख्येने टाय व बेल्टचे वाटप करणे इत्यादी प्रकारच्या अनियमितता आढळून आल्या.

याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय खालीलप्रमाणे आहे:-

1. अलिशा मार्केटिंग, अमरावती यांना न पुरविलेल्या टाय व बेल्टसाठी प्रदान करणेबाबत:-

भांडार विभागाचा पुरवठा मागणी आदेश क्र. 237 दिनांक - नमूद नाही.

आलिशा मार्केटिंग, अमरावती यांचे बिल क्र.55 दि.18.06.2014

प्रमाणक क्रमांक 3844 दिनांक 16.08.2014 रु.5,33,633/-

प्रदान करण्यात आलेल्या देयकानुसार केलेली खरेदी खालीलप्रमाणे-

(अ)टाय सिम्बालसह 11793 नग X रु.19.25 प्रती नग = रु.2,27,015/-

(ब) बेल्ट सिम्बालसह 11793 नग X रु.26.00 प्रती नग = रु.3,06,618/-

रु.5,33,633/-

मनपाच्या भांडार विभागाकडील सन 2014-15 च्या साठानोंदवहीत आलिशा मार्केटिंग, अमरावती यांचेकडून प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या टाय व बेल्टची संख्या व प्रती नग दर याबाबतची खर्चाची नोंद पुढीलप्रमाणे केली आहे.

(अ) टाय सिम्बालसह 10380 नग X रु.19.25 प्रती नग = रु.199815/-

(ब) बेल्ट सिम्बालसह 10380 नग X रु.26/- प्रती नग = रु.269880/-

एकुण **रु.469695/-**

साठा नोंदवहीनुसार प्रत्यक्षात पुरवठादाराकडून प्राप्त टाय व बेल्टपेक्षा एकूण 1413 जादा नग टाय व बेल्टच्या रकमेचे रु.63938/- चे अतिप्रदान झाल्याचे दिसून येत असून वसुलपात्र आहे.

2. भांडार विभागाकडील साठा नोंदवहीनुसार मागील वर्षीचा साठा निरंक आहे. संबंधीत नस्तीमधील दि.13.02.2015 च्या टिपणीवरील नोंदीनुसार विदयार्थी पटसंख्या 10380 असल्याचे दिसून येते. म्हणजेच विद्यार्थ्यांची एकूण पटसंख्या10380 असल्याचे स्पष्ट होते. असे असताना अलिशा मार्केटिंग, अमरावती यांना एकूण 11793 नग टाय बेल्टसाठी प्रदान करण्यात आले असून रु.533633/- चे बिलाचे मागील पृष्ठावर प्रदानार्थ रु.5,21,679/- ला मंजूरी दिली आहे. आयकर कपातीची रक्कम शासनाकडे जमा करावयाची असल्याने आयकर रकमेसह रु.533633/- ला प्रदानार्थ मंजूरी आवश्यक असताना रु.521679/- ला मंजूरी दिली आहे. ही बाब लेखांकनाचे दृष्टीने नियमसंगत नाही.

3. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन, शासन निर्णय क्र. जाहिरात-2009/प्र.क्र.137/का-34 दिनांक 31.08.2009 मधील निर्णय क्रमांक 12 नुसार निविदेचे मुल्य रु. 55 लाखापर्यंत असेल तर अशा जाहिराती **ब** वर्ग दैनिक वर्तमानपत्रात व साप्ताहिकात प्रसिध्दी दयावी असे नमूद आहे. मनपाने नियमबाहयरित्या स्थानिक सांध्य दैनिक या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दी दिल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे.

4. महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-1088/ (2512) उद्योग-6 दिनांक 2जाने.1992 मधील परिच्छेद 8.3(अ) आणि भांडार खरेदी नियम पुस्तिका प्रकरण चार भाग-2 नियम-1(ई)नुसार निविदा प्रसिध्द झाल्यानंतर पुरवठादारांना निविदा भरण्यासाठी कमीत-कमी 3 आठवडयाचा कालावधी देण्यात यावा असे निर्देश आहे. परंतु निविदाधारकांना निविदा सादर करण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात आला नाही. पुरवठादाराला निविदा भरण्यास पुरेसा कालावधी न मिळाल्यामुळे तसेच स्थानिक सांध्य दैनिकात नियमबाहयरित्या जाहिरात दिल्यामुळे जास्तीत जास्त व शहराबाहेरील पुरवठाधारकाने निविदा भरल्या नाही. त्यामुळे टाय व बेल्टचे दर माफक असल्याची खात्री होत नाही.

5. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती-2010/प्र.क्र. 34/39 दि.6.08.2010 नुसार निविदा प्रक्रियेचे महत्व लक्षात घेवून शासनाच्या प्रत्येक विभागात दिनांक 1.12.2010 पासून ई-निविदा कार्यप्रणाली वापरणे अनिवार्य करण्यात आले आहे. असे असतांना ई-निविदा कार्यवाहीचा अवलंब न केल्याने ही गंभीर अनियमितता ठरते. सदर जाहिरात स्थानिक सांध्य दैनिकात दिल्यामुळे

DRAFT

टाय व बेल्ट पुरविण्याचा कंत्राट स्थानिक पुरवठादारालाच देण्याचा हेतू स्पष्ट होतो. शासन निर्णयातील तरतूदीनुसार विभागीय वर्तमान पत्रात किंवा ई-निविदाव्दारे जाहिरात दिली असती तर मनपाला खुल्या बाजारपेठेतील स्पर्धात्मक दराचा फायदा मिळाला असता परंतु मनपाच्या भांडार विभागाकडून अशी कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे विभागाचा हेतू मनपाचे आर्थिक हित जोपासण्याचा असल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त प्रकरणी खरेदी प्रक्रिया तसेच जादाचे खरेदीसंबंधी खुलासा करण्यास अर्धसमास पत्र क्र.133 दि. 16.04.2018 नुसार खुलासा करण्यास कळविण्यात आले होते. परंतु खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत असून रु.63938/- वसुलपात्र असून संबंधीताकडून वसुलीची कार्यवाही करुन अनुपालन करावे.

DATDUBM6401 (Ref No : 133)

114 कोंडवाडा विभागांतर्गत प्रत्यक्ष खरेदी झाली नसताना रु.19.43 लाख एवढा खर्च संबंधित लेखाशिर्षाखाली नोंदविल्याने खर्च केलेल्या रकमेच्या गैरविनियोगाच्या शक्यतेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :400 मनपानिधी निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 1943730.00/-

मनपा अमरावती येथील कोंडवाडा विभागातील सन 2014-2015 या वर्षामध्ये नविन वाहन खरेदीवर लेखाशिर्ष 400 मध्ये एकूण रु.19,43,730/- एवढा खर्च झाल्याचे दर्शविले आहे परंतु कोंडवाडा विभागाचे पत्र क्र.79, दि.19/05/2018 नुसार 2014-15 मध्ये विभागाने नविन वाहन खरेदीबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नसल्याचे कळविले त्यामुळे यासंदर्भात नियमबाह्य व अनियमित विनियोग झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

मनपा अमरावती येथील कोंडवाडा विभागाकरिता सन 2014-15 या वर्षामध्ये नवीन वाहन खरेदीवर अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष आकडेवारी लेखाशिर्ष 400 मध्ये एकूण रु.19,43,730/- एवढा खर्च झाल्याचे दर्शविले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र. 46 दि. 20/02/2018 व पत्र क्र.113, दि. 09/05/2018 नुसार अभिलेखाची मागणी केली असता कोंडवाडा विभागाचे पत्र क्र.79, दि. 19/05/2018 नुसार वर्ष 2014-15 मध्ये कोंडवाडा विभागाने नविन वाहन खरेदीबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नसल्याचे तसेच अद्यापपर्यंत त्या विभागास कोणतेही नविन वाहन उपलब्ध झाले नसल्याचे कळविले. ही बाब मनपा आयुक्तांचे निदर्शनास अर्धसमास पत्र क्र.215, दि.03/07/2018 अन्वये आणून देण्यात आली. परंतु सदर खर्चासंबधीची प्रमाणके अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे कोंडवाडा विभागातील लेखाशिर्ष क्र.400 मधील रु.25 लाखाच्या

तरतुदीतून रु.19.43 लाखाचा नियमबाह्य व अनियमित विनियोग झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब रु.19,43,730/- हा नविन वाहन खरेदीवरील खर्च आक्षेपित ठेवण्यात येतो.

DATVVBM6301 (Ref No : 215)

115 आरोग्य व पर्यवेक्षण विभागातील स्वास्थ/स्वच्छता निरीक्षक यांना रु.4300 ऐवजी रु.4800 असे चुकीचे ग्रेड वेतन देऊन अतिप्रदान केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9अ

आरोग्य तसेच पर्यवेक्षण विभागातील स्वास्थ/स्वच्छता निरीक्षक (रु. 5200-20200, ग्रेड वेतन-2400) या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना प्रमुख स्वच्छता/स्वास्थ निरीक्षक व स्वच्छता अधिकारी/अधिक्षक या पदाचे अनुकरणे 4200 व 4300 हे ग्रेड वेतन प्रथम व दुसऱ्या आश्वासित प्रगती योजने अंतर्गत देय आहे. परंतु वेतन देयकाची तपासणी केली असता स्वास्थ/स्वच्छता निरीक्षक या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती अंतर्गत 4800 एवढे चुकीचे ग्रेड वेतन प्रदान करण्यात येऊन त्यांना अतिप्रदान करण्यात आले आहे.

अमरावती महानगरपालिके अंतर्गत आरोग्य तसेच पर्यवेक्षक विभागातील स्वास्थ/स्वच्छता निरीक्षक या पदावर कार्यरत पुढे दर्शविलेल्या कर्मचाऱ्यांना रु.5200-20200 या वेतनश्रेणी मध्ये रु.2400/- ऐवढे ग्रेड वेतन देय आहे. परंतु वेतन देयकाची तपासणी केली असता स्वास्थ/स्वच्छता निरीक्षक या पदावर कार्यरत विविध कर्मचाऱ्यांना रु.2400/-, 4200-/, 4800/- अशा प्रकारे ग्रेड वेतन देण्यात आल्याचे आढळून आले.

स्वास्थ/स्वच्छता निरीक्षक या पदाकरिता आकृतीबंधानुसार पदोन्नतीच्या श्रृंखलेमध्ये पुढील पदे उपलब्ध आहेत.

(1) स्वास्थ/स्वच्छता निरीक्षक रु.5200-20200, ग्रेड वेतन-2400
(2) प्रमुख स्वास्थ/स्वच्छता निरीक्षक रु.9300-34800 ग्रेड पे 4200
(3) स्वच्छता अधिकारी/अधिक्षक रु.9300-34800 ग्रेड पे 4300

याप्रमाणे पदोन्नती श्रृंखलेमध्ये पदे उपलब्ध असतांना स्वास्थ/स्वच्छता निरीक्षक या पदावर कार्यरत खालील दर्शविलेल्या कर्मचाऱ्यांना रु.4800/- एवढे ग्रेड वेतन प्रदान करण्यात आल्याचे प्रमाणक क्रमांक 5347/5348, दि. 25.09.2014 अन्वये माहे जुलै, 2014 च्या प्रदान झालेल्या वेतन देयकावरून दिसून आले.

अ.क्र.	कर्मचाऱ्यांचे नाव	पद	दिलेले ग्रेड वेतन (रुपये)
1	श्री सिद्धार्थ गणपत गेडाम	स्वास्थ निरीक्षक	4800
2	श्री कलीम उल्ला खान	स्वास्थ निरीक्षक	4800
3	श्री इरफान खान रशीद खान	स्वास्थ निरीक्षक	4800
4	श्री रामदास फकीराजी डोंगरे	ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक	4800
5	श्री अरुणकुमार तुकाराम तिजारे	ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक	4800
6	श्री सुभाष शेषराव पळस्कर	ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक	4800

स्वास्थ/स्वच्छता निरीक्षक पदावरील कार्यरत वरील कर्मचाऱ्यांना पुढील पदोन्नतीचे पद असताना रु.4800/- ग्रेड वेतन कसे देण्यात येत आहे याबाबत अर्धसमास पत्र क्र.88, दि.28/03/2018 नुसार विचारणा केली असता कोणताही खुलासा प्राप्त झाला नसल्याने सदर आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

तरी वर दर्शविलेल्या स्वास्थ निरीक्षक यांना कालबध्द पदोन्नतीअंतर्गत देय असलेल्या ग्रेड वेतनानुसार सुधारित वेतन निश्चिती करून त्यांना अतिप्रदान झाले असल्यास अतिप्रदानाची वसुली करावी व विवरणासह अनुपालन सादर करावे.

DATVVBM6301 (Ref No : 88)

124 GIS Database तयार करणे या योजनेच्या अंमलबजावणी मधील अनियमिततांमुळे 13 व्या वित्त आयोगातील रु.1.33 कोटी एवढया खर्चाची उपयोगिता शून्य ठरणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 08

लेखा शीर्ष :360 शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 13381547.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 817430.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 13381547.00/-

13 व्या वित्त आयोग निधीतून GIS Database तयार करून सुधारणात्मक बदल घडवून आणण्यासाठी एजन्सीची चुकीच्या पध्दतीने निवड करणे, वेळोवेळी केलेल्या कामावर नियंत्रण न ठेवणे, कामाची प्रगती नसताना 90% प्रदान करणे व झालेल्या कामाचा लाभ मनपास न मिळणे या अनियमिततांमुळे रु.1.33 कोटीचा खर्चाची उपयोगिता शून्य ठरले आहे. याशिवाय आयकराची कपात न केल्याने रु.13.38 लाखाचे केंद्र शासनाचे नुकसान झाले आहे.

DRAFT

मनपाच्या विविध विभागाशी संबंधित विकास कामे, सेवा, मालमत्ता व अन्य सर्व प्रकारच्या माहितीच्या High Resolution Satellite Image चा वापर करून उपलब्ध झालेल्या माहितीचे (Data) Disitization करून GIS प्रणालीशी लिंक करणे हे तांत्रिक काम मनपाच्या कार्यप्रणालीतील सुधारणाविषयक कार्यक्रमांतर्गत सन 2011-12 मध्ये सुरु करण्यात आले.

या कामाचे सन 2011-12 ते 2015-16 या कालावधीत एकूण 90% प्रदान झाले असून 2014-15 या लेखापरीक्षणाच्या कालावधीत सदरचे काम अपूर्णावस्थेत होते.

अन्य तपशील पुढीलप्रमाणे

एजन्सी – मे. सायबरटेक सिस्टिम व सॉफ्टवेअर लिमिटेड, पुणे

तांत्रिक मान्यता – सहाय्यक संचालक,नगररचना,मनपा,अमरावती (रु.15388750/-)

प्रशासकीय मान्यता – जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती,
दि. 03/09/2011 रु. 153.88 लाख

निविदा मंजुरी - स्थायी समिती ठराव क्र.211, दि. 30/12/2011

स्विकृत निविदा - रु. 1,48,68,386/-

करारनामा - दि. 03/01/2012

कार्यादेश - दि. 03/01/2012

मूळ मुदत - दि. 02/01/2013 पर्यंत (52 आठवडे)

मुदतवाढ - दि. 31/12/2013 पर्यंत (नस्तीवरील टिपणीप्रमाणे)

एकूण प्रदान - 90%=रु.1,33,81,547 (2011-12 ते 2015-16)

मनपा क्षेत्रामध्ये विविध कामे, सेवा, मालमता, रस्ते, नाल्या, भुयारी गटार योजना, खुले भूखंड, मनपाचे भूखंड, विजेचे खांब, बगीचे इत्यादी बाबतची माहिती संकलित करून त्या माहितीचा High Resolution Satellite Image चा वापर करून GIS data base तयार करण्याच्या कामासाठी मनपा नगररचना विभागाकडून दि. 09/11/2011 रोजी निविदा प्रकाशित करून मे.सायबरटेक सिस्टीम अॅड सॉफ्टवेअर लिमिटेड या कंपनीची निवड करून दि. 03/01/2012 रोजी करारनामा करण्यात आला. या कंपनीस दि. 31/12/2013 पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती.

या कामासाठी 75% रु.13381547/- प्रदान झाल्यानंतर उर्वरित रकमेपैकी 15% रकमेचे देयक प्रस्तावित करताना नोडल अधिकारी यांनी दि. 13.01.2016 रोजी सदर कंपनीने पूर्ण न केलेल्या कामाचे स्वरूप टिपणीवर स्पष्ट केले. ते पुढील प्रमाणे -

1) विविध विभागाकडून माहिती घेऊन ती GIS System मध्ये अंतर्भूत न करणे.

ब) मनपातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण न देणे.

क) सर्व विभाग GIS प्रणाली सोबत लिंकअप न करणे.

DRAFT

या वरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :-

1. **सक्षम तांत्रिक मान्यता नसणे**– या प्रकल्पास सहाय्यक संचालक, नगररचना,मनपा, अमरावती यांनी तांत्रिक मान्यता दिली आहे. वास्तविक सदरचा प्रकल्प संगणकीय स्वरूपाचा असताना नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेली तांत्रिक मान्यता संयुक्तीक वाटत नाही. म्हणजेच सदरचा प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या सक्षम व व्यवहारिक असल्याची रितसर तपासणी करण्यात आली नाही हे स्पष्ट होते.

2. **वित्तीय मर्यादेबाहेरील निविदा मंजूर होणे**- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 नुसार रु.50 लाखापर्यंत चे करार स्थायी समितीच्या मंजुरीने करता येतात. परंतु या प्रकल्पाचे निविदा मूल्य स्थायी समितीकडील वित्तीय मर्यादेच्या तीनपट असता नाही प्रशासनाने सर्वसाधारण सभेसमोर निविदा मंजुरीसाठी न ठेवता स्थायी समिती समोर मांडून ठरावाद्वारे मंजुरी प्राप्त केली. सदर बाब वित्तीय मंजुरीचे उल्लंघन असल्याने सदर ठराव क्र.211, दि.30/12/2011 शासनाकडे पाठवून कलम 451(I) नुसार विखंडीत करून घेणे आवश्यक होते. परंतु मनपा आयुक्तांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते.

3. **प्रशासकीय दृष्ट्या अपात्र निविदा स्विकृत करणे**- निविदा सूचनेतील अट क्र. 3.5 नुसार GIS विषयातील मागील तीन वर्षातील भारतामधील उल्लाढाल रु. 20 कोटीच्या वर असणाऱ्या निविदाधारकास पात्र समजणे गरजेचे होते. या संबंधीचे पुरावे तांत्रिक लिफाफ्यात असल्याशिवाय निविदादराचा लिफाफा उघडणे चुकीचे होते. परंतु स्विकृत निविदाधारकाकडे 3 ऐवजी 2 वर्षाचा केवळ रु. 3.30 कोटीच्या उलाढालीचा अनुभव असल्याने त्याची निविदा स्विकृत करण्याचे कोणतेही औचित्य नव्हते. असे असताना मनपानेच लादलेल्या पात्रतेच्या अटीकडे मनपाच्या निविदा समितीने दुर्लक्ष केल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

4. **मुद्रांकशुल्काची हानी**- सदर प्रकल्पासाठी कंत्राटदाराने दि. 03/01/2012 रोजी केलेल्या रु.14868386/- मूल्याचा करारनाम्यात रु.100/- किंमतीचे मुद्रांक वापरलेले आहे. मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 63 व नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण 2009/ संक्र 1794/नवी-20 दि. 07/12/2009 नुसार कार्यकंत्राट रकमेच्या प्रथम रु.10 लाख पर्यंत रु.100 व त्यावरील प्रत्येक रु.1 लाखासाठी रु.100 मूल्याचे मुद्रांक वापरणे आवश्यक आहे.

त्यामुळे सदर करारनाम्याचे प्रकरणात रु.15000/- एवढ्या शासन महसुलाचे नुकसान झाले आहे.

5. **तांत्रिक चौकशी समितीची स्थापना**- नोडल अधिकाऱ्याच्या उपरोक्त टिपणीच्या अनुषंगाने केलेल्या कामाची तांत्रिक तपासणी करण्यासाठी दि. 02/06/2017 रोजी स्थापन केलेल्या तांत्रिक उपसमितीने कंपनीस त्यांनी केलेल्या कामाचा संगणक प्रणालीशी लिंक करण्यसाठी Log in ID व Passward उपलब्ध करण्याची सूचना केली. परंतु ती उपलब्ध करण्यात आली नाही किंवा कंपनीचा प्रतिनिधीसुध्दा हजर झाला नाही. म्हणजेच कंपनीने कोणते काम केले हे समितीस निश्चित करता आले नाही. परंतु तत्पूर्वी पुढील टप्प्याचे अनुषंगाने

कंपनीस प्रदान करण्यात आले.

अ.क्र.	कामाचे नाव (टप्पे)	टप्प्यांनुसार प्रदान करावयाची रकम व टक्केवारी	प्रदान केलेली टक्केवारी
1	Delivery of GIS Platform	20% (रु.2973677/-)	20%
2	Creation of layears of GIS	20% (रु.2973677/-)	20%
3	Customised GIS application to intergrated sp.. date with e. for ..	---	-
4	Successful testing customized GIS application on GIS platform	20% (रु.2973677/-)	20%
5	Submission of system documentation and user documentation.	-	-
6	Training to staff of AMC	20% (रु.2973677/-)	15% (रु.2230258/-)
7	Porject Completion Certificate	20% (रु.2973677/-)	15% (रु.2230258/-)
		100%(रु.14868386)	90% (रु.13381547)

वरील टप्प्यांपैकी क्र. 6 व 7 हे टप्पे 100% अपूर्ण आहेत. उर्वरित 1 ते 5 टप्पे अंशत: पूर्ण केल्याचे नोडल अधिकारी यांच्या टिपणीवरून लक्षात येते. असे असताना क्र 6 व 7 वरील एकूण 40% वगळून 60% म्हणजेच रु.8921032/- चे प्रदान समर्थनीय ठरू शकले असते. परंतु 75% प्रदानानंतर 15% चे प्रदान प्रस्तावित करून 10% रकम थांबविण्याचेही नोडल अधिकारी यांनी प्रस्तावित केले असले तरी संबंधित नस्ती हाताळण्याची जबाबदारी असलेल्या नगररचना विभाग व प्रशासनाने 75% नंतरचे सर्व प्रदान थांबविणे जरुरी होते परंतु सर्व परिस्थिती समोर मांडण्यात आली असताना 15% चे ही प्रदान करण्यात आले. ही बाब नोडल अधिकाऱ्याने मांडलेल्या वस्तुस्थितीशी सुसंगत वाटत नाही. परिणामी 60% ऐवजी 90% चे प्रदान कंपनीस झाले.

6. करारनाम्यानुसार मध्यस्थाची (Arbitration) नियुक्ती करून मार्ग न काढणे- करारनाम्यातील परिच्छेद क्र.15 नुसार मध्यस्थाची तरतूद करण्यात आली. मनपा व कंपनीत यांचे मधील वाद परस्पर प्रयत्नांनी मिटत नसल्यास Arbitration and Conciliation Act 1996 मधील तरतुदीनुसार मध्यस्थाचे मार्फत मार्ग काढता येऊ शकतो.

सदर प्रकरणात निविदा रकम रु.1.49 कोटी पैकी रु.1.34 कोटीचे प्रदान कंपनीस करण्यात आले असून

कंपनीने केलेल्या विनंती नुसार त्यांच्याकडील काम पूर्ण झाले असून शिल्लक प्रदान म्हणजेच रु.1.49 -1.34 = रु.15 लाखाचे प्रदान केल्यास Login ID व Passward देऊन प्रकल्प पूर्णत्वास नेता येऊ शकतो असे दिसून येते. त्यामुळे केवळ रु.15 लाखासाठी प्रत्यक्ष झालेला रु.1.34 कोटी एवढा खर्च व्यर्थ ठरला आहे. त्यामुळे सदर प्रकरण मध्यस्थाकडे नेल्यास रु.15 लाखाचे उर्वरित प्रदान करून मूळ प्रकल्प पूर्ण करून मनपास सोपविणे कंपनीस कायदेशीररित्या बंधनकारक असेल व पर्यायाने रु.1.34 कोटीच्या झालेला खर्चाची उपयोगिता वास्तवात येण्याची शक्यता आहे.

सबब सदरचे प्रकरण मध्यस्थकडे नेणे आवश्यक वाटते.

7. आयकराची कपात- उपलब्ध विवरणानुसार सदर कंपनी झालेले प्रदान त्यातून केलेली कपात पुढीलप्रमाणे आहे.

धावते देयक	रुपये	प्रदान दिनांक
प्रथम धावते देयक	2973677	31/03/2012
दुसरे धावते देयक	2973677	10/10/2012
तिसरे धावते देयक	2973677	30/01/2013
चौथे धावते देयक	2230258	13/11/2013
पाचवे धावते देयक	2230258	22/01/2016
रुपये	13381547	
सर्व देयकातून केलेली कपात रुपये	299753 (2.24%)	
निव्वळ प्रदान रुपये	**13081794**	

यावरून असे दिसून येते की एकूण 5 देयकातून आयकर अधिनियमातील कलम 194 J मधील तरतुदीनुसार 10% आयकराची कपात करण्यात आलेली नाही. त्यामुळे केंद्र शासनाच्या रु.13381547/- च्या 10% म्हणजेच रु.1338155/- एवढा महसुलाची हानी झाली आहे. सदर रकम कंपनीकडून वसूल करणे आवश्यक आहे.

8. बँक गॅरंटी जप्त न करणे- सदर कामाचा करारनामा करताना कंपनीकडून रु.802430/-मूल्याची बँक गॅरंटी (सुरक्षा अनामत) घेण्यात आली होती. त्याची मूळ मुदत दि.02/01/2013 असून कामास दि.31/12/2013 पर्यंत प्रथम मुदतवाढी पर्यंत व त्यानंतर मुदतवाढ प्राप्त नसलेल्या कालावधीतही बँक गॅरंटीचे नुतनीकरण करण्यात आले नव्हते. त्यामुळे करारनाम्यातील परिच्छेद क्र.14 नुसार सुरक्षा अनामत जप्त करणे आवश्यक असताना मुदतबाह्य बँक गॅरंटीमुळे तसे करणे शक्य नसल्याने मनपाचे रु.802430/- चे नुकसान झाले आहे.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेतल्यास मुळात अपात्र असलेल्या कंपनीस नियमबाह्य पध्दतीने मोठया

रकमेचे परंतु तांत्रिक दृष्टया सक्षम मान्यता नसलेले काम देणे व काम योग्य पध्दतीने करवून घेण्यासाठी जबाबदार असलेल्या नगररचना विभागाने त्यावर उचित नियंत्रण न ठेवल्याने शासनाकडील अनुदानाची हानी झाली आहे तथापि,सदरचे प्रकरण मध्यस्थाकडे (Arbitration) वर्ग करणे उचित ठरेल असे वाटते.

DATABWM6901 (Ref No : 00)

125 कनिष्ठ अभियंता या पदावरून शाखा अभियंता पदावर दर्जावाढ मंजूर केली असताना पदोन्नती समजून वेतन निश्चिती केल्याने मूळ वेतनात झालेले रु.143520 व त्यावरील भत्ते एवढ्या अतिप्रदाना बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :215 मनपानिधी निधी

अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 143520.00/-

श्री. तांबेकर कनिष्ट अभियंता यांना शाखा अभियंता पदावरील दर्जावाढी ऐवजी पदोन्नतीच्या नियमाप्रमाणे वेतन निश्चित केल्यामुळे 01.07.2007 पासून रु. 1.43 लाखाच्या मूळ वेतनाचे अतिप्रदान झाल्याचे आढळून आले आहे.

अमरावती मनपावरील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांचे चाचणी लेखापरीक्षण करतांना श्री रविंद्र तांबेकर (पदविकाधारक अभियंता) यांना आदेश क्र. अमनपा/साप्रवि/उपा/2395/2010 दि. 25.11.2010 अन्वये दि.04.07.2007 रोजी शाखा अभियंता पदावर पूर्वलक्षी प्रभावाने दर्जावाढीचा लाभ देण्यात आला असे निदर्शनास आले. त्यावरील वेतननिश्चीतीमध्ये तृटी आढळली असून पर्यायाने अतिप्रदान झाल्याचे दिसून आले.

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :

श्री तांबेकर यांना पाठबंधारे विभागाच्या क्र.CDS-1582/158/212/आ-10, दि.16.04.1984 मधील तरतुदी लागू करून दर्जावाढ दिली असली तरी ती प्रत्यक्षात विद्यमान पदाच्या दर्ज्यात वाढ असून पदोन्नती नाही हे स्पष्ट आहे. त्यामुळे दर्जावाढीचा लाभ देताना 3% वेतनवाढी व नविन ग्रेड वेतन याऐवजी पाटबंधारे विभाग शासननिर्णय दि.16.04.1984 व मनासे (वेतन) नियम 1984 मधील नियम 11 (2) व वि.वि. शासन परिपत्रक क्र. वेपूर 1209/प्र.क्र.69/सेवा-9 दि.05.05.2010 मधील परिच्छेद क्र. 2.1 (ब) (i) नुसार विद्यमान वेतन कायम राहून केवळ नविन ग्रेड वेतनाचाच लाभ देय ठरतो. असे असतांना सदरहु प्रकरणात पुढील प्रमाणे चुकीची वेतन निश्चिती व वेतनवाढी मंजूर करण्यात आल्या आहेत.

दर्जावाढीच्या दिनांकास विद्यमान वेतन - रु. 10670 + 4300 (ग्रेडवेतन)
(वेतनबँड रुपये 9300 - 34800+ग्रे.वे.4300)
दर्जावाढीचा दिनांक - 04.03.2007
शाखा अभियंता पदाचा वेतनबँड - रु.9300 - 34800+ग्रे.वे. 4400

अनु.क्र.	वेतन निश्चिती / वेतन वाढीचा दिनांक	केलेली वेतन निश्चिती व दिलेले वेतन	अनुज्ञेय वेतन	मूळ वेतनातील तफावत मासिक तफावत	मूळ वेतनात वार्षिक अतिप्रदान
1	04.03.2007	10670+4400	10670+4400	-	-
2	01.07.2007 (वेतन निश्चिती)	10670+450 (3%) =11120+4400	पदोन्नती नसल्याने 3% लाभ देय नाही.	450	5400
3	01.07.2007 नियमित वेतन वाढ	3%=470 = 11590+4400	04.03.07 ते 01.07.07 सहा महिन्यापेक्षा कमी सेवाकाळ असल्याने वेतनवाढ 01.07.2008 रोजी देय आहे.	920	11040
4	01.07.2008	3%=480 12070+4400	11120+4400	950	11400
5	01.07.2009	12570+4400	11590+4400	980	11760
6	01.07.2010	13080+4400	12070+4400	1010	12120
7	01.07.2011	13610+4400	12570+4400	1040	12480
8	01.07.2012	14150+4400	13080+4400	1070	12840
9	01.07.2013	14710+4400	13610+4400	1100	13200
10	01.07.2014	15290+4400	14150+4400	1140	13680
11	01.07.2015	15880+4400	14710+4400	1170	14040
12	01.07.2016	16490+4400	15290+4400	1200	14400

DRAFT

13	01.07.2017	17120+4400	15880+4400	1240	11160
एकूण					143520

याप्रमाणे दि. 04.03.2007 ते 31.03.2018 पर्यंत मूळ वेतनात रु. 1,43,520/- व त्यावरील वेतन व भत्ते यांचे अतिप्रदान होवून मनपा निधीची हानी झाली आहे ती वसूलपात्र आहे. याप्रमाणे अन्य प्रकरणांचाही आढावा घेण्यात यावा.

DATABWM6901 (Ref No : 232)

129 कर अधिकाऱ्याच्या कक्षासाठी दरपत्रके न मागविता नियमबाह्य अग्रीमातून वित्तीय औचित्याबाहेरील अवाजवी खर्च करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :101 मनपानिधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 70000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 48500.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 21500.00/-

कर अधिकाऱ्यासाठी नवीन कक्ष उभारणीसाठी येणाऱ्या खर्चाचे प्राकलन तयार न करता रु.70,000/- च्या मोघम अग्रीमातून वित्तीय औचित्याबाहेरील रु.21,500/- एवढा खर्च करण्यात आला.

अग्रिम प्रमाणक क्र. 12068, दि.25/02/2015 रु.70,000/-
समायोजन प्रमाणक क्र.13531, दि.30/03/2015 रु.70,000/-

मनपा अमरावती मधील कर विभागाचे कर व करसंकलन अधिकारी या पदासाठी कक्ष बनविण्यासाठी उपरोक्त प्रमाणकान्वये रु. 70,000/- चे अग्रिम श्री रवींद्र पवार, उपअभियंता यांनी उचलले असून त्यातून साहित्य व मजुरी यावर संपूर्ण रकम खर्च झाल्याचे दर्शवून अग्रीमाचे समायोजन करण्यात आले. समायोजनाच्या बिजकांची तपासणी करतांना त्यापैकी काही खर्च मनपाची आर्थिक स्थिती विचारात घेत मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम 58 नुसार वित्तीय औचित्यांचे उल्लंघन करणारा आहे असे स्पष्ट दिसते.

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :-

1. सदर प्रकरणात रु.70,000/- या अग्रीमातून आक्षपार्ह असलेला खर्च पुढीलप्रमाणे आहे.

अ. कक्षासाठी फॉरेस्ट ब्लॅक ग्लास - 17,000/-

(मे. तिरुपती ग्लास ॲड प्लाय, अमरावती)

ब. कक्षासाठी रंगीत गालीचा - 4,500/-

(मे. मधुसूदन सन्स, अमरावती) ----------

21,500/-

सन 2013-14 व 2014-15 च्या मनपाच्या वित्तीय विवरणानुसार मनपाची आर्थिक परिस्थिती सुदृढ नसताना व प्रत्यक्ष कर विभागाने प्रत्यक्ष मागणीच्या तुलनेत केलेली वसुली समाधानकारक नसताना खर्चात काटेकोरपणा व काटकसरीचे धोरण अंमलात आणणे अत्यंत गरजेचे होते. परंतु केबिनसाठी काळी काच व रंगीत गालिच्यावर केलेला अवास्तव खर्च या धोरणाचे व वित्तीय औचित्यांचे उल्लंघन करणारा ठरतो. सबब तो वसूलपात्र आहे.

2. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील नियम 141 नुसार प्रत्येक बांधकामाचे प्रचलित अनुसूचित दरानुसार अंदाजपत्रक तयार करून दरपत्रक किंवा निविदा मागवून किफायतशीर दराने संबंधित काम करणे आवश्यक असताना व कोणतीही तातडीची बाब नसताना रु.70,000/- ची अग्रीमाद्वारे उचल करण्यात आली. सदर बाब नियमसंगत नसल्याने या अग्रीमातून झालेल्या कामाचे मुल्यांकन करणे व अनावश्यक व जादा खर्चाची वसुली क्रमप्राप्त ठरते.

DATABWM6901 (Ref No : 231)

137 शासन निर्णय वित्त विभाग दि. 03.07.2009 नुसार दि. 01.01.2006 नंतर आगाऊ वेतनवाढ अनुज्ञेय नसताना श्री मिराणी व.ली. तथा श्री भूषण पुसनकर,क. लि. यांना आगाऊ वेतनवाढ दिल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :12 मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

शासन निर्णय वित्त विभाग क्र. शासन 1009/प.क्र./87/9/आठ, दि. 03.07.2009 नुसार देय नसताना श्री मिराणी व.लि. यांना दि. 01.10.2008 रोजी दोन तथा दि. 01.01.2011 रोजी एक याप्रमाणे एकूण तीन आगाऊ वेतनवाढी तथा श्री पुसनकर,क.लि.यांना दि. 01.07.2008 रोजी एकूण तीन आगाऊ वेतनवाढी देण्यात आल्याने अतिप्रदान झाले आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शा.नि.क्रमांक 1009/प.क्र./87/9/आठ, दि. 03.07.2009 नुसार दि.1 ऑक्टोबर 2006, 01.ऑक्टो. 2007 व 01 ऑक्टो. 2008 रोजी देय होणाऱ्या आगाऊ वेतनवाढी ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना 5 व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत मंजूर करण्यात आल्या असतील अशा कर्मचाऱ्यांची 6 व्या वेतन आयोगाचे शिफारसीनुसार वेतन निश्चिती करताना दि. 1 ऑक्टोबर 2006, दि.1 ऑक्टोबर 2007 व 1 ऑक्टो.2008 रोजी देय होणाऱ्या आगाऊ वेतन वाढीचा लाभ देण्यात येवू नये असे स्पष्ट निर्देश असताना महानगरपालिकेने पुढील कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढी मंजूर केलेल्या आहेत.

2) श्री जी.एस.मिरानी, वरिष्ठ लिपीक

अ.क्र.	दिनांक	नियमित वेतनवाढ (रुपये)	ग्रेड पे आगाऊ वेतनवाढ रुपये)
1	01.07.2008	7330+280=7610+1900	-
2	01.10.2008	-	7610+290=7900+1900
3	01.10.2008	-	7900+300=8200+1900
4	01.07.2009	8200+310=8510+1900	-
5	01.07.2010	8510+320=8830+1900	-
6	01.01.2011	-	8830+330=9160+1900
7	01.07.2011	9160+340=9500+1900	-

2) श्री भूषण पुसनकर, कनिष्ठ लिपीक

अ.क्र.	दिनांक	नियमित वेतनवाढ (रुपये)	ग्रेड पे आगाऊ वेतनवाढ (रुपये)
1	01.01.2006	6790+1900	-
2	01.07.2006	6790+270+1900	-
3	01.07.2007	7060+270+1900	-
4	01.07.2007	7330+280+1900	-
5	01.07.2008	-	7610+290+1900
6	01.07.2008	-	7900+300+1900
7	01.07.2008	-	8200+310+1900
8	01.07.2009	8510+320+1900	-

तसेच श्री मिरानी व श्री पुसनकर,क.लि. यांना ज्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्यात आले(शा.नि.दि.01/06/1967 व दि.18/02/1975) त्याच्या प्रती तसेच मनपा आयुक्त यांच्या आदेशाच्या प्रती (दि.17/09/2004 व दि.21/10/2008) लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास पत्र क्र. 37, दि. 14/02/2018 अन्वये कळविण्यात आले. मात्र अर्धसमास पत्राचा खुलासा तथा आवश्यक अभिलेख उपलब्ध करून देण्यात आला नाही. त्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 37)

DRAFT

138 गांधी चौक वाहनतळ पार्किंगची जागा स्वस्त दराने भाडेतत्वावर देऊन मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :42 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 161786.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 161786.00/-

मनपा अमरावती अंतर्गत गांधी चौक वाहनतळ पार्किंगची जागा 10254 चौ.फुट जागा दरवर्षी 80,000 या स्वस्त दराने दहा वर्षाकरिता भाडेपट्ट्याने एकवीरादेवी संस्थान यांना देऊन मनपाचे दरवर्षाचे अंदाजे रु.1,61,786/- एवढे आर्थिक नुकसान होत आहे.

मनपा अमरावती अंतर्गत गांधी चौक येथील वाहनतळ पार्किंगची जागा दरवर्षी खाजगी कंत्राटदारांना देण्यात येत होती. 2010-2011 या वर्षामध्ये रु.2,13,700/- वार्षिक भाड्यावर तर 2012-2013 मध्ये रु.2,41,786 एवढ्या वार्षिक भाड्याने सदरहू पार्किंगची जागा कंत्राटी पद्धतीने देण्यात आली होती. सदरहू वाहनतळाचे आधारभूत कंत्राट मूल्य रु.2,35,000/- इतके वार्षिक ठेवण्यात आले.

परंतु स्थायी समिती ठराव क्र. 127, दि.11/01/2013 नुसार गांधी चौक येथील वाहनतळ चालविण्याकरिता अंबादेवी संस्थान किंवा इतर सेवाभावी संस्थान, ट्रस्ट यांचेसोबत संपर्क साधून त्यांना सदर काम देण्याबाबतचे कार्यवाही प्रशासनाने करावी असे ठरविण्यात आले. त्या अनुषंगाने एकविरा देवी संस्थान,अमरावती यांच्याशी वाटाघाटी करून गांधी चौक वाहनतळ पार्किंगची मनपाच्या मालकीची व हक्काची तथा महानगरपालिका हद्दीतील 10254 चौ.फुट जागा रु.80,000/- प्रतीवर्ष प्रमाणे दहा वर्षाकरिता म्हणजेच दि.01/11/2014 ते 31/10/2024 या कालावधी करिता भाडेपट्ट्यावर देण्यात आली.

कोणतीही मालमत्ता व जागा भाडेपट्ट्याने देण्याकरिता निविदा प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असताना स्थायी समितीने अंबादेवी संस्थान किंवा इतर सेवाभावी संस्थान,ट्रस्ट यांच्यासोबत संपर्क साधून काम देण्याबाबतची कार्यवाही प्रशासनाने करण्याबाबत सूचित केले.

सदरहू जागेचे भाडे यापूर्वी वर्ष 2010-11 मध्ये रु.2,13,700/- तर 2012-13 मध्ये रु.2,41,786 एवढे प्राप्त होत असताना व सदरहु वाहनतळाचे आधारभूत मुल्य रु.2,35,000/- इतके वार्षिक ठेवले असतांना तेच वाहनतळ दरवर्षी रु.80,000/- एवढ्या वार्षिक भाडेपट्टयावर दिल्यामुळे मनपाचे दरवर्षी अंदाजे रु.1,61,786/- इतके वार्षिक नुकसान होत असल्याचे निर्देशनास येते. प्रत्यक्षात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 79 (ड) नुसार वार्षिक भाड्याची रकम प्रचलित बाजार मूल्यापेक्षा कमी असता कामा नये. अशी स्पष्ट तरतूद असूनही नियमबाह्य कार्यवाही करण्यात

आली आहे.

उपरोक्त स्थायी समितीचा ठराव मनपाच्या आर्थिक हिताविरुद्ध असल्यामुळे शासनाकडे नियम 451 नुसार विखंडनासाठी पाठविण्यात आला नाही त्यामुळे मनपाचे थेट दरवर्षी रु.1,61,786/- एवढे रकमेचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास येते.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.206, दि.21/06/2018 नुसार खुलासा विचारण्यात आला असता याबाबत कोणताही खुलासा प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 206)

141 31 नालाकुली(वर्ग-4) कर्मचा-यांना पुर्वलक्षी प्रभावाने नियमबाहयपणे वरिष्ठ पदावर सेवेत सामावून घेणे व या प्रभावावरील सेवा आश्वासित प्रगती योजनेसाठी विचारात घेऊन प्रारंभापासून वेतनाचे अतिप्रदान होत असल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :140 महानगरपालिका स्व-निधी निधी
अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 9669675.00/-

अमरावती महानगरपालिका, अमरावती यांचा आदेश क्र. अमनपा/साप्रवि/आयुक्त 3997/05 दिनांक 11.02.2005 नुसार मनपाचे आस्थापनेवर कार्यरत एकूण 31 नाली कुली (वर्ग-4) चे कर्मचारी हे विहित शैक्षणिक पात्रता धारण करीत असले तरी त्यांना नियमबाहयपणे पुर्वलक्षी प्रभावाने कनिष्ठ लिपीक या वरिष्ठ पदावर वेतनश्रेणी रु.3050-75-3950-80-4590 मध्ये दि.11.02.2005 पासून सेवेत सामावून घेणे,कनिष्ठ लिपीक पदावर आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू करताना दि.11.05.2005 पुर्वीची नालाकुली पदावरील सेवा विचारात घेणे, 6 व्या वेतन आयोगानुसार दि.1.01.2006 ला वेतन निश्चिती करताना वेतन निश्चिती चुकीची करणे इत्यादीमुळे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 51(4) च्या तरतुदीनुसार राज्य शासनाच्या (नगर विकास विभाग) पुर्वमंजूरीशिवाय महानगरपालिकेतील अधिका-यांची व कर्मचा-यांची कोणतीही नवीन पदे निर्माण करता येणार नाही, असे निर्देश आहेत. असे असताना मनपाने शासनाचे पुर्वमंजूरीशिवाय 31 नाला कुली (वर्ग-4) कर्मचा-यांची महानगरपालिका, अमरावती यांचे आदेश क्र.अमनपा/उपा/ साप्रवि/ 506/95 दिनांक 3.06.1995 नुसार वेतनश्रेणी रु.2550-55-2660-60-3200 मध्ये नियुक्ती करण्यात आली. अधिनियमतील कलम 51(4) नुसार वेतनमान किंवा वेतन संरचना यातील सुधारणा किंवा विशेष वेतन किंवा श्रेणी देण्याबाबत किंवा भत्त्यांतील सुधारणा (महागाई भत्ता वगळून) किंवा पदनामातील बदल हे पोट-कलम (4) च्या

प्रयोजनासाठी नवीन पदाची निर्मिती असल्याचे मानण्यात येईल. मनपा अमरावतीचे आस्थापनेवरील कर्मचा-यांचे नियुक्तीबाबत सेवा प्रवेश नियम तयार केलेले नाही. संबंधीत कर्मचा-यांचे सेवापुस्तकाची पडताळणी केली असता ब-याच अनियमित बाबी निदर्शनास आल्या आहे.

यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत:-

1. उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार महानगरपालिकेला शासनाचे पूर्वमंजूरीशिवाय कोणतीही नविन पदे भरता येणार नाही, असे निर्देश असताना मनपाने शासनाची मंजूरी न घेता 31 नाला कुली (वर्ग-4) कर्मचा-यांची नियुक्ती केली. मनपा अमरावतीचा मंजूर पदांचा आकृतीबंध शासनाचे नगर विकास विभागाकडून मंजूर नाही. नाला कुलीची पदे भरण्याबाबतचे शासनाचे मंजूरीचे आदेश तसेच त्यांना उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त करीत असल्याने नाला कुली पदावरील कर्मचा-यांना वरिष्ठ पदावर सामावून घेण्यात यावे याबाबतचे आदेश लेखापरिक्षणादरम्यान तपासणीस उपलब्ध झाले नाही.

2. संबंधीत कर्मचारी शैक्षणिक अर्हता प्राप्त करीत असल्याचे सबबीवर मनपा प्रशासनाने त्यांचे आदेश क्र.अमनपा/साप्रवि/आयुक्त3997/05 दिनांक11.02.2005 नुसार कनिष्ठ लिपीक पदावर वेतनश्रेणी रु.3050-75-3950-80-4590 मध्ये दि.11.05.2005 पासून सामावून घेतले. याबाबत पदोन्नतीचे कोणतेही निकष न ठरवता लिपीक संवर्गात (वर्ग-क) वरच्या पदावर सामावून घेण्यात आले. 31 नालाकुलींना कनिष्ठ लिपीक पदावर सामावून घेताना 31 कनिष्ठ लिपीकांची पदे रिक्त होती काय व ती आकृतीबंधानुसार मंजूर होती काय? याबाबत नस्तीत नोंद नाही.

(अ) नालाकुली पदावरील सेवाकालावधीचे कनिष्ठ लिपीक पदाचे वेतन पुर्वलक्षी प्रभावाने लागू करणे-

श्री. प्रविण एन. इंगोले व अन्य 30 कर्मचारी यांची वेतनश्रेणी 2550-55-2660-60-3200 मध्ये नाला कुली (वर्ग-4) चे पदावर दि.23.08.1996 ला नियुक्ती करण्यात आली असून त्यांना मनपा आदेश दि.11.02. 2005 नुसार वेतनश्रेणी रु.3050-75-3950-80-4590 मध्ये कनिष्ठ लिपीक (वर्ग-3)चे पदावर मनपा सेवेत पुर्वलक्षी प्रभावाने सामावून घेण्यात आले असून दि.23.08.1996 पासून वरिष्ठ पदावरील वेतनश्रेणीचा नियमबाहयपणे लाभ देण्यात आला. याप्रकरणी वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी पुर्वलक्षी प्रभावाने लागू करुन कनिष्ठ लिपीक पदावर सामावून घेणेबाबत शासनाचे नगर विकास विभागाचे आदेश तसेच मनपा अमरावतीने केलेली कार्यवाही याबाबतची नस्ती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत अर्ध.पत्र क्र.184 दि.21.05.2018 व अर्ध. पत्र क्र.198 दि.12.06.2018 नुसार कळविण्यात आले होते. परंतु याबाबतचे कोणतेही अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही. 31 नाला कुली कर्मचा-यांनी कनिष्ठ लिपीक या वरिष्ठ वेतनश्रेणीच्या पदावर प्रत्यक्षात काम केले नसल्याने नियुक्ती दिनांकापासून पुर्वलक्षी प्रभावाने वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करणे नियमसंगत नाही. त्यामुळे वेतनात अतिप्रदान झालेले आहे.

(रक्कम रुपयात)

वेतनवाढीचा दिनांक	नाला कुली पदावरील देय वेतन	क.लि.पदावर पुर्वलक्षी प्रभावाने सामावून घेतल्याने अदा करण्यात आलेले वेतन	वेतनातील अतिप्रदान
23.08.1996	2550	3050	500X11 म.9दिवस = 5645/-
1.08.1997	2605	3125	520X12 महिने = 6240/-
1.08.1998	2660	3200	540X12महिने = 6480/-
1.08.1999	2720	3275	555X12महिने = 6660/-
1.08.2000	2780	3350	570X12महिने = 6840/-
1.08.2001	2840	3425	585X12महिने = 7020/-
1.08.2002	2900	3500	600X12महिने = 7200/-
1.08.2003	2960	3575	615X12महिने = 7380/-
1.08.2004	3020	3650	630X6म.10दिवस = 4005/-
11.2.2005ते 31.12.2005	3125 (3050-4590 मध्ये)	3725 (कनिष्ठ लिपीक पदावरील वेतन)	600X10म.18दिवस = 6385/-
		एकूण	63855/-

प्रत्यक्षात त्यांना दि.11.02.2005 आदेशान्वये वेतनश्रेणी 3050-75-3950-80-4590 मध्ये कनिष्ठ लिपीक या अधिक जबाबदारीच्या पदावर सामावून घेण्यात आल्यामुळे म.ना.से. वेतन नियम 1981 चे नियम 11(1) नुसार वेतनश्रेणीतील रु.3125 प्रमाणे वेतन देय असताना दि.11.02.2005 पासून रु.3725 दराने वेतन अदा करण्यात आल्याने रु.63855/- अधिक त्यावरील अनुषंगीक देय भत्त्याचे अतिप्रदान झाले आहे.

(ब) 6 व्या वेतन आयोगानुसार 1 जाने.2006 ला वेतननिश्चिती चुकीची केल्याने अतिप्रदान:-

6व्या वेतन आयोगाचे वेतननिश्चितीनूसार दि.1.1.2006 देय वेतन रु.3125X1.86=रु.5820 +ग्रेड-पे 1900=7720/- वेतन देय असतांना दि.1.1.2006 ला रु.3725X1.86=6930/- +1900=रु.8830/- प्रमाणे वेतन अदा करण्यात आल्याने अतिप्रदान झाले आहे.

वेतनवाढीच ा दिनांक	अदा करावयाचे	अदा करण्यात आलेले	वेतनातील अतिप्रदान

	वेतन+ग्रेड -पे	वेतन+ग्रेड-पे (सेवापुस्तकातील नोंदीनुसार)	
1.01.2006	5820+1900	6930+1900	1110X6महिने =6660/-
1.07.2006	6060+1900	7200+1900	1140X12महिने =13680/-
1.07.2007	6300+1900	7480+1900	1180X12महिने =14160/-
1.07.2008	6550+1900	7770+1900	1220X1म.22दिवस =2086/-
		एकूण	36586/-

वरीलप्रमाणे दि.1.01.2006 ते 22.08.2008 पर्यंत रु.36586/- अधिक त्यावरील देय असलेले अनुषंगीक भत्याचे अतिप्रदान झाले.

(क) आश्वासित प्रगती योजनेच्या लाभासाठी कनिष्ठ पदावरील सेवा विचारात घेणे:-

श्री. प्रविण एन इंगोले व अन्य 30 कर्मचा-यांना दि.11.02.2005 ला कनिष्ठ लिपीक पदाची वरिष्ठ वेतनश्रेणी लागू केली असल्याने संबंधीत कर्मचा-यांना सदर पदावर 12 वर्षाचा कालावधी दि.10.02.2017 ला पुर्ण होत असून दि.11.02.2017 पासून सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा प्रथम लाभ देय होईल. शासन निर्णय क्र. वेतन-1109/प्र.क्र.44/सेवा-3 दि.1 एप्रिल 2010 नुसार एकाच पदावर सलग 12 वर्ष सेवा झालेल्या कर्मचा-यांना आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देय ठरतो. परंतु या प्रकरणी कुली वर्ग 4 चे पदावरील सेवा विचारात घेऊन संबंधीत कर्मचा-यांना मनपा आदेश क्र.अमनपा/ साप्रवि/आयुक्त/2764/13दि.25.10.2013 नुसार आश्वासित प्रगती योजनेचा प्रथम लाभ दिनांक 23.08.2008 पासून लागू करण्यात आला आहे. सबब नियमबाहय लाभ लागू केल्याने दि.23.08.2008 पासून पुढीलप्रमाणे अतिप्रदान झाले आहे.

(रक्कम रुपयात)

वेतनवाढीचा दिनांक	अदा-करावयाचे वेतन+ग्रेड-पे	आश्वासित प्रगती योजनेचा लाभानुसार अदा केलेले वेतन	अतिप्रदानाची रक्कम
23.08.2008	6550+1900	8060+2400	2010X10म.9दिवस =20684/-
1.07.2009	6810+1900	8380+2400	2070X12 महिने =24840/-

1.07.2010	7080+1900	8710+2400	2130X12 महिने =25560/-
1.07.2011	7350+1900	9050+2400	2200X12 महिने =26400/-
1.07.2012	7630+1900	9400+2400	2270X12 महिने =27240/-
1.07.2013	7920+1900	9760+2400	2340X12 महिने =28080/-
1.07.2014	8220+1900	10130+2400	2410X12 महिने =28920/-
1.07.2015 ते 30.06.16	8530+1900	10510+2400	2480X12 महिने =29760-
		एकूण	211484/-

दि.23.08.1996 ते 31.12.2005 पर्यंत अतिप्रदान रु.63855/- अधिक अनुषंगीक भत्ते

दि. 1.01.2006 ते 22.08.2008 पर्यंत अतिप्रदान रु.36586/- अधिक अनुषंगीक भत्ते

दि.23.08.2008 ते 30.06.2016 पर्यंत अतिप्रदान रु.211484/- अधिक अनुषंगीक भत्ते

एकूण वसुलपात्र रु.311925/- अधिक अनुषंगीक भत्ते

प्रती कर्मचारी वसुलपात्र रक्कम रु.311925/- अधिक भत्ते X 31 कर्मचारी = रु.96,69,675/-

वसुलपात्र रक्कम रु.96,69,675/- अधिक अनुषंगीक भत्त्यासह वसुलीची कार्यवाही करुन अनुपालन करावे.

3. संबंधीत कर्मचारी विहित शैक्षणिक अहर्ता प्राप्त करीता असल्याचे सबबीवर मनपा प्रशासनाने 31 नाला कुली कर्मचा-यांना कनिष्ठ लिपीक या पदावर दि.11.05.2005 पासून सामावून घेतले. याबाबत पदोन्नतीचे निकष पुर्ण न करताही लिपीक संवर्गात (वर्ग-क) वरच्या पदावर सामावून घेण्यात आले व पुढील कालावधीत पुर्तता न केलेल्या प्रकरणात शासन निर्देशानुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

(अ) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. मभाप-1002/प्रक्र 38/02/20ब दिनांक 8.05.2003 तसेच सामान्य प्रशासन विभागाचे दि. 30.12.1987 , दि. 7.02.2001 , व दि. 1.01.1993 नुसार एतदर्थ मंडळाच्या मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळणे.

(ब) सामाजिक न्याय विभाग शासन परिपत्रक क्र. सीबीसी-10/2010/प्र.क्र. 590/मावक-5 दिनांक 8 जुन 2011 नुसार जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.132 दि.16.04.2018 व पत्र क्र.184 दि.21.05.2018 नुसार आवश्यक अभिलेख व खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले होते. परंतु मागणी केलेले अभिलेख व मुद्यावरील खुलासा लेखापरिक्षण पुर्ण होईस्तोवर प्राप्त झाले नाही. परिणामी आक्षेप नोंदविण्यात येत असून रु.9669675/- वसुलपात्र रक्कम वसुल करुन अनुपालन करावे.

DATDUBM6401 (Ref No : 184)

DRAFT

148 शिक्षण विभागातील वर्ग 4 च्या कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता विचारात न घेतल्याने नियमबाह्य आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :79 महानगरपालिका स्व-निधी निधी
अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 50933.00/-

महानगरपालिका अमरावतीचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणादरम्यान मनपाच्या शिक्षण विभागातील कर्मचा-यांच्या सेवापुस्तकाची पडताळणी केली असता वर्ग 4 च्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेल्या आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करताना शैक्षणिक अर्हता विचारात न घेणे तसेच शासन निर्णय क्र.वेपुरा 210/प्र.क्र.124/सेवा-9 दि.01.09.2015 नुसार वेतननिश्चिती न केल्याने वेतनात अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आले.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र वेपुरा.1029.क्र.प्र/27 9-सेवा/दि.22 एप्रिल 2009 नुसार 6 व्या वेतन आयोगानुसार दि.1 जाने. 2006 पासून सुधारित वेतनसंरचना लागू करण्यात आली. मनपा कर्मचाऱ्यांना 6 व्या वेतन आयोगानुसार दि.1 एप्रिल 2010 पासून लाभ देण्यात आले. वर्ग 4 कर्मचाऱ्यांना सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ (24 वर्ष) मंजूर करताना पदोन्नतीचे निकष न ठरवता लाभ मंजूर करणे तसेच महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेपुर/1210/ प्र.क्र.124/सेवा/-09 दि.1.09.2015 नुसार वेतननिश्चिती न केल्याने वेतनात अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आले.

याबाबत लेखापरीक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत-

1) <u>श्री विजय ग. ढगे,शिपाई, शिक्षण विभाग, (वर्ग 6 उत्तीर्ण)</u>

श्री. विजय ग. ढगे यांची मनपा आदेश क्र. अमनपा/प्रशा/ठराव-38/84 दि.12.10.1984 नुसार चौकीदार या पदावर नियुक्ती केली. दि.15.10.1996 ला सुधारित वेतनश्रेणी रु.2610-60-2910-65-3300-70-4000 मध्ये कालबध्द पदोन्नतीचा प्रथम लाभ दिला. त्यानंतर मनपा आदेश क्र. अमनपा/साप्रवी/उप/1847/2011 दि.8.08.2011 नुसार वेतनबँड रु.4440-7440 ग्रेड-पे-1600 मधुन रु.5200-20200 ग्रेड-पे 1900 मध्ये सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ दि.15.10.2008 पासून लागू करण्यात आला.

श्री. ढगे शिपाई हे दि. 01.07.2007 ला वेतनबँड 4440-7440 मध्ये रु.7300+ ग्रेड-पे 1600 वेतन घेत होते. परंतु दि.1.07.2008 रोजी 7440+1600 ग्रेड वेतन व दि.1.07.2008 ला वार्षिक वेतनवाढ लागू केल्यानंतर उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार रु.7580/- ऐवजी रु.7440 कमाल

वेतन देय होते.

श्री. ढगे कनिष्ठ लिपीक पदास आवश्यक असलेली एस एस सी उत्तीर्ण ही अर्हता धारण करीत नसल्याने त्यांना 5200-20200 ग्रेड-वेतन 1900 हे वेतन बँड देय होत नाही. त्यांना लगतचे रु.1800 हे ग्रेड वेतन देय ठरते. तसेच विद्यमान पदावरील वेतनबँडचा कमाल टप्पा रु.7440/- च्या पुढे वेतन देय नसल्याने प्रत्यक्षात रु.7580/- एवढे वेतन गृहीत धरुन केलेली वेतननिश्चितीसुध्दा अयोग्य ठरते. त्यामुळे दि.1.07.2008 पासून अतिप्रदान झाले आहे.

वेतन निश्चितीचा तपशील	वेतननिश्चितीनुसार अदा करावयाचे वेतन	चुकीच्या वेतन निश्चितीनुसार अदा करण्यात आलेले वेतन	वेतनातील अतिप्रदान
दि.1.07.2007 चे वेतन	7300+1600=रु.8900	--	--
दि.1.07.2008	7440+1600=रु.9040/-	7580+1600=रु.9180/- (वेतन निश्चीतीपुर्व चुकीची वेतनवाढ)	140x 3म.1दि. = रु.484/-
दि.15.10.2008 वेतननिश्चितीनुसार	7720+1800=रु.9520	7860+1900=रु.9760	240x8म.17दि. = रु.2052/-
दि.01.07.2009	8010+1800=रु.9810	8160+1900=रु.10060	250x 12 म. = रु.3000/-
दि.01.07.2010	8310+1800=रु.10110	8470+1900=रु.10370	260x 12म. = रु.3120/-
दि.01.07.2011	8620+1800=रु.10420	8790+1900=रु.10690	270x 12म. = रु.3240/-
दि.01.07.2012	8940+1800=रु.10740	9110+1900=रु.11010	270x 12म. = रु.3240/-
दि.01.07.2013	9270+1800=रु.11070	9440+1900=रु.11340	270x 12म. = रु.3240/-
दि.01.07.2014 ते 30.06.2015	9610+1800=रु.11410	9780+1900=रु.11680	270x 12म. = रु.3240/-
			रु. 21616/-

DRAFT

दि. 01.07.2008 ते 30.06.2015 या कालावधीत मूळ वेतनामध्ये रु. 21616/- व त्यावरील अनुषंगीक भत्ते (उदा. महाभत्ता, घरभाडे भत्ता) इत्यादीचे अतिप्रदान झाले असून नियमानुसार पुनर्वेतननिश्चिती करून अतिप्रदानाच्या वसुलीसह अनुपालन करावे.

2) <u>श्री. अशोक मारोतराव बोरकर शिपाई ,शिक्षण विभाग (9 वा वर्ग उत्तीर्ण)</u>

श्री. अशोक मारोतराव बोरकर यांची नियुक्ती मनपा आदेश क्र. अमनपा/साप्रवी/1458/86 दिनांक 05.05.1986 नुसार हेल्पर या पदावर वेतनश्रेणी रु.200-3-230-5-255-5-280 मध्ये करण्यात आली. दि.05.05.1998 पासून वेतनश्रेणी रु.2610-60-2910-65-3300-70-4000 मध्ये कालबध्द पदोन्नतीचा प्रथम लाभ देण्यात आला. त्यानंतर मनपा आदेश क्र. अमनपा/साप्रवी/1847 /2011 दि. 08.08.2011 नुसा वेतनबँड रु. 4440-7440 ग्रेड-पे 1600 मधून रु.5200-20200 ग्रेड पे 1900 मध्ये सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ दिनांक 05.05.2010 पासून लागू करण्यात आला.

श्री. बोरकर हेल्पर हे दि.1.07.2008 रोजी 7420+1600 ग्रेड-वेतन व दि.01.07.2009 ला वेतनबँड 4440-7440 मध्ये रु. 7690+ ग्रेड-पे 1600 वेतन घेत होते. परंतु दि.1.07.2009 ला वार्षिक वेतनवाढ लागू केल्यानंतर उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार रु.7690/- ऐवजी रु.7440 कमाल वेतन देय होते.

श्री. बोरकर कनिष्ठ लिपीक पदास आवश्यक असलेली एस. एस. सी. उत्तीर्ण ही अर्हता धारण करीत नसल्याने त्यांना 5200-20200 ग्रेड-वेतन 1900 हे वेतन बँड देय होत नाही. त्यांना लगतचे रु.1800 ग्रेड वेतन दे ठरते. तसेच विद्यमान पदावरील वेतनबँडचा कमाल टप्पा रु.7440/- च्या पुढे वेतन देय नसल्याने प्रत्यक्षात रु.7690/- गृहीत धरुन केलेली वेतननिश्चितीसुध्दा अयोग्य ठरते. त्यामुळे दि.1.07.2009 पासून अतिप्रदान झाले आहे.

वेतननिश्चितीचा तपशील	वेतननिश्चितीनुसार अदा करावयाचे वेतन	चुकीच्या वेतन निश्चितीनुसार अदा करण्यात आलेले वेतन	वेतनातील अतिप्रदान
दि.01.07.2008 चे वेतन	7420+1600=रु.9020	--	--
दि.01.07.2009	7440+1600=रु.9040 (4440-7440)	7690+1600=रु.9210/- (4440-7440ग्रेडपे1600)	170 x10म.4दि. = रु.1722/-
दि.05.05.2010 ला वेतननिश्चिती नुसार	7720+1800=रु.9520 7440+1600=9040x 3%=280	7970+1900=रु.9870	350x01म.27दि. = रु.655/-
दि.01.07.2010	7720+1800=रु.9520	7970+1900=रु.9870	350 x 12म.

			= रु.4200/-
दि.01.07.2011	8010+1800=रु.9810	8270+1900=रु.10170	360 x 12म. = रु.4320/-
दि.01.07.2012	8310+1800=रु.10110	8580+1900=रु.10480	370 x 12म. = रु.4440/-
दि.01.07.2013	8620+1800=रु.10420	8900+1900=रु.10800	380 x 12म. = रु.4560/-
दि.01.07.2014	8940+1800=रु.10740	9230+1900=रु.11130	390 x 12म. = रु.4680/-
दि.01.07.2015 ते 30.06.2016	9270+1800=रु.11070	9570+1900=रु.11470	400 x 12म. = रु.4800/-
			रु. 29377/-

दि. 01.07.2009 ते 30.06.2016 या कालावधीत मूळ वेतनामध्ये रु.29377/- व त्यावरील अनुषंगीक भत्ते (उदा.महाभात्ता,घरभाडे भत्ता) इत्यादीचे अतिप्रदान झाले असून उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार पुनर्वेतननिश्चिती करून अतिप्रदानाच्या वसुलीसह अनुपालन करावे.

DATDUBM6401 (Ref No : 190)

153 मनपा अमरावतीच्या आर्थिक वर्ष 2014-15 चा अर्थसंकल्प, जमा-खर्च व आर्थिक स्थितीवरील अभिप्राय.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 01 निधी
अनियमितता कलम : 9अ

मनपा अमरावतीच्या 2014-15 च्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकाचे व त्यानुषंगाने प्रत्यक्ष जमा व खर्चाचे अवलोकन करताना मूळ अंदाजपत्रकात विविध बाबींवर अवाजवी जमेचे अंदाज नोंदविणे, वैधानिक राखीव निधीसाठी तरतूद न करणे व तरतूद केलेल्या निधीमध्ये प्रत्यक्ष जमा न करणे, आस्थापना खर्च प्रचंड प्रमाणावर असणे, अनावश्यक व निरर्थक खर्च या त्रुट्यामुळे पर्यायाने मनपाची वर्ष अखेर आर्थिक स्थिती

समाधानकारक दिसून येत नाही.

अर्थसंकल्प हा पुढील वर्षातील अपेक्षित उत्पन्न व मनपाचे मर्यादित उत्पन्नातून मनपाक्षेत्रातंर्गत विविध विकासात्मक व अन्य विहित बाबींवर करावयाचा खर्च यांच्या नियोजनाचा आराखडा असल्याने तो मनपाच्या सर्व प्रकारच्या वित्तीय कार्यवाहीमध्ये प्राथमिक व अत्यंत महत्वाचा दस्तावेज मानला जातो. मागील वर्षातील उत्पन्नांचा आढावा घेऊन अर्थसंकल्पीय वर्षातील उत्पन्नाचे स्त्रोत तसेच उपलब्ध व नव्याने प्रस्तावित उत्पन्नाच्या स्त्रोतांपासून मिळणारे अपेक्षित उत्पन्न यांचा विवेकपुर्व व वास्तववादी विचार करून त्यातून आवश्यक खर्चाचे अंदाज मांडण्यात आले पाहिजे. यासंबंधीच्या मार्गदर्शक तरतुदी राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियमावलीच्या प्रकरण 33 मध्ये विस्तृतपणे मांडण्यात आल्या आहेत.

मनपा अमरावती सन 2014-15 चा मूळ व सुधारित अर्थसंकल्प मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95,96 व 100 नुसार मंजूर करण्यात आला असून जमा खर्चाचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

DRAFT

जमा बाजू

(रकमा कोटींत)

उत्पन्नाचे स्वरूप	मूळ अंदाज	सुधारित अंदाज	प्रत्यक्ष उत्पन्न
प्रारंभिक शिल्लक (महसुली) महसुली उत्पन्न	35.33 289.77	0.13 359.19	25.47 166.00
प्रारंभिक शिल्लक (भांडवली) महसुली उत्पन्न	33.03 204.51	151.99 223.59	169.60 69.73
प्रारंभिक शिल्लक (असाधारण) असाधारण ऋण व विलंबन	5.85 7.30	4.54 10.21	1.65 6.18
एकूण	576.00	749.68	438.60

खर्च बाजू

खर्चाचे स्वरूप	मूळ अंदाज	सुधारित अंदाज	प्रत्यक्ष खर्च
महसुली खर्च भांडवली	311.54 192.46 7.30	312.40 258.58 7.37	167.47 87.88 5.36

असाधारण ऋण व विलंबन			
एकूण खर्च	511.30	578.35	260.64
अपेक्षित अखेरची शिल्लक (सर्व मिळून)	64.69	171.30	177.88 (प्रत्यक्ष शिल्लक)

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :-

1. जमेचे अवास्तव अंदाज :-

अंदाजपत्रक हे वास्तववादी व मागील वर्षाच्या अनुभवाच्या आधारे तयार केला पाहिजे. परंतु तसे न करता महसुली उत्पन्नाच्या काही बाबी फुगवून वाढविलेल्या दिसून येतात.

उदाहरणार्थ :

(रकमा कोटींत)

उत्पन्नाची वाढ	मागील 3 वर्षाची सरासरी (2011-12 ते 2013-14)	2014-15 चे मूळ व सुधारित अंदाज	प्रत्यक्ष उत्पन्न
इमारतीवरील कर	16.03	40.00	18.32
रहदारी पास	8.15	12.00	0.00
चिल्लर वसुली ठेका	0.01	0.25	0.03
व्यापारी संकुल उत्पन्न	0.71	1.50	0.51
ओपन स्पेस वसुली (20%)	0.16	1.10	0.35

2. विशेष राखीव निधीसाठी तरतुदी प्रत्यक्ष जमा न करणे.

मनपाने महाराष्ट्र मनपा अधिनियमाचे विविध कलमाखाली विविध राखीव निधीची उभारणी करून त्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करणे व प्रत्यक्ष स्वतंत्र खात्यामध्ये रकमा जमा करणे आवश्यक आहे. परंतु केवळ वेतन राखीव निधीसाठी रु. 2.00 कोटी व घसारा निधीसाठी 0.60 कोटी एवढी तरतूद करण्यात आली. तथापि, त्यांचे अनुषंगाने दोन्ही निधीमध्ये जमा निरंक आढळते. म्हणजेच यावरील तरतुदी अन्य बाबींवर खर्च करण्यात आल्याची शक्यता आहे.

कर्जनिवारण निधी, निवृत्तीवेतन निधी, डीसीपीएस मध्ये मनपाचा हिस्सा ई. निधीसाठी तरतूद करण्यात आली नाही.

3. अखेरच्या व सुरुवातीच्या शिल्लकेतील तफावत :

अंदाजपत्रकामध्ये सन 2013-14 ची अखेरची शिल्लक व 2014-15 ची सुरुवातीची शिल्लक यांत तफावत

दिसून येते.

(रकमा कोटीत)

बाब	2013-14ची अखेरची शिल्लक	2014-15 प्रत्यक्ष थकीत असलेली सुरुवातीची शिल्लक	तफावत
महसुली	168.11 (-) 154.75 ---------- 14.36	25.47	(-) 11.11
भांडवली	242.72 (-) 65.91 ---------- 177.81	169.60	8.21

वरील तफावतीमुळे 2014-15 चे सुधारित अंदाजपत्रकात महसुली भागात रु. 11.11 कोटी जादा तर भांडवली रु. 8.21 कोटी कमी रकम सुरुवातीच्या शिल्लक गृहीत धरण्यात आली.

4. आर्थिक स्थिती :-

मनपाची आर्थिक स्थिती प्रामुख्याने स्वउत्पन्नावर व त्यामधून झालेल्या खर्चावर आधारित असून अधिकाधिक विकास सुधारणात्मक कामे करण्यासाठी मनपाने त्यांचे कार्यक्षेत्रातील विविध स्त्रोत ओळखून त्यांचे बळकटीकरण करणे आवश्यक असते. मनपाने मालमत्तांचे सर्वेक्षण करून फेरमुल्यांकन करणे, विविध करांचे पुनर्निधारण करणे अत्यंत आवश्यक होते. विविध कर व दरांचे फेरावलोकन करून सन 2014-15 अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे परंतु प्रत्यक्षात सुधारित कर वा दरांची आकारणी करण्यात आली नसल्याने अर्थातच मनपाची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याचे दिसून येते.

उदाहरणार्थ महसूली जमेचे अंदाज व प्रत्यक्ष वसुली पुढीलप्रमाणे आहे.

(रकमा कोटीत)

अ.क्र.	उत्पन्नाची वाढ	उत्पन्नाचे अंदाज	प्रत्यक्ष जमा
1	इमारतीवरील कर	40.00	18.32
2	पथकर	2.15	1.53
3	स्थानिक संस्थाकर	100.00	80.57
4	जकातपोटी नुकसान भरपाई	3.00	00.00
5	नझुल उत्पन्न	4.00	00.00
6	सांस्कृतिक भवन भाडे	0.56	1.14
7	माध्यमिक शाळा अनुदान	8.00	00.00

याप्रकारे मनपास अपेक्षित उत्पन्नाच्या प्रमुख स्त्रोतापासून तुलनेने कमी उत्पन्न प्राप्त झाले आहे. असे असतांना 2014-15 च्या 191.47 कोटी एवढया महसुली उत्पन्नातून वेतन, निवृत्तीवेतन, कंत्राटी/रोजंदारी आस्थापना व अन्य उत्पन्न बाबीवर रु. 92.61 कोटी एवढा प्रचंड खर्च झाला आहे. चालू लेखापरिक्षण अहवालातील विविध परिच्छेदात नोंदविल्या प्रमाणे बराच खर्च अनावश्यक व निरर्थक ठरला आहे. (उदा. जी.आय.एस. डाटावरील खर्च)

सन 2014-15 या वर्षअखेर अंदाजपत्रक पुस्तकानुसार रु. 24.00 कोटी (महसुली) व रु. 151.45 कोटी (भांडवली) या प्रमाणे रु. 175.45 कोटी अपेक्षित असतांना प्रत्यक्ष उपलब्ध झालेल्या बँकेच्या खातेपुस्तकांनुसार (संख्या 44) रु.62.62 कोटी एवढीच शिल्लक दिसून येते.

सबब एकूण परिस्थिती विचारात घेता मनपाची 2014-15 अखेरची आर्थिकस्थिती समाधानकारक नाही असे लक्षात येते.

DATABWM6901 (Ref No : 07)

DRAFT

कलम ९ ब खालील आक्षेप

DRAFT

6 समाजमंदिरा पासून रु. 70 लाखाच्या अवैध वसुली प्रकरणावर कार्यवाही न होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :12 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 7000000.00 /-

मनपाच्या मालकीच्या गवळीपुरा शादीखाना समाज मंदिरापासून 15 वर्षात अंदाजे रु.70 लाखाचे खाजगीरित्या अवैध वसुली झाल्याने सर्वसाधारण सभेने कार्यवाही करण्यास सुचवूनही त्याकडे दुर्लक्ष झाल्याने मनपाची हानी झालेली आहे.

सर्वसाधारण सभेच्या ठरावांच्या इतिवृतांचे अवलोकन करताना मनपाच्या स्थावर मालमत्तेपासून अनाधिकृतपणे खाजगी वसुली करून मनपाच्या महसुलाची प्रचंड हानी होत असल्याचे दिसून आले.

मनपा अमरावती क्षेत्रातील गवळीपुरा शादीखाना येथे मनपातर्फे समाजमंदिर बांधण्यात आले असून श्री सलीम बेग युसुफ बेग ही मनपामध्ये कार्यरत नसलेली व्यक्ती स्वतःची पावती देऊन समाज मंदिरापासून अवैध वसुली करीत असल्याचे सर्वसाधारण सभा ठराव क्र.64 दि. 12/12/2014 च्या इतिवृतावरून दिसून आले. त्या अनुषंगाने सभेपुढे मांडण्यात आलेल्या प्रस्ताव क्र. 64, दि.12/12/2014 नुसार 'मागील 15 वर्षाचे एकूण रु.70 लाख निघतात'.

सदर प्रकरणी सभेद्वारे कायदेशीर कार्यवाही करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. या सबंधाने अर्धसमास क्र.16, दि. 30/01/2018 अन्वये मनपा आयुक्तांना संबंधित नस्ती उपलब्ध करून सध्यास्थिती स्पष्ट करण्यास सुचविण्यात आले होते. परंतु त्यावरील स्पष्टीकरण लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही.

यावरून मनपा प्रशासनाने सर्वसाधारण सभेच्या निर्देशाकडे व सदर अवैध वसुलीकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट असून परिणामी मागील 15 वर्षात मनपाच्या अंदाजे रु.70 लाखाच्या महसुलाची हानी झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

DATABWM6901 (Ref No : 16)

9 कर निर्धारणानंतर स्थानिक संस्था कराची रु.23.46 लाख एवढी रक्कम अद्याप वसूल न होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :392 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 2346380.00/-

मनपाचे सन 2012-13, 2013-14 व 2014-15 च्या स्थानिक संस्था कर विभागाचे कर निर्धारणाची तपासणी केली असता 21 व्यापा-यांकडे कर निर्धारण तारखेस रु.23,46,380/- थकीत कर असल्याचे दिसून आले असून सदर रकम संबंधित व्यापा-यांकडून अद्याप वसूल करण्यात आले नाही.

मनपा, अमरावतीचे स्थानिक संस्था कर विभागाचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणात व्यापा-यांचे सन 2012-13, 2013-14 व 2014-15 चे कर निर्धारण प्रकरणे तपासली असता खालीलप्रमाणे कराच्या रकमा थकीत असल्याचे दिसून आले. महाराष्ट्र मनपा (स्था.सं.कर) नियम मधील नियम क्र.33 (2) नुसार कर निर्धारणानुसार अनुज्ञेय होणा-या करापेक्षा व्यापा-यांनी कमी कराचा भरणा केला असून संबंधित व्यापा-यांकडून नियम क्र.4 नुसार थकीत कर वसूल करणे आवश्यक आहे.

तपशील खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	एलबीटी क्रमांक	व्यापा-यांचे नाव	कर निर्धारण वर्ष	निर्धारित एकूण कर, दंड व व्याज	भरणा केलेली रक्कम	थकीत कर / दंडाची अप्राप्त रक्कम
1	AMT020300030	रमेशकुमार ॲण्ड सन्स	2014-15	17200	12200	5000
2	AMT030200169	रामको इंडस्ट्रीज	2014-15	616666	127340	489326
3	AMT010200009	मुरलीधर कोल डेपो	2014-15	35180	29712	5468
4	AMT201016601	सहेली साडी सेंटर	2013-14	219986	102196	117790
5	AMT201016601	सहेली साडी सेंटर	2014-15	117387	73191	44196
6	AMT010200429	न्यु पलक क्रियेशन	2014-15	1466613	1447633	18980
7	AMT010200426	ईस्माईल फॅशन बाजार	2014-15	99810	90050	9760
8	AMT010200402	तिरुपती क्रियेशन	2014-15	69142	38714	30428
9	AMT020102313	ओमशक्ती इंटरप्राईजेस	2012-13	312707	25038	287669
10	AMT020102313	ओमशक्ती इंटरप्राईजेस	2013-14	350349	124241	226108

11	AMT020102313	ओमशक्ती इंटरप्राईजेस	2014-15	298382	170710	127672
12	AMT020102508	जतारीया किराणा	2012-13	405210	1715	403495
13	AMT020102508	जतारीया किराणा	2013-14	248087	4025	244062
14	AMT020102508	जतारीया किराणा	2014-15	10411	2580	7831
15	AMT020103814	हर्ष साडीज	2014-15	98127	60571	37556
16	AMT020300323	नारायण प्लास्टीक	2012-13	25995	1980	24015
17	AMT020300323	नारायण प्लास्टीक	2013-14	38113	2506	35607
18	AMT020103587	साक्षी जनरल स्टोअर्स	2014-15	9794	1370	8424
19	AMT020103610	शालीनी सेल्स कॉर्पोरेशन	2014-15	213318	36706	176612
20	AMT020300300	गांधी आभुषण केंद्र	2013-14	45169	2179	42990
21	AMT020300300	गांधी आभुषण केंद्र	2014-15	8031	5440	3391
			एकूण	**4705677**	**2360097**	**2346380**

(रु.तेवीस लाख छेचाळीस हजार तीनशे अंशी)

याबाबत अर्धसमास पत्र क्र.127, दिनांक 16.04.2018 नुसार अनुपालन मागविले असता संबंधित विभागाचे दि.19.4.2018 रोजी उत्तर प्राप्त झाले असून त्याप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 127)

11 सन 2014-15 मध्ये महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिरातीसाठी संबंधित वृत्तपत्रांना शासन मान्य दरापेक्षा अधिक दराने रक्कम अदा केल्याने मनपाचे झालेले नुकसान रु.104076/- बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 104076.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 104076.00/-

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा.नि. क्र.पीयुवी-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.1 मे 2001 यातील परि.क्र. 6 अन्वये महानगरपालिकेच्या वर्गीकृत जाहिराती तसेच दर्शनी जाहिराती शासन धोरणाप्रमाणे वृत्तपत्रांना परस्पर वितरीत करण्याचे अधिकार आहेत.तथापि,त्यांनी आपल्या जाहिरातीच्या वितरणासाठी

शासनमान्य वृत्तपत्रांच्या यादीचा तसेच शासनमान्य दराचा अंगीकार करून शासन धोरणाप्रमाणे त्या त्या वर्गातील वृत्तपत्रांमध्ये करावयाच्या समान तत्वावरील वाटपाच्या धोरणाचा कटाक्षाने अंमल करावा असे नमूद आहे. मात्र अमरावती महानगरपालिकेच्या जाहिरात विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्याच्या तपासणीत सन 2014-15 मध्ये महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिराती वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत संबंधित वृत्तपत्रांना शासनमान्य दरापेक्षा अधिक दराने रक्कम अदा केल्याने मनपाचे रु.104076 /- एवढे नुकसान झाल्याचे दिसून येते.

महानगरपालिका, अमरावतीचे सन 2014 -15 चे लेखापरीक्षणाकरीता मनपाच्या जाहिरात विभागाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या अभिलेख्याच्या तपासणीत सन 2014-15 मध्ये महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिराती वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत संबंधित वृत्तपत्रांना शासनमान्य दरापेक्षा अधिक दराने रक्कम अदा केल्याने मनपाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास येते.

(रक्कम रुपयात)

अ.क्र.	जाहिरात क्र व दिनांक	संबंधीत विभाग	वृत्तपत्राचे नाव	जाहिरातीचा आकार (सें.मी.)	शासनमान्य दर प्रति से.मी. (उपलब्ध दरपत्रकानुसार)	देय रक्कम	प्रत्यक्षात प्रदान केलेली रक्कम	झालेले अति-प्रदान	देयकाचा क्र. व दिनांक (नोंदवही-तील नोंदीनुसार)
1	18/23-4-13	कार्य.अभि. 2	साप्ता.भारत वंदना	3 x 20	46=00	2760/-	4320/-	1560/-	1-10-14
2	97/18-7-18	नगरसचिव	प्रेरणापुंज	3 x 30	36=00	3240/-	3780/-	540/-	5-4-14
3	151/7-9-13	कार्य.अभि. 2	मातृभूमी	3 x 30	41=00	3690/-	4200/-	510/-	24-4-14
4	152/7-9-13	कार्य.अभि. 2	आवाज ए भारत	3 x 30	28=00	2520/-	3920/-	1400/-	1-10-14
5	175/24-9-13	जकात अधिक्षक	दै.हिंदुस्तान	3 x 30	57=00	5130/-	5880/-	750/-	19-5-14
6	198/17-10-13	शहर अभियंता	बुलंद देश	3 x 40	26=00	3120/-	4200/-	1080/-	19-5-14
7	201/24-10-13	शहर अभियंता	प्रेरणापुंज	3 x 30	36=00	3240/-	3780/-	540/-	4-4-14
8	202/24-10-13	शहर अभियंता	मातृभूमी	3 x 30	41=00	3690/-	4800/-	1110/-	25-4-14

DRAFT

9	209/30-10-13	कार्य.अभि. 1	जिवनदाता	3 x 35	21=00	2205/-	3000/-	795/-	4-4-14
10	217/1-11-13	भांडार विभाग	भारत वंदना	3 x 20	46=00	2760/-	4320/-	1560/-	1-10-14
11	220/7-11-13	शहर अभियंता	महाविदर्भ	3 x 40	52=00	6240/-	7280/-	1040/-	1-11-14
12	221/7-11-13	शहर अभियंता	लोकपथ	3 x 35	52=00	5460/-	8320/-	2860/-	22-8-14
13	236/14-11-13	शहर अभियंता	अमरावती मंडल	3 x 20	60=00	3600/-	4500/-	900/-	25-4-14
14	242/19-11-13	स सं नगररचना	बातमीपत्र	3 x 50	34=00	5100/-	6480/-	1380/-	22-11-14
15	249/26-11-13	शहर अभियंता	मानवक्रांती	3 x 35	46=00	4830/-	6480/-	1650/-	12-5-14
16	257/2-12-13	प्रकाश विभाग	अमरावती मंडल	3 x 35	60=00	6300/-	7200/-	900/-	25-4-14
17	268/7-12-13	शहर अभियंता	बातमीपत्र	3 x 35	34=00	3570/-	6480/-	2910/-	26-12-13
18	274/11-12-13	कार्य अभि 1	भारत की आनबान	3 x 20	21=00	1260/-	6240/-	4980/-	1-10-14
19	274/11-12-13	कार्य अभि 1	लोकपथ	3 x 20	52=00	3120/-	5200/-	2080/-	25-9-14
20	294/27-12-13	प्रकाश विभाग	अमरावती मंडल	3 x 20	60=00	3600/-	4500/-	900/-	25-4-14
21	298/31-12-13	कार्य.अभि. 1	निर्भय संचार	3 x 20	25=00	1500/-	4320/-	2820/-	2-1-14
22	299/2-1-14	भांडार अधिक्षक	अमरावती मंडल	3 x 20	60=00	3600/-	4500/-	900/-	25-4-14
23	302/4-1-14	शहर अभियंता	लोकपथ	3 x 30	52=00	4680/-	6240/-	1560/-	22-8-14
24	302/4-1-14	शहर अभियंता	दै.प्रदर्शन	3 x 30	41=00	3690/-	4800/-	1110/-	12-5-14
25	304/7-1-14	कार्य.अभि. 2	आदिम कैवारी	3 x 40	23=00	2760/-	3600/-	840/-	12-5-14
26	305/8-1-14	प्रकाश विभाग	अमरावती मंडल	3 x 20	60=00	3600/-	4500/-	900/-	25-4-14
27	307/9-1-14	प्रकाश विभाग	बातमीपत्र	3 x 20	34=00	2040/-	3160/-	1120/-	22-12-14
28	307/9-1-14	प्रकाश विभाग	उठाठेव	3 x 20	26=00	1560/-	2464/-	904/-	22-12-14

DRAFT

29	308/9-1-14	शहर अभियंता	मातृभूमी	3 x 30	41=00	3690/-	6000/-	2310/-	25-4-14
30	324/20-1-14	कार्य अभियंता 1	बातमीपत्र	3 x 50	34=00	5100/-	8640/-	3540/-	22-12-14
31	338/31-1-14	कार्य.अभि. 2	निर्भय संचार	3 x 35	25=00	2625/-	6336/-	3711/-	25-4-14
32	338/31-1-14	कार्य.अभि. 2	भारत की आनबान	3 x 35	21=00	2205/-	7800/-	5595/-	1-10-14
33	344/1-2-14	कार्य अभियंता 1	बातमीपत्र	3 x 50	34=00	5100/-	6840/-	1740/-	22-12-14
34	354/6-2-14	शहर अभियंता	अमरावती मंडल	3 x 30	60=00	5400/-	6300/-	900/-	25-4-14
35	12/8-5-14	शहर अभियंता	दै.प्रदर्शन	3 x 40	41=00	4920/-	8400/-	3480/-	11-6-14
36	13/8-5-14	कार्य अभियंता 1	अमरावती मंडल	3 x 90	60=00	16200/-	18000/-	1800/-	25-7-15
37	23/20-5-14	कार्य अभियंता 1	बातमीपत्र	3 x 30	34=00	3060/-	4860/-	1800/-	22-12-14
38	29/21-5-14	शहर अभियंता	निर्भय संचार	3 x 35	25=00	2625/-	6480/-	3855/-	26-6-14
39	38/3-6-14	शहर अभियंता	बातमीपत्र	3 x 40	34=00	4080/-	5184/-	1104/-	22-12-14
40	58/18-6-14	कार्य अभियंता 1	निर्भय संचार	3 x 35	25=00	2625/-	4725/-	2100/-	10-11-14
41	61/20-6-14	शहर अभियंता	भारत की आनबान	3 x 40	21=00	2520/-	7280/-	4760/-	1-10-14
42	67/30-6-14	कार्य अभियंता 1	मातृभूमी	3 x 40	41=00	4920/-	6000/-	1080/-	25-7-15
43	70/2-7-14	शहर अभियंता	बातमीपत्र	3 x 50	34=00	5100/-	7632/-	2532/-	12-6-15
44	80/14-7-14	शहर अभियंता	भारत की आनबान	3 x 20	21=00	1260/-	4680/-	3420/-	1-10-14
45	92/18-7-14	शहर अभियंता	भारत की आनबान	3 x 50	21=00	3150/-	7800/-	4650/-	1-10-14
46	107/2-8-14	शहर अभियंता	लोकपथ	3 x 20	52=00	3120/-	4160/-	1040/-	22-8-14
47	114/7-8-14	कार्य अभियंता 1	कलाविश्व	3 x 30	23=00	2070/-	6720/-	4650/-	10-11-14
48	128/22-8-14	प्रकाश	अमरावती	3 x 20	60=00	3600/-	6000/-	2400/-	24-11-14

DRAFT

		विभाग	मंडल						
49	155/9-9-14	शहर अभियंता	अहर्निष	3 x 50	31=00	4650/-	8960/-	4310/-	1-10-14
50	151/5-9-14	प्रकाश विभाग	अमरावती मंडल	3 x 30	60=00	5400/-	6000/-	600/-	24-11-14
51	133/26-8-14	कार्य.अभि. 2	लोकपथ	3 x 25	52=00	3900/-	5200/-	1300/-	22-8-14
52	100/28-7-14	सिस्टीम मॅनेजर	अमरावती मंडल	3 x 20	60=00	3600/-	5400/-	1800/-	24-11-14
							एकूण	**104076/-**	

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा.नि. क्र.पीयुवी-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.1 मे 2001 यातील परि.क्र. 6 अन्वये महानगरपालिकेच्या वर्गीकृत जाहिराती तसेच दर्शनी जाहिराती शासन धोरणाप्रमाणे वृत्तपत्रांना परस्पर वितरीत करण्याचे अधिकार आहेत.तथापि,त्यांनी आपल्या जाहिरातीच्या वितरणासाठी शासनमान्य वृत्तपत्रांच्या यादीचा तसेच **शासनमान्य दराचा अंगीकार करून** शासन धोरणाप्रमाणे त्या त्या वर्गातील वृत्तपत्रांमध्ये करावयाच्या समान तत्वावरील वाटपाच्या धोरणाचा कटाक्षाने अंमल करावा असे नमूद आहे. मात्र अमरावती महानगरपालिकेच्या जाहिरात विभागाने वरीलप्रमाणे जाहिराती वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत संबंधित वृत्तपत्रांना शासनमान्य दरापेक्षा अधिक दराने रक्कम अदा केल्याने मनपाचे रु.**104076**/-एवढे नुकसान झाल्याचे दिसून येते.

याबाबत अर्धसमास क्र.66, दि.03/03/2018 अन्वये खुलासा मागविण्यात आला.मात्र खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 66)

DRAFT

13 सन 2014-15 मध्ये शासनाच्या वतीने शिक्षण कर,रोजगार हमी उपकर व मोठया निवासी इमारतीवरील कर अंतर्गत नागरिकांकडून वसूल केलेली रक्कम रु.5.01 कोटी शासन खात्यात विलंबाने भरणा करण्यात आल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 275172000.00 /-

महाराष्ट्र राज्याचा महसूल म्हणून शासनाच्या वतीने स्विकारलेल्या सर्व रकमा कोणताही गैरवाजवी विलंब न लावता कोणत्याही परिस्थितीत रक्कम स्विकारल्यापासून दोन दिवसाच्या आत शासनाच्या खात्यात पूर्णत:

भरण्यात येतील.कामाच्या दोन दिवसाच्या मर्यादेचे पालन करणे व्यवहार्य होणार नसेल तर विभागप्रमुख विशेष आदेश काढून जमा करण्याचा अवधी कामाच्या सात दिवसापर्यंत वाढवू शकतात अशी महाराष्ट्र कोषागार नियम -1968 मधील विभाग चार, नियम 8(1) यात तरतूद आहे.तसेच याबाबत शासनाने वेळोवेळी सूचना वजा निर्देशसुद्धा दिलेले आहेत.मात्र मनपाने सन 2014-15 मध्ये शासनाच्या वतीने शिक्षण कर,रोजगार हमी उपकर व मोठया निवासी इमारतीवरील कर अंतर्गत नागरिकांकडून वसूल केलेली रक्कम रु.5.01 कोटी शासन खाती विलंबाने भरणा केल्याचे उपलब्ध नस्तीवरून दिसून येते.

महानगरपालिकेद्वारा नागरिकांकडून शिक्षण कर,रोजगार हमी उपकर व मोठया निवासी इमारतीवरील कर इत्यादी शासकीय कर वसूल केला जातो. महाराष्ट्र कोषागार नियम -1968 विभाग चार, नियम 8(1) मधील तरतूदीनुसार तथा शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनावजा निर्देशांनूसार शासनाच्या वतीने वसूल करण्यात आलेला शासकीय कर, वसुलीच्या दिनांकापासून जास्तीत जास्त सात दिवसाचे आत शासन खात्यात भरणा करणे आवश्यक आहे.

सन 2014 -15 मध्ये अमरावती महानगरपालिकेने शासनाच्या वतीने शिक्षण कर,रोजगार हमी उपकर व मोठया निवासी इमारतीवरील कर अंतर्गत रु.50150515/- एवढी रक्कम नागरिकाकडून वसूल केली असल्याचे उपलब्ध करून दिलेल्या नस्तीवरून दिसून येते. वसूल केलेल्या रकमा मनपाच्या, एचडीएफसी,अमरावती येथील बँक खाते क्र.27317620000020 यात वेळोवेळी जमा करण्यात आल्यात. पुढे या खात्यातून रक्कम काढून उपरोक्त दिनांकास शासन खात्यात प्रत्यक्षात भरणा करण्यात आलेला आहे. वसूल केलेल्या रकमेचा शासन खाती केलेला भरणा याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

महिना	शिक्षण कर	रोजगार हमी उपकर	मोठया निवासी इमारतीवरील कर	एकूण	भरणा केल्याचा दिनांक
04/2014	1418931/-	234026/-	27182/-	1680139/-	23/9/2014
05/2014	1287320/-	151942/-	154431/-	1593693/-	23/9/2014
06/2014	1395641/-	124806/-	25365/-	1545812/-	22/10/2014
07/2014	1098599/-	117526/-	22798/-	1238923/-	22/10/2014
08/2014	2467739/-	337041/-	88305/-	2893085/-	25/11/2014
09/2014	4727705/-	729450/-	172956/-	5630111/-	25/11/2014
10/2014	2937877/-	410318/-	93500/-	3441695/-	24/01/2015
11/2014	5496253/-	775752/-	263061/-	6535066/-	24/03/2015
12/2014	7433591/-	1239398/-	342872/-	9015861/-	24/03/2015

DRAFT

01/2015	4459800/-	647163/-	133545/-	5240508/-	24/03/2015
02/2015	3345307/-	472014/-	78867/-	3896188/-	24/03/2015
03/2015	6277319/-	962602/-	199513/-	7439434/-	13/04/2015
एकूण	**42346082/-**	**6202038/-**	**1602395/-**	**50150515/-**	

उपरोक्त विवरणपत्राचे अवलोकन केल्यास वसूल केलेल्या कराचा प्रत्येक महिन्यात विलंबाने भरणा केल्याचे निदर्शनास येते.

सदर रक्कम ही शासनाच्या वतीने वसूल केली असल्याने विहित मुदतीत ती शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. परंतु या महानगरपालिकेत याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे स्पष्ट होते.तरी महानगरपालिकेने मध्ये शिक्षण कर,रोजगार हमी उपकर व मोठया निवासी इमारतीवरील कर अंतर्गत वसूल होणाऱ्या रकमेचा शासन खाती विहित कालावधीत भरणा करण्याच्या दृष्टीने उचित उपाययोजना कराव्यात. तसेच सदर अनियमिततेस शासनाकडून क्षमापन प्राप्त करावे.

DATMMSM6701 (Ref No : 08)

14 सन 2014-15 या आर्थिक वर्षात प्रदान केलेल्या रु.11.57 लाख इतक्या अग्रीमाचे प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या बिजकांसह समायोजन न झाल्याने मनपा निधीच्या झालेल्या संभावित हानीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 1157000.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 1157000.00/-

मुंबई वित्तीय नियम-1959 मधील नियम 142 (अ) नुसार अग्रीमाचे 3 महिन्याचे आत समायोजन होणे आवश्यक आहे. मात्र विहित मुदतीचे आत अग्रीमापोटी उचल केलेल्या रकमांचे प्रत्यक्ष खर्चाच्या पुराव्यासह समायोजन न झाल्याने रकमांचा गैरविनियोग होऊन मनपा निधीची हानी झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

महानगरपालिका, अमरावतीचे सन 201 4 -15 चे लेखापरीक्षणात लेखा विभागाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या अग्रीम नोंदवहीची तपासणी केली असता सन 201 4 -15 मधील 09 प्रमाणकांन्वये अदा केलेल्या एकूण रु.1157000/-च्या तात्पुरत्या अग्रीमांचे समायोजन झाल्याच्या नोंदी नोंदवहीत आढळून

आलेल्या नाहीत. समायोजन न झालेल्या अग्रीम रकमेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	अग्रीम ज्यांना देण्यात आले त्यांचे नाव/पदनाम	अग्रीम देण्याचे थोडक्यात प्रयोजन	अग्रीम प्रदान केल्याचा प्रमाणक क्रमांक व दिनांक	रक्कम रुपये
1	श्री डी ए मिसाळ	मेमोरी बॉक्स,मुंबई येथे पाठविणेबाबत.	1572/3-6-2014	3000/-
2	श्री प्रभाकर देवपुजारी	जातीनिहाय जनगणना बाबत कामाकरिता मुंबई प्रवासाकरिता अग्रीम.	1607/6-6-2014	5000/-
3	श्री जी एच जयस्वाल	अतिक्रमण हटविणेस अग्रीमधन.	1917/20-6-2014	100000/-
4	श्री आर एम पवार,उपअभियंता	प्राथ.शाळा दुरुस्तीकरिता अग्रीम.	2441/1-7-2014	200000/-
5	श्री मिलींद बल्लाळ, अभियंता	लोकसभा सार्व.निवडणूक 2014 मतदान केंद्रावर सुविधा पुरविण्याबाबत.	3833/16-8-2014	100000/-
6	डॉ.सचिन छगन बोंद्रे,पशु शल्य चिकित्सक	औषध साहित्य खरेदीकरिता.	5436/25-9-2014	200000/-
7	श्री पी व्ही इंगोले,उप अभियंता	पोलीस मुख्यालय येथे प्रवेशद्वार उभारणेकरिता अग्रीम.	8330/3-12-2014	299000/-
8	श्रीमती अरुणा डांगे	कला महोत्सवाकरिता.	9651/9-1-2015	200000/-
9	सौ. चरणजितसिंग कौर नंदा,महापौर	मुंबई येथे जाणेकरिता.	13242/23-3-2015	50000/-
			एकूण रुपये	**1157000/-**

मुंबई वित्तीय नियम-1959 मधील नियम 142(अ) नुसार अग्रीमाचे 3 महिन्याचे आत समायोजन होणे आवश्यक आहे.मात्र विहित मुदतीचे आत अग्रीमापोटी उचल केलेल्या रकमांचे प्रत्यक्ष खर्चाच्या पुराव्यासह समायोजन न झाल्याने रकमांचा गैरविनियोग होऊन मनपा निधीची हानी झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरीलप्रमाणे एकूण रु.11.57 लक्ष एवढी प्रचंड रक्कम मनपाच्या लेख्याबाहेर दिर्घ कालावधीसाठी असणे ही गंभीर बाब आहे. सदर प्रलंबित असलेल्या अग्रीम समायोजनाबाबतची सद्यस्थिती स्पष्ट करण्याबाबत अर्धसमास क्र.67, दि.5.3.2018 अन्वये लेखा विभागास कळविण्यात आले होते. परंतू त्याबाबतचा खुलासा प्राप्त झाला नसल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 67)

16 कर्जनिवारण निधी खात्यातील जमा रकमा दीर्घ मुदतीसाठी गुंतवणूक न करता बचत खात्यात ठेवल्याने 2014-15 मध्ये अंदाजे रु 48843/ व्याजाचे नुकसान होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 6399171.00 /-

महाराष्ट्र मनपा अधिनियमातील कलम 92(1) नुसार एखाद्या निधीतून रकमा काढण्याची आवश्यकता नसल्यास अशा रकमा दीर्घ मुदतीसाठी गुंतविण्याचे निर्देश असताना कर्जनिवारण निधी खात्यातील शिलकी रकमांचे दीर्घ मुदतीसाठी किफायतशीर गुंतवणूक न केल्यामुळे 2014-15 या वर्षात अंदाजे रु.48843/- एवढ्या व्याजाचे मनपाचे नुकसान झाले आहे. याचप्रमाणे त्यापूर्वीच्या कालावधीतसुद्धा मनपाचे व्याजापोठी नुकसान झाले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 92 (1) नुसार महानगरपालिकेच्या निधीत जमा असलेल्या शिलकी रकमांची गुंतवणूक शासनमान्य बँकेत करणे आवश्यक आहे. मनपाच्या वित्त शाखेकडील उपलब्ध अभिलेख्याप्रमाणे कर्जनिवारण निधीच्या एक्सिस बँक, शाखा अमरावती मधील खाते क्र.911010036128187 च्या बँक विवरणाचे अवलोकन केले असता असे दिसून आले की,सदर खात्यातील दि.31-03-2014 अखेरची शिल्लक रु.1041510/-असून त्यावर त्यावर त्रैमासिक व्याज (साधारणत: 3.75 ते 4.00 टक्के प्रतिवर्ष दराने) अनुक्रमे रु. 10387/-,10605/-,10712/-,10585/- असे एकूण रु.42289/- प्रत्येक तिमाही अखेर खात्यात जमा करण्यात आले आहे.

उपरोक्त कलमान्वये निधीतील रक्कम काढण्याची आवश्यकता नसल्यास अशा रकमा दीर्घ मुदतीसाठी गुंतविण्याचे निर्देश असताना व कर्जनिवारण निधीमधील रकमा नियमित खर्चासाठी उपलब्ध नसल्यामुळे त्यांची दिर्घ मुदतीसाठी गुंतवणूक करणे आवश्यक होते. त्यामुळे शिल्लक रकमांची गुंतवणूक दिर्घ मुदतीसाठी व तुलनेने अधिक व्याजदरावर करून अधिक व्याज प्राप्त करता आले असते.

सन 2014-15 च्या सुरुवातीस रु.1041510/- शिल्लक असून त्यावर जवळपास 4% प्रतिवर्ष या दराने रु.42289/- एवढे व्याज 2014-15 मध्ये बचत खात्यावर प्राप्त झाले आहे.सदर कालावधीत विविध बँकांकडील एक वर्षासाठीचे मुदती ठेवीवरील दर सरासरीने 8.75% (अंदाजे) असून त्याची तुलना केल्यास अंदाजे रु.91132/- एवढे व्याज सन 2014-15 मध्ये प्राप्त होणे अपेक्षित होते.परंतू किफायतशीर गुंतवणूक न केल्यामुळे रु.48843/- एवढ्या व्याजाचे नुकसान झाल्याचे दिसून येते. याचप्रमाणे कर्जनिवारण निधीच्या स्थापनेपासून 2013-14 या आर्थिक वर्षापर्यंत सुद्धा दरवर्षी

व्याजापोटी मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

यासंदर्भात अर्धसमास क्र. 08 दिनांक 23-01-2018 अन्वये विचारणा केली असता मनपाचे लेखा विभागाकडून खुलासा प्राप्त झाला नाही. नियमानुसार कार्यवाही न केल्यामुळे मनपास व्याजाची हानी झाल्यामुळे सदरचा आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 08)

19 मनपाचे कर विभाग/म्यु.नगर रचना विभागातील कर्मचा-यांचे सेवापुस्तकातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

सेवाप्रवेशोत्तर नियमानुसार शासकीय सेवेत / स्वायत्त संस्थेत नियुक्त झालेल्या सर्व कर्मचा-यांना शासनाने / स्वायत्त संस्थेने ठरवून दिलेल्या नियमावलीनुसार अर्हता धारण करणे आवश्यक असून मनपाचे आरोग्य विभागातील कर्मचा-यांचे सेवापुस्तकात त्रुटि/उणीवा आढळून आल्यामुळे त्याप्रमाणे मनपाने उचित प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते.

मनपा, अमरावतीचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणात कर विभागाचे खालील सेवापुस्तकांची पडताळणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्यात :-

(अ)

अ.क्र.	कर्मचा-यांचे नांव व पदनाम	सेवापुस्तकातील आढळून आलेल्या अनियमितता
1	2	3
1	श्री.शुभम गजानन वाकोडे, कनिष्ठ लिपिक	1. चारित्र्य पडताळणीची नोंद सेवापुस्तकात दिसून आली नाही. 2. वैद्यकीय पात्रतेबाबत जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिलेल्या प्रमाणपत्राची नोंद दिसून आली नाही. 3. MSCIT संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 4. एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा उत्तीर्ण करण्यापासुन सुट मिळाल्याची सेवापुस्तकात नोंद नाही. 5. नामांतरण फॉर्मस् जोडलेले नाही. 6. जात पडताळणीची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही.

2	श्री.गजानन सा.घुगे, कनिष्ठ लिपिक	1. चारीत्र्य पडताळणीची नोंद सेवापुस्तकात दिसून आली नाही. 2. वैद्यकीय पात्रतेबाबत जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिलेल्या प्रमाणपत्राची नोंद दिसून आली नाही. 3. एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा उत्तीर्ण करण्यापासुन सुट मिळाल्याची सेवापुस्तकात नोंद नाही. 4. नामांतरण फॉर्मस् जोडलेले नाही.
3	श्री.शरद उत्तमराव काळे, कनिष्ठ लिपिक	1. चारीत्र्य पडताळणीची नोंद सेवापुस्तकात दिसून आली नाही. 2. वैद्यकीय पात्रतेबाबत जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिलेल्या प्रमाणपत्राची नोंद दिसून आली नाही. 3. एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा उत्तीर्ण करण्यापासुन सुट मिळाल्याची सेवापुस्तकात नोंद नाही. 4. जात पडताळणीची नोंद सेवापुस्तकात नाही.
4	श्री.मनोहर भाऊरावजी ढोके, कनिष्ठ लिपिक	1. चारीत्र्य पडताळणीची नोंद सेवापुस्तकात दिसून आली नाही. 2. वैद्यकीय पात्रतेबाबत जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिलेल्या प्रमाणपत्राची नोंद दिसून आली नाही. 4. MSCIT संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 5. एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा उत्तीर्ण करण्यापासुन सुट मिळाल्याची सेवापुस्तकात नोंद नाही. 6. टंकलेखन परीक्षा मराठी/इंग्रजी परीक्षा उत्तीर्ण असल्याची नोंद नाही. 7. जात पडताळणीची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही.
5	श्री.कमलकिशोर अ.देसाई	1. चारीत्र्य पडताळणीची नोंद सेवापुस्तकात नाही. 2. वैद्यकीय पात्रतेबाबत जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिलेल्या प्रमाणपत्राची नोंद नाही. 3. MSCIT संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 4. एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा उत्तीर्ण करण्यापासुन सुट मिळाल्याची सेवापुस्तकात नोंद नाही. 5. टंकलेखन परीक्षा मराठी/इंग्रजी परीक्षा उत्तीर्ण असल्याची नोंद नाही. 6. नामांतरण फार्मस् भरलेले नाहीत.

DRAFT

6	श्री.योगेश्वर झां.आकोडे, निरीक्षक	1. चारीत्र्य पडताळणीची नोंद सेवापुस्तकात नाही. 2. वैद्यकीय पात्रतेबाबत जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिलेल्या प्रमाणपत्राची नोंद नाही. 3. MSCIT संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 4. एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा उत्तीर्ण करण्यापासुन सुट मिळाल्याची सेवापुस्तकात नोंद नाही. 5. टंकलेखन परीक्षा मराठी/इंग्रजी परीक्षा उत्तीर्ण असल्याची नोंद नाही.
7	श्री.आर.एन.अंबाडकर	1. चारीत्र्य पडताळणीची नोंद सेवापुस्तकात नाही. 2. वैद्यकीय पात्रतेबाबत जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिलेल्या प्रमाणपत्राची नोंद नाही. 3. MSCIT संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 4. एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा उत्तीर्ण करण्यापासुन सुट मिळाल्याची सेवापुस्तकात नोंद नाही. 5. टंकलेखन परीक्षा मराठी/इंग्रजी परीक्षा उत्तीर्ण असल्याची नोंद नाही.
8	श्री.रमेश भिमराव सहारे, चेकर/जमादार	1. चारीत्र्य पडताळणीची नोंद सेवापुस्तकात नाही. 2. वैद्यकीय पात्रतेबाबत जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिलेल्या प्रमाणपत्राची नोंद नाही. 3. MSCIT संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 4. एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा उत्तीर्ण करण्यापासुन सुट मिळाल्याची सेवापुस्तकात नोंद नाही. 5. टंकलेखन परीक्षा मराठी/इंग्रजी परीक्षा उत्तीर्ण असल्याची नोंद नाही. 6. जात पडताळणीची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही.

तसेच म्यु.नगर रचना विभागाचे कर्मचा-यांचे सेवापुस्तकाची तपासणी केली असता खालील अनियमितता आढळून आल्यात :-

(ब)

अ.क्र.	कर्मचा-यांचे नांव व पदनाम	सेवापुस्तकातील आढळून आलेल्या अनियमितता

DRAFT

1	2	3
1	श्री.संजय जयदेव डाके, कनिष्ठ लिपिक नियुक्ती दि.5.6.2004	1. चारीत्र्य पडताळणीची नोंद सेवापुस्तकात दिसून आली नाही. 2. एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा उत्तीर्ण करण्यापासुन सुट मिळाल्याची सेवापुस्तकात नोंद नाही. 3. टंकलेखन परीक्षा मराठी/इंग्रजी परीक्षा उत्तीर्ण असल्याची नोंद नाही. 4. नामांतरण फॉर्मस् जोडलेले नाही. 5. जात पडताळणीची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही.
2	श्री.सुनिल पं.सवाई, कनिष्ठ लिपिक, नियुक्ती दि.15.10.1984	1. चारीत्र्य पडताळणीची नोंद सेवापुस्तकात नाही. 2. वैद्यकीय पात्रतेबाबत जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिलेल्या प्रमाणपत्राची नोंद नाही. 3. MSCIT संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 4. एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा उत्तीर्ण करण्यापासुन सुट मिळाल्याची सेवापुस्तकात नोंद नाही. 5. टंकलेखन परीक्षा मराठी/इंग्रजी परीक्षा उत्तीर्ण असल्याची नोंद नाही. 6. जात पडताळणीची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही. 7. नामनिर्देशन फॉर्मस् भरलेले नाहीत.

1. वरील तक्ता **"ब"** मधील अ.क्र.1 श्री.संजय जयदेव डाके यांची मुळ नियुक्ती चतुर्थ श्रेणीमध्ये असून त्यांना दिनांक 2.11.2008 पासून कनिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती विहित अटी व शर्तींच्या अनुषंगाने देण्यात आली.

त्यांचे पदोन्नती आदेशातील अट क्र.3 नुसार मराठी टंकलेखन 30 श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन 40 श.प्र.मि. 1 वर्षात उत्तीर्ण करणे बंधनकारक असून या कालावधीत टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण न केल्यास पदावनती करण्यात येईल, अशी अट असताना त्यांनी टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण केली नसल्याचे सेवापुस्तकातील नोंदींवरुन दिसून येते. मनपाने अद्याप कोणतीही प्रशासकीय कार्यवाही केली नसून त्यांच्या नियमानुसार वार्षिक वेतनवाढी थांबविण्यात आलेल्या नाहीत.

2. वरील तक्ता **"ब"** मधील अ.क्र.2 श्री.सुनिल पंजाबराव सवाई, कनिष्ठ लिपिक वरील तक्ता-ब मध्ये नमुद केल्याप्रमाणे MSCIT परीक्षा/टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण केली नसून जात पडताळणीची नोंद नसल्यामुळे ते पदोन्नतीस पात्र नसल्याचे दिसून येते. तरी त्यांना 12 वर्ष व 24 वर्षांचे सेवेची कालबध्द/आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आल्याचे दिसून येते.

3. तसेच मनपाचे इतरही ब-याच कर्मचा-यांनी शैक्षणिक पात्रता पूर्ण केली नसताना त्यांना पदोन्नती/आश्वासित पदोन्नतीचा लाभ देण्यात आल्याचे दिसून येते.

4. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई शासन निर्णय क्र.मभाप-1087/14/सीआर-2/87/20,

दिनांक 30.12.1987 नुसार सेवानियुक्तीपासून दोन वर्षात मराठी भाषा उत्तीर्ण करणे किंवा मराठी भाषा उत्तीर्ण करण्यापासून सुट मिळविणे आवश्यक आहे. विहित कालावधीत परीक्षा उत्तीर्ण न होणा-या अथवा सुट न मिळविणा-या कर्मचा-यांच्या वेतनवाढी रोखण्यास पात्र ठरेल. परंतु मनपाचे अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही.

5. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई शासन निर्णय क्र.हिभाप-1076-28, दिनांक 10.6.1976 नुसार प्रत्येक शासकीय कर्मचा-याने शासकीय सेवेत रुजू झाल्याच्या दिनांकपासून तीन वर्षाचे मुदतीत उत्तीर्ण करणे आवश्यक आहे किंवा सुट मिळविणे आवश्यक आहे. विहित कालावधीत परीक्षा उत्तीर्ण न होणाऱ्या अथवा सुट न मिळविणाऱ्या कर्मचा-यांच्या वेतनवाढी रोखण्यात येतील. असे असताना मनपाचे कर्मचा-यांना मराठी भाषा / हिंदी भाषा उत्तीर्ण केल्याची किंवा सुट मिळविल्याची नोंद सेवापुस्तकात नसून विहित कालावधीनंतर त्यांच्या वार्षिक वेतनवाढी रोखण्यात आल्या नाहीत.

6. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-2000/प्र.क्र.5/2001/39, दिनांक 20.7.2002 नुसार जे कर्मचारी संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण करणार नाहीत, अशा कर्मचा-यांच्या वेतनवाढी सुट मिळण्यास पात्र होईस्तोवर रोखण्यात येईल. तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-2000/प्र.क्र.61/2001/39, दिनांक 19.3.2003 नुसार दिनांक 19.3.2003 रोजी किंवा त्यानंतर गट-अ, गट-ब व गट-क मधील ज्या पदाची निवड प्रक्रिया सुरु होईल, अशा नव्याने नियुक्त होणा-या सर्व अधिकारी/कर्मचारी संगणक अर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आत प्राप्त न केल्यास अशा कर्मचा-यांच्या सेवा समाप्त करण्यात येईल, असे स्पष्ट नमुद आहे. परंतु मनपा प्रशासनाकडून अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.118, दिनांक 05.04.2018 नुसार अनुपालन मागविले असता कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 118)

20 स्थायी समिती ठरावाद्वारे निश्चित केलेल्या परवाना शुल्काच्या रकमेपेक्षा कमी दराने वसुली केल्याने रु.22000/- च्या महसुलाच्या हानीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 22000.00/-

स्थायी ठराव क्र.166, दि.08/02/2013 नुसार सुधारित निश्चित दराप्रमाणे परवाना शुल्काची रक्कम वसूल न केल्याने रु.22000/- च्या रकमेचे नुकसान झाले आहे.

बाजार विभागाद्वारे सन 1999-2000 पासून व्यावसायीकरिता आवश्यक असलेल्या परवाना शुल्काची वसुली करण्यात येत असून सर्वसाधारण सभा ठराव क्र.08. दि.19/01/2013 नुसार नवीन व्यावसाय समाविष्ट करण्यात आलेले आहे. एकूण 275 व्यावसायिक परवाना शुल्काचे सुधारित दर स्थायी ठराव क्र.166, दि.08/02/2013 नुसार निश्चित करण्यात आलेले आहे.

विभागाने पुरविलेल्या पावती पुस्तक व दैनिक वसुली नोंद्वहीशी तपासणी केली असता उपरोक्त ठरावाच्या निश्चित दराप्रमाणे वसुली न करता त्यापेक्षा कमी दराप्रमाणे वसुली करण्यात आल्याचे दिसून आले.

पुढील व्यवसांयापासून निश्चित दरापेक्षा कमी वसूल केल्याचे आढळून आले.

(रकमा रुपयात)

व्यवसायाचे नाव	पावती बुक क्र./ पावती क्र. व दिनांक	निश्चित दर	आकारण्यात आलेले दर	कमी वसूल केलेली रक्कम
मंगल कार्यालय	884/025 , 03.02.2015	15000/-	13000	2000
मंगल कार्यालय	884/028 , 03.02.2015	15000/-	13000	2000
मंगल कार्यालय	884/039 , 03.02.2015	15000/-	13000	2000
मंगल कार्यालय	884/040 , 03.02.2015	15000/-	13000	2000
मंगल कार्यालय	884/042 , 03.02.2015	15000/-	13000	2000
मंगल कार्यालय	884/049 , 03.02.2015	15000/-	13000	2000
मंगल कार्यालय	884/053 , 04.02.2015	15000/-	13000	2000
मंगल कार्यालय	886/026 , 05.01.2015	15000/-	13000	2000
मंगल कार्यालय	887/035 , 05.01.2015	15000/-	13000	2000
मंगल कार्यालय	886/083 , 06.02.2015	15000/-	13000	2000
मंगल कार्यालय	943/030 , 10.01.2015	15000/-	13000	2000
एकूण रक्कम रु.		165000	143000	22000

वरील परवानाधारकाकडून परवाना शुल्क निश्चित दराप्रमाणे वसूल न केल्यामुळे त्याबाबतची जबाबदारी निश्चित करून वसूल करण्यात यावे.

DRAFT

21 सेवाकराची आकारणी न केल्यामुळे व विहित मुदतीत सेवाकराचा भरणा न केल्यामुळे रु. 29.00 लाख एवढ्या संभाव्य दंडनीय व्याजाची जबाबदारी निश्चित करून वसुली होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 2921190.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 2921190.00/-

Finance act 1994 नुसार सेवाकराची रक्कम वेळेत केंद्र शासनाकडे भरणा न केल्यामुळे त्यातील विविध कलमान्वये निर्माण होणाऱ्या दंडनीय व्याजाच्या रु. 29,21,190/- एवढ्या दायित्वाचा मनपा निधीवर अकारण भुर्दंड पडणार असून संबंधीताकडून जबाबदारी निश्चीतीसह वसुली होणे आवश्यक आहे.

Finance act 1994 मधील कलम 65 (105)(zzzz) नुसार अचल संपत्तीच्या भाडेमूल्यावर 12% केंद्र शासनाचा सेवाकर, त्यावर 2% Education cess व 1% Secondary and Higher education cess लागू असून तो विहित मुदतीचे आत न भरल्यास कलम 75 नुसार सेवाकराच्या भरणा केल्याच्या दिनांकापर्यंत व्याज, कलम 76 नुसार प्रतिदिवस रु. 200/- प्रमाणे किंवा सेवाकर रकमेच्या 24% (वार्षिक) यापैकी जास्त असेल तो दंड व कलम 77 नुसार रु. 5,000/- दंड भरण्यास संबंधित व्यक्ती / संस्था पात्र आहे.

मनपाकडे बाजार विभागाकडील शॉप रेंट ची प्राप्त रक्कम व त्यावरील देय सेवाकर पुढीलप्रमाणे आहे.

वर्ष	प्राप्त भाडे रक्कम	सेवाकर (12.36%)	भरणा केलेली रक्कम	भरणा करावयाची शिल्लक रक्कम
2014-15	1,11,11,669	13,73,402	0.00	13,73,402

वरीलप्रमाणे सन 2014-15 मध्ये प्राप्त भाडे रकमेवर सेवाकराची आकारणी न केल्याने उक्त अधिनियमानुसार 12.36% प्रमाणे एकूण रु. 13,73,402/- ची वसुली केली नाही. त्यामुळे केंद्र शासनाच्या महसुलाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

थकीत सेवाकराच्या 13,73,402/- या रकमेवरील व्याज व दंडाच्या दायित्वाची रक्कम पुढीलप्रमाणे आहे.

1. <u>व्याज (कलम 75)</u> (सेवाकर नोटीफीकेशन नं. 12/2014-ST दि. 11.07.2014 नुसार व्याजाच्या सुधारित दराप्रमाणे परिगणना)		
i	प्रथम 6 महिने (एप्रिल 2014 ते सप्टेंबर 2014) (18% व्याज)	1,23,606
ii	पुढील 6 महिने (ऑक्टोबर 2014 ते मार्च 2015) (24% व्याज)	1,64,808

iii	त्यापुढे अद्याप भरणा न झाल्याने किमान जून 2017 पर्यंत म्हणजेच 2 वर्ष व 3 महिन्यापर्यंत (एप्रिल 2015 ते मार्च 2017) (30% व्याज)	1,83,120
	एकूण व्याजाचे दायित्व	**4,71,534**
2. <u>थकीत सेवाकरावर दंड (कलम 76)</u>		
i	3 वर्षे व 3 महिने x 24% प्रतिवर्ष (एप्रिल 2014 ते जून 2017)	**10,71,254**
3. <u>दंड (कलम 77)</u>		
i	अधिकतम रु. 5,000/-	**5,000.00**
एकूण व्याज व दंड (1+2+3)		**15,47,788**

याप्रमाणे सन 2014-15 मध्ये प्राप्त भाडे रक्कम रु. 13,73,402/- चा सेवाकर न भरल्याने व त्याअनुषंगाने व्याज व दंडापोटी रु. 15,47,788/- एवढे जून 2017 अखेर पर्यंत एकूण रु. 29,21,190/- चे दायित्व मनपावर असून सेवाकर रक्कम भरण्याव्यतिरिक्त केंद्र शासनाच्या सेवाकर विभागाकडून व्याज व दंडापोटी क्षमापन प्राप्त न झाल्यास जबाबदारी निश्चितीसह सदर रक्कम संबंधितांकडून वसूल करून मनपा निधी मार्फत केंद्र शासनास भरणा होणे आवश्यक आहे.

DLFSPPM8501 (Ref No : 39)

22 जाहिरातीवरील कर वसुलीचे काम कंत्राट तत्वावर दिल्याने विहित मुदतीत कराची रक्कम मनपास प्राप्त होत नसल्याने त्यावर आकारण्यात येणाऱ्या व्याजाची एकूण रक्कम रु. 10048500/- चे मनपाचे नुकसान होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 10048500.00/-

करारनाम्यातील अट क्र.29 नुसार मुदत दिनांकानंतर सदर रकमेवर 18% प्रमाणे सरळ व्याजानुसार आकारणी केली नसल्यामुळे रु. 10048500 चे मनपाचे नुकसान झाले आहे.

मनपा क्षेत्रातील जाहिरातीची (स्थायी होर्डिंग/तात्पुरते फलक/दुकानावरील फलक) कर वसुली करणे व निवडक जागेवर होर्डिंग प्रदर्शित करणे, इलेक्ट्रिक पोलवर क्रिऑक्स व फलक प्रदर्शित करण्याचे कामाकरिता जाहिरातीच्या करापासून महसूल प्राप्ती करीता जाहीरातीद्वारे निविदा सूचनामध्ये 80 लक्ष शासकीय आधारभूत मूल्य ठेवून जाहिरात प्रसिद्धी करण्यात आल्या.

मनपाच्या स्थायी समितीचे मंजूर व कायम ठराव क्र.4, दि.13/04/2012 नुसार मनपाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने व कर्मचारी कमी असल्याने होर्डिंग व इतर जाहिरातीवरील कर वसुलीचे काम कंत्राट तत्वावर देण्याबाबत निर्देशित करण्यात आले होते. त्यानुसार मनपा क्षेत्रातील जाहिरातीचे कर वसूली करणे व निवडक जागेवर होर्डिंग प्रदर्शित करणे व इलेक्ट्रिक पोल, क्रिऑक्स व फलक प्रदर्शित करण्याचे हक्काबाबत दि.30/10/2012 चे दैनिक लोकमत व साप्ताहिक वृत्तपत्रात दुसऱ्यांदा फेर निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली व त्यात रु.80 लक्ष शासकीय आधारभूत मुल्य ठेवण्यात आले. त्यानुसार खालील निविदा प्राप्त झाल्या.

निविदाधारक आधारभूत मुल्य (रु.)

1) मे.थर्ड आय सेक्युरिटी सर्विसेस 8651000/-

2) मे.आर्य सेक्युरिटी सर्विसेस 8400000/-

3) मे.सोनू सेक्युरिटी सर्विसेस 8250000/-

4) मे.सेल अँड सर्विसेस 8416027/-

यापैकी उच्चतम निविदाधारक मे.थर्ड आय सेक्युरिटी सर्विसेस यांना बँक गँरंटी करणेबाबत कळविले असता सदर निविदा धारकाने विहित मुदतीत बँक गँरंटी सादर केली नाही. त्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचे उच्चतम निविदा धारक मे. सेल अँड सर्विसेस, नागपूर यांच्याशी दि.24/12/2012 ला वाटाघाटी केली असता त्यांनी रु.8700000/- चे ऑफर मूल्य देण्याचे लिखित मान्य केले आहे व त्यांच्या ऑफर मुल्यास आयुक्तांनी दि.25/12/2012 ला मंजुरी मान्य करण्यात आली आहे. त्यानुसार सदर निविदा धारकांनी रु.10 लक्षचे सुरक्षा रक्कम सादर केलेली आहे.

करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार कंत्राटदार रु.8700000/- ऑफर मूल्याचे प्रदान समान 12 हफ्त्यामध्ये करून रु.725000/- प्रती महिना प्रत्येक महिन्याच्या 1 तारखेस देण्याचे ठरले.

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत-

1) करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार कंत्राटदार मनपास ऑफर मूल्याच्या 12 समान भागामध्ये विभागून रु.725000/- प्रती महिना प्रत्येक महिन्याच्या 1 तारखेस भरणा करण्याचे ठरवले आहे. अट क्र.29 नुसार मुदत दिनांकानंतर सदर रकमेवर 18% प्रमाणे सरळ व्याजानुसार आकारणी केली जाईल व अशी देय रक्कम व उशिरा भरण्यात येणाऱ्या रकमेवर देय व्याज 2 महिन्याच्या आत भरण्यात आले नाही तर करार संपुष्टात येईल असे नमूद आहे. तथापि, जमा रकमांची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की वसूल रकमेच्या विलंबापोटी व्याजाची आकारणी करण्यात आली नाही.

व्याजाची आकारणी करण्यात न आल्यामुळे पुढीलप्रमाणे नुकसान झाले आहे.

पावती क्र. व दिनांक	देय कालावधी	पावतीनुसार मनपास देण्यात आलेली रक्कम (रु.)	व्याज आकारणी करावयाचा कालावधी	व्याज आकारणी न केल्यामुळे झालेले नुकसान (रु.)
993101/24.04.2014	11.11.2013 ते 11.12.2013	725000/-	144 दिवस	626400

993102/03.07.2014	11.12.2013 ते 11.01.2014	725000/-	180	783000
993103/24.07.2014	11.01.2014 ते 11.02.2014	725000/-	203	883050
993104/28.11.2014	11.02.2014 ते 11.03.2014	725000/-	328	1426800
993105/28.11.2014	11.03.2014 ते 11.04.2014	725000/-	298	1296300
993106/28.11.2014	11.04.2014 ते 11.05.2014	1000000/-		
	11.05.2014 ते 11.06.2014		208	904800
993107/28.11.2014	11.06.2014 ते 11.07.2014	725000/-	150	652500
993110/23.02.2015	11.07.2014 ते 11.08.2014	725000/-	173	752550
993111/26.02.2015	11.08.2014 ते 11.09.2014	725000/-	176	765600
993112/30.03.2015	11.09.2014 ते 11.10.2014	725000/-	180	783000
993113/30.03.2015	11.10.2014 ते 11.11.2014	725000/-	150	652500
993114/30.03.2015	11.11.2014 ते 11.12.2014	725000/-	120	522000
व्याजाची आकारणी न केल्यामुळे झालेले नुकसान (एकूण रु.)				10048500

सदरील व्याजाची रक्कम संबंधिताकडून वसूल करून मनपा निधीमध्ये जमा केल्याचे समर्थनिय अनुपालन सादर करावे.

DLFSPPM8501 (Ref No : 32)

26 स्थानिक संस्था कराच्या प्राप्त रकमेतील आढळून आलेल्या तफावतीचा ताळमेळ न घेणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :392 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

स्थानिक संस्था कर विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार सन 2014-15 मध्ये स्थानिक संस्था कराची रक्कम रु.71,65,34,776/- प्राप्त झाल्याचे कळविले आहे. ई-मेल द्वारे सॉफ्ट कॉपीमध्ये सादर केलेल्या विवरणपत्राची बेरीज रु.71,60,85,600/- एवढी येते. रोखपुस्तकावरुन मनपा निधीत जमा झालेली रक्कम रु.79,73,36,436/- एवढी येते. याबाबत बँकेशी ताळमेळ घेण्यात आला नसून सन 2014-15 मधील स्थानिक संस्था कराच्या रकमांचे बँकेसोबत ताळमेळ घेवून तफावतीच्या रकमा निश्चित करणे आवश्यक आहे.

मनपा, अमरावतीचे स्थानिक संस्था कर विभागाचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणात स्थानिक संस्था कराची रक्कम रु.71,65,34,776/- एवढी रक्कम प्राप्त झाल्याचे कळविले आहे. याबाबत ई-मेल द्वारे प्राप्त 146 पृष्ठ एलबीटी विवरणपत्राची तपासणी केली असता एकूण बेरीज **रु.71,60,85,600/-** एवढी येते. तसेच रोख पुस्तकावरुन मनपा निधीत जमा झालेली रक्कम **रु.79,73,36,436/-** एवढी येते. यावरुन विभागाने सादर केलेली स्थानिक संस्था कराची रक्कम व रोखपुस्तकातील जमा रकमा यात **रु.8,08,01,660/-** एवढी तफावत दिसून येते.

ई-मेल द्वारे प्राप्त स्थानिक संस्था कराचे विवरणपत्राची आकडेवारी, विभागाने सादर केलेली आकडेवारी तसेच रोखपुस्तकातील जमा रकमांची आकडेवारी यात बरीच तफावत असल्यामुळे स्थानिक संस्था कराच्या प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या रकमांची अचूकता तपासता आली नाही. सदर रकमांचा बँकेच्या खात्यांशी ताळमेळ घेवून तफावतीच्या रकमा निश्चित करणे आवश्यक आहे.

मनपाचे स्थानिक संस्था कराचे बँक खात्यांची तपासणी केली असता बँक खात्यात दिनांक 31.3.2015 रोजी खोलील विवरणाप्रमाणे शिल्लक दिसून आली असून त्यामध्ये बरीच तफावत आढळून आली.

(रक्कम रुपयात)

अ.क्र.	बँकेचे नांव	खाते क्रमांक	दि.31.3.2015 अखेरची शिल्लक
1	अभिनंदन बँक, अमरावती	01021001683	3,99,765.50
2	आयसीआयसीआय बँक, अमरावती	042805001488	5,08,506.19
3	बँक ऑफ इंडिया, अमरावती	967510110004735	5,76,425.85
4	शामराव विठ्ठल को -ऑ-बँक लि . अमरावती	111904180000015	5,64,875.05
5	कॉसमॉस बँक, अमरावती	103100101038	10,41,592.23

6	ॲक्सीस बँक, अमरावती	912010045753973	38,18,622.16
7	सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, अमरावती	3187458921	11,34,191.63
8	बँक ऑफ महाराष्ट्र, अमरावती	60100924679	8,16,526.26
9	पंजाब नॅशनल बँक, अमरावती	0016002101004760	14,26,446.57
		एकूण	**102,86,951.44**

याबाबत अर्धसमास पत्र क्र.129, दिनांक 16.04.2018 नुसार अनुपालन मागविले असता विभागाने दिनांक 19.4.2018 रोजी उत्तर सादर केले असून त्याप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 129)

29 भाडेपट्टीने दिलेल्या दुकान, गाळेधारकाकडून विलंबाने वसूल केलेल्या थकबाकीच्या रकमेवर शास्तीची आकारणी न केल्यामुळे मनपाचे रु. 70123/- चे नुकसान होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 70123.00/-

गाळेधारकाकडून विलंबाने वसूल केलेल्या थकबाकीपोटी रकमेवर शास्तीची आकारणी न केल्यामुळे मनपाचे रु.70123/- चे नुकसान झाले आहे.

मनपाने दुकानगाळे भाडेपट्टीने दिलेल्या भोगवटादाराकडून स्थायी समितीने वेळोवेळी ठरविलेल्या भाडेची आकारणी करून वसूल करणे गरजचे आहे. विलंबाने वसूल करण्यात आलेल्या भाडेपट्टीच्या थकीत रकमेवर मनपाचे महसूल वाढविण्याकरिता प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी मासिक 2 टक्के इतकी रक्कम मालमत्ता कराच्या तरतुदीप्रमाणे शास्ती म्हणून वसूल करणे आवश्यक आहे. तथापि, विलंबाने भरणा करण्यात आलेल्या थकीत रकमेवर शास्ती आकारणी करण्याची तरतूद नसल्याचे संबंधिताने मौखिकरित्या कळविले व बाजार विभागांतर्गत दुकाने, गाळे व ओटे इत्यादीचे मासिक भाडे प्रत्येक महिन्यात जमा न करता एकत्रितपणे मार्च अखेरीस अथवा वर्षातील अन्य महिन्यास एकमुश्त भरणा करण्यात येत असल्याचे लेखापरीक्षणादरम्यान निदर्शनास आले. त्यानुषंगाने निर्माण झालेल्या थकबाकीच्या विलंबाने जमेच्या प्रकरणी शास्तीची आकारणी केल्याचे आढळत नाही व शास्ती वसूल करत नसल्याचेही विभागाने मौखिकरित्या

कळविले. त्यामुळे मनपा अशा महसुलापासून वंचित असल्याचे दिसून येते.

उदाहरणादाखल पुढील प्रकरणे दर्शविण्यात येत आहेत –

दुकानाचे ठिकाण	दुकान क्र.	वसूलीची रक्कम (रु.)			मार्च 2015 अखेर भाडेपट्टीची रक्कम विलंबाने भरणा केलेले एकूण महिने		वसूल न केलेली शास्तीची रक्कम (रु.) प्रतिमाह 2% प्रमाणे		
		चालू	थकीत	एकूण	चालू	थकीत	चालू	थकीत	एकूण
महात्मा गांधी संकुल	17	11029	5252	16281	11	33	2426	3466	5892
	29	6958	6627	13585	11	23	1531	3048	4579
संत गाडगे बाबा संकुल	1	16140	0	16140	11	0	3550	0	3550
	4	16668	0	16668	11	0	3667	0	3667
प्रशासकीय इमारत संकल	04	25284	0	25284	11	0	5563	0	5563
	सी.एल.खत्री पहिला माळा	67400	0	67400	14	0	18872	0	18872
	सी.एल.खत्री दुसरा माळा	100000	0	100000	14	0	28000	0	28000
विलंबापोटी एकूण शास्तीची रक्कम रु.									70123

वरीलप्रमाणे एकूण रु.70123/- संबधिताकडून वसूल करून मनपा निधीमध्ये जमा होणे आवश्यक आहे. याचप्रकारे अन्य प्रकरणे तपासून शास्ती वसूल करावी.

यासंदर्भात जारी केलेल्या अर्धसमासातील वरील मुद्याबाबत खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DRAFT

DLFSPPM8501 (Ref No : 21)

31 आयुर्विमा महामंडळाकडून घेतलेल्या कर्जाची हमी शुल्क रक्कम तसेच त्यावरील व्याज व दंडणीय व्याजाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब

सन 1996-97 मध्ये रु. 4365 लक्षची अमरावती पाणीपुरवठा योजना टप्पा-2 मंजूर करण्यात आली. या योजनेकरीता आयुर्विमा महामंडळाकडून रु.1204.53 लक्ष व खुल्या बाजारातील रु.922.37 लक्ष असे एकूण रु. 2126 लक्ष उभारलेल्या कर्जाकरीता शासनाने घेतलेल्या हमी बाबतची परतफेड अमरावती महानगरपालिकेने विहित मुदतीत न केल्याने फार मोठया प्रमाणावर दंडनिय व्याज अदा करावे लागले. आयुर्विमा व खुल्या बाजारातील कर्ज तसेच शासन हमी शुल्क परतफेडीसाठी मनपाच्या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात आली नाही.

अमरावती पाणीपुरवठा योजना टप्पा-2 च्या सुधारित वित्तीय आकृत्तीबंधास महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शुध्दीपत्रक बैठक क्र.2005/प्र.क्र.-1/पापु दि.24.11.2005 नुसार मान्यता प्रदान केलेली असून या योजनेचा सुधारित वित्तीय आकृत्तीबंध खालीलप्रमाणे-

6)	शासकीय अनुदान (23.33%)	रु. 1018.35 लक्ष
7)	कर्ज (76.67%)	
	अ. आर्युविमा	रु.1204.53 लक्ष
	ब. खुल्या बाजारातील कर्ज	रु.922.37 लक्ष
	क. महापालिकेमार्फत विदर्भ वैधानिक विकास मडंळाकडून	रु.500.00 लक्ष
	ड. महाराष्ट्र जिवन प्राधिकरणमार्फत	रु.719.75 लक्ष
योजनेची एकुण ढोबळ किंमत		रु.4365.00 लक्ष

यापैकी आयुर्विमा महामंडळाकडून रु.1204.53 लक्ष व खुल्या बाजारातील रु.922.37 लक्ष असे एकूण 2126 लक्ष उभारलेल्या कर्जाकरीता शासनाने घेतलेल्या हमीबाबतची परतफेड अमरावती महानगरपालिकेने विहीत मुदतील न केल्याने व त्याकरीता परतफेडीसाठी मनपाचे अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद न केल्याने कर्जावर फार मोठया प्रमाणावर व्याज तसेच दंडनिय व्याज अदा करावे लागले. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 112 कर्ज निवारण निधी उभारुन त्यात शासन कर्ज परतफेडीकरीता अर्थसंकल्पात तरतूद करणेबाबत नमूद आहे. परंतु मनपाने अर्थसंकल्पात कर्ज परतफेडीकरीता पुरेशी तरतूद न केल्याने थकबाकीची परतफेड, व्याज तसेच दंडनिय व्याजात अगणिक वाढ होत आहे. अर्थसंकल्पात केलेली तरतूद खालीलप्रमाणे-

आर्थिक वर्ष	अर्थसंकल्पात केलेली तरतूद (रु. लाखात)
2008-09	5 लक्ष
2009-10	निरंक
2010-11	निरंक
2011-12	निरंक
2012-13	निरंक
2013-14	निरंक
2014-15	निरंक

महानगरपालिका, अमरावती यांनी कक्ष अधिकारी नगर विकास मुंबई यांना लिहिलेल पत्र क्र.अमनपा/मुलेअधि/लेखा218/2016 दि.17.02.2016 चे विवरण पत्रानुसार आयुर्विमा मंडळाकडून घेतलल्या कर्जाची पुर्ण परतफेड करण्यात आली असून महापालिकेकडे काही घेणे नाही असे कळविले आहे. तर महाराष्ट्र जीवण प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र.मजीप्रा/वित्त-1/हमीशुल्क नोटीस/29/ 2017-18 दि.29.03.2017 शासन हमी शुल्क रु.28019904/- व दंडनीय व्याज रु.54654399/- असे एकूण रु.82674303/- ची थकबाकी असल्याचे महानगरपालिका अमरावतीला कळविले आहे.

महानगरपालिका अमरावतीने आयुर्विमा महामंडळाकडून घेतलेल्या कर्जाची नियमित परतफेड न केल्याने शासनाचे नगरपरिषद प्रशासन संचालयाने 12 व्या व 13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार मनपास देय असलेला निधी परस्पर जीवण प्राधिकरणकडे वळता करुन आयुर्विमा महामंडळाकडे कर्जाची परतफेड करण्यासाठी सुर्पुद केला आहे. मनपा अमरावतीचे कक्ष अधिकारी नगर विकास विभाग मुंबई यांना लिहिलेले पत्र दि.10.03.2014 नुसार आयुर्विमा मंडळाकडून रु. 1205 लक्ष एवढे कर्ज घेतल्याचे नमुद असून कर्जाचे परतफेडीचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

शासन निर्णय क्र.व दिनांक	कर्जाची रक्कम (रु. लक्ष)	मनपाने कर्जाची परतफेड केलेली रक्कम व शासनाने परस्पर वळती केलेली रक्कम	रक्कम (रु. लक्ष)
शा.नि.क्र.पानुयो-1096/1475/प्र.क्र.179/पापु-19 दिनांक 16.11.1996	रु. 1205	1. क्र.मजिप्रा/वित्त-2/आ.कर्ज/परतफेड नोटीस/600/02दि.31.10.2002 धनादेश क्र.151143 दि.18.10.2003 2. मजिप्रा पत्र क्र.तांशा/1420 दि.30.07.2004 3. आ.क्र.नपप्रसं/तेविआ पहिला हप्ता/2010-11/2010/कक्ष-11 दि.29.12.2010 4. आ.क्र.नपप्रसं/तबाविआ/2008-09 दुसरा हप्ता/2010 दि.22.01..2010 5. शा.नि. क्र.बाविआ-2010/प्र.क्र.62/वि-4 दिनांक 26.03.2010	रु.150 रु.292 रु.258 रु. 71 रु. 71 रु. 70

		6. शा.नि.क्र.जीईएन-2010/प्रक्र 131/नवि-16 दिनांक 24.02.2011 7. शा.नि.क्र.तेविआ-2011/प्रक्र-50/नवि-4 दिनांक 25.03.2011	रु.252
एकूण	रु. 1205		रु.1164

2 महानगरपालिका, अमरावतीने पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवण प्राधिकरण, अमरावतीकडे पाणीपुरवठा योजनेच्या संपूर्ण मालमत्तेसह हस्तातंरीत केली असून अमरावती शहरातील नागरिक/ संस्था/व्यावसायिक यांना पाणीपुरवठा करण्याची जबाबदारीसुध्दा जीवण प्राधिकरणची आहे. त्यामूळे पाणीपट्टीसुध्दा जीवन प्राधिकरण अमरावती हेच वसुल करीत आहे. पाणीपुरवठा योजनेपासून होणारे उत्पन्न जीवण प्राधिकरण घेत असून अमरावती शहराच्या टप्पा-2 साठी आर्युविमा महामंडळाकडून घेतलेल्या कर्ज परतफेडीची जबाबदारीसुध्दा जीवण प्राधिकरणकडे सोपविणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही न झाल्याने महानगरपालिकेवर फार मोठया प्रमाणात दायित्वाचा भार पडला आहे.

DATDUBM6401 (Ref No : 06)

33 शहरातील अनाधिकृत मोबाईल टॉवर्समुळे अंदाजे रु. 2. 27 कोटी एवढे मनपाचा महसुल, वाढीव मालमत्ता कर तसेच पर्यावरणविषयक हानी होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :296 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 22698240.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 22698240.00/-

स्थायी समिती ठराव क्रमांक 152, दि. 13.02.2015 च्या कार्यवृत्तातील उल्लेखानुसार मनपा हद्दीत ठरावाचे दिवशी म्हणजेच 2014-15 मध्ये 152 पैकी 128 अनाधिकृत मोबाईल टॉवर्स अस्तित्वात होते. 2015-16 मध्ये आकारण्यात आलेल्या एका टॉवर वरील रु. 1.77 लाख एवढे शुल्क गृहीत धरल्यास मनपा रु. 2.27 कोटी महसुलापासून वंचित राहिली आहे असे दिसते. तसेच एकूण 152 टॉवर्स वर मालमत्ता कराची आकारणी व वसुली करण्यात आली नाही असेही दिसून येते.

मनपा अमरावती क्षेत्रात दूरसंचार दळणवळणासाठी दूरसंचार कंपन्यांकडून भूखंडावर किवां खाजगी इमारतीवर मोबाईल टावर व त्यासाठी केबीन बांधण्यात येतात. सदरची बाब 'बांधकाम' विषयांतर्गत

असल्याने MRTP Act 1966 मधील तरतुदीनुसार मनपाच्या नगररचना विभागाकडून सर्व अटीची पूर्तता होत असल्यास विविध शुल्क आकारून बांधकाम परवानगी दिल्यानंतर बांधकामाची पुढील कार्यवाही होणे अभिप्रेत आहे.

स्थायी समितीच्या क्र. 152 दि. 13.02.2015 या मोबोईल टॉवर नियमितीकरणविषयक ठरावाच्या कार्यवृत्तांनुसार शहरात 152 मोबाईल टॉवर्स अस्तित्वात असून त्यापैकी केवळ 24 टॉवर्सना मनपाने परवानगी दिली आहे.

प्रचलित धोरणानुसार मोबाईल टॉवर्स परवानगीपोटी मनपास पुढील विविध शुल्कांद्वारे महसूल प्राप्त होतो. (उदा. अर्ज क्र. 29 दि. 22.10.2014 व परवानगी 2015-16)

मनपाकडील कर व शुल्क :

अनामत रक्कम (परतावायोग्य)	-	2440
विकास शुल्क	-	3130
भुयारी गटार अधिभार	-	975
स्थानिक संस्था कर (एल बी टी)	-	3255
बांधकाम कामगार कल्याण उपकर	-	5530

राज्य शासनाकडील कर :

अग्निशमन सेवा शुल्क	-	31000
छाननी फी	-	1000
प्रशासकीय शुल्क/ प्रीमियम	-	30000
शास्ती	-	100000
		==========
	एकूण रु.	**177330**

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :

1) मनपाच्या नगररचना विभागाकडून प्राप्त पत्रानुसार (खुलासा) 2014-15 या वर्षात मोबाईल टॉवर्स परवानगी दिलेल्या प्रकरणांची संख्या 'निरंक' आहे. उपलब्ध केलेल्या परवानगीच्या नियंत्रण नोंदवहीमध्ये 2014-15 मध्ये व त्यापूर्वी परवानगी दिल्याचे प्रकरणाची नोंद नसून त्यामध्ये त्या वर्षात प्राप्त अर्जाची नोंद आढळून येते. असे असतांना स्थायी समितीच्या उपरोल्लेखित ठरावात 24 परवानगीप्राप्त टॉवर्स असल्याची नोंद असल्याने मनपा कडील माहितीमध्ये विसंगती दिसून येते.

2) मोबाईल टॉवर्सना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 मधील प्रकरण 4 नियम 44,45 नुसार विकास (DEVELOPMENT) या संज्ञेखाली (प्रकरण 1, नियम 2, (7)) परवानगी देण्यात येते. मनपा अमरावतीच्या क्षेत्रात वरील ठरावानुसार दि. 13.02.2015 रोजी एकूण 128 मोबाईल टावर्स अनधिकृतपणे कार्यरत असल्याने महाराष्ट्र मनपा अधिनियमचे कलम 478 नुसार ते अनधिकृत

बांधकाम गृहीत धरून आवश्यक कार्यवाही होणे आवश्यक होते.

परंतु नगररचना विभागाने यावर कोणतीही दंडात्मक कार्यवाही केल्याचे दिसत नाही. सदर टॉवर्स पुढील कालावधीत थकीत व दंडात्मक शुल्काचा वसुलीसह नियमित झाले किंवा कसे या संदर्भातही विभागाकडून खुलासा प्राप्त झाला नाही. त्यामुळे मनपाचे पुढील प्रमाणे संभाव्य हानी झाली आहे.

1) **अत्यावश्यक शुल्काची हानी :**

अनाधिकृत टॉवर्सची संख्या - 128

वर उल्लेखिल्याप्रमाणे एका टॉवर पोटी अंदाजे प्राप्त उत्पन्न - रु. 1,77,330 /-

याप्रमाणे एकूण अनधिकृत टॉवर्सपोटी झालेले महसुलाचे संभाव्य नुकसान - रु. 2,26,98,240 /-

2) पर्यावरणविषयक हानी - नगर विकास विभाग अधिसूचना क्रमाक TPS-1810/1975/CR - नविन-65/12/DP/UD-13 दि. 04.03.2014 मधील अटीशर्तीनुसार पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 प्रमाणे प्रदूषण संदर्भातील अटी, नाहरकत प्रमाणपत्र यांची वरील अनधिकृत टॉवर्सच्या प्रकरणात पूर्तता होत नसल्यास जनतेच्या आरोग्याचे नुकसान संभवते. तसेच लागू असलेल्या शासकीय शुल्काचेही नुकसान संभवते.

3) वाढीव मालमत्ता कराचे नुकसान - महाराष्ट्र मनपा अधिनियमाचे कलम 128 अ नुसार भूखंड किंवा ईमारतीवरील मोबाईल टॉवर्सची उभारणी मालमत्ता करास पात्र आहे, उपलब्ध नोंदीनुसार शहरात 2014-15 मध्ये अधिकृत व अनधिकृत असे एकूण 152 टावर्स अस्तित्वात असल्याने त्यांचेवर मालमत्ता कराची आकारणी करणे आवश्यक होते. अर्धसमास पत्र क्रमांक 120, दि.06.04.2018 च्या अनुषंगाने कर विभागाकडून खुलासा प्राप्त झाला नाही, त्यामुळे त्याप्रमाणे आकारणी योग्य कराची वसुली न झाल्याचे शक्यता नाकारता येत नाही. परिणामी, मनपा महसुलाचे नुकसान संभवते.

DATABWM6901 (Ref No : 120)

34 श्रीमती उर्मिला अटाळकर सेवानिवृत्त कनिष्ठ लिपीक यांना सेवेत सामावून घेताना आवश्यक असणा-या प्रमाणपत्राची पुर्तता न करता वरिष्ठ पदावर सेवेत सामावून घेणे व इतर अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 05

लेखा शीर्ष :79 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

महानगरपालिका, अमरावती आदेश क्र. अमनपा/उपा/साप्रवि/95 दि.3.06.1995 तसेच शासन निर्णय क्र.एएसी/3094/1031/94 दि. 29 जुलै 1994 व शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.अनुकंपा/1093/2335/प्रक्र 90/93 आठ दि.26.10.1994 च्या तरतूदीनुसार मनपा प्रशासनाने दिनांक

10.06.1995 चे नियुक्ती आदेशानुसार श्रीमती उर्मिला अटाळकर यांची नालाकुली पदावर नियुक्ती केली. संबंधीत कर्मचारी विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्याचे सबबीवर वर्ग-3 चे पदावर आवश्यक प्रमाणपत्र विहित कालावधीत प्राप्त करुन न घेता नियमबाह्यपणे सेवेत कायम ठेवण्यात आल्याची अनियमितता निदर्शनास आली.

श्रीमती उर्मिला अटाळकर यांची नियुक्ती मनपा आदेश दि.10.06.1995 नुसार नालाकुली पदावर करण्यात आली. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 38 व 45 तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. आवेवा-1009/प्र.क्र. 87/09/ आद दिनांक 03.07.2009 नुसार कार्यवाही न करणे, कर्मचा-यांची वैद्यकीय तपासणी झाल्याची नोंद सेवापुस्तकात न घेणे, कर्मचा-यांचे चारित्र्याबाबत पोलीस विभागाकडून पडताळणी केलेल्या अहवालाची नोंद सेवापुस्तकात नसणे, जात वैधता प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात न घेणे तसेच जात वैधता प्रमाणपत्राशिवाय पदोन्नतीचा लाभ देणे, एतदर्थ मंडळाच्या मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे अथव अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळणे याबाबतची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आल्या नाही.

महानगरपालिका, अमरावती प्रशासनाने श्रीमती उर्मिला अटाळकर, नालाकुली (वर्ग-ड) हया विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त करीत असल्याचे आदेशात नमूद करुन त्यांना वेतनश्रेणी रु.2550-55-2660-60-3200 मधून वेतनश्रेणी रु.3050-75-3900-80-4590 या वेतनश्रेणीत वर्ग-क चे कनिष्ठ लिपीक पदावर दि.23.08.1996 पासून सामावून घेतले. संबंधीत कर्मचा-यास वरचे पदावर सामावून घेण्यात आल्याने वरील नियुक्तीसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हते व्यतिरिक्त अन्य सर्वसाधारण अटी व शर्तीची पुर्तता होप आवश्यक असतांना पुढील त्रृटया आढळून आल्यात-

1. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक सीबीसी-10/2010/प्र.क्र.590/मावक-5 दिनांक 8 जुन 2011 नुसार शासकीय व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी यांना आरक्षणाचा लाभ घेतलेल्या व घेवू इच्छिणा-यांना जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक असून याबाबतची नोंद संबंधीत कर्मचा-यांचे सेवापुस्तकात घेणे आवश्यक असतांना अशा प्रकराची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही.

2. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.मभाप-1002/प्रक्र-38/02/20ब दि.8.05.2003 तसेच सामान्य प्रशासन विभाग दि. 30.12.1987, दि.7.02.2001 व दि.1.01.1993 नुसार आदेश, अधिसुचना व परिपत्रक निर्गमित केले असून एतदर्थ मंडळाच्या मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळणे याबाबतचे संबंधीत कार्यालयाचे नियुक्ती प्राधिका-याने आदेश काढून सेवापुस्तकात तशी नोंद घेणे आवश्यक आहे. ज्या कर्मचा-यांनी एतदर्थ मंडळाच्या मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण केली नाही अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नाही, अशा कर्मचा-यांच्या वेतनवाढी थांबविण्यात याव्यात, अशी तरतूद असतांनासुध्दा तशी कार्यवाही प्रशासनाकडून करण्यात आली नाही.

3. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवानिवृत्ती वेतन) नियम 1982 चे नियम 63 नुसार सेवानिवृत्त होणा-या

कर्मचा-यांचे सेवापुस्तकात घ्यावयाच्या आवश्यक नोंदी तसेच वेतननिश्चितीची पडताळणी लेखापरीक्षा विभागाकडून करुन सेवानिवृत्ती प्रकरण तयार करण्यात येते. सेवापुस्तकातील नोंदी अद्यावत करणे तसेच वेतननिश्चिती बरोबर असल्याची खात्री करुनच सेवानिवृत्ती वेतनाचे लाभ देणे नियमसंगत आहे. परंतु सामान्य प्रशासन विभागाकडून योग्य ती पडताळणी न करता सेवानिवृत्तीचे लाभ अदा करण्यात आले.

4. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 16 नुसार कर्मचा-याची वैद्यकीय दृष्टया तपासणी झाली असून कर्मचारी सेवेस पात्र आहे असे प्रमाणपत्र वैद्यकीय अधिका-याने सादर केल्यानंतर त्याविषयची नोंद सेवापुस्तकात घेणे आवश्यक आहे. परंतु संबंधीत कर्मचा-यांची वैद्यकीय तपासणी झाली असल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही.

5. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 चे नियम 40 नुसार तसेच नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण 2007/पडताळणी/नवि-26 दि.21.11.2007 नुसार कर्मचा-यांची पोलीस विभागाकडून चारित्र्याची पडताळणी करुन घेणे आवश्यक असून संबंधीत कर्मचा-यांचे सेवापुस्तकात चारित्र्याबाबत पोलीस विभागाकडून पडताळणी केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात नाही.

उपरोक्त प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.103 दि.3.04.2018 नुसार खुलासा करण्यास सुचविले होते. परंतु आक्षेप लिहिस्तोवर खुलासा सादर न केल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 103)

35 दैनदिन साफसफाईच्या कामाला मुदतवाढ देणे तसेच विहित मुदतीत नविन निविदा प्रक्रिया न राबविणे व सेवा शुल्काचे प्रदानातील अनियमिततेबाबत..

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :147 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 89401030.00 /-

महानगरपालिका, अमरावती शहराच्या दैनदिन साफसफाईचे कामाकरीता नविन निविदा प्रक्रिय न करता सन 2012-13 च्या मंजूर केलेल्या जुन्याच सफाई कंत्राटदारांना दिनांक 31.10.2014 पर्यंत मुदतवाढ देण्याची अनियमितता घडून आली. तसेच शहराच्या दैनदिन साफसफाईकरीता एकाच कंत्राटदाराला काम न देता अमरावती शहरातील एकूण 43 प्रभागासाठी वेगवेगळया सफाई कंत्राटदारांना काम सोपविण्यात आले.

सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान मनपा, अमरावतीच्या स्वच्छता विभागातील प्राप्त अभिलेख व निवडक देयकाची पडताळणी केली असता अमरावती शहरातील एकूण 43 प्रभागातील दैनदिन साफसफाईच्या कामाकरीता नविन निविदा प्रक्रिया न राबवता जुन्याच कंत्राटदाराला नियमबाहय दि.31.10.2014 पर्यंत मुदतवाढ दिली तसेच नविन निविदा प्रक्रिया राबवितांना ब-याच अनियमितता आढळून आल्या. याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे.

1.दैनदिन साफसफाईच्या सन 2012-13 करीता मंजूर करण्यात आलेल्या निविदांची मुदत दि. 31.08.2013 ला संपुष्टात आली असल्याने मुदत संपण्यापुर्वीच स्वच्छता विभागाचे विभाग प्रमुखाने नियमानुसार नविन निविदा प्रक्रिया कार्यवाही करणे अपेक्षित होते. परंतु नविन निविदा प्रक्रियेची कार्यवाही विवित मुदतीपुर्वी सुरू न केल्याने जुन्याच सफाई कंत्राटदाराला काम सुरू ठेवण्यास मुभा दिली. मनपा स्थायी समिती ठराव क्र.119 दि. 31.08.2013 नुसार दि.1.09.2013 ते 31.10.2014 पर्यंत मुदत देण्यात आली. नियमानुसार अशी मुदतवाढ एकदाच जास्तीत जास्त सहा महिने कालावधीसाठी देता येते. एक वर्षाची मुदतवाढ दिल्याने दि. 2 जाने.1992 च्या शासन निर्देशाचे उलंघ्घन झाले.

2. सन 2014-15 चे कालावधीकरीता शहरातील एकूण 43 प्रभागाकरीता दैनदिन साफसफाईकरीता सफाई कामगारांच्या प्रभागनिहाय संख्याबळानुसार निविदेचे दर निश्चिती करण्यासाठी कामगार आयुक्त मुंबई यांचे परिपत्रक 5 फेब्रूवारी 2014 नुसार क्र. ग्रा.वि./किवेअ/वि.भ./2014-1कार्या-10 किमान वेतन अधिनियम 1948 नुसार अनुसूचीत उद्योगातील कामगाराकरीता विशेष वेतन भत्याचे दर दि. 1.01.2014 ते 30.6.2014 कालावधीकरीता खालीलप्रमाणे-

अ.क्र. 49 नुसार साफसफाई मेहतर कामधंदा रु.2593.50/- प्रतिमहिना

सहाय्यक कामगार आयुक्त अमरावती यांचे पत्र क्र.सकाआ/802/2014 दि. 24.04.2014 नुसार साफसफाई कामगाराचे मुळ वेतन (पुर्ण वेळ काम) रु.4450/- नुसार देय आहे. त्याप्रमाणे प्रतीकामगार मुळ वेतन रु.4450/- + भत्ता रु.2593.50/- असे एकूण रु.7043.50 प्रतीमहिना परंतु महिण्यातील कामाचे 26 दिवस विचारात घेता प्रती सफाई कामगार प्रती दिवस मजूरीचा दर रु.270.90 प्रमाणे विचारात घेवून मनपाने प्रभागातील कामगार संख्येनुसार खालीलप्रमाणे निविदा दर निश्चिती केले.

24 सफाई कामगार रु. 246049/-
29 सफाई कामगार रु. 295330/-
34 सफाई कामगार रु. 344556/-
39 सफाई कामगार रु. 393891/-

प्रभागनिहाय सफाई कामगारांची संख्या निश्चित करतांना कुठला आधार घेतला याबाबत निविदेत तसेच अभिलेख्यात उल्लेख केलेला नाही.

कामगार संख्या प्रभागनिहाय	मनपाने निश्चिती केलेले दर	कामगार आयुक्ताकडून प्राप्त दरानुसार दर	इतर करापोटी फरकाची रक्कम (2-3)
1	2	3	4
24 कामगार	रु.10252 X 24= रु.246049/-	रु.7043.50 X 24 = रु.169044/-	रु.77005/-

29 कामगार	रु.10184 X 29= रु.295330/-	रु.7043.50 X 29 = रु.204262/-	रु.91068/-
34 कामगार	रु.10134 X 34= रु.344556/-	रु.7043.50 X 34 = रु.239479/-	रु.105077/-
39 कामगार	रु.10099 X 39= रु.393891/-	रु.7043.50 X 39 = रु.274697/-	रु.119194/-

इतर करापोटी व सेवा शुल्कापोटी फार मोठया प्रमाणावर प्रदान होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे मनपाने निविदा मुल्य निश्चित करतांना सदरचे दर वाजवी असल्याची खबरदारी घेतली नसल्याचे दिसून येत नाही. महानगरपालिकेस सेवा पुरविण्यात आलेल्या कोणत्याही सेवा सेवाकर मुक्त आहे. असे असतांना 13% सेवाकर विचारात घेवून निश्चित केलेले मुल्य जादा दराने निश्चित केल्याचे दिसून येते. परिणामी मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे.

3. वाटाघाटीनंतर निश्चित केलेले दर हे नगम्य असल्याचे खालील विवरणावरुन दिसून येते.

(रक्कम रुपयात)

निविदाधाकाचे नाव व प्रभाग	कामगार संख्या	मनपाने निश्चित केलेले दर	निविदाधारकांने सादर केलेले दर	वाटाघाटीनंतर निश्चित केलेले दर
श्री नागरिक सेवा सह.संस्था प्रभाग-जवाहर गेट	39	393891	374999	374999
श्री विजय गंगन प्रभाग-शेगांव नाका	24	246049	244224	244224
श्री. विजय गंगन प्रभाग-महेन्द्र कॉलनी	24	246049	268556	246049
इसराजी महिला नाग. संस्था प्रभाग-मोरबाग	34	344556	350000	295330
बेरोजगार साईबाबा ना.सह.स. प्रभाग-रहेमतनगर	24	246049	325000	246049
सम्यक नाग.सेवा सह.संस्था प्रभाग-अंबिकानगर	24	246049	268558	246049
सम्यक नाग.सेवा सह.संस्था प्रभाग-भिमटेकडी	24	246049	268558	246049
सम्यक नाग.सेवा सह.संस्था प्रभाग-स्वामि विवेकानंद	24	246049	244444	244444
सिध्दीविनायक महिला सह.सं.प्रभाग-सोमवाबाजार	34	344556	306456	306458
वाल्मिकी सफाई काम. सह.सं.प्रभाग-वडरपूरा	24	246049	335000	246049
सु.बेरो.जगदंबा मरिमाता संस्था प्रभाग-पठाणपुरा	24	246049	300000	246049
सु.बेरो.जगदंबा मरिमाता	24	246049	222222	222222

DRAFT

संस्था प्रभाग-वडाळी				
श्री जगदंबा स्वय.सेवा.संस्था प्रभाग-साईनगर	24	246049	305000	246049

उपरोक्त विवरणावरुन असे निदर्शनास येते की, प्रशासनाने वाटाघाटी करतांना मनपाने निश्चित केलेल्या दरासोबत वाटाघाटी करावयाच्या असतांना निविदाधारकांच्या दरासोबत करण्यात आलेल्या असून कमी करण्यात आलेली रक्कम नगण्य आहे. तसेच काही कंत्राटदारांनी मनपाने निश्चित केलेल्या दरापेक्षाही कमी दराने निविदा सादर केलेल्या आहे.

4. मनपास प्राप्त झालेल्या निविदेच्या लिफाफा-1 व लिफाफा-2 वर उपआयुक्त सामान्य प्रशासन यांची स्वाक्षरी नाही. तसेच निविदा समितीतील सदस्यांच्या लिफाफ्यावर स्वाक्षरी नाही. त्यामुळे निविदा प्रक्रिया राबवतांना गोपनियता पाळल्याचे दिसून येत नाही.

5. सन 2014-15 चे वर्षाचे दैनदिन साफसफाईचे कंत्राटाचे कामास मनपा स्थायी समिती सभेने ठराव क्र.73 दिनांक 30.08.2014 नुसार मान्यता दिली. शहरातील एकूण 43 प्रभागापैकी केवळ 40 प्रभागासाठी फेरनिविदा काढण्यात आली. उर्वरित 3 प्रभागाकरीता (प्रभाक क्र.7 नवसारी, प्रभाग क्र.8 जमील कॉलनी व प्रभाग क्र.43 झिरी) फेरनिविदा कार्यवाही कार्यवाही करण्यात आली. फेरनिविदा प्रक्रियेमध्ये मंजूर निविदा धारकांना कार्यारंभ आदेश देतांना कार्यारंभ आदेश क्र. अमनपा/स्ववि / 424/2014 दि.31.10.2014 मध्ये दि.1.11.2014 ते 31.08.2014 असा कालावधी नमूद केला त्यामूळे दैनदिन साफसफाई कामाचा कालावधी निश्चित कोणता, याबाबतची खात्री होत नाही.

6. दि.19.08.2014 ला मंजूर केलेल्या निविदेनुसार युवा प्रहार स्वंयरोजगार नाग. सह. संस्था यांना प्रभाग क्र.14 एसआरपीएफ कँम्प चा कंत्राट दिला असून करारनामा करताना मुद्रांक रु.2000/-(मुद्रांक क्र.314758 रु.1000/- व मुद्रांक क्र.314757 रु.1000/-) दि. **12.11.2014** ला खरेदी केलेल्या मुद्रांकावर दि. **30.08.2014** ला करारनामा केलेला आहे. तसेच स्वच्छता विभागातील लिपीकाने दि. 30.12.2014 ला करारनाम्याबाबत टिपणी सादर केली असून उपायुक्त मनपा, अमरावती यांनी दि. 3.01.2015 ला करारनाम्यावर स्वाक्षरी केली आहे. अर्थात कंत्राटदार व मनपा यांचेत झालेला करारनामा विलंबाने केलाचे दिसून येते. याबाबत स्थायी समितीची करारनाम्यास मंजूरी नाही.

7. श्री. विजय बा. गंगन यांना प्रभाग क्र.9 महेन्द्र कॉलनी सन 2014-15 चा दैनिक साफसफाईचा कंत्राट मंजूर केला असून करारनामा दि. 30.08.2014 ला केलेला आहे. परंतु याकरीता रु.2000/- (मुद्रांक क्र. 314688 रु.1000/- व मुद्रांक क्र.314689 रु.1000/-) चे दि. 7.11.2014 ला खरेदी केलेले आहे. तसेच बेरोजगार क्षितीज नाग.सह. संस्था यांना प्रभाग क्र.17 फ्रेजरपुरा चा दैनदिन साफसफाईचा कंत्राट मंजूर केला असून याप्रकरणी करारनामा दि. 30.08.2014 ला केल्याचे नमूद असून त्याकरीता खरेदी केलेल मुद्रांक रु.2000/-(मुद्रांक क्र.314749 रु.1000/- व मुद्रांक क्र.314750 रु.1000/-) चे दि. 12.11.2014 ला खरेदी केलेले आहे. म्हणजेच कार्यारंभ आदेश निर्गमित केल्यानंतर करारनामा केल्याचे दिसून येते.

DRAFT

36 झोन क्र. 1 मधील कार्यक्षेत्रात येणा-या मालमत्तेचे करनिर्धारण तसेच खुल्या भुखंडावर आकारणी न केल्याने मनपाच्या होत असलेल्या हानीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :01 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम मधील प्रकरण 11 चे नियम 129 (क) (3) अन्वये महानगरपालिकेस दर पाच वर्षांनी महानगरपालिका हद्दितील संपुर्ण निवासी, व्यावसायिक व औद्योगिक मालमत्ता तसेच खुले भुखंड यांचे पुर्न: कर मुल्यांकण करणे आवश्यक आहे. महागरपालिका अमरावती क्षेत्रातील झोन क्र. 1 मधील मालमत्तेवर करण्यात आलेली कर आकारणीचे दर अल्प असल्याचे तसेच खुल्या भुखंडावर कराची आकारणी होत नसल्याचे लेखापरिक्षणादरम्यान आढळून आले. त्यामुळे मनपाच्या महसुलाची हानी होत असून सन 2002 पासून करनिर्धारण मुल्यात कुठलीही वाढ केलेली नाही. त्यामुळे मनपाच्या महसुलात वाढ न झाल्याने नागरी सोयी-सुविधासाठी निधी अपुरा पडत असल्याने विकास कामासाठी शासनाच्या निधीवर अवलंबून राहावे लागते. मनपाची आर्थिक स्थिती नाजूक असून महसुलात वाढ न करणे तसेच आस्थापना खर्चावर अंदाजे 70% पेक्षा जास्त होत असल्याने करनिर्धारण मुल्यात मागील 17 वर्षापासून वाढ न करणे हि गंभीर बाब आहे.

महानगरपालिका अमरावतीचे सन 2014-15 लेखापरिक्षणादरम्यान मनपा अंतर्गत झोन क्र. 1 मधील प्राप्त कराचे विवरणपत्र, करनिर्धारण प्रकरणे इत्यादीची पडताळणी केली असता 2002 पासून करनिर्धारण मुल्यात वाढ केली नसल्याचे निदर्शनास आले. तसेच झोन क्र. 1 मधील खुल्या भुखंडावर मालमत्ता कराची वसुलीच करण्यात येत नसल्याचे आढळून आले. त्यामुळे मनपाला आर्थिक समस्या भेडसावत असून पुरेशा निधी अभावी शहरातील विकास कामावर परिणाम होवून नागरिकांना नागरी सोयी सुविधापासून वचिंत राहावे लागत आहे.

मनपाने सन 2002 मध्ये करनिर्धारण तसेच मालमत्ता कराची आकारणी यासाठी निश्चित केलेल्या दरानेच मालमत्ताचे करनिर्धारण व मालमत्ता कराची वसुली खालील तक्त्यात नमूद दरानेच होत असल्याचे निदर्शनास आले. याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे.

1. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 127 अन्वये महानगरपालिका क्षेतातील खुल्या भुखंडाची महानगरपालिकामध्ये मालमत्ता नोंदवहीत नोंद करणे अनिवार्य आहे. परंतु बरेच भुखंडधारक त्यांच्या भुखंडाची नोंद महानगरपालिकेमध्ये न करता त्यावर बांधकाम करतात. परिणामी महानगरपालिकेच्या महसुलाची फार मोठया प्रमाणावर हानी होत आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सदर भुखंडाची खरेदी-विक्रीचे व्यवहार दुय्यम निबंधकाकडे होत असून अशा सर्व मालमत्ताची माहिती दुय्यम निबंधक, अमरावती यांचेकडून प्राप्त करुन संबंधीत भुखंडधारकास नोटीस बजावून खरेदी मुल्ल्यावर मालमत्ता कराची वसुली खरेदीचे

दिनांकापासून थकबाकीसह करणे आवश्यक आहे. तसेच खुल्या भुखंडावर बांधकामाची परवानगी देतांना मालमत्ता कराची संपूणी वसुली करुनच नविन बांधकामांना किंवा वाढीव बांधकामांना मंजूरी देणे अभिप्रेत आहे. परंतु अशी कार्यवाही मनपाच्या कर विभाग अथवा बांधकाम विभागाकडून होत असल्याचे दिसून येत नाही.

याप्रकरणी आयुक्त मनपा अमरावती यांचे अर्धशासकीय पत्र क्र.अमनपा/आयुक्त/स्वी.स./72/ 2000 दि.7.07.2000 नुसार सह जिल्हा निबंधक वर्ग-1 मुद्राक, अमरावती यांना खरेदी व्यवहाराची नोंद करतांना नोंदणीपूर्वी खरेदीदाराकडून भूखंड महानगरपालिकेकडे नोंद झाल्याच्या पावतीची मागणी करावी व भूखंड महानगरपालिकेकडे नोंद झाल्याचे प्रमाणपत्र जोपर्यंत खरेदी दस्तासोबत जोडत नाही. तोपर्यंत खरेदीपत्र नोंदणी करू नये असे कळविण्यात आले होते. परंतु याबाबत सह जिल्हा निबंधक, अमरावती यांचेकडून अमलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही.

याबाबत सहाय्यक संचालक नगर रचना अमरावती महानगरपालिका, अमरावती यांनी मा. आयुक्त यांचे दि.13.07.2000 चे आदेशान्वये दि. 1.04.2000 पासून खुल्या भुखंडावर खालील दराने कर आकारणी करण्याचे निर्देश दिले आहे.

भूखंड किमंतीच्या 6% दराने भाडेमूल्य वजा सुट 10% वगळून करयोग्य मूल्य निश्चित करून करयोग्य मूल्यावर 12% मालमत्ता कर, 1% वृक्षकर व 2% ते 6% शिक्षण कर तसेच वाणिज्यीक वापर असल्यास शिक्षण कर व वृक्ष कर दुप्पट आकारण्यात यावा, असे निर्देश असतांनासुध्दा त्यानुसार कार्यवाही होत नाही. परिणामी मनपाच्या महसुलाची हानी होत आहे.

2. आयुक्त महानगरपालिका, अमरावती यांचे दि. 14.02.2002 चे मंजूरीनुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम,1949 मधील कलम 99 अन्वये सन 2001-02 या वित्तीय वर्षाकरीता निश्चित केलेल्या दरानुसार मालमत्ता कराची वसुली करण्याबाबत निर्देश दिले असून त्यानंतर मालमत्ता कराच्या दरात वाढ झालेली नाही. मालमत्ता कराचे निश्चित केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

मनपा कर - सामान्य कर 30% (करयोग्य मुल्यावर)
वृक्ष कर 1% (करयोग्य मुल्यावर)
अग्निकर 2% (करयोग्य मुल्यावर)
पाणीपट्टी 10% (करयोग्य मुल्यावर)
रस्ते कर 4% निवासी व 8% गैरनिवासी मालमत्तेवर
(रु.15000/-वार्षिक करयोग्यव त्यापेक्षा जास्त करयोग्यमुल्य मालमत्तेवर असलेल्या मालमत्तेवर)

शासकीय कर - शिक्षण कर शासकीय नियमानुसार
रोजगार हमी योजना उपकर शासकीय नियमानुसार
मोठया निवासी इमारतीवर कर शासकीय नियमानुसार

अकृषक परवानगी प्राप्त खुल्या भुखंडावरील कराचे दर-
सामान्य कर 12% करयोग्य मुल्यावर
वृक्ष कर 1% करयोग्य मुल्यावर
शिक्षण कर शासकीय नियमानुसार

उपरोक्त दरानुसार खुल्या भुखंडावर कर आकारणी करावयाची असतांनासुध्दा मनपाच्या कर विभागाकडून कराची वसुली केली जात नाही, हि गंभीर बाब आहे.

DRAFT

3. सध्यस्थितीत मनपा क्षेत्रात निवासी, वाणिज्यीक, शासकीय, निमशासकीय अशा सुमारे 1,45,000 मालमत्तांची नोंद असून त्यातील ब-याच मालमत्ता यांचे करयोग्य मुल्य वाढण्याची शक्यता आहे. काही मालमत्तांवर कर आकारणी करण्यात आलेली आलेली नाही किंवा तर काही मालमत्तांमध्ये अतिरिक्त बांधकामास कर आकारणी करण्यात आलेली नाही. तसेच काही मालमत्तांचे वापरात बदल झाला असल्याने अशा सर्व बाबीचा विचार करुन संपुर्ण मालमत्तांचे नव्याने सर्वेक्षण करुन करयोग्य मुल्य काढणे आवश्यक आहे. महानगरपालिका याबाबत स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेवून पुढील आर्थिक वर्षात कलम 127 नुसार निर्दिष्ट केलेल्या करांपैकी जे कोणतेही कर बसविण्याचे ठरवेल ते कर पुढील आर्थिक वर्षात ज्या दरानी व ज्या मर्यादेपर्यत बसवण्यात येतील ते दर ती मर्यादा विचारात घेवून निश्चित करेल. म्हणजेच महानगरपालिकेने विहित कालावधीनंतर करनिर्धारण दरात वाढ करणे अभिप्रेत आहे. परंतु झोन क्र. 1 मधील निवासी, व्यावसायिक मालमत्तावर करण्यात येणारी आकारणी ही सन 2001 मध्ये निश्चित केलेल्या दराचे आधारे करण्यात येत आहे. मागील 17 वर्षापासून मालमत्ता कराच्या दरात वाढ करण्यात आली नाही. मनपाची आर्थिक स्थिती नाजूक असतांना महसुली उत्पन्नात वाढ करण्यासाठी प्रयत्न होत नसल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे मनपाच्या उर्वरित 4 झोन मध्येसुध्दा वर नमुद दराने कराची आकारणी करण्यात येत असून खुल्या भुखंडावर कर वसुल करण्यात येत नाही.

मालमत्ता करामध्ये सामान्य कर, अग्नीकर, पाणीपट्टीकर, वृक्षकर व पथकर इत्यादी वसुली करण्यात येत असून आकारण्यात आलेले दर फारच अल्प आहे. अमरावती शहराच्या सर्वांगीण विकास कामासाठी निधी अपुरा पडत असून नागरिकांना नागरी सोयीसुविधापासून वंचित राहावे लागत आहे. महसुली उत्पन्न कमी असल्याने मनपाला शासनाचे निधीवर पुर्णता अवलंबवून राहावे लागते.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.144 दि.19.04.2018 अन्वये माहिती व खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले होते. परंतु झोन कार्यालयाकडून माहिती व खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 144)

38 मनपाच्या नगर सचिव विभागाकडील चहापान खर्च, आकस्मिक खर्च, सादिल खर्च तसेच सदस्यांचे मानधन व वाहन भत्यावरील खर्चातील अनियमितता व अखिर्च् त निधीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 06

लेखा शीर्ष :88 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 21410000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 13211470.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3069397.00/-

मनपा अमरावती कार्यालयातंर्गत नगर सचिव विभागाकडील सन 2014-15 ची अनुदान नोंदवही व खर्च नोंदवहीची तपासणी केली असता नोंदवहीनुसार झालेला प्रत्यक्ष खर्च व मनपाच्या सन 2016-17 च्या

अर्थसंकल्पात सन 2014-15 मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च यात रु.30,69,397/- एवढया रकमेची तफावत आढळून आली. तसेच चहा व पाणी बॉटलच्या एकाच बिलाचे प्रदान वेगवेगळया लेखाशिर्षात खर्ची34 टाकण्यात आल्याने अनियमितता घडून आल्याचे निदर्शनास आले.

महानगरपालिका अमरावतीच्या सन 2014-15 लेखापरिक्षणादरम्यान अनुदान नोंदवही, खर्चाची नोंदवही तसेच निवडक देयकाची पडताळणी केली असता मंजूर तरतूदीपेक्षा जादाचा खर्च करणे, सन 2014-15 मध्ये प्रत्यक्षात झालेला नोंदवहीनुसार खर्च व सन 2016-17 चे अर्थसंकल्प पुस्तकात सन 2014-15 करीता नोंदविलेला प्रत्यक्ष खर्च यात तफावत आढळून आली. तसेच एकाच प्रकारचा खर्च वेगवेगळया लेखाशिर्षात खर्ची टाकण्याची अनियमितता लेखापरिक्षणादरम्यान निदर्शनास आली. याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे.

1. नगर सचिव विभागाने केलेल्या विविध लेखाशिर्षाखाली केलेली तरतूद, नोंदवहीत नोंदविलेला खर्च व प्रत्यक्षात झालेला खर्च यात तफावत असून याबाबतची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	खर्चाचा लेखाशिर्ष	2014-15 करीता मंजूर तरतूद	2016-17 चे अर्थ-संकल्प पुस्तका-नुसार प्रत्यक्ष खर्च	14-15 मधील नोंदवहीनुसार प्रत्यक्ष खर्च	शिल्लक तरतूद (3-5)
1	2	3	4	5	6
1	आकस्मिक खर्च	2500000	3015710	1116553	1383447
2	प्रवास खर्च व दौरे	500000	196350	272474	227526
3	सभेचा सादिल खर्च	300000	57620	218645	81355
4	अतिथी खर्च-महापौर	90000	56960	निरंक	90000
5	सदस्यांना मानधन व भत्ता	14000000	7735000	7735700	6264300
6	मा, महापौर निधी फी	20000	निरंक	10000	10000
7	नविन वाहन खरेदी	1000000	निरंक	निरंक	1000000
8	वाहन वैकल्पीक भत्ता	3000000	2149830	1914555	1085445
	एकूण	21410000	13211470	11267927	10142073

उपरोक्त विवरणानुसार मनपा, अमरावतीच्या सन 2016-17 चे अर्थसंकल्पात नगर सचित विभागाचा एकूण नमूद प्रत्यक्ष खर्च रु.13211470/- इतका दर्शविला असून नगर सचिव विभागाने लेखापरिक्षणासाठी सादर केलेल्या अनुदान नोंदवहीनुसार प्रत्यक्ष खर्च रु.1167927/- एवढा दर्शविला आहे. अनुदान नोंदवहीतील प्रत्यक्ष खर्चापेक्षा अर्थसंकल्प पुस्तकात नमूद केलेला प्रत्यक्ष खर्च रु.3069397/- (रु.13211470 वजा रु.11267927) ने जास्त आहे.

2. मनपा अमरावती कार्यालयातील नगर सचिव विभागाकरीता सन 2014-15 चे अर्थसंकल्पात लेखाशिर्ष 88 ते 95 अंतर्गत खर्चाकरीता एकूण रु.2,14,10,000/- एवढी तरतूद करण्यात आली होती. परंतु नगर सचिव विभागाकडील अनुदान व खर्च नोंदवहीनुसार प्रत्यक्षात रु. 1,12,67,927/- एवढाच खर्च झाला असल्याने

रु.1,01,42,073/- एवढी तरतूद शिल्लक असल्याचे आढळून आले.

3. सन 2014-15 चे अर्थसंकल्पात केलेली तरतूद व प्रत्यक्षात झालेल्या खर्चाची आकडेवारी यात फार मोठया प्रमाणावर तफावत आढळून आली. आकस्मिक खर्चासाठी रु.2500000/- एवढी तरतूद नमूद असून प्रत्यक्षात खर्च रु.3015710/- एवढा झाला आहे. मंजूर तरतूदीपेक्षा जास्त खर्च झाला आहे. नगर सचिव विभागाने खर्चासाठी अर्थसंकल्पात तरतूद करतांना खर्चाचा अंदाज घेवून तरतूद केली नसल्याचे स्पष्ट होते. रु.1,01,42,073/- एवढी तरतूद वर्षअखेर शिल्लक असल्याने अमरावती शहरातील नागरिकांना सोयी सवलती उपलब्ध करुन देण्याकरीता तरतूद अपुरी पडल्याने विकास कामावर परिणाम झाल्याचे दिसून येते.

4. लेखाशिर्ष 88 अंतर्गत आकस्मिक खर्चापोटी दि.25.09.2014 ला नगर सचिव यांचे नावांने रु.2500/- एवढी अग्रीम राशी अदा करण्यात आली असून प्रत्यक्षात रु.3500/- एवढा खर्च नोंदवहित खर्ची टाकण्यात आला.

5. विरोधी पक्षनेता कार्यालयासाठी चहा व पाणी बॉटलचे न्यु बजरंग टी स्टॉलचे देयक रु.7385/- दि.15.12.2014 रोजी लेखाशिर्ष (88)आकस्मिक खर्चात खर्ची टाकण्यात आले असून सभापती, स्थायी समिती यांचे सभेचे चहा व पाणी बॉटलचे न्यु बजरंग टी स्टॉलचे तेवढयाच रकमेचे म्हणजे रु.7385/- दि.15.12.2004 रोजी लेखाशिर्ष (90) सभेचा सादिल खर्च या शिर्षातंर्गत खर्ची टाकण्यात आले. एकाच पावतीवर दोनदा खर्च टाकल्याचे दिसून आले. विभागाने दुबार देयक नोंदवही ठेवलेली नाही.

6. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.एमबीओ-4685/1885/2सीआर 68-86 दि.25.07.1996 नुसार चहापाणी दरात बदल होत असल्याने दर ठरवून देण्यात आले नाही.

उपरोक्त प्रकरणी नगर सचिव विभागास अर्धसमास पत्र क्र.60 दि.26/02/2018 नुसार अभिलेख लेखापरिक्षणास सादर करण्यास सुचविले होते. परंतु अभिलेख लेखापरिक्षणास प्राप्त झाले नाही. आक्षेपित मुद्याच्या अनुषंगाने कार्यवाही करुन अनुपालन करावे.

DATDUBM6401 (Ref No : 60)

39 सन 2013 व 2014 च्या शीघ्र सिद्धगणकातील दराच्या तफावतीनुसार जमीनवापर मूल्याची अतिरिक्त रक्कम रु. 1.17 लाख वसूल न करणे व विशिष्ट हेतूसाठी प्राधिकृत नसलेल्या संस्थेस त्या हेतूसाठी भूखंड वाटप करणे बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :12 शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 802968.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 117100.00/-

शैक्षणिक हेतूसाठी प्राधिकृत नसलेल्या संस्थेस बालक मंदिरसाठी भूखंड वाटप करताना बाजारमूल्यातील तफावतीची (रु.1.17 लाख) आकारणी व वसुली न करणे, तसेच करारनाम्यातील अटीनुसार तीन वर्षाचे आत भूखंडाचा विकास केल्याचा पुरावा नसणे व तीन वर्षापुढे भाडेकरारास मुदतवाढ न घेणे या त्रुट्यामुळे भूखंडाचे वाटपाच्या प्रक्रियेत नियमबाह्यता झाल्याचे आढळून येते.

अमरावती मनपाचे क्षेत्रातील मंजूर अभिन्यासातील सार्वजनिक वापरातील खुल्या जागा मनपाने विविध संस्थाना व्यायमशाळा, बालक मंदिर चालविण्यायासाठी प्रथम 3 वर्षासाठी (उचित विकास केल्यास त्यापुढे 10 वर्षाकरिता भाडेपट्टीवर मुदतवाढीस पात्र) देण्यात आलेल्या आहेत. त्यासाठी संबंधित संस्थाकडून महानगरपालिकेने ठरविलेली रक्कम (नगर विकास विभाग शा.नि.क्रं. टीपीबी 4396/114/प्र.क्र89/96/नवी.11 दि. 10.06.1996 मधील परीच्छेद क्र. अ (3)) जमिनीच्या वापर मूल्याचे स्वरुपात वसूल केली आहे.

यापैकी एक प्रकरण पुढीलप्रमाणे आहे-

भूखंड क्र. 195, 196 व 197

मौजा – पेठ अमरावती, सर्व्हे क्रं. 33/3, 33/4, 33/5

संस्था – संकटमोचन हनुमान मंदिर ट्रस्ट, अमरावती

प्रयोजन – बालकमंदिराचे बांधकाम करणे व ते चालविणे

भूखंड वाटपास मान्यता - सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. 60, दि. 20.09.2013

करारनामा – दि 08.07.2014

<u>यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे –</u>

1) <u>रु. 1.17 लाखाच्या फरकाची वसुली न करणे -</u>

महाराष्ट्र मनपा अधिनियमाचे कलम 89 नुसार मनपाकडील मालमत्ता चालू बाजार मूल्यापेक्षा कमी नसेल अश्या दरानेच भाडेपट्टीवर देता येते. सदर प्रकरणात सर्वसाधारण सभेने दि. 20.09.2013 रोजी वाटपास मान्यता दिली असली तरी प्रत्यक्ष करारनामा दि. 08.07.2014 रोजी होऊन त्यापुढील 3 वर्षाकरीता भूखंडाचे वाटप झाले आहे. त्यामुळे 2014 मधील लागू बाजारदराच्या शीघ्र सिद्धगणकानुसार जमीनवापर मूल्याची परिगणना होणे आवश्यक होते. परंतु परंतु याप्रकरणी 2013 च्या दरानुसार आकारणी व वसुली करण्यात आली आहे.

<u>क्षेत्र – 334.57 चौ.मी.</u>

2014 बाजार दरानुसार जमिनीचे मूल्य = रु. 5500 x 334.57 = रु.18,40,135/-
जमीन वापर मूल्य 1840135 x 50% = रु. **9,20,068/-**
2013 बाजार दरानुसार जमिनीचे मूल्य = रु. 4800 x 334.57 = रु. 16,05,936/-
जमीन वापर मूल्य 16,05,936 x 50% = रु. **8,02,968/-**
==========
रु. **1,17,100/-**

सबब रु. 1,17,100/- एवढा महसूल कमी वसूल झाल्याने मनपाची हानी झाली आहे. याप्रमाणे झालेल्या अन्य प्रकरणांतील कमी वसुलीच्या प्रकरणांचा आढावा घेऊन उचित कार्यवाही करावी.

<u>2) करारनाम्याचे उल्लंघन होणे</u>

सदर प्रकरणातील करारनाम्यानुसार 3 वर्षाच्या आत म्हणजेच दि. 08.07.2014 ते दि. 07.07.2017 पर्यंत बालक मंदिराचे बांधकाम करणे आवश्यक होते, परंतु सदर नस्तीमध्ये बांधकामाचा आराखडा सादर करून रितसर परवानगी घेतल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे बांधकाम झाले असल्यास ते MRTP Act 1966 व NMC Act नुसार अनधिकृत ठरते.

याशिवाय 3 वर्षाचे आंत बांधकाम झाले असल्यास, पुढील 10 वर्षाकरिता भाडेपट्टीस मुदतवाढ देता येते. परंतु याप्रकरणात मुदतवाढ

दिल्याचीही नोंद नाही.त्यामुळे अनधिकृत बांधकाम भाडेपट्टीच्या कालावधी संपुष्टात येणे या अनियमितता शक्यता नाकारता येत नाही.

3)विश्वस्त व्यवस्थेचा हेतू शैक्षणिक नसणे

सहाय्यक धर्मदाय आयुक्त अमरावती यांचेकडून मंजूर असलेल्या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या नोंदणी साठीच्या उपलब्ध अर्जानुसार सदर संस्थेने घोषित केलेला विश्वस्थव्यवस्थेचा हेतू शैक्षणिक नसून धार्मिक असल्याचे दिसून येते. त्यामुळे बालकमंदिर चालविणे या शैक्षणिक प्रयोजनासाठी प्राधिकृत नसलेल्या संस्थेस त्याच हेतूसाठी भूखंड वाटप करणे नियमसंगत वाटत नाही. त्यामुळे मनपाने केलेल्या सदर भूखंड वाटप नियमबाह्य असल्याचे दिसून येते.

या संदर्भात मनपाकडून खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATABWM6901 (Ref No : 137)

42 बांधकाम परवानगी देताना भूखंडधारकाकडून प्राथमिक विकास खर्चापोटी रु. 90/- प्रती चौ.मी. ऐवजी रु.20/- प्रमाणे वसूल केल्याने रु. 2.72 लाखाच्या महसुलाची हानी होण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :336 मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 272084.00/-

अविकसित अभिन्यासाच्या विकासासाठी त्यामधील भूखंडावर बांधकामास परवानगी मागणाऱ्या भूखंडधारकांकडून रु.90/- या दराने 2006-2007 पासून शुल्क वसुली करणे आवश्यक असताना रु.90/- ऐवजी रु.20/- प्रमाणे वसुली होत अस ल्याने मनपा निधीची हानी झाली आहे. 2014-15 मधील निवडक 18 प्रकरणामध्ये अशी हानीची रक्कम रु. 2,72,084/- एवढी आहे.

अमरावती मनपाक्षेत्रातील विविध खाजगी अभिन्यासातील भूखंडावर बांधकामास परवानगी देताना त्या अभिन्यासाच्या प्राथमिक विकासापोटी भूखंडधारकाकडून विशिष्ट शुल्क आकारले जाते. या शुल्काच्या एकत्रित रक्कमेतून अभिन्यासामध्ये रस्ते, नाल्या व सी.डी. वर्क ची कामे करून नागरिकांना आवश्यक सोयी सुविधा पुरविण्याचे अपेक्षित असते.

अविकसित अभिन्यासाच्या विकासासाठी प्राथमिक विकास खर्चाचा रु. 20/- ऐवजी रु. 150/- हा निर्धारित केलेला दर मनपा सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. 382 , दि. 20.07.2006 अन्वये कमी करून रु.90/- प्रती चौ.मी. असा निश्चित करण्यात आल्यानंतर त्याप्रमाणे महसूल गोळा होणे अभिप्रेत होते.

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :-

मनपा अमरावतीमधील नगर रचना विभागाकडील बांधकाम परवानगीच्या प्रकरणाचे लेखापरिक्षण करताना बऱ्याच प्रकरणात रु.90/- ऐवजी रु. 20/- नुसार शुल्क वसुली केल्याचे आढळले आहे. सन 2014-2015

मध्ये एकूण 18 प्रकरणाना मंजुरी देण्यात आली असून संपूर्ण प्रकरणातील वसुलीच्या तफावतीची एकत्रित रक्कमेची आकडेवारी उपलब्ध नसली तरी निवडक प्रकरणाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे -

अनु. क्र.	बांधकाम परवानगी व आरंभ प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक	भूखंडाचे क्षेत्रफळ (चौ.मी.)	लागू असलेला दर	केलेल्या वसुलीचा दर	दरातील तफावत	तफावतीची / हानीची रक्कम
1	0233 - 29.05.2014	139.40	90/-	20/-	70/-	9758/-
2	0207 - 26.05.2014	226	90/-	40/-	50/-	11300/-
3	0223 - 28.05.2014	92.93	90/-	20/-	70/-	6505/-
4	0230 - 29.05.2014	139.43	90/-	00	90/-	12549/-
5	0209 - 20.05.2014	123.55	90/-	00	90/-	11119/-
6	0210 - 20.05.2014	147.70	90/-	20/	70/-	10339/-
7	0212 - 27.08.2014	305.16	90/-	20/-	70/-	21361/-
8	0216 - 16.05.2014	929	90/-	20/-	70/-	65030/-
9	0213 - 27.05.2014	83.61	90/-	20/-	70/-	5853/-
10	0222 - 28.05.2014	212	90-	20/-	70/-	14840/-
11	0239 - 30.05.2014	136	90/-	20/-	70/-	9520/-
12	0241 - 30.05.2014	146	90/-	20/-	70/-	10220/-
13	0242 - 31.05.2014	99	90/-	20/-	70/-	6930/-
14	0244 - 02.04.2014	190.13	90/-	20/-	70/-	13310/-
15	0246 - 02.04.2014	142.73	90/-	20/-	70/-	9991/-
16	0250 - 03.06.2014	167.28	90/-	20/-	70/-	11710/-
17	0227 - 29.05.2014	435	90/-	20/-	70/-	30450/-
18	0211 - 26.05.2014	226	90/-	40/-	50/-	11300/-
					एकूण	**2,72,084/-**

याप्रमाणे 2014-2015 मध्ये उपरोक्त विषयक 18 प्रकरणामध्ये रु. 2 ,72,084/- ची कमी वसुली झाल्यामुळे मनपा निधीचे नुकसान झाले आहे.

2006-2007 मध्ये रु. 20/- एवेजी रु. 150/- हा निर्धारित दर कमी करून अंतिमत: रु.90/- प्रती चौ.मी. असा निश्चित केला असताना 2014-2015 मध्ये सुध्दा रु.20/- प्रमाणेच शुल्काची वसूली होत असल्याने नगर रचना विभागाने सर्वसाधारण सभेच्या ठरावातील निर्देशाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे 2006-2007 ते 2014-2015 व त्यानंतरच्या कालावधीतील कमी दराच्या वसुलीमुळे हानीची रक्कम मनपाने निश्चित करून हानीची भरपाई होणे आवश्यक आहे.

DRAFT

43 मनपाच्या नुकसान भरपाईच्या रु. 240825/- पैकी रु. 140489/- एवढी रकम कर्मचाऱ्यांकडून वसूल न होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 0

लेखा शीर्ष :00 मनपानिधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 240825.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 140513.00/-

अमरावती मनपा उर्दू शाळा क्र.1, नूरनगर येथे संरक्षण भिंत बांधण्याची निविदा प्रक्रियेची मूळ नस्ती प्रलंबित ठेवल्यामुळे 2011-2012 मधील कामात अकारण वाढ झाल्यामुळे उपअभियंता, सहाय्यक अभियंता व टंकलेखक यांच्यावर जबाबदारी निश्चित करून रु. 240825/- च्या वसुलीचे आदेश देण्यात आले. सदरची वेतनातील वसुली डिसेंबर 2014 पासून करणे बंद असल्याने रु. 140513/- ची वसुली अद्याप झाली नाही.

अमरावती मनपा शाळा उर्दू क्र. 1, नूरनगर येथे संरक्षण भिंत बांधणेबाबतच्या चालू निविदा प्रक्रीयेची मूळ नस्ती दि. 17.12.2013 पासून जाणूनबुजून प्रलंबित ठेवल्याने सदर प्रक्रिया वेळेत पूर्ण करता आली नाही. परिणामी सदर कामाचे सन 2011-2012 मधील प्राकलन मूल्य रु. 1315824/-, सन 2013-2014 मध्ये रु. 1556641/- एवढे होवून त्यामध्ये अकारण रु. 240824/- एवढी वाढ झाल्याने मनपावर आर्थिक बोजा वाढला असे श्री.बांगर टंकलेखक यांचा सेवा पुस्तकावरून दिसून येते.

वरील कारणामुळे उपायुक्त, मनपा यांचे आदेश क्र. अमनपा/उपा/साप्रवि/664/14 दि. 30.08.2014 अन्वये संबंधितावर जबाबदारी निश्चित करून निश्चित केल्याप्रमाणे वेतनातून वसुली करण्याचे आदेश देण्यात आले.

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे.

अनु.क्र.	जबाबदारी निश्चित झालेले अधिकारी/कर्मचारी	हानीची निश्चित रकम रु.	वेतनातून वसुलीचा तपशील (रु.)	**प्रलंबित वसुली रु.**
1	श्री रवींद्र पवार, उपअभियंता, (बांधकाम विभाग)	80275/-	माहे ऑगष्ट 2014 ते नोव्हेबर 2014 (4 महिने x रु. 8028/- प्रती महिना) 32112/-	48163/-
2	श्री नितीन बोगडे, सहाय्यक अभियंता (बांधकाम विभाग)	80275/-	वरीलप्रमाणे (4 महिने x रु. 8528/- प्रती महिना) 34100/-	46175/-
3	श्री हसमुख गांगर, टंकलेखक (बांधकाम विभाग)	80275/-	वरीलप्रमाणे (4 महिने x रु. 8528/- प्रती महिना) 34100/-	46175/-
एकूण		240825/-	100312/-	140513/-

ऑगष्ट 2014 ते नोव्हेबर 2014 पर्यंत दरमहा वसुली करून पुढील कालावधीत ती बंद केल्याचे दिसते. त्यामुळे उर्वरित रकम व्याजासह वसूल होणे आवश्यक वाटते.

DATABWM6901 (Ref No : 99)

DRAFT

45 न्यायालयीन प्रकरणात महानगरपालिकेला सेवा देणाऱ्या अधिवक्त्याच्या शुल्कातून आयकराची कपात न केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :157 मनपानिधी निधी
अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 149785.00/-

महानगरपालिका अमरावती या कार्यालयाचे वतीने न्यायालयीन प्रकरणासाठी नियुक्त अभियोक्ता यांना प्रदान करण्यात आलेल्या शुल्कातून नियमानुसार आयकर कपात करून कपात केलेला आयकर शासनखाती जमा न करणे या प्रकरणी अनियमितता झाल्याचे दिसून येते.

अमरावती महानगरपालिकाकडील न्यायालयीन प्रकरणी कार्यालयाची बाजू मांडण्याकरिता पॅनलवर विविध अभियोक्ताची नियुक्ती करून स्थायी समितीच्या ठरावाद्वारे निश्चित केलेल्या दराने त्यांना शुल्क प्रदान करण्यात येते. वर्ष 2014-2015 मध्ये एकूण रु. 14,97,857/- एवढा खर्च करण्यात आला.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग मुंबई शासन निर्णय क्र. आयकर-107/प्र.क्र.105/कोषां.क्र.5, दि. 22.02.2008 नुसार आहरण व सवितरण अधिकारी यांनी वेळोवेळी आयकर अधिनियमातील तरतुदी नुसार आयकर कपात करणे बंधनकारक असून वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. आयकर-009/ प्र.क्र.40/कोषां.क्र.5, दि. 10.12.2013 नुसार आयकर कपाती बाबत सूचना दिलेल्या आहेत. आयकर कलम 194 (जे) नुसार व्यावसायिक सेवा शुल्कावर 10% आयकर कपात करणे बंधनकारक होते. परंतु अभियोक्ता यांना प्रदान करताना एकूण देय रकमेवर विहित दरानुसार आयकराची कपात करण्यात आली नाही. त्यामुळे शासन महसुलाची हानी झाल्याची लेखा परीक्षा दरम्यान आढळून आले.

तपशीलवार विवरण खालीलप्रमाणे आहे.

अनु.क्र	अधिवक्ताचे नांव	प्रदान केलेली रक्कम	नियमानुसार कपात करावयाची आयकराची रक्कम	प्रत्यक्षात कपात केलेला आयकर	कपात करावयाची आयकराची रक्कम
1	ॲड. ए.एम. जैन	337000	33700	0	33700/-
2	ॲड. डी.एम. श्रीमाळी	89500	8950	0	8950/-
3	ॲड. कैलास नरवले	15000	1500	0	1500/-
4	ॲड. नइम अहमद	42000	4200	0	4200/-
5	ॲड. अंकुश काळमेघ	95000	9500	0	9500/-

6	ॲड. एस. शिंगणे	190000	19000	0	19000/-
7	ॲड. एन. आहुजा	184500	18450	0	18450/-
8	ॲड. जे.बी.कासट	432357	43235	0	43235/-
9	ॲड. आर.बी. अटल	15000	1500	0	1500/-
10	ॲड. मिलिंद वैष्णव	97500	9750	0	9750/-
				एकूण	149785/-

वर्ष 2014-2015 मध्ये रु.1,49,785/- एवढी आयकरा बाबतची रक्कम कपात केलेली नाही. तरी अभियोक्ता यांचाकडून आयकराची कपात करण्याबाबतची कार्यवाही करून तसे अनुपालन सादर करावे. सबब या प्रकरणात अत्यावश्यक कार्यवाही करण्यात यावी.

याबाबत अर्धसमास प्रत्र क्र. 125, दि. 12.04.2018 नुसार विचारणा केली असता यापुढे आयकराची कपात नियमित करण्यात येईल असे कळविले.

DATVVBM6301 (Ref No : 125)

49 सन 2014 -15 मध्ये कंत्राटदार, पुरवठादार यांच्या देयकातून कपात केलेल्या रु.1.82 कोटी एवढया कार्यकंत्राट कर रकमेचा शासन खात्यात विलंबाने भरणा करण्यात आल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 18186985.00 /-

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 मधील सेक्शन 31 व सेक्शन 40 नुसार कंत्राटदाराच्या देयकातून कार्यकंत्राट कराची (WCT) वसूल करून वसूल केलेली रक्कम वसुलीच्या दिनांकापासून पुढील महिन्याच्या 21 तारखेपर्यंत शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. विहित कालावधीत कार्यकंत्राट कर (WCT) जमा न केल्यास महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 मधील सेक्शन 30 व महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम 2005 नियम 88 मधील तरतुदीनुसार कार्यकंत्राट कराचा भरणा करावयास प्रलंबित असलेल्या रकमेवर 1.25% दरमहा या दराने दंडनीय व्याजाची आकारणी लागू ठरते. सन 2014-15 या आर्थिक वर्षात अमरावती महानगरपालिकेने कंत्राटदाराच्या देयकातून कपात केलेली कार्यकंत्राट कराची रक्कम रु.1.82 कोटी शासनखाती विलंबाने भरणा केल्याचे उपलब्ध नस्तीवरून दिसून येते.

महानगरपालिकेकडून कंत्राटदारांच्या देयकातून कार्यकंत्राट कराची (WCT) रक्कम कपात करण्यात

येते. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 मधील सेक्शन 31 व सेक्शन 40 नुसार कंत्राटदाराच्या देयकातून कार्यकंत्राट कराची (WCT) वसूल केलेली रक्कम वसुलीच्या दिनांकापासून पुढील महिन्याच्या 21 तारखेपर्यंत शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. विहित कालावधीत कार्यकंत्राट कर (WCT) जमा न केल्यास महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 मधील सेक्शन 30 व महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम 2005 नियम 88 मधील तरतुदीनुसार कार्यकंत्राट कराचा भरणा करावयास प्रलंबित असलेल्या रकमेवर 1.25% दरमहा या दराने दंडनीय व्याजाची आकारणी लागू ठरते.

मनपाच्या लेखा विभागाकडून उपलब्ध केलेल्या सन 2014-15 मध्ये कार्यकंत्राट कर रकमेचा भरणा केल्याच्या चलान तथा विवरणपत्राच्या तपासणीत पुढीलप्रमाणे भरणा केल्याचे दिसून आले.

अ.क्र.	महिना	कार्यकंत्राट कराची रक्कम	भरणा केल्याचा दिनांक
1.	एप्रिल-2014	निरंक	निरंक
2.	मे-2014	906483/-	9-10-2014
3.	जून-2014	384319/-	9-10-2014
4.	जुलै-2014	2341590/-	9-10-2014
5.	ऑगस्ट-2014	940696/-	1-11-2014
6.	सप्टेंबर-2014	515627/-	11-2-2015
7.	आक्टोंबर-2014	2139966/-	11-2-2015
8.	नोव्हेंबर-2014	1416785/-	11-2-2015
9.	डिसेंबर-2014	2194607/-	11-2-2015
10.	जानेवारी-2015	1990593/-	20-3-2015
11.	फेब्रुवारी-2015	1604721/-	20-3-2015
12.	मार्च-2015	3751598/-	18-5-2015
	एकूण रुपये	**18186985/-**	

कार्यकंत्राट कराचा विहीत मुदतीत शासन खाती भरणा न केल्यास महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 मधील सेक्शन 30 व महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम 2005 नियम 88 मधील तरतुदीनुसार कार्यकंत्राट कराचा भरणा करावयास प्रलंबित असलेल्या रकमेवर 1.25% दरमहा या दराने दंडनीय व्याजाची आकारणी लागू ठरत असल्याने मनपावर त्याचे अकारण दायित्व निर्माण झाले आहे.

याबाबत अर्धसमास क्र.157 दि.24/04/2018 अन्वये खुलासा मागविण्यात आला.मात्र खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 157)

50 कारखाना विभागाकडील भंगार ठरलेल्या वाहनांच्या विक्री प्रक्रियेतील विलंबामुळे मनपाचे झालेले नुकसान रु. 1,53,000/- बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनि यमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :37 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब

महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग शा.नि.क्र.संकीर्ण 2007/वाहन खरेदी/प्र.क्र.27/2008/नवी 26 दि.18 फेब्रुवारी 2008 नुसार कारखाना विभागाकडील कालबाह्य तथा निरुपयोगी ठरलेल्या वाहनांचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने माहे जाने.2013 मध्ये विक्रीमूल्य ठरवून दिले.मनपा आयुक्तांनी दि.31-01-2013 रोजी तथा स्थायी समितीनेसुद्धा दि.05-04-2013 रोजी विक्री करण्यास मंजुरी प्रदान केली. असे असताना मनपाने पुढील कार्यवाहीस विलंब केल्याने विक्रीमुल्यातील तफावतीमुळे (प्रत्यक्षात विक्री दि.26-12-2014) मनपाचे रु.1,53,000/- एवढे नुकसान झाले आहे.

महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग शा.नि.क्र.संकीर्ण 2007/वाहन खरेदी/प्र.क्र.27/2008/नवी 26 दि.18 फेब्रुवारी 2008 नुसार महानगरपालिकेची वाहने निरुपयोगी ठरविण्याकरिता अवजड वाहनांसाठी 10 वर्षाचे आयुष्य किंवा 2,00000 कि.मी.धावसंख्या तसेच हलकी वाहनांसाठी 10 वर्षाचे आयुष्य किंवा 2,40000 कि.मी. धावसंख्या यापैकी जे नंतर पूर्ण होईल त्याअनुषंगाने वाहने निर्लेखित करून अशा कालबाह्य तथा निरुपयोगी ठरलेल्या वाहनांची विक्रीद्वारे विल्हेवाट करावयाची आहे.

अमरावती महानगरपालिकेच्या कारखाना विभागाकडील पुढील कालबाह्य तथा निरुपयोगी ठरलेल्या वाहनांच्या विक्रीकरिता वाहनांचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने माहे जाने.2013 मध्ये विक्रीमूल्य ठरवून दिले. तसेच मनपा आयुक्तांनी दि.31-01-2013 रोजी तथा स्थायी समितीनेसुद्धा दि.05-04-2013 रोजी विक्री करण्यास मंजुरी प्रदान केली. मात्र अमरावती महानगरपालिकेने त्या वाहनांच्या विक्रीची तात्काळ कार्यवाही न करता एक वर्षानंतर पुन्हा त्याच वाहनांची मुल्यनिश्चिती करण्यासाठी पत्र क्र.4105/हवाक/ प्रापका/अम/2014 दि.29-01-2014 अन्वये प्रादेशिक परिवहन कार्यालयास पत्र पाठविले. सदर पत्राच्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून प्राप्त विक्रीमूल्याची तपासणी केली असता पूर्वीच्या दरापेक्षा कमी दर निर्धारित झाल्याचे निदर्शनास आले. याबाबतचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र	वाहन प्रकार	वाहन नोंदणी क्रमांक	सुरुवातीस माहे जाने.2013 मध्ये प्रादेशिक परिवहन कार्यालयाने	माहे जुलै 2014 मध्ये प्रादेशिक परिवहन कार्यालयाने नव्याने ठरवून	फरक

			ठरवून दिलेले विक्रीमूल्य	दिलेले विक्रीमूल्य	
1.	Ambassador car. model 2000/petrol	MH-27 H-1321	100000.00	25000.00	75000.00
2.	Ambassador car. model 2000/petrol	MH-27 H-2007	25000.00	24500.00	500.00
3.	Ambassador car. model 2000/petrol	MH-27 H-9090	83000.00	25500.00	57500.00
4.	Pal 118 NE car. model 1997	MH-27 H-11	30000.00	20000.00	10000.00
5.	Vikrant auto. 3 wheeler 1996 (load body)	MH-27 A-4053	12000.00 ते 15000.00	7000.00	5000.00 (किमान 12000.00 विचारात घेतल्यास)
6.	Vikrant auto. 3 wheeler 1996 (load body)	MH-27 A-4059	12000.00 ते 15000.00	7000.00	5000.00 (किमान 12000.00 विचारात घेतल्यास)
				एकूण फरक	153000.00

उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता महानगरपालिकेकडून झालेल्या दिरंगाईमुळे रु.153000.00 चे नुकसान झाल्याचे स्पष्ट दिसून येते. याबाबत अर्धसमास क्र.155 दि.24/04/2018 अन्वये खुलासा मागविण्यात आला.मात्र विहित कालावधीत खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 155)

51 महानगरपालिकेच्या हद्दीतील प्रवेश नाक्यावर खाजगी सुरक्षा रक्षक पुरविण्याचे आदेश होण्यापूर्वीच्या कालावधीतील पारिश्रमिक अदा केल्याने झालेले अतिप्रदान रु.67560/-बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 67560.00/-

उपायुक्त (प्रशा),मनपा,अमरावती यांचे कार्यालयीन आदेश क्र.अमनपा/साप्रवि/उपा./650/14 दि.28/08/2014 अन्वये अमरावती मनपाचे हद्दीतील 10 प्रवेश नाक्यावर 20 सुरक्षा रक्षक पुरविण्याबाबत मे.जगदंबा स्वयंरोजगार नागरी सेवा सहकारी संस्था,अमरावती या संस्थेस कंत्राट देण्यात आले.दि.28-08-14 रोजीचे आदेश असताना प्रमाणक क्र.12288/दि.5-3-15 अन्वये संबंधितांना 16-08-14 ते 16-09-14 या कालावधीचे रु.8726/- प्रति सुरक्षा रक्षक या दराने रु.174520/-अदा करण्यात आले.अशा प्रकारे दि.16-08-14 ते आदेश निर्गमनाचे पूर्वीपर्यंत म्हणजे दि.27-08-14 पर्यंत रु.67560/- अतिप्रदान झाले आहे.

महानगरपालिकेने मनपाचे सिमेअंतर्गत असलेल्या दहा प्रवेश नाक्यावर दोन पाळीकरिता प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण 20 सुरक्षा रक्षक (प्रति सुरक्षा रक्षक रु.8726/- प्रमाणे) एक महिन्याकरिता मे.जगदंबा नागरी सेवा सहकारी संस्था,अमरावती यांना उपायुक्त(प्रशा.) मनपा,अमरावती यांचे आदेश क्र.अमनपा/साप्रवि/उपा./650/14 दि.28-08-2014 अन्वये आदेश देण्यात आले.

दि.28-08-14 रोजीचे आदेश असताना प्रमाणक क्र.12288/दि.5-3-15 अन्वये संबंधितांना 16-08-14 ते 16-09-14 या कालावधीचे रु.8726/- प्रति सुरक्षा रक्षक या दराने रु.174520/-अदा करण्यात आले.अशा प्रकारे दि.16-08-14 ते आदेश निर्गमनाचे पूर्वीपर्यंत म्हणजे दि.27-08-14 पर्यंत रु.67560/- अतिप्रदान झाले आहे.

याबाबत अर्धसमास क्र.27 दि.06/02/2018 अन्वये खुलासा मागविण्यात आला.मात्र खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 27)

52 अधिकच्या दराने सुरक्षा रक्षकांची नेमणूक केल्याने मनपाचे दरमहा होत असलेले नुकसानीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

मनपा आयुक्त यांचे कार्यालयाकरिता एक तथा महापौर कार्यालयाकरिता एक असे एकूण दोन सुरक्षा रक्षक रु.15000/- दरमहा या दराने दि.20-10-2014 पासून मनपा आयुक्त यांच्या मंजुरी आदेशान्वये नियुक्त

करण्यात आले आहे. याच कालावधीत उपायुक्त (प्रशा),मनपा, अमरावती यांचे आदेश क्र.अमनपा/साप्रवि/उपा./650/14 दि.28-08-2014 अन्वये मे.जगदंबा नागरी सेवा सहकारी संस्था,अमरावती यांना, मनपा हद्दीतील दहा प्रवेश नाक्यावर 20 सुरक्षा रक्षक रु. 8726/-प्रतिमहा या दराने पुरविण्याबाबत मंजुरी आदेश देण्यात आले आहे. रु.8726/- या दराने सुरक्षा रक्षक पुरविण्यास सहकारी संस्था तयार असताना रु.15000/-या अधिकच्या दराने सुरक्षा रक्षक नियुक्त करणे वित्तीय औचीत्याला धरून नाही. यामुळे रु.15000/-(-)8726/-=रु.6274/-x 2 =12548/- एवढे दरमहा मनपाचे नुकसान संभवते आहे.

महानगरपालिकेने मनपा आयुक्त यांचे कार्यालयाकरिता एक तथा महापौर कार्यालयाकरिता एक असे एकूण दोन सुरक्षा रक्षक रु.15000/- दरमहा या दराने दि.20-10-2014 पासून मनपा आयुक्त यांच्या मंजुरीने नियुक्त केले असून त्यांना रु. 15000/- दरमहा या मंजूर दराने रक्कम अदा करण्यात आली आहे.(जसे फेब्रुवारी-15 ची रक्कम रु.30000/- प्रमाणक क्र 12289 ते 12290 दि.5-3-2015.) याच कालावधीत उपायुक्त (प्रशा),मनपा, अमरावती यांचे आदेश क्र.अमनपा /साप्रवि /उपा./ 650/14 दि.28-08-2014 अन्वये मे.जगदंबा नागरी सेवा सहकारी संस्था,अमरावती यांना, मनपा हद्दीतील दहा प्रवेश नाक्यावर 20 सुरक्षा रक्षक रु. 8726/-प्रतिमहा या दराने पुरविण्याबाबत मंजुरी आदेश देण्यात आले होते. त्यामुळे रु.8726/- या दराने सुरक्षा रक्षक पुरविण्यास सहकारी संस्था तयार असताना रु.15000/-या अधिकच्या दराने सुरक्षा रक्षक नियुक्त करणे वित्तीय औचीत्याला धरून नाही.असे केल्यामुळे 15000/-(-)8726/-= रु.6274/-x 2 =12548/-एवढे दरमहा मनपाचे नुकसान संभवते आहे.

याबाबत अर्धसमास क्र.40 दि.15/02/2018 अन्वये खुलासा मागविण्यात आला.मात्र खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 40)

55 सन 2014-15 मध्ये महानगरपालिकेच्या अधिकारी वर्गाकरिता भाडेतत्वावर घेतलेल्या खाजगी वाहनांच्या मासिक भाडे देयकांच्या तपासणीत आढळून आलेल्या अनियमिततांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ब

महानगरपालिकेच्या अधिकारी वर्गाकरिता भाडेतत्वावर घेतलेल्या खाजगी वाहनांच्या मासिक भाडे देयकांच्या तपासणीत करारनाम्यातील अटीनुसार पुरविलेल्या प्रत्येक वाहनाचे लॉगबुक विहित नोंद घेऊन वाहन वापर

केलेल्या अधिकाऱ्याकडून प्रमाणित करून मासिक देयकासोबत जोडले नसताना देयक पारित करणे, ठरवून दिलेल्या मासिक वापर मर्यादेपेक्षा अधिक कि.मी.वाहनाच्या वापराकरिता सक्षम अधिकाऱ्याची मंजुरी नसतानाही अतिरिक्त वापरलेल्या अंतराकरिता सादर केलेल्या देयकाचे प्रदान करणे, देयकातून कपात केलेल्या सेवाकराचा भरणा केल्याची खात्री न करताच पुढील कालावधीच्या देयकांचे प्रदान करणे इत्यादी अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

महानगरपालिकेच्या अधिकारी वर्गाकरिता सन 2014-15 मध्ये भाडेतत्वावर घेतलेल्या खाजगी वाहनांवरील खर्चाच्या लेखापरीक्षणाकरिता मोटार कार्यशाळा विभागाने उपलब्ध केलेल्या मासिक भाडे देयकांच्या (प्रमाणके) तपासणीत पुढीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

अ.क्र.	प्रमाणक क्रमांक,दिनांक व रक्कम	आढळून आलेल्या अनियमितता
1.	क्र.141/दि.19-04-2014 रु.318510/-.(फेब्रु.14 चे मासिक भाडे देयक.)	1)करारनाम्यातील अटीनुसार पुरविलेल्या प्रत्येक वाहनाचे लॉगबुक विहित नोंद घेऊन वाहन वापर केलेल्या अधिकाऱ्याकडून प्रमाणित करून मासिक देयकासोबत जोडणे आवश्यक आहे.मात्र पुढील वाहनांच्या लॉगबुकांची प्रत जोडली नसताना देयक पारित करण्यात आले. MH 27-5880,MH 04-9133,MH 27-9344,MH 27-9922,MH 04-3856,MH 27-9622. 2) देयकाची निव्वळ देय रक्कम रु.288767/- यावर सेवाकर 12.36%दराने रु.35691/-=रु.324458/-(-)आयकर रु.5948/-=318510/- कंत्राटदाराला अदा केले. सदर सेवाकर कंत्राटदाराने शासनखाती जमा केले किंवा कसे. भरणा केल्याचा पुरावा तपासणीस उपलब्ध करण्यात आला नाही.
2.	क्र.1297/ दि.23-05-2014 रु.386365/-.(मार्च 14 चे मासिक भाडे देयक)	1)करारनाम्यातील अटीनुसार पुरविलेल्या प्रत्येक वाहनाचे लॉगबुक विहित नोंद घेऊन वाहन वापर केलेल्या अधिकाऱ्याकडून प्रमाणित करून मासिक देयकासोबत जोडणे आवश्यक आहे.मात्र पुढील वाहनांच्या लॉगबुकची प्रत जोडली नसताना देयक पारित करण्यात आले. MH 27-5880,MH 04-9133, MH 27-9422,MH 04-3856 इत्यादी. 2) देयकाची निव्वळ देय रक्कम रु.350286/- यावर सेवाकर 12.36%दराने रु.43295/-=रु.393581/-(-)आयकर रु.7216/-

DRAFT

		=386365/- कंत्राटदाराला अदा केले. सदर सेवाकर कंत्राटदाराने शासनखाती जमा केले किंवा कसे. भरणा केल्याचा पुरावा तपासणीस उपलब्ध करण्यात आला नाही.
3.	क्र.3671/ दि.11-08-2014 रु.321988/-.(जून-14 चे मासिक भाडे देयक)	दि.20-09-2012 रोजीच्या करारनाम्यातील अट क्र 13 नुसार पुरविलेल्या प्रत्येक वाहनाचे लॉगबुक विहित नोंद घेऊन वाहन वापर केलेल्या अधिकाऱ्याकडून प्रमाणित करून मासिक देयकासोबत जोडणे आवश्यक आहे.मात्र पुढील वाहनांच्या लॉगबुकची प्रत जोडली नसतानाही देयक पारित करण्यात आले आहे. MH 27-5880,MH 04-9133, MH 27-9422, MH 27-9922, MH 04-3856,MH 27-824,MH 27-5984 इत्यादी. 2) देयकाची निव्वळ देय रक्कम रु.291920/- यावर सेवाकर 12.36%दराने रु.36081/-=रु.328001/-(-)आयकर रु.6013/-=321988/- कंत्राटदाराला अदा केले. सदर सेवाकर कंत्राटदाराने शासनखाती जमा केले किंवा कसे. भरणा केल्याचा पुरावा तपासणीस उपलब्ध करण्यात आला नाही. 3) माहे जून-14 मध्ये पुढील वाहनांचा वापर 1000 कि.मी.पेक्षा अधिक करण्यात आला. अ) वाहन क्र. MH 27-9344 300 कि.मी. ब) वाहन क्र. MH 27-9522 622 कि.मी. क) वाहन क्र. MH 27-5882 400 कि.मी. ड) वाहन क्र. MH 32-824 662 कि.मी. ई) वाहन क्र. MH 27-9722 1250 कि.मी. फ) वाहन क्र. MH 27-9822 962 कि.मी. उपअभियंता कार्यशाळा,मनपा,अमरावती.यांचे पत्र क्र.कार्यशाळा विभाग/उपा/322/2015 दि.22/09/2015 अन्वये मासिक वापर मर्यादा 1000 कि.मी.अशी ठरवून देण्यात आली आहे.मर्यादेपेक्षा जास्त वाहन वापरण्याची आवश्यकता भासल्यास प्रत्येक वेळी योग्य ती कारणमीमांसा देऊन वापरासाठीचा मंजुरीचा प्रस्ताव आयुक्तांकडे सादर करावयाचा आहे.सन 2014-15 मध्ये याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही. वाहन क्र. MH 27-5882 च्या माहे जून- 2014 च्या देयकासोबत

DRAFT

		जोडलेल्या लॉगबुकची तपासणी केली असता सुरुवातीची धावसंख्या 107514 असून महिनाअखेरची धावसंख्या 108915 अशी आहे.म्हणजे प्रत्यक्षात 108915 (-) 107514 =1401 कि मी वाहन वापर झालेला आहे व तशी महिनाअखेर नोंद घेतलेली आहे.सदर नोंदीखाली दि.11-06-2014 रोजीचा बडनेरा-नागपूर-परत असा 400 कि मी.चा पुन्हा नव्याने प्रवास केल्याची नोंद घेतलेली आहे व मनपाने सदर 400 कि मी वापराकरिता रु 7.20 प्रति कि मी दराने रु.**2880**/- रकमेचे प्रदान केले आहे.
4.	क्र.5453/ दि.25-09-2014 रु.315974/-.(जुलै-14 चे मासिक भाडे देयक)	1)माहे जुलै-2014 मध्ये पुढील वाहनांचा वापर 1000 कि.मी.पेक्षा अधिक करण्यात आला. अ) वाहन क्र. MH 27-9344 305 कि.मी. ब) वाहन क्र. MH 27-9522 401 कि.मी. क) वाहन क्र. MH 27-9133 500 कि.मी. ड) वाहन क्र. MH 27-9922 895 कि.मी. इ) वाहन क्र. MH 27-9722 1832 कि.मी. फ)) वाहन क्र.MH 27-9822 1405 कि.मी. ह) वाहन क्र. MH 27-5998 697 कि.मी. स) वाहन क्र. MH 27-5881 500 कि.मी.
5.	क्र.5454/ दि.25-09-2014 **ऑग**-14 चे मासिक भाडे देयक)	1) वाहन क्र.MH 27-9922 च्या मासिक भाड्याबाबत पृथ्वी ट्रॅव्हल्स यांनी सादर केलेल्या बिजकानुसार माहे ऑग-14 मध्ये एकूण वापर 1770 कि मी म्हणजे अतिरिक्त वापर 770 x 7.20 प्रति कि.मी.दराने रु 5544/- + मासिक भाडे 18380/- = रु 23924/- अदा केले आहे.देयकासोबत संलग्न लॉगबुकची तपासणी केली असता सदर लॉगबुक माहे ऑग 2014 ची नसून माहे ऑग 2013 ची आहे व त्यात मासिक वाहन वापर 1155 कि मी असे आहे.प्रमाणपत्रावर फक्त ऑगस्ट महिना नमूद आहे.वर्ष नमूद नाही. **दि.20-09-2012 रोजीच्या करारनाम्यातील अट क्र 13 नुसार देयकासोबत ऑग 2014 च्या लॉगबुकाची प्रत जोडणे आवश्यक होते.प**रंतु प्रत जोडली नसतानाही सदर वाहनाचे माहे ऑग-14 चे मासिक भाडे रु.**23924/-** अदा करण्यात आले आहे.
6.	क्र.9860/ दि.15-01-2015 रु.306350/-.(सप्टे -14 चे	1) माहे सप्टे-2014 मध्ये पुढील वाहनांचा वापर 1000 कि.मी.पेक्षा अधिक करण्यात आला.

DRAFT

	मासिक भाडे देयक)	MH 27-5881,MH 27-9344,MH 27-9922, MH 27-9422,MH 27-5878,MH 27-9722,MH 27-9822. 3) माहे सप्टे 2014 मध्ये पुढील वाहन वापराबाबतच्या प्रदान केलेल्या मासिक भाड्यात अतिप्रदान झाले आहे. अ) वाहन क्र.MH 27-5881 दि.1-9-2014 रोजीची धावसंख्या 110019 असून 30-9-2014 अखेरची धावसंख्या 110787 अशी आहे. एकूण वापर 768 कि मी असल्याने 1000 कि मी करीता देय असताना एकूण वाहन वापर 1396 कि मी दर्शवून 21036/- प्रदान करण्यात आले.**रु.2656/-चे अतिप्रदान झाले आहे.** ब) वाहन क्र.MH 27-9722 दि.1-9-2014 रोजीची धावसंख्या 46770 असून 30-9-2014 अखेरची धावसंख्या 49700 अशी आहे. एकूण वापर 2930 कि मी झालेला आहे.अतिरिक्त वापर 1930 कि मी करीता रु 9.00 दराने 17370/-+ मासिक भाडे 22280/- =39650/-देय असताना सदर महिन्यात एकूण वापर 3280 कि मी दर्शवून रु 42800/- अदा करण्यात आले आहे.**रु.3150/- चे अतिप्रदान झाले आहे**.

याबाबत अर्धसमास क्र.138 दि.16/04/2018 अन्वये खुलासा मागविण्यात आला.मात्र खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 138)

58 अतिक्रमण विभागातील मजूरांना रोखीने प्रदान केलेल्या मजूरीसंबंधी मजूरांच्या स्वाक्षऱ्या नसतांना दर्शविण्यात आलेल्या रु.47352/- एवढया प्रदानातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :202 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 700000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 47352.00/-

मनपाचे अतिक्रमण विभागामार्फत मनपा हद्दीतील रस्त्यावरील अतिक्रमण काढणे, अनधिकृत बांधकाम पाडणे, इ.कामाकरीता लावण्यात आलेल्या मजूरांची मजूरी श्री.जी.एच.जयस्वाल, अतिक्रमण पथक प्रमुख यांनी अग्रिमाची उचल करुन रोखीने प्रदान केली आहे. सदर मजूरी प्रदान करताना काही मजूरांच्या प्रदानाच्या स्वाक्षऱ्या देयकात आढळून आल्या नाहीत. यामुळे प्रत्यक्षात रकमा प्रदान केल्या नसताना प्रदान दाखवून

मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याची शक्यता आहे.

मनपाचे अतिक्रमण विभागामार्फत मनपा हद्दीतील रस्त्यावरील अतिक्रमण काढणे, अनधिकृत बांधकाम पाडणे, शहरातील लहान मोठे नाले साफ करणे, नगरसेवक यांचे प्रभागातील काम करणे इ.कामाकरीता लावण्यात आलेले वाहन चालक व मजूर यांची दैनंदिन मजूरी विविध प्रमाणकान्वये लेखाशिर्ष "202-अतिक्रमण हटविणे" मधून श्री.जी.एच.जयस्वाल, अतिक्रमण पथक प्रमुख यांनी मनपाकडून अग्रिम घेवून रोखीने प्रदान केल्याचे दर्शविण्यात आले आहे. सदर प्रदानाची तपासणी केली असता काही दिनांकांना मजूरीच्या रकमा प्राप्त झाल्याच्या स्वाक्षऱ्या (पोचपावत्या) आढळल्या नाहीत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

(रकमा रुपयात)

अ.क्र.	प्रमाणक क्रमांक	दिनांक	अग्रिम समायोजन रक्कम	स्वाक्षऱ्या नसलेले दिवस	प्रदान दर्शविण्यात आलेली रक्कम व दिवस	प्रदान दर्शविण्यात आलेली रक्कम
1	2703	11.7.2014	100000	16.4.2014	208x4	832
				17.4. 2014	208x3	624
				18.4.2014	400x1 208x8	2064
				19.4.2014	208x4	832
				20.4.2014	400x1 208x8	2064
				21.4.2014	208x4	832
				22.4.2014	208x4	832
				23.4.2014	208x4	832
				24.4.2014	208x4	832
				25.4.2014	208x5	1040
				26.4.2014	208x4	832
				27.4.2014	400x1 208x8	2064
				28.4.2014	208x4	832
				29.4.2014	208x4	832

DRAFT

				30.4.2014	208x4	832
				2.5.2014	400x1 208x8	2064
				3.5.2014	208x4	832
				4.5.2014	400x1 208x8	2064
				5.5.2014	208x4	832
				6.5.2014	208x3	624
				7.5.2014	208x4	832
				8.5.2014	208x5	1040
				9.5.2014	208x4	832
						25296
2	3724	11.8.2014	100000	18.5.2014	208x2	416
				19.5.2014	208x1	208
						624
3	5216	23.9.2014	100000	6.6.2014	400x1	400
				9.6.2014	208x1	208
				19.6.2014	400x1 208x2	816
						1424
4	7545	12.11.2014	100000	19.7.2014	208x1	208
				27.7.2014	208x2	416
				28.7.2014	208x2	416
				5.8.2014	208x2	416
				14.8.2014	208x2	416
						1872
5	10954	3.2.2015	100000	22.9.2014	400x1	400
				23.9.2014	400x1 208x1	608
				24.9.2014	400x1	400
				25.9.2014	400x1	400
				26.9.2014	400x1	608

DRAFT

					208x1	
				27.9.2014	400x1 208x1	608
				29.9.2014	400x1 208x1	608
				30.9.2014	400x1 208x1	608
				1.10.2014	400x1 208x1	608
				4.10.2014	400x1	400
				6.10.2014	400x1	400
				7.10.2014	400x1 208x2	816
				8.10.2014	400x1	400
				9.10.2014	400x1	400
				10.10.2014	400x1	400
				13.10.2014	400x1 208x1	608
				14.10.2014	400x1	400
				15.10.2014	400x1 208x1	608
				16.10.2014	400x1	400
				17.10.2014	400x1 208x1	608
				18.10.2014	400x1 208x1	608
				20.10.2014	400x1 208x1	608
				21.10.2014	400x1 208x1	608
				22.10.2014	400x1 208x1	608

DRAFT

				27.10.2014	400x1 208x1	608
				28.10.2014	400x1 208x1	608
				29.10.2014	400x1 208x1	608
						14544
6	313	22..4.2014	200000	14.11.2013	208x1	208
				21.11.2013	208x1	208
				28.11.2013	264x1 208x2	680
				1.12.2013	208x1	208
				23.12.2013	208x4	832
				31.12.2013	208x1	208
				7.1.2014	208x5	1040
				8.1.2014	208x1	208
						3592
					एकूण	**47352**

सदर बाब गंभीर असून मजूरांचे स्वाक्षरीशिवाय दर्शविण्यात आलेले प्रदान **रु.47352/-** वसुलपात्र ठरतात.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.180, दिनांक 14.5.2018 नुसार खुलासा मागविला असता कोणतेही उत्तर/अनुपालन प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 180)

65 मनपा हद्दितील प्रभागनिहाय दैनदिन साफसफाईचे कामाचे कंत्राटदारांना मासिक देयकाचे प्रदानातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 12

लेखा शीर्ष :147 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 89401030.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 578517.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 578517.00/-

महानगरपालिका अमरावतीच्या हद्दितील विविध एकूण 43 प्रभागातील दैनदिन साफसफाईच्या कामाचे सन 2014-15 मध्ये प्रदान करण्यात आलेल्या मासिक देयकाची पडताळणी केली असता कंत्राटदारांने करारनाम्यातील अटी व शर्तीची उलंघ्घन केल्याचे निदर्शनास आले. कंत्राटदारास देय नसलेली देयकातून कपात केलेली 13% सेवाकराची रक्कम शासनाकडे जमा केल्याची चलान सादर न करता देयकाचे प्रदान करणे, कंत्राटदाराकडील सफाई कामगारांच्या मासिक देयकातून 13.61% कर्मचारी भविष्य निधी व 1% कामगार कल्याण निधीचा भरणा केल्याबाबत खात्री न करता प्रदान करणे, सफाई कर्मचारी कामावर नसतांना हजर दाखवून देयकात मागणी करणे, मासिक अहवालावर स्वच्छता निरिक्षकांच्या स्वाक्षरी करुन प्रमाणित न करणे, गैरहजर कामागारांच्या संख्येत खाडाखोड करणे, इत्यादी अनियमितता लेखापरिक्षणादरम्यान निदर्शनास आल्या.

अमरावती महानगरपाका, स्थायी समिती ठराव क्र.119 दि.31.08.2013 नुसार अमरावती शहरातील एकूण 43 प्रभागातील दैनदिन साफसफाईची कामे वेगवेगळया कंत्राटदाराकडून करण्यात आली. मनपा स्थायी समिती ठराव क्र.231 दि.13.09.2013 नुसार दि. 31.08.2014 पर्यंत एक वर्षाची मुदतवाढ दिली असून कंत्राटदाराला दैनदिन साफसफाईच्या कामाचे देयकाचे प्रदान करताना करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार देयकाची पडताळणी न करता प्रदान करण्यात आले. सन 2014-15 मध्ये दैनदिन साफसफाईचे कामावर रु. 8.94 कोटी एवढा खर्च झाला असून निवडक देयकाची पडताळणी केली ब-याच अनियमितता निदर्शनास आल्या असून लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे.

1. बेरोजगार क्षितीज नागरी सेवा सहकारी संस्था अमरावतीचे प्रभाग क्र. 26 चे दैनदिन साफसफाईचे देयक माहे जून- 2014 रु.295364/- प्रमाणक क्र.12330 दि.5.3.2015 चे देयकासोबत जोडलेल्या सफाई कामगाराच्या हजेरी पटावर स्वास्थ निरीक्षकाची स्वाक्षरी नाही. तसेच आरोग्य स्वास्थ अधिकारी यांनी हजेरीपट प्रमाणित केले नाही. माहे जून-2014 चे हजेरीपटामध्ये एकूण गैरहजर कामगार 2 दर्शविले असून दि.26.06.2014 ला 14 कामगार गैरहजर होते. परंतु 6 (सहा) कामगार गैरहजर असल्याचे दाखवून रु.500/- प्रतीकामगार प्रमाणे 6 सफाई कामगाराची रु.3000/-ची कपात केली. एकूण 8 सफाई कामगाराचे रु.500/- दराने रु.4000/- अतिप्रदान झाले. मासीक अहवाल पत्रात गैरहजर कर्मचा-यांच्या संख्येवर पांढरी शाई लावून खाडाखोड केली आहे.

2. बेरोजगार क्षितीज नागरी सेवा सहकारी संस्था अमरावती प्रभाग क्र. 26 चे माहे मे-2014 दैनदिन साफसफाईचे देयक रु.295364/- प्रमाणक क्र.12329 दि. 5.3.2015 मध्ये देयकाचे प्रदान करताना हजेरी तपासणीबाबतचा मासिक अहवाल माहे ऑगस्ट 2014 चा जोडून प्रदान करण्यात आले. सफाई कामगाराचे मासिक हजेरीपत्रक अस्पष्ट असून एकूण गैरहजर कामगार 3 दाखविले आहे. मात्र मासिक अहवालात एकूण 32 कामगार गैरहजर दाखविले आहे. गैरहजर कामगाराचे संख्येत खाडाखोड केली आहे. माहे मे-2014 चे देयकात दैनदिन साफसफाई कामाबाबत अहवालामध्ये दि. 3.5.2015 चा अहवाल जोडला आहे.

DRAFT

3. आरोग्य विभागामार्फत प्रदान करण्यात येणा-या साफसफाईच्या कामाच्या मासिक देयकाचे प्रदानाकरीता दुबार देयक प्रदान नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. देयकासोबत दुबार देयक नोंदवहीत नोंद घेण्यात आली असे प्रमाणपत्र जोडले आहे. परंतु अशी नोंदवही लेखापरिक्षा पथकास तपासणीस सादर केली नाही. त्यामुळे दुबार देयक नोंदवही ठेवण्यात आली किंवा नाही, याबाबतची खात्री होत नाही.

4. बेरोजगार क्षितीज नागरी सेवा सहकारी संस्था, अमरावती प्रभाग क्र. 22 शारदानगरचे माहे मे-2014 दैनदिन साफसफाईचे देयक रु.295364/- प्रमाणक क्र.12328 दि.5.3.2015 मध्ये संस्धेने नियुक्त केलेल्या कामगाराची यादी सोबत जोडलेली नाही. कंत्राटदाराचे मासिक देयकाचे प्रदान करतांना देयकातून कपात केलेली कर्मचारी भविष्य निधीची तसेच कामगार कल्याण कराची रक्कम शासनाकडे भरणा केल्याबाबत चालानची प्रत प्राप्त न करताच प्रदान करण्यात आले.

5. बेरोजगार क्षितीज नागरी सेवा सहकारी संस्था, अमरावती प्रभाग क्र. 22 शारदानगरचे माहे जून-2014 दैनदिन साफसफाईचे देयक रु.295364/- प्रमाणक क्र.12327 दि.5.3.2015 चे मध्ये कामावर गैरहजर असलेल्या कामगारांना प्रदान करण्यात आले असून त्यांचे देयकातून कर्मचारी भविष्य निधीची कपात करण्यात आली. अशा कर्मचा-यांची नावे खालीलप्रमाणे आहे.

1. प्रदिप चावरे फक्त 5 दिवस (रविवारला) कामावर हजर
2. अमर चावरे कामावर हजर नाही.
3. राहून चावरे फक्त 5 दिवस (रविवारला) कामावर हजर
4. विशाल चावरे कामावर हजर नाही.
5. विजय सुर्यवंशी कामावर हजर नाही.
6. विक्की चावरे कामवर हजर नाही.

अ. क्र. 1 व 3 चे कर्मचारी फक्त 5 दिवस (फक्त रविवार) कामावर होते.

अ. क्र. 2, 4, 5 व 6 चे सफाई कर्मचारी कामगाराच्या यादीत नाव नसतांना प्रदान करण्यात आले. खालील सफाई कामगार कामावर हजर होते परंतु त्यांना प्रदान केल्याची देयकात नोंद नाही.

1. मुन्ना ठाकुर 2. विजय सारसर 3. रितेश सोनटक्के 4. महादेव गवई 5. वि. प्रजापती
6. हनुमंत आमटे 7. गुणवंत गायकवाड 8. राजू सरकाटे 9. किसन माहुरे 10. नितीन खोब्रागडे
11. विक्की गोहर 12. श्रीराम सौय्या 13. सुधाकर गुडधे 14. रवी डागर

6. बेरोजगार साईबाबा नागरी सेवा सहकारी संस्था, अमरावती प्रभाग क्र. 30 रहेमतनगरचे देयक माहे मे-2014 रु.295364/- प्रमाणक क्र.12325 दि.5.3.2015 नुसार प्रदान करण्यात आले. कत्रांटदारास प्रदान करतांना कर्मचारी भविष्य निधी व कामगार कल्याण निधीची रक्कम शासनाकडे जमा केल्याबद्दल चलानची प्रत देयकासोबत जोडलेली नाही. कंत्राटदाराचे कर्मचारी भविष्य निधी व कामगार कल्याण निधीची रक्कम शासनाकडे जमा केल्याची खात्री केल्यानंतरच प्रदान करणे आवश्यक आहे. सफाई कर्मचा-याला प्रदान केल्याची यादी देयकासोबत जोडली नाही.

7. श्री. विजय बालकिसन गंगन प्रभाग क्र. 9 महेन्द्र कॉलनीचे देयक माहे जुलै 2014 रु.295364/- प्रमाणक क्र.12317 दि.5.3.2015 नुसार प्रदान करण्यात आले. कंत्राटदाराने कर्मचा-याचा कर्मचारी

DRAFT

भविष्य निधी तसेच कामगार कल्याण निधी रक्कम शासनाकडे जमा केल्याबाबत खात्री न करताच मासिक देयकाचे प्रदान करण्यात आले. भरणा केल्याबाबत चलानच्या प्रती लेखापरिक्षणास प्राप्त झाल्या नाही. रु. 5000/- चे वर सफाई कर्मचा-यांना प्रदान करतांना रु. 1/- चा मुद्रांक शुल्क लावून वेतनपटावर स्वाक्षरी घेतली नाही. देयकासोबत सादर केलेल्या दैनदिन साफसफाई कामाबाबतच्या मासिक अहवालवावर स्वच्छता निरिक्षक तसेच स्वच्छता आरोग्य अधिकारी यांनी स्वाक्षरी करुन दिनांक नमूद केलेला नाही.

तसेच प्रभाग क्र. 11 मोरबाग कॉलनी देयक माहे जुलै 2014 रु.393094/- प्रमाणक क्र.12318 दि. 5.3.2015 मध्ये कामावर हजर असलेल्या सफाई कामगाराची आकस्मिक तपासणी केली नाही. खालील नमूद सफाई कामगारांना नियमित हजेरी पत्रकात रविवारी गैरहजर दाखविले आहे.

1) श्रीमती मिराबाई लंगारे 2. श्रीमती शोभा पाटील 3. श्रीमती मिना बोयत
4. श्रीमती मंगला बोयकत 5. श्रीमत चंद्रा खडसे 6. श्रीमती रजनी बोयत
7. श्री. दिलीप वानखडे 8. श्री. निलेश लांडगे 9. श्याम अवचारे
10. श्री. आकाश हटवाल 11. अशोक तायडे 12. श्री. विनीत तिकाडे

माहे. जुलै 2014 चे देयक रु.393094/- प्रमाणक क्र.12318 दि. 5.3.2015 चे देयकात ज्या सफाई कर्मचा-यास मासिक प्रदान करण्यात आले अशा कर्मचा-याची नावे उपस्थिती पत्रकात नमूद नाही. कर्मचा-यांची नावे खालीलप्रमाणे आहे.

1) श्री. गणेश इंगळे 2. श्री. महादेव झाडे 3. श्री. गजानन खडसे 4. श्री. विनायक साबळे
5. श्री. नामदेव इंगळे 6. श्री. सुभाष खडसे 7. श्री. महेन्द्र इंगळे 8. श्री. आकाश बिसमोरे
9. श्री. किसन कांबळे 10. श्री. जयराम भुवण 11. श्री. सुभाष इंगळे 12. श्रीमती लक्ष्मी टाक
13.श्रीमती रेखा राठोड 14. श्रीमती हिरा बोयत 15. तुकाबाई सारवान 16. निर्मला धावडे
17.श्री.प्रकाश चावरे 18.श्री.संदिप बोयत 19. श्री.सुरज घोंगडे 20. श्री.विजय उसरटे
21. श्री. राजू धावरी 22. श्री.विजय उसरटे 23.श्री.राजेश गुप्ता 24. श्री.अन्नु शॉ

8. युवक कल्याण नागरी सेवा सह.संस्था प्रभाग 39 नेमाणी गोडावूनचे देयक माहे जुलै 2014 रु.295364/- प्रमाणक क्र.12315 दि.5.3.2015 चे देयकात करारनाम्यातील अट क्र. 30 नुसार गणवेषात नसलेल्या तिन सफाई कर्मचा-याकरीता प्रती कामगार रु.200/- नुसार रु.600/- ची कपात देयकातून करण्यात आले नसल्याने करारनाम्यातील अटी व शर्तीचे उलंघ्घन झाले.

9. बेरोजगार क्षितीज नागरी सेवा सह. संस्था, अमरावती प्रभाग क्र. 4 (संत गाडगेबाबा) चे देयक माहे जून 2014 रु.295364/- प्रमाणक क्र. 12334 दि. 5.3.2015 चे देयकावर प्रदानार्थ मंजूरी नाही. (प्रदान आदेशाची नोंद नाही) तसेच देयकावर मुख्य लेखाधिकारी यांची स्वाक्षरी नसतांना देयकास मंजूरी प्रदान करुन रकमेचे प्रदान करण्यात आले.

10. कंत्राटातील अटी व शर्तीनुसार देयकात नमूद सफाई कामगाराचे राष्ट्रीयकृत बँकेचे खाते क्रमांक देयकासोबत जोडलेली नाहीत. त्यामूळे त्यांच्या खात्यात वेतनाची रक्कम जमा झाल्याची खात्री करता येत नाही. बँक पासबुकाची अदयावत छायांकित प्रत देयकासोबत सादर करण्यात आली नाही. परिणामी देयकातून कर्मचारी भविष्य निधी व कामगार कल्याण निधीची रक्कम कपात करुन शासन खात्यात

DRAFT

जमा केल्याची खात्री करता येत नाही.

11. दैनदिन साफसफाईचे कंत्राटदारास मासिक देयकाचे प्रदान करतांना करारातील अटी व शर्तीनुसार 13% सेवाकर, 13.61% कर्मचारी भविष्य निधी व 1% कामगार कल्याण निधीच्या कपाती देयकातून करण्यात आल्याबाबत कंत्राटदारांना प्रदान करतांना कपात केलेल्या रकमेचा भरणा शासनाकडे केल्याबद्दल चलानच्या प्रती संबंधीत कत्राटदाराकडून प्राप्त करुन अशा कपात केलेल्या रकमा शासनाकडे भरणा केल्याबाबत चालानच्या प्रती प्राप्त केल्यानंतरच मासिक देयकाचे प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही होत असल्याचे दिसून येत नाही.

12. मासिक देयकासोबत प्रभागातील प्रतिष्ठित नागरिकांचे स्वच्छतेल्या अभिप्रायासह स्वाक्ष-या घेण्यात आल्या नाही. काही देयकासोबत जोडलेल्या अभिप्राय विवरणपत्रावर एकाच शाईने एकाच हस्ताक्षरात स्वाक्ष-या केल्या आहे. त्यामुळे केलेल्या स्वाक्ष-या प्रतिष्ठित नागरीकाच्याच आहे याबाबतची खात्री होत नाही. स्वच्छता निरिक्षकाने स्वाक्षरी केलेले छांयाकित प्रतीचे नमुने वारंवार वापरण्यात आल्याचे लेखापरिक्षणादरम्यान आढळून आले. उपरोक्त मुद्दया प्रकरणी आरोग्य विभाग प्रमुखाकडून आकस्मित पाहणी केल्याचे दिसून येत नाही.

13. मनपा स्थायी समिती ठराव क्र.73 दि.30.08.2014 नुसार युवाप्रहार स्वंयरोजगार नागरीक सेवा सहकारी संस्था, अमरावती यांचेसोबत करारनामा करण्यास मंजूरी दिली. युवाप्रहार स्वंयमरोजगार नागरीक सेवा सहकारी संस्था अमरावती यांनी मुंद्राक क्र.आर-314758 रु.1000 चा दि.12.11.2014 ला खरेदी केला असून करारनामा दि.30.08.2014 ला केल्याचे दर्शविले आहे. करारनामा केल्यानंतरच कार्यारंभ आदेश देणे अपेक्षित आहे. परंतु संबंधीत कंत्राटदाराने 1.09.2014 पासून कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षरी केली आहे. कामाची सुरूवात प्रत्यक्षात कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर होते. त्यामुळे युवाप्रहार यांनी दि.12.11.2014 नंतरच कामाला सुरूवात केल्याची दिसून येते. परिणामी दि.1.09.2014 ते 11.11.2014 या कालावधी प्रभाग 14 (एस आर पी एफ) च्या 24 कामगारासाठी रु.2,44,444/- प्रतीमहिना दराने एकूण रु.5,78,517/- चे प्रदान करण्यात आले. नियमबाहय प्रदानाची रक्कम रु.5,78,517/- वसुलपात्र ठरते.

प्रदानातील अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.2 दि.19.01.2018, क्र.6 दि.20.01.2018 क्र.110 दि.04.04.2018 व क्र.166 दि.04.05.2018 नुसार अभिलेख सादर करणे तसेच आक्षेपीत मुद्याचे अनुषंगाने खुलासा करण्यास सुचविले होते. प्राप्त प्रमाणके तसेच उपलब्ध अभिलेख्यावरुन लेखापरिक्षण करण्यात आले. अर्धसमास पत्रानुसार खुलासा प्राप्त झालेला नाही. परिणामी आक्षेप नोंदविण्यात येत आहे. वरील आक्षेपित मुद्यांचे अनुषंगाने मनपाच्या अंतर्गत लेखापरिक्षण पथकामार्फत सखोल तपासणी करुन अहवालासह अनुपालन करावे.

DATDUBM6401 (Ref No : 166)

66 दैनदिन साफसफाईचे कंत्राटदारांना प्रदान करतांना 13.5% सेवा शुल्क अदा केल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत.

अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :147 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 89401030.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4879030.00/-

भारत सरकार, वित्त विभाग, सेवाकर अधिसुचना क्र. 25/2012 दिनांक 20.06.2012 नुसार महानगरपालिकेस सेवा पुरविण्यात आलेल्या कोणत्याही सेवा हया सेवाकरापासून मुक्त आहे. असे असतांना मनपाने शहरातील प्रभागवार दैनदिन साफसफाईचे कामाकरीता सफाई कामगारांचे दर निश्चित करतांना कंत्राटदारास देय होणा-या रकमेवर 13.5% सेवाकर लागू केल्याने मनपाची रु.11410470/- एवढया रकमेची हानी झाली.

महानगरपालिका अमरावती अंतर्गत एकूण 43 प्रभागाकरीता दैनदिन साफसफाईच्या सन 2012-13 करीता मंजूर करण्यात आलेल्या निविदांची मुदत दिनांक 31.08.2013 ला संपुष्टात आली. मनपा स्थायी समिती ठराव क्र.119 दि. 31.08.2013 नुसार दि.1.09.2013 ते 31.10.2014 पर्यंत मुदत देण्यात आली. त्यानंतर सन 2014-15 या कालावधीकरीता नव्याने निविदा मागविण्यात आल्या असून एकूण 43 प्रभागातील दैनदिन साफसफाईच्या कामाकरीता मनपा स्थायी समित ठराव क्र. 73 नुसार मंजूरी दिली. साफसफाईच्या कामाकरीता प्रती कामगार वेतनाचे दर निश्चित करतांना सेवा शुल्काची 13.5% रक्कम विचारात घेवून कंत्राटमुल्य निश्चित करण्यात आल्याने साफसफाईच्या कंत्राटदारास देय नसलेल्या रकमेचे अतिप्रदान झाले असून याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे.

1. महानगरपालिका, अमरावतीच्या स्वच्छता विभागामार्फत 43 प्रभागाकरीता दैनदिन साफसफाईचे कामाकरीता कंत्राटदाराची निविदाव्दारे नियुक्ती करण्यात आली असून कंत्राटदाराचे रकमेवर महानगरपालिका 13.5% दराने सेवा कर कंत्राटदाराला अदा करते. परंतु भारत सरकार, वित्त विभाग, सेवाकर विषयक अधिसुचना क्रमांक 25/2012 दिनांक 20.06.2012 नुसार सदर अधिसुचनेच्या परि. 25 नुसार Service Provided to Government, a local authority or a Governental authority by way of-

1) Carrying out any activity in relation to any function ordinarity entrusted to a municipality relation to water supply, public health, sanitation conservancy, solid waste management or slum improvement and up gradation; or
2) Repair or maintenance of a vessel or an aircraft ;

असे नमूद आहे, त्यामुळे महानगरपालिकेस पाणिपुरवठा, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक स्वच्छता, संवर्धन घनकचरा व्यवस्थापन, गलिच्छ वस्ती सुधारणा या कामाकरीता पुरविण्यात आलेल्या कोणत्याही सेवा हया सेवाकरातून कर मुक्त आहे. तसेच याबाबत सहाय्यक आयुक्त, केन्द्रीय उत्पादन शुल्क अमरावती यांचे पत्र क्र. IV(16)19-117/ST/AMT/ 2010 अमरावती दि.31.07.2013 नुसार महानगरपालिकेस पुरवित असलेल्या सेवा करमुक्त असल्याचे कळविले आहे. त्यामुळे या कामाकरीता नियुक्त केलेल्या कंत्राटदारांना सेवाकर अदा करता येणार नाही. असे असतांना कंत्राटदारास 13.5% दराने सेवा शुक्ल अदा करण्यात येत असल्याचे मुख्य लेखा परिक्षण विभागाने दि. 11.07.2014 ला सादर करण्यात आलेल्या अनुवृत्ती

पत्रात (पृष्ठ 118) नमूद आहे.

2. उक्त अधिसुचना दिनांकापासून म्हणजेच दिनांक 20 जून 2012 पासून आजपावेतो अमरावती महानगरपालिकेने कंत्राटदारास अदा केलेली 13.5% दराने सेवाकराची रक्कम कंत्राटदाराने कामगार आयुक्त, अमरावती यांचेकडे जमा केल्याबाबत मनपास सादर केलेल्या चलानच्या प्रतीवरुन परिगणना करुन कामगार आयुक्त अमरावती अथवा संबंधीत कंत्राटदाराकडून वसुल करण्यात यावी.

मनपा अमरावतीने सन 2012 ते 2015 या कालावधीत दैनदिन साफसफाईचे कामासाठी खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आले.

वर्ष	प्रदान केलेली रक्कम
2012-13	6,17,40,980/-
2013-14	11,58,98,220/-
2014-15	8,94,01,030/-

सन 2014-15 मध्ये दैनदिन साफसफाईच्या कामासाठी अदा करण्यात आलेले सेवा कराची रक्कम खालीलप्रमाणे-

सहाय्यक कामगार आयुक्त, अमरावती यांचे पत्र दि. 24.04.2014 नुसार प्रति कामगार प्रति महिना मुळ वेतन रु.4450/- अधिक खास भत्ता रु.2593.50 असे एकूण रु.7043.50 देय होईल.

एकूण 43 प्रभागामधील कामगाराची संख्या 1000

प्रति कामगार प्रतिमहिना वेतन रु.7043.50 X 1000 = रु.70,43,500/-

प्रति महिना खर्च रु.70,43,500/- X 12 महिने = रु.8,45,22,000/-

सेवा शुल्काची रक्कम रु.8,45,22,000/-X 13.5% = रु.1,14,10,470/-

सेवा शुल्कापोटी सन 2014-15 मध्ये एकूण रु.1,14,10,470/- चे अतिप्रदान झाल्याचे दिसून येते. याबाबत वसुलीची कार्यवाही करुन अनुपालन करावे.

3. सन 2014-15 मध्ये एकूण सफाई कामगार संख्या 1000 प्रति महिना प्रति कामगार वेतन रुपये 7043.50 प्रमाणे एका महिन्याचे वेतन रु.70,43,500/- देय असून एका वर्षात रु. 8,45,22,000/- एवढी रक्कम अदा करावयाची असतांना अर्थसंकल्प पुस्तकामध्ये दैनदिन साफसफाईवरील प्रत्यक्ष खर्च रु. 8,94,01,030/- एवढा नमूद केला आहे. सन 2014-15 मध्ये दैनदिन साफसफाईचे कामासाठी एकूण देय रक्कम रु. 8,45,22,000/- अदा करावयाची असतांना रु.8,94,01,030/- एवढी रक्कम अदा करण्यात आल्याने रु.48,79,030/- एवढे जादाचे प्रदान झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर प्रदान कोणत्या बाबीवर करण्यात आले, याबाबत सखोल तपासणी करुन अनुपालन करावे.

उपरोक्त प्रकरणी अर्धसमास पत्र क्र. 166 दि.4/05/2018 नुसार विचारणा करण्यात आली होती. परंतु आक्षेप लिहिस्तोवर खुलासा व आवश्यक अभिलेख प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 166)

67 नाली कामगार व सफाई कामगारांना लागू करण्यात आलेल्या नियमबाहय ग्रेड-पे बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :140 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1013399.00 /-

महानगरपालिका, अमरावतीच्या आरोग्य विभागातील स्वच्छता विभाग कार्यासनाकडील वेतन देयकाची पडताळणी केली असता सफाई कामगाराची नियुक्ती वेतन बँड रु.4440-7440 ग्रेड-पे 1300 मध्ये वर्ग-4 चे पदावर करण्यात आली असून मनपाच्या प्रस्तावित आकृतीबंधात सफाई कामगारांना पदोन्नतीचे पद नसल्याने सफाई कामगार हे एकाकी पद आहे. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. आप्रयो1014/प्र.क्र.41/सेवा-3 दि. 5.07.2010 नुसार पदोन्नतीच्या संधी नसलेल्या एकाकी पदांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतंर्गत अतिरिक्त ग्रेड वेतनाचा लाभ देय असताना वर्ग-3 चे पदाचे वेतन-बँड 5200-20200 मधील ग्रेड-पे 1900 लागू करण्यात आल्याने वेतनात अतिप्रदान झाल्याचे दिसून येते.

महानगरपालिका अमरावती अंतर्गत स्वच्छता विभागाकडील सफाई कामगारांच्या मासिक वेतन देयकाची पडताळणी केली असता सफाई कामगारांना वेतन बँड 5200-20200 मधील ग्रेड-पे रु.1900 लागू करण्यात आला. अर्धसमास पत्र क्र.168 दि.04.05.2018 नुसार मनपा अमरावतीचा नगर विकास विभागाने मंजूर केलेला आकृतीबंधाची प्रत पुरविण्यास कळविण्यात आले होते. परंतु ती प्राप्त झाली नाही. स्वच्छता विभागाकडील मासिक वेतन देयकात आकृतीबंधानुसार मंजूर पदाची संख्या, कार्यरत पदे व रिक्त पदे नमूद केली नाही. तसेच तसेच सफाई कामगारांना देय असलेला वेतन-बँड व ग्रेड पे नमूद केलेला नाही.

याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे:-

1. सफाई कामगार (पुरूष) वर्ग-4 चे मासिक देयक माहे जून 2014 देय जुलै 2014 रु.10,13,399/- प्रमाणक क्र.3569 ते 3570 दि. 7.08.2014 या देयकात सफाई कामगारांची एकूण मंजूर पदे, कार्यरत पदे, सफाई कामगारांना देय असलेले वेतन बँड व ग्रेड-पे नमूद केलेला नाही. मनपा अमरावतीच्या प्रस्तावित आकृतीबंधानुसार सफाई कामगार यांना वेतन बँड रु.4440-7440 ग्रेड पे देय असतांना देयकामध्ये रु. 1900 ग्रेड-पे नियमबाहयपणे लागू करण्यात आला आले.

2. रु. 1900 ग्रेड-पे वर्ग-3 चे लिपीकवर्गीय संवर्गाला 5200-20200 मध्ये लागू आहे. नाली कुली व सफाई कामगार या पदावरील कर्मचारी पदोन्नतीचे निकषानुसार आश्वासित प्रगती योजनेच्या लाभास पात्र ठरत असेल तर अशा कर्मचा-यांना वेतन बँड रु.4440-7440 मध्ये रु.1300+300 अतिरिक्त ग्रेड-पे याप्रमाने 1600 एवढे ग्रेड-पे देय ठरते. नाली कुली व सफाई कामगार हे वर्ग-3 चे पदावर पदोन्नतीसाठी पात्र ठरत असतील तरच त्यांना वरिष्ठ पदाचा वेतन बँड 5200-20200 ग्रेड-पे 1900 देय ठरतो.

(अ) परंतु खालील नमूद कर्मचा-यांना 1900 ग्रेड वेतन लागू केल्याने किमान 10 वर्ग पास, वैद्यकिय

तपासणीस पात्र, संगणक हाताळणी परिक्षा उत्तीर्ण करणे, मराठी/ हिन्दी भाषा परिक्षा उत्तीर्ण करणे अथवा सुट प्राप्त करणे, स्थायित्वाचे प्रमाणत्र प्राप्त करणे इत्यादी निकष पुर्ण केले किंवा कसे, याबाबत खुलासा करावा.

प्रमाणक क्र. 3569 ते 3570 दि. 7.08.2014 देयक रु.1013399/-

सफाई कर्मचा-याचे नांव	लागू करण्यात आलेला ग्रेड-पे
श्री. चंदु बसी टाक स. का.	1900
श्री. संजय गोकुल संकत स. का.	1900
श्री. तुळसीदास न. सारसर स. का.	1900
श्री. मुरली मामचंद ठेणवाल स. का.	1900
श्री. घासीराम नारायण कलोसे स. का.	1900
श्री. सुभाष मंगल काकडे स. का.	1900

(ब) सफाई कामगार (स्त्री) प्रमाणक क्र.3549 ते 3550 दि. 1.08.2014 देयक रु. 1005893/-

सफाई कर्मचा-याचे नांव	लागू करण्यात आलेला ग्रेड-पे
श्रीमती नारायणी रामदास चावरे स. का.	1900
श्रीमती सुलोचना न. सोनक्के स. का	1900
श्रीमती विमल दु. चावरे स. का.	1900
श्रीमती पदमा तुलसी कलोसे स. का.	1900
श्रीमती मंगला च. टाक स. का.	1900
श्रीमती रेखा घ. सिरसिया स. का.	1900

(क) नाली कुली प्रमाणक क्र.5247 ते 5248 दि. 25.09.2014 देयक रु. 332461/-

सफाई कर्मचा-याचे नांव	लागू करण्यात आलेला ग्रेड-पे
श्री. मेहबूब खॉ मेहबूब खॉ ईस्माइल कुली	1900
श्री. मारोती महादेव खडसे कुली	1900
श्री. शेख बब्बू शेख कादर कुली	1900
श्री. पांडुरग मा. हिवराळे कुली	1900
श्री. परशराम आ. गुगलमाने कुली	1900
श्री. प्रल्हाद न. वैरागडे कुली	1900

उपरोक्त नमुद कर्मचा-यांची नावे नमुन्यादाखल असून उर्वरीत कर्मचा-यांना लागू करण्यात आलेल्या रु.1900 ग्रे-पे नुसार आश्वासित प्रगती योजनेच्या लाभासाठी पात्र नसलेल्या सफाई कामगार व नाली कुली कर्मचा-यांकडून नियमानुसार देय नसलेल्या ग्रेड-पे च्या अनुषंगाने अती प्रदान रकमेची वसुलीची कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

उपरोक्त प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.170 दि.05/05/2018 नुसार अभिलेख व खुलासा सादर

करण्यास कळविण्यात आले होते. परंतु संबंधीत विभागाकडून खुलासा व आवश्यक अभिलेख माहितीसह प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 170)

69 रमाई आवास घरकुल योजनेतंर्गत लाभार्थ्यांना निवास वाटपातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 07

लेखा शीर्ष :363 शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 134506870.00 /-

अमरावती महानगरपालिकेतील कार्यकारी अभियंता-2 यांचेकडील रमाई आवास योजने अंतर्गत मंजूर घरकुल प्रकरणाची तपासणी केली असता महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. बीसीएच-2009/प्र.क्र.159/मावक-2 दि. 09.03.2010 नुसार लाभार्थ्यांची निवड करतांना निकषानुसार न करणे, लाभार्थ्यांकडून आवश्यक ते अभिलेख प्राप्त करुन न घेणे, काम पुर्णत्वाचा अहवाल सादर न करता अनुदान वाटप करणे, घरकुलाचा ताबा न देणे इत्यादीबाबत करारनाम्यातील अटी व शर्ती तसेच शासन निर्णयाचे मार्गदर्शक सुचनांचे पालन न करणे इत्यादी अनियमितता आढळून आल्या.

महानगरपालिका अमरावती अंतर्गत शहरातील अनुसुचीत जाती व नवबौध्द घटकासाठी सन 2014-15 लेखाशिर्ष 363 अंतर्गत रु. 10000000/- एवढी मुळ तरतूद करण्यात आली होती. या योजनेवर आर्थिक वर्षात रु.13,45,06,870/- एवढा खर्च करण्यात आला. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, शासन निर्णय क्र.बीसीएच-2009/प्र.क्र.159/मावक-2 दि.9.03.2010 नुसार रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करणे, योजनेचे मार्गदर्शन करणे, निवड झालेल्या लाभार्थ्यांचे प्रकरण तयार करणे, जुन्या कच्च्या घराचे व जागेचे मोजमाप करणे तसेच नवीन घराचा आराखडा तयार करणे इत्यादीसाठी मे. पेव्हटेक कंन्स्लटंट पुणे या प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करण्यात आली. या प्रकरणी अभिलेख्याची पडताळणी केली असता लेखापरिक्षणादरम्यान ब-याच अनियमता आढळून आल्या.

याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे:-

1. मनपा स्थायी समिती सभा दि.3.01.2012 च्या ठराव क्र.223 नुसार दि.14.03.2012 ला करारनामा करण्यात आला असून करारनाम्यातील अट क्र.4 नुसार शासन निर्णयातील तरतुदीनुसार लाभार्थीस पात्र ठरविण्याकरीता करारनाम्यातील शर्तीनुसार सर्व कागदपत्रे लाभार्थीकडून प्राप्त करुन लाभार्थीनिहाय नस्ती तयार करण्याची जबाबदारी मे. पेव्हटेक कन्स्लटंट, पुणे यांची होती. घरकुल वाटप केलेल्या लाभधारकांच्या नस्ती तपासल्या असता शासन निर्णयानुसार खालील मुद्याची पुर्तता

केली नसल्याचे आठळून आले.

अ.क्र.	लाभधारकाचे नाव व पत्ता	आढळून आलेल्या त्रृटया
1	श्रीमती माधुरी नामदेव आढवले घर क्र.8412 बिपीएल क्र.28398	1.लाभार्थ्यास दोन पेक्षा जास्त अपत्य आहे.(पाच अपत्य) 2.अंतिम 5% निधी वाटप करतांना सादर केलेल्या फोटोमध्ये घरकुलाचे काम पुर्ण झाले नसल्याचे दिसते.
2	श्रीमती यमुना यशवंत इंदुरकर घर क्र.503 बिपीएल क्र.7356	1. लाभार्थ्यास दोन पेक्षा जास्त अपत्य आहे.(पाच अपत्य) 2.जात वैधता प्रमाणपत्र सादर न करताच ताबा दिला. 3.घरकुलाची जागा लाभार्थिच्या नावाने नाही.
3	श्रीमती कमला गौ. कैशवास घर क्र.1437 बिपीएल क्र.1397	1.लाभार्थ्यास दोन पेक्षा जास्त अपत्य आहे.(तिन अपत्य) 2.पेव्हटेक कसंल्टंट पुणे यांनी सादर केलेल्या Biometric Survey अहवालावर दिनांक नमूद नाही. 3.जात वैधता प्रमाणपत्र सादर न करताच ताबा दिला. 4.फोटोवरून काम पुर्ण झाले नसल्याचे दिसते, असे असतांना अंतिम 5% निधीचे वाटप केले. 5.असेस्टमेंटची प्रत जोडलेली नाही.
4	श्रीमती सुलाचना ग. अडकणे	1.लाभार्थ्यास दोन पेक्षा जास्त अपत्य आहे.(चार अपत्य) 2.घरकुल बांधकामाची जागा नझुलची असून घर टॅक्स पावती क्र.538714 दि.14.12.2009 श्री. चंद्रभान अडकणे यांचे नावाची आहे. 3.जातीचे प्रमाणपत्र श्री. चंदण अडकणे या नावाचे जोडले आहे. जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही.
5	श्रीमती मनोरमा ओम. इंगळे घर क्र. 1010/1 बिपीएल क्र.18238	1.लाभार्थ्यास दोन पेक्षा जास्त अपत्य आहे.(तिन अपत्य) 2. जागा लाभार्थिच्या मालकीची नसून शासकीय जागा असल्याचे मालमत्ता पत्रकाहून दिसून येते. 3.पेव्हटेक कसंल्टंट पुणे पहिल्या टप्प्यातील कामाचा प्रगती अहवाल सादर न करताच त्यानंतरचे निधी वितरण केले आहे. 4.काम पुर्णत्वाचा अहवालासोबत सादर केलेल्या फोटोवरुन काम अपुर्ण असल्याचे दिसून येते. निधी उपयोगीता प्रमाणपत्र घेतल्याचे दिसत नाही.
6	श्रीमती केसरबाई तु. बनसोड घर क्र.1369 बिपीएल क्र.6401	1.लाभार्थ्यास दोन पेक्षा जास्त अपत्य आहे.(पाच अपत्य) 2. घरकुल बांधकाम करण्यात आलेली जागा मालमत्ता पत्रकानुसार श्री. अतुल तुकाराम बनसोड यांचे नावाची असून नझुलची आहे. 3.अर्जासोबत सादर केलेले विद्युत देयक श्री. अतुल तु.

DRAFT

		बनसोड यांचे नावाचे आहे. 4.घरटॅक्स पावती श्री. अतुल तु. बनसोड यांचे नावाची आहे. 5. लाभार्थीने जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. 6.बांधकामाबाबत असेस्टमेंटची प्रत जोडलेली नाही.
7	श्रीमती ताईबाई पु. कुंभलकर घर क्र.778 बिपीएल क्र.3154	1.लाभार्थ्यास दोन पेक्षा जास्त अपत्य आहे.(तिन अपत्य) 2.पेव्हटेक कन्स्लटंट पुणे यांचेकडून Biometric Survey केल्याचा अहवाल सादर केलेला नाही. 3.प्रथम हप्ता व दुस-या हप्त्याच्या निधीबाबत उपयोगीता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. 4.घर टॅक्स पावती लाभार्थिच्या नावाने नाही. 5.लाभार्थीने जातीचा दाखला तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. 6.घरकुलाचा नकाशा मयत पुरूषोत्तम कुंभलकर यांच्या नावाने आहे.
8	श्रीमती नर्मदा महादेव सावळे घर क्र.716 बिपीएल क्र.29494	1.लाभार्थ्यास दोन पेक्षा जास्त अपत्य आहे.(पाच अपत्य) 2.जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. 3.लाभार्थ्याचे नाव श्रीमती नर्मदा महादेव सावळे असून बि पीएल प्रमाणपत्र क्र.29494 श्रीमती नर्मदा साबळे नावाचे सादर केलेले आहे.

2. शौचालय बांधण्यासाठी लाभार्थ्यांना रु.12000/- ची प्रतिपूर्ती पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून अनुज्ञेय आहे. शासन निर्णयानुसार लाभधारकांना निर्धुर चुल व शौचालय पुरविणेबाबत सुचना असतांना त्याप्रमाणे विभागाने कार्यवाही न केल्याने लाभधारकांना लाभापासून वंचित ठेवण्यात आले.

3. करारनाम्यातील अट क्र. 11 नुसार बांधकाम सुरू असतांना बांधकामाचा दर्जा सार्वजनिक बांधकाम विभागाचे निकषानुसार उत्कृष्ठ ठेवण्याची जबाबदारी सल्लागार एजन्सीची असल्याने प्रत्येक घरकुलाचे कामाचे गुणवत्ता नियंत्रणाचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक होते. परंतु अशा प्रकारचे प्रमाणपत्र अभिलेख्यात आढळून आले नाही. उक्त, शासन निर्णयातील परि. 24 नुसार घरकुल बांधकामाचा दर्जा संचालक, पुणे यांनी जिल्हानिहाय नियुक्त पथकाकडून करणे बंधनकारक असतांना अशा पथकाकडून कामाच्या दर्जाबाबतचा अहवाल नस्तीत आढळून आला नाही.

4. रमाई आवास योजने अंतर्गत घर बांधकाम खर्चाचे अंदाजपत्रक, नवीन बांधकामाचे मुल्यांकन सर्वेक्षण एजन्सीकडून प्राप्त न करता योजनेचा लाभ प्रदान करण्यात आला आहे. करारनाम्यातील अट क्र.11 नुसार या योजनेतंर्गत प्रत्येक काम पूर्ण झाल्यानंतर त्याच्या पूर्ण कामाच्या पूर्णत्वाचे प्रमाणपत्र सल्लागार संस्थेचे आर्कीटेक्ट/अभियंता यांच्या स्वत:च्या सहीनिशी मनपास सादर करणे आवश्यक

असून सल्लागार एजन्सीने एकाही लाभार्थ्याला पुर्णत्वाचा दाखला व ताबा न देताच लाभार्थ्यांना अंतिम हप्ता प्रदान करण्यात आला.

5. मनपा अमरावतीच्या संबंधीत विभागाने रमाई आवास योजनेच्या व्यापक प्रसिध्दीसाठी वृत्तपत्रात जाहिरात तसेच मेळावे घेवून प्रसिध्दी दिली असल्याचे अभिलेख आढळून आले नाही. त्याचप्रमाणे पात्र लाभधारकाची यादी विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचे पातळीवर प्रसिध्द केल्याचे नस्तीत आढळून आले नाही. तसेच सन 2014-15 करीता उद्दिष्ट निश्चित करण्यात आले नसल्याने या योजनेसाठी शासनाकडून निधी प्राप्त झाला नाही. परिणामी महानगरपालिका अमरावती क्षेत्रातील लाभार्थी या योजनेपासून वंचित राहिले.

6. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, शासन निर्णय क्र.बीसीएम-2009/प्र.क्र.159 /मावक-2 दिनांक 9.03.2010 मधील परिच्छेद 3 नुसार लाभार्थ्यास शासनाच्या एकाच योजनेचा लाभ मिळेल कोणत्याही परिस्थितीत शासनाच्या योजनेतंर्गत लाभार्थ्यास दुबार लाभ मिळणार नाही, असे नमूद आहे. या योजनेचा लाभधारकास दुबार लाभ मिळू नये, याबाबत कुठलीही खात्री केल्याचे अभिलेख्यावरून दिसून येत नाही.

7. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. बीसीएच- 2009/प्र.क्र.159/मावक-2 दिनांक 9.03.2010 मधील मुद्दा क्र.11 नुसार बांधकाम व प्रकल्प व्यवस्थापनाची कामे सेवाभावी संस्थाकडून करुन घेण्याचे निर्देश असतांना मनपाने नोंदणीकृत व अशासकिय सेवाभावी संस्थाकडून एकमुस्त शुल्क तत्त्वावर निविदा मागविल्या असून त्यामूळे उक्त शासन निर्णयाचे उल्लंघन झाले.

उपरोक्त प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.171 दि.05.05.2018 अन्वये आवश्यक ते अभिलेख्यासह खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु संबंधीत विभागाकडून आवश्यक अभिलेख व आक्षेपित मुद्यावरील खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 171)

70 मनपाच्या कर्मचा-यासाठी सेवानिवृत्तीनंतरच्या दायित्वासाठी तसेच मासिक निवृत्ती वेतनाची अदायगीसाठी निवृत्तीवेतन अशंदान निधीची स्थापना न करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :105 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 206336060.00 /-

दि.1 नोव्हे. 2005 रोजी किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त कर्मचा-यांना निवृत्तीवेतन योजना बंद केली असली तरी तत्पुर्वी सेवेत नियुक्त कर्मचा-यांना निवृत्ती वेतन देय आहे. अशा मनपाच्या कर्मचा-यांना सेवानिवृत्तीनंतर देय होणारे मासिक सेवानिवृत्ती वेतनासाठी निवृत्तीवेतन अंशदान निधीची स्थापना करणे आवश्यक आहे. परंतु मनपा अमरावतीने अशा प्रकारच्या निधीची स्थापना केली नसल्याचे निदर्शनास आले.

महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्तीवेतन)नियम 1982 मधील नियम 110(2)(बी)नुसार दि. 27 फेब्रू. 2009 नुसार हकीम समितीच्या शिफारशी स्विकारल्याच्या दिनांकापासून दहा वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त परंतु 20 वर्षापेक्षा कमी एवढी सेवा पूर्ण केल्यानंतर नियतवयमान, पुर्ण सेवा, रुग्णता किंवा भरपाई निवृत्तीवेतनावर सेवानिवृत्त होणा-या शासकीय कर्मचा-यास महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार दिनांक 1 नोव्हेंबर 2005 पुर्वी सेवेत नियुक्त कर्मचा-यांना सेवानिवृत्ती वेतन देय आहे.

महानगरपालिका, अमरावतीमध्ये सध्या अंदाजे 2550 एवढे निवृत्ती वेतनधारक निवृत्तीवेतन घेत असून निवृत्तीवेतनधारकावर सन 2014-15 मध्ये रु. 206336060/- एवढा खर्च झाला आहे. मागील काही वर्षातील निवृत्तीवेतनावर खालीलप्रमाणे खर्च झाला आहे.

सन 2012-13	खर्च पद क्र.105	रु.16,11,85,080/-
सन 2013-14	खर्च पद क्र.105	रु.20,33,00,810/-
सन 2014-15	खर्च पद क्र.105	रु.20,63,36,060/-

वर नमुद निवृत्तीवेतनावरील खर्चाची आकडेवारी लक्षात घेता निवृत्तीवेतनावरील खर्चात अधिकाधिक वाढ होत आहे.

मनपाची आर्थिक स्थिती नाजूक असल्याने सेवानिवृत्त कर्मचा-यांना सेवानिवृत्तीनंतरचे लाभ देण्यास पुरेसा निधी नसल्याने लाभाची अदायगी करण्यास विलंब होत आहे. तसेच मनपाने निधी अभावी सेवानिवृत्त कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 मधील नियम 5(1) नुसार देय होणारे अंशराशिकरणाचे प्रदान करणे बंद असून सन 2016-17 चे अर्थसंकल्प पुस्तकामध्ये निवृत्तीवेतनधारकांना देय होणा-या रकमेची माहे मार्च 2016 अखेर थकबाकी रु.45,80,00,000/- एवढी असल्याचे दिसून आले.

माहे फेब्रूवारी 2016 चे दायीत्व दर्शविणारे विवरण खालीलप्रमाणे आहे.

1. सेवानिवृत्ती वेतन थकबाकी रु.2.50 कोटी
2. सेवानिवृत्तीवेतन उपदान रु.0.80 कोटी
3. सेवानिवृत्ती अंशराशिकरण रु.4.00 कोटी
4. सेवानिवृत्ती अर्जित रजा रोखीकरण रु.1.50 कोटी
5. सेनिवे/कुनिवे थकबाकी रु.9.50 कोटी
6. 6 वे. आ. उपदान थकबाकी रु.15.00 कोटी
7. 6 वे. आ. सेवानिवृत्त शिक्षकांचे सेनिवे/कु.नि.वेतन थकबाकी रु.5.50 कोटी

8. से.नि. शिक्षकांचे उपदान रु.3.50 कोटी
9. कर्मचा-यांचे रजा रोखीकरण थकबाकी रु.4.00 कोटी
एकूण रु.45.80 कोटी

सेवानिवृत्तीनंतरचे देय लाभ व मासिक निवृत्तीवेतनाचे दायित्वासाठी निवृत्तीवेतन अंशदान निधीची स्थापना करणे आवश्यक आहे. मनपा अमरावतीने सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान लेखा विभाग अंतर्गत निवृत्ती वेतन कार्यासनाचे अभिलेख्याची पडताळणी केली असता सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या मासिक निवृत्ती वेतन अदायगीसाठी निवृत्ती वेतन अंशदान निधीची स्थापना केली नसल्याचे निदर्शनास आले.

यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत-

1. मनपाच्या सेवानिवृत्त कर्मचा-यांना देय होणा-या मासिक निवृत्ती वेतनाच्या दायित्वाकरीता निवृत्ती वेतन अंशदान निधीची स्थापना करुन त्यात अशा प्रकारचा निधी जमा करण्यात येतो. जेणेकरुन मनपाच्या आर्थिक अडचणीदरम्यान अशा प्रकारच्या निधीतून भविष्यात मासिक सेवानिवृत्ती वेतनाचे प्रदान करणे सोईचे होईल. परंतु मनपा अमरावतीने अशा प्रकारच्या निधीची स्थापनाच केली नसल्याचे निदर्शनास आले.

2. महानगरपालिका कर्मचा-यांना देय असणा-या निवृत्ती वेतनासाठी लेखाशिर्ष खर्च पदाच्या वार्षिक सरासरी खर्चाच्या विहित दराएवढे अंशदान निवृत्ती वेतन निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारच्या अंशदान निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली नसल्याचे सन 2014-15 चे अर्थसंकल्प पुस्तकावरुन दिसून आले.

3. अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या निवृत्तीवेतन अंशदान निधीसाठी स्वतंत्र बँक खाते ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारचे बँकेत खाते उघडण्यात आले नाही. अर्थसंकल्पात निवृत्तीवेतन अंशदान निधीची तरतूद करुन असा निधी मनपाचे नावे बँक खाते उघडून निधी खात्यात जमा करणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

याप्रकरणी अर्धसमास पत्र क्र.169 दि.04/05/2018 नुसार अभिलेख सादर करुन खुलासा सादर करण्यास सुचविले होते. परंतु अभिलेख तसेच खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 169)

73 अतिक्रमणाचे काम केले नसलेल्या (कामावर अनुपस्थित असलेल्या) दिवसांची रु.1.18 लाख एवढे मजूरीचे प्रदान करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :202 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 700000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 118372.00/-

मनपाचे अतिक्रमण विभागाने अतिक्रमण पथकाकरिता लावलेल्या मजूरांची हजेरी रजिष्टरवर स्वाक्षरी नसतांना, वाहन बंद असलेल्या दिवशी तसेच गैरहजेरीच्या कालावधीचे रु.1,18,372/- एवढे मजूरीचे प्रदान केल्याने आर्थिक अनियमितता झाल्याचे दिसून येते.

मनपाचे अतिक्रमण विभागाने शहरातील रस्त्यावरील अतिक्रमण काढणे, अनधिकृत बांधकाम पाडणे, शहरातील लहान मोठे नाले साफ करणे इ.कामाकरिता लावण्यात आलेल्या मजूरांची मजूरी प्रदान केल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. सदर अभिलेखाची तपासणी केली असता वाहन बंद असलेल्या दिवशी तसेच सार्वजनिक सुट्टीचे दिवशी व ज्या दिवशी मजूर गैरहजर आहे अश्याही कालावधीचे मजूरीचे प्रदान केल्याचे दिसून येते.

उदाहरणादाखल तपशील खालीलप्रमाणे आहे :-

(1) काम बंद असल्याच्या दिवसांसाठी प्रदान – रकाना क्र.2 मध्ये नमूद दिनांकासाठी (रकमा रुपयांत)

अ.क्र.	काम बंद असल्याचा दिनांक	मजूरांचे नांव	प्रदान केलेली मजूरी	तपशील
1	2	3	4	5
1	एप्रिल-14 6,10,20,24,26,27 माहे मे-14 - 2,15,16,17,18,19,20, 21,22,23,25,29,30,31	श्री.लक्ष्मण तिहीले, वाहन चालक, 1) प्र.क्र.1711, दि.12.6.2014, रु.100000/- 2) प्र.क्र.2703, दि.11.7.2014, रु.100000/- 3) प्र.क्र.3724, दि.11.8.2014, रु.100000/-	400 x 20 = 8000	जेसीबी 3D मशीन बंद असतांना मजूरीचे प्रदान दर्शविण्यात आले.
2	एप्रिल-14 – 7,15,22,29	श्री.वासुदेव काठोडे, वाहन चालक 1) प्र.क्र.1711, दि.12.6.2014 2) प्र.क्र.2703, दि.11.7.2014.	400 x 4 = 1600	एमएच-27-ऐ-3821 वाहन बंद असतांना मजूरीचे प्रदान दर्शविण्यात आले.
3	मे-14 – 2,3,4,5, 21,25,29,30,31	श्री.राजेंद्र गव्हाने, वाहन चालक	(Fix pay Rs.15000) (15000 x 16 ÷	एमएच-27-ऐ-3821 वाहन बंद असतांना मजूरीचे प्रदान

	जून-14 – 12,17 जुलै-14 – 26, 27,28,29,30 उदाहरणादाखल	1) प्र.क्र.2703, दि.11.7.2014. 2) प्र.क्र.3724, दि.11.8.2014 3) प्र.क्र.5216, दि.23.9.2014, रु.100000/- 3) प्र.क्र.7545, दि.12.11.2014, रु.100000/-	30) = 8000	
		एकूण	**17600**	

आक्षेपाधीन रक्कम रु.5,00,000/- वसुलपात्र रक्कम रु.17600/-

(2) <u>हजेरी रजिष्टरवर स्वाक्षऱ्या नसलेल्या दिवसांसाठी मजूरीचे प्रदान</u> :-

अ.क्र.	मजूराचे नाव	अनुपस्थित असल्याचा दिनांक	प्रदान केलेली रक्कम	गैरहजेरीच्या दिवसांसाठी प्रदान केलेली जादा रक्कम
1	श्री.सुरेंद्र वानखडे, वाहन चालक	एप्रिल-14 - 10,14,18,26 ऑगष्ट-14 - 1,9,15,23 सप्टेंबर-14 - 24,27 ऑक्टोबर-14 - 1,15,24,25 डिसेंबर-14 - 24,25	रु.18000/- (प्रति महिना दर)	16 दिवस गैरहजर (18000 x 16 ÷ 30) = 9600
2	श्री.राजेश गव्हाने	एप्रिल-14 - 10,14,18 सप्टेंबर-14 - 29 ऑक्टोबर-14- 6,15,29,30,31 नोव्हेंबर-2014 - 2 डिसेंबर-2014 - 25 फेब्रुवारी-2015 - 20,21	रु.15000/- (प्रति महिना दर)	13 दिवस गैरहजर (15000 x 13 ÷ 30) = 6500
3	श्री.कन्हैय्या जयस्वाल, व्हीडीओग्राफर	एप्रिल-14 - 10,14,18,26 जून-2014 - 28 जुलै-2014 - 12 ऑगष्ट-2014 - 29 सप्टेंबर-2014 - 24,27 ऑक्टोबर-14- 6,11,15,23,24 डिसेंबर-14 - 8,12,13,25 जानेवारी-15 - 24,31	रु.15000/- (प्रति महिना दर)	20 दिवस गैरहजर (15000 x 20 ÷ 30) = 10000

DRAFT

4	श्री.मजहर हुसैन	एप्रिल-14-10,19,20,21,22,28 जून-14 - 15,21,22,30 जुलै-14 – 27,28 ऑगष्ट-14 - 16,23 सप्टेंबर-14 – 29	प्रतिदिन मजूरी रु.208/- प्रमाणे प्रदान.	15 दिवस गैरहजर (208 x 15) = 3120
5	श्री.मनिष काकडे	एप्रिल-14 – 10 मे-14 - 22,23,27 जून-14 - 2,3,5,6,7,8,19,26,27,29 जुलै-14 - 1,8,9,11,25 ऑगष्ट-14 - 1,8,11,12,21,28,29,30 सप्टें.-14 - 1,2,4,5,9,10,11,12,15 ऑक्टो.- 14 - 9,14,15,16,17,18	प्रतिदिन मजूरी रु.208/- प्रमाणे प्रदान.	42 दिवस गैरहजर (208 x 42) = 8736
6	श्री.अमित मानके	एप्रिल-14- 6,20,21,22,23,24,25,26 मे-14 -10,11,15,18,24,25,30,31 जून-2014 - 16,22 जुलै-14 - 18,26,27 ऑगष्ट-14 - 1,24,27 सप्टेंबर-14 - 1 ऑक्टो-14 - 6,8,9,15	प्रतिदिन मजूरी रु.208/- प्रमाणे प्रदान.	29 दिवस गैरहजर (208 x 29) = 6032
7	श्री.राजेंद्र चौधरी	एप्रिल-14 - 12,13,18,20,27 मे-14 - 4,7,11,13,18,23,24,25,31 जून-14 - 2,3,4,8,9,10,11,12,13, 14,15,16,17,18,19,20,21,22,29 जुलै-14 - 27 ऑगष्ट-14 - 1,14,26 सप्टेंबर-14 - 16,26 ऑक्टोबर-14 - 7,8,9,15,16	प्रतिदिन मजूरी रु.208/- प्रमाणे प्रदान.	44 दिवस गैरहजर (208 x 44) = 9152
8	श्री.हेमंत जयस्वाल	एप्रिल-14 - 10,12,13,18,20,27 मे-14 - 6,9,10,11,15,16,8,25 जून-14 - 8,21,22 जुलै-14 - 25 ऑगष्ट-14 - 21 ऑक्टोबर-14 - 15,16	प्रतिदिन मजूरी रु.208/- प्रमाणे प्रदान.	21 दिवस गैरहजर (208 x 21) = 4368
9	श्री.मोहित साहू	एप्रिल-14 - 6,10,22 मे-14 - 2,3,4,10,11,15 जुलै-14 - 3,6,7,8,9,14,26,27 ऑगष्ट-14 - 1,2	प्रतिदिन मजूरी रु.208/- प्रमाणे प्रदान.	21 दिवस गैरहजर (208 x 27) = 5616

DRAFT

		सप्टेंबर-14 - 11,15,25,29,30 ऑक्टोबर-14 – 1,4,15		
10	श्री.बबलू यादव	एप्रिल-14 - 10,21,22 जून-14 - 19,20 ऑगष्ट-14 - 16,26 सप्टेंबर-14 - 5 ऑक्टोबर-14 - 1,9,14,15	प्रतिदिन मजूरी रु.208/- प्रमाणे प्रदान.	12 दिवस गैरहजर (208 x 12) = 2496
11	श्री.गजानन वनवे	एप्रिल-14 - 6,13,20	प्रतिदिन मजूरी रु.208/- प्रमाणे प्रदान.	3 दिवस गैरहजर (208 x 3) = 624
12	श्री.आदेश अढाऊ	ऑक्टोबर-14 - 15 नोव्हेंबर-14 – 13	प्रतिदिन मजूरी रु.208/- प्रमाणे प्रदान.	2 दिवस गैरहजर (208 x 2) = 416
			एकूण	**66660**
13	श्री.सतिश भोपसे	**एप्रिल-14** – 1,2,3,4,5,6,7,9, 10,11,12,13,15 = 13 दिवस (प्र.क्र.2703, दि. 11.7.2014 व प्र.क्र.1711, दि.12.6.2014) **जून-2014** – 25,26,27,28, 29,30 = 6 दिवस (प्र.क्र.6725, दि.22.10.2014), रु.100000/- **जुलै-2014** – 1 ते 12, 14 ते 18 = 17 दिवस (प्र.क्र.7545, दि.12.11.2014) **जुलै-2014** – 27,28 = 2 दिवस **माहे ऑगष्ट-2014** – 5,6,11,12,14 = 5 दिवस (प्र.क्र.8839, दि.15.12.2014, रु.100000/-)	प्रतिदिन मजूरी रु.208/- प्रमाणे प्रदान.	43 दिवस गैरहजर (208 x 43) = 8944
14	श्री.सतिश बाभुळकर	**एप्रिल-14** – 1,2,3,4,5,6,16, 17,18,19,20, 21,22,23,24, 25,26,27,29,30 = 20 दिवस **मे-2014** - 2,3,4,5,6,7,8,9 = 8 दिवस (प्र.क्र.2703, दि.11.7.2014)	प्रतिदिन मजूरी रु.208/- प्रमाणे प्रदान.	58 दिवस गैरहजर (208 x 58) = 12064

DRAFT

		जून-2014 – 25,26,27,28, 29,30 = 6 दिवस (प्र.क्र.6725, दि.22.10.2014) **जुलै-2014** – 1 ते 12, 14 ते 18 = 17 दिवस (प्र.क्र.7545, दि.12.11.2014) **जुलै-2014** – 27,28 = 2 दिवस (प्र.क्र.7545, दि.12.11.2014) माहे **ऑगष्ट-2014** – 5,6,11,12,14 = 5 दिवस (प्र.क्र.8839, दि.15.12.2014)		
15	श्री.राहुल दंदे	जून-2014 - 2 ते 24 = 23 दिवस (प्र.क्र.5216, दि.23.9.2014)	प्रतिदिन मजूरी रु.208/- प्रमाणे प्रदान.	23 दिवस गैरहजर (208 x 23) = 4784
16	श्री.प्रतिक भोरे	**जुलै-2014** – 19,21,22,23, 24,25,27,28,31 = 9 दिवस (प्र.क्र.7545, दि.12.11.2014) **माहे ऑगष्ट-2014** – 4,5,6, 7,11,12,14,16,19,21,22, 23,27,28,29,30 = 16 दिवस (प्र.क्र.7545, दि.12.11.2014, प्र.क्र.8839, दि.15.12.2014)	प्रतिदिन मजूरी रु.208/- प्रमाणे प्रदान.	25 दिवस गैरहजर (208 x 25) = 5200
17	श्री.सचिन रामेकर	**जुलै-2014** – 19, 21 ते 28 = 9 दिवस (प्र.क्र.7545, दि.12.11.2014) **माहे ऑगष्ट-2014** – 2,5,6,11,12,14 = 6 दिवस (प्र.क्र.7545, दि.12.11.2014, प्र.क्र.8839, दि.15.12.2014)	प्रतिदिन मजूरी रु.208/- प्रमाणे प्रदान.	15 दिवस गैरहजर (208 x 15) = 3120
			एकूण	**100772**

आक्षेपाधीन रक्कम रु.2,00,000/- वसुलपात्र रक्कम रु.1,00,772/-

तरी वरील अ.क्र.1 ते 2 नुसार प्रदान केलेली मजूरीची अतिरिक्त रक्कम रु.1,18,372/- वसुल करुन मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.191, दिनांक 30.5.2018 नुसार खुलासा मागविला असता कोणतेही अनुपालन प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 191)

DRAFT

77 कंत्राटपध्दतीने चालविण्यास दिलेल्या सांस्कृतिक भवनापासून ठराविक रकमांच्या तुलनेत दोन स्वतंत्र अभिलेख्यानुसार वेगवेगळी व कमी रकम प्राप्त होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 2

लेखा शीर्ष :35 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 17717995.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 602655.00/-

मनपा अमरावतीच्या सांस्कृतिक भवनाच्या भाडे रकमेपोटी कार्यादेशापासून तीन वर्षात 1.77 कोटी महसूल अपेक्षित असताना अंदाजपत्रक पुस्तकानुसार व बाजार व परवाना विभागाच्या अहवालानुसार अनुक्रमे रु. 1.42 कोटी व रु.47.91 लाख कमी प्राप्त झाले असे दिसून येते. याशिवाय अभिप्रेत नसताना अभिकर्त्याने मनपाच्या कार्यक्रमांपोटी रु. 6.00 लाखाची परस्पर कपात केली आहे.

अमरावती शहरात मनपाच्या मालकीचे संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृह असून 2014-2015 च्या लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेल्या नस्तीप्रमाणे दि. 01.09.2003 पासून प्रथम खाजगी अभिकर्त्याद्वारे व दि. 02.04.2008 पासून मनपाद्वारे चालविले जात होते परंतु उत्पन्नापेक्षा खर्च अधिक होत असल्यामुळे जाहिर निविदाद्वारे खाजगी अभिकर्त्याकडून वार्षिक दर प्राप्त करण्यात आले. सन 2013-2014 मध्ये निविदा प्रक्रिया पूर्ण करून स्थायी समिती ठराव क्र. 10, दि. 05.04.2013 अन्वये 'सांस्कृतिक भवन चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे' या प्रयोजनासाठी सर्वात अधिक दराच्या मे. आनंद कॅटरर्स यांची रु. 56,20,300/- प्रतिवर्ष मूल्याची निविदा स्विकृत करण्यात आली. या संदर्भात 15 वर्षासाठी देणार मूल्यात प्रतिवर्ष 5% वाढ या दरासह दि. 22.05.2013 रोजी करारनामा करून दि. 03.06.2013 रोजी कार्यादेश देण्यात आला.

यावरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.

1. सांस्कृतिक भवनापासून कार्यादेश दिल्याच्या दिनांका पासून अपेक्षित भाडे रकमेच्या तुलनेत प्रत्यक्ष प्राप्त रकमेची तुलना करताना वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक पुस्तिकेतील प्रत्यक्ष प्राप्त नोंदविलेली रक्कम व नस्ती मध्ये उपलब्ध बाजार व परवाना विभागाच्या पत्रातील प्राप्त रकमेच्या आकडेवारी मोठ्या प्रमाणावर तफावत आढळून आली. त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

अ.क्र.	करारनाम्याचा वार्षिक कालावधी	करारनाम्यानुसार अपेक्षित भाडे रकम (रुपये)	अंदाजपत्रक पुस्तकातील प्रत्यक्ष भाडे रकम (रुपये)	अधिक्षक, बाजार व परवाना विभाग यांचे (अतिरिक्त शहर अभियंता यांना लिहिलेले) पत्र क्र.562,दि. 03.10.2015 नुसार

				प्राप्त रकम
1	03.06.2013 ते 02.06.2014	5620300	1309460 (13-14)	5620300
2	03.06.2014 ते 02.06.2015	5901315 (5%वार्षिक वाढीसह)	1400000 (14-15)	5901316
3	03.06.2015 ते 02.06.2016 (माहे जून,जुलै, ऑगस्ट 2015 ची त्रैमासिक किस्त)	6196380 (5%वार्षिक वाढीसह)	802420 (15-16)	802520 (+602655/- मनपाने विविध कार्यक्रमासाठी भाडे रकम न भरल्याने वार्षिक रकमेतून परस्पर कपात)
	एकूण	1,77,17,995	35,11,880	1,29,26,691
	अभिलेख्याप्रमाणे कमी/जास्त प्राप्त		(-) 1,42,06,115 कमी प्राप्त	(-) 47,91,304 कमी प्राप्त

वरील प्रमाणे मनपाच्या 2016-2017 च्या वार्षिक अंदाजपत्रकात नोंदविलेली 2013-2014 ते 2015-2016 मधील प्रत्यक्ष रकमेचा विचार केल्यास मनपास दि. 03.06.2013 ते 02.06.2016 या करारनाम्याच्या 3 वर्षाच्या कालावधीत रु. 1.77 कोटीच्या तुलनेत रु. 1.42 कोटी रकम कमी प्राप्त झाली. तर संबंधित बाजार विभागाच्या अधिक्षकांच्या अहवालानुसार रु. 47.91 लाख कमी प्राप्त झाले. याबाबत विभागास खुलासा मागविण्यात आला. तसेच प्रत्यक्ष पावत्या सादर करण्यास निर्देशित केले असता त्याचे अनुपालन करण्यात आले नाही. त्यामुळे मनपातील दोन अभिलेख्यातील प्राप्त महसुलातील तफावतीमुळे मनपाच्या नुकसानीची शक्यता नाकारता येत नाही.

2. स्थायी समिती ठराव क्र. 10 दि.05.04.2013 अन्वये सार्वजनिक दराची निविदा स्विकारताना निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार 'आयुक्त आदेशित करतील त्या कार्यक्रमासाठी सांस्कृतिक भवनाचा हॉल व परिसराचा कोणताही भाग उपलब्ध करून देण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील.' यावरून अभिकर्त्याने सांस्कृतिक भवन मनपास विनामूल्य उपलब्ध करून देणे असे स्थायी समितीस अभिप्रेत असावे. परंतु या संबंधाने दि. 22.05.2013 रोजी केलेल्या करारनाम्यात सदरच्या अटीचा समावेश करण्यात आला नाही. परिणामत: मनपाच्या कार्यक्रमासाठी उपलब्ध केलेल्या मनपाच्याच मालमत्तेपोटी अभिकर्त्याने रु. 6,02,655/- ची भाडेरकमेतून परस्पर कपात केली असे उपरोक्त तक्त्यामधील शेवटच्या रकान्यावरून लक्षात येते. यामुळे मनपाच्या त्या रकमेच्या महसुलाचे नुकसान झाले अशी शक्यता आहे.

DATABWM6901 (Ref No : 59)

79 ऑप्टीकल फायबर केबलचे जाळे टाकणे व अन्य भूमिगत कामासाठी वापरलेल्या जमिनीवरील भाडे रकमांवर रु. 5.87 कोटीचा सेवाकराची आकारणी व वसूली न करण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :12 शासननिधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 474578153.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 58657860.00/-

ऑप्टीकल फायबर केबलचे, वीजतारांचे भूमिगत जाळे उभारणे, इत्यादी प्रयोजनासाठी मनपाहद्दीतील जागा भाडेतत्वावर देण्यात येते. यापासून सन 2012-13 ते 2015-16 या कालावधीत विविध संस्थाकडून रु. 47.46 कोटी एवढे भाडे मनपास प्राप्त झाले असून दि. 01.07.2012 पासून सेवाकराची आकारणी न केल्यामुळे केंद्रशासनाची रु. 5.87 कोटी एवढी तात्पुरती हानी झाली आहे.

मनपाच्या हद्दीतील जागेत दूरसंचार कंपन्यांकडून ऑप्टीकल फायबर केबलचे जाळे जमिनीखाली टाकण्यासाठी तसेच अन्य संस्थाना विविध भूमिगत कामांच्या प्रयोजनासाठी सदरची जागा दीर्घमुदतीसाठी भाडेतत्वावर देण्यात येत असून त्यासाठी मनपाकडून भाडे आकारले जाते. याप्रकारे मनपाच्या मालकीची चल-अचल स्थावर मालमत्ता भाडेतत्वावर किंवा भाडेपट्टीवर देण्याची क्रिया केंद्रशासन वित्त अधिनियम (finance Act 1994) मधील कलम 65 (B) (41) नुसार 'renting' च्या व्याख्येत मोडते. त्यामुळे केंद्रशासन अधिसूचना क्र.36/2012 - ST दि. 20.06.2012 व वरील अधिनियमाचे कलम 65 (105) (ZZZZ) नुसार सदरची सेवा (Renting of immovable property) दि. 01.07.2012 पासून सेवाकरास पात्र करण्यात आली आहे.

वरील तरतुदीना अनुसरून मनपाने दूरसंचार कंपन्यांकडून भाडेरकमांसह प्रचलित दराने सेवाकर आकारून तशी वसुली करणे व त्याचा केंद्रशासनाकडे भरणा करणे अपेक्षित होते. परंतु तसे करण्यात आल्याचे सन 2014-15 च्या संदर्भात मे. रिलायंस यांना दिलेल्या परवानगी संबंधित नस्तीचे अवलोकन करताना आढळून आले नाही. त्यामुळे अर्धसमासाद्वारे कंपन्याची नावे, प्राप्त भाडेरकम व त्यावर वसूल केलेला सेवाकर याचा तपशील उपलब्ध करण्यास सबंधित विभागास सुचविण्यात आले परंतु तसा तपशील पुरविण्यात आला नाही.

तथापि, वस्तु व सेवाकर महासंचालनालय,पुणे यांचेकडील क्र. DGCEI/NRU/44/2016/1109 दि. 15.11.2016 अन्वये मनपास बजावलेल्या कारणे दाखवा नोटीस वरून सन 2012-13 ते 2015-16 या कालावधीत विविध कंपन्यांकडून भाडेरकमांपोटी पुढीलप्रमाणे महसूल प्राप्त झाला असे दिसून आले. परंतु सदर रकमावर सेवाकर मात्र आकारण्यात आला नाही.

अ.क्र.	दूरसंचार कंपन्यांची नावे	प्राप्त भाडेरकम (रु.)
1	संज्योत कार्पोरेशन, पुणे	44502
2	एम एस ई डी सी एल	79854733
3	रिलायंस	171461359
4	सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती	190785
5	वोडाफोन	216000
6	रिलायंस जीओ	87562865
7	एम आय डी सी	805736
8	आयडीया सेल्युलर	27142680
9	भारती एअरटेल	107299493
	एकूण	47,45,78,153

या आकडेवारीचा कंपनीनिहाय व वर्षनिहाय तपशील उपलब्ध नसल्याने सेवाकराच्या विविध दरानुसार वसूल करावयाची रकम निश्चित करता आली नाही. असे असले तरी सन 2014-15 मधील प्रचलित दर 12.36% नुसार परिगणना केल्यास सन 2012-13 ते 2015-16 या कालावधी भाडेरकमांपोटी रु.5,86,57,860/- एवढा सेवाकराची रकम प्रलंबित असल्याचे दिसून येते. मनपाने संबंधित कंपन्यांना नोटीस पाठवूनही त्यांनी सेवाकराचा भरणा केला नसल्याचेही लक्षात येते.

परिणामी केंद्रशासनाकडील रु. 5,86,57,860/- एवढ्या सेवाकराची तात्पुरती हानी झाली आहे.

DATABWM6901 (Ref No : 106)

82 राजापेठ उड्डाणपूलच्या बांधकाम सल्लागारास होणाऱ्या प्रदानातील अनियमितता मुळे शासननिधीचे होत असलेल्या नुकसानीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :274 शासननिधी निधी

अनियमितता कलम : 9ब

राजापेठ उड्डाणपूल बांधकामाचे मूळ प्राकलन मुल्य रु. 25.00 कोटीच्या अनुषंगाने बांधकाम सल्लागाराची 2.7% फी दराने (2010-11 मध्ये) नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर कामाच्या मूल्यात वाढ होऊन रु. 49.36 कोटी दिली. त्यामुळे पून्हा रु. 41.68 कोटीचे सुधारित प्राकलन तयार करून तसे 2015-16 मध्ये सल्लागारास कळविण्यात आले. या सर्व प्रक्रियेत स्थायी समितीची सुधारित मान्यता प्राप्त करण्यात आली

नाही. मूळ निविदेप्रमाणे दरवाढीच्या रकमेवर सल्लागार फी चे प्रदान देय नसताना दरवाढीसह एकूण रु. 41.68 कोटी बांधकाम मूल्यावर सल्लागार फी चे प्रदान देय असेल असे सल्लागारास लेखी कळविण्यात आले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर अतिप्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अमरावती शहरातील रेल्वेलाईनमुळे शहराचे दोन्ही भागाकडील रहदारी सुरळीत ठेवण्यासाठी उड्डाणपूल बांधकामाचा 2011-12 च्या सीएसआर नुसार 25.00 कोटी मूल्यांचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेने क्र. 178 दि. 19.12.2009 अन्वये मंजूर केला. त्यासाठी बांधकाम सल्लागार नियुक्त करण्यासाठी निविदा मागवून मे. एस.एन.भोबे यांची 2.70% (प्रकल्प मूल्यांच्या) दराची निविदा स्थायी समितीच्या ठराव क्र. 166 दि. 10.12.2010 अन्वये मंजूर करण्यात आली. त्यानुसार दि. 10.12.2010 रोजी करारनामा घेऊन दि. 07.03.2011 रोजी कार्यादेश देण्यात आला. सदर स्विकृत निविदेनुसार सल्लागारास पुढीलप्रमाणे अपेक्षित होते.

<u>सल्लागार फी</u> :-

सल्लागारा फी चे एकूण अंदाजित मुल्य रु. 67,50,000/-

सल्लागार फी प्रदानाचे पृथ:करण :-

8) Pre Tender activities - प्रकल्प मूल्याचे 15% = रु. 1012500 अंदाजे
9) Post Tender activities - प्रकल्प मूल्याचे 85% = रु. 5737500 अंदाजे

i) प्रत्यक्ष बांधकाम मूल्याच्या - 70%
[Time related 60%
Payment related 40%]
1) अंतिम देयक -प्रत्यक्ष बांधकाम मूल्याच्या - 5%
2) Defect liability च्या कालावधीत - 5%
3) Defect liability चा कालावधी संपुष्टात आल्यानंतर - 5%

85%

<u>बांधकामच्या प्राकलन मूल्यात वाढ</u> :-

या कामाचे प्राकलन मूल्यात पुढीलप्रमाणे वाढ झाल्याने नस्तीवरून दिसून येते

3) मूळ मुल्य (CSR 2011-12) रु. 25.00 कोटी
4) सुधारित प्राकलन मुल्य (CSR2013-14) रु.49.36 कोटी
(शहर अभियंता यांची तांत्रिक मंजुरी दि. 04.01.2014)
iii) सुधारित प्राकलन मूल्य (CSR 2013-14) रु. 41.68 कोटी
(मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती
यांची तांत्रिक मान्यता क्र. D2 (4)/18 अ दि. 08/05/17)

DRAFT

प्रकल्पाच्या प्राकलन मुल्यातील दोन वेळा झालेल्या वाढीच्या अनुषंगाने सुधारित निविदा प्रक्रिया, स्थायी समितीचा सुधारित ठराव याबाबी कार्यान्वित केलेल्या दिसत नाही. तथापि, रु.49.56 कोटीच्या खर्चास विभागीय आयुक्त तथा जिल्हास्तरीय समिती, अमरावती यांची दि.20.09.2013 रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त असल्याचे दिसते.

वरीलप्रमाणे मूळ बांधकामाच्या मूल्यात झालेल्या सुधारणेच्या अनुषंगाने अतिरिक्त शहर अभियंता यांनी पत्र क्र. अमनपा/बांवि/सअ/3750/16 दि.25.01.2016 अन्वये " रु.41.68 कोटीच्या बांधकाम प्राकलन मूल्याच्या आधारे सल्लागार फी चे प्रदान करण्यात येईल " असे सल्लागार मे. एस .एन भोबे यांना कळविले.

<u>बांधकाम सल्लागारास प्रत्यक्ष झालेले प्रदान (Gross payment)</u>

1) <u>For Pre Tender activities</u> :-

1 ले	धावते देयक	2013-14	3,37,500	बांधकाम प्राकलन मूल्य रु. 24.75 कोटी गृहीत धरून
2 रे	धावते देयक	2013-14	2,02,500	
3 रे	धावते देयक	2014-15	5,85,300	प्राकलन मुल्य रु. 41.68 कोटी गृहीत धरून
4 थे	धावते देयक	2015-16	5,62,650	प्राकलन मुल्य रु. 41.68 कोटी गृहीत धरून
			---------- **16,87,920**	

2) <u>For Post Tender activities</u> :-

5 ते 10वे	धावते देयक	2015-16 ते 2017-18	56,22,900	प्राकलन मुल्य रु. 41.68 कोटी गृहीत धरून
10वे	धावते देयका पर्यंत झालेलेएकूण प्रदान	(A+B)	---------- **73,10,850**	

यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

2) <u>स्थायी समितीची सुधारित वित्तीय मान्यता प्राप्त नसणे :-</u>

स्थायी समितीने दि. 10.12.2010 च्या ठरावान्वये रु. 25.00 कोटी हे मूळ बांधकाम प्राकलन मुल्य विचारात घेऊन 2.70% दराने रु. 67,50,000/- सल्लागार फी रकमेच्या प्रदानास मान्यता दिली होती, परंतु पुढील काळात बांधकामाच्या प्राकलनात रु. 25.00 कोटी

DRAFT

वरून रु.41.68 कोटी म्हणजे रु. 16.93 कोटी एवढी वाढ घेऊन त्या वाढीवर 2.70% प्रमाणे रु. 45,03,600/- एवढी सल्लागार फी मध्ये अतिरिक्त वाढ झाली. सदरच्या दरवाढीच्या अनुषंगाने स्थायी समितीची मंजुरी प्राप्त करण्यात आली नाही.

प्राप्त वित्तीय मंजुरीची रकम रु 67,50,000/- (मूळ प्राकलन 25 कोटी x 2.70%)

रु. 1,12,53,600/- (सुधारित प्राकलन 41.68 कोटी x 2.70%)

सक्षम वित्तीय मंजुरी नसताना रु. 45,03,600/-

सल्लागार फी चे होऊ घातलेले प्रदान

दहाव्या धावत्या देयका पर्यंत सल्लागारास रु. 73,10,850/- चे प्रत्यक्ष प्रदान झाल्याने रु.73,10,850-67,50,000/- प्रमाणे रु.5,60,850/- चे सक्षम मंजुरीशिवाय खर्च करण्यात आल्याचे दिसून येते.

3) <u>बांधकामाच्या मूळ प्राकलन मूल्यव्यतिरिक्त अन्य प्रशासकीय बाबीवर सुद्धा सल्लागार फी ची आकारणी लागू करणे :-</u>

अतिरिक्त शहर अभियंता यांनी सल्लागारास दिलेल्या दि. 25.01.2016 च्या अतिरिक्त सुरक्षाठेव रकमेच्या मागणीपत्रात रु. 41.68 कोटी या रकमेवर सल्लागार फी चे प्रदान देय असेल असे नमूद केले आहे. परंतु या एकूण रकमेत बांधकामाव्यतिरिक्त अन्य बाबी सुद्धा समाविष्ट आहेत. तपशील पुढील प्रमाणे आहे.

A	प्रत्यक्ष बांधकाम प्राकलन मूल्य		32,65,38,783
B	अन्य बाबी		
	i	कामाचा विमा (A च्या 1%)	32,62,388
	ii	चाचणी शुल्क (testing charge) (A च्या 1.5%)	48,93,582
	iii	Shifting of utility service (A च्या 9%)	3.00.95.528
	iv	आकस्मिक खर्च (contigencies) (A च्या 4%)	1,45,79,611
	v	दरवाढ (escalation) (A च्या 9.95%)	3,77,17,454
		A+B	41,67,87,346

मूळ टेंडर क्लॉज क्र. 4 (v) नुसार बांधकामाच्या दरवाढीवरील खर्च (Payment towards Price Escalation) सल्लागार फी च्या परिगणनेसाठी गृहीत धरला जाऊ नये असे अपेक्षित आहे. तसेच सल्लागार फी बांधकामाच्या प्रत्यक्ष मूल्यांच्या व्यतिरिक्त अन्य बाबीवर (क्र. iv वरील आकस्मिक खर्च वगळून) प्रदान करण्याचे औचित्य नाही. त्यामुळे अतिरिक्त शहर अभियंता यांनी संपूर्ण रु. 41.68 कोटी रकमेवर 2.70% सल्लागार फी म्हणजेच रु. 1.13 कोटी देय असल्याचे पत्रात नमूद केले असले तरी प्रत्यक्षात (A)+(B) (iv) म्हणजे रु. 34,08,18,394/- वर 2.70% प्रमाणे रु.92,02,097/- एवढीच फी रकम देय ठरू शकते परिणामी सल्लागारास त्यांच्या अंतिम देयक रु. 21.00 लाखाचे अतिप्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरील अभिप्राय रु. 41.68 कोटी या सुधारित प्राकलनाचे अनुषंगाने असले तरी मूळ प्रकल्पाची किमत रु. 24.75 कोटी (म्हणजेच रु. 25.00 कोटी अंदाजे) असताना प्राप्त निविदा मधून मे.एस.एन.भोबे यांची निविदा स्विकारून दि. 07.03.2011 रोजी त्यांना कार्यादेश देण्यात आला होता. याच मूळ निविदा क्लॉजनुसार (वर नमूद केल्याप्रमाणे) दरवाढ (price escalation) गृहीत धरता येत नसताना बांधकामाचे विविध कारणामुळे वाढलेले मूल्य रु. 41.68 कोटी विचारात घेतल्यास प्रत्यक्ष दरवाढ ही रु.16.93 कोटी एवढी असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यावरील 2.70% म्हणजेच रु.45.71 लाखाचे सल्लागार फी चे संभाव्य प्रदान अनियमित ठरते (सध्यास्थितीत रु. 25 कोटी वर 2.70% रु. 67,50,000/- ऐवजी रु. 45.71 कोटीच्या अनुषंगाने दहाव्या धावत्या देयकापर्यंत अभिप्राय क्र. 1 प्रमाणे रु. 73.11 लाखाचे प्रदान करण्यात आले आहे).

4) **<u>सक्षम मान्यता न घेता फी वाढीव मूल्याच्या अनुषंगाने मूळ सल्लागारास थेट कार्यादेश देणे.</u>** :-

बांधकाम प्रकल्पाची मूळ किंमत रु.25.00 कोटी मध्ये रु. 49.36 कोटी अशी वाढ व नंतर रु. 41.68 कोटी अशी सुधारणा होत असताना त्यास स्थायी समितीची मान्यता घेणे क्रमप्राप्त होते. परंतु दि. 10.12.2010 च्या समितीच्या ठरावा नंतर (रु.25.00 कोटीसाठी) सुधारित मान्यता घेतलेली नाही. तसेच सुधारित निविदा प्रक्रिया सुद्धा राबविण्यात आली नाही. असे असताना नस्तीमधील टिपणीस शहर अभियंता व आयुक्त यांची मंजुरी न घेता अतिरिक्त शहर अभियंता यांनी दि. 25.01.2016 रोजी मूळ नियुक्त सल्लागारास सुधारित कार्यादेश देऊन " रु. 41.68 कोटी याच रकमेवर कन्सल्टसी फी देय राहील." असे स्पष्टपणे नमूद करून सुरक्षाठेवीची फरकाची रकम जमा करण्याचे निर्देशित केले.
उपलब्ध अभिलेखावरून अतिरिक्त शहर अभियंता यांना तसे प्राधिकार वर्ग झाल्याचे स्पष्ट होत नाही.

5) **<u>आयकराची कमी कपात :-</u>**

आयकर अधिनियमाचे कलम 194 (i) नुसार व्यावसायिक सेवावरील प्रदानातून 10% आयकर कपात करणे आवश्यक आहे. परंतु सबंधित सल्लागाराच्या दहाव्या धावत्या देयकापर्यंतच्या एकूण रु.73,10,850/- सकल देयक रकमेतून 5% प्रमाणे रु.3,65,543/- एवढीच कपात केली असल्याने उर्वरित 5% रकम रु. 3,65,543/- व त्यावरील 10% अधिभार रु.36,554/-, 2% शिक्षण उपकर रु.7,311/- व उच्च शिक्षण उपकर रु.3,655/- याप्रमाणे रु.4,13,063/- चे केंद्र शासनाकडील कराचे नुकसान झाले आहे.

6) <u>नियुक्त सल्लागार कंपनीचे कायदेशीर अधिकार अन्य कंपनीकडे बहाल :-</u>

या प्रकल्पातील मूळ नियुक्त सल्लागार मे. एस.एन.भोबे यांच्याकडील सर्व अधिकार मुंबई उच्च न्यायालयाचे दि. 12.01.2017 च्या आदेशान्वये दि. 01.07.2017 पासून मे. TPF Engineering PVT. Limited यांना बहाल करण्यात आल्याचे उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते. या संबंधीच्या सूचनेची टिपणी बांधकाम विभागाकडून आयुक्तांच्या निर्देशनास दि. 16.07.2017 रोजी आणून देण्यात आली आहे. परंतु मनपाकडून नवीन फर्मशी कोणत्याही

प्रकारचा करार (सुधारित) करण्यात आलेला नाही. तसेच बँक गॅरटीच्या अनुषंगाने सुद्धा कोणतीही कार्यवाही करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

DATABWM6901 (Ref No : 213)

83 दीर्घमुदतीसाठी भाडेपट्टीवर दिलेल्या वडाळी तलाव व छत्री तलावापोटी कंत्राटदाराकडून सेवाकराची रु.5.18 लाख एवढी रकम वसूल न करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :41 म.न.पा.निधी निधी
अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 518024.00/-

दीर्घमुदतीवर भाडेपट्टीवर दिलेल्या वडाळी तलाव व छत्री तलाव या मनपाच्या स्थावर मालमत्तापोटी प्राप्त भाडे रकमावर दि.01.7.2012 पासून सेवाकराची आकारणी लागू झाली असताना त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने रु.5.18 लाखाच्या केंद्र शासनाच्या महसुलाची हानी झाली आहे.

केंद्र शासनाकडील Finance Act 1994 मधील कलम 65 (B) (41) मध्ये Renting ची व्याख्या दिलेली असून त्यानुसार मनपाच्या स्थावर मालमत्ता भाडे तत्वावर (letting) भाडेपट्टी (Lease) व परवाना अंतर्गत देणे (Licencing) व या प्रकारच्या अन्य व्यवस्थाचा समावेश होते.

Notification no. 36/2012, service tax dt. 20.06.2012 अन्वये प्रसिध्द केलेल्या service tax (second Amendement) Rules 2012 मधील नियम 2 (F) नुसार " Renting of Immovable property means any service provided or agreed to be provided by renting of Immovable property any other service in relation to seal renting." हे निश्चित करून अशी सेवा दि.01.07.2012 पासून सेवाकरास पात्र ठरविण्यात आली आहे.

अमरावती मधील 'वडाळी तलाव व हरिभाऊ कलोटी बगीचा' आणि छत्री तलाव मनपाची स्थावर मालमत्ता असून दोन्ही मालमत्ता दीर्घ मुदतीच्या भाडेकरारावर खाजगी व्यावसायिकांना व्यावसायिक स्तरावर नागरिकांना जलक्रीडा व इतर सोयी देण्यासह बगीच्याची निगा राखणे, सौंदर्यीकरण व निगा राखणे या प्रयोजनातून उत्पन्न कमविण्यासाठी देण्यात सन 2003 ते 2018 या कालावधीसाठी देण्यात आले. यामधून मनपास पुढीलप्रमाणे भाडे रक्कम प्राप्त झाली.

भाडे रकमेच्या स्वरुपात महसूल प्राप्त झाला परंतु दि. 01.07.2012 नंतर प्रथम भाडे रक्कमेवर केंद्र शासनास सेवाकर देय ठरला असताना त्याची आकारणी व वसुली सबंधित कंत्राटदाराकडून केलेली नाही.

त्यामुळे पुढीलप्रमाणे केंद्र शासनाच्या महसुलाची हानी झाली आहे.

अ.क्र.	मालमत्तेचे नाव	कंत्राटदार	निश्चित केलेली भाडे रक्कम (2003 ते 2018) (रु.)	सेवाकर लागू झाल्यानंतरच्या कालावधीसाठी (01.07.2012) प्राप्त रक्कम (रु.)	रकमा प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा कालावधी व रकम (रु.)		लागू सेवा कराचा दर (रु)	सेवाकर (रु.)
1	वडाळी तलाव व हरीभाऊ कलोटी बगीचा	मे. एच.एम. कोषटवार (राजहंस टुरिझम, अमरावती)	10,20,000	3,66,000 (1.7.2012 ते 31.3.2017) कालावधी साठी	01.07.2012 ते 30.05.2015 01.06.2015 ते 14.11.2015 15.11.2015 ते 31.05.2016 01.06.2016 ते 31.03.2017	225000 90000 90000	12.36% 14.5% 15%	27818 13050 13500
2	छत्री तलाव	मे. खोडके ॲग्रो प्रॉडक्टस प्रा.लि. अमरावती	55,00,000	1545400 (1.07.2012) ते 31.3.2016) (त्यानंतर करारनामा रद्द झाला)	01.07.2012 ते 31.03.2013 13.02.2015 01.04.2015 ते 31.03.2016 (विलंबाने प्राप्त)	363200 2000000 1183200	12.36% 12.36% 14.5%	44892 247200 171564
सेवाकरास पात्र एकूण रकम रु.				**1917400**	**एकूण सेवाकर रु.**			**518024**

वरीलप्रमाणे वरील दोन मालमत्तापोटी रु. 5.18 लाखाचे वसुली करून केंद्र शासनाकडे भरणा करावा व याच प्रकारच्या अन्य भाडे रकमेवर दिलेल्या मालमत्तांचा आढावा घेऊन उचित कार्यवाही करावी.

DATABWM6901 (Ref No : 176)

84 छत्री तलाव सुशोभित व सौंदर्य करण्यासाठी दिलेले एजन्सीद्वारे रक्कम उशिराने मनपा खात्यात जमा केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ब

मनपा अमरावती अंतर्गत छत्री तलाव सुशोभित व सौंदर्यीकरणा करिता मे. खोडके ॲग्रो प्रॉडक्ट लिमिटेड या एजन्सीला दि. 13.08.2003 रोजी 55 लक्ष ऑफर मूल्यावर 15 वर्षाच्या मुदतीकरिता म्हणजे 22.08.2018 पर्यंतचा करारनामा करण्यात आला. त्यांनी दरवर्षी ठरविलेली रक्कम मनपा खात्यात न भरता ती विलंबाने भरण्यात आल्यामुळे मनपाचे नुकसान झाल्याचे निदर्शनात आले.

मनपा, अमरावतीचे क्षेत्रात असलेल्या छत्री तलाव व त्या परिसरातील बगीच्याचे सुशोभिकरण व सौंदर्यीयकरण करणे या करिता दि. 13.08.2013 रोजी मे. खोडके ॲग्रो प्रॉडक्ट लिमिटेड या संस्थेशी 15 वर्ष मुदतीकरिता 55 लक्ष रुपयाच्या आधारमूल्यावर दि. 22.08.2018 पर्यंतचा करारनामा करण्यात आला.

मे. खोडके ॲग्रो प्रॉडक्ट प्रायवेट लिमिटेड या कंपनीसोबत झालेल्या करारनाम्यानुसार त्या कंपनीने दरवर्षी महानगरपालिकेला देण्यासाठी रक्कम निश्चित करून दिलेली आहे. तसा रकमेचा भरणा दरवर्षी करावयाचा होता परंतु कंपनीने खालील दर्शविलेल्या तक्त्यानुसार भरणा नियमितपणे न करता विलंबाने केलेला आहे. तपशील खालीलप्रमाणे :-

वर्ष	रक्कम	अंतिम दिनांक	प्रत्यक्षात रक्कम भरण्याचा दिनांक	विलंबाचा कालावधी (दिवस)
2004-05	3,12,000	30.06.2004	11.09.2008	1531
2005-06	3,12,000	30.06.2005	11.09.2008	1166
2006-07	3,12,000	30.06.2006	11.09.2008 (76,000/-) 13.02.2015 (2,36,000/-)	801 3145
2007-08	3,12,000	30.06.2007	13.02.2015	2780
2008-09	3,63,200	30.06.2008	13.02.2015	2415
2009-10	3,63,200	30.06.2009	13.02.2015	2050
2010-11	3,63,200	30.06.2010	13.02.2015	1685
2011-12	3,63,200	30.06.2011	13.02.2015	1320
2012-13	3,63,200	30.06.2012	29.05.2015	1064
2013-14	3,94,400	30.06.2013	29.05.2015	699
2014-15	3,94,400	30.06.2014	29.05.2015	344
2015-16	3,94,400	30.06.2015	--	--
2016-17	3,94,400	30.06.2016	--	--
2017-18	3,94,400	30.06.2017	--	--

DRAFT

2018-19	4,64,000	30.06.2018	--	--
एकूण	55,00,000		--	--

वर दर्शविल्याप्रमाणे मे. खोडके ॲग्रो प्रॉडक्ट लिमिटेड या कंपनीने 2013-14 पर्यंत ठरवून दिलेल्या टप्प्याप्रमाणे 2014-15 पर्यंत एकूण 34,58,400/- एवढ्या रकमेचा भरणा करावयाचा होता. त्यानुसार कंपनीने दि. 11.9.2008 रोजी 7 लक्ष दि. 13.02.2015 रोजी रु. 20 लक्ष व 29.05.2015 रोजी रु.11,52,800/- असे एकूण रु. 34 ,58,400/- भरणा केलेला असून सदरहु रक्कम दरवर्षी देय दिनांकास न भरता विलंबाने भरण्यात आली.त्यामुळे मनपा अमरावती यांचे नुकसान झाल्याचे दिसते. याबाबत अर्धसमास पत्र क्र. 158 दि, 25.04.2018 नुसार या संदर्भात विचारणा केली असता याबाबत कोणत्याही खुलासा प्राप्त नाही.

तरी विलंब शुल्क आकारून मनपाचे झालेल्या नुकसानीची भरपाई करावी व याबाबतची अनुपालन सादर करावे.

DATVVBM6301 (Ref No : 158)

85 मनपा अमरावती क्षेत्रा अंतर्गत मोकाट जनावरे पकडण्याकरिता वाहन भाडे यावरील केलेल्या अनावश्यक खर्चा बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ब
आक्षेपाधीन रक्कम रु. 449000.00/-

मनपा अमरावती क्षेत्राचेअंतर्गत मोकाट जनावरे पकडण्याकरिता वर्ष 2014-15 मध्ये वाहन भाडे करिता एकूण 280 दिवसाचे रु.6,57,000/- एवढे प्रदान करण्यात आले असून त्यापैकी 196 दिवस कोणतेही जनावरे न पकडता किंवा जनावराची वाहतूक न करता फक्त मोकाट जनावरे शोधण्याकरिता वाहन भाड्यावर रु.4,49,000/- एवढा निरर्थक खर्च करण्यात आला.

मनपा अमरावती क्षेत्रा अंतर्गत मोकाट जनावरे पकडण्याकरिता वर्ष 2014-15 या वर्षात एकूण रु.7,39,300/- एवढा खर्च करण्यात आला असून त्यापैकी मोकाट जनावरे पकडण्याकरिता लावलेल्या वाहनाचे भाडे एकूण 280 दिवसाचे रु.6,57,000/- एवढे प्रदान करण्यात आले.

मोकाट जनावरे पकडण्याकरिता व वाहतूक करण्याकरिता शांतु नागरी संस्था यांना दरपत्रकानुसार मोकाट जनावरे पकडून कोंडवाड्यात ठेवणे तसेच सदर कामासाठी आवश्यक वाहने पुरविणे तथा मनुष्यबळ

पुरविणे याकरिता कंत्राट देण्यात आले. भाडयाने लावलेल्या वाहनांच्या वापराबाबत कोणत्या पद्धतीने व कश्याप्रकारे करार करण्यात आला याबाबतची माहिती संबंधित विभागाकडून प्राप्त झाली नाही. कोंडवाडा विभागातील तपासणीस प्राप्त झालेल्या देयकावरून लहान आकाराचे वाहन यांना दर दिवशी रु.2000/- तर मोठे वाहन यांना दर दिवशी रु.3000/- एवढे वाहनाचे भाडे प्रदान करण्यात आल्याचे दिसून आले.

मोकाट जनावरे पकडण्याकरिता केलेल्या खर्चाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

(रक्कम रुपयात)

कालावधी	वाहन क्र.	भाडयाने वापरलेल्या वाहनाचे दिवस	दर	एकूण प्रदान	जनावरे पकडलेले दिवस	त्याबाबतचे एकूण भाडे	जनावरे न पकडता वापरलेल्या वाहनाचे दिवस	त्या बाबतचे एकूण भाडे
एप्रिल 2014	-	26	2000	52000	10	20000	16	32000
मे 2014	MH-20 4023	27	2000	54000	5	10000	22	44000
जुलै 2014	MH-20 1857	26	2000	52000	-	-	26	52000
ऑक्टो 2014	MH-31 5106	20	3000	60000	6	18000	14	42000
	MH-27 x-899	7	2000	14000	3	6000	4	8000
	MH-20 T-4023	2	2000	4000	2	4000	-	-
नोव्हे. 2014	MH-27 x-899	13	2000	26000	7	14000	6	12000
	MH-31 5106	23	3000	69000	13	39000	10	30000
डिसे. 2014	MH-20 4023	26	2000	52000	10	20000	16	32000
	MH-31 5106	26	3000	78000	10	30000	16	48000
जाने. 2015	MH-20 4023	28	2000	56000	11	22000	17	34000
	MH-31 5106	28	3000	84000	7	21000	21	52000
	MH-27 x-899	28	2000	56000	2	4000	26	63000
एकूण		**280**		**657000**	**86**	**208000**	**194**	**449000**

वरील तक्त्या वरून निदर्शनास येते की 2014-15 या वर्षात एकूण 280 एवढे दिवस भाड्याचे वाहन घेवून मोकाट जनावरे पकडण्याकरीता रु.6,57,000/- एवढा खर्च करण्यात आला. परंतु 280 दिवसापैकी फक्त 86 दिवस मोकाट जनावरे पकडण्यात आली व त्या जनावरांची वाहतूक करण्यात आली. तर 194 दिवस कोणतेही

DRAFT

मोकाट जनावर पकडले किंवा वाहतूक करण्यात आली नाही असे असतानाही वाहनाच्या भाडेपोटी मनपा यांनी रु.4,49,000/- एवढा खर्च करण्यात आला.

कोणतेही मोकाट जनावर न पकडता तसेच कोणत्याही जनावरांची वाहतूक न करता एकूण 194 दिवस वाहन नुसते मोकाट जनावरांच्या शोधात फिरले तसेच एकाच दिवशी एकाच मार्गाने दोन दोन वाहने फिरली, असे अभिलेख्यावरून दिसते. याप्रमाणे मोकाट जनावरे न पकडता तसेच त्यांची वाहतूक न करता झालेल्या एकूण 194 दिवसाचे वाहन भाडे यावरील खर्च रु.4,49,000/- निरर्थक असल्यामुळे सदर खर्च आक्षेपित ठेवण्यात येत आहे. सदर संस्थेसोबत झालेल्या करारनामा निविदा सूचना किंवा नस्ती उपलब्ध करण्यात आली नसली तरी मोकाट जनावरे पकडणे ही योजनेची प्राथमिकता असल्यामुळे जनावरे न पकडताही संस्थेस प्रदान करणे ही बाब वित्तीय औचित्याला धरून नाही. त्यामुळे संबंधित संस्थेस हेतुपरस्पर आर्थिक लाभ मिळण्यासाठी करारनाम्यात तजवीज करण्यात आल्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

या बाबत अर्धसमास पत्र क्र.161, दि.03.05.2018 नुसार विचारणा केली असता कोणताही खुलासा प्राप्त झाला नाही. त्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 161)

93 रमाई आवास योजनेतंर्गत शासनाकडून प्राप्त निधीवरील व्याज तसेच अखर्चित निधी शासनाकडे जमा न करणे व इतर अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 06

लेखा शीर्ष :363 शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 749223.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 749223.00/-

मनपा अमरावती क्षेत्रातील अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकासाठी रमाई आवास योजनेतंर्गत घरकुलाचे बांधकामासाठी शासनाच्या सामाजिक व न्याय विभागाकडून वेळोवेळी प्राप्त झालेला निधी मनपाचे देना बँक, शाखा एमआयडीसी खाते क्र.125810032025 वर जमा करण्यात आला. या खात्यात जमा रकमेवरील व्याज तसेच अखर्चित निधी शासनाकडे जमा करणे आवश्यक आहे. रमाई आवास योजनेतंर्गत घरकुलाचे कामासाठी शासनाकडून प्राप्त निधीवरील व्याज तस अखर्चित निधी शासनाकडे परत न करणे तसेच प्राप्त निधीच्या अनुषंगाने उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर न करणे इत्यादी अनियमितता लेखापरिक्षणादरम्यान आढळून आल्या.

महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. बीसीएच-2009/प्र.क्र159/मावक-2 दि.9 मार्च 2010 मधील तरतूदीच्या अनुषंगाने रमाई आवास योजने अतंर्गत

अमरावती शहरातील अनुसूचीत जाती व नवबौध्द दुर्बल घटकासाठी घराचे चटाई क्षेत्र 269 चौ. फुट जागेत घरकुल बांधून देण्यासाठी उक्त शासन निर्णयातील परि. 19 नुसार गृह निर्माण समिती अध्यक्ष आणि सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीने खालीलप्रमाणे अनुदान विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी व लाभार्थ्यांच्या नावे सुरू करण्यात आलेल्या बँकेच्या खात्यात निधी जमा करण्यात येते. जमा निधीमधून लाभार्थ्यांना खालीलप्रमाणे कामाच्या प्रगतीनुसार निधीचे वाटप करण्यात येते.

अ. घराचे बांधकाम सुरू करतांना 50 टक्के

ब. 50 टक्के निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर 40 टक्के

क. घराचा ताबा घेताना आणि सक्षम प्राधिका-यांनी पुर्णत्वाचा दाखला दिल्यानंतर 10 टक्के

यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत-

10) योजेनच्या व्यवहाराचे स्वतंत्र रोखपुस्तक न ठेवणे-

शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून रमाई आवास योजनेतंर्गत मनपा अमरावतीला खालीलप्रमाणे निधी प्राप्त झाला.

वर्ष	शासनाकडून प्राप्त निधी	झालेला खर्च	शासनाकडून मंजूर उद्दिष्टे
2010-11	रु.5.27 कोटी	रु.5.56 कोटी	293 घरकुल
2011-12	रु.1.40 कोटी	रु.1.33 कोटी	70 घरकुल
2012-13	रु.7.00 कोटी	रु.6.65 कोटी	350 घरकुल
2013-14	रु.26.94 कोटी	रु.27.26 कोटी	1347 घरकुल
2014-15	निरंक	निरंक	निरंक
2015-16	रु.18.00 कोटी	रु.15.40 कोटी	700 घरकुल
2016-17	रु.37.50 कोटी	रु.27.34 कोटी	1500 घरकुल

या योजनेतंर्गत प्राप्त निधी मनपाचे नावे देना बँक शाखा एमआयडीसी येथे स्वतंत्र खाते उघडले असून या खात्यामधूनच लाभार्थ्यांना निधीचे वाटप करण्यात येते. शासनाकडून सन 2010-11 ते 2016-17 या कालावधीत रु.96.11 कोटी निधी प्राप्त झाला असून माहे मार्च-2017 अखेर रु.83.54 कोटी खर्च झाले असून रु.12.57 कोटी एवढा निधी अखर्चीत असल्याचे दिसून येते. अखर्चीत निधी अद्यापही शासनाकडे जमा करण्यात आला नाही. शासन अनुदान योजनेकरीता स्वतंत्र रोख पुस्तक ठेवणे आवश्यक असतांना मनपाच्या एकाच रोख पुस्तकातून सर्व व्यवहार करण्यात आले आहेत. त्यामुळे या योजनेखालील जमा-खर्चाचा एकत्रित व्यवहार तपासता आला नाही. सदर योजनेसाठी शासनाकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या निधी मंजूरीचे आदेश लेखापरिक्षणास प्राप्त झाले नाही.

2**. बँक खात्यातील जमा झालेले व्याज शासनास परत न करणे-**

सदर योजनेकरीता शासनाकडून प्राप्त होणारा निधी मनपाने देना बँक शाखा एम आय डी सी अमरावती खाते क्र. 125810032025 वर जमा केला असून त्यावरील जमा व्याजाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

व्याजाचा कालावधी	व्याज जमा झाल्याचा दिनांक	खात्यात जमा झालेले व्याज
1.11.2010 ते 28.02.2011	5.03.2011	413431/-
1.03.2011 ते 31.08.2011	3.09.2011	838716/-
1.09.2011 ते 28.02.2012	3.03.2012	1353862/-
1.03.2012 ते 31.08.2012	1.09.2012	1137442/-
1.09.2012 ते 29.02.2013	2.03.2013	600685/-
1.03.2013 ते 31.08.2013	7.09.2013	1159619/-
1.09.2013 ते 28.02.2014	1.03.2014	1611367/-
1.03.2014 ते 31.08.2014	6.09.2014	2127175/-
1.09.2014 ते 28.02.2015	7.03.2015	458185/-
1.03.2015 ते 31.08.2015	6.09.2015	634208/-
1.09.2015 ते 28.02.2016	6.03.2016	1081713/-
1.03.2016 ते 31.05.2016	5.06.2016	1167867/-
1.06.2016 ते 31.08.2016	10.09.2016	344619/-
1.09.2019 ते 30.11.2016	12.12.2016	189351/-
1.12.2016 ते 28.02.2017	8.03.2017	136433/-
1.03.2017 ते 31.05.2017	6.06.2017	522227/-
	एकूण	13776900/-

लेखा विभागाकडून प्राप्त बँक विवरणानुसार रु.13776900/- एवढी व्याजाची रक्कम मनपाचे बँक खात्यात जमा झाली असून दि.31.03.2015 अखेर केवळ रु.10310000/- एवढी रक्कम संबंधीत खात्यात शिल्लक दिसून येते. याबाबत ताळमेळ घेवून व्याजाची रक्कम रु.13776900/- शासनाकडे तात्काळ परत करण्यात यावी.

3**. योजनेचा निधी विहित कामासाठी खर्च न करता मुदत ठेवीमध्ये गुंतविणे**-

शासनाच्या सामाजिक व न्याय विभागाकडून प्राप्त झालेला निधी मनपाचे बँक खात्यात जमा करण्यात येत असून या खात्यावरील जमा निधी एकाच वेळी खर्च होत नसल्याने खात्यावरील जमा रकमेची मोठया प्रमाणावर मनपाने मुदती ठेवीमध्ये गुंतवणूक करून व्याज कमावले आहे. गुंतवणूक नोंदवहीची पडताळणी केली असता मुदती ठेवीवर जमा झालेल्या व्याजाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(आकडे रूपयात)

गुंतवणूक	बँकेचे नांव	गुंतवणूक	मुदती	व्याजाच	गुंतवणूकीवर	आवर्ती जमा

दिनांक		केलेली रक्कम	ठेवीचा कालावधी पर्यंत	दर	प्राप्त व्याज	पत्राचा क्रंमाक
02.04.14	ॲक्सीस बँक अमरावती	50000000	30.06.2014	9.00%	1097260	769015
01.07.14	ॲक्सीस बँक अमरावती	51097260	30.09.2014	9.00%	1050994	46886
01.10.14	ॲक्सीस बँक अमरावती	52148254	31.12.2014	9.00%	1072611	63383
01.01.15	ॲक्सीस बँक अमरावती	53220865	31.03.2015	9.00%	973286	02965
16.01.15	आयडीबिआय बँक अमरावती	100000000	31.01.2015	6.50%	267123	6576181
01.02.15	आयडीबिआय बँक अमरावती	100267123	28.02.2015	6.50%	482106	6576119
02.03.15	आयडीबिआय बँक अमरावती	100749229	31.03.2015	6.50%	520308	6576034
01.04.15	आयडीबिआय बँक अमरावती	101269537	30.06.2015	5.50%	299647	7290414
18.05.15	आयडीबिआय बँक अमरावती	20000000	30.06.2015	6.00%	141370	915040021829072
01.07.15	आयडीबिआय बँक अमरावती	20141370	30.09.2015	7.25%	364062	915040029206264
					6268767	

मुदती ठेवीवरील एकूण जमा व्याज रु.62,68,767/- (2.04.2014 ते 1.07.2015 पर्यंत) शासनाकडे परत करुन अनुपालन करावे.

4. <u>एकाच बँकेकडे गुंतवणूक करणे-</u>

राष्ट्रीयकृत बँकेत मुदती ठेवीत गुंतवणूक करताना वेगवेगळया राष्ट्रीयकृत बँकेकडून सिलबंद लिफाफ्यात व्याजाचे दर मागवून स्पर्धात्मक दराचा लाभ घेवून गुंतवणूक करणे अपेक्षित होते. परंतु अशी कार्यवाही करण्यात आली नसल्याचे अभिलेख्यावरुन दिसून येते. ॲक्सीस बँकेत मुदती ठेवीत

गुंतवलेल्या रकमेला मुदतवाढ देऊन आवर्ती जमा पत्राचे नुतनीकरण केल्याचे दिसून येते.

5. अपेक्षित व प्राप्त व्याजातील तफावत-

आक्षेपातील मुद्दा क्र.3 वरील मुदती ठेवीवरील निश्चित दरानुसार प्राप्त होणारे व्याज व प्रत्यक्षात प्राप्त झालेले व्याज यात खालीलप्रमाणे तफावत आढळून आली.

(आकडे रूपयात)

बँकेचे नांव	गुंतवणूक केलेली रक्कम	मुदती ठेवीचा कालावधी	व्याजाचा दर	ठेवीवरील अपेक्षित जमा	प्रत्यक्षात जमा व्याज	कमी प्राप्त झालेले व्याज
ॲक्सीस बँक अमरावती	50000000	90 दिवस	9.00%	1109589	1097260	12329
ॲक्सीस बँक अमरावती	51097260	92 दिवस	9.00%	1159138	1050994	108144
ॲक्सीस बँक अमरावती	52148254	92 दिवस	9.00%	1182980	1072611	110369
ॲक्सीस बँक अमरावती	53220865	90 दिवस	9.00%	1181066	973286	207780
आयडीबीआय बँक अमरावती	100000000	16 दिवस	6.50%	284932	267123	17809
आयडीबीआय बँक अमरावती	100267123	28 दिवस	6.50%	499962	482106	17856
आयडीबीआय बँक अमरावती	100749229	30 दिवस	6.50%	538249	520308	17941
आयडीबीआय बँक अमरावती	101269537	36 दिवस	5.50%	549353	299647	249706
आयडीबीआय बँक अमरावती	20000000	44 दिवस	6.00%	144658	141370	3288
आयडीबीआय बँक अमरावती	20141370	92 दिवस	7.25%	368063	364062	4001
एकुण				7017990	6268767	749223

वरील तक्त्यात नमूद आकडेवारी ही गुंतवणूक नोंदवहीवरुन घेतली असून व्याजाची परिगणना केली असता रु.749223/- एवढे व्याज कमी प्राप्त झाल्याचे दिसून येते. गुंतवणूक नोंदवहीवर शाखा प्रमुखाची पडताळणी केल्याबाबत स्वाक्षरी नाही. उर्वरित कालावधीची नोंदवही तपासणीस प्राप्त झाली नाही. त्यामुळे कमी प्राप्त झालेल्या संपूर्ण व्याजाची परिगणना करता आली नाही. निश्चित व्याजदरानुसार व्याजाची परिगणना करुन

DRAFT

बँकेस व्याजाच्या फरकाची मागणी करण्यासाठी बँक शाखा प्रमुखाशी संपर्क साधून जमा रकमा व त्यावरील व्याज याबाबत ताळमेळ घेवून फरकाची रक्कम रु.749223/- वसुल करावी. तसेच उर्वरित कालावधीची कमी प्राप्त व्याजाची परिगणना करुन वसुलीच्या कार्यवाहीसह अनुपालन करावे.

6. उपयोगिता प्रमाणपत्र -

शासनाचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून प्राप्त निधीच्या अनुषंगाने सदर योजनेवरील खर्चाचे अनुषंगाने वेळोवेळी उपयोगीता प्रमाणपत्र शासनास सादर करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही संबंधीत विभाग प्रमुखाकडून करण्यात आली नसल्याचे दिसून येते. याबाबतचे उपयोगीता प्रमाणपत्र लेखापरिक्षणास प्राप्त झालेले नाही. शासनाकडून सदर योजनेसाठी प्राप्त झालेला निधी व खर्च झालेला निधी याबाबतचा ताळमेळ घेवून अनुपालन करावे.

लेखापरिक्षणादरम्यान आढळलेल्या त्रृटयांचे अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.196 दि.05.06.2018 नुसार अभिलेख पुरविणे व नमूद मुद्दयावरील खुलासा सादर करण्यात कळविण्यात आले होते. परंतु आक्षेप लिहिस्तोवर खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 196)

94 सार्वजनिक शौचालयाच्या साफसफाईच्या कामाच्या कंत्राटाची निविदा प्रसिध्द न करता जुन्याच कंत्राटदाराला मुदतवाढ देण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 05

लेखा शीर्ष :144 महानगरपालिका स्व-निधी निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 276030.00 /-

अमरावती महानगरपालिका शहरांतर्गत सार्वजनिक शौचालयातील सेफ्टीक टँकमधील घाण काढणे व सफाई करणे याकरीता प्रती युनिट रु.5500/-(1 युनिट म्हणजे 10 सिट्स) याप्रमाणे दि.20.12.2012 ते 19.12.2014 या कालावधीकरीता कंत्राटदार सुशिक्षित बेरोजगार नविकरण नागरिक सेवा संस्था हयांना कंत्राट देण्यात आला होता. सदर कंत्राटाची मुदत दि.19.12.2014 ला संपुष्टात येत असल्याने मुदत संपण्यापुर्वीच नविन कंत्राटदाची नेमणूक करणे आवश्यक असताना निविदा प्रक्रिया न राबविता स्थायी समिती ठराव क्र.85 दि.19.12.2014 नुसार तसेच आयुक्त अमरावती यांचे मंजूरी आदेश दिनांक 22.01.2015 नुसार पुर्वीच्याच करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार जुनेच कंत्राटदार यांना दिनांक 19.12.2016 पर्यंत मुदतवाढ दिली. पुन: प्रत्ययी आदेशाची प्रत नस्तीत आढळून आली नाही. एकाच कंत्राटदारास वारंवार मुदत वाढीसह पुन: प्रत्ययी आदेश देवून शासन निर्णय क्र. उद्दयोग, उर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-1088/ (2512)/उद्योग-6 दि.2 जाने.1992 मधील तरतुदीचे

उल्लंघन करण्यात आले आहे.

महानगरपालिका अमरावती शहरातील सार्वजनिक शौचालयातील सेफ्टीक टँकमधील घाण काढणे व सफाई करण्याचे कामाच्या मुळ कंत्राटाचा कालावधी दि.1.07.2010 ला संपुष्टात आल्याने दिनांक 6.10.2012 ला वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली. निविदा स्विकारण्याची अंतिम तारिख दिनांक 15.10.2010 पर्यंत होती. सदर कामासाठी खालीलप्रमाणे तिन कंत्रादाराकडून दर प्राप्त झाले.

अ. सुशिक्षित बेरोजगार नवकिरण नागरिक सेवा सहकारी संस्था रु.7000/- प्रतियुनिट दर

ब. सम्यक नागरिक सेवा सहकारी सहकारी संस्था रु.10000/- प्रतियुनिट दर

क. बेरोजगार क्षितीज नागरिक सेवा सहाकारी संस्था रु.12000/- प्रतियुनिट दर

यापुर्वीचे दर लक्षात घेता प्राप्त निविदाधारकांना वाटाघाटासाठी बोलावून तडजोड करण्यात आली. सुशिक्षित बेरोजगार नवकिरण नागरिक सेवा सह. संस्था (पुर्वीचेच कंत्राटदार) यांनी वाटाघाटी अंती रु.5500/- प्रतियुनिट दराने काम करण्यास सहमती दर्शविल्यानुसार कार्यारंभ आदेश देण्यात आला. त्यानंतर दि.20.12.2012 ते 19.12.2014 या कालावधीसाठी सुध्दा मुदतवाढ देण्यात आली.

यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे-

1. अमरावती शहरातील सार्वजनिक शौचालयातील सेफ्टीक टँकमधील घाण काढणे व सफाई करण्याचे कामासाठी दिनांक 6.10.2012 ला स्थानिक वर्तमानपत्र अमरावती दर्पण (सांध्य दैनिक) व अमरावती मंडळ या वर्तमानपत्रात देण्यात आलेल्या निविदा जाहिरातीमध्ये शहरातील एकूण युनिट्सची संख्या नमूद केलेली नाही.

2. निविदाधारकांनी सादर केलेल्या तांत्रिक लिफाफ्यावर उपायुक्त मनपा, अमरावती यांची स्वाक्षरी नाही. तसेच तांत्रिक लिफाफा क्र.1 मधील कागदपत्रावर उपायुक्त मनपा अमरावती यांनी “Opened by me in precenes of T. S. C. Member “ चे समोर स्वाक्षरी केली नाही.

3. सुशिक्षित बेरोजगार नवकिरण नागरिक सेवा सह. या कंत्राटदाराचा नोंदणी क्र.अटीआ/जनरल/ओ/743/10 दि.26.03.2010 असून मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 अतंर्गत आस्थापनेचा नोंदणी क्र. अम/व्यास/253/10 दि.25.05.2010 आहे. असे असतांना वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता विभाग) मनपा, अमरावती यांनी जा.क्र.452 दि.30.11.2010 नुसार सन 2009-10 व 2010-11 या कालावधीचे न केलेल्या कामाबाबतचे अनुभवाचे प्रमाणपत्र निर्गमित केले.

4. महानगरपालिका अमरावती शहरात अंदाजे 100 सार्वजनिक शौचालय असून सेफ्टीक टँकमधील घाण काढणे व सफाई करणे याकरीता प्रथम दि.2.07.2010 ते 1.07.2012 व नंतर दि.20.12.2012 ते 19.12.2014 या कालावधीकरीता कंत्राटदार सुशिक्षित बेरोजगार नविकरण नागरिक सेवा संस्था हयांना कंत्राट देण्यात आला होता. कंत्राटाची मुदत दि.19.12.2014 ला संपुष्टात येत असल्याने मनपाचे आरोग्य विभागाने कंत्राटाची मुदत संपुष्टात येण्यापुर्वीच निविदा प्रक्रिया पुर्ण करुन नविन कंत्राटदाराची नेमणूक करणे आवश्यक होते. परंतु मनपाच्या आरोग्य विभागाने तशी कार्यवाही न करता महानगरपालिका अमरावती स्थायी समिती ठराव क्र.85 दि.19.12.2014 नुसार तसेच आयुक्त अमरावती यांचे मंजूरी आदेश दिनांक 22.01.2015 नुसार पुर्वीच्याच करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार दि.19.12.2016 पर्यंत मुदतवाढ दिली. जुन्याच कंत्राटदारास पुर्नप्रत्ययी

DRAFT

आदेश देण्यात आला असून शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-1088/(2512)/उद्योग-6 दि.2 जाने.1992 मधील तरतूदीचे उल्लंघन झालेले आहे.

5. लेखापरिक्षणास प्राप्त नस्तीचे अवलोकन केले असला कंत्राटाची मुदत संपण्यापूर्वी निविदा प्रक्रिया राबवून नविन कंत्राटदाराची नेमणूक करणे प्रकरणी कार्यवाही न करणे, परिणामी सदरचे कामास मुदतवाढ देण्याची परिस्थिती उद्भवणे याप्रकरणी आयुक्त मनपा अमरावती यांनी विलंबासाठी जबाबदार असलेल्या संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कार्यवाही करावी, असे निर्देश दिले आहे. परंतु मनपाच्या वैद्यकिय अधिकारी (स्वच्छता विभाग) यांनी संबंधीतावर कुठलीही कारवाई केली असल्याचे नस्तीतून आढळून आले नाही.

उपरोक्त मुद्याचे अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.211 दि.25/06/2018 नुसार लेखापरिक्षणास आवश्यक अभिलेख व नमूद मुद्यावर खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले होते. परंतु आक्षेप लिहिस्तोवर अभिलेख व खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 211)

95 व्यावसायीक प्रतिष्ठानांतील कचरा गोळा करणा-या कंत्राटदाराने करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार रॉयल्टी रकमेचा भरणा न केल्यामुळे मनपाच्या झालेल्या हानीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 09

लेखा शीर्ष :147 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 89401030.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2176895.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2176895.00/-

नागरी घनकचरा हाताळणी नियम 2000 नुसार नागरी घनकचरा उचलून त्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. महानगरपालिका, अमरावती अंतर्गत व्यावसायिक प्रतिष्ठाने जसे मंगलकार्यालये, हॉटेल्स, खानावळी, बिअरबार, उपहारगृहे, धाबे व हातगाडया येथून निघणारा ओला व सुका कचरा याची उचल करुन कंपोस्ट डेपोत जमा करणे या कामाकरीता दिनांक 10.05.2013 ते 9.05.2016 या तिन वर्ष कालावधीसाठीचा कंत्राट श्री. विजय बालकिसन गंगन यांना देण्यात आला होता. परंतु कंत्राटदाराने करारातील अटी व शर्तीनुसार रॉयल्टीची रक्कम मनपाकडे भरणा न केल्याने मनपा निधीची हानी झाली.

DRAFT

स्थायी समिती ठराव क्र.105 दि. 28.12.2012 चे मंजूरीनुसार तसेच मनपा आयुक्ताचे आदेश दिनांक 30.04.2013 नुसार महानगरपालिका क्षेत्रातील लहान-मोठे हॉटेल्स, मंगल कार्यालय, बिअरबार, खानावळी, लॉन व इतर आस्थापनेमधून निघणारा वेस्ट गोळा करुन मनपाच्या सुकळी येथील कंपोस्ट डेपोत किंवा मनपा सांगेल त्या ठिकाणी नेवुन टाकण्याबाबत श्री. विजय बालकिसन गंगन या कंत्राटदाराची निविदा मंजूर करुन दि.10.05.2013 ते 9.05.2016 या कालावधीसाठी कंत्राट देण्यात आला होता. परंतु करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कंत्राटदाराने रॉयल्टीची रक्कम मनपा खात्यात जमा न केल्याने मनपा निधीची हानी झाल्याचे लेखापरिक्षणादरम्यान निदर्शनास आले.

यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत-

1. अमरावती शहरातील व्यावसायिक प्रतिष्ठानांतील वेस्ट उचलन्याकरिता तिन निविदा प्राप्त झाल्या असून एकूण वार्षिक उत्पन्नावर मनपाला देय असलेल्या रॉयल्टीचे दर श्री. विजय बालकिसन गंगन यांचे सर्वात जास्त म्हणजे पहिल्या वर्षाकरीता 7%, दुस-या वर्षाकरीता 7%+ 7.2%= 14.2% व तिस-या वर्षी 14.2%+7.2%=21.4% असल्याने तिन वर्षाकरीता कंत्राट मंजूर करण्यात आला. परंतु मनपाने सन 2006 ते 2010 या कालावधीतील रॉयल्टीचे दर अनुक्रमे 18% व 33.75% असल्याने संबंधीत कंत्राटदारासोबत रॉयल्टीच्या दरात वाढ करण्याकरीता पुन्हा वाटाघाटी करण्यात आल्या. त्यानुसार कंत्राटदाराने रॉयल्टीचे दराबाबत त्यांचे पत्र दि. 1.10.2012 नुसार प्रथम वर्षी 7% ऐवजी 8% व दुस-या वर्षासाठी 15.2% व तिस-या वर्षाकरीता 22.4% नुसार काम करण्यास सहमती दर्शविल्यामुळे मनपाचे स्वच्छता विभागाचे पत्र क्र.अमनपा/स्व.वि.772/1/13 दि.10.05.2013 नुसार कार्यारंभ आदेश देण्यात आला. परंतु कंत्राटदाराने निश्चित केलेल्या दरानुसार मनपाकडे रॉयल्टीचा भरणा केला नसल्याचे लेखापरिक्षणादरम्यान आढळून आले.

2. कंत्राटदारास निविदेतील अटीनुसार रु.3 लक्षची बँक गॅरन्टी दि.22.12.2013 ला मनपा खात्यात जमा करुन करारनामा करण्यास कळविले. परंतु कंत्राटदारास वांरवार सुचना देवुनसुध्दा बँक गॅरंटीची रक्कम मनपा खात्यात जमा करण्यात आली नाही, असे असतांना सुध्दा मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 73(क) नुसार दि.08.04.2013 ला करारनामा करुन कार्यारंभ आदेश देण्यात आला. कंत्राटदाराने दि.18.04.2013 ला बँक गॅरेंटीची रक्कम रु.3 लक्ष विलंबाने मनपा खात्यात जमा केली. बँक गॅरेंटीच्या रकमेचा भरणा न करताच करारनामा करण्यात आल्याचे दिसून येते.

3. व्यावसायिक प्रतिष्ठाणातील वेस्ट गोळा करण्यासाठी मनपाने ठरवून दिलेल्या दरानुसार कंत्राटदारास प्राप्त होणारा उत्पन्नाचा तपशिल खालील प्रमाणे असून निश्चित केलेल्या दराने उत्पन्नावर आधारीत रॉयल्टीचा भरणा केलेला नाही.

प्रतिष्ठानांचे नाव	प्रतिष्ठानांची संख्या	प्रतिमहिना दर	दरमहा उत्पन्न	प्रतिवर्षी उत्पन्न
मोठे हॉटेल उपहारगृहे	28	275	7700	92400
छोटे हॉटेल व उपहारगृहे	233	275	64075	768900
बिअर बार	46	500	23000	276000
लॉजिंग बोर्डिंग व हॉस्टेल	58	300	17400	208000

मंगल कार्यालय व सभागृह	78	250	37500	2925000
मंगल कार्यालय व लाम्न	27	150	22500	270000
ढाबा व खानावळ	58	300	17400	208000
इतर आस्थापना (हातगाडया)	200	50	10000	120000
			199575	4869900

कंत्राटदारास प्रतीवर्षी प्राप्त होणा-या उत्पन्नावर वाटाघाटीनुसार निश्चित केलेल्या रॉयल्टीच्या दरानुसार मनपास प्राप्त होणारे रॉयल्टीने उत्पन्न खालीलप्रमाणे-

कंत्राटदारास प्राप्त वार्षिक उत्पन्न रु. 48,69,900/-

पहिल्या वर्षी रु.48,69,900/- च्या 8% = रु.3,89,592/-

दुस-या वर्षी रु.48,69,900/- च्या 15.2% = रु.7,40,225/-

तिस-या वर्षी रु.48,69,900/- च्या 22.4% = रु.10,90,858/-

परंतु नस्तीची तपासणी केली असता पहिल्या वर्षी 7% दराने रॉयल्टीची रक्कम भरणा करणेबाबत मनपाने संबंधीत कंत्राटदारास कळविल्याचे नस्तीतून दिसून येते. संबंधीत कंट्राटदार वाटाघाटीनुसार 8% दराले रॉयल्टी भरण्यास तयार असतांनासुध्दा मनपाने 7% दराने रॉयल्टी भरण्यास कळविणे उचित नाही. त्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार रॉयल्टीचा भरणा केला नसल्याने मनपा निधीची हानी झाली असुन संबंधीताकडून उर्वरित रकमेची वसुली करुन अनुपालन करावे.

4. संबंधीत कंत्राटदार श्री. विजय बालकिसन गंगन यांना करारनाम्यातील अट क्र.10 नुसार त्यांचेकडून प्राप्त होणारी रॉयल्टीची रक्कम रु.3,89,592/- चा भरणा करण्यास मनपाचे पत्र क्र. अमनपा/स्व. वि. 138 दि. 11.06.2014 नुसार कळविण्यात आले. परंतु कंत्राटदाराने रॉयल्टीची रक्कम रु.3,89,592/- मनपा खात्यात जमा न केल्याने मनपाचे पुनश्च: पत्र क्र.273 दि.14.08.2014, पत्र क्र.486 दिनांक 17.11.2014 व स्मरण पत्र क्र.228 दि.27.07.2015 नुसार कळविण्यात आले. असे असतांनाही कंत्राटदाराने फक्त रु.45000/- एवढया रॉयल्टीच्या रकमेचाच भरणा केल्याचे नस्तीतून दिसून येते. उर्वरित थकबाकी रकमेवर करारातील अटी व शर्तीनुसार दंडात्मक कार्यवाही करुन अनुपालन करण्यात यावे.

5. करारनाम्यातीलट अट क्र.10 नुसार ठरलेल्या दरानुसार रॉयल्टीची रक्कम हि प्रत्येक वर्षी प्रथम महिण्याच्या 15 तारखेपर्यंत मनपा खात्यात भरणा करावयाची होती. परंतु कंत्राटदार रॉयल्टीचा भरणा करण्यास टाळाटाळ करीत असल्याने मनपाचे स्मरणपत्र क्र. निरंक दि.14.08.2014 नुसार कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसल्यामुळे कंत्राट रद्द करण्याबाबत तसेच मनपाकडे जमा असलेली सुरक्षा ठेव रक्कम जप्त करून दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल असे कळविण्यात आले. तसेच संबंधीत कंत्राटदारास काम समाधानकारक नसल्याने त्यास काळया यादीत टाकून रु.3 लक्ष मधून रॉयल्टीची रक्कम वसुल करणेबाबत प्रस्तावित केले असल्याचे दिसून येते. परंतु याबाबत मनपाच्या आरोग्य विभागाकडून कुठलीही कार्यवाही झाली नसल्याने संबंधीत कंत्राटदारास मुभा देण्यात आल्याचे दिसून येते.

6. मनपाचे सन 2016-17 चे अंदाजपत्रकात नमुद सन 2012-13, 2013-14 व 2014-15 मध्ये

महसुली जमा रकमेत सदर कामाच्या रॉयल्टीपासून प्राप्त उत्पन्न निरंक दर्शविण्यात आले. त्यामुळे कंत्राटदाराकडून प्रथम वर्षाची रॉयल्टीची रु.3,89,592/-, दुस-या वर्षीची रु.7,40,225/- व तिस-या वर्षीची रु.10,90,858/- अशी एकूण रु. 22,20,675/- वसुल करावयाची असतांना केवळ रु.45000/- एवढीच रक्कम भरणा केल्याचे नस्तीतून दिसून येते. त्यामुळे उर्वरित रक्कम रु.21,75,675/- वसुलपात्र ठरते. रु.21,75,675/- एवढया रकमेची वसुली करुन मनपा खात्यात जमा करण्यात यावी तसे अनुपालन करावे.

7. करारनाम्यातील अट क्र.8 नुसार कंत्राटदाराने प्रत्येक वर्षीचा माहे मार्च अखेरचा सनदी लेखापालाचा लेखापरिक्षण अहवाल मनपास सादर करणे बंधनकारक होते. परंतु अशा प्रकारचा लेखापरिक्षण अहवाल नस्तीत आढळून आला नाही. त्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याने कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करणे अपेक्षित होते. परंतु तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

8. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 मधील परि. क्र.1 नुसार व महसूल व वन विभाग, शासन अधिसुचना दि.23.04.2006 नुसार करारनामा हा कार्यकंत्राटाची रक्कम रु.10 लाखापर्यंत रु.100/- चे मुद्रांकावर व पुढील प्रत्येक लाखासाठी रु. 100/- प्रमाणे अधिकतम रु. 5 लाखार्यंतच्या मुद्रांकावर करणे आवश्यक आहे. परंतु तिन वर्षाची एकूण रॉयल्टीची रक्कम रु.22,20,675/- च्या कामासाठी रु.100/- चे मुद्रांकावर करारनामा केल्याने रु.1220/- एवढया महसुलाची हानी झाली.

9. संबंधीत कंत्राटदाराने रॉयल्टीच्या रकमेचा भरणा करण्यास टाळाटाळ करणे, काम समाधानकारक नसल्याने काळया यादीत टाकण्याचे प्रस्तावित करणे व रॉयल्टीची रक्कम न भरल्यामुळे कारणेदाखवा नोटीस बजावणे असे असतांनासुध्दा संबंधीत कंत्राटदारास दि.10.05.2016 ते 30.06.2016 व त्यानंतर पुन्हा दि.28.02.2017 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. सदर कामाच्या अनुषंगाने मुदतपुर्व नविन कंत्राटदार नेमण्यासाठी प्रक्रिया कार्यवाही करणे अपेक्षित होते. परंतु अशी कार्यवाही मनपाच्या आरोग्य विभागाकडून करण्यात आली नाही.

उपरोक्त मुद्यातील अनियमिता व रॉयल्टीची थकबाकी वसुल न करणे, विलंबाबाबत संबंधीतावर दंडात्मक कार्यवाही न करणे इत्यादीबाबत अर्धसमास पत्र क्र.211 दि.25/06/2018 नुसार रॉयल्टीच्या रकमा जमा केल्याचा तपशिल तसेच आवश्यक अभिलेख व खुलासा करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु माहिती व खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येते आहे.

DATDUBM6401 (Ref No : 211)

101 जमीन वापर मूल्याची तफावतीची रकम रु.2.15 लाखाच्या वसुलीकडे दुर्लक्ष करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :12 मनपानिधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 495000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 215000.00/-

मंजूर अभिन्यासातील खुली जागा अभिन्यासधारकांना व्यायामशाळेच्या बांधकामासाठी वाटप करण्यास दि.18.02.2014 रोजी मंजुरी प्राप्त असून प्रत्यक्ष वाटप दि.13.07.2015 रोजी झाले. जमीन वापर मूल्याची रकम प्रत्यक्ष वाटपाच्या दिनांकास लागू बाजारदराऐवजी दि.18.02.2014 रोजी लागू असलेल्या बाजारदराने वसूल केल्याने दि.13.07.2015 रोजीच्या बाजार दराप्रमाणे निर्माण होणारी रु. 2.15 लाखाची तफावतीची रक्कम वसूलपात्र ठरते.

अमरावती मनपाने मंजूर केलेल्या अभिन्यासातील सार्वजनिक वापरासाठी असलेल्या खुल्या जागांपैकी मौजा शेगाव, सर्व्हे क्र.50 मधील भूखंड क्र.2, क्षेत्रफळ 200 चौ.मी. ही जागा समता गृहनिर्माण सहकारी संस्था, अमरावती यांना व्यायाम शाळा बांधण्यास प्रथम 3 वर्षासाठी वाटपास सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.7, दि.13.02.2014 अन्वये मंजुरी देण्यात आली. सदर अभिन्यास उपरोक्त गृहनिर्माण संस्थेचेच असल्याने नगर विकास विभाग ज्ञापन क्र. टिपीबी-4396/114/प्र.क्र.89/96/नवि.11, दि. 10.06.1996 नुसार सर्वसाधारण सभेने वाटप केले आहे.

उपरोक्त वाटप करताना भुयारी गटार अधिभार व ट्री गार्ड शुल्कापोटी प्रत्येकी रु.10,000/- व 2013 च्या दरानुसार जमीन वापर मूल्याची (रु.4,95,000/-) आकारणी करण्यात आली. त्या अनुषंगाने पुढील प्रमाणे धनादेशा द्वारे महसूल गोळा करण्यात आला.

जमीन वापर मूल्य	- रु.4,95,000/-	पावती क्र.88 दि.	13.01.2015	धनादेश क्र. (417777)
भुयारी गटार अधिभार	- रु.10,000/-	पावती क्र.89 दि.	13.01.2015	धनादेश क्र. (417778)
ट्री गार्ड	- रु.10,000/-	पावती क्र.90 दि.	13.01.2015	धनादेश क्र. (417779)

या वरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहे :

1. सर्वसाधारण सभेने दि.18.02.2014 रोजीच्या ठरावाद्वारे सदरचे वाटप मंजूर केले असले तरी प्रत्यक्ष करारनामा दि.13.07.2015 रोजी होऊन प्रत्यक्ष वाटप करारनाम्याच्या दिनांकानंतर तीन वर्षाकरीता प्रत्यक्ष वाटप करण्यात आले. महाराष्ट्र मनपा अधिनियमाचे कलम 89 नुसार मनपाकडील मालमत्ता चालू बाजार मूल्यापेक्षा कमी नसेल अशा दरानेच भाडेपट्टीवर देता येते. हस्तांतरित करता येते किंवा विकता येते. त्यामुळे प्रत्यक्ष वाटपाच्या दिनांकास लागू असलेल्या जागेचा बाजार दर विचारात घेऊन जमीन वापर मूल्याच्या तफावतीची रकम थकबाकीच्या स्वरुपात वसूल करणे आवश्यक होते. परंतु त्याकडे नगररचना विभागाने दुर्लक्ष केल्याने या प्रकरणात पुढीलप्रमाणे रु. 2.15 लाख कमी वसूल करण्यात आली आहे.

सिध्द शिघ्रगणकानुसार 2013 चा बाजारदर = रु. 4,950/-

जागेचे मूल्य	- रु.4950 x 200	= रु. 9,90,000/-
जमीन वापर मूल्य	- रु.9,90,000 x 50%	**= रु. 4,95,000/- (A)**

सिध्द शीघ्र गणकानुसार 2015 चा बाजार दर		= रु. 7100/-
जागेचे मूल्य	- रु. 7100 x 200	= रु. 14,20,000/-
जमीन बाजार मूल्य	- रु 14,20,000 x 50%	**= रु. 7,10,000/- (B)**

जमीन बाजार मुल्यातील तफावतीची थकबाकी - **(B) - (A) = रु. 2,15,000/-**

2. या प्रकरणातील मंजुरीचा ठराव व करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार सदरचे वाटप प्रत्यक्ष तीन वर्षाकरीता म्हणजेच दि.12/07/2018 पर्यंतच असून या कालावधीत उद्देशिलेल्या प्रमाणे जागेच्या विकास म्हणजेच व्यायाम शाळेचे बांधकाम होणे आवश्यक आहे. परंतु प्रत्यक्ष लेखापरीक्षणाच्या दि.04/05/2018 नंतर मुदतीचे केवळ दोन महिने शिल्लक असताना प्रकरणाचा नस्तीमध्ये प्रत्यक्ष बांधकाम झाल्याचे किंवा सुरु करण्यात आल्याची कोणतीही नोंद किंवा पुरावा आढळत नाही. तसेच बांधकामाचा आराखडा सादर करून त्यास नगर रचना विभागाकडून मंजुरी प्राप्त करवून घेतल्याचे ही दिसून येत नाही. त्यामुळे मुदत संपल्यानंतर त्यामध्ये वाढ करण्यापूर्वी करारनाम्यातील अटी व शर्तीची पूर्तता झाल्याची खात्री होणे आवश्यक आहे, अन्यथा बांधकाम परवानगी पोटी मनपास प्राप्त होणाऱ्या विकास शुल्क, विकास खर्च, प्रशासकीय शुल्क, अनामत रकम, शासनाकडील बांधकाम कामगार कल्याण उपकर, अग्निशमन सेवाशुल्क, शास्तीच्या महसूलापासून मनपा वंचित राहण्याची शक्यता आहे.

DATABWM6901 (Ref No : 136)

103 सर्वसाधारण सभेचा धोरणात्मक निर्णय असताना नविन अभिन्यासातील विकास कामासाठी त्यामधील दर्शनी भागातील भूखंडाचे अधिग्रहण न करण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :16 शासननिधी निधी
अनियमितता कलम : 9ब

मनपा सर्वसाधारण सभेचे ठराव क्र. 41, दि. 20.05.2014 अन्वये घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार नविन अभिन्यासातील विकास कामे करण्यावरील खर्च भागविण्यासाठी त्यामधील दर्शनी भागातील 10% भूखंडाचे मनपाचे नावे हस्तांतरण होणे आवश्यक होते जेणे करून मनपास असे भूखंड विक्री करून येणाऱ्या उत्पन्नातून त्या अभिन्यासांतील विकास कामावर खर्च करणे सुलभ झाले असते. परंतु नविन अभिन्यासांना मंजुरी देताना 10% भूखंड हस्तांतरित करीत असल्याचे मोघमपणे नोंदवून करारनामा करण्यात येत असल्याचे दिसते. तथापि, अभिन्यास हुकुम नोंद्वहीनुसार क्रमानिहाय मंजुरीच्या नोंदींपुढे हस्तांतरित केल्याच्या रकान्यात

निरंक दर्शविण्यात आले आहे. आहेत. त्यामुळे या अभिन्यासामधील विकास कामांवरील खर्चाचा बोजा थेट मनपा निधीवर पडण्याची शक्यता आहे.

सर्व साधारण सभेचे विषय क्र. 41 , दि. 20.05.2014 मधील उल्लेखानुसार त्यापूर्वी मंजूर अभिन्यासातील 10% भूखंड स्विकारून त्याच्या विक्रीतून विकास कामे करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले होते परंतु अभिन्यासांतील नाल्याकडील बाजूचे किंवा कमी मूल्य असलेले भूखंड मनपास प्राप्त होत असल्याचे दिसून आल्याने मनपास होते असलेले नुकसान लक्षात घेता ठराव क्र. 35 व 41, दि. 20.05.2014 अन्वये नविन अभिन्यासांतील विकास कामाबाबत सुधारित धोरण ठरविण्यात आले असून त्यानुसार अभिन्यासधारकांकडून दर्शनी भागातील नियमानुसार निश्चित जागा (प्लॉट) घेण्यात यावी व त्याचे विक्रीतून संबंधित अभिन्यासातील विकास कामे मनपाने करावी असे निश्चित करण्यात आले.

सन 2014-2015 मध्ये एकूण 52 अभिन्यासांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी उपरोक्त धोरण निश्चितीच्या 20.05.2014 या दिनांकानंतर 2014-2015 मधील मंजूर प्रकरणे 40 आहेत. उपलब्ध अभिन्यास हुकुम रजिस्टर (परवानगी नोंद वही) नुसार सर्वच प्रकरणात मनपास भूखंड हस्तांतरित झाल्याचे रकान्यात निरंक नोंद दर्शविण्यात आली आहे.

या वरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहे :-

1. सर्व साधारण सभेने निश्चित केलेल्या धोरणानुसार अभिन्यासांना मंजुरी देतांना त्यांच्या दर्शनी भागातील भूखंड मनपाने स्विकारण्याचा एकच पर्याय ठेवण्यात आला असताना त्यानंतरच्या कालावधीत मंजूर झालेल्या अभिन्यासापैकी काही प्रकरणात अभिन्यासधारकांनी स्वत: विकास करण्याचा पर्याय स्विकारल्याचे लक्षात आले. ही बाब मनपाच्या स्विकृत धोरणाशी विसंगत असताना नगर रचना विभागाने मंजुऱ्या प्रदान केल्या आहेत.

उदाहरण दाखल प्रकरण पुढील प्रमाणे आहेत :-

अ) सौ मनीषा भास्कर टोम्पे, मौजा-बडनेरा,सर्व्हे क्र. 157/2 ,एकूण क्षेत्र 2800 चौ.मी. अभिन्यास मंजुरी क्र.अमनपा/अभि./06/14, दि.30.04.2014
10% भूखंड 280 चौ.मी. x रु.1750/(RR/2014) = रु. 490000/- (जमिनीचे मूल्य)

ब) सोनी मालू ॲड तलडा डेव्हलपर्स, मौजा-पेठ अमरावती, सर्व्हे क्र.61/2, एकूण क्षेत्र 7200 चौ.मी. अभिन्यास मंजुरी क्र. अमनपा/अभि/17/14, दि. 27.06.2014
10% भूखंड 720 चौ.मी.x रु.1950 = रु. 1404000/- (जमिनीचे मूल्य)

2. स्विकृत धोरणानुसार अभिन्यासातील दर्शनी भागातील भूखंड मनपास खरेदीखताद्वारे हस्तांतरित होणे आवश्यक होते. परंतु उपलब्ध प्रकरणातील रु.100/- वरील मुद्रांकासह केलेल्या करारनाम्यात 10% जागा मनपाकडे हस्तांतरित करण्यात येत असल्याचा मोघम उल्लेख आहे. त्यामध्ये मंजूर अभिन्यासाच्या

नकाशानुसार दर्शनी भागातील भूखंड क्र. नोंदविलेले नाहीत. तसेच आवश्यक असलेल्या खरेदीखताद्वारे हस्तांतरणाची कार्यवाही झालेली नाही. अभिन्यासाच्या मंजूर नकाशा मध्ये सुध्दा भूखंडाच्या डिमार्केशन मध्ये हस्तांतरणयोग्य भूखंड क्रमांक उल्लेखिलेले नाही. या संदर्भात अर्धसमासाद्वारे खुलासा मागविण्यात आला होता. परंतु तो प्राप्त झाला नाही.

त्यामुळे भूखंडाचे मनपास प्रत्यक्ष हस्तांतरण न करता तसे झाल्याचे दर्शविल्याने व हस्तांतरणाची कार्यवाही खरेदीखताद्वारे न केल्याने स्विकृत धोरणाप्रमाणे मनपा अश्या भूखंडाची विक्री करून उत्पन्न प्राप्त करू शकणार नाही. परिणामी, अश्या अभिन्यासामध्ये भूखंडधारक राहण्यास आल्यानंतर त्यांना मुलभूत सोयी उपलब्ध करून देणेचे दायित्व मनपावर येणार असल्याने मनपा निधीतून खर्च होणे याप्रकारे दुबार नुकसान मनपास सहन करावे लागणार आहे.

याप्रमाणे हस्तांतरणाची वैध प्रक्रिया न राबविल्याने व अश्या दर्शविलेल्या हस्तांतरीत भूखंडाची मालमत्ता नोंदवहीत किंवा अन्य नियंत्रण नोंदवही नोंद न घेतल्यामुळे त्यांच्या विक्रीमुल्यातून प्राप्त होणाऱ्या संभाव्य रकमा पासून मनपा वंचित असणार आहे हे दिसून येते.

DATABWM6901 (Ref No : 142)

DRAFT

106 मनपातील पदाधिकारी/अधिकारी यांना सन 2014 व 2015 मध्ये पुरविण्यात आलेल्या दैनदिनी छपाईतील अनियमितेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 05

लेखा शीर्ष :88 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 513000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 333000.00/-

महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512)/उद्योग-6 दिनांक 2 जाने. 1992 मधील तरतूदीनुसार कार्यालयाकरीता लागणारे साहित्य व लेखनसामुग्रीकरीता दरपत्रक मागवून खरेदी करणे आवश्यक आहे. मनपा अमरावतीच्या पदाधिकारी/ अधिकारी यांना सन 2014 मध्ये पुरविण्यात आलेल्या दैनदिनीची छपाई करण्याकरीता दरपत्रक न मागविता पुर्वीच्याच पुरवठादाराकडून वारंवार छपाई करुन दैनदिनी पुरविण्यात आल्या. सन 2015 मध्ये दैनदिनी छपाईच्या कामाकरीता एकाच पुरवठादारास वाटाघाटीसाठी बोलविल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नाही. तसेच पदाधिकारी व अधिकारी यांच्या संख्येपेक्षा जादा दैनदिनीची छपाई करण्यात आल्याने व बाजारमुल्यापेक्षा जादा दराने खरेदी करण्यात आली असून मनपा निधीची हानी झाली.

महनगरपालिका अमरावतीमधील पदाधिकारी व अधिकारी यांना सन 2014 व 2015 मध्ये दैनदिनी पुरविण्यासाठी मे. सुबोध मुद्रण, अमरावती यांना प्रतीवर्ष 500 नग डायरी छपाईचे काम दिले. सन 2012, 2013, 2014 व 2015 मध्ये एकाच पुरवठादाराकडून वर्ष 2015 वगळता दर पत्रके न मागविता नियमबाहय छपाई करुन घेण्यात आल्याने उक्त शासन निर्णयातील तरतूदीचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते. सन 2014 व 2015 मध्ये पदाधिकारी व अधिकारी यांच्या संख्येपेक्षा जादा दैनदिनीची छपाई बाजारमुल्यापेक्षा जादा दराने केल्याचे दिसून येते.

याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे.

1. मे. सुबोध मुद्रण, राजापेठ, अमरावती यांचे पत्र दि.16.11.2013 नुसार भांडार अधिक्षक, मनपा अमरावती यांना लिहिलेल्या पत्रात सन 2012 च्या छपाईच्या दरानुसार सन 2014 करीता दैनदिनी छपाई करुन देणेबाबत सहमती दर्शविली. वास्तविकता मे. सुबोध मुद्रण, राजापेठ, अमरावती यांनी कार्यालय प्रमुख आयुक्त यांना पत्र देवून कळविणे आवश्यक होते. परंतु भांडार प्रमुख यांनी दैनदिनी छपाई करीता दरपत्रके न मागविताच रु.478/- प्रमाणे प्रती दैनदिनी दराने एकूण 500 नग दैनदिनी छपाईचे आदेश दिल्याचे नस्तीतून दिसून येते. याबाबतचे प्रदानाचे देयक रु.239000/- लेखापरिक्षणास मागणी करुनही उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

2. सन 2015 च्या दैनदिनी छपाईसाठी दरपत्रके मागविण्यात आली. त्याप्रमाणे खालील पुरवठादारांनी दैनदिनी छपाईचे दर खालीलप्रमाणे सादर केल्याचे दिसून येते.

1. सुबोध मुद्रण राजापेठ, अमरावती प्रती नग रु.576/-
2. सुवर्ण मुद्रण अमरावती प्रती नग रु.588/-
3. सुयोग जनरल सप्लायर, अमरावती प्रती नग रु.595/-

दि.2.01.2015 ला सुबोध मुद्रण, राजापेठ, अमरावती यांना सन 2015 च्या दैनदिनी छपाईच्या अनुषंगाने वाटाघाटी करण्याकरीता बोलविण्यात आले. परंतु उर्वरित दोन पुरवठादारांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले नाही. वाटाघाटीनंतर सुबोध मुद्रण राजापेठ, अमरावती यांचे पत्र दि.19.01.2015 नुसार प्रती दैनदिनी रु.548/- दराने छपाई करुन देण्यास सहमती दर्शविली. त्यामुळे सुबोध मुद्रण राजापेठ अमरावती यानांच दैनदिनी छपाईचे काम देण्याबाबत निश्चित असल्याचे दिसून येते. उर्वरित पुरवठादारांना वाटाघाटी साठी न बोलविल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ मनपास मिळाला नाही.

3. महानगरपालिका, अमरावती शहरामधील निर्वाचित नगरसेवक 87 व नामनिर्देशीत सदस्य 5 अशी एकून 92 सदस्य आहे. तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वर्ग अ व वर्ग ब (तांत्रिक व अतांत्रिकहस) एकूण 98 अधिकारी कार्यरत आहे. मनपातील पदाधिकारी व अधिकारी यांची एकूण संख्या 190 विचारात घेता जास्तीत-जास्त 200 नग दैनदिनीची छपाई करणे गरजेचे असताना 500 नग दैनदिनीची छपाई करण्यात आली. त्यामुळे 300 नग जादाच्या दैनदिनी छपाईचा भुर्दंड मनपावर बसला.

सन 2014 ची छपाई 500 नग- जादा छपाई 300 नग X रु.478/- = रु.143400/-

सन 2015 ची छपाई 500 नग- जादा छपाई 300 नग X रु.548/- = रु.164400/-

एकूण **रु.307800/-**

गरजेपेक्षा जादाची दैनदिनी छपाई केल्याने मनपाच्या रु.307800/- एवढया निधीची हानी झाली.

DRAFT

4. सन 2014 व 2015 च्या दैनदिनीला 114 पाने साधी व 16 पाने कलर फोटो असलेली अशी एकूण 130 पानाच्या दैनदिनीची अंदाजे बाजारमुल्य रु.180/- एवढे असू शकते. असे असताना सन 2014 मध्ये रु.478/- व 2015 मध्ये रु.548/- प्रती दैनदिनी प्रमाणे छपाई करुन घेतल्याने अवाजवी खर्च केल्याचे दिसून येते.

सन 2014 प्रती दैनदिनी जादाचा खर्च रु.298/- X 500 दैनदिनी = रु.149000/-

सन 2015 प्रती दैनदिनी जादाचा खर्च रु.368/- x 500 दैनदिनी = रु.184000/-

एकूण **रु.333000/-**

मनपा अमरावतीची आर्थिक स्थिती नाजूक असताना अनावश्यक अवाजवी खर्च केल्याचे दिसून येते. त्यामुळे जादाच्या खर्चाची रक्कम **रु.333000**/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

5. मुद्रांक क्र.LL-162106 रु.100/- चे मुद्रांकावर दि.2.02.2015 ला करारनामा करण्यात आला असून करारनाम्यावर उपायुक्त मनपा अमरावती यांची स्वाक्षरी नाही. करारनामा होण्यापुर्वीच पुरवठा आदेश दिल्याचे दिसून येते. मे. सुबोध मुद्रण, राजापेठ, अमरावती यांना मनपाचा पुरवठा आदेश क्र.303 दि.30.01.2015 नुसार 500 नग दैनदिनी पुरविण्याबाबत आदेश देण्यात आला. छपाई करून दैनदिनी दि.15.05.2015 ला प्राप्त झाल्याचं नस्तीमधील नोंदीवरुन दिसून येते. सन 2015 मध्ये पाच महिने कालावधी संपल्यानंतर दैनदिनी प्राप्त झाल्याने पदाधिकारी/अधिकारी यांना विलंबाने पुरविण्यात आल्याचे दिसून येते. प्राप्त झालेल्या दैनदिनीची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आली नाही. तसेच प्राप्त दैनदिनीचे वितरण नगर सचिव विभाग, सामान्य प्रशासन विभाग व इतर विभागांना कधी व किती नगाचे करण्यात आले याची नोंद साठा नोंदवहीत घेणे आवश्यक असताना तशी नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आली नाही.

याप्रकरणी अर्धसमास पत्र क्र.219 दि.05/07/2018 नुसार अभिलेख, खर्चाची प्रमाणके व समर्पक खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. आक्षेप लिहिस्तोवर माहिती व खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 219)

107 सक्षम मान्यता प्राप्त न करता 80 वर्ष व त्यावरील निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना निवृत्तीवेतनात 10% वाढ लागू करण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :105 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र.सेनिवे-1014/प्र.क्र.26/सेवा-4 दि.9 जून 2014 नुसार 80 वर्ष व त्यावरील निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना 6 व्या वेतन आयोगानुसार निश्चित केलेल्या मूळ निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनात दि.1.04.2014 पासून 10% वाढ लागू करावयाची आहे. सदर शासन

निर्णयानुसार सदर वाढ राज्य शासकिय कर्मचारी, जिल्हा परिषद, शैक्षणिक संस्था, कृषी विद्यापीठे यांनाच लागू केली आहे. परंतु महानगरपालिकांना सदर शासन निर्णय लागू असल्याचे दिसत नाही. उक्त शासन निर्णयाचे अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभाग महानगरपालिका स्वायत्त संस्थेतून सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना 10% वाढीचा लाभ देणेबाबत स्वतंत्र शासन निर्णय/ परिपत्रक काढून लागू करणे आवश्यक आहे. परंतु याबाबत नगर विकास विभागाचा कुठलाही शासन निर्णय नसतांना मनपातून सेवानिवृत्त कर्मचा-यांना 10% वाढ लागू केल्याचे दिसून येते.

अमरावती महानगरपालिकेच्या लेखा विभागाकडून मनपाच्या आस्थापनेवरून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनाचे प्रदान करण्यात येते. सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान निवृत्तीवेतन कार्यासनाकडील मासिक वेतन देयकाची पडताळणी केली असता 80 वर्ष व त्यावरील निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना दि.1.07.2014 पासून 10% वाढ लागू केल्याचे निदर्शनास आले.

याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे:-

1. महाराष्ट्र शासनविभाग वित्त ,, शासन निर्णय क्र-सेनिवे.1014.क्र.प्र/26-सेवा/4 दि.9 जून वर्ष 80 नुसार 2014 मूळ केलेल्या निश्चित आयोगानुसार वेतन व्या 6 निवृत्तीवेतनधारकांना कुटुंब/निवृत्तीवेतनधारक त्यावरील व .दि निवृत्तीवेतनात कुटुंब/निवृत्तीवेतन1.04.2014 पासून 10% वाढ लागू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णय हा राज्य शासकिय कर्मचारी, जिल्हा परिषद, कृषी विद्यापिठे व शैक्षणिक संस्था यांनाच लागू असल्याचे नमूद केले आहे. मनपाचे आस्थापनेवरून सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकाच्या निवृत्तीवेतनात 10% वाढ लागू करणेबाबत शासनाचे नगर विकास विभागाने स्वतंत्र शासन निर्णय/ परिपत्रक काढून लाभ लागू करणे आवश्यक होते.परंतु मनपाचे आस्थापनेवरील सेवानिवृत्त कर्मचा-यांना निवृत्तीवेतनात 10% लागू करणेबाबत शासनाचे नगर विकास विभागाचे कुठलेही आदेश नसताना दि. 1.07.2014 पासून 10% वाढ लागू करणे नियमसंगत वाटत नाही.

2. मनपाचे आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या सन 2014-15 मधील निवृत्तीवेतन देयकाची पडताळणी केली असता दि.1.07.2014 ला 80 वर्ष पुर्ण केलेल्या व त्यानंतर 80 वर्ष वय पुर्ण करणा-या निवृत्तीवेतनधारक/कुटुंबनिवृत्तीवेतनधारक यांना मुळ निवृत्तीवेतनावर 10% वाढ लागू करुन प्रदान करण्यात आल्याचे निदर्शनास आले. उदाहरणादाखल खालील निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना निवृत्तीवेतनात 10% वाढ लागू करण्यात आली.

नि. वेतनधारक/ कु. नि. वेतनधारकाचे नाव	जन्मतारीख	10% वाढ लागू केल्याचा दिनांक	मूळ निवृत्तीवेतन/ कु. निवृत्तीवेतन
श्रीमती कलावती कापसे	1.07.1929	1.07.2014	रु.2882/-
श्रीमती शेवंताबाई राजगिरे	--	1.07.2014	रु.2882/-
श्रीमती विठाबाई मेटांगे	--	1.07.2014	रु.2882/-
श्रीमती सुहासिनी टाकळकर	--	1.07.2014	रु.2882/-
श्री. एस. एम. ठाकरे	--	1.07.2014	रु.3752/-
श्री. बी. जि. चुटके	1.07.1930	1.07.2014	रु.3106/-

श्री. सै. इब्राहिम सै.गुलाब	1.04.1927	1.07.2014	रु.5772/-
श्री. बी. पी. वैद्य	27.02.1935	1.03.2015	रु.6345/-
श्री. एम. टि. बाळापुरे	19.03.1929	1.07.2014	रु.3088/-
श्री. व्हि. एन. महाजन	1.05.1932	1.01.2016	रु.6164/-
श्री. बाबुराव बी. जोशी	1.07.1920	1.07.2014	रु.5275/-
श्रीमती निवेदिता शेळके	18.08.1925	1.07.2014	रु.4538/-
श्री. आर. टी. बक्षी	--	1.07.2014	रु.6215/-
श्री. यशवंत झेड. तायडे	--	1.07.2014	रु.4723/-
श्री. यशवंत झेड. तायडे	--	1.07.2014	रु.6215/-
श्री. व्हि. ए. हाडे	--	1.07.2014	रु.5594/-
श्री. एस. एल. लोखंडे	--	1.07.2014	रु.6215/-
श्रीमती शकुंतला कदम	--	1.07.2014	रु.4211/-
श्री. मकसुद हुशन	1.07.1931	1.11.2014	रु.4154/-
श्री. एस. आर. वसुले	1.06.1930	1.07.2014	रु.4041/-
श्री. व्हि. सी. दोंडे	10.06.1929	1.07.2014	रु.6215/-
श्रीमती सरला आर. देवलकर	20.08.1931	1.07.2014	रु.4638/-
श्री. आर. जि. शर्मा	1.07.1932	1.07.2014	रु.6215/-
श्री. व्हि. के. पिपळकर	1.01.1928	1.11.2014	रु.4751/-
श्रीमती जराबाई व्हि. माणिकपुरे	24.05.1936	1.07.2017	रु.3729/-
श्री. बी. एम. दुबे	1.06.1936	1.06.2016	रु.6960/-
श्रीमती साधना मेळमट्टी	----	1.07.2014	रु.4601/-

उपरोक्त प्रकरणे नमुन्यादाखल असून काही निवृत्तीवेतनधारकांच्या जन्मतारीख नमूद नाही. वर नमूद निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना लागू करण्यात आलेली 10% वाढ मनपाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन सर्वसाधारण सभेची सक्षम मान्यता व आवश्यक असल्यास नगर विकास विभागाकडील शासन मंजूरी प्राप्त करून लागू करण्यात आलेले लाभ नियमित करावे अन्यथा वसुलीची कार्यवाही करावी.

3. श्री. एन. डी. जोशी हे निवृत्तीवेतन प्रदान आदेश क्र.865 आय डि बि आय बँक शाखा अमरावती खाते क्र.50710010100194 वर निवृत्तीवेतन घेत आहे. त्यांचे मुळ निवृत्तीवेतन रु.5833/- असतांना त्यांना रु.5863/- वर 10% दराने रु.586/- प्रमाणे वाढ देण्यात आल्याने अतिप्रदान होत आहे. 10% लागू केल्याच्या दिनांकापासून वसुली करुन अनुपालन करावे.

DATDUBM6401 (Ref No : 48)

110 मनपा शाळेतील वर्ग 1 ते 7 मधील गरीब मुला-मुलींसाठी गणवेश शिलाई करुन वाटप करण्यातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 06

लेखा शीर्ष :243 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 839207.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 811064.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 28203.00/-

महानगरपालिका अमरावती शहरातील मनपाच्या शाळामधील वर्ग 1 ते 7 च्या गरीब विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्याकरीता गणवेश शिलाई करुन गणवेशाचे वाटप करणे इत्यादी प्रकरणी प्रत्यक्षात एकूण विद्यार्थी संख्येपेक्षा शाळांना जादा गणवेश संचाचा पुरवठा करणे, मागील वर्षातील विद्यार्थी संख्या विचारात न घेता जादा गाणवेशाची शिलाई करणे, विद्यार्थ्यांच्या उंचीची मोजमापे न घेता गणवेशाची शिलाई करणे इत्यादीबाबत अनियमिता झाल्याचे लेखापरिक्षणादरम्यान निदर्शनास आले असून महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस-1088/(2512) उद्योग-6 दिनांक 2 जानेवारी 1992 मधील निर्देशांचे उल्लंघन झाले आहे.

सन 2014-15 मध्ये प्रदान करण्यात आलेल्या 2013-14 चे शैक्षणिक सत्राकरीता अमरावती अंतर्गत शाळांतील वर्ग 1 ते 7 मधील गरीब मुला-मुलींना गणवेशाचे वाटप करण्यास कापड खरेदी व शिलाई मिळून या प्रयोजनासार्ठ रु.75,10,192/- चे खर्चास दिनांक 30.03.2013 रोजी आयुक्त अमरावती यांची प्रशासकीय मंजूरी प्राप्त असून मे. सांचल मार्केटिंग, अमरावती यांना शिलाई पोटी रु.8,11,064/- चे प्रदान करण्यात आले. तसेच सन 2014-15 चे शैक्षणिक सत्रासाठी मनपाच्या शाळेतील वर्ग 1 ते 7 मधील विद्यार्थ्यांना गणवेश शिलाईचे मे. सांचल मार्केटिग, अमरावती यांना रु.8,39,207/- चे प्रदान करण्यात आले. प्रत्यक्ष पटसंख्येपेक्षा जादा गणवेश शिलाई केल्याने शाळाकडे फार मोठया प्रमाणावर गणवेश शिल्लक असल्याचे निदर्शनास आले.

यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :-

1. <u>मनपाच्या शाळेतील वर्ग 1 ते 7 मधील विद्यार्थ्यांना सन 2013-14 चे सत्राकरीता गणवेश शिलाई करुन विलंबाने पुरवठा करणेबाबत</u> -

प्रशासकीय मंजूरी दिनांक 30.03.2013 रक्कम रु.75,10,192/-

करारनामा दिनांक 07.06.2013, मनपा अमरावतीचा पुरवठा आदेश क्र.46 दि. 12.06.2013

सांचल मार्केटिंग, अमरावतीकडून पुरवठा देयक क्र.177 दि.25.07.2013

शिलाई देयक प्रमाणक क्र. 1294 दि.23.05.2014 रु.8,11,064/-

(आकडे रुपयात)

अ.क्र.	गणवेश शिलाई संचाचा प्रकार	शिलाई केलेले गणवेश संच	प्रती संच शिलाई दर	शिलाईची रक्कम
1	वर्ग 1 ते 4 च्या मुलांचे निळा पँट व लालचेक हाफशर्ट	3616	76.50	276624
2	वर्ग 5 ते 7 च्या मुलांचे निळा हाफपँट व लालचेक हाफशर्ट	2282	77.70	177311
3	वर्ग 1 ते 4 च्या मुलींचे निळा पिनो फ्रॉक व लालचेक ब्लाउज	1977	64.10	126725

4	वर्ग 5 ते 7 च्या मुलींचे निळा पीनोफ्राक व लालचेक ब्लाउज	1240	65.00	80600
5	वर्ग 1 ते 7 च्या उर्दु शाळेतील मुलींचे सलवाल कमीज	2674	56	149744
		11789	--	811004

महाराष्ट्रातील सर्व शाळा जुन महिन्याच्या शेवटच्या आठवडयात सुरू होत असल्याने शाळा सुरू होताच विद्यार्थ्यांना गणवेश पुरवणे आवश्यक होते. परंतु मनपाच्या भांडार विभागाने सांचल मार्केटिंग अमरावती यांचे सोबत दि. 7.06.2013 ला करारनामा केल्या असून दि.12.06.2013 ला गणवेश शिला कार्यारंभ आदेश दिला. सांचल मार्केटिंग, अमरावती यांचेकडून बिल क्र.177 दि.25.07.2013 नुसार शिलाई केलेल्या गणवेशाचा पुरवठा करण्यात आला. भांडार विभागाच्या साठा नोंदवहीची पडताळणी केली असता शिलाई केलेले गणवेश कधी प्राप्त झाले व शाळांना कधी पुरविण्यात आले. याबाबतची नोंद घेण्यात आली नाही. त्यामुळे विहित कालमर्यादेत गणवेश पुरविल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे शिलाई केलेल्या गणवेशाचा शालेय विद्यार्थ्यांना विलंबाने पुरवठा करण्यात आल्याने योजनेचा उदेश विफल ठरला.

2. <u>पटसंख्येपेक्षा जादा गणवेश शिलाई केल्याने गणवेश शिलाईवर अवाजवी खर्चाबाबत</u>-

सन 2014-15 चे शैक्षणिक सत्रासाठी मनपाच्या शाळेतील वर्ग 1 ते 7 मधील विद्यार्थ्यांना गणवेश शिलाई करुन पुरविण्याचे काम सांचल मार्केटिग, अमरावती यांना देण्यात आले.

कार्यारंभ आदेश क्र. 236 दिनांक 19.03.2014

शिलाई केलेल्या गणवेशाची बिल क्र.180 दि.30.06.2014 रु.8,39,207/-

2) निळा हाफ पँट व लाल चेक हाफ शर्ट गणवेश शिलाई

वर्ग	विद्यार्थी संख्या	शिलाई दर प्रती नग	शिलाईची रक्कम
1 ला	938	76.50	71757
2 रा	889	76.50	68009
3 रा	955	76.50	73058
4 था	1090	76.50	83385
5 वा	777	77.70	60373
6 वा	743	77.70	57731
7 वा	733	77.70	56954
	6125	एकूण	471267

(ब) मुलीचे निळा पिनो फ्रॉक व लाल चेक ब्लॉउज गणवेश शिलाई

वर्ग	विद्यार्थी संख्या	शिलाई दर प्रती नग	शिलाईची रक्कम
1 ला	558	64.10	35768

2 रा	559	64.10	35832
3 रा	613	64.10	39293
4 था	728	64.10	46665
5 वा	434	65.00	28210
6 वा	440	65.00	28600
7 वा	438	65.00	28470
	3770	एकूण	242838

2) उर्दु शाळेतील मुलीकरीता निळा सलवार लाल चेक कुर्ता व निळी ओढणीची शिलाई

वर्ग	विद्यार्थी संख्या	शिलाई दर प्रती नग	शिलाईची रक्कम
1 ला	351	56.00	19656
2 रा	322	56.00	18032
3 रा	322	56.00	18032
4 था	377	56.00	21112
5 वा	297	56.00	16632
6 वा	285	56.00	15960
7 वा	280	56.00	15680
	2234	एकूण	125104

शिक्षण विभागाकडील साठा नोंदवहीनुसार 2014-15 चे शैक्षणिक सत्राकरीता 12129 गणवेश संचावरील शिलाईचा खर्च वरील एकूण (अ+ब+क ची बेरीज) रु.839209/- एवढी असून सन 2013-14 मधील एकूण विद्यार्थी संख्या विचारात घेवून गणवेश संचाची शिलाई करणे आवश्यक असतांना 12129 विद्यार्थ्यांसांठी गणवेश शिलाई करण्यात आले. काही निवडक शाळाकडील साठा नोंदवहीची तपासणी केली असता विद्यार्थी पटसंख्येपेक्षा जादा गणवेश पुरविण्यात आले असून गरजेपेक्षा जादा गणवेश शिलाईकरीता कापड खरेदी करणे व त्यानुसार जादा गणवेशाची शिलाई करुन शाळांना पुरविल्याने शाळांकडे मोठया प्रमाणावर शिलाई केलेले गणवेश संच शिल्लक असल्याचे निदर्शनास आले. मनपाची आर्थिक स्थिती अडचणीची असतांना गणवेश शिलाईवर अवाजवी खर्च करण्यात आल्याने मनपावर आर्थिक खर्चाचा अधिकचा भार पडला.

खालील शाळांना पुरविण्यात आलेले गणवेश, वाटप केलेले गणवेश व शिल्लक गणवेश खालीलप्रमाणे:-

1) मराठी मुलांची प्राथमिक शाळा क्र.2 बुधवारा अमरावती

वर्ग	पुरविण्यात आलेले गणवेश			वाटप करण्यात आलेले गणवेश			शिल्लक गणवेशाची संख्या		
	मुले	मुली	एकूण	मुले	मुली	एकूण	मुले	मुली	एकूण
1	28	11	39	8	7	15	20	4	24
2	20	20	40	7	8	15	13	12	25
3	14	14	25	14	13	27	0	1	1
4	11	15	26	4	10	14	7	5	12
एकूण	83	49	132	33	38	71	40	21	61

ब. उच्च श्रेणी मुख्याध्यापक मराठी शाळा बुधवारा, अमरावती

वर्ग	पुरविण्यात आलेले गणवेश			वाटप करण्यात आलेले गणवेश			शिल्लक गणवेशाची संख्या		
	मुले	मुली	एकूण	मुले	मुली	एकूण	मुले	मुली	एकूण
1	15	20	35	9	11	20	6	9	15
2	18	13	31	15	7	22	13	6	19
3	12	15	27	10	8	18	2	7	9
4	25	25	50	8	7	15	17	18	35
5	25	25	50	12	18	30	13	7	20
6	15	20	35	14	14	28	1	6	7
7	25	30	55	19	14	33	6	16	22
	135	148	283	77	84	161	58	64	122

उपरोक्त शाळामधील शिल्लक गणवेश साठा हा शाळांकडील नोंदवहीनुसार आहे. यावरुन असे निदर्शनास येते की, मनपाच्या भांडार विभागाने शिक्षण विभागाकडून मागील वर्षीच्या पटसंख्येचा आधार घेवून कापड खरेदी करणे व त्यानुसार गणवेशाची शिलाई करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही. प्रमाणापेक्षा जास्त गणेवश संचाची शिलाई केल्याने शाळांकडे फार मोठया प्रमाणावर गणवेश शिल्लक राहिल्याने मनपाचा निधी नाहक गुंतून पडला.

3. <u>अंदाजपत्रकात गरजेपेक्षा जादाची तरतूद करणे</u>-

प्राथमिक शाळेतील गरीब मुला-मुलींना मोफत गणवेशाचे वाटप करण्यासाठी सन 2014-15 चे मुळ अंदाजपत्रकात लेखाशिर्ष 243 अंतर्गत रु.100,00,000/- एवढी तरतूद केली असतांना प्रत्यक्षात रु.73,74,850/- एवढा खर्च करण्यात आला. अंदाजपत्रकात मंजूर तरतूदीपेक्षा कमी खर्च झाला आहे. त्यामुळे मनपा अंतर्गत विविध विकास कामासाठी निधी अपुरा पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4. <u>स्थानिक वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्दी देण्यातील अनियमितता</u>-

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन, शासन निर्णय क्र. जाहिरात-2009/प्र.क्र.137/का-34 दिनांक 31.08.2009 मधील निर्णय क्रमांक 12 नुसार निविदेचे मुल्य रु.55 लाखापर्यंत असेल तर अशा जाहिराती **ब** वर्ग दैनिक वर्तमानपत्रात व साप्ताहिकात प्रसिध्दी दयावी असे नमूद आहे. मनपाने नियमबाहयरित्या स्थानिक सांध्य दैनिक या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दी दिल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रंमाक मातंसं/नस्ती-2010/प्र.क्र. 34/39 दि.6.08.2010 नुसार निविदा प्रक्रियेचे महत्व लक्षात घेवून शासनाच्या प्रत्येक विभागात दिनांक 1.12.2010 पासून ई-निविदा कार्यप्रणाली वापरणे अनिवार्य करण्यात आले आहे. असे असतांना ई-निविदा कार्यवाहीचा अवलंब न केल्याने ही गंभीर अनियमितता ठरते. सदर जाहिरात स्थानिक सांध्य दैनिकात दिल्यामुळे गणवेश शिलाईचे कंत्राट स्थानिक पुरवठादारालाच देण्याचा हेतू स्पष्ट होतो. शासन निर्णयानुसार विभागीय वर्तमान पत्रात किंवा ई-निविदाव्दारे जाहिरात दिली असती तर खुल्या बाजारपेठेतील स्पर्धात्मक दराचा मनपाला फायदा मिळाला असता.

DRAFT

5. <u>शिलाई केलेल्या गणवेशाचा पुरवठा विलंबाने केल्या प्रकरणी दंडात्मक कार्यवाही न करणे</u>-

अभिलेख्याची तपासणी केली असता मे. सांचल मार्केटिंग यांना 2014-15 चे शैक्षणिक सत्राकरीता गणवेश शिलाई करण्याचे कार्यादेश क्रंमाक 236 दिनांक 19.03.2014 ला दिले. सदर शिलाई केलेले गणवेश भांडार विभागाला बिल क्र.180 दि.30.06.2014 नुसार प्राप्त झाल्याची नोंद साठा पुस्तकात आहे. शिलाई केलेले गणवेश शिक्षण विभागाला केव्हा दिले याची साठा पुस्तकात नोद नाही. तसेच गणवेश कोणी व कधी स्विकारले याबाबत साठा नोंदवहीत स्वाक्षरि व दिनांक नमूद केलेला नाही. त्यामुळे मनपाच्या सर्व शाळांना गणवेशाचे वाटप झाले किंवा नाही, याबाबतची खात्री होत नाही. शिक्षण विभागाचे साठा पुस्तक तपासणीत प्राप्त झाले नाही. सांचल मार्केटिंग, अमरावती यांचेकडून शिलाई केलेले गणवेश दि.30.06.2014 ला प्राप्त झाल्याची नोंद भांडार विभागाच्या साठा नोंदवहीत असल्याने गणवेशाचे वाटप माहे जुलै-2014 मध्ये अथवा त्यानंतर झाल्याचे दिसून येते. सदर बाब लक्षात घेता सांचल मार्केटिंग यांनी जाहिरातीमध्ये नमुद व करारनाम्यातील अटीनुसार मुदतीच्या आत (30 दिवसात) गणवेश शिलाई न झाल्यास प्रती दिवसाला रु.200/- दंड आकारला जाईल असे असतांना मनपाने सांचल मार्केटिंग यांच्यावर दंडात्मक कार्यवाही केल्याची दिसून येत नाही.

6. **<u>शालेय विद्यार्थ्यांना गणवेशाचे विलंबाने वाटन करणे</u>-**

मनपा त्यांच्या क्षेत्रातील शाळेला दरवर्षी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करीत आलेले आहे. शाळेचे शैक्षणिक सत्र प्रतीवर्षी माहे जुन महिण्यापासुन सुरू होत असते. त्यामूळे शाळेत विद्यार्थ्यांना गणवेश शाळेच्या पहिल्या दिवसापासून उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात मनपाने माहे जुलै 2014 मध्ये गणवेशाचे वाटप केल्याचे दिसून येत आहे. त्यामूळे विद्यार्थ्यांना शाळेच्या सुरूवातीपासून वाटप न केल्यामूळे गणवेशाचा योग्यप्रकारे उपयोग झाला नसल्याचे आढळून येते. त्यामूळे योजनेचा उद्देश सफल झाला नसल्याचे दिसून येते.

उपरोक्त नमूद आक्षेपित मुद्यांच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.167 दि.04.05.2018 नुसार संबंधीत अभिलेख व खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले होते. परंतु मागणी केलेले अभिलेख व खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 167)

112 मनपातील पदाधिकारी यांचेकडील खाजगी सचिवांच्या नियमबाह्य नेमणुकीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :88 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 150000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 150000.00/-

महानगरपालिका अमरावतीचे पदाधिकारी महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, पक्षनेता व विरोधी पक्षनेता यांनी खाजगी सचिवाची प्रतीमाह रु.2500/- प्रमाणे नेमणूक केली. संबंधीत पदाधिकारी यांना मनपाचे आस्थापनेवरून कार्यालयीन कामकाजासाठी स्विय सहाय्यक पुरविण्यात येतात. असे असताना पदाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर खाजगी सचिवाची नेमणूक करण्यात आल्याने मनपावर सन 2014-15 मध्ये रु.150000/- चा अधिकचा भार पडला.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 19-अ(1) मधील तरतूदीनुसार महानगरपालिकेने केलेल्या नियमाव्दारे राज्य शासनाच्या पूर्वमंजूरीने पालिका सदस्यांना मानधन, फी व भत्ते देण्याबाबत तरतूद आहे. परंतु पदाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर खाजगी सचिवाची नेमणूक करून मनपा निधीतून मानधनाचे प्रदान करण्याबाबत अधिनियमात कुठलीही तरतूद नसताना मनपा अमरावतीचे पदाधिकारी महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती व विरोधी पक्षनेता यांनी खाजगी सचिवाची मानधनावर प्रतीमाह रु.2500/- प्रमाणे नियमबाह्यपणे नेमणूक केली. प्रतीमाह रुपये 2500/- प्रमाणे एकूण पाच खाजगी सचिवावरील सन 2014-15 मध्ये एकूण रु.150000/- एवढया खर्चाचा भुर्दंड मनपा निधीवर पडला आहे.

याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे:-

सन 2014-15 मध्ये लेखाशिर्ष 88 अतंर्गत रु.3015710/- एवढा आकस्मिक खर्च करण्यात आला असून या खर्चामध्ये पदाधिकारीव्दारा नेमण्यात आलेल्या 5 खाजगी सचिवांचे मानधनावरील रु.150000/- एवढया खर्चाचा समावेश आहे. खालील नमूद खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास प्राप्त झाली.

(रक्कम रूपयात)

पदाधिका-याचे नाव	महिना	खर्चाचा प्रमाणक क्र. व दिनांक	देयकाची रक्कम
मा. सभापती, स्थायी समिती, मनपा अमरावती	डिसेंबर-2014	12523 दि.11.03.2015	2500
मा. महापौर मनपा, अमरावती	फेब्रूवारी-2015	12524 दि.11.03.2015	2500
मा. पक्षनेता, मनपा, अमरावती	फेब्रूवारी-2015	12525 दि.11.03.2015	2500

देयकावर खाजगी सचिवांची नावे नमूद नाही. मनपाचे पदाधिकारी यांनी नेमलेल्या खाजगी सचिवावर सन 2014-15 मध्ये खालीलप्रमाणे खर्च झाला.

पदाधिका-याचे नाव	खाजगी सचिवाचे नाव	कालावधी	प्रती महिना मानधन	प्रदान केलेले मानधन
मा. महापौर, मनपा	श्री. रोशन भालसाखर	4/14 ते 3/15	रु.2500/-	रु.30000/-

अमरावती				
उपमहापौर, मनपा अमरावती	श्री. सुरज सोनोने	4/14 ते 3/15	रु.2500/-	रु.30000/-
मा. सभापती स्थायी समिती मनपा अमरावती	नाव नमूद नाही.	4/14 ते 3/15	रु.2500/-	रु.30000/-
मा. पक्षनेता, मनपा अमरावती	श्री. मुकेश कासलीकर	4/14 ते 3/15	रु.2500/-	रु.30000/-
मा. विरोधी पक्षनेता	श्री. गजानन राऊत/ श्री. डिंगाबर डहाके	4/14 ते 3/15	रु.2500/-	रु.30000/-
	एकूण			रु.150000/-

उपरोक्त खर्चाचे अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.228 दि.13.07.2018 नुसार नगर सचिव विभाग प्रमुखांना खाजगीसचिवांच्या नेमणूकीबाबत शासन निर्णयाची प्रत, शासनाच्या नगर विकास विभागाकडून निश्चित केलेला जाब चार्ट, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात तरतूद व सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेल्या ठरावाची प्रत लेखापरिक्षणास पुरविण्याबाबत व सदर प्रकरणी खुलासा करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु अभिलेख व खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे. मनपाचे पदाधिकां-यामार्फत खाजगी सचिवाची करण्यात आलेली नमेणूक नियमबाह्य असल्याने प्रदान करण्यात आलेली रक्कम रु.150000/- वसुलपात्र ठरते. वसुलीची कार्यवाही करुन अनुपालन करावे.

DATDUBM6401 (Ref No : 228)

113 मनपा शाळेतील वर्ग 1 ते 7 मधील गरीब मुला-मुलींसाठी गणवेश कापड खरेदी करतांना गरजेपेक्षा जादा कापडाची खरेदी केल्याने मनपावर रु.893923/- एवढया अनावश्यक खर्चाचा भार पडल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 05

लेखा शीर्ष :243 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 6199192.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5305269.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 893923.00/-

महानगरपालिका अमरावती शहरातील मनपाच्या शाळांमधील वर्ग 1 ते 7 च्या गरीब विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्याकरीता गणवेश कापड खरेदी करणे, गणवेश शिलाई करुन गणवेशाचे वाटप करणे इत्यादी

प्रकरणी प्रत्यक्षात एकूण विद्यार्थी संख्येपेक्षा जादा विद्यार्थ्यांकरीता गणवेश कापड खरेदी करुन अतिरिक्त गणवेशाची शिलाई करणे इ. बाबत अनियमिता झाल्याचे लेखापरिक्षणादरम्यान निदर्शनास आले. उपरोक्त खरेदी प्रक्रियेत महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस-1088/(2512) उद्योग-6 दिनांक 2 जानेवारी 1992 मधील निर्देशांचे उल्लंघन झाले आहे.

महानगरपालिका अमरावतीच्या शिक्षण विभागाकरीता भांडार विभागाने मनपाच्या शाळेतील वर्ग 1 ते 7 च्या गरीब मुला-मुलींना गणवेश पुरविण्यासाठी महाराष्ट्र स्टेट हँडलूम कार्पोरेशन लि. नागपूर यांचेकडून कापडाची खरेदी करण्यात आली. गणवेश शिलाईकरीता कापडाची मागणी करण्यापूर्वी मनपाच्या शाळेतील एकूण लाभार्थीची संख्या व उंचीची मोजमापे घेवून कापडाची खरेदी करणे, तसेच मनपाच्या शिक्षण विभागाकडून प्राप्त मागणीचा अंदाज घेवून त्यानंतरच कापड खरेदीबाबत पुरवठा आदेश देणे आवश्यक असताना भांडार विभागाने यानुसार कार्यवाही न करता शाळेच्या एकूण पटसंख्येपेक्षा जादा विद्यार्थ्यांसाठी कापडाची खरेदी केली. त्यामूळे कापड खरेदीवर गरज नसतांना आवश्यकतेपेक्षा जादा कापड खरेदी केल्याने अनावश्यक खर्चाचा भार मनपावर पडला.

उपरोक्त खरेदी प्रकरणी लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत:-

1. महाराष्ट्र स्टेट हँडलूम कॉर्पोरेशन लि. नागपूर यांचेकडून खरेदी केलेल्या कापडाचा तपशील भांडार विभागाकडील साठा नोंदवहीनुसार:-

प्रशासकीय मंजूरी दि.15.02.2014 रु.8514599/-(कापड खरेदी व शिलाईसाठी एकत्रित)
पुरवठा मागणी आदेश क्र.223 दिनांक 4.03.2014
कापड पुरवठा केल्याचा बिजक क्र.3 दिनांक 24.06.2014
प्रमाणक क्र.6585 दि.21.10.2014 रु.6199192/-

अ.क्र.	कापडाचा प्रकार	खरेदी केलेला कापड	प्रती मिटर दर	रक्कम
1	मनिला, ब्लाउज, कुर्ता करीता लाल चौकडी कापड(ड्रिल)	20594.20 मिटर	रु.86.25	रु.1776250
2	हाफ पँटकरीता नेव्ही निळया रंगाचा कापड (उलन कापड)		रु.270.00	रु.2041200
3	बॉडी फ्रॉग नेव्ही निळया रंगाचा कापड (उलन कापड)	5606.70 मिटर	रु.270.00	रु.1513809
4	ओढणीकरीता नेव्ही निळया रंगाचा कापड	4468 मिटर	रु.86.25	रु.385365
5	सलवार करीता नेव्ही निळया रंगाचा कापड	5595 मिटर	रु.86.25	रु.482569
		43823.90 मिटर		रु.6199193

DRAFT

सन 2014-15 च्या मंजूर तरतूदीतून प्रमाणक क्र.6585 दि.21.10.2014 रु.61,99,192/- चे प्रदान करण्यात आले. मनपा शाळेतील वर्ग 1 ते 7 मधील (सन 2014-15 ची पटसंख्या)विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्याकरीत मनपा शाळामधील पटसंख्या व विद्यार्थ्यांच्या उंचीची मोजमापे न घेता गणवेश कापड खरेदी करण्यात आले. व व उंचीनुसार प्रत्येक मुलांना किती कापड लागेल याचा पुरेसा अंदाज घेऊन कापड खरेदी केल्याबाबत अभिलेख मनपाच्या भांडार विभागाकडून लेखापरिक्षणास प्राप्त न झाल्याने सखोल तपासणी करता आली नाही.

2. मनपाच्या शाळेतील ड्रेस कोडनिहाय विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेल्या गणवेश सचांची संख्या खालीलप्रमाणे:-

वर्ग	गणवेश संचाचा प्रकार	पुरविण्यात आलेले गणवेश संच
वर्ग 1 ते 4 वर्ग 5 ते 7	मुलांचा निळा हाफ पँट व लालचेक शर्ट -------- // ---------	3872 संच 2253 संच
वर्ग 1 ते 4 वर्ग 5 ते 7	मुलींचा निळा पिनो फ्रॉक व लालचेक ब्लाउज --------- // ----------	2458 संच 1312 संच
वर्ग 1 ते 7	उर्दु शाळेतील मुलींना निळा सलवार व लालचेक कुर्ता, ओढणी	2234 संच
	एकुण	12129 संच

सन 2014-15 चे सत्रामध्ये 10380 विद्यार्थी पटसंख्या असताना 12129 विद्यार्थ्यांसाठी कापड खरेदी करण्यात आला. परिणामी विद्यार्थी पटसंख्येपेक्षा जादा गणवेश शिलाई करण्यात आले असून सन 2014 मध्ये गणवेश वाटप केल्यानंतरही फार मोठया प्रमाणावर शाळांकडे गणवेश साठा शिल्लक होता. त्यामुळे एकूण 1749 जादा विद्यार्थ्यासाठी रु.8,93,923/- मुल्याची जादा खरेदी करण्यात आल्याचे दिसून आले. नमुन्यादाखल शाळांकडील शिल्लक गणवेश साठा खालीलप्रमाणे:-

(अ) मराठी मुलांची प्राथमिक शाळा क्र.2 बुधवारा अमरावती

वर्ग	शिल्लक गणवेश संच		
	मुले	मुली	एकूण
1	20	4	24
2	13	12	25
3	0	1	1
4	7	5	12
एकूण	40	21	61

(ब) प्राथमिक कन्या शाळा क्र.1 भाजीबाजार, अमरावती

वर्ग	शिल्लक गणवेश संच		
	मुले	मुली	एकूण
1	6	9	15
2	13	6	19
3	2	7	9

4	17	18	35
5	13	7	20
6	1	6	7
7	6	16	22
	58	64	122

मनपाच्या शाळांकडे फार मोठया प्रमाणावर गणवेश संच शिल्लक होते. त्यामुळे आवश्यकतेपेक्षा जादा गणवे शिल्लक असल्याने कापड खरेदी व शिलाईवर झालेला खर्च हा मनपाची आर्थिक स्थिती अडचणीची असताना अनावश्यक झाल्याचे दिसून येते.

3. शालेय गणवेशाचे कापड पुरविण्याबाबत मनपा अमरावतीने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपूर यांना पुरवठा आदेश क्र.अमनपा/उपा/भा.वि./236/2014 दिनांक 19.03.2014 नुसार एकुण 43823.90 मिटर कापड पुरविण्याबाबत आदेश दिला. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपूर यांचे देयक क्र.180 दि.30.06.2014 नुसार कापडाचा पुरवठा केल्याचे साठा नोंदवहीवरुन दिसून येते. यावरून गणवेश कापड पुरवठा सहा आठवडयाच्या आत केल्याचे दिसून येत नाही. त्यामूळे परिणामत: 12129 गणवेश संच शिलाई करीता लागणारा कालावधी विचारात घेता विद्यार्थ्यांना गणवेश विलंबाने पुरविल्या दिसून येत असून योजनेचा उद्देश सफल झाला नाही.

4. महाराष्ट्र शासन उद्योग संचालनालय शासन परिपत्रक भांखस/हातमाग कापड/दरनिश्चिती/ (29)/ 2011-12/बी17003 दिनांक 3.09.2011 अन्वये मागणीपत्र प्राप्त झाल्यापासून 6 आठवडयाच्या आत मालाचा पुरवठा न झाल्यास उशिरा पुरवठा केलेल्या मालाच्या किमंतीवर 0.5% प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकाराला दिला जाईल असे निर्देश आहे. असे असतांना सदर कापड सहा आठवडयाच्या आत पुरवठा न केल्यामुळे शासन परिपत्रकाप्रमाणे कमाल मर्यादा पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केल्यास मालाची किंमत रु.1 लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या 5% दंडाची तरतूद असतांना त्याप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामूळे महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ नागपूर यांनी प्रत्यक्षात दि.24.06.2014 ला कापड पुरवठा उशिरा केल्याबाबत चौकशी करून दंडात्मक कार्यवाही करावी.

5. शासन निर्णय क्र.भांखस-1088/(2512)/उद्योग-6 दि.2 जाने.1992 च्या परीशिष्ट-8 प्रमाणे डायरेक्टर, सुपरीन्टेडन्स कंपनी ऑफ इंडीया प्रा. लि. यांचेकडून मनपा अमरावतीने कापडाची Test Certificates प्राप्त केल्याचे दिसून येत नाही. असे प्रमाणपत्र नस्तीत आढळून आले नाही.

उपरोक्त नमूद आक्षेपित मुद्यांच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.190 दि.28.05.2018 नुसार संबंधीत अभिलेख व खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले होते. परंतु मागणी केलेले अभिलेख व खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 190)

DRAFT

116 मनपा शाळेचे इमारत बांधकाम, देखभाल व दुरूस्ती यावरील खर्चाचे नस्त्या व अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न देणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :241 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 41949656.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 38539964.00/-

महानगरपालिका अमरावती अंतर्गत शाळांचे नविन इमारतीचे बांधकाम, देखभाल व दुरूस्ती याकरीता सन 2014-15 मध्ये अर्थसंकल्पात लेखाशिर्ष 241 वर मुळ तरतूद रु.40000000/- करण्यात आली होती. सन 2015-16 करीता सुधारीत व सन 2016-17 चे मुळ अंदाजपत्रकात शाळेचे बांधकाम, देखभाल व दुरूस्तीवर रु.39,43,260/- एवढा प्रत्यक्ष खर्च झाल्याचे नमूद आहे. शिक्षण विभागाकडील अनुदान नोंदवहीनुसार रु.3,85,39,964/- एवढा खर्च झाल्याची नोंद असुन शिक्षण विभागाने कामनिहाय खर्चासाठी बाधंकाम विभागाला एकूण रु.4,19,49,656/-एवढा निधी वितरीत केल्याचे दिसून येते. मंजूर तरतूदीपेक्षा जादा खर्च झालेल आहे. प्रत्यक्ष खर्चामध्ये व नोंदविलेल्या खर्चामध्ये रु.3,80,06,396 एवढया रकमेची तफावत असून यात आर्थिक अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

महानगरपालिका अमरावतीच्या सन 2014-15 चे अर्थसंकल्पात शिक्षण विभागासाठी शाळेचे बांधकाम, देखभाल व दुरूस्तीसाठी रु.4,00,00,000/- तरतूद मंजूर केली असून सदरची कामे मनपाच्या बांधकाम विभागाकडून करण्यात आली आहेत. कामनिहाय खर्चासाठी मंजूर कामाच्या अनुषंगाने शिक्षण विभागाने बांधकाम विभागाला सन 2014-15 मध्ये वेळोवेळी निधी उपलब्ध करून दिल्याचे शिक्षण विभागाच्या अनुदान नोंदवहीतून दिसून येते. शिक्षण विभागाच्या अनुदान नोंदवहीनुसार प्रत्यक्ष वितरीत केलेला कामनिहाय निधी रु.4,19,49,656/- एवढा आहे. बांधकाम विभागास वितरीत केलेला निधी व सन 2016-17 चे अंदाजपत्रकात दर्शविलेला प्रत्यक्ष खर्च यात फार मोठया प्रमाणावर तफावत असल्याने अर्धसमास पत्र क्र.203 दि.20.06.2018 व पत्र क्र.229 दि.13.07.2018 नुसार झालेल्या खर्चाचे अनुषंगाने शाळांचे बांधकाम, देखभाल व दुरूस्तीवरील कामाची प्रशासकीय मंजूरी, तांत्रिक मान्यता, स्थायी समितीची मंजूरी, मंजूर निविदा, मोजमाप पुस्तिका व खर्चाची प्रमाणके इत्यादी माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु बांधकाम विभागाने अभिलेखे, नस्त्या व नोंदवहया लेखापरिक्षणास सादर केल्या नाही.

सन 2014-15 करीता मंजूर तरतूद रु.4,00,00,000/-
सन 2016-17 चे अंदाजपत्रकात नमूद प्रत्यक्ष खर्च रु.39,43,260/- (सन 2014-15 चा)
शिक्षण विभागाकडील अनुदान नोंदवहीनुसार नमूद एकूण खर्च रु.3,85,39,964/-
शिक्षण विभागाने बांधकाम विभागाला वितरीत केलेला निधी रु.4,19,49,656/-

मनपाच्या शाळा देखभाल व दुरूस्तीवरील खर्चासाठी लेखाशिर्ष 241 सन 2014-15 ची तरतूद रु.40000000/- शिक्षण विभागाने कामनिहाय वितरीत केलेला निधी खालीलप्रमाणे (निवडक प्रकरणे) –

(रक्कम रुपयात)

अ.क्र.	बाबनिहाय खर्चाचा विषय	खर्चाची रक्कम
1	प्रभाग क्र.15 वडाळी येथील मनपा शाळा क्र.14 येथे E-Learning Hall चे बांधकाम.	रु.34,08,695/-
2	मनपा शाळा क्र.21 कैलासनगर येथे खांब उभारुन उर्जा बचतीचा दिवा लावणे.	रु.88,301/-
3	अमरावती मनपा शाळामधील छपाई, रंगरंगोटी व इतर किरकोळ दुरूस्तीबाबत.	रु.2,00,000/-
4	मनपा उच्च प्राथमिक उर्दु शाळा क्र.1 नुरनगर या शाळेचे दोन वर्ग खोल्याचे बांधकाम.	रु.13,15,556/-
5	मनपा मराठी शाळा क्र.23 व कन्या शाळा क्र. 8 येथे कम्पाउंड वॉलचा खर्च	रु.2,53,123/-
6	मनपा अमरावती शाळा दुरूस्ती झोन क्र.1,2,3,4,5 अमरावती.	रु.29,80,663/-
7	मनपा उच्च प्राथ. हिन्दी शाळा क्र.7 येथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे.	रु.1,12,655/-
8	E-Learning School च्या उद्घाटन करीता वडाळा शाळेची वर्ग खोली नुतणीकरण करणे.	रु.3,34,368/-
9	प्रभाग क्र.15 मधील मनपा शाळा क्र.14 वडाळी येथील E-Learning School चे उद्घाटन.	रु.50,000/-
10	मनपा शाळा हिन्दी मुलांची माध्य. शाळा नेहरू मैदान येथे दर्शनिय भागात पेव्हींग ब्लॉक बसवणे व संरक्षण भिंत बांधकाम करणे.	रु.6,24,730/-
11	मनपा शाळा क्र.8 मराठी रामनगर वॉचमन निवास दुरूस्तीचे काम.	रु.49,699/-

DRAFT

12	मनपा शाळा जेवडनगर मधील शाळेची रंगरंगोटी करणे.	रु.49208/-
13	मनपा उर्दु उच्च प्राथ. शाळा क्र.7 शाळेची शाखा लालखडी या करीता चार खोल्याचे बांधकाम करणे.	रु.27,93,911/-
14	शेगांव गावठान शाळेमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत.	रु.4,73,697/-
15	प्राथ. शाळा दुरूस्ती व देखभाल तसेच प्र. क्र.11 मधील शाळा क्र. 2 येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे.	रु.4,73,697/-
16	मनपा शाळा क्र.17 विलासनगर येथील शाळेची दुरूस्ती करणेबाबत.	रु.27,65,660/-
17	मनपा शाळेला लागून असलेल्या शाळेचे सांडपाणी वाहून जाण्याकरीता क्रांक्रीट नालीचे बांधकाम करणे.	रु.8,79,341/-
18	मनपा उर्दु शाळा क्र.10 व उर्दु शाळा क्र.3 मनपा शाळेची रंगरंगोटी व पेव्हिंग ब्लॉक बसविणे.	रु.5,01,142/-
19	राजापेठ येथील शाळेमध्ये विकास कामे व दुरुस्तीबाबत	रु.7,17,173/-
20	मनपा शाळा क्र.24 बडनेरा येथील मनपा शाळेमध्ये दुरूस्ती व रंगरंगोटीचे काम करण्याबाबत.	रु.12,12,927/-
21	मनपा उर्दु शाळा क्र.4 व 11 येथील शाळेची दुरूस्ती व रंगरंगोटीचे काम.	रु.6,67,026/-
22	जमील कॉलनी मनपा शाळा क्र. 8 उर्दु या शाळेत पेव्हिंग ब्लॉक बसविणे.	रु.7,10,991/-
23	जमील कॉलनी मनपा शाळा क्र. 8 उर्दु या शाळेत पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत.	रु.6,64,838/-
24	मनपा मराठी शाळा अकोली येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे	रु.6,00,073/-
25	मनपा उच्च प्राथ. शाळा जेवड पवननगर येथे कंम्पाउंड वॉल चे काम.	रु.29,82,504/-
26	मनपा शाळा क्र.17 विलासनगर येथील नविन विदुतीकरण करणेबाबत.	रु.1,75,914/-

DRAFT

27	मनपा नेहरू मैदान शाळेच्या इमारतीतील वर्ग खोल्यामध्ये नविन विद्युतीकरण.	रु.2,38,168/-
28	मनपा शाळा क्र.17 विलासनगर येथे ओटा व शेड बांधने.	रु.19,04,514/-
29	नुरनगर या शाळेची रंगरंगोटी करणेबाबत.	रु.1,97,754/-
30	वडाळी येथील मनपा शाळा क्र.14 येथे ई-लर्निग हॉलचे बांधकाम.	रु.728,917/-
31	बुधवारा शाळेत हॉल चे बांधकाम व रंगरंगोटीची कामे	रु.5,34,537/-
32	मनपा शाळा नमुना या शाळेची दुरूस्तीचे काम	रु.1,13,655/-
33	बुधवारा मनपा शाळेची दुरुस्तीचे काम	रु.6,76,344/-
34	मनपा शाळा क्र.2 बुधवारा येथील शाळेचे विद्युतीकरण	रु.1,95,355/-
35	मनपा शाळा बेनोडाचे दुरुस्ती व रंगरंगोटीचे काम	रु.18,54,850/-
36	मनपा शाळा शेंगाव रंगरंगोटी व पेव्हिंग ब्लाकचे काम व वॉल कंम्पाउंडचे बांधकाम	रु.1,91,693/-
37	मनपा शाळा क्र.10 उर्दु शाळा बडनेरा दुरूस्ती रंगरंगोटींचे काम.	रु.2,54,209/-
38	मनपा उर्दु शाळा क्र. 8 या शाळेला संरक्षक भिंतीलगत पेव्हींग ब्लॉक बसविणे.	रु.2,49,956/-
39	मनपा उर्दु शाळा क्र. 8 जमील कॉलनी येथे संरक्षक भिंतलगत पेव्हिंग ब्लॉक बसविणे.	रु.2,49,956/-
40	मनपा उर्दु शाळा क्र. 8 जमील कॉलनी येथे संरक्षक भिंतलगत पेव्हिंग ब्लॉक बसविणे.	रु.2,49,956/-
41	मनपा उर्दु शाळा क्र. 8 जमील कॉलनी येथे संरक्षक भिंतलगत पेव्हिंग ब्लॉक बसविणे.	रु.2,49,956/-
42	मनपा शाळा जेवड येथील शाळेचे बांधकाम	रु.4,10,952/-
43	मनपा शाळा क्र.7 बडनेरा पेव्हिंग ब्लॉक बसविणे.	रु.8,89,883/-

DRAFT

44	मनपा शाळा निंभोरा या शाळेत पेव्हिंग ब्लॉक बसविणे.	रु.4,40,676/-
45	मनपा शाळा जमील कालनी क्र. 8 चे शाळेसमोर व शाळेच्या बाजूला क्रॉक्रींट रोडचे बांधकाम.	रु.14,91,254/-
46	मनपा शाळा क्र.9 नुरनगर शाळेचे बांधकाम- श्री.बोबडेसर	रु.3,57,787/-
47	मनपा शाळा क्र.11 चे बांधकाम.	रु.1,95,907/-
48	मनपा शाळा क्र.10 च्या कम्पाउंड चे बांधकाम	रु.5,21,112/-
49	मनपा शाळा मराठी प्राथमिक शाळा क्रं. 21 महादेव खोरी चे बांधकाम करणे.	रु.15,00,000/-

उपरोक्त कामांवरील एकूण वितरित अनुदान रु.4.14 कोटीपैकी रु.39.43 लाख एवढा प्रत्यक्ष खर्च अंदाजपत्रकीय पुस्तकात नोंदविण्यात आला असला तरी खर्चाच्या शिक्षण विभागाकडील प्रत्यक्ष खर्चाच्या आकडेवारीत (रु.3.95 कोटी) प्रचंड तफावत दिसून येते. बांधकाम विभागास अर्धसमास पत्राव्दारे लेखापरिक्षणासाठी आवश्यक संपूर्ण अभिलेख उपलब्ध करुन देणबाबत कळविण्यात आले होते. परंतु लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध करुन देण्यात आले नाही. खर्चातील तफावत लक्षात घेता सदर कामामध्ये आर्थिक अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

DATDUBM6401 (Ref No : 229)

117 पशुसवंर्धन विभागाने लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे तसेच पाळीव प्राणी परवाना शुल्क वसुल न केल्याने मनपा निधीची हानी झाल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :234 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 819520.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 819520.00/-

महानगरपालिका, अमरावतीचे सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान मनपाच्या पशुवैद्यकीय विभागाचे लेखापरिक्षणाकरीता एकुण रु.819520/- एवढया खर्चाची प्रमाणके, मनपा अधिनियम 1949 चे कलम 386(2) नुसार आकारण्यात आलेल्या परवाना शुल्कापासून प्राप्त उत्पन्न तसेच अनधिकृत मांसविक्री उपद्रवी पशुपालनाकरीता पोलिस संरक्षणावरील खर्च इत्यादी प्रकरणी अभिलेख लेखापरिक्षणास सादर करण्यात आले

नाही.

महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस-1088/2512/उद्योग/6 दिनांक 2 जाने.1992 मधील परिच्छेद क्र.7 नुसार खरेदीचे दरकरार 1 मे पुर्वी करणे आवश्यक आहे. भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रित करण्याकरीता लस खरेदी करण्यासाठी मंजूर केलेल्या दरकरारानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच मनपा अधिनियम 1949 चे कलम 386(2) नुसार आकारण्यात आलेल्या परवाना शुल्कापासून प्राप्त उत्पन्न याबाबतची माहिती लेखापरिक्षणास सादर करणेबाबत अर्धसमास पत्र क्र.78 दि.15.03.2018 नुसार कळविण्यात आले होते. परंतु पशुवैद्यकीय विभागाने अभिलेख व माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही. त्यामुळे खालील नमुद मुद्दे आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

1. महानगरपालिका अमरावतीचे पशुवैद्यकीय विभागाने सन 2014-15 मध्ये लेखाशिर्षनिहाय खालील प्रमाणे खर्च केला असून खर्चाचे अनुषंगाने प्रमाणके लेखापरिक्षणास सादर करण्यात आली नाही.

(रूपय आकडयात)

लेखाशिर्षाचा तपशिल	लेखाशिर्ष	सन 2014-15 ची मंजूर तरतूद	प्रत्यक्ष खर्च
किरकोळ खर्च	233	100000	26940
श्वान उत्पत्ती नियत्रंण उपक्रम	234	5000000	532580
अनधिकृत मांसविक्री उपद्रवी पशुपालक करीता पोलिस संरक्षण	418	4000000	260000
		9100000	819520

लेखाशिर्ष 234 व 418 अतंर्गत खर्चाचा अंदाज घेऊन अंदाजपत्रकात तरतूद करणे आवश्यक होते. परंतु मंजूर तरतूदीच्या तुलनेत लेखाशिर्ष 234 मध्ये 10.65% व लेखाशिर्ष 418 मध्ये 6.5% एवढाच खर्च झाला आहे. अवास्तव खर्चाची तरतूद केल्याने नागरी सोयी-सुविधावर खर्चासाठी निधी अपुरा पडला असून विकास कामावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2. महानगरपालिका, अमरावती शहरातील पाळीव कुत्र्याचा परवाना देण्यापासून मनपास सन 2014-15 मध्ये प्राप्त उत्पन्नाचा तपशिल सादर करण्यास कळविण्यात आले होते. परंतु लेखापरिक्षणास माहिती सादर करण्यात आली नाही. मनपा अधिनियम 1949 चे कलम 386(2) नुसार पाळीव प्राण्यासाठी परवाना शुल्क आकारणे आवश्यक आहे. परंतु सन 2016-17 चे अंदाजपत्रकात नमुद सन 2014-15 मध्ये जनावरे परवाना शुल्क लेखाशिर्ष 428 अतंर्गत प्राप्त उत्पन्न निरंक दर्शविण्यात आले आहे. अधिनियमातील तरतूदीनुसार जनावरे परवाना शुल्क वसुल न केल्याने मनपा महसुलाची हानी झाली.

3. अमरावती शहरातील भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रित करण्यासाठी रु.532580/- एवढा खर्च करण्यात आला असून खर्चाची प्रमाणके, केलेली उपाययोजना, सर्व्हेक्षण अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात झालेला खर्च नियमानुसार करण्यात आला किंवा नाही, याबाबत सखोल तपासणी करता आली नाही.

DRAFT

उपरोक्त प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.78 दि.15.03.2018 नुसार लेखापरिक्षणाकरीता अभिलेख व खर्चाची प्रमाणके उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु खर्चाची प्रमाणके व अभिलेख लेखापरिक्षणास प्राप्त न झाल्याने एकुण खर्चाची रक्कम रु.819520/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 78)

118 मनपाच्या शाळेतील वर्ग 9 व 10 च्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके पुरविणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :245 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 256802.00 /-

महानगरपालिका अमरावती अतंर्गत मनपाच्या शाळेतील मराठी व हिंदी माध्यमातील वर्ग 1 ते 8 च्या विद्यार्थ्यांना शासनाकडून पाठयपुस्तके पुरविण्यात येते. त्याच धर्तीवर मनपाच्या शाळेतील मराठी व हिंदी माध्यमातील वर्ग 9 व 10 च्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके पुरविण्यासाठी मनपाचे भांडार विभागाकडून खरेदी करण्यात आली. पाठयपुस्तकाचे मागणीसंबंधी शिक्षणाधिकारी, मनपा अमरावती यांची मागणी असल्याचे दिसून येत नाही. तसेच साठा नोदवहीत प्राप्त पाठ्यपुस्तकाची नोंद नाही.

अमरावती महानगरपालिका अतंर्गत मनपाच्या माध्यमिक शाळामध्ये मराठी व हिंदी माध्यमात वर्ग 9 व 10 मध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके पुरविण्याबाबत शिक्षणाधिकारी, मनपा, अमरावती यांचेकडून रितसर प्रस्ताव प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. मनपाच्या शाळांमधून अत्यंत गरीब तथा हलाखीच्या परिस्थितीतील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मनपा फंडातून पुरविण्यात आली. नस्तीची पडताळणी केली असता संबंधीत शाळांनी मागणीपत्रानुसार सादर केलेल्या पटसंख्येएवढी पुस्तकाची खरेदी केल्याचे दिसून येते.

मनपा शाळाकडून पुस्तकाची मागणी खालीलप्रमाणे आहे:-

पुस्तकाची नावे	वर्ग 9 वा		वर्ग 10 वा	
	मराठी माध्यम	हिंदी माध्यम	मराठी माध्यम	हिंदी माध्यम
मराठी, इंग्रजी, हिंदी, गणित, विज्ञान, समाजशास्त्र	85	99	80	78
एकूण	85	99	80	78

मनपाच्या माध्यमिक शाळांमध्ये मराठी व हिंदी माध्यमात वर्ग 9 व 10 मध्ये शिकणारे एकूण 342 विद्यार्थी

आहे. पुस्तकाचा पुरवठा करणेबाबत पाठयपुस्तक भांडार विभाग कार्यालय अमरावती येथे शिक्षणाधिकारी मनपा यांचे नावाने नोंदणी करुन दरपत्रक मागविण्यात आले. भांडार व्यवस्थापक पाठयपुस्तक भांडार व वितरण केंद्र अमरावती यांनी मनपा भांडार विभागाच्या मागणीनुसार दरपत्रकासह रु.256802/- भरणा करण्यास सुचविले. त्यानुसार मनपा, अमरावती यांनी रु.256802/- चे प्रदान प्रमाणक क्र.270 दि.7.05.2015 नुसार करण्यात आले.

यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत-

1. महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यास संशोधन मंडळ, वितरण केंद्र अमरावती यांनी बिल क्र.31500459 दि.30.06.2015 नुसार पुरवठा केलेली विषयवार पुस्तके 48 एकूण संख्या 4825 चे देयक रु.291220/- वजा वटाव रु.43683/- निव्वळ रक्कम रु.247537/- प्राप्त झाले. मनपाने प्रदान केलेली रक्कम रु.256802/- वजा देयकाची निव्वळ रु.247537/- असतांना उर्वरित रक्कम रु.9265/- मनपास परत आल्याची नोंद नस्तीत नाही. त्यामुळे रु.9265/- चे अतिप्रदान झाल्याचे दिसून येते.

2. पाठयपुस्तके भांडार विभागास प्राप्त झाल्याबाबत तसेच पाठयपुस्तकाचे वितरण मनपाच्या शाळांना केल्याबाबत नस्तीत नोंद नाही. भांडार विभागाकडील साठा नोंदवहीची पडताळणी केली असता शालेय पुस्तके प्राप्त झाल्याबाबतची नोंद साठानोंदवहीत नाही. तसेच शाळांची साठा नोंदवही लेखापरिक्षणास प्राप्त झाली नाही. त्यामुळे शाळांना प्रत्यक्षात पुस्तकाचा पुरवठा करण्यात आला याबाबत खात्री करता आली नाही.

उपरोक्त प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.167 दि.4.05.2018 नुसार आवश्यक माहिती व खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले होते. परंतु खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 167)

122 अतिक्रमण विभागाने घेतलेल्या अग्रिमाचा वापर प्रलंबित कालावधीतील मजूरी प्रदानाकरिता करणेबाबत तसेच मोठया प्रमाणात रोख काढून त्याचा गैरवापर करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता सं ख्या : 01

लेखा शीर्ष :202 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1260000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1260000.00/-

मनपाचे अतिक्रमण विभागाने अतिक्रमण पथकाकरिता लावलेल्या मजूरांची मजूरी प्रदान करणेकरिता वेळोवेळी मनपाकडून अग्रिम घेण्यात आले असून त्याचा वापर प्रलंबित कालावधीतील मजूरांची मजूरी प्रदान करण्याकरिता करण्यात आल्याचे दिसून येते. वास्तविक कोणत्याही अग्रिमाचा वापर हा अग्रिम घेतल्यानंतरच्या कालावधीकरिता करणे आवश्यक असून प्रत्यक्षात झालेल्या कामाची मजूरीची देयके सादर करुन ती पारीत करणे आवश्यक होते. तसेच मजूरांची मजूरी त्यांचे बँक खात्यात जमा करणे आवश्यक

असतांना मोठया प्रमाणात रोख वाटपाकरिता अग्रिम काढण्यात आला असून रोख रकमेचा गैरवापर केल्याचे निदर्शनास येते.

मनपाचे अतिक्रमण विभागाने शहरातील रस्त्यावरील अतिक्रमण काढणे, अनधिकृत बांधकाम पाडणे, शहरातील लहान मोठे नाले साफ करणे इ.कामाकरिता लावण्यात आलेल्या मजूरांची मजूरी प्रदान करणेकरिता मनपाकडून वेळोवेळी अग्रिम घेण्यात आले आहे. वास्तविक कोणत्याही अग्रिमाचा वापर अग्रिम घेतल्यानंतरच्या कालावधीकरिता करणे आवश्यक असून प्रत्यक्षात झालेल्या कामाची मजूरीची देयके सादर करुन ती पारीत करणे आवश्यक होते. परंतू तसे न करता सदर अग्रिमाचा उपयोग प्रलंबित कालावधीतील मजूरांची मजूरी प्रदान करणेकरिता करण्यात आल्याचे दिसून येते.

तसेच सदर कामाकरिता नियमित एकसारखे मजूर लावण्यात आल्यामुळे मजूरीची रक्कम थेट बँक खात्यात जमा करणे किंवा धनादेशाव्दारे प्रदान करणे आवश्यक असतांना मोठया प्रमाणात रोखीने मजूरीचे तसेच फिक्स वेतनाचे प्रदान करण्यात आले आहे. फिक्स वेतनाचे देयक पारित करुन प्रदानाची रक्कम संबंधितांचे बँक खात्यात किंवा धनादेशाव्दारे प्रदान करणे आवश्यक असतांना अग्रिमाचे रकमेतून परस्पर रोखीने प्रदान केल्याचे निदर्शनास आले. सदर बाब नियमबाहय असून महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.डीडीओ 1007/ प्र.क्र.62/कोषा-प्रशा-5, दिनांक 7 एप्रिल, 2008 नुसार धनादेशाव्दारे किंवा थेट बँक खात्यातून प्रदानाची रक्कम अदा करणे आवश्यक असताना नियमबाहय रोखीने प्रदान करण्यात आले.

तपशील खालीलप्रमाणे आहे :-

	अग्रिमाची उचल केल्याचा तपशील			अग्रिम समायोजनाचा तपशील			
अ.क्र.	प्रमाणक क्रमांक	दिनांक	अग्रिमाची रक्कम	प्रमाणक क्रमांक	दिनांक	समायोजित रक्कम	समायोजन प्रमाणकात प्रत्यक्ष खर्चाचा कालावधी
1	10787	7.3.2014	200000	313	22.4.2014	200000	14.11.13 ते 15.2.14
2	509	29.4.2014	60000	1712	12.6.2014	60000	16.2.14 ते 14.3.14
3	507	29.4.2014	100000	1711	12.6.2014	100000	15.3.14 ते 15.4.14
4	1711	12.6.2014	100000	2703	11.7.2014	100000	16.4.14 ते 9.5.14
5	2744	15.7.2014	100000	3724	11.8.2014	100000	10.5.14 ते 1.6.14
6	4665	9.9.2014	100000	5216	23.9.2014	100000	2.6.14 ते 24.6.14
7	5924	10.10.14	100000	6725	22.10.14	100000	25.6.14 ते 18.7.14
8	6449	18.10.14	100000	7545	12.11.14	100000	19.7.14 ते 19.8.14
9	8225	29.11.14	100000	2548	15.12.14	100000	21.8.14 ते 20.9.14
10	9651	3.1.2015	100000	10954	3.12.2015	100000	22.9.14 ते 29.10.14
11	11172	9.2.2015	100000	12394	5.3.2015	100000	30.10.14 ते

DRAFT

							29.11.14
12	1917	20.6.2014	100000	श्री.जी.एच.जयस्वाल, तत्कालीन अतिक्रमण पथक प्रमुख			समायोजन दिसून आले नाही.
		एकूण	**1260000**				

2. वरील तक्त्यातील अ.क्र.12 नुसार **रु.1,00,000/-** अग्रिमाचे समायोजनाबाबत वारंवार तोंडी तसेच अर्धसमास पत्राद्वारे मागणी करुनही अभिलेख उपलब्ध करुन दिला नसल्यामुळे सदर अग्रिमाचे समायोजन झाल्याची खात्री पटत नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.191, दिनांक 30.5.2018 नुसार खुलासा मागविला असता कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 191)

127 बाजार ओटयांच्या भाडे रकमेत स्थायी समितीच्या ठरावानुसार भाडेवाधीची अंमलबजावणी न केल्याने 2014-2015 मध्ये मोठ्या महासुलाचे चे नुकसान होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 0

लेखा शीर्ष :18 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब

बाजार ओटयांच्या भाडे रकमेत वाढ करण्याच्या स्थायी समितीच्या दि. 14.02.2014 च्या ठरावानुसार बाजार व परवाना विभागाने कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे प्रचलित दरानुसार रु. 8.40 लाख वसुली ऐवजी सुधारित दरानुसार रु. 56.79 लाख वसुली अपेक्षित असताना उचित कार्यवाही न झाल्याने मनपा वाढीव महसुलापासून वंचित आहे.

DRAFT

मनपा अमरावतीच्या मालकीचे शहरातील विविध ठिकाणी व विविध आकाराचे एकुण 1164 बाजार ओटे उपलब्ध असून त्यांचा लिलाव करून प्रतिमाह भाडे रकम निश्चित करून बाजार विभागा मार्फत महसूल गोळा केला जातो.

स्थायी समितीच्या ठराव क्रमाक 258 दि. 14.02.2014 च्या इत्तिवृतानुसार संपूर्ण 1164 ओटयापासून पूर्वीच्या निर्धारित दरानुसार प्रतिवर्ष प्राप्त उत्पन्न रु. 8,40,026/- एवढेच अपेक्षित असल्याने व मोठया कालावधीपासून भाडे रकमेत सुधारणा न केल्यामुळे उक्त ठरावान्वये निश्चित दरवाढ मंजूर करून रु. 8,40,026/- ऐवजी रु.56,79, 000/- एवढा महसूल भाडे रकमेपोटी 2014-2015 मध्ये प्राप्त होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

अ. क्र.	ओटयाचे क्षेत्र (चौ.फुट)	ओटयाची संख्या	ठरावान्वये मंजूर प्रतीवर्ष भाडे (2014-2015)	अपेक्षित वार्षिक भाडे रकम/महसूल (2014-2015)	प्रत्यक्षात प्राप्त महसूल (2014-2015)
1	8x8	865	3000	2595000	ओटयाचे क्षेत्र व संख्ये निहाय प्राप्त भाडे रकमांचा तपशील उपलब्ध नाही.
2	8x10	132	3000	396000	
3	10x10	52	3000	156000	
4	10x10	25	3000	75000	
5	10x12	25	3000	75000	
6	10x12	46	3000	138000	
7	10x12	4	3000	12000	
8	10x12	1	12000	144000	
9	10x12	1	18000	216000	
10	10x12	2	12000	288000	
11	10x12	2	12000	288000	
12	10x12	2	12000	288000	
13	10x12	3	12000	432000	
14	10x12	4	12000	596000	
अंदाजप्रत्रकानुसार एकूण अपेक्षित महसूल				5679000	

त्या नुसार बाजार विभागाने तात्काळ दरवाढ लागू करून तशी वसुली करणे आवश्यक असताना

ठरावाप्रमाणे पूर्णपणे अंमलबजावणी करण्यात आली नाही असे समजते. बाजार विभागास ओटयाच्या क्षेत्रफळ व संख्या निहाय प्रत्यक्ष आकारणीचा दर तसेच प्रत्यक्ष भाडे वसुलीचा तपशील उपलब्ध करण्यास सूचित करण्यात आले होते. परंतु ते उपलब्ध करण्यात आले नाही.

म्हणजेच बाजार विभागाने उचित दराची प्रत्यक्षात आकारणी न केल्याचे व ओटे धारकांना ठरावाचे विरुध्द मुभा दिल्याचे शक्यता वाटते. याप्रकारे प्रभावी अंमलबजावणी व वसुलीवरील नियंत्रणा अभावी प्रत्यक्ष झालेली एकूण वसुली (तपशील उपलब्ध नाही) व ठरावानुसार अपेक्षित रकम रु. 56.79 लाख लक्षात घेता यांमधील फरकाच्या महसुलाची 2014-2015 मध्ये हानी झाली असे स्पष्ट दिसते.

DATABWM6901 (Ref No : 195)

128 बांधकाम परवानगी धारकाकडून स्थानिक संस्था कर वसूल न करता प्रतिज्ञापत्रे प्राप्त न केल्याने कराच्या महसुलाची हानी होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :392 शासननिधी निधी
अनियमितता कलम : 9ब

बांधकामाच्या मूल्यावर 0.25% दराने स्थानिक संस्था कराची आकारणी करून बांधकाम परवानगी धारकाकडून वसुली न करता प्रतिज्ञापत्रे प्राप्त करण्यात आली आहेत. सदर प्रतिज्ञापत्रानुसार बांधकामावर वापरलेल्या साहित्यापोटी संबंधित व्यापाऱ्यांनी योग्य कराचा भरणा केल्याबाबत मनपाकडून कर निर्धारणाद्वारे खात्री करण्यात आली नाही. पर्यायाने स्थानिक संस्था कराची तात्पुरती हानी झाली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम 2012 नुसार मनपा क्षेत्रात आयात करण्यात येणाऱ्या मालाच्या किमतीवर स्थानिक संस्था कराची आकारणी लागू आहे. त्यामधील नियम 5 नुसार "मनपा क्षेत्रात कोणतेही काम हाती घेणाऱ्या व्यापाऱ्यांला किंवा व्यक्तीला, अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किमतीवर एकतर L.B.T. प्रदान करण्याचा किंवा त्याचा कंत्राट मूल्याच्या एकूण रक्कमेच्या 0.25% इतक्या ठोक दराने उक्त कर प्रदान करण्याचा पर्याय" उपलब्ध आहे. या प्रयोजनासाठी व्यापारी किंवा कंत्राटदारास मनपाकडे स्थानिक संस्था कर नियमाखाली नोंदणी करणे बंधनकारक असते.

परंतु वैयक्तिकरित्या घराचे बांधकाम करणाऱ्या व्यक्तीस अशा प्रकारची नोंदणी करणे बंधनकारक नसली तरी त्याने बांधकामासाठी स्थानिक व्यापाऱ्याकडून खरेदी करून वापरलेल्या साहित्यावर स्थानिक संस्था कराचे प्रदान संबंधित व्यापाऱ्याकडून झाले असल्याचा पुरावा व अश्या

कराच्या प्रदानाबाबत व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणपत्रे सादर होऊन देय कराचा पूर्ण भरणा झाल्याची खात्री होणे सुद्धा आवश्यक आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेतल्यास सदरची प्रक्रिया दीर्घ मुदतीची असल्याने बांधकाम करणाऱ्याकडून उक्त नियमानुसार बांधकाम मूल्याच्या 0.25% एवढया कराची वसुली (समायोजनाच्या किंवा परताव्याच्या अधीन राहून) करणे आवश्यक ठरते.

परंतू, या प्रकारची उचित कार्यवाही न करता "बांधकामास लागणारे साहित्य नोंदणीकृत व्यापाऱ्याकडून खरेदी करण्यात येईल" या आशयाची प्रतिज्ञापत्रे बांधकाम परवानगी धारकाकडून मनपाने लिहून घेतल्याचे दिसून येते. या अटींवर सूट देण्याची नियमात तरतूद नसताना अशा प्रकरणात स्थानिक संस्था कर भरण्यापासून मुभा देण्यात आलेली आहे. तसेच अश्या प्रकरणातील प्रतिज्ञापत्रानुसार कार्यवाही झाली किंवा कसे याचीही शहनिशा करण्यात आल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे अशी नियमबाह्य सूट दिल्याने स्थानिक संस्था कराची हानी झाल्याची पुरेपूर शक्यता आहे.

उदा. काही प्रकरणे पुढील प्रमाणे आहेत :

अनु. क्र.	बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक	आकारणी योग्य क्षेत्र व आकारणीचा प्रचलित दर (m^2 x Rs.)	प्रतिज्ञापत्रे प्राप्त केल्याने वसूल न झालेली रक्कम (रुपये)
1	210 - 26.05.2014	66.39 x 100	6,640/-
2	209 - 26.05.2014	123.55 x 100	12,355/-
3	208 - 26.05.2014	92.53 x 100	9,253/-
4	211 - 26.05.2014	64.61 x 100	6,461/-
5	233 - 29.05.2014	110.80 x 100	11,080/-

सबब अशी प्रतिज्ञापत्रे सादर झालेल्या प्रकरणात ज्या व्यापाऱ्याकडून बांधकाम साहित्य खरेदी करण्यात आली आहे त्यांच्या स्थानिक संस्था कराची वार्षिक विवरणपत्रानुसार कराचे अचूक निर्धारण व आवश्यक पूर्तता झालेली नसल्यास अश्या बांधकाम परवानगी धारकाकडून स्थानिक संस्था कराची रक्कम वसूल करण्यात यावी.

DATABWM6901 (Ref No : 84)

134 जिल्हा नियोजन विकास निधीमधील सन 2014-15 अखेर रु.50.78 लाख एवढी अखर्चित रक्कम शासनास परत न केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :352 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 5077659.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5077659.00/-

महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग शा.नि. क्रमांक स्थाविका 2007/प्र.क्र.170/का.1482 दि.18 फेब्रु. 2011 मध्ये "निधी अखर्चित राहिल्यास विहित वेळेत निधी समर्पित करण्याची कार्यवाही करावी.निधी विहित वेळेत समर्पित न केल्यास संबंधित अधिकारी जबाबदार राहतील."असे स्पष्ट निर्देशित करण्यात आले आहे.मात्र अमरावती महानगरपालिकेने सन 2014-15 अखेर अखर्चित असलेला निधी रु.50.78 लाख शासनास परत केलेला नाही.

महाराष्ट्र शासन,नियोजन विभाग शा.नि.क्रमांक-स्थाविका 2007/ प्र.क्र.170/का.1482 दि.18 फेब्रु.2011 अन्वये निर्गमित आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना यातील परि.क्र.14(6)मध्ये "अखर्चित राहणारा निधी समर्पित करण्याचा प्रस्ताव कार्यान्वित यंत्रणेने प्रत्येक आर्थिक वर्षाच्या 5 मार्चपर्यंत जिल्हाधिकारी यांना पाठवावा.जिल्हाधिकारी यांनी निधी अखर्चित राहिल्यास, समर्पित करावयाच्या निधीचा प्रस्ताव प्रत्येक आर्थिक वर्षाच्या 10 मार्चपर्यंत शासनास सादर करावा.विहित वेळेत निधी समर्पित न केल्यास संबंधित अधिकारी जबाबदार राहतील."असे स्पष्ट निर्देशित करण्यात आले आहे.

तसेच जिल्हा नियोजन समिती,जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती मार्फत खासदार स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत तथा आमदार स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत अमरावती महानगरपालिकेला सन 2014-15 मध्ये खासदार/आमदार यांनी सुचविलेल्या कामाकरिता निधी वितरीत केले आहे व उपरोक्त निर्णयाद्वारे काम पूर्ण झाल्यानंतर कामावरील बचतीचा निधी व त्यावरील प्राप्त व्याज "जिल्हाधिकारी,अमरावती" या नावे धनादेशाद्वारे परत करणे आवश्यक आहे.

मात्र लेखापरीक्षणास उपलब्ध केलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बँक खाते पुस्तिकेची (आयडीबीआय बँक,अमरावती खाते क्र.0507104000080228) सन 2014-15 या कालावधीतील आर्थिक व्यवहारांच्या नोंदींची तपासणी केली असता दि.31-03-2015 अखेर सदर खात्यात पुढीलप्रमाणे अखर्चित निधी व निधीवरील प्राप्त व्याज शिल्लक असल्याचे दिसून आले.

1) दि.1-04-2014 रोजीची प्रारंभिक शिल्लक	89,24,007.00
2) सन 2014-15 मध्ये प्राप्त एकूण निधी	-
3) सन 2014-15 मध्ये प्राप्त एकूण व्याज	2,17,941.00
4) एकूण	91,41,948.00
5) सन 2014-15 मध्ये केलेला एकूण खर्च	40,64,289.00
6) दि.31-03-2015 अखेरची शिल्लक	**50,77,659.00**

वरीलप्रमाणे मोठ्या प्रमाणावर शासनाची रक्कम प्रभावी नियोजनाच्या अभावी अखर्चित राहून अकारण बँकांमध्ये अडकवून ठेवलेली आहे.

यासंदर्भात अर्धसमास क्र. 227 दि.10/07/2018 अन्वये विचारणा केली असता संयुक्तिक खुलासा

प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 227)

139 महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविण्यासाठी महसुली उत्पन्नाच्या 5% तरतूदीमधून खर्च करण्यातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :212 महानगरपालिका स्व-निधी निधी
अनियमितता कलम : 9ब

महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.जिईएम-1793/1198/नवि-14 दिनांक 14.07.1992 नुसार मनपाच्या एकूण वार्षिक महसुली उत्पन्नातून बांधिल खर्च वजा जाता उर्वरित रकमेच्या 5% रक्कम महिला व बालकल्याण कार्यक्रमासाठी राखून ठेवून समितीच्या मागणीनुसार त्यातून महिला व बालकल्याणाच्या उन्नतीकरीता विविध योजना राबवून त्यावर खर्च करणे आवश्यक आहे. परंतु शासन निर्णयातील तरतूदीनुसार खर्च होत नसल्याचे निदर्शनास आले.

महानगरपालिका अमरावती शहरातील महिला व बालकल्याणाच्या विविध योजना राबविण्यासाठी सन 2014-15 चे अर्थसंकल्पात महसूली उत्पन्नातून बांधिल खर्च वजा जाता लेखाशिर्ष 212 अतंर्गत रु.1 कोटी तरतूद करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात रु. 79.50 लक्ष एवढाच खर्च केला असून त्याची टक्केवारी 79.50% आहे.

याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे.

1. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.2005/प्र.क्र.255/05/नवि-20 दिनांक 8.11.2010 नुसार राखीव तरतूदीमधून शासन निर्णयात नमूद केलेल्या 15 बाबीवर खर्च करणे आवश्यक आहे. जसे महिला व मुलीसाठी समुपदेशक केन्द्र चालविणे, हेल्पलाईन चालविणे, विधी केन्द्र चालविणे, मुलीसाठी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करणे व आरोग्य शिबिराचे आयोजन करणे इत्यादीवर नियमानुसार खर्च करण्यात आला नसल्याचे नस्तीतून दिसून येते. सदर योजनांवर केलेल्या रुपये 7950100/- खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास प्राप्त झाली नाही.

2. महिला व बालकल्याण समिती मार्फत सन 2014-15 मध्ये घेण्यात आलेल्या महिलांच्या विविध प्रशिक्षणाकरीता स्थायी समिती ठराव क्र.54 दिनांक 4.09.2014 नुसार पुर्वीचीच संस्था बेरोजगारांची शिखर संस्था, अमरावती यांनाच प्रशिक्षणाचे काम सोपविण्यास मंजूरी दिली आहे. सदर प्रशिक्षणाच्या अनुषंगाने वृत्तपत्रात जाहिरात देउन दर माविण्यात आले नाही. त्यामुळे मनपाला स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला नाही.

2. शासन निर्णयात नमूद केल्यानुसार तरतूदीच्या अनुषंगाने खर्च होत नसल्याचे निदर्शनास आले.

मागील तिन आर्थिक वर्षात योजनेवर झालेल्या खर्चाची टक्केवारी पुढीलप्रमाणे-

(आकडे रुपयात)

वर्ष	अर्थसंकल्पीय तरतूद	प्रत्यक्षात खर्च	कमी झालेला खर्च	खर्चाची टक्केवारी
2012-13	7000000	3391250	3608750	48.45%
2013-14	7000000	3909460	3090540	**55.85%**
2014-15	10000000	7950100	2049900	**79.50%**

अंदाजपत्रकात मंजूर तरतूदीच्या अनुषंगाने योजनेवर होणारा खर्च अल्प असल्याने योजनेचा उद्देश सफल होत नसून अमरावती शहरातील महिला व मुली विविध योजनेच्या लाभापासून वंचित राहात आहे. समाज विकास विभागात महिला व बालकल्याण समिती गठीत करण्यात आली असून समितीचे प्रभावी नियत्रंण नसल्याचे दिसून येते.

3. महिला व बाल कल्याण कार्यक्रमासाठी राखीव निधी 5% मधून खालील नमूद कार्यक्रमावर खर्च करण्यात आला.

(अ) मनपा शाळेतील विद्यार्थ्यांसाठी बाल आनंद महोत्सव कार्यक्रमासाठी लेखाशिर्ष 212 मधून दि.30 व 31 डिसेंबर 2014 ला झालेल्या कार्यक्रमावर रु.300000/- खर्च करण्यात आला.

(ब) महिलांना विविध उद्योगाचे तांत्रिक प्रशिक्षण देणे. या उपक्रमातंर्गत ॲडव्हास ब्युटीपार्लरचे प्रशिक्षण देणे, महिलांचा ब्युटीपार्लरचे प्रशिक्षण देणे, महिलांना शिवणकाम प्रशिक्षण देणे.

(क) सावित्रीबाई फुले जयंती अतंर्गत महिला व बालकल्याण समितीव्दारे विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे.

(ड) महिलासाठी उद्योकता विकास प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करणे.

उपरोक्त प्रकरणी प्रशिक्षण कार्यक्रम राबवितांना शासन निर्णय क्र.सं/2005/प्र.क्र.156/05 दि.31.12.2006 मधील तरतूदीनुसार कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

उपरोक्त मुद्याचे अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.134 दिनांक 16.04.2018 नुसार लेखापरिक्षणास आवश्यक ते अभिलेख पुरवून नमूद मुद्यावर खुलासा करण्यास सुचविले होते. परंतु लेखापरिक्षण पुर्ण होईस्तोवर माहिती व खुलासा प्राप्त झाला नाही. परिणामी आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 134)

140 अमरावती शहर बस वाहतुक उपक्रम अभिकर्त्याने रॉयल्टीचा भरणा विलंबाने करणे तसेच वाहतुक उपक्रम हस्तांतरणबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 04

लेखा शीर्ष :284 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 23514.00/-

महानगरपालिका अमरावतीने शहर बस वाहतुकीचे काम अभिकर्ता अकोला प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्था मर्या. अकोला रजि. न 311 यांना अभिकर्ता म्हणून बि. ओ. ओ. तत्वावर दि.22.02.2006 पासून चालविण्यासाठी सदर संस्थेसोबत करारनामा करण्यात आला. परंतु सदर अभिकर्ता उपक्रमीने शहर बस वाहतुकीचे काम मे. अंबा माल व प्रवासी वाहतुक सेवा सहकारी संस्था मर्या. अमरावती रजि. न. 111 यांना हस्तांतरित करण्यासाठी अर्ज केला. व त्यास मनपाचे स्थायी समितीने ठराव क्र.55 दि.6.06.2011 ला हस्तांतरण करण्यास मान्यता दिली असून या प्रकरणी नव्याने त्रिपक्षीय करारनामा केल्याचे दिसून येत नाही. तसेच रॉयल्टीचा भरणा विलंबाने केल्याप्रकरणी दंड वसुल केला नसल्याने मनपा निधीची हानी झाली.

अमरावती महानगरपालिका क्षेत्राच्या प्रमुख मार्गावर शहरातील नागरिकांना सुरक्षित व स्वस्त शहर बस प्रवास सेवा उपलब्ध करुन देण्याकरीता मनपाने शहर बस वाहतुक उपक्रम बि. ओ. ओ. तत्वावर मे.अकोला प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्था मर्या. अकोला, रजि. नं.311, यांना अभिकर्ता नेमुन दि.22.02.2006 रोजी सदर संस्थेसोबत करारनामा करुन शहर बस वाहतुक उपक्रम राबविण्यास सुरूवात केली आहे.
याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत:-

1. शहर बस वाहतुक अभिकर्ता मे. अकोला प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्था मर्या. अकोला रजि. नं.311 यांच्या पॉवर ऑफ ॲटर्नीधारक सभासदांनी दि.15.03.2011 रोजी सादर केलेल्या पत्राप्रमाणे तसेच दि.19.12.2010 व दि.13.02.2011 चे अभिलेखाप्रमाणे शहर बस वाहतुक उपक्रम मे. अंबा माल व प्रवासी वाहतुक सेवा सहकारी संस्था मर्या, अमरावतकडे हस्तांतरीत करण्यास मनपाचे स्थायी समितीने ठराव क्र.55 दि.6.06.2011 ला मान्यता दिली. शहर बस वाहतुक उपक्रम मे. अंबा माल व प्रवासी वाहतुक सेवा सहकारी संस्था मर्या, अमरावती यांचेसोबत नव्याने त्रिपक्षीय करारनामा करणे आवश्यक होते. परंतु नव्याने करारनामा करण्यात आला नसल्याने पुर्वीच्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कामकाज सुरू ठेवण्यास परवानगी दिली. परिणामी पुर्वीच्याच रॉयल्टीच्या दराने रॉयल्टी वसुल करण्यात येत असल्याने रॉयल्टीपासून मनपास प्राप्त होणा-या महसुलाची हानी होत आहे.

2. शहर बसेसवरील रॉयल्टीपोटी मनपाला दि.31 मार्च 2014 पर्यत व सन 2014-15 मध्ये प्राप्त झालेला महसुल याबाबतची माहिती विवरण पत्रात लेखापरिक्षणास सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु परिवहन विभागाकडून ती पुरविण्यात आली नाही. मे. अंबा माल व प्रवासी वाहतूक सेवा सहकारी संस्था मर्या. या अभिकर्त्याने करारनाम्यातील अट क्र.11 नुसार रॉयल्टीचा भरना पुढील महिन्याच्या 5 तारखेपर्यंत करावयाचा असून विलंबाने भरणा केल्यास 24% द.सा.द.शे. प्रमाणे दंड आकारावयाचा आहे. परंतु अभिकर्त्याने रॉयल्टीचा भरणा विलंबाने केल्या प्रकरणी करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार दंड वसुल न केल्याने मनपा महसुलाची हानी झाली आहे.
(रक्कम रुपयात)

महिना	भरणा करावयीची रॉयल्टीची रक्कम	पावती क्रमांक व दिनांक	विलंबाचे एकूण दिवस	24% दराने वसुल करावयाचा दंड
मार्च- 2014	254696/-	4/660 दि.17.4.14	12 दिवस	2010/-
एप्रिल- 2014	254696/-	8/660 दि.17.5.14	12 दिवस	2010/-
मे - 2014	263186/-	9/660 दि.16.6.14	11 दिवस	1904/-
जून - 2014	254696/-	10/660 दि.18.7.14	13 दिवस	2177/-
ऑगस्ट-2014	263186/-	18/660 दि.19.9.14	14 दिवस	2423/-
सप्टें. -2014	254696/-	19/660 दि.20.10.14	15 दिवस	2512/-
आक्टो.-2014	263186/-	24/660 दि.25.11.14	20 दिवस	3461/-
नोव्हे. -2014	254696/-	25/660 दि.11.12.14	6 दिवस	1005/-
डिसें. -2014	263186/-	27/660 दि.12.1.15	7 दिवस	1211/-
जाने.- 2015	263186/-	28/660 दि.21.2.15	16 दिवस	2769/-
फेब्रू.-2015	237730/-	29/660 दि.18.3.15	13 दिवस	2032/-
				23514/-

3. मुंबई मोटर वाहन प्रवासी कर कायदा 1958 मधील तरतूदीनुसार शहर वाहतूक उपक्रम अभिकर्त्याने परिवहन उपक्रमाव्दारे प्राप्त झालेल्या उत्पन्नाचे 3.5 % प्रवासी शुल्क स्वरूपात प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेपर्यंत शासनखाती जमा करणे आवश्यक आहे. परंतु वाहतूक उपक्रमी अभिकर्त्याने शासनाकडे तसा भरणा केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे शासनाचे महसुलाची हानी झाली.

4. मनपा हद्दीत धावणा-या बसेसवरील जाहिरातीपासून मनपास दि.31 मार्च 2014 पर्यंत प्राप्त झालेला महसुल व सन 2014-15 मध्ये प्राप्त झालेला महसुल तसेच थकबाकीची रक्कम याबाबतची माहिती विवरणपत्रात सादर करणेबाबत अर्धसमास पत्राव्दारे कळविण्यात आले होते. परंतु माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही. याप्रकरणी परिवहन विभाग प्रमुखांनी विचारणा केली असता अशा प्रकारची माहिती उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. बसेसवरील जाहिरातीपासूनचे उत्पन्न वाहतूक उपक्रमी अभिकर्त्याकडून वसूल करण्यात येत नसल्याने मनपा निधीची हानी होत आहे.

उपरोक्त नमुद त्रृट्यांच्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.74 दि.12.03.2018 नुसार लेखापरिक्षणास अभिलेख, विवरण पत्रातील माहिती व त्यावरील खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले होते. परंतु लेखापरिक्षण संपेस्तोवर माहिती व खुलासा प्राप्त झाला नाही. परिणामी आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 74)

144 मनपाच्या मालकीच्या जागेवरील बस पार्किंगचे भाडे वसुल न केल्याने मनपाची हानी झाल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी निधी
अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 1297104.00/-

महानगरपालिका, अमरावतीने शहरातील शहर बस वाहतुक व्यवस्था अध्यक्ष/सचिव, अकोला प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्था, मर्यादित अकोला या अभिकर्ता उपक्रमीकडे माहे जुलै-2006 पासून शहर बसेस चालविण्याचे काम देण्यात आले. शहर बसेस पार्किंगकरीता बडनेरा कार्यालय व कार्यशाळा, मनपा हया जागा उपलब्ध करुन दिल्या असून करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार विहित दराने शहर बस पार्किंगचे भाडे मनपा, अमरावतीकडे भरणा करावयाचे होते. परंतु सन 2006 ते 2015 या कालावधीतील बस पार्किंग भाडयाची थकबाकी रु.12,97,104/- मनपा खात्यात जमा केली नसल्याने मनपा निधीची हानी झाली.

अमरावती महानगरपालिका क्षेत्राच्या प्रमुख मार्गावर शहरातील शहरवासीयांना सुरक्षित व स्वस्थ शहर बस प्रवास सेवा उपलब्ध करुन देण्याकरीता अमरावती महानगरपालिकेने शहर बस वाहतुक उपक्रम बि.ओ.ओ. तत्वावर चालविण्यासाठी अध्यक्ष/सचिव, अकोला प्रवासी व मालवाहतुक सहकारी संस्था, मर्या. अकोला यांना सोपविला असून दि.22.02.2006 ला याबाबत करारनामा करण्यात आला. शहर बस पार्किंगसाठी मनपाने आपल्या मालकीची बडनेरा कार्यालय व कार्यशाळा मनपा हया जागा उपलब्ध करुन दिल्या. करारातील अट क्र.5 नुसार निश्चित प्रतीमाह दराने भाडे मनपाकडे जमा करणे आवश्यक होते. परंतु वाहतुक अभिकर्ता उपक्रमीने सन 2006 ते 2015 या कालावधीतील बस पार्किंगचे भाडे मनपाकडे भरणा केले नसल्याचे नस्तीतून दिसून आले.

अमरावती महानगरपालिका शहर बस वाहतुक उपक्रमाबाबत करारनामा अट क्र.5 प्रमाणे शहर बस वाहतुकीच्या बसेस पार्किगचे भाडे संबंधीत उपक्रमीने सन 2006 पासून मनपाच्या खात्यात जमा केले नाही. याबाबत थकबाकीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(रक्कम रुपयात)

वर्ष	बडनेरा वाहन स्थळ भाडे (प्रतीमहा भाडे)	कार्यशाळा मनपा भाडे (प्रतीमहा भाडे)	एकुण वसुल करावयाचे भाडे
2006	रु.810/-X 6 = रु.4860/-	रु.8540/-X6 =रु.51240/-	56100/-
2007	रु.845/-X 12= रु.10140/-	रु.8850/-X12=रु.106200/-	116340/-
2008	रु.972/-X 12= रु.11664/-	रु.10246X12=रु.122952/-	134616/-
2009	रु.972/-X 12= रु.11664/-	रु.10246X12=रु.122952/-	134616/-

2010	रु.1013/-X12= रु.12156/-	रु.10868X12=रु.130416/-	142572/-
2011	रु.1013/-X12= रु.12156/-	रु.10868X12=रु.130416/-	142572/-
2012	रु.1013/-X12= रु.12156/-	रु.10868X12=रु.130416/-	142572/-
2013	रु.1013/-X12= रु.12156/-	रु.10868X12=रु.130416/-	142572/-
2014	रु.1013/-X12= रु.12156/-	रु.10868X12=रु.130416/-	142572/-
2015	रु.1013/-X12= रु.12156/-	रु.10868X12=रु.130416/-	142572/-
		एकुण	1297104/-

महानगरपालिका अमरावतीचे पत्र क्र.अमनपा/आयुक्त/कार्यशाळा वि./बसभाडे/758/2011 दिनांक 17.02.2011 नुसार अध्यक्ष/सचिव, अकोला प्रवासी व मालवाहतुक सहकारी संस्था मर्या.अकोला यांना सन 2006 ते 2010 पर्यंतची थकबाकी रु.5,84,244/- चा भरणा मनपाकडे करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु रु.5,84,244/- ची थकबाकी अध्यक्ष/सचिव, अकोला प्रवासी व मालवाहतुक सहकारी संस्था मर्या. अकोला व अंबा माल व प्रवासी वाहतुक सेवा सहकारी संस्था मर्या. अमरावती यांनी सन 2011 ते 2015 या कालावधीतील थकबाकी रु.7,12,860/- असल्याचे दिसून येते. परंतु दोन्ही संस्थेने थकबाकीचा भरणा केल्याबाबत नस्तीत नोंद नाही. तसेच अंदाजपत्रकात सदर रक्कम जमा झाल्याची नोंद नाही. सन 2011 पासून प्रतीमहीना भाडयाची नोंद नस्तीत नाही तसेच लेखापरिक्षणास नस्ती प्राप्त झाली नाही. त्यामुळे सन 2010 चे दराने बस पार्किंगचे जे दर आकारले त्याच दराने आकारणी केली. सन 2011 पासून निश्चित दराने आकारणी करुन फरकाची वसुली करावी. उपरोक्त प्रमाणे थकबाकी रु.12,97,104/- वसुल करुन अनुपालन करावे.

DATDUBM6401 (Ref No : 74)

145 मनपा अमरावतीची पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावती यांचेकडे सोपविली असतांना आस्थापना खर्चावर तसेच सार्वजनिक नळाच्या पाणीपुरवठा देयकावर फार मोठया प्रमाणातील खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 04

लेखा शीर्ष :130 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 9060330.00 /-

अमरावती शहराला पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावतीकडे सोपविली असून मनपाकडे पाणीपुरवठा प्रकरणी कुठलीही भांडवली कामे निहित नसतांना कर्मचा-यांच्या वेतन भत्यावर फार मोठया प्रमाणात खर्च होत आहे. तसेच महानगरपालिका अमरावतीने मनपाची पाणीपुरवठा योजना मालमत्ता व दायित्वासह महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावतीकडे सोपविण्यात आली असतांना मनपाच्या

सार्वजनिक नळांना मोफत पाणीपुरवठा करणेबाबत करारात तरतूद केली नसल्याने मनपावर सार्वजनिक नळांच्या पाणीपुरवठा देयकावरील खर्चाचा भार पडत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 189 (1) मध्ये शहराच्या कोणत्याही भागास जलव्यवस्था केद्रांतून पाण्याच्या खाजगी नळांच्या साहयाने किंवा सार्वजनिक नळ उभे करुन किंवा कोणत्याही अन्य मार्गाने पाणीपुरवठा करण्याकरीता सर्व उपाययोजना करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असेल अशी तरतूद आहे. तसेच कलम 189 (2) (क) नुसार शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीसोबत व्यवस्था करणेबाबतही तरतूद आहे. त्यानुषंगाने मनपाने अमरावती शहराला पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावतीकडे पाणीपुरवठा योजनेतील सर्व मालमत्तेसह मनपाचे पत्र क्र.3648 दि.9.08.1983 ला हस्तांतरित केली आहे. मनपाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणसोबत दि.9.08.1983 ला करार करतांना आवश्यक त्या अटी व शर्ती न घातल्याने जीवन प्राधिकरणाव्दारे शहरातील सार्वजनिक नळांना पाणीपुरवठा केल्या प्रकरर्ण पाणी देयकावर फार मोठया प्रमाणावर खर्च होत असल्याचे निदर्शनास आले.

यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे:-

1. अमरावती शहराला पाणीपुरवठा करणारी संपुर्ण पाणीपुरवठा योजना मालमत्तेसह महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावतीकडे सोपविण्यात आली असून पाणीपुरवठासंबंधीत कोणतीही भांडवली कामे मनपा अमरावतीकडे नाही. असे असतांना पाणीपुरवठा विभागातील कर्मचा-यांच्या वेतन भत्यावर लेखाशिर्ष 128 अतंर्गत सन 2014-15 मध्ये रु.19,34,710/- एवढा खर्च झाला आहे. याबाबत पाणीपुरवठा विभागास अर्धसमास पत्राव्दारे विचारणा करण्यात आली असता माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

2. महानगरपालिका अमरावतीने मनपाच्या मालकीची संपुर्ण पाणीपुरवठा योजना मालमत्तेसह महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावतीकडे हस्तांतरीत करण्यात आली. परंतु मनपाने करार करतांना शहरातील सार्वजनिक नळखाबांना मोफत पाणीपुरवठा करणे अथवा सुट देण्याबाबत करारात अट नमूद केली नाही. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने सार्वजनिक नळखांबासाठी केलेल्या पाणीपुरवठयापोटी मनपास प्रदान करावे लागत आहे. सन 2014-15 मध्ये रु.71,25,620/- चे पाणीपुरवठा देयकाचे प्रदान करण्यात आले. लेखापरिक्षणास प्राप्त झालेर्ल मासीक देयक पुढीलप्रमाणे आहे:-

(रक्कम रुपयात)

पाणीपुरवठा मासिक देयक	प्रमाणक क्रमांक व दिनांक	प्रदान केलेली रक्कम
माहे नोव्हेंबर 2008	13336 दिनांक 26.03.2015	रु. 6,77,290/-
माहे डिसेंबर 2008	13337 दिनांक 26.03.2015	रु. 6,77,290/-
माहे जानेवारी 2012	13335 दिनांक 26.03.2015	रु.20,05,744/-
माहे मार्च 2013	13334 दिनांक 26.03.2015	रु.20,05,744/-

अमरावती शहरात एकूण 792 नळखांब असल्याचे नमूद असून प्रती नळखांब रु.2360/- दराने जिवन प्राधिकरणला प्रती महिना रु.18,69,120/- प्रदान करावयाचे असतांना माहे जाने.2012 व माहे मार्च 2013 मध्ये रु.20,05,744/- प्रमाणे प्रदान करण्यात आले. शहरातील एकुण नळखाबांची संख्या किती, याबाबत अर्धसमास

पत्र क्र.72 दि.6.03.2018 नुसार माहिती सादर करण्यास कळविण्यात आले, परंतु लेखापरिक्षणास माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

पाणीपट्टीची वसुली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून करण्यात येत असून त्यामधून मनपाला रॉयल्टीसुध्दा प्राप्त होत नाही. करारनामा करतांना वरील अटी व शर्ती करारात नमूद केल्या असत्या तर मनपाला महसुल प्राप्त असता तसेच पाणीदेयकाचे प्रदान करण्यापासून सुट मिळाली असती.

3. अमरावती शहरातील एकुण नळखांब किती, त्यापैकी किती नळखांबामधून पाणीपुरवठा होतो, किती नळखांबे बंद आहे, दररोज नळखाबांना किती पाणीपुरवठा होतो व त्याचा दर किती, याबाबतची माहिती देयकासोबत सादर करण्यात येत नाही. असे असतांना जिवन प्राधिकरण अमरावतीने देयकामध्ये एकुण नियमित नळखाबांच्या संख्येनुसार मनपाकडे मागणी सादर करण्यात येत असुन मनपाकडून याबाबत कुठलीही खातरजमा न करता व अहवाल प्राप्त न करता देयकाचे प्रदान मनपाकडून करण्यात येते. भविष्यामध्ये देयकाचे प्रदान करतांना उपरोक्त सर्व नमुद बाबीची पुर्तता केल्यानंतर तसेच मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या निरिक्षकाव्दारे शहरातील नळखाबांचा मासिक अहवाल प्राप्त झाल्यानंतच देयकाचे प्रदान करणे योग्य राहील.

4. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन उपविभाग क्र.3 अमरावती यांचे पत्र क्र.तांशा/सामान्य / 317/2013 दि.4.03.2013 नुसार माहे जानेवारी 2013 चे सार्वजनिक तथा प्रशासकीय नळजोडण्याची देय मागणी रु.25,08,424/- तसेच थकबाकी रकमेवरील माहे फेब्रूवारी 2013 पर्यंतची अधिभाराची रक्कम रुपये 23,49,87,798/- सह एकूण रु.53,58,02,665/- चे मागणीपत्र मनपास सादर केले. थकबाकीची रक्कम विचारात घेता प्रलंबित दायित्वासाठी सन 2014-15 चे अंदाजपत्रकात लेखाशिर्ष 131 मध्ये रु.50 लक्ष एवढी अल्प तरतूद ठेवण्यात आली. थकबाकीच्या अनुषंगाने पुरेशी तरतूद करण्यात न आल्याने परिणामी थकबाकी रकमेवरील अधिभाराच्या रकमेत दिवसेंदिवस वाढ होत असून त्याचा मनपावर भुर्दंड बसत आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.72 दि.6.03.2018 नुसार लेखापरिक्षणासाठी अभिलेख, नस्त्या, नोंदवहया व खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु अर्धसमास पत्राचे अनुषंगाने मागणी केलेले अभिलेख व माहिती प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 72)

146 शालेय पोषण आहाराबाबत प्राप्त तांदुळाची प्राथमिक शाळेच्या साठा नोंदवहीत नोंद नसणे तसेच अंदाजपत्रकातील खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :250 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 7784450.00 /-

शालेय पोषण आहार योजनेचे वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक केंद्रशासनाने दि.28.04.2014 या Programme Approval Board च्या बैठकीत मंजूर केले आहे. केंद्र शासनाने राज्यासाठी लाभार्थी व कार्यदिन मंजूर केले आहे. त्या आधारावर शिक्षण सहसंचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे-1 यांचे पत्र क्र. प्राशिसं/शापोआ/AWP/2014-15/7347/301 दिनांक 9.05.2014 च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना 222 कार्यदिन मंजूर केले आहेत. मनपा अमरावतीच्या शाळेतील शालेय पोषण आहार अभिलेख्याची पडताळणी केली असता शाळांनी मंजूर कार्यदिनापेक्षा जादा कार्यदिन दर्शवून तांदुळाचा वापर केल्याचे लेखापरिक्षणादरम्यान निदर्शनास आले. तसेच प्राप्त तांदुळाची नोंद साठानोंदवहीत घेण्यात आली नाही. त्यामुळे प्राप्त 2 क्वि. तांदुळाचा अपहार झाल्याचे दिसून येत आहे.

केन्द्र शासनाचे पत्र क्र.F.No.9-1/2014 MDM 2-1, दिनांक 28.04.2014 नुसार शालेय पोषण आहार योजनेतंर्गत सन 2014-15 साठी मंजूर लाभार्थी, कार्यदिन व तरतूदी निश्चित केल्या आहे. असे असताना मनपा अमरावतीच्या शाळेने निश्चित केलेल्या कार्यदिनापेक्षा जादा कार्यदिन वापरण्यात आल्याने शालेय पोषण आहार खर्चात अनावश्यक वाढ होणे, तसेच प्राप्त तांदुळाची नोंद शाळेच्या साठानोंदवहीत न घेणे, परंतु वार्षिक अहवालात तांदुळ प्राप्त झाल्याचे दर्शविणे इत्यादी अनियमितता निदर्शनास आल्या आहे.

याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे:-

1. शिक्षण सहसंचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे-1 यांचे पत्र क्र.प्राशिसं/शापोआ/AWP/2014-15/7347/301 दिनांक 9.05.2014 च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना खालीलप्रमाणे लाभार्थी व कार्यदिन मंजूर केले आहे.

अ.क्र.	इयत्ता	लाभार्थी	कार्यदिन
1	प्राथमिक (इ.1 ली ते 5 वी)	65,00,000	222 दिवस
2	उच्च प्राथमिक (इ.6 वी ते 8 वी)	39,00,000	222 दिवस
3	राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प (NCLP)	8,469	312 दिवस

मनपा शाळेकडील शालेय पोषण आहार नोंदवहीची पडताळणी केली असता मंजूर कार्यदिनापेक्षा जादा कार्यदिन दर्शवून तांदुळ शिजवण्यात आल्याने तांदुळाचा जादा वापर होऊन अनावश्यक खर्च झाल्याचे दिसून येते. नमुन्यादाखल शाळाची नावे खालीलप्रमाणे-

शाळेचे नाव	महिना	मंजूर कार्यदिन	वापरलेले कार्यदिन	अतिरिक्त तांदुळाचा वापर
प्राथमिक मराठी मुलांची शाळा क्र. 1 भाजीबाजार	एप्रिल-2014	13 दिवस	22 दिवस	42 किलो
मराठी मुलांची प्राथमिक शाळा क्र.1 बुधवारा अमरावती	एप्रिल-2014	13 दिवस	23 दिवस	45 किलो
प्राथमिक मराठी शाळा क्र.6 खरकाडीपुरा, मनपा, अमरावती	एप्रिल-2014	13 दिवस	22 दिवस	78 किलो

प्राथमिक मराठी शाळा क्र.19 रुक्मीनीनगर, अमरावती	ऑगस्ट-2014	20 दिवस	23 दिवस	12 किलो

मनपा अमरावतीकडे जिल्हा परिषद अमरावतीकडून हस्तातंरीत झालेल्या 16 शाळा व मनपाच्या एकूण 49 शाळांना सन 2014-15 मध्ये एकूण शाळानिहाय प्राप्त झालेले तांदुळ, सुरवातीचा साठा, वापरण्यात आलेले तांदुळ व वर्षेअखेर शिल्लक साठा याबाबत मंजूर कार्यदिन विचारात घेवून अतिरिक्त वापरण्यात आलेला तांदुळाबाबत ताळमेळ घेऊन शिक्षणाधिकारी व आयुक्त मनपा, यांचे स्वाक्षरिने अनुपालन करावे.

2. सन 2014-15 या कालावधीत प्राथमिक मराठी मुलांची शाळा क्र.1 भाजीबाजार या शाळेला वर्ग 1 ते 4 मधील विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियान योजनेतंर्गत तांदुळाचा पुरवठा करण्यात आला. सदर शाळेला माहे सप्टेंबर 2014 मध्ये 2 क्विंटल तांदुळाचा पुरवठा केला. परंतु तांदुळ प्राप्त झाल्याबाबत संबंधीत शाळेच्या साठा नोंदवहीत नोंद नाही. परंतु वार्षिक अहवालामध्ये सप्टेंबर 2014 मध्ये 2 क्विंटल तांदुळ प्राप्त झाल्याचे नमुद केले आहे. तसेच वार्षिक गोषवा-यामध्ये माहे सप्टेंबर 2014 मध्ये खाडाखोड करून 2 क्विंटल तांदुळ प्राप्त झाल्याचे दर्शवून महिनाअखेर 3.33 क्वि. तांदुळ शिल्लक असल्याचे दर्शविले आहे. त्यामुळे शालेय पोषण आहारातील प्राप्त 2 क्वि. तांदुळाचा अपहार झाल्याचे दिसून येते. मनपाच्या शिक्षण विभागाकडील शाळा निरिक्षकाकडून शाळांना पुरविण्यात येणा-या शालेय पोषण आहारातील तांदुळाच्या साठानोंदवहीची आकस्मिक तपासणी होत नसल्याचे दिसून येते. तपासणी केल्याबाबत शाळांच्या साठा नोंदवहीवर शाळा निरक्षकाची स्वाक्षरी आढळून आली नाही.

3. मनपाच्या शाळांना सर्व शिक्षा अभियान योजनेतंर्गत महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह फेडरेशन लि. मुंबई शाखा अमरावती व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, अमरावतीकडून तांदुळाचा पुरवठा करण्यात येतो. असे असतांना सन 2015-16 करीता सुधारित व सन 2016-17 च्या मुळ अंदाजपत्रकात सन 2014-15 मध्ये लेखाशिर्ष 250 अतंर्गत (प्राथमिक शाळा पोषण आहार) प्रत्यक्ष खर्च रु.77,84,450/- झाल्याचे दिसून येते. सदरचा खर्च कुठल्या बाबीवर करण्यात आला याबाबत खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास प्राप्त झाली नाही. याबाबत तपासर्ण करुन अनुपालन करावे.

उपरोक्त प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.190 दि.28.05.2018 नुसार मागणी केलेले अभिलेख व खुलासा लेखापरिक्षणास सादर करण्यात आला नाही. परिणामी आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 190)

147 भांडार विभागाने मनपाच्या विविध विभागासाठी खरेदी केलेल्या साहित्य खरेदीतील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :145 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1668544.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 48732.00/-

महानगरपालिका अमरावतीच्या विविध विभागासाठी दरवर्षी लागणाऱ्या साहित्यासाठी सर्व विभागाकडून एकत्रित वार्षिक मागणी व शिल्लक साठा विचारात घेऊन आवश्यक असलेल्या साहित्याची खरेदी न करणे, दर करारावर नसलेल्या पुरवठादारांकडून निविदा मागवून साहित्य खरेदी करताना साहित्याच्या विनिर्दिष्टाप्रमाणे चालू बाजारभाव विचारात घेऊन खरेदी न करणे, राखीव पुरवठरांना सहभागी करुन न घेणे, दरवर्षी नियत दिनांकास भांडारामध्ये शिल्लक असलेल्या साहित्याची तपासणी करुन त्याप्रमाणे आवश्यक प्रमाणपत्र सादर न करणे इत्यादी अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखसं-1088/(28837)/उद्योग -6 दि. 2 जाने.1992 व 4 फेब्रू. 2003 मध्ये दरकरारावरील संस्था तसेच विनिर्दिष्टीत साहित्य पुरविण्यासाठी शासनाकडे आरक्षित असलेल्या संस्थाकडे मागणी नोंदविण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या विविध विभागासाठी आवश्यक असणारे साहित्य खरेदी करण्यासाठी मनपातील सर्व विभागाची साहित्याची गरज लक्षात घेता एकाच प्रकारच्या वस्तूसाठी मनपाच्या खरेदी समितीमार्फत खरेदीची कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु मनपाच्या भांडार विभागाने एकाच प्रकारच्या साहित्याची खरेदी वेगवेगळया दराने एकाच पुरवठादाराकडून करण्यात आल्याने उक्त शासान निर्णयातील तरतूदीचे उल्लंघन झाले आहे.

याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत:-

1. खरेदी नियमपुस्तिका 1978 भाग-2 नियम 1 मधील तरतूदीनुसार विविध खात्यासाठी करण्यात आलेर्ल खरेदी अत्यावश्यक असल्याबाबत वेळोवेळी आढावा घेवून त्यानुसार संबंधित खात्याकडून आलेली मागणी योग्य व वाजवी असल्याबाबत खात्री केल्याबाबत आवश्यक ती कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे खरेदी कार्यवाही अचूक व योग्यरित्या झाली असल्याची खात्री करता आली नाही. खरेदी नियमपुस्तिकेतील नियम 1(ड) नुसार खरेदी करावयाच्या वस्तू CSPO/DGSD च्या दरकरारावरील दर विचारात घेऊन त्यानुसार खरेदी केली असल्याबाबत खात्री करण्यात आल्याचे उपलब्ध नस्तीमध्ये दिसून आले नाही. नमुन्यादाखल काही प्रकरणे पुढीलप्रमाणे-

(अ) आरोग्य विभागासाठी साहित्य खरेदी-

प्रमाणक क्रमांक 6106 दि.17.10.2014 रु.22000/-

आरोग्य विभागासाठी व्हॅकुम पाईप क्लिनर गाडी क्र.4455 करीता 100 फुट रु.220/- प्रती फुट दराने खरेदी केला. याकरीता खालील पुरवठादाराकडून दरपत्रक प्राप्त झाले.

(अ) श्री. बजरंग ट्रेडर्स, अमरावती (ब) गुरूनानक सेल्स, एजन्सी अमरावती

(क) श्रीराम एन्टरप्राईजेस, अमरावती

प्राप्त दरपत्रकावर पुरवठादाराचा नोंदणी क्रमांक व दिनांक नमूद नाही. पुरवठा आदेश क्र.9327 दि.30.01.2014 नुसार मागणी केली असून श्रीराम एन्टरप्राईजेस, अमरावती यांचेकडून प्राप्त रु.22000/- चे बिलावर नोंदणी क्रमांक व दिनांक नमुद नाही. प्राप्त बिलाच्या मागील भागावर साठा नोंदवहीत नोंद घेतल्याचे

प्रमाणित केले नाही. याबाबत आरोग्य विभागाकडील जंगम साठा नोंदवहीची लेखापरिक्षणाकरीता मागणी केली असता तपासणीस उपलब्ध करुन देण्यात आली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात साहित्य प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

(ब) आरोग्य विभागातील कामगारासाठी साहित्य खरेदी करणे-

प्रमाणक क्रमांक 799 दि.30.04.2014 रु.8,87,844/-

प्रशासकीय मंजूरी –आयुक्त मनपा, दि.2309.2013 रु.10,00,000/-

उपआयुक्त मनपा अमरावती मागणी आदेश क्र.162 दि.31/10/2013

पुरवठादार - सुयोग जनरल सप्लायर, अमरावती

बिल क्र.46 दि. निरंक (दिनांक नमुद नाही) रु.8,87,844/-

खरेदी केलेल्या साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

अ.क्र.	साहित्याचा तपशिल	संख्या	प्रती नग दर	एकूण
1	गमबुट	398 जोड	रु.690/- प्रती जोड	रु.274620/-
2	चप्पल	298 जोड	रु.180/- प्रती जोड	रु.53640/-
3	लाईफबॉय साबन	16704 नग	रु.23.50/- प्रती नग	रु.392544/-
4	मास्क	696 नग	रु.240/- प्रती नग	रु.167040/-
				रु.887844/-

साबणाच्या दराबाबत दि.7.04.2014 ला झालेल्या चर्चेनुसार सुयोग जनरल सप्लायर अमरावती यांचे पत्र क्र. निरंक दिनांक निरंक नुसार लाईफबॉय साबण प्रती नग रु.23.50/- ऐवजी रु.20.87/- प्रती नग दराने पुरवठा करण्यास सहमती दर्शविली. असे असताना भांडार प्रमुखांकडून रु.23.50/- प्रती नग दराने प्रदान करण्यात आले. लाईफबॉय साबण प्रती नग रु.20.87/- दराने 16704 नगाचे एकूण रुपये 348612/- चे प्रदान करावयाचे असतांना रु.392544/- चे प्रदान केल्याने रु.43932/- चे अतिप्रदान झाले असल्याने वसुलपात्र ठरते.

2) पाणीपुरवठा विभागासाठी साहित्य खरेदी-

प्रमाणक क्रमांक 8233 दि.29.11.2014 रु.43200/-

प्रशासकीय मंजूरी - आयुक्त मनपा, अमरावती दि.20.03.2014 रु.44100/-

पुरवठा मागणी आदेश क्र.9376 दि.5.06.2014

पुरवठादार – श्रीराम एन्टरप्राईजेस, अमरावती

मनपाच्या मागणी आदेशानुसार पाणी टँकर एम एच-27– 5119 करीता 3 इंची एकूण 160 फुट पाईपची मागणी केली असता पुरवठादार श्रीराम एन्टरप्राईजेस, अमरावती यांनी बिल क्र. 225 दिनांक निरंक नुसार 180 फुट प्रती फुट रु.240/- प्रमाणे रु.43200/- चे सादर केले असून त्याचे प्रदान प्रमाणक क्र.8233 दि.29.11.2014 रु.43200/- चे प्रदान केले. प्रती फुट 240/- दराने एकुण 160 फुटाचे रु.38400/- चे प्रदान करावयाचे असतांना रु.43200/- चे प्रदान करण्यात आल्याने रु.4800/- चे अतिप्रदान झाले.

(ड) स्वच्छता विभागातील टँकर क्र.5120 करीता होस पाईपची खरेदी-

प्रमाणक क्रमांक 8234 दि.29.11.2014 रु.43200/-

प्रशासकीय मंजूरी - आयुक्त मनपा, अमरावती दि.24.03.2014 रु.44100/-

पुरवठा मागणी आदेश क्र.9369 दि.16.04.2014

पुरवठादार – श्रीराम एन्टरप्राईजेस, अमरावती

होस पाईप खरेदी करीता खालील नमुद पुरवठादाराकडून दरपत्रके प्राप्त झाली.

3) गुरूनानक सेल्स एजन्सी अमरावती 3 इंची प्रती फुट रु.260/- प्रमाणे

(ब) श्रीराम एन्टरप्राईजेस, अमरावती 3 इंची प्रती फुट रु.240/- प्रमाणे

(क) श्री बजरंग ट्रेडर्स, अमरावती 3 इंची प्रती फुट रु.245/- प्रमाणे

श्रीराम एन्टरप्राईजेस, अमरावती यांनी पाणी टँकर होस पाईप 2 1/2 प्रती फुट रु.240/-प्रमाणे एकूण 180 फुटाचे बिल क्र.226 दि. निरंक रु.43200/- चे मनपास सादर केले. दरपत्रक 3 इंची साईजप्रमाणे प्राप्त झाले असतांना पुरवठादाराने 2 1/2 इंच साईज होस पाईपचा पुरवठा केला. मागणीनुसार पुरवठा केला नाही. याबाबत मनपाचे भांडार विभागाने कुठलीही कार्यवाही केली नाही.

(इ) स्वच्छता विभागा अंतर्गत झोन क्र.4 बडनेरा येथील टँकर क्र.4873 करीता होस पाईप खरेदी-

प्रमाणक क्रमांक 8235 दि.29.11.2014 रु.44100/-

प्रशासकीय मंजूरी - आयुक्त मनपा, अमरावती दि.16.06.2014 रु.44100/-

पुरवठा मागणी आदेश क्र.9384 दि.22.07.2014

पुरवठादार – श्रीराम एन्टरप्राईजेस, अमरावती

पुरवठादाराने 3 इंची होस पाईपचे बिल 180 फुटाचे प्रती फुट रु.245/- दराने बिल क्र.229 दिनांक निरक रु.44100/- चे मनपास सादर केले. सदर बिलाचे प्रदान करताना बिलावर प्रदानार्थ मंजूरी दिली नाही. तसेच बिलाच्या मागील भागावर साहित्य सुस्थितीत प्राप्त झाल्याची व साठा नोंदवहीत साहित्याची नोंद घेतल्याबाबत नोंद घेतली नाही. स्वच्छता विभागाने साठा नोंदवही लेखापरिक्षणा सादर केली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात साहित्य प्राप्त झाल्याची खात्री होत नाही.

(ई) नगर सचिव विभागासाठी साहित्य खरेदी- लेखाशिर्ष 88 (आकस्मिक खर्च)

प्रमाणक क्रमांक 8232 दि.29.11.2014 रु.34500/-

भांडार विभागाने नगर सचिव विभागाचे आकस्मिक खर्चाचे मंजूर तरतूदीमधून गटनेता यांचे कार्यालयासाठी 12 नग रिलेक्स चेअर खरेदी केल्या. पुरवठादार श्रीराम एन्टरप्राईजेस, अमरावती यांचे प्रती रिलेक्स चेअर रु.2870/- प्रमाणे एकूण 12 नग खरेदी केले. याबाबत भांडार विभागाने साहित्य खरेदीसाठी घेतलेली प्रशासकिय मंजूरी, स्थायी समितीची मंजूरी, साहित्य खरेदीसाठी मागविण्यात आलेली दरपत्रके इत्यादीबाबतची नस्ती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे साहित्य खरेदीची केलेली कार्यवाही नियमानुसारच आहे, याबाबतची खात्री करता आली नाही.

2. उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखसं-1088/(28837)/उद्योग -6 दि.2 जाने.1992 मधील परिच्छेद 5 परिशिष्ट- तीन नुसार स्टिल फर्निचरसाठी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळामार्फत राखून ठेवण्यात आलेल्या वस्तूंची खरेदी त्यांचेमार्फत करण्यात आलेली नाही. त्यामुळे केलेली खरेदी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम 73(क) नुसार किफायतशीर दराने न झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्र लघुउदयोग विकास महामंडळ यांचेकडील दरकरार क्र.MSSIDC/MRK/RCT/2012-13 दिनांक 11.02.2013 नुसार सर्व प्रकारच्या करांसह स्टिल फर्निचरचे दर निश्चित केले आहे. त्यानुसार खरेदी करण्यात आली नाही. शासन निर्णय उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि.2 जाने. 1992 व 4 फेब्रू.2003

मध्ये दर करारावरील संस्था तसेच विनिर्दिष्टीत साहित्य पुरविण्यासाठी शासनाकडे आरक्षित असलेल्या संस्थांकडे मागणी नोंदविण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार खरेदी कार्यवाही करण्यात न आल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झाले आहे.

3) महिला व बालकल्याण विभागाकरीता साहित्य खरेदी-

लेखाशिर्ष 80 मंजूर तरतूद रू.3000000 अदांजपत्रक वर्ष-2014-15

महिला व बालकल्याण विभागासाठी लोखंडी आलमारी व व्हिल चेअर खरेदी केल्या.

प्रमाणक क्रमांक 8244 दि.29.11.2014 रु.49200/-

साहित्य खरेदीकरीता खालील पुरवठादाराकडून दरपत्रक प्राप्त झाले.

1) श्रीराम एन्टरप्राईजेस, अमरावती आलमारी रु.15500/-, व्हिल चेअर रु.4900/- प्रतीनग

(ब) श्री. बजरंग ट्रेडर्स, अमरावती आलमारी रु.14900/-, व्हिल चेअर रु.4500/- प्रतीनग

(क) गुरूनानक सेल्स एजन्सी, अमरावती आलमारी रु.15500/-, व्हिल चेअर रु.4500/- प्रतीनग

श्री. बजरंग ट्रेडर्स, अमरावती यांचे बिल क्र.121 दि. निरंक रु.49200/- चे मनपास सादर केले.

लोखंडी आलमारी 6.1/2x3x1.1/2 3 नग रु.14900/- प्रतीनग रु.44700/-

व्हिल चेअर 1 नग रु.4500/- प्रतीनग रु.4500

पुरवठदाराने साहित्याच्या पुरवठा केल्याचा दिनांक नमुद नाही. तसेच सदर साहित्य खरेदी प्रकरणी अभिलेख, नस्ती व नोंदवही लेखापरिक्षणास सादर केली नाही.

(ब) भांडार विभागाने खरेदी केलेल्या शिलाई मशिन व पिको-फॉल मशीन खरेदीबाबत-

भांडार विभागाकडील साठा नोंदवहीची पडताळणी केली असता शिलाई मशिन व पिको-फॉल मशिन प्राप्त झाल्याची नोंद खालीलप्रमाणे आढळून आली.

(अ) साठा नोंदवहीच्या पृष्ठ 148 वर 10 नग शिलाई मशिन व 1 नग पिको-फॉल मशिन दि.24.02.2015 ला प्राप्त झाल्याची नोंद आहे.

(ब) साठा नोंदवहीच्या पृष्ठ 160 वर रिटा कंपनीच्या 100 नग शिलाई मशिन प्रती मशिन रु.4500/- प्रमाणे एकूण रु.4,50,000/- ची खरेदी केल्याचे निदर्शनास आले.

(क) साठा नोंदवहीच्या पृष्ठ 373 वर शिलाई मशिन 10 नग रु.4500/- प्रती नगाप्रमाणे रुपये 45000/- व पिको-फॉल मशिन 5 नग रु.9900/- प्रती नगाप्रमाणे रु.49500/- ला पुरवठादार ओम इलेक्ट्रानिक्स ॲन्ड जनरल सप्लायर्स यांचेकडून खरेदी केल्या आहे. खरेदी केलेल्या शिलाई मशिन कोणत्या लाभार्थिस वाटप केल्या याबाबतची नोंद साठा नोंदवहीत नाही. तसेच लाभार्थीची स्वाक्षरी घेण्यात आली नाही. त्यामुळे खरेदी केलेले साहित्य प्राप्त झाल्याबाबतची खात्री होत नाही. याप्रकरणी अर्धसमास पत्र क्र.152 दि.21.04.2018 नुसार खरेदीसंबंधी केलेली कार्यवाही दरपत्रके, निविदा प्रक्रिया, प्रशासकीय मंजूरी, स्थायी समितीची मंजूरी, नस्त्या, नोंदवहया व खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु याबाबत भांडार विभागाकडून कुठलेही अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही. भांडार विभागाने खरेदी केलेल्या सर्व साहित्याचे पुरवठादाराकडून प्राप्त बिलावर दिनांक नमूद नाही. त्यामुळे भांडार विभागाकडून करण्यात आलेल्या साहित्य खरेदीमध्ये आर्थिक अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याप्रकरणी मनपाच्या अंतर्गत यंत्रणेव्दारे सखोल तपासणी करुन अनुपालन करावे.

DRAFT

3. मालाच्या दर्जाबाबतच्या तपासणीसाठी खरेदी नियमपुस्तिका परिच्छेद 8.4 परिशिष्ट आठनुसार संस्थाची यादी देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर नियमातील नियम1(ह) व 7 नुसार खरेदी केलेल्या वस्तुचे स्पेशिकेशन विचारात घेऊन ज्या वस्तूंचे चाचणी अहवाल प्राप्त करावयाचे आहेत अशा वस्तूबाबतचे अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

उपरोक्त मुद्दयाचे अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र.41 दि.15.02.2018, क्र. 152 दि.21.04.2018 व क्र. 197 दि.7.06.2018 नुसार भांडार विभागाने केलेल्या साहित्याच्या खरेदीसंबंधी निविदा प्रक्रिया नस्ती, दरपत्रके, प्रशासकीय मंजूरी, स्थायी समितीची मंजूरी, नस्त्या व नोंदवहया इत्यादी अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु भांडार विभागाकडून वर नमुद खर्चाची प्रमाणके वगळता उर्वरित कोणतेही अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही. परिणामी आक्षेप नोंदविण्यात येत असून रु. 1668544/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 197)

149 सामान्य प्रशासन विभागातील कर्मचा-यांना वाढीव ग्रेड-पे दिल्याने झालेले अतिप्रदान तसेच सेवापुस्तकातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 08

लेखा शीर्ष :79 महानगरपालिका स्व-निधी निधी
अनियमितता कलम : 9ब

महानगरपालिका, अमरावतीचे सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान मनपातील सामान्य प्रशासन विभागाकडील अधिकारी/कर्मचारी यांचे सेवापुस्तकाची पडताळणी केली असता सामान्य प्रशासन विभागाकडील विविध विभागात कार्यरत कर्मचारी/अधिकारी यांना लागू करण्यात आलेली आश्वासित प्रगती योजना, शासन निर्णय क्र.वेपुर1210/प्र.क्र.124/सेवा-9 दि.1.09.2015 नुसार वेतननिश्चिती न करणे, पदोन्नती तसेच 6व्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती चुकीची करणे, वेतनातील अतिप्रदान, रजा लेखा अद्यावत नसणे व सेवापुस्तकात आवश्यक नोंदी न घेणे इत्यादी अनियमितता आढळून आल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपुर1209/प्र.क्र.27/सेवा-9 दिनांक22 एप्रिल 2009 नुसार 6 व्या वेतन आयोगानुसार दि.1 जाने. 2006 पासून सुधारित वेतनसंरचना लागू करण्यात आली. मनपा कर्मचा-यांना 6 वा वेतन आयोग दि.1 एप्रिल 2010 पासून लागू करण्यात आला. त्यानुसार मनपा अमरावतीच्या आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवापुस्तकाची पडताळणी केली असता कर्मचा-यांच्या वेतनाची पुनर्रचना करताना वेतननिश्चिती चुकीची करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

आवश्यक निकषानुसार पात्र असलेल्या कर्मचा-यांना पदोन्नतीच्या पदावर कायम ठेवणे आवश्यक आहे. पदोन्नत कर्मचा-यांनी विहित कालमर्यादेत अटी व शर्तीची पुर्तता केल्याच्या आवश्यक त्या नोंदी सेवापुस्तकात घेण्यात आल्या नाहीत.

याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1. श्री. एम. आर. तांबेकर, समुदाय विकास अधिकारी, नगर सचिव विभाग

श्री.एम.आर.तांबेकर यांची मनपा आदेश क्र.साप्र/428/85 दि.19.02.1985 नुसार वेतनश्रेणी रु.220-5-250-7-285 मध्ये नियुक्ती करण्यात आली. मनपा आदेश क्र. निरंक दि.1.02.1988 नुसार समुदाय विकास अधिकारी या पदावर वेतनश्रेणी 500-20-700-दरो25-900 मध्ये पदोन्नती देण्यात आली. त्यानंतर मनपा आदेश मनपा आदेश क्र.अमनपा/साप्रवि/778/2003 दि.2.12.2003 नुसार वेतनश्रेणी रु.6500-10500 मध्ये दि.1.02.2000 पासून कालबध्द पदोन्नतीचा लाभ दिला.

मनपा आदेश क्र.अमनपा/साप्रवि/1363/07 दि.14.08.2007 नुसार समाज अधिकारी पदावर वेतनश्रेणी रु.6500-10500 मध्ये कार्यात्मक पदोन्नतीने तात्पुरत्या स्वरुपात पदस्थापना करण्यात आली. त्यानंतर मनपा आदेश क्र.अमनपा/साप्रवि-आयु-2600/15 दि.21.11.2015 नुसार सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा (24 वर्ष) दुसरा लाभ वेतनबँड 9300-34800 ग्रेड-पे 5000 मध्ये लागू करण्यात आला. परंतु या संवर्गामध्ये आकृतीबंधात पदोन्नतीचे पद उपलब्ध नसल्याने सदर पद एकाकी ठरते. त्यामुळे त्याना रु.5000 चा ग्रेड वेतनाचा लाभ अनुज्ञेय ठरत नाही. शासन निर्णय दि. 5 जुलै 2010 नुसार एकाकी पदानुसार वेतननिश्चिती करुन अनुपालन करावे.

2. श्री. जसवंतसिंग ओकांरसिंग शेखावत

श्री. जसवंतसिंग ओकांरसिंग शेखावत यांची नियुक्ती दि.21.08.1982 ला वेतनश्रेणी 290-10-390-15-465 मध्ये करण्यात आली. मनपा आदेश क्र.अमनपा/साप्रवि/885/95 दि.5.08.1995 नुसार दि.1.10.1994 पासून वेतनश्रेणी रु.1400-40-1800-50-2300 (5व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु.5500-175-9000) कालबध्द पदोन्नतीचा प्रथम लाभ लागू करण्यात आला.

दि.1.02.1997 रु.2180/-, दि.1.02.1998 रु.2240/- व दि.1.02.1999 रु.2300/- वर वेतनवाढी मंजूर नसतांना वेतनवाढीचा लाभ देण्यात आला.

6 व्या वेतन आयोगानुसार वेतनबँड 9300-34800 ग्रेड-पे 4300 मध्ये दि.1.01.2006 ला वेतननिश्चितीनुसार वेतन रु.13490+4300 देय ठरते. मनपा आदेश क्र.अमनपा/साप्रवी/उपा/1847/11

दि.8.08.2011 नुसार सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा (24 वर्ष) दुसरा लाभ वेतनबँड 9300-34800 ग्रेड-पे 4900 लागू करण्यात आला. सदर पद एकाकी पद असल्याने रु.4900 ग्रेड-पे देय नाही.

3. <u>श्री. शैलेन्द्र के. वैद्य कनिष्ठ लिपीक-</u>

श्री. शैलेन्द्र के. वैद्य यांची नियुक्ती कनिष्ठ लिपीक पदावर कर विभागात दि.17.05.2000 ला करण्यात आली. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपुर1209/प्र.क्र.27/सेवा-9 दिनांक 22 एप्रिल 2009 नुसार 6 व्या वेतन आयोगानुसार दि.1 जाने. 2006 पासून सुधारित वेतनसंरचना लागू करण्यात आली.

दि. 1.01.2006 चे मुळ वेतन रु.3425 X 1.86 = रु.6370/- + ग्रेड-पे रु.1900 = रु.8270/-

याप्रमाणे वेतन देय असतांना रु.6380 + ग्रेड-पे रु.1900 प्रमाणे रु.8280/- प्रमाणे वेतन अदा करण्यात आले. त्यामुळे मुळ वेतन व त्यावरील देय अनुषंगीक भत्त्यामध्ये अतिप्रदान झाले.

4. <u>श्री. अनिल गोहर, वरिष्ठ लिपीक</u>

श्री. अनिल गोहर यांची मनपा आदेश क्र.अमनपा/आयु/सा.अ./2/1422/99 दि.12.10.1999 चे आदेशान्वये वशीला पध्दतीने सफाई कामगार पदावर रु.750-12-870दरो740 मध्ये दि.16.10.1999 पासून नेमणूक केली. मनपाचा पदोन्नती आदेश क्र.अमनपा/साप्रवि/आयुक्त/3887/08 दि.21.12.2008 (एकुण 53 चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना कनिष्ठ लिपीक पदावर पदोन्नती) नुसार त्यांना कनिष्ठ लिपीक पदावर वेतनश्रेणी 3050-75-3950-80-4590 मध्ये पदोन्नती देण्यात आली.

पदोन्नती आदेशातील अ. क्र. 3 वरील अटीनुसार मराठी-30 व इंग्रजी-40 तसेच संगणक परीक्षा (MSCIT) एक वर्षाचे कालावधीत उत्तीर्ण करणे आवश्यक होते. या कालावधीत जे कर्मचारी वरील परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत त्यांची पुर्वीचे पदावर पदावनत करण्यात येईल, असे स्पष्ट नमुद आहे. संबंधीत कर्मचा-यांनी टंकलेखन परीक्षा व संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र सुध्दा सादर करण्यात आले नाही. असे असतांना त्यांना सेवेत कायम ठेवण्यात आले आहे. तसेच संबंधीत कर्मचा-याची वैद्यकीय तपासणी व पोलिस विभागा कडील चारित्र्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन तशी सेवापुस्तकात नोंद घेण्यात आली नाही. पदोन्नती आदेशातील अट क्र.5 नुसार शासनाचे नगर विकास विभाग पत्र क्र. संकिर्ण 1007/स.क्र. 657/नवि-24 /26दि.26.09.2007 मध्ये नमुद केल्याप्रमाणे सेवाप्रवेश नियमातील अटीस अधिन राहून करण्यात आली आहे. त्यानुसार पदोन्नत झालेल्या कर्मचा-यांनी तीन महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते. परंतु जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात नाही. प्रथम पदोन्नतीच्या अटी व शर्ती पुर्ण होत नसताना त्याना पदावनत करण्याऐवजी आदेश क्र.अमनपा/साप्रवि/आयु/2495/13 दि.25.09.2013 नुसार वेतनश्रेणी 5200-20200 ग्रेड-पे 2400 मध्ये वरिष्ठ लिपीक पदावर पदोन्नती दिली. त्यामुळे श्री. गोहर यांची पदोन्नती नियमबाहय ठरते.

DRAFT

5. <u>श्री. जि. एन. अटल कनिष्ठ अभियंता</u>

श्री. जि. एन. अटल यांची मनपा आदेश दि.23.08.1984 नुसार कनिष्ठ अभियंता पदावर नियुक्ती केली. 5व्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी 6500-200-10500 मध्ये दि.1.01.2006 ला रु.10500/- वेतन घेत होते. संबंधीतास वरिष्ठ वेतनश्रेणी 8000-13500 लागू झाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 6व्या वेतन आयोगानुसार दि.1.01.2006 ला वेतनबँड 9300-34800 ग्रेड-पे 5400 मध्ये दि.1.01.2006 ला वेतननिश्चिती करतांना रु.10500 x1.86=रु.19530/- वेतननिश्चिती करावयाची असताना रु.11300/- इतके वेतन विचारात घेवून (11300x1.86)= रु.21020/- वर वेतननिश्चिती करण्यात आली. दि.1.01.2006 ला केलेल्या वेतननिश्चिती परिगणना विवरणपत्रावर कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी नाही. त्यामुळे दि.1.01.2006 ला केलेली वेतननिश्चितीची पडताळणी करुन अनुपालन करावे.

दि.1.01.2005, 1.01.2006 व दि.1.01.2010 च्या वेतनवाढी मंजूर नाही. असे असतांना वेतनवाढी लागू करुन वेतनाची अदायगी करण्यात आली आहे. तेव्हा वेतनवाढीस मंजूरी घेवून वेतनवाढी नियमित करण्यात याव्यात.

श्री. जी.एम. अटल कनिष्ठ अभियंता यांनी पुढील कालावधीत अर्जीत रजा उपभोगल्या असून नमूद कालावधीतील उपभोगलेल्या अर्जित रजा सक्षम प्राधिका-यांनी मंजूर केल्या नसतांनाही वेतनाचे प्रदान करण्यात आले.

अर्जित रजा दि.24.01.2005 ते 4.02.2005 = 12 दिवस
दि.13.06.2005 ते 17.06.2005 = 5 दिवस
दि.21.12.2005 ते 23.12.2005 = 3 दिवस
दि. 3.5.2007 ते 5.05.2007 = 3 दिवस
दि.30.07.2007 ते 13.08.2007 = 15 दिवस
दि.30.04.2008 ते 3.05.2008 = 4 दिवस

उपरोक्त कालावधीत उपभोगलेल्या अर्जित रजा सक्षम प्राधिकारी यांचेकडून मंजूर करून तशा नोंदी रजा मंजूरी आदेशासह सेवापुस्तकात घेण्यात याव्यात.

6. <u>श्री. एस. बी. पकडे वरिष्ठ लिपीक</u>

श्री. एस. बी. पकडे यांची नियुक्ती मनपा आदेश क्र.609/84 दि.15.10.1984 नुसार वेतनश्रेणी 950-20-1150 दरो 25-1500 मध्ये कनिष्ठ लिपीक पदावर करण्यात आली. दि.1.10.1992 ला रु.1150 वर दक्षता रोध मंजूरी आदेशाची नोंद सेवापुस्तकात नाही, असे असतांना दि.1.10.1993 व 1.10.1 994 च्या वेतनवाढी मंजूर करण्यात आल्या. म.ना.से. (वेतन) नियम 1981 मधील नियम 37 नुसार सक्षम प्राधिकारी दक्षता रोध मंजूर करणार नाही तोपर्यंत पुढील वेतनवाढी देय ठरत नाही.

DRAFT

मनपा आदेश क्र.अमनपा/साप्रवि/2162/11 दि.19.09.2011 नुसार श्री. पकडे क.लि. यांना वेतनबँड 5200-20200 ग्रेड-पे 2400 मध्ये तात्पुरत्या स्वरुपात 6 महिने कालावधीसाठी पदोन्नती देण्यात आली. 6 महिने कालावधीनंतर नियमित पदोन्नतीचे आदेश काढून वरिष्ठ पदावर कायम करणे आवश्यक होते. परंतु नियमित पदोन्नतीचे आदेश न काढता वरिष्ठ पदावर कायम ठेवून वरिष्ठ पदावरील वेतनश्रेणीनुसार वेतनाची अदायगी करण्यात आली. संबंधीत कर्मचा-याचे बाबतीत नियमित पदोन्नतीचे आदेश काढून पदोन्नती नियमित करुन पदोन्नती मंजूरी आदेशाच्या नोंदीसह सेवापुस्तक अदयावत करावे.

7. <u>श्री. मंगेश बी. जाधव वरिष्ठ लिपीक, भांडार विभाग</u>

श्री. मंगेश बी. जाधव यांची नियुक्ती मनपा आदेश क्र. अमनपा/साप्रवि/उप-2394/07 दि.14. 12.2007 नुसार अनुकंपा तत्वावर भ.ज.(ब) अंतर्गत वेतनश्रेणी रु.3050-4590 मध्ये कनिष्ठ लिपीक पदावर करण्यात आली. सेवापुस्तकाची पडताळणी केली असता पुढीलप्रमाणे त्रृटया आढळल्या.

(अ) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र.16 नुसार कर्मचा-याची वैद्यकीय दृष्टया तपासणी झाली आहे आणि तो सेवेस पात्र आहे, असे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्याविषयीची नोंद सेवापुस्तकात घेणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारची नोंद सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठावर नाही.

(ब) पोलीस विभागाकडून पडताळणी झाली नाही. सेवापडताळणी अभिलेख अदयावत नाही. तसेच संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण केल्याची नोंद सेवापुस्तकात नाही.

(क) मनपा आदेश क्र.अमनपा/साप्रवि/आयु/2666/13 दि.09.10.2013 नुसार वेतनबँड 5200-20200 ग्रेड-पे 2400 मध्ये वरिष्ठ पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आली. परंतु याबाबत नियमित पदोन्नतीचे आदेश न काढता दि.9.10.2013 पासून त्याच पदावर कायम ठेवण्यात आले. याप्रकरणी पात्र असल्यास नियमित पदोन्नतीचे आदेश काढून तात्पुरत्या पदोन्नतीवरील कालावधी नियमित करुन तशी नोंद सेवापुस्तकात घेण्यात यावी.

8. <u>श्रीमती नर्मदा सुरेश सोळंके, सहाय्यक क्षेत्रिय अधिकारी, आरोग्य विभाग</u>

श्रीमती. नर्मदा सुरेश सोळंके यांची मनपा ओदश क्र.अमनपा/साप्रवि/1202/04 दि.10.06.2004 नुसार वेतनश्रेणी 2550-3200 मध्ये कुली या पदावर दि.10.06.2004 पासून नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर मनपा आदेश क्र.अमनपा/साप्रवि/आयुक्त/3887-08 दि.21.11.2008 नुसार वेतनश्रेणी 3050-4590 मध्ये कनिष्ठ लिपीक पदावर आदेशातील पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून पदोन्नती देण्यात आली.

(अ) मराठी टंकलेखन 30 व इंग्रजी टंकलेखन 40, एमएससीआयटी संगणक अहर्ता परिक्षा एक वर्षाचे कालावधीत उत्तीर्ण न केल्यास पदावनत करण्यात येईल. तसेच जात वैधता प्रमाणपत्र तिन महिन्याचे आत सादर करणे आवश्यक आहे. परंतु नऊ वर्षाचा कालावधी लोटूनही जात वैधता प्रमाणपत्र व MS-CIT संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याबाबतची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही. तसेच पदोन्नतीच्या पदावरील

DRAFT

वेतननिश्चितीची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही. पदोन्नती आदेशातील अटी व शर्तीची पुर्तता करण्यात आली नसतांनाही पदोन्नतीचे पदावर कायम ठेवण्यात आल्याचे दिसून येते. तेव्हा पदोन्नती आदेशातील अटी व शर्तीची पुर्तता करुन नियमानुसार कार्यवाहीसह अनुपालन करावे.

(ब) मनपा पदोन्नती आदेश क्र.अमनपा/साप्रवि/आयु/2666/13 दि.8.10.2013 नुसार वरिष्ठ लिपीक पदावर वेतनबँड रु.5200-20200 ग्रेड-पे 2400 मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आली. सदर पदावर नियमित पदोन्नतीचे आदेश न काढता मनपाने पदोन्नती ओदश क्र.अमनपा/साप्रवि/ आयु/893/15 दि.27.04 .2015 नुसार सहाय्यक क्षेत्रिय अधिकारी या पदावर वेतनबँड 9300-34800 ग्रेड-पे 4200 मध्ये पदोन्नती देण्यात आली.

वरिष्ठ लिपीक पदावरील पदोन्नती आदेशातील अटी व शर्तीची पुर्तता करुन तसेच नियमित पदोन्नतीचे आदेशासह सेवापुस्तकात आवश्यक त्या नोंदी घेण्यात याव्यात. त्याचप्रमाणे सहाय्यक क्षेत्रिय अधिकारी या पदावरील पदोन्नती आदेशातील अटी व शर्तीची पुर्तता करण्यात यावी.

DATDUBM6401 (Ref No : 10)

150 शिक्षण विभागाने शाळा इमारत भाडयाचे केलेले अतिप्रदान व आकस्मिक खर्चाचे मंजूरीतील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :239 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 853321.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 599588.00/-

महानगरपालिका अमरावतीच्या सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान मनपाच्या शिक्षण विभागाच्या आकस्मिक खर्च व शाळा इमारतीचे भाडे प्रदान इत्यादी देयकाची व खर्च नोंदवहीची पडताळणी केली असता आकस्मिक निधीतून आगाऊ रक्कम मंजूर करताना मंजूर रकमेपेक्षा जादा रकमेचे प्रदान करणे तसेच खाजगी इमारत शाळेसाठी भाडयाने घेतलेल्या इमारतीचे प्रदान करताना दुबार प्रदान होणे तसेच एकाच प्रकारचा खर्च वेगवेगळया लेखा शिर्षात खर्ची टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले.

महानगरपालिका अमरावतीने मनपाच्या शाळेकरीता स्वत:च्या मालकीची इमारत उपलब्ध नसल्याने शाळेसाठी खाजगी इमारती भाडे तत्वावर घेतल्या आहे. सदर खर्चाकरीता अंदाजपत्रकात लेखाशिर्ष 239 अंतर्गत सन 2014-15 या आर्थिक वर्षाकरीता रु.5 लक्ष तरतूद करण्यात आली असून खर्च 853321/- एवढा करण्यात आला. मंजूर तरतूदीपेक्षा जादा खर्च झाला असल्याने अतिरिक्त खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 101 नुसार स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक असून

त्यास मंजूरी न घेणे, आयुक्ताव्दारा मंजूर रकमेपेक्षा जादाचे प्रदान करणे, एकाच प्रकारचा खर्च वेगवेगळया लेखाशिर्षात खर्ची टाकून दुबार प्रदान करणे तसेच दुबार देयक प्रतीबंध नोंदवही न ठेवणे इत्यादी अनियमितता आढळून आल्या आहेत.

याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत:-

1. स्वातंत्र्यदिन 15 ऑगस्ट चे कार्यक्रमाकरीता आयुक्त मनपा व महापौर यांचे हस्ते मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात करीता रु.4000/- एवढया अग्रिम रकमेस आयुक्त मनपा यांनी दि.12.08.2014 ला मंजूरी दिली. अग्रीम राशी रु.4000/- सौ. चित्रा खोब्रागडे शाळा निरिक्षक शिक्षण विभाग मनपा अमरावती यांना मंजूर करण्यात आली असल्याचे नस्तीत नमूद आहे. परंतु प्रमाणक क्र.3755 दि.13.08.2014 नुसार धनादेश क्र.496498 दिनांक 13.08.2014 नुसार रु.5000/- चे प्रदान करण्यात आले. आयुक्त मनपा यांची रु.4000/- एवढया अग्रिमास मंजूरी असताना रु.5000/- चे प्रदान करण्यात आले. तसेच देयकाची तपासणी केली असता देयकावर प्रदानार्थ मंजूरी नाही. सदर खर्चाबाबत अनुदान नोंदवहीत लेखाशिर्ष 236 अंतर्गत खर्चाची नोंद नाही. तसेच रु.5000/- एवढया रकमेच्या खर्चाची देयके नस्तीत आढळून आली नाही.

2. शाळा इमारत भाडे ले.शि.239 अंतर्गत मुळ तरतूद रु.500000/- असून खर्च 853321/- एवढा झाला आहे. मुळ तरतूदीपेक्षा जादा खर्चास स्थाची समितीची मंजूरी घेतल्याचे दिसून येत नाही. अनुदान नोंदवहीनुसार लेखाशिर्ष 236 आकस्मिक खर्च अंतर्गत सै.हसन सै. फारुख यांना गवळीपुरा शाळा इमारत भाडे रु.548938/- चे प्रदान दि.31.10.2014 ला करण्यात आले. तसेच तेवढयाच रकमेचे प्रदान लेखाशिर्ष 239 शाळा इमारत भाडे अंतर्गत सै.हसन सै. फारुख यांना गवळीपुरा शाळेचे इमारत भाडे रु.548938/- प्रदान करण्यात आले. एकाच प्रकारचा खर्च दोन लेखाशिर्षात खर्ची पडला असल्याने दुबार प्रदान झाल्याचे दिसून येत आहे. याबाबत सखोल तपासणी करुन अनुपालन करावे.

शाळेच्या भाडयापोटी रु.10659/- प्रती महिना फरकाची रक्कम एकूण 42 महिन्याची थकबाकी रु.447678/- व माहे मे व सप्टें. 2014 चे भाडे रु.25305/- प्रमाणे रु.50610/- असे एकूण रु.498288/- चे प्रदान करावयाचे असतांना रु.548938/- प्रदान करण्यात आल्याने रु.50650/- चे अतिप्रदान झाल्याचे खर्च नोंदवहीवरुन दिसून येते. रु.548938/- चे दुबार प्रदान व रु.50650/- चे अतिप्रदान असे एकूण रु.599588/- अतिप्रदान झाल्याचे आढळून आल्याने याबाबत अर्धसमास पत्र क्र.229 दिनांक 13.07.2018 नुसार दुबार देयक प्रतीबंध नोंदवही, खर्चाची प्रमाणके व नमूद मुद्यावरील खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले होते. परंतु मागणी केलेले अभिलेख, नोंदवहया व खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास सादर करण्यात आली नाही. त्यामुळे संबंधीताकडून अतिप्रदानाची रक्कम रु.599588/- वसुल करुन अनुपालन करावे.

DATDUBM6401 (Ref No : 229)

152 जिल्हापरीषदेकडून समायोजनाने मनपाकडे वर्ग झालेल्या शिक्षकांच्या संबंधाने जिल्हापरीषदेकडून सेवानिवृत्ती अंशदान प्राप्त न करणे व प्रदानातील इतर त्रृटयांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :237 महानगरपालिका स्व-निधी निधी
अनियमितता कलम : 9ब

मनपाच्या आस्थापनेवरून सेवानिवृत्त कर्मचा-यांना निवृत्तीवेतन व उपदान रकमेचे प्रदान करणापुर्वी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियम 29, 67 मधील प्रमाणशीर अंशदान विषयक तरतूदीचे पालन झाले नसल्याचे निदर्शनास आले. जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरून समावेशनाने वर्ग झालेल्या शिक्षकाचे सेवानिवृत्ती अंशदान मनपाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त केलेले नाही. तसेच मनपाच्या शिक्षण विभागातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांचे बाबतीत उपदानाचे प्रदान करताना रितसर आदेश काढून कर्मचा-यांची एकूण झालेली अर्हताकारी सेवा, शेवटचे वेतन नोंदवून तसेच नादेय प्रमाणपत्र व ना-चौकशी प्रमाणपत्र घेवूनच प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारचे परिपुर्ण आदेश शिक्षण विभागाने न काढताच प्रदान करण्यात आले.

महानगरपालिका अमरावती अंतर्गत शिक्षण विभागातून सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांना सेवानिवृत्ती विषयक लाभाचे मनपानिधीतून प्रदान करण्यात येते. मनपा अंतर्गत शिक्षण विभाग स्वतंत्र आस्थापना असल्याने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे सेवानिवृत्तीनंतरचे लाभ जसे निवृत्तीवेतन, कुटुंब निवृत्तीवेतन, सेवा उपदान, सेवा-नि-मृत्यू उपदान व रजा रोखीकरण(शिक्षकेत्तर कर्मचारी) अदा करताना नियमानुसार सर्व प्रकारचे प्रदानासंबंधी शिक्षण विभागाचे प्रमुखाने रितसर आदेश काढून लाभ अदा करणे आवश्यक आहे. परंतु देयकाची पडताळणी केली असता तसे आदेश मनपाच्या शिक्षण विभागाकडून काढण्यात येत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे निवृत्ती वेतन, उपदान व रजारोखीकरण यात अतिप्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत:-

1. शिक्षण विभागातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना उपदानाचे प्रदान करण्यात आलेल्या देयकाची पडताळणी केली असता शिक्षणाधिकारी यांनी उपदान रकमेच्या प्रदानासंबंधी मंजूरीचे आदेश काढून त्यात कर्मचा-यांचे शेवटचे वेतन, त्याची एकूण अर्हताकारी सेवा नमूद करुन देय उपदान रकमेची परिगणना करुन मंजूरी आदेश, नादेय प्रमाणपत्र, ना-चौकशी प्रमाणपत्र नोंदवूनच देयक मनपाच्या लेखा शाखेकडे सादर करणे आवश्यक आहे. परंतु अशा आवश्यक बाबीची पुर्तता न होताच लेखा शाखेकडून प्रदान करण्यात येत असल्याचे दिसून येते. उदाहरणादाखल प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) श्री. परसराम गेमनदान मनुजा से. नि. प्राथ. सहा. शिक्षक
(ब) सौ. सिंधुबाई रामदास गौतम से. नि. प्राथमिक मुख्यध्यापक

(क) सौ. शिरिन कौसर आगा खॉ से. नि. प्राथमिक सहा. शिक्षक
(ड) श्री.शब्बीर सै. मुनाफ से. नि. सहा. शिक्षक
(इ) सौ. कनिज फातूमा नासीर खान से. नि. प्राथ. सहा. शिक्षक

या प्रकरणी अर्धसमास पत्र क्र. 210 दि.22.06.2018 नुसार सेवानिवृत्ती प्रकरणे व सेवापुस्तके लेखापरिक्षणास सादर करण्यात आली नाही.

2. श्री. रफिक उल्लाह खान रहमत खान सेवानिवृत्त प्राथमिक मुख्याध्यापक हे जिल्हापरिषद अमरावती यांचे आस्थापनेवरील नियुक्त शिक्षक होते. त्यांचा सेवेचा काही कालावधी हा जिल्हापरिषदेच्या शाळेवर व्यतीत झाला असून त्यांना महानगरपालिकेच्या शाळेवर सामावून घेतले आहे. त्यांना सेवानिवृत्तीनंतरचे निवृत्तीवेतन व सेवाउपदानाचे प्रदान मनपा स्वनिधीतून अदा करण्यात येत असल्याचे दिसते.

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवानिवृत्तीवेतन) नियम 1982 चे नियम 29 नुसार कर्मचा-याच्या निवृत्तीवेतनार्ह सेवेचा भाग एकत्रित निधीतून आणि काही भाग स्थानिक निधीतून निवृत्तीवेतन दिले जाण्यास पात्र असतो तेव्हा त्याच्या निवृत्तीवेतनाची रक्कम सेवाकालावधीच्या प्रमाणात आकारण्यात येते. म्हणजेच एकत्रित निधी (जिल्हा परिषद) व स्थानिक निधी यांमध्ये निवृत्तीवेतनाची विभागणी करावयाचे आवश्यक असल्याने जिल्हापरिषदेच्या आस्थापनेवरील सेवाकालावधीचे सेवानिवृत्ती अंशदान मनपाकडे जमा करणे आवश्यक होते. परंतु सेवानिवृत्ती अंशदान जमा करुन न घेताच निवृत्तीवेतन व उपदानाचे प्रदान करण्यात येत आहे. त्यामुळे मनपा निधीवर अकारण भार पडत असल्याचे दिसते. याबाबत अर्धसमास पत्र क्र. 210 दि.22.06.2018 नुसार अभिलेख, सेवापुस्तकासह खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले होते. परंतु सेवापुस्तक व खुलासा प्राप्त झाला नाही.

3. श्री. खान (क्र.2 वरील) यांना उपदानाचे प्रदान दोन टप्प्यात करण्यात आले असून उपदानातून कपात करण्यात आलेल्या वजातीच्या रकमेसह पुर्ण रकमेला प्रमाणक क्रमांक देणे आवश्यक असताना निव्वळ देय रकमेला प्रमाणक क्रमांक देण्यात आल्याने अचुक लेखांकनाच्या दृष्टीने केलेली कार्यवाही चुकीची दिसून येते.

DATDUBM6401 (Ref No : 210)

DRAFT

कलम ९ क खालील आक्षेप

DRAFT

142 मनपा शाळेतील वर्ग 1 ते 10 पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिता डेस्क व बेंच खरेदीतील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 16

लेखा शीर्ष :360 शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9क

गुंतलेली रक्कम रु. 3999910.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1723260.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 871290.00/-

सुवर्ण जयंती शहरी रोजगार या विभागाने C D S मार्फत मनपा शाळेतील वर्ग 1 ते 4 व वर्ग 5 ते 10 करीता डेस्क-बेंच खरेदी करण्याकरीता प्रकल्प संचालक मनपा अमरावती यांचे पत्र क्र. 236/14 दि. 26.03.2014 नुसार समुदाय संस्थाकडून रु.39.50 लक्ष एवढा निधी उपलब्ध करून दिल्याचे मनपा आयुक्ताना कळविण्यात आले. भांडार विभागाने नस्तीत नमूद केल्यानुसार वनश्री मार्केटिंग, अमरावती यांच्यासोबत दि.21.11.2013 पासून 1 वर्षापर्यंत दरकराराप्रमाणे मनपा पुरवठा आदेश क्र.248 दिनांक 29.03.2014 नुसार मनपाच्या शाळेतील वर्ग 1 ते 4 करीता 358 नग व वर्ग 5 ते 10 करीता 367 नग डेस्क-बेंचची मागणी केली. भांडार विभागाकडील साठा नोंदवही व शिक्षण विभागाकडील साठा नोंदवहीनुसार खरेदी केलेले डेस्क-बेंच व शाळांना वाटप केलेले डेस्क-बेंच यात तफावत आढळून आली. भांडार विभागाकडून प्राप्त नस्तीनुसार खरेदी केलेल्या डेस्क-बेंचचे पुर्ण वाटपच झाले नसून वाटप झाल्याचे दाखविण्यात आले. सन 2013-14 मध्ये वाटप केलेले डेस्क-बेंचसुध्दा सन 2014-15 मध्ये वाटप केल्याचे दर्शविण्यात आले. भांडार विभागाने खरेदी केलेल्या डेस्क-बेंचच्या साहित्य वाटपात अपहार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

मनपा अमरावतीचे प्राथमिक शाळा व उच्च प्राथमिक शाळेतील वर्ग 1 ते 4 विद्यार्थ्यांकरीता 358 नग व वर्ग 5 ते 10 चे विद्यार्थ्याकरीता 367 डेस्क-बेंच खरेदी करण्याकरीता खालील नमुद समुदाय संस्थाकडून खालीलप्रमाणे रु.39.50 लक्ष एवढा निधी प्राप्त झाला आहे.

अ.क्र.	निधी पुरविण्या-या संस्थेचे नाव	निधी मंजूरी आदेश व दिनांक	प्राप्त निधी
1	सावित्रीबाई फुले समुदाय विकास समिती	पत्र क्र.239/14 दि.21.032014	रु.10.50 लक्ष
2	रमाबाई आंबेडकर समुदाय विकास समिती	पत्र क्र.233/14 दि.25.03.2014	रु. 2.50 लक्ष
3	संबोधी समुदाय विकास समिती	पत्र क्र.230/14 दि.21.03.2014	रु. 4.00 लक्ष
4	समुदाय विकास समिती क्रं. 2	पत्र क्र.229/14 दि.21.03.2014	रु.10.50 लक्ष
5	कल्याणी समुदाय विकास समिती	पत्र क्र.228/14 दि.21.03.2014	रु.12.00 लक्ष
		एकूण	रु.39.50 लक्ष

मनपा स्थायी समिती ठराव क्र.166 दि.16.11.2013 नुसार शिक्षण विभागास लागणारे खेळ साहित्य व इतर साहित्य खरेदी करण्यास वाटाघाटीअंती वनश्री मार्केटिंग, अमरावती यांच्या कमी दराच्या निविदेस मंजूरी प्रदान केली. नस्तीची पडताळणी केली असता भांडार विभाग प्रमुखाने कल्याणी समुदाय विकास समितीकडून प्राप्त निधीतून वर्ग 1 ते 4 साठी 93 नग व वर्ग 5 ते 10 साठी 123 नग डेस्क-बेंच पुरविल्याचे दर्शविले असून शिक्षणाधिकारी, मनपा यांनी प्राथमिक शाळेसाठी 10 नग व उच्च प्राथमिक शाळेशाठी 48 नग डेस्क-बेंच प्राप्त झाल्याचे प्रमाणित केले आहे.

यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत:-

1. मनपा स्थायी समिती ठराव क्र.166 दि.16.11.2013 नुसार वनश्री मार्केटिंग, अमरावती यांचेसोबत दिनांक 21.11.2013 पासून एक वर्षासाठी केलेल्या दरकरारानुसार डेस्क-बेंचची खरेदी करण्यास मंजूरी दिली. परंतु डेस्क-बेंचचे दराबाबत नस्तीत उल्लेख नाही. भांडार विभागाचा पुरवठा आदेश क्र.248 दि.29.03.2014 नुसार वर्ग 1 ते 4 साठी 358 डेस्क-बेंच व वर्ग 5 ते 10 साठी 367 डेस्क-बेंचची मागणी करण्यात आली. परंतु डेस्क-बेंचच्या खरेदीच्या अनुषंगाने मनपाचे ठरावाची प्रत व वनश्री मार्केटिंगसोबत केलेल्या दरकराराची प्रत नस्ती आढळून आली नाही. त्यामुळे केलेली खरेदी ही दरकरारानुसारच केल्याचे स्पष्ट होत नाही.

2. शाळानिहाय डेस्क-बेंचच्या आवश्यकतेबाबतचे मागणीपत्र नस्तीत आढळून आले नाही. भांडार विभागाकडील साठा नोंदवहीची पडताळणी केली असता डेस्क-बेंच प्राप्त झाल्याची तसेच कोणत्या शाळेस पुरविण्यात आले याबाबतची नोंद घेण्यात आली नाही. त्यामुळे वनश्री मार्केटिंग, अमरावती यांचेकडून खरेदी केलेले डेस्क-बेंच प्रत्यक्षात प्राप्त झाले किंवा नाही, याबाबत खात्री होत नाही.

3. महानगरपालिका अमरावतीच्या शिक्षण विभागासाठी भांडार विभागाने वर्ग 1 ते 4 करीता 255 नग डेस्क-बेंच रु.4590/- प्रती नग दराने रु.11,70,450/- व वर्ग 5 ते 10 करीता 160 नग डेस्क-बेंच रु.6280/- प्रती नग दराने रु.10,04,800/- प्रमाणे प्रमाणक क्रमांक 4475 दि.2.09.2014 रु.21,83,020/- ला खरेदी केली. याबाबतची नोंद भांडार विभागाकडील साठा नोंदवहीच्या पृष्ठ क्र.155 वर आहे. परंतु खरेदी केलेले डेस्क-बेंच कोणत्या शाळेंना वाटप केली याबाबतची नोंद साठा नोंदवहीत घेतली नाही. त्यामुळे खरेदी केल्याचे दर्शविलेले डेस्क-बेंचचे वाटप झाल्याची खात्री होत नाही.

4. वनश्री मार्केटिंग, दस्तूरनगर अमरावती यांचे पत्र दि. निरंक (दिनांक नसलेले) नुसार वर्ग 1 ते 4 साठी 357 नग व वर्ग 5 ते 10 साठी 376 नग पुरविल्याचे रु.39,99,910/-चे देयक मनपास सादर केले. सदर पत्राची नोंद आवक नोंदवहीत घेण्यात आली नाही. तसेच वनश्री मार्केटिंग, अमरावती यांचे बिल क्र.81 दि. निरक चे रुपये 39,99,910/- चे प्राप्त झाले असून प्राप्त बिलावर कार्यालय प्रमुखाची प्रदानार्थ मंजूरी व साहित्य चांगल्या स्थितीत प्राप्त झाले असून साहित्याची नोंद साठा नोंदवहीच्या अमूक पृष्ठावर घेण्यात आल्याचे प्रमाणित केले नाही. पुरवठा आदेश क्र.248 दि.29.03.2014 चे पुरवठा आदेशावरील रकान्यामध्ये साहित्य चांगल्या स्थितीत प्राप्त झाल्याबाबत भांडार प्रमुखाची स्वाक्षरी नाही. परंतु छायांकित प्रतीवर पुरवठादारानेच साहित्य चांगल्या स्थितीत प्राप्त झाल्याबाबत

स्वाक्षरी केली आहे. त्यामुळे खरेदी केलेले साहित्य प्रत्यक्षात प्राप्त न होताच प्रदान केल्याचे दिसून येते

5. मनपाचा सुधारित पुरवठा आदेश क्र. 111 दि.25.08.2014 नुसार शिक्षण विभागाकरीता वर्ग 1 ते 4 करीता 358 नग व वर्ग 5 ते 10 करीता 367 नग डेस्क-बेंच पुरविण्याबाबत वनश्री मार्केटिंग अमरावती यांना साहित्य पुरविण्याबाबत आदेश देण्यात आले असून पुरवठा आदेश क्र.248 दि.29.03.2014 रद्द करण्यात येत असल्याचे कळविण्यात आले. परंतु भांडार विभागाचे पत्र क्र.अनपा/भा.वि./88/2014 दि.30.07.2014 नुसार प्रकल्प संचालक, सुवर्ण जयंती विभाग, मनपा अमरावती यांना लिहिलेल्या पत्रानुसार कल्याणी समुदाय विकास समिती यांनी दिलेल्या यादीनुसार वर्ग 1 ते 4 करीता 112 नग व वर्ग 5 ते 10 करीता 117 नग डेस्क-बेंच पुरविण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे. म्हणजे सुधारित मागणी आदेशाच्या दिनांकापुर्वीच वाटप झाल्याचे दिसते. वरिल सर्व बाबीचा विचार करता डेस्क-बेंचची खरेदी प्रक्रियाच संशयास्पद असल्याचे दिसून येते.

6. प्रकल्प संचालक, मनपा अमरावती यांचे पत्र क्र.अमनपा/सुजयो/417/2014 दि. 20.08.2014 नुसार शिक्षणाधिकारी, मनपा अमरावती यांना लिहिलेल्या पत्रामध्ये भांडार विभागामार्फत वर्ग 1 ते 4 करीता 357 नग व वर्ग 5 ते 10 करीता 376 नग डेस्क-बेंच पुरविण्यात आल्याने याबाबतचा अहवाल सादर करण्यास सुचविले होते. परंतु भांडार प्रमुखाची स्वाक्षरी असलेल्या विवरणपत्रानुसार वर्ग 1 ते 4 करीता 358 नग व वर्ग 5 ते 10 करीता 367 नग डेस्क-बेंच पुरविण्यात आल्याचे नमूद आहे.

अ. क्र.	C.D.S. संस्थेचे नाव व युनिट क्र.	खरेदी करुन देण्यात आलेले डेस्क-बेंच	
		वर्ग 1 ते 4 करीता	वर्ग 5 ते 10 करीता
1	सावित्रीबाई फुले समुदाय विकास समिती युनिट क्र. 5	100 नग	94 नग
2	रमाबाई आंबेडकर समुदाय विकास समिती युनिट क्र. 3	20 नग	25 नग
3	संबोदी समुदाय विकास समिती युनिट क्र. 6	45 नग	31 नग
4	समुदाय विकास समिती युनिट क्रं. 2	100 नग	94 नग
5	कल्याणी समुदाय विकास समिती युनिट क्र.1	93 नग	123 नग
	एकूण	358 नग	367 नग

प्रकल्प संचालक, अमरावती यांचे दि.20.08.2014 चे पत्र व भांडार विभाग प्रमुखाचे स्वाक्षरी असलेले विवरणपत्र यातील आकडेवारीत तफावत आहे.

7. मनपा उर्दु प्राथमिक कन्या शाळा क्र.3 जुनी वस्ती बडनेरा या शाळेस दि.26.12.2013 ला 20 नग डेस्क-बेंच पुरविण्यात आल्याबाबत शिक्षण विभागाकडील साठा नोंदवहीत नोंद आहे. परंतु शाळेच्या

मुख्याध्यापकानी दि.26.12.2014 ला डेस्क-बेंच प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षरी केली आहे. तसेच मनपा मराठी प्राथमिक शाळा क्र.21 महादेवखोरी, अमरावती या शाळेस दि.26.12.2013 ला 40 नग डेस्क-बेंच पुरविण्यात आल्याबाबत शिक्षण विभागाकडील साठा नोंदवहीत नोंद आहे. परंतु शाळेच्या मुख्याध्यापकांनी दि.26.12.2014 ला डेस्क-बेंच प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षरी केली आहे. मनपाचा सुधारित पुरवठा आदेश क्र. 111 दि.25.08.2014 नुसार शिक्षण विभागाकरीता वर्ग 1 ते 4 करीता 358 नग व वर्ग 5 ते 10 करीता 367 नग डेस्क-बेंच पुरविण्याबाबत वनश्री मार्केटिंग अमरावती यांना आदेश देण्यात आले असून त्यानुसार पुरवठादाराकडून डेस्क-बेंच पुरवठा माहे ऑगस्ट-2014 नंतरच केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे शिक्षण विभागाकडील साठा नोंदवहीत नोंद घेतलेल्या 130 नग डेस्क-बेंच वाटप सन 2013-14 मध्ये केले असतांनासुध्दा माहे ऑगस्ट-2014 नंतर प्राप्त झालेल्या साठ्यातून वाटप केल्याचे दर्शविले आहे. त्यामुळे 130 नग डेस्क-बेंच इ. साहित्याचा अपहार होण्याची शक्यता असल्याने **सदर बाब लेखापरीक्षण पथकाकडील गोपनीय पत्र क्र.स्था-8/ब/मनपालेप/अमरावती/33/2018 दि.13.07.2018 नुसार आयुक्त मनपा अमरावती यांचे निदर्शनास आणून देण्यात आली आहे.**

8. मनपाच्या भांडार विभाग प्रमुखानी प्रकल्प संचालक, सुवर्ण जयंती विभाग मनपा अमरावती यांना सादर केलेल्या अहवालासोबत जोडलेल्या पोचपावतीच्या छायांकित प्रतीनुसार शाळांना डेस्क-बेंच पुरविल्याचे दर्शविले असून शाळा मुख्याध्यापकांनी डेस्क-बेंच प्राप्त झाल्याची पोच दिली आहे. परंतु शिक्षण विभागाकडील साठा नोंदवहीतील पृष्ठ क्र. 97 ते 100 वर संबंधीत शाळांना डेस्क-बेंचचा पुरवठाच झाला नसल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रत्यक्षात डेस्क-बेंच न पुरवता शाळांना डेस्क-बेंच पुरविण्यात आल्याचे दर्शविले आहे. तसेच अहवालासोबत सादर केलेल्या पोचपावत्या व त्यावरील मुख्याध्यापकांच्या स्वाक्ष-या खरी असल्याची खात्री होत नाही. डेस्क-बेंच पुरविण्यात आलेल्या शाळेची साठा नोंदवही तपासणीस सादर करण्यात आली नाही. नमुन्यादाखल प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत.

मनपा शाळेचे नाव	भांडार विभागाचे पोचपावतीनुसार पुरविण्यात आलेले डेस्क-बेंचची नोंद		शिक्षण विभागाकडील नोंदवहीनुसार डेस्क-बेंचची संख्या	
	वर्ग 1 ते 4	वर्ग 5 ते 10	वर्ग 1 ते 4	वर्ग 5 ते 10
उच्च प्राथमिक शाळा क्र.13, दस्तूरनगर, अमरावती	14 नग	--	निरंक	--
प्राथमिक मराठी शाळा क्र.6, खरकाडीपुरा, अमरावती	20 नग	--	10 नग (10नग जास्त)	--
प्राथमिक मराठी कन्या शाळा, भाजीबाजार, अमरावती	21 नग	--	निरंक	--
प्राथमिक मुलांची शाळा क्र.1, भाजीबाजार, अमरावती	21 नग	--	निरंक	--

उच्च प्राथमिक शाळा नमुना, अमरावती	--	5 नग	--	निरंक
उच्च प्राथमिक शाळा बुधवारा, अमरावती	--	20 नग	--	निरंक
उच्च प्राथमिक हिंदी/इंग्लीश शाळा क्र.11, खरकाडीपुरा	--	50 नग	--	निरंक
उच्च प्राथमिक हिंदी शाळा क्र.13, दस्तुरनगर, अमरावती	14 नग	--	निरंक	--
उच्च हिंदी प्राथमिक शाळा क्र.2 मसाजगंज, अमरावती	10 नग	--	20 नग (10नग जास्त)	--

प्राथमिक मराठी शाळा क्र.6, खरकाडीपुरा, अमरावती व उच्च हिंदी प्राथमिक शाळा क्र.2 मसाजगंज, अमरावती या शाळांना 10 नग डेस्क-बेंच वाटप केल्याबाबत पोचपावतीवरुन दिसून येते. परंतु शिक्षण विभागाकडील साठा नोंदवहीत संबंधीत शाळांना 20 नग डेस्क-बेंच वाटप केल्याचे नमूद असून नगाच्या संख्येत खाडाखोड केली आहे.

9. शिक्षण विभागाकडील साठा नोंदवहीची पडताळणी केली असता शिक्षणाधिकारी मनपा, अमरावती यांनी दि.27.02.2015 ला सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अंतर्गत भांडार विभागाकडून वर्ग 1 ते 4 करीता 285 नग व वर्ग 5 ते 10 करीता 292 नग डेस्क-बेंच प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षरी केली आहे. परंतु साठा नोंदवहीनुसार वर्ग 1 ते 4 करीता 279 नग व वर्ग 5 ते 10 चे वर्गांना 286 नग डेस्क-बेंचचे वाटप केल्याची नोंद असून आकडयावर पांढरी शाई लावून खाडाखोड केली आहे.

10. युनिट क्र.1 कल्याणी समुदाय विकास समिती अमरावती यांच्या करीता पुरविण्यात आलेल्या डेस्क-बेंचच्या संख्येत मोठया प्रमाणात तफावत दिसून येत असून अपहार झाल्याचे दिसून येते.

समुदाय विकास समिती, युनिट क्र.	भांडार विभागाने पुरविल्याचे दर्शविलेले डेस्क-बेंच		शाळेचे नाव	प्रत्यक्षात शाळेला प्राप्त झालेले डेस्क-बेंच	
	वर्ग 1ते 4	वर्ग 5 ते 10		वर्ग 1 ते 4	वर्ग 5 ते 10
कल्याणी समुदाय विकास समिती युनिट क्र.1	93 नग	123 नग	मनपा हिंदी मुलाची शाळा नेहरु मैदान	--	25 नग
			मनपा प्राथ.मराठी शाळा क्र.6 खरकाडीपुरा	10 नग	--
			मनपा प्राथ. मराठी मुलांची शाळा क्र.2	--	23 नग

			बुधवारा		
एकूण	93 नग	123 नग		10 नग	48 नग

शिक्षणाधिकारी, मनपा अमरावती यांची स्वाक्षरी असलेल्या विवरणपत्रानुसार प्रत्यक्षात वर्ग 1 ते 4 करीता 10 नग व वर्ग 5 ते 10 करीता 48 नग डेस्क-बेंच प्राप्त झाल्याचे प्रमाणित केले आहे. यावरुन वर्ग 1 ते 4 करीता 83 नग व वर्ग 5 ते 10 करीता 75 नग डेस्क-बेंच कमी पुरविण्यात आले असून रु.851970/- एवढया रकमेचा मुल्याचे डेस्क-बेंच पुरविण्यात आले नाही.

5) वर्ग 1 ते 4 करीता प्रती नग दर रु.4590/- X 83 नग = रु. 380970/-

ब. वर्ग 5 ते 10 करीता प्रती नग रु.6280/- X 75 नग = रु. 471000/-

एकूण रु. 851970/-

तसेच भांडार विभागाने वर्ग 1 ते 4 करीता 358 नग व वर्ग 5 ते 10 करीता 367 नग डेस्क-बेंच खरेदी केल्याचे दर्शविले असून शिक्षण विभागाकडील साठा नोंदवहीची पडताळणी केली असता (नोंदवहीचे पृष्ठ 97 ते 100) नुसार शाळानिहाय वर्ग 1 ते 4 करीता 279 नग वर्ग 5 ते 10 करीता 286 नग डेस्क-बेंच वाटप केल्याची नोंद आहे. त्यानुसार वर्ग 1 ते 4 करीता 79 नग व वर्ग 5 ते 10 करीता 81 नग डेस्क-बेंच कमी वाटप झाल्याचे दिसून येते.

अ. वर्ग 1 ते 4 करीता प्रती नग दर रु.4590/- X 79 नग = रु. 362610/-

ब. वर्ग 5 ते 10 करीता प्रती नग दर रु.6280/- X 81 नग = रु.508680/-

एकूण रु. 871290/-

उपरोक्त प्रकरणी सखोल चौकशी करुन रु.851970/- अधिक रु.871290/- अशी एकूण रु.17,23,260/- एवढया रकमेच्या साहित्य वाटपासंबंधी सखोल चौकशी करून अहवालासह अनुपालन सादर करावे.

11. सुवर्ण जयंती कार्यालयातील युनिट क्र.6 संबोधी समुदाय विकास समिती यांच्याकरीता वर्ग 1 ते 4 करिता 45 नग व वर्ग 5 ते 10 करीता 31 नग डेस्क-बेंच पुरविण्यात आल्याचे भांडार विभागाने नमूद केले आहे. शिक्षणाधिकारी प्रमाणित केलेल्या विवरणपत्रावर (छायाकिंत प्रत) डेस्क-बेंचच्या संख्येत खाडाखोड केली आहे. मुळ स्वाक्षरीची प्रत नस्तीत लागून नाही. त्यामुळे शिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी झाल्यानंतर संख्येत बदल केल्याची शक्यता नाकारता येत नाही. शिक्षण विभागातील प्रमाणित साठानोंदवही व शिक्षणाधिकारी यांच्या मुळ स्वाक्षरीच्या प्रती साक्षांकित प्रतीसह अनुपालन करावे.

12. सुवर्ण जयंती कार्यालयातील युनिट क्र.5 सावित्रीबाई फुले समुदाय विकास समिती यांच्याकरीता वर्ग 1 ते 4 करिता 100 नग व वर्ग 5 ते 10 करीता 94 नग डेस्क-बेंच पुरविण्यात आल्याचे भांडार विभागाने नमूद केले आहे. शिक्षणाधिकारी प्रमाणित केलेल्या विवरणपत्रावर (छायाकिंत प्रत) डेक्स-बेंचच्या संख्येत खाडाखोड केली आहे. मुळ स्वाक्षरीची प्रत नस्तीत लागून नाही. त्यामुळे शिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी झाल्यानंतर संख्येत बदल केल्याची शक्यता नाकारता येत नाही. शिक्षण विभागातील साठानोंदवही व शिक्षणाधिकारी यांच्या मुळ प्रतीच्या प्रमाणित छायाकिंत प्रतीसह अनुपालन करावे.

13. मनपा प्राथमिक शाळा क्र.4 अंबापेठ, मनपा प्राथमिक मराठी मुलांची शाळा क्र. 1 भाजीबाजार

व मनपा प्राथमिक मराठी मुलींची शाळा क्र.1 भाजीबाजार यांना डेस्क-बेंच पुरविण्यात आल्याचे नमुद केले आहे. परंतु त्या शाळांकडून साहित्य प्राप्त झाल्याची पोच लेखापरिक्षणादरम्यान आढळून आली नाही. शिक्षणाधिकारी मनपा, अमरावती यांनी प्रमाणित केलेल्या विवरणपत्रावर प्रकल्प संचालकाची स्वाक्षरी नाही. शिक्षणाधिकारी मनपा नागपूर यांचे अहवाल विवरणपत्र व शाळेच्या मुख्यध्यापकांच्या मुळ स्वाक्षरी असलेल्या पोचपावत्या लेखापरिक्षणास आढळून आलेल्या नाही. परंतु छायाकिंत प्रती नस्तीत लागून आहे. त्यामुळे विवरणपत्रावर व पोचपावतीवर असलेल्या स्वाक्ष-या शाळा प्रमुखांच्याच आहे, याबाबतची खात्री होत नाही.

14. शिक्षण विभागाकडील साठा नोंदवहीची पडताळणी केली असता वर्ग 5 ते 10 करीता वाटप केलेल्या संख्येत पांढरी शाई लावून खाडाखोड केली असून प्राथमिक शाळांनासुध्दा 5 ते 10 चे वर्ग नसतांना डेस्क-बेंच वाटप केल्याचे दर्शविले आहे.

मनपा शाळेचे नाव	शिक्षण विभागाकडील नोंदवहीनुसार डेस्क-बेंचची संख्या	
	वर्ग 1 ते 4	वर्ग 5 ते 10
प्राथमिक मराठी शाळा क्र.23 बडनेरा, अमरावती	5 नग	5 नग
प्राथमिक मराठी शाळा क्र.24 बडनेरा, अमरावती	20 नग	10 नग
प्राथमिक मराठी कन्या शाळा क्र.3 राजापेठ	6 नग	6 नग
प्राथमिक मराठी कन्या शाळा क्र.8 बडनेरा	10 नग	10 नग
प्राथमिक मराठी शाळा, वरुडा	15 नग	10 नग
प्राथमिक मराठी शाळा, निंभोरा	6 नग	6 नग
प्राथमिक उर्दु मुलांची शाळा क्र.10, बडनेरा	--	20 नग
प्राथमिक मराठी शाळा क्र.6 खरकाडीपुरा	10 नग	10 नग
प्राथमिक मराठी शाळा क्र.18, प्रविणनगर	--	5 नग
प्राथमिक मराठी शाळा क्र.20, नवाथेनगर	6 नग	7 नग

प्राथमिक शाळेकडील साठा नोंदवहीची तपासणी करुन संबंधीत शाळांना डेस्क-बेंच प्राप्त झाल्याबाबत मुख्याध्यापकाच्या स्वाक्षरीची पोच प्राप्त करुन अनुपालन करावे.

15. शिक्षणाधिकारी मनपा, अमरावती यांनी डेस्क-बेंचची मागणी न केलेल्या शाळांना तसेच मागणी केलेल्या संख्येपेक्षा जास्त नग भांडार विभागाने पुरविल्याचे शिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी असलेल्या विवरणपत्रावरुन व शिक्षण विभागाकडील साठा नोंदवहीवरुन दिसून येते.

मनपा शाळेचे नाव	शिक्षण विभागाकडील नोंदवहीनुसार डेस्क-बेंचची

	संख्या	
	वर्ग 1 ते 4	वर्ग 5 ते 10
उर्दु प्राथमिक मुलांची शाळा क्र.10 , बडनेरा, अमरावती	--	20 नग (मागणी 15 नग)
उच्च प्राथमिक हिन्दी शाळा क्र.15, कृष्णनगर	--	5 नग
प्राथमिक मराठी शाळा क्र.18, प्रविणनगर	--	5 नग
उच्च हिंदी प्राथमिक शाळा क्र.2 मसानगंज	20 नग	--
उच्च प्राथमिक उर्दु मुलांची शाळा क्र.1, नागपूरीगेट, अमरावती	10 नग	--

याप्रकरणी शिक्षणाधिकारी, मनपा अमरावती यांचा खुलासा प्राप्त करुन व तसेच अभिलेख्याची सखोल तपासणी करुन समर्पक अनुपालन करावे.

16. वनश्री मार्केटिंग, अमरावती यांना रु.39,99,910/- (बिल क्र.81 दि. निरंक) चे प्रदान केल्याची नोंद नस्तीत नाही. त्यामुळे पुरवठादाराकडून वसुल करावयाच्या आयकराची कपात करण्यात आली किंव नाही. याबाबतची खात्री होत नाही. तसेच प्रदानाबाबत खर्चाचे प्रमाणक मागणी करूनही लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

उपरोक्त मुद्याचे अनुषंगाने खर्चाचे प्रमाणक, शिक्षणाधिकारी मनपा अमरावती यांचे मुळ स्वाक्षरी असलेले विवरणपत्र व पोचपावत्या तसेच अनुषंगीक अभिलेख व खुलासा सादर करणेबाबत अर्धसमास पत्र क्र. 219 दि.5/07/2015 नुसार कळविण्यात आले होते. परंतु समर्पक खुलासा व अभिलेख प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 219)

DRAFT

सर्वसाधारण अनियमितता

DRAFT

कलम ९ ड खालील आक्षेप

DRAFT

7 वेतनातून आयकराची दरमहा कपात न करता एकत्रित कपात करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :205 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

मनपाचे सहा.संचालक, नगर रचना विभागाचे वेतन देयकांची तपासणी केली असता अधिकारी/कर्मचा-यांचे वेतनातून आयकराची दरमहा कपात न करता माहे फेब्रुवारी पेड इन मार्च-2014 च्या वेतनातून एकत्रित कपात करण्यात आल्याचे दिसून येते. आयकर अधिनियम, 1961 मधील कलम 192 नुसार कर्मचा-यांचे मासिक वेतनातून प्रमाणशीर आयकराची कपात करणे आवश्यक आहे.

मनपाचे सहा.संचालक, नगर रचना विभागाचे वेतन देयकांची तपासणी केली असता अधिकारी/कर्मचा-यांचे वेतनातून आयकराची दरमहा कपात न करता माहे फेब्रुवारी-2014 पेड इन मार्च-2014 च्या वेतनातून एकत्रित कपात करण्यात आल्याचे दिसून येते. आयकर अधिनियम,1961 मधील कलम 192 नुसार कर्मचा-यांचे वेतनातून दरमहा प्रमाणशीर आयकराची कपात करणे आवश्यक आहे.

तपशील खालीलप्रमाणे :-

प्रमाणक क्र.251 ते 255, दिनांक 22.04.2014, रक्कम रु.6,07,435/-

(माहे फेब्रुवारी-2014 पेड इन मार्च-2014)

अ.क्र.	अधिकारी/कर्मचा-यांची नावे व पदनाम	एकूण वेतन	वेतनातून कपात केलेला आयकर
1	2	3	4
1	श्री.प्रमोद म.देशमुख, उपअभियंता (स्था)	69905	53740/-
2	श्री.अनंत म.पोतदार, --“--	69905	45300
3	श्री.विजय रु.साखरे, शाखा अभियंता	61757	23610
4	श्री.लक्ष्मण ना.पावडे, --“--	45481	16690
5	श्री.नितीन एम.बोबडे, --“--	44473	14590
6	श्री.श्रीरंग जानराव तायडे, --“--	46447	11850
7	श्री.प्रदीप म.वानखडे, --“--	47476	13240
8	श्री.शैलेश जीवनराव बोरकर, क.अ.	39624	6660

DRAFT

9	श्री.नंदकुमार ना.तिखीले, क.अ.	40651	10310
10	श्री.मंगेश चं.कडु, क.अ.	40651	10310
11	श्री.दत्तात्रय ल.निबलवार,वाहन चालक	37196	11450
12	श्री.हसमुख पो.गंगर, टंकलेखक	35046	9300
13	श्री.सुहास नं.चव्हाण, सहा.अभि.	47476	8850
14	श्री.घनश्याम वा.वाघाडे, शा.अ.	45229	16090
15	श्री.रविन्द्र म.पवार, सहा.अभि.	51761	8493
16	श्री.प्रमोद वि.इंगोले, सहा.अभि.	58538	36680
17	श्री.दिपक ल.खडेकार, स.अ.	57830	17070
18	श्री.आनंद सु.जोशी, स.अ.	54659	16700
19	श्री.सुधीर वि.गोटे, स.अ.	47434	13870

वरीलप्रमाणे दरमहा आयकराची वेतनातून कपात न करता एकाच महिन्यात आयकराची कपात करण्यात आल्याचे दिसून येते.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.117, दिनांक 05.04.2018 नुसार खुलासा मागविला असता कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 117)

10 सहकारी बँकेकडून अथवा पतसंस्थेकडून कर्ज घेतांना कर्मचा-यांची एकूण वित्तलब्धी तसेच सहकार कायदयातील तरतूदी विचारात न घेता विभाग प्रमुखाने बेजबाबदारपणे हमी देण्याची अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :140 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ड

मनपामध्ये कार्यरत स्वच्छता विभागातील सफाई कामगारांच्या मासिक वेतननातून एकूण वित्तलब्धीच्या 50 टक्केपेक्षा जास्त रक्कम कपात केल्याने महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अग्रिम-1095/प्रक्र-70/96/विनियम, दिनांक 26/09/1997 तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा 1960 च्या नियम 49(1) मधील तरतूदीचे उल्लंघन झाले आहे.

महानगरपालिका, अमरावतीचे सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान स्वच्छता विभागाकडील माहे सप्टें. 2014 चे वेतन देयकाची पडताळणी केली असता स्वच्छता विभागाने वित्त विभागाकडे सादर केलेल्या मासिक देयकातून सफाई कामगारांच्या एकूण वित्तलब्धीपेक्षा सर्व प्रकारच्या कपाती मिळून 50% पेक्षा जास्त रक्कम कपात केल्याचे निदर्शनास आले. वास्तविकत: कर्मचा-याला त्याचे मासिक वेतनातून परिवाराचे उदनिर्वाहाकरीता एकूण वित्तलब्धीच्या किमान 50% एवढी रक्कम हाती मिळणे आवश्यक आहे. याबाबत महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अग्रीम-1095/प्र.क्र.70/95/1997 दि.26.9.1997 मधील परि. 4 मध्ये "अग्रीम व त्यावरील दंडनीय व्याजाची वसुलीची कार्यवाही करतांना कर्मचा-यांच्या एकूण वित्तलब्धीतून अग्रीमाची व दंडनीय व्याजाची रक्कम अशा प्रकारे वसूल करण्यात यावी की, वेतन देयकातील नियमित वसुली व अग्रीम किंवा दंडनीय व्याजाची रक्कम मिळून होणारी वसुली ही एकूण वित्तलब्धीच्या 50% पेक्षा जास्त होणार नाही", अशी स्पष्ट तरतूद आहे. असे असतांना स्वच्छता विभागाचे आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्यांचे विभागातील सफाई कामगारांचे मासिक वेतनातून 50% पेक्षा जास्त कपात करुन शासन निर्देशांना डावलल्याचे दिसते.

1. **मनपातील कर्मचा-यांनी सहकारी बँकेतून कर्ज घेतांना विभाग प्रमुखांनी हमी देण्यातील अनियमितता** -

सहकारी बँक, सहकारी पतसंस्था तसेच राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज घेतांना संबंधीत संस्था कर्जाच्या परतफेडीबाबत कर्मचारी ज्या विभागामध्ये कार्यरत आहे अथवा ज्या विभागातून वेतन घेत आहे, अशा विभाग प्रमुखाकडून हमीपत्र घेवूनच कर्मचा-यांना कर्ज मंजूर केले जाते. महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा 1960 च्या कलम 49(1) नुसार आहरण व संवितरण अधिकारी यांनी कर्मचा-यांचे कर्ज परतफेडीची हमी देतांना संबंधीत कर्मचारी कर्जाचे हप्ते भरण्यास सक्षम आहे किंवा नाही याबाबतची खातरजमा करणे आवश्यक आहे. अधिनस्त कर्मचा-यांना कर्ज घेण्यास हमी देतांना त्याला मिळणारे एकूण वेतन, त्याचे वेतनातून सध्या होणारी वसुली व सेवानिवृत्तीचा शिल्लक कालावधी तसेच कर्ज मंजूर केल्यानंतर त्याला उदरनिर्वाहाकरीता किमान 50% रक्कम हाती मिळेल याप्रमाणात कर्ज मंजूर करण्यास शिफारस करणे आवश्यक आहे. परंतु पुढे नमुद प्रकरणांमध्ये कर्मचा-यांनी सहकारी संस्था व बँकेकडून मोठया प्रमाणावर कर्ज घेतल्याचे दिसून येते. यावरुन विभागप्रमुखाने कर्ज प्रकरणात हमी देतांना कोणतेही निकष लावले नाही, असे स्पष्ट होते. सदरहू बाब शासन निर्देशांचे उल्लंघन करणारी असून त्यामध्ये तात्काळ सुधारणा होणे आवश्यक आहे.

2. **एकूण वित्तलब्धीच्या 50% पेक्षा जादा कपात करणे**-

माहे सप्टेंबर 2014 चे वेतन देयकाची पडताळणी केली असता 50% पेक्षा जास्त रकमेची कपात करण्यात आल्याचे दिसून येते.

(रक्कम रुपयात)

अ.क्र.	कर्मचा-याचे नाव	देयकाचा महिना/	प्रमाणक क्रमांक व	एकूण वित्तलब्धी	कपात केलेली	निव्वळ अदा	कपातीची टक्केवारी

		रक्कम	दिनांक		रक्कम	रक्कम	
1	श्री. दिनेश कि. जेदे सफाई कामगार	9/2014	6318 दि. 18.10.2014	10530	7891	2649	74.94%
2	श्री. हिरा रा. संगते सफाई कामगार	9/2014	6318 दि. 18.10.2014	18585	12309	6276	66.23%
3	श्री. संदिप बालगोहर सफाई कामगार	9/2014	6318 दि. 18.10.2014	17966	12375	5591	68.88%
4	श्री.दिलीप टि. चवरे सफाई कामगार	9/2014	6318 दि. 18.10.2014	15874	10601	5273	66.78%
5	श्री. धिरज संगते सफाई कामगार	9/2014	6318 दि. 18.10.2014	15585	12374	6211	79.40%
6	श्री. आंनद चवरे सफाई कामगार	9/2014	6318 दि. 18.10.2014	18585	11674	6911	62.81%
7	श्री.सुरेश सोनटक्के सफाई कामगार	9/2014	6318 दि. 18.10.2014	12390	9529	2869	76.91%
8	श्री. भागीरथ मार्वे सफाई कामगार	9/2014	6318 दि. 18.10.2014	17346	10234	7112	59.00%
9	श्री. नितेश शं. सांडे सफाई कामगार	9/2014	6318 दि. 18.10.2014	13629	8617	5012	63.23%
10	श्री. प्रकास म.	9/2014	6318 दि.	18585	12035	6550	64.76%
11	श्री. दिपक	9/2014	6318 दि.	17966	12125	5841	67.49%
12	श्री. धरम समुन्द्रे सफाई कामगार	9/2014	6318 दि. 18.10.2014	17346	10356	6990	59.70%

DRAFT

13	श्री. राम सारसर सफाई कामगार	9/2014	6318 दि. 18.10.2014	17966	12379	5587	68.90%

या संदर्भात निर्गमित केलेल्या अर्धसमासावर विभागाने स्पष्टीकरण सादर केलेले नाही. सबब झालेल्या अनियमिततेबाबत क्षमापन प्राप्त करुन अनुपालन करावे.

DATDUBM6401 (Ref No : 06)

15 सन 2014-15 च्या भांडार तथा छपाई विभागाचे लेखापरीक्षणात आढळून आलेल्या अनियमिततांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

महानगरपालिकेच्या विविध विभागाकरिता मागणीप्रमाणे विविध नमुन्यांची छपाई करणे तथा स्टेशनरी खरेदीकरिता दरपत्रके मागविण्यात आले. सदर प्रक्रिया राबविताना अनेक स्वरूपाच्या गंभीर अनियमितता आढळून आलेल्या आहेत. दरपत्रकात संबंधित विभागाकडून प्राप्त मागणीच्या नमूद संख्येत भांडार विभागाचे स्तरावर परस्पर वाढ केली. साठा नोंदवहीत मागणीप्रमाणे साहित्य प्राप्त झाल्याची नोंद नाही.स्वाक्षरी करण्यास सक्षम नसताना तुलनात्मक तक्त्यावर फक्त भांडार अधीक्षकाने स्वाक्षरी केलेली आहे. तुलनात्मक तक्त्यावर अथवा कुठेही दरपत्रक उघडतेवेळी हजर असलेबाबत सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेतलेली नाही.कोटेशन केव्हा उघडण्यात आले दिनांक कुठेही नमूद नाही. गरजेपेक्षा अधिकची अवास्तव दराने खरेदी केली. देयकातून विहित दराने मूल्यवर्धित कराची कपात करण्यात आली नाही. या सर्व अनियमिततेमुळे गैरव्यवहार होऊन मनपाचे नुकसान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

महानगरपालिका,अमरावतीचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणातर्गत भांडार विभागाकडील उपलब्ध केलेल्या सन 2014-15 मध्ये केलेल्या विविध विभागाकडील छपाई तथा स्टेशनरी खरेदीबाबत प्रदान केलेल्या रकमेच्या प्रमाणकांचे तपासणीत पुढीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

अ.क्र.	प्रमाणक क्रमांक, दिनांक व रक्कम	आढळून आलेल्या अनियमितता
1.	12254, दि.3-3-2015	1) उपायुक्त,मनपा,अमरावती व भांडार अधीक्षक यांच्या स्वाक्षरीने

	रु.34000/-.	निर्गमित दरपत्रक नोटीस क्र. निरंक,दिनांक निरंक नुसार पुढीलप्रमाणे नमुने पुरवठा करणेबाबत सर्व पुरवठादारांना जाहीर कळविण्यात आले व त्याकरिता दि.25-11-2014 रोजी दु.12.00 वाजेपर्यंत दरपत्रक सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गोपनीय अहवाल संच 2000 प्रती (संच) रहिवासी दाखले - 5000 प्रती विवरणसंच दर्शविणारा तक्ता - 1000 प्रती. यातील रहिवासी दाखले नमुने 5000 प्रतीची मागणी असताना तसेच दरपत्रक नोटीसमध्येसुद्धा स्पष्ट नमूद असताना तुलनात्मक तक्त्यात खाडाखोड करून 14000 अशी मागणी नोंदविण्यात आली. 2) एकूण 3 दरपत्रक प्राप्त झाले असताना तुलनात्मक तक्त्यावर अथवा कुठेही दरपत्रक उघडतेवेळी हजर असलेबाबत कोटेशनधारकांची स्वाक्षरी घेतलेली नाही. दरपत्रक केव्हा उघडण्यात आले दिनांक कुठेही नमूद नाही. 3) तुलनात्मक तक्त्यावर फक्त भांडार अधीक्षकाने स्वाक्षरी केलेली आहे.स्वाक्षरी करण्यास भांडार अधीक्षक सक्षम असल्यास किंवा त्यांना अधिकृत केले असल्यास संबंधित आदेशाची प्रत लेखापरीक्षणास पुरविण्यात आली नाही. 4) छपाई करून नमुने पुरवठा केल्याबाबत बजरंग ट्रेडर्स यांनी सादर केलेल्या प्रमाणकावरचा दिनांक 22-10-2014 (खाडाखोड केलेला) असा आहे.म्हणजेच दरपत्रक सादर करणेपूर्वी सर्व नमुने छापून पुरवठा करण्यात आले काय खुलासा करावा. 5)देयकातून विहित दराने आयकर तथा व मूल्यवर्धित कराची कपात करण्यात आली नाही. 6) मागणीप्रमाणे साहित्य सुस्थितीत प्राप्त झाल्याचे तथा साठा नोंदवहीत नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र नोंदविण्यात आले नाही.दि.26-09-2014 नंतर प्राप्त गोपनीय अहवाल संच नमुनाची व दि.05-06-2014 नंतर प्राप्त रहिवासी दाखल्याच्या प्रतींची नोंद साठा नोंदवहीत नाही. **संपूर्ण नोंदवहीची तपासणी केली असता साठा नोंदवहीत अद्यावत नोंदी घेण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास येते.**

DRAFT

2.	12255, दि.3-3-2015 रु.47700/-.	उपायुक्त,मनपा,अमरावती व भांडार अधीक्षक यांच्या स्वाक्षरीने निर्गमित 1) 1) दरपत्रक नोटीस क्र. निरंक,दिनांक निरंक नुसार पुढील साहित्याचा पुरवठा करणेबाबत सर्व पुरवठादारांना जाहीर कळविण्यात आले व त्याकरिता दि.25-11-2014 रोजी दु.12.00 वाजेपर्यंत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. 1.संगणक पेपर साईज 10x12x1 30000 2. लिपी रिबीन कार्टेज नं. Epson-Fx 20 20 नग. यातील लिपी रिबीन कार्टेजची 20 ची मागणी असताना तसेच दरपत्रक नोटीसमध्येसुद्धा स्पष्ट नमूद असताना तुलनात्मक तक्त्यात खाडाखोड करून 40 अशी मागणी नोंदविण्यात आली.(दि.30-09-2014 रोजीच्या अनुवृत्तीपत्रात ज्यावर मुख्य लेखाधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली आहे 20 नग अशीच मागणी नोंदविलेली आहे.) 2) एकूण 3 दरपत्रके प्राप्त झाले असताना तुलनात्मक तक्त्यावर अथवा कुठेही दरपत्रक उघडतेवेळी हजर असलेबाबत कोटेशनधारकांची स्वाक्षरी घेतलेली नाही. दरपत्रक केव्हा उघडण्यात आले दिनांक कुठेही नमूद नाही. 3) देयकातून विहित दराने आयकर तथा वॅटकराची कपात करण्यात आली नाही. 4) मागणीप्रमाणे साहित्य सुस्थितीत प्राप्त झाल्याचे तथा साठा नोंदवहीत नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र नोंदविण्यात आले नाही.**प्रत्यक्षात साहित्य प्राप्तीची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आलेली नाही.** 5) तुलनात्मक तक्त्यावर फक्त भांडार अधीक्षकाने स्वाक्षरी केलेली आहे.
3.	12256, दि.3-3-2015 रु.49200/-	1)संगणक पेपर व लीपी रिबीन कार्टेज खरेदीकरिता एकूण 3 दरपत्रक प्राप्त झाले असताना तुलनात्मक तक्त्यावर अथवा कुठेही दरपत्रक उघडतेवेळी हजर असलेबाबत कोटेशनधारकांची स्वाक्षरी घेतलेली नाही. दरपत्रक केव्हा उघडण्यात आले दिनांक कुठेही नमूद नाही. 2) देयकातून विहित दराने आयकर तथा मूल्यवर्धित कराची कपात करण्यात आली नाही.

DRAFT

		3) मागणीप्रमाणे साहित्य सुस्थितीत प्राप्त झाल्याचे तथा साठा नोंदवहीत नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र नोंदविण्यात आले नाही. **प्रत्यक्षात साहित्य प्राप्तीची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आलेली नाही.** 4) तुलनात्मक तक्त्यावर फक्त भांडार अधीक्षकाने स्वाक्षरी केलेली आहे.
4.	12257, दि.3-3-2015 रु.49500/-	1) संगणक पेपर खरेदीकरिता एकूण 3 कोटेशन प्राप्त झाले असताना तुलनात्मक तक्त्यावर अथवा कुठेही दरपत्रक उघडतेवेळी हजर असलेबाबत कोटेशनधारकांची स्वाक्षरी घेतलेली नाही.कोटेशन केव्हा उघडण्यात आले दिनांक कुठेही नमूद नाही. 2) देयकातून विहित दराने आयकर तथा मूल्यवर्धित कराची कपात करण्यात आली नाही. 3) मागणीप्रमाणे साहित्य सुस्थितीत प्राप्त झाल्याचे तथा साठा नोंदवहीत नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र नोंदविण्यात आले नाही. **प्रत्यक्षात साहित्य प्राप्तीची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आलेली नाही.** 4) तुलनात्मक तक्त्यावर फक्त भांडार अधीक्षकाने स्वाक्षरी केलेली आहे.
5.	12262, दि.3-3-2015 रु.3000/-	1.उपमहापौर यांचे कार्यालयाकरिता दिपावली शुभेच्छापत्र (500 नग) छपाई केले.सदर मागणी कोणत्या नियमांतर्गत मोडते अथवा मंजूर ठरावाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करावी. 2. प्रत्यक्षात साहित्य प्राप्तीची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आलेली नाही.
6.	12263, दि.3-3-2015 रु.3000/-	1.महापौर यांचे कार्यालयाकरिता दिपावली शुभेच्छापत्र (500 नग) छपाई केले.सदर मागणी कोणत्या नियमांतर्गत मोडते अथवा मंजूर ठरावाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करावी. 2. प्रत्यक्षात साहित्य प्राप्तीची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आलेली नाही.

DRAFT

7.	12265, दि.3-3-2015 रु.3000/-	1.शिक्षण सभापती यांचे कार्यालयाकरिता व्हिजीटींग कार्ड व रहिवासी दाखले छपाई केली. सदर मागणी कोणत्या नियमांतर्गत मोडते अथवा मंजूर ठरावाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करावी. 2.रहिवासी दाखले छपाई (10 नग x 150 = 1500/-) ची रक्कम दोनदा काढण्यात आलेली आहे.(प्रमाणक क्र. 12264 दि.3-3-15 रु.3000/- यामध्ये सुद्धा काढण्यात आलेली आहे.) खात्री करावी. 3. प्रत्यक्षात साहित्य प्राप्तीची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आलेली नाही.

DATMMSM6701 (Ref No : 35)

17 मनपाच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या सेवापुस्तकातील नोंदी अद्दयावत नसणे तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार आवश्यक नोंदी न घेणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 0

लेखा शीर्ष :79 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 16, 38 व 45 नुसार सेवापुस्तकाची पडताळणी प्रत्येक वर्षीच्या मे महिन्यात करणे आवश्यक असून कर्मचा-याचे सेवाकालावधीतील प्रत्येक सेवाविषयक घटनेची नोंद सेवापुस्तकात घेणे आवश्यक आहे. परंतू अशा प्रकारच्या नोंदी सेवापुस्तकात घेण्यात आल्या नाही. दक्षता रोध मंजूर नसतांना वेतनवाढीचा लाभ देणे, संगणक परीक्षा उतीर्ण नसतांना वेतनवाढी मंजूर करणे तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसतांना पदोन्नतीचा लाभ देणे इत्यादीप्रकारच्या अनियमितता लेखापरिक्षणादरम्यान आढळून आल्या.

महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभाग तसेच वित्त विभागाने कर्मचा-यांचे सेवाविषयक बाबीसंबंधी वेळोवेळी अधिसुचना तसचे शासन निर्णय निर्गमित केले असून त्यानुसार कर्मचा-यांचे सेवापुस्तक आवश्यक नोंदी घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधीत तरतूदी नुसार सेवाविषयक घटनेची प्रत्येक नोंद सेवापुस्तकात घेणे आवश्यक असून अमरावती महानगरपालिकेचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणादरम्यान स्वच्छता विभाग, कर विभाग व झोन क्र. 1 मधील कार्यरत कर्मचा-यांच्या निवडक सेवापुस्तकाची तपासणी केली असता सेवापुस्तके अद्दयावत नसल्याचे आढळून आले. त्यासंबंधाने पुढील त्रृटया निदर्शनास आल्या असून याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय

पुढीलप्रमाणे आहे.

1. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. मभाप-1002/प्रक्र 38/02/20 ब दिनांक 8.05.2003 तसेच सामान्य प्रशासन विभागाचे दि. 30.12.1987, दि. 7.02.2001, व दि. 1.01.1993 नुसार आदेश,अधिसुचना व परिपत्रक निर्गमित केले असून एतदर्थ मंडळाच्या मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळणे याबाबतचे संबंधीत कार्यालयाचे नियुक्ती प्राधिका-राने आदेश काढून सेवापुस्तकात तशी नोंद घेणे आवश्यक आहे. ज्या कर्मचा-यांनी एतदर्थ मंडळाच्या मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण केली नाही अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नाही, अशा कर्मचा-यांच्या वेतनवाढी थांबविण्यात येईल, अश्या सुचना निर्गमित केल्या आहे. मनपा अमरावतीच्या आस्थापनेवर कार्यरत कर्मचा-यांचे सेवापुस्तकात नोंदीच घेण्यात आल्या नाही. शासनाचे निर्देशानूसार कार्यवाही केली नसल्याने शासन निर्देशाची अवहेलना केल्याचे निदर्शनास आले.

2. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 38 नुसार वेतनवाढीची नोंद सेवापुस्तकामध्ये घेतांना सक्षम अधिका-याने वेतनवाढ मंजूरीबाबत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु वेतनवाढीस अथवा दक्षता रोध पार करण्यास मंजूरी नसतांना वेतनवाढी लागू करुन वेतनवाढीचा लाभ देण्यात आला.

3. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 38 नुसार
रजेची नोंद नियमित सेवापुस्तकात घेणे आवश्यक आहे. रजा मंजूरीच्या नोंदी सेवापुस्तकात घेण्यात आल्या परंतु मंजूरीबाबत विभागप्रमुखाची स्वाक्षरी नाही. तसेच रजा नोंदी हया वेगळे पृष्ठ जोडून त्यावर नोंदविण्यात आल्या आहे. तसेच काही पुस्तकामध्ये पांढरी शाई लावून खाडाखोड केल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी विभाग प्रमुखांना सुचना देण्यात येते की, सर्व सेवापुस्तकातील अर्जित रजा लेखा तसेच अर्धवेतनी रजा लेखा अद्दयावत करून अनुपालन करावे.

4. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 45 नुसार सेवापुस्तकाची पडताळणी प्रत्येक वर्षीच्या मे महिन्यात करणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारची पडताळणी केल्याचे दिसून आले नाही. तसेच काही सेवापुस्तकातील नोंदी अद्यावत नसल्याचे आढळून आले.

5. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम क्र. 16 नुसार
कर्मचा-याची वैद्दयकीय दृष्टया तपासणी झाली आहे आणि तो पात्र आहे असे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्याविषयीची नोंद सेवापुस्तकात घेणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारच्या नोंदी घेण्यात आल्या नाही.

लेखापरिक्षणादरम्यान सेवापुस्तकात आढळून आलेल्या उणिवा खालीलप्रमाणे-

अ.क्र.	कर्मचा-याचे नांव व	नियुक्तीचा	सेवापुस्तकाम नोंद नसलेली बाब	नियम व शासन

	पदनाम	दिनांक		निर्णय
1	श्री. अविनास तराळे कनिष्ठ लिपीक, सामान्य प्रशासन विभाग	11.10.1990	1. मराठी व हिन्दी भाषा परिक्षा उतीर्ण होण्यापासून सुट मिळाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 2. पोलीस पडताळणी झाल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही अथवा तसे प्रमाणपत्र सेवापुस्तकात जोडलेले नाही. 3. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही. 4. वैद्यकीय तपासनीची नोंद सेवापुस्तकात नाही. 5. संगणक परिक्षा उतीर्ण केल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 6.सेवापडताळणी अभिलेख नियुक्तीपासून अद्ययावत नाही. 7. नामनिर्देशनाची प्रत सेवापुस्तकासोबत जोडली नाही. 8. स्थायीत्व प्रमाणपत्राची नोंद नाही.	मनासे (सेवेच्या सर्व.शर्ती) नियम 1981 चे नियम 16,38, 45 नुसार
2	श्रीमती जयश्री निलेश वाघमारे ए.एम.एन आरोग्य विभाग	19.11.2003	अ.क्र.1 वरील बाब क्र. 1,2,4,5,6,7 व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	मनासे (सेवेच्या सर्व.शर्ती) नियम 1981 चे नियम 16,38, 45 नुसार
3	श्रीमती जयश्री मा. कासदेकर ए.एम.एन आरोग्य विभाग	9.09.2002	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,6,7 व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही. रजा लेखा चुकीचा आहे.	वरीलप्रमाणे
4	श्रीमती रत्नमाला पवार ए.एम.एन. आरोग्य	19.11.2003	अ.क्र.1 वरील बाब क्र. 1, 5,6, 7 व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे

DRAFT

	विभाग			
5	श्री. सुरेश न. साबद्रा कनिष्ठ लिपीक, लेखा विभाग	15.10.1984	अ.क्र.1वरील बाब क्र. 1,2,4,5, 7 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
6	श्री. संजय देशमुख कनिष्ठ लिपीक, कर विभाग	15.10.1984	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,6,7 व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
7	श्री. जी. एन. अटल कनिष्ठ अभियंता, नगर रचना विभाग	23.08.1984	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,5, 6,7 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
8	श्री. श्याम म. मोहोड लिपीक, कर विभाग	15.10.1984	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,3,4,5, 6 व 7 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
9	श्री. प्रदीप मा. पातर्डेकर कनिष्ठ लिपीक, कर विभाग	24.11.2003	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,3, 4,5,7 व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
10	श्री. एस. बी. पकडे वरिष्ठ लिपीक	15.10.1984	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,3,4,5,6व7 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
11	श्री. एम.आर. तांबेकर सहा. उदयान निरीक्षक	20.02.1985	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,4,5, 6,7 व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
12	श्री. शिवदास ल. देशमुख अनुरेखक नगररचना विभाग	1.02.2005	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,3,4,5,7, व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
13	श्री. मनिष शा. हिरोळे अनुरेखक, नगररचना	1.02.2005	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,3,4,5,7, व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
14	श्री.प्रितम वा. रामटेके अनुरेखक, नगररचना विभाग	25.02.2004	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,3,4,5 व 7 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
15	श्री. प्रशांत रा. पवार कनिष्ठ लिपीक, कर विभाग	22.09.2003	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2, व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
16	श्री. एच. एस. कहाळे	2.09.1982	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,4,6,7 व	वरीलप्रमाणे

DRAFT

	कनिष्ठ लिपीक, कर विभाग		8 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	
17	श्री. सुभाष दि. विधाते वरिष्ठ लिपीक, कर विभाग	9.08.1983	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,3,4,5,6, व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
18	श्री. चंद्रकांत अ. देशमुख कनिष्ठ लिपीक कर विभाग	8.06.1995	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,3,4,6,7, व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही. रजा लेख्यामध्ये पांढरी शाई लावून खाडाखोड केली आहे.	वरीलप्रमाणे
19	श्री. राजू अ. वाठोडकर कनिष्ठ लिपीक, कर विभाग	15.10.1984	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,4,5,7, व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही. दि.1.10.1993 ची रु.1150/- वर द. रो. मंजूर नाही.	वरीलप्रमाणे
20	श्री. प्रविण ना. इंगोले कनिष्ठ लिपीक, कर विभाग	8.06.1995	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,4,5,6,7, व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
21	श्री. मंगेश ग. वाटाणे लिपीक, कर विभाग	15.10.1984	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,3,4,5,7, व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
22	श्री. ज्ञानेश्वर वि. इंगोले मोहरिर, कर विभाग	11.02.1982	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,3,4,5,7, व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
23	श्री. जसवंतसिंग शेखावत इलेक्ट्रीशियन, प्रकाश विभाग	21.08.1992	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,4,5,7, व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे
24	श्री. शैलेश वैद्य, कनिष्ठ लिपीक, कर विभाग	17.05.2000	अ.क्र.1 वरील बाब क्र.1,2,3,4,5,6,7, व 8 ची नोंद सेवापुस्तकात नाही.	वरीलप्रमाणे

.

वर नमुद प्रकरणे नमुन्यादाखल असून सर्व सेवापुस्तकात आवश्यक त्या नोंदी घेवून सेवापुस्तके अद्दयावत करुन पुढील लेखापरिक्षणादरम्यान तपासणीस उपलब्ध करुन दयावी.

DATDUBM6401 (Ref No : 10)

18 क्रिडा विभागातील क्रिडा रत्न पुरस्काराच्या खर्चामधील अनियमिततेबाबत.

DRAFT

अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :257 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 96000.00 /-

मनपाचे क्रिडा विभागाने क्रिडा रत्न पुरस्काराचा खर्च करताना नियमानुसार दरनिश्चिती करुन खर्च करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न करता खर्च करण्यात आला. याकरीता सन 2011 मध्ये घेतलेल्या अग्रिमाचे सन 2014 मध्ये विलंबाने समायोजन करण्यात आले. तसेच सन 2014-15 मध्ये सुधारीत तरतुदीपेक्षा जादा खर्च करण्यात आला. तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास स्थायी समितीची मंजूरी घेतल्याचे दिसून येत नाही.

मनपाचे क्रिडा विभागाने सन 2012-13 मध्ये घेतलेल्या क्रिडा स्पर्धेतील विजेत्यांना क्रिडा रत्न पुरस्कार प्रत्येकी रु.11000/- प्रमाणे एकूण 6 विजेत्यांना रु.66000/- रोख पुरस्कार प्रमाणक क्रमांक 9423 ते 9428, दिनांक 8.12.2014, रक्कम प्रत्येकी रु.11000/- (66000/-) प्रमाणे मंजूर करण्यात आले आहे. सदर स्पर्धेच्या आयोजनाकरिता प्रमाणक क्र.9156, दि.4.2.2011 नुसार रु.35000/-अग्रिम मंजूर करण्यात असून खर्चाची प्रमाणके तपासली असता खालील अनियमितता दिसून आल्यात :-

1. सदर अग्रिम समायोजन देयकाची तपासणी केली असता केलेल्या खर्चाबाबत महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 2.1.1992 नुसार रु.1000/- वरील खर्चाकरीता नियमानुसार दरपत्रके प्राप्त करणे आवश्यक आहे. सदर दरपत्रके लेखापरीक्षणास तपासणीस सादर केलेली नाहीत.

2. खर्चाची प्रमाणके ही सन 2011 ची असून त्याकरिता प्रमाणक क्र.9156, दिनांक 4.2.2011 नुसार रु.35000/- अग्रिम देण्यात आला. सदर अग्रिमाचे प्रमाणक क्र.6599, दिनांक 21.10.2014 नुसार विलंबाने समायोजन करण्यात आले.

3. तसेच सन 2014-15 मध्ये सुधारीत तरतुद रु.50,000/- असताना एकूण खर्च रु.96,000/- करण्यात आला. म्हणजेच रु.46,000/- जादा खर्च करण्यात आला. मंजूर तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास स्थायी समितीची मंजूरी घेतल्याचे दिसून येत नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.112, दिनांक 04.04.2018 नुसार खुलासा/अभिलेख मागविला असता कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 112)

DRAFT

23 बांधकाम परवानगी जारी करण्यापूर्वी स्थानिक संस्था कराच्या बँकेत परस्पर भरलेल्या रकमांची बँक स्क्रोलवरून तपासणी न केल्याने मनपा महसुलाच्या हानीच्या शक्यतेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :392 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 12317296.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 12317296.00/-

बांधकाम परवानगी देण्यापुर्वी संबंधितांकडून स्थानिक संस्था कराची रक्कम स्वत: वसूल करण्याऐवजी बँकेत परस्पर भरण्याचे सूचित करण्यात येते. त्याअनुषंगाने रक्कम भरण्याच्या पावत्यांच्या छायाप्रती सादर केल्यानंतर परवानगी देण्यात येते. परंतू त्या पावत्या ख-या असल्याची खात्री केली जात नाही. पुढील दिवशी बँक स्क्रोल तपासून सदर रक्कम भरण्याचीही खात्री केली जात नाही. तसेच ताळमेळही घातला जात नाही. त्यामुळे रकमांच्या खोटया पावत्या सादर होऊन मनपा महसूलाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम 2012 नुसार मनपा क्षेत्रात कोणतेही काम हाती घेणाऱ्या व्यक्तीला अश्या कामांसाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालावर विहित दराने महानगरपालिकेकडे कराचा भरणा करावा लागतो. त्यासाठी महानगरपालिकेने पुढीलप्रमाणे विविध बँकांमध्ये खाती उघडली आहेत.

1. Axis Bank (912010045753973)
2. Bank Of Maharashtra (60100924679)
3. Central Bank Of India (3187458921)
4. Bank Of India (967510110004735)
5. Punjab National Bank (0016002101004760)
6. ICICI Bank (042805001488)
7. Abhinandan Co.Op. Bank (21/1683)
8. Cosmos Bank (103100101038)

मनपाच्या हद्दीत नागरिक व विकासकाकडून विविध बांधकामे हाती घेण्यासाठी बांधकामाचे आराखडे मनपाकडे सादर करण्यात येतात. या बांधकामांच्या क्षेत्राप्रमाणे निश्चित दराने स्थानिक संस्था कराची आकारणी करून संबंधितांना मागणीपत्रके जारी करताना वरीलपैकी कोणत्याही खात्यामध्ये कराचा भरणा करण्याचे सुचविले जाते. त्यानुषंगाने संबंधित नस्त्यामध्ये भरणा केलेल्या रकमांच्या पावत्यांच्या छायाप्रती सादर केल्यानंतर नगररचना विभागाकडून आराखड्यास मंजुरी देण्याची पुढील कार्यवाही केली जाते.

विभागाकडील नोंदवहीनुसार 2014-15 मध्ये एकूण रु. 12317296/- बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने स्थानिक संस्था करापोटी आकारल्याची नोंद आहे.

उपरोक्त नोंदवहीनुसार पुढीलप्रमाणे कराच्या रकमांची आकारणी करण्यात आली.

महिना	कराची प्राप्त रकम (रु.)
एप्रिल 14	325670
मे 14	277651
जुन 14	826165
जुलै 14	1615500
ऑगस्ट 14	510345
सप्टेंबर 14	1188860
ऑक्टोबर 14	314005
नोव्हेबर14	1416300
डिसेंबर 14	1458205
जानेवारी 15	1700985
फेब्रुवारी 15	1207680
मार्च 15	675930
एकूण	**12317296**

यावरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत –

1. बांधकाम आराखड्यास मंजुरी देताना वरीलप्रमाणे कराच्या रकमा भरल्याच्या छायांकित पावत्या बघितल्या जातात असे दिसते .परंतु प्रत्यक्षात त्यांच्या सत्यतेचीही शहानिशा केली जात नाही. तसेच प्रत्यक्षात रकमा मनपाच्या संबंधित खात्यात जमा झाल्याचीही खात्री केली जात नाही. याशिवाय यासंबंधाने प्राप्त धनादेश वटविल्याचीसुद्धा खात्री केली जात नाही असे दिसते.

वास्तविक संबंधित बँकेकडून पुढील दिवशी स्क्रोल मागवून संबंधित रकम प्रत्यक्षात खात्यामध्ये जमा झाल्याची खात्री केल्यानंतरच परवानगी देणे अभिप्रेत आहे. परंतु नगररचना विभागाने तशी उपाययोजना केलेली नाही. रकमांचा बँकेशी मासिक ताळमेळ ही घातला जात नाही. त्यामुळे खोट्या पावत्या सादर होऊन मनपाचे आर्थिक नुकसान होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. यासंबंधाने National Municipal Accounting Mannual मधील प्रकरण 29.11 मध्ये मासिक ताळमेळ व राज्य शासनाच्या महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम 98(5) मध्ये बँक स्क्रोल वरून रकमा प्राप्त झाल्याची तपासणी केल्याशिवाय सेवा देवू नये, याबाबत नियंत्रणात्मक निर्देश दिलेले आहेत.

त्यामुळे नगररचना विभागाने सर्वच प्रकरणांचा आढावा घेऊन सदर रकमा बँकेत जमा झाल्याच्या विस्तृत विवरणासह ताळमेळ करून अनुपालन सादर करावे.

DATABWM6901 (Ref No : 102)

DRAFT

24 स्थानिक संस्था कर निर्धारण रक्कम विलंबाने भरणा केल्यास व्याज व दंडाची रक्कम न आकारणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :392 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ङ

मनपाने स्थानिक संस्था कर निर्धारणाची रक्कम भरणेकरिता विहित कालमर्यादा दिलेली नसल्यामुळे विलंबाने भरणा केलेल्या कर निर्धारणाच्या रकमेवर मनपाला व्याज व दंडाच्या रकमेचे आर्थिक नुकसान होत आहे. सन 2014-15 या वित्तीय वर्षापर्यंत एकूण 10102 व्यापा-यांपैकी 6110 व्यापा-यांचे कर निर्धारण झाले असून उर्वरित 3992 नोंदणीकृत व्यापा-यांचे कर निर्धारण करुन स्थानिक संस्था करुन स्थानिक संस्था कर (L.B.T.) व्याज व दंडाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

मनपा, अमरावतीचे स्थानिक संस्था कर विभागाचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणात स्थानिक संस्था कर निर्धारण करणेकरिता संगणक आज्ञावलीचा वापर करण्यात येते. सन 2014-15 या वित्तीय वर्षापर्यंत एकूण 10102 नोंदणीकृत व्यापा-यांपैकी 6110 व्यापा-यांचे कर निर्धारण झाले असून उर्वरित 3992 नोंदणीकृत व्यापा-यांचे कर निर्धारण व्हावयाचे आहे. उर्वरित व्यापा-यांचे कर निर्धारण करुन स्थानिक संस्था कर (L.B.T.), व्याज व दंडाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

संगणक आज्ञावलीची तपासणी केली असता कर निर्धारण आज्ञावलीतून व्यापा-यांचे ज्या तारखेस (31 मार्च पर्यंत) कर निर्धारण करावयाचे आहे त्या तारखेपर्यंत व्याज व दंडाची रक्कम निर्धारित करण्यात येते. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्र.स्थासक.0209/प्र.क्र.65/09/न.वि.34, दिनांक 25.3.2010 मधील नियम क्र.33(10) नुसार कर निर्धारण आदेशाची वैधता निश्चित करणे आवश्यक असून कर निर्धारण रक्कम एक महिन्याचे आत संबंधित व्यापा-याने भरणा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम भरणेकरिता मनपाने कोणतीही कालमर्यादा निश्चित केलेली नसून 1 महिन्यापेक्षा ज्यादा कालावधीने कराची रक्कम भरणा केल्यास त्यास मनपाकडून व्याज व दंडाची आकारणी केली जात नसल्याचे दिसून येते.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.131, दिनांक 16.04.2018 नुसार अनुपालन मागविले असता विभागाचे उत्तर प्राप्त झाले असून त्यानुसार आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 131)

DRAFT

25 महानगरपालिका अमरावती कार्यालयातील आरोग्य विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतनामधून भविष्य निर्वाह निधी किंवा डीसीपीएस ची कपात न केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ङ

महानगरपालिका अमरावती येथील आरोग्य विभागातील कार्यरत कर्मचाऱ्याचे वर्ष 2014-15 या वर्षातील नोव्हेंबर 2014 जानेवारी 2015 या महिन्यातील वेतन देयकाची तपासणी केली असता एकूण 19 अधिकारी व कर्मचारी यांचे वेतनामधून भविष्य निर्वाह निधी किंवा डीसीपीएस ची मासिक वर्गणीची कपात केली नसल्याचे आढळून आले.

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 चे नियम 8(1)ब नुसार सन 2005 पूर्वी नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे त्यांचे वेतनाचे कमीतकमी 6% एवढा भविष्य निर्वाह निधीची कपात करणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय अनियो/1005/ 126/सेवा-4 दि.30-10-2005 व शासन निर्णय अनियो /1007/18/सेवा-4 दि.7 जुलै, 2007 नुसार ज्या कर्मचारी यांची नियुक्ती 1 नोव्हेंबर 2005 नंतर झाली आहे, अशा कर्मचाऱ्याचे त्यांचे वेतनाचे 10% दराने अंशदान डीसीपीएस ची मासिक वर्गणीची कपात करणे आवश्यक असताना खाली दर्शविलेल्या एकूण 19 अधिकारी व कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधीची मासिक वर्गणी किंवा डीसीपीएस वर्गणीची कपात मासिक वेतनामधून करण्यात आली नाही.

भविष्य निर्वाह निधी किंवा डीसीपीएस ची कपात न केलेल्या कर्मचाऱ्याची यादी पुढील प्रमाणे आहे.

1) श्री.तुषार पोहनकर, वैधकीय अधिकारी.
2) श्रीमती वैशाली भुयार, प्र.तंत्रज्ञ
3) श्री.धीरज किसन माकोडे, औषध निर्माता
4) श्री.सुरज जाधव, शिपाई
5) श्री.हरजेस प्रभाकर बाबल, शिपाई
6) श्री.सिराज अमजद खान, शिपाई
7) श्री.चंद्रशेखर कराले, कुली
8) श्री.राजानिप्रकाश उके, शिपाई
9) श्रीमती सुनिता मेश्राम, शिपाई
10)श्री.हर्षद रौउफ खान, कुली
11)श्री.लक्ष्मीनारायण कांबळे, कुली

DRAFT

12) योगिता बुधीराम शर्मा, नर्स
13)श्री.कुणाल महादेव बाबल, कुली
14)श्री.रमेश मनोहर पातुर्देकर, कनिष्ठ लिपिक
15) वृषाली शांताराम गावंडे, शिपाई
16) विद्या रामेश्वर बारसे, पीएच एन
17) प्रमिला शामराव कपाले, परिचारिका
18) डॉ. शिवदास नाचणकर, वैद्यकीय अधिकारी
19) डॉ. विजय मोटघरे, वैद्यकीय अधिकारी

उपरोक्त दर्शविलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी व डीसीपीएसची वर्गणीची कपात संबधितांचे वेतनामधून करण्याबाबत कार्यवाही करण्यात येऊन त्याबाबतचे अनुपालन सादर करण्यात यावे.

या संदर्भात अर्धसमास पत्र क्र.50, दि. 22.02.2018 नुसार खुलासा देण्यास कळविले होते परंतु तो प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 50)

28 अधिकारी/कर्मचारी यांनी संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर न करताही नियमित वेतनवाढी मंजूरीबाबतची अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :79 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ड

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-2000/प्रक्र 5/2001/39 दि. 20 जुलै 2002 नुसार जे कर्मचारी संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण करणार नाही, अशा कर्मचा-यांच्या वेतनवाढी सुट मिळण्यास पात्र होईस्तोवर रोखण्यात येईल अशी तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशा. विभाग शासन निर्णय क्र.प्रशिक्षण 2000/प्रक्र61/2001/39 दि.19.03.2003 नुसार दि. 19.03.2003 रोजी किंवा त्यानंतर गट-अ, गट-ब व गट-क मधील ज्या पदाची निवड प्रक्रिया सुरू होईल, अशा नव्याने नियुक्त होणा-या सर्व अधिकारी/कर्मचारी संगणक अर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आत प्राप्त न केल्यास अशा कर्मचा-यांच्या सेवा समाप्त करण्यात येईल, असे नमूद केले आहे. परंतु याप्रकरणी मनपा प्रशासनाकडून अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

DRAFT

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रशिक्षण-2000/प्र.क्र.61/2001/39 दि.19.03.2003 नूसार शासकीय तसेच निमशासकीय कामकाजात संगणकाचा मोठया प्रमाणात वापर होण्याच्या दृष्टीने शासकीय व निमशासकीय कार्यालयातील गट-अ, गट-ब, व गट-3 च्या अधिकारी/कर्मचारी यांना संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान अवगत असणे आवश्यक आहे. याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम-1999 अधिसूचीत करण्यात आले आहे. त्यामूळे उपरोक्त शासन निर्णयान्वये संगणक विषयक प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक केलेले आहे.

याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे:-

1. महानगरपालिका, अमरावतीचे सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान विविध विभागाकडील सेवापुस्तकाची पडताळणी केली असता संगणक अर्हता प्राप्त केल्याबाबत सेवापुस्तकात नोंदीच घेण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले. उक्त शासन निर्णयानुसार दि.19.03.2003 रोजी किंवा त्यानंतर सेवेत लागलेल्या गट-अ, गट-ब व गट-क चे कर्मचा-यांना सेवेत लागल्यापासून दोन वर्षाचे आत संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जे कर्मचारी अशा प्रकारचे प्रमाणपत्र सादर करणार नाही, अशा सर्व कर्मचा-यांची सेवा समाप्त करण्यात येईल व जे कर्मचारी दि.19.03.2003 पूर्वी सेवेत लागलेले आहे अशा कर्मचा-यांचे बाबतीत सुट प्राप्त होईस्तोवर वेतनवाढी रोखण्यात येईल अशी तरतूद केली आहे. परंतु शासन निर्णयानूसार कार्यवाही करण्यात न आल्याने प्रशासनाने कर्मचा-यांना अवाजवी मुभा दिल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन केले असल्याची शक्यता आहे. त्यामुळे मनपाने सर्व कर्मचा-यांच्या प्रकरणांचा आढावा घेऊन अर्हतेबाबतच्या नोंदी सेवापुस्तकात घ्याव्या. व अर्हताप्राप्त नसलेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत शासन निर्णयानुसार आवश्यक कार्यवाही करावी.

सेवापुस्तकात संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याची अथवा सुट प्राप्त झाल्याची नोंद नसलेल्या कर्मचा-यांची नमुन्यादाखल काही प्रकरणे पुढीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	अधिकारी/कर्मचा-यांचे नाव	सेवेत नियुक्तीचा दिनांक	सेवेचा एकूण कालावधी
1	श्रीमती जयश्री वाघमारे ए.एन.एम	19.11.2003	15 वर्ष
2	श्रीमती रत्नमाला पवार ए.एन.एम	19.11.2003	15 वर्ष
3	श्रीमती. योगीता शर्मा ए.एन.एम	25.05.2007	10 वर्ष
4	श्री. सुरेश न. साबद्रा वरिष्ठ लिपीक	15.10.1984	33 वर्ष
5	श्री. संजय ज. देशमुख वरिष्ठ लिपीक	15.10.1984	33 वर्ष
6	श्री. जी. एन. अटल कनिष्ठ अभियंता	23.08.1984	33 वर्ष
7	श्री. श्याम म. मोहोड वरिष्ठ लिपीक	15.10.1984	33 वर्ष

DRAFT

8	श्री. प्रदीप पातुर्डेकर कनिष्ठ लिपीक	24.11.2003	15 वर्ष
9	श्री. एस. बी. पकडे सहाय्यक अधिक्षक	15.10.1984	33 वर्ष
10	श्री. एम. आर. तांबेकर वरिष्ठ लिपीक	20.02.1985	32 वर्ष
11	श्री. प्रितम वा. रामटेके अनुरेखक	25.02.2004	15 वर्ष
12	श्री. सुभाष दि. विधाते वरिष्ठ लिपीक	09.08.1983	34 वर्ष
13	श्री. प्रविण ना. इंगोले कनिष्ठ लिपीक	08.06.1995	22 वर्ष
14	श्री. मंगेश गणेश वाटाणे वरिष्ठ लिपीक	15.10.1984	33 वर्ष
15	श्री. शैलेश वैद्य वरिष्ठ लिपीक	17.05.2000	17 वर्ष

2. सेवेत नव्याने नियुक्त कर्मचा-यांच्या नियुक्ती आदेशामध्ये संगणक अर्हता प्रमाणपत्र दोन वर्षाचे आत सादर करण्यात यावे अन्यथा सेवेतून कमी करण्यात येईल अशी अट नमूद करण्यात आली आहे. परंतु अशा कर्मचा-यांकडून संगणक अर्हता प्रमाणपत्र न घेता व तसे प्रमाणपत्र असल्यास सेवापुस्तकात न नोंदविता सेवेत कायम ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले. उदा. वरील तत्क्यातील अ. क्र. 1, 2, 3, 8 व 11 चे बाबतीत अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

3. मनपामध्ये कार्यरत ज्या कर्मचा-यांनी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केले नाही अथवा ज्या कर्मचा-यांना वयाची 55 वर्ष पूर्ण झाल्याने सुट देण्यात आल्याचे आदेश निर्गमित करण्यात आले नाही. तसेच उपरोक्त दि. 20 जुलै 2002 चे परि. 3 (1) टीप-2 नुसार अशा प्रकारे रोखून धरलेल्या वेतनवाढी, संबंधीत कर्मचारी ज्या तारखेला परीक्षा उत्तीर्ण होईल किंवा ज्या तारखेला त्याला अशा प्रकारे परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल अशा तारखेला देय होतील आणि जणू काही त्याच्या वेतनवाढी रोखल्या गेल्या नव्हत्या असे समजून त्या उपर्जित होतील, परंतु वेतनवाढी रोखून धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा हक्क असणार नाही. अशी तरतूद असतांना सुध्दा मनपा प्रशासनाकडून तशी कार्यवाही लेखापरिक्षणाच्या दिनांकापर्यंत करण्यात आली नाही, असे निदर्शनास आले.

वरील मुद्याचे अनुषंगाने अर्धसमासपत्र क्र. 80 दिनांक19.03.2018 नुसार सामान्य प्रशासन विभागाकडून विहित विवरणपत्रातील माहिती सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु प्रारुप आक्षेप लिहिस्तोवर माहिती प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

30 महात्मा गांधी संकुल नुतनीकरण / नवीन लीजप्रक्रिया न राबविता 30 वर्षापेक्षा कालावधी होऊनसुद्धा सुरूच असणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ङ

महाराष्ट्र अधिनियम (महानगरपालिका) 79(2) (ग) अन्वये लीझ भाडेपट्टीने देण्याकरिता 30 वर्षापेक्षा अधिक होणार नाही अशी तरतूद असताना सदर संकुलाचा लीझ कालावधी 34 वर्षापेक्षाही उलटून गेला असताना कारवाही करण्यात आली नाही.

अमरावती महानगरपालिकेच्या हद्दीतील महात्मा गांधी व्यापार संकुल दिनांक 15/08/1983 ला बांधण्यात आले असून 'A' व 'B' असे दोन भाग मिळून एकूण 51 दुकाने वितरीत करण्यात आले. त्याच्या मोबदल्यात मनपाने विशिष्ट अशी रु.15000/- ची अनामत रकमेचा भरणा करण्यात आला व तेव्हापासून लेखापरीक्षण कालावधीपर्यंत मनपाने ठरविलेल्या दराप्रमाणे दुकान भाड्याची वसुली करत असल्याचे दिसून आले.

महाराष्ट्र अधिनियम (महानगरपालिका) 79(2) (ग) अन्वये लीझ भाडेपट्टीने देण्याकरिता दुकान भाड्याच्या बाजार मूल्यापेक्षा किंवा इतर मोबदल्यापेक्षा कमी नसेल अश्या भाड्याने व मनपा लादेल अशा शर्तीस अधीन राहून 30 वर्षापेक्षा अधिक होणार नाही इतक्या मुदतीकरिता भाडेपट्ट्याने देता येईल असे नमूद आहे. परंतु सदर संकुलातील एकूण 51 दुकान भाड्याची लीझ मुदत संपुष्टात आल्यानंतरही सुरूच असल्याचे निदर्शनास आले.

सदर संकुलाच्या लीझ कालावधी 34 वर्षापेक्षाही उलटून गेल्याने त्यावर उचित कारवाही केल्याचे दिसून आले नाही. महात्मा गांधी संकुलाची मूळ नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्यामुळे त्यावेळेस दुकान गाळेधारकाशी केलेल्या 'लीझ डीड' नुसार अटीची व शर्तीची तपासणी होऊ शकली नसल्याने भाडेपट्टी दर व इतर अनुषंगिक माहिती तपासता आली नाही. तसेच हस्तांतरण शुल्काबाबतची स्थायी समितीने मंजूर केलेल्या ठरावाची प्रत लेखापरीक्षणास सादर केली नाही.

DLFSPPM8501 (Ref No : 32)

32 रमाई आवास (घरकुल) योजनेसाठी शासनाकडे निधी मागणीचा प्रस्ताव सादर न केल्याने योजनेपासून लाभार्थी वंचित राहणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :363 शासन निधी

अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, शासन निर्णय क्र.सीएचबी-2/मावक/159 प्र.क्र./ 2009 दि.9 मार्च 2010 नुसार दारिद्रयरेषेखालील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील लोंकासाठी घरकुल योजना लागु करण्यात आली आहे. यासाठी नागरी क्षेत्रातील एका घरकुलासाठी रु.2.00 लक्ष अनुदान मंजूर करण्यात येते. सदर योजना ही महाराष्ट्र शासनाची महत्वाकांक्षी योजना असून मंजूर उद्दिष्टानुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. परंतु मनपा अमरावतीने सन 2014-15 साठी घरकुल बांधणीचे उद्दिष्टच निश्चित केले नसून सदर योजनेसाठी शासनाकडे निधी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात आला नाही. परिणामी लाभार्थी सदर योजनेपासून वचिंत राहिले.

महानगरपालिका अमरावती क्षेत्रातील दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील लोकांना रमाई आवास योजनेतंर्गत घरकुलाचे बांधकाम करुन घरकुलाचे वाटप करण्यासाठी निश्चित केलेल्या उद्दिष्टानुसार महाराष्ट्र शासनाकडून सन 2010-11 पासून निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाकडून सदर योजनेतंर्गत उद्दिष्टानुसार सन 2010-11 पासून खालीलप्रमाणे निधी प्राप्त झाला आहे.

(रु.लाखात)

वर्ष	निश्चित केलेले उद्दिष्ट	प्राप्त निधी
2010-11	293 घरकुल	527.40
2011-12	70 घरकुल	140.00
2012-13	350 घरकुल	700.00
2013-14	1347 घरकुल	2694.00
2014-15	निरंक	निरंक
2015-16	700 घरकुल	1800.00
	2760 घरकुल	**5861.40**

महानगरपालिका अमरावतीचे सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान अभिलेख्याची पडताळणी केली असता रमाई आवास(घरकुल) योजनेसाठी मनपाचे कार्यकारी अभियंता-2, समाज विकास विभाग अमरावती यांनी सन 2014-15 करीता घरकुलाचे उद्दिष्ट निश्चित केले नाही. तसेच सदर योजनेसाठी व्यापक प्रसिध्दी दिली नाही. उद्दिष्ट निश्चित नसल्याने व लाभार्थीचे सर्व्हेक्षण केले नसल्याने मनपाने सदर योजनेसाठी शासनाकडे निधी मागणीचा प्रस्ताव सादर केला नाही. त्यामुळे शासनाने निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे अमरावती शहरातील दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील लाभार्थ्यांना सदर योजनेपासून वचिंत ठेवण्यात आले असून महाराष्ट्र शासनाच्या योजनेचा उद्देश विफल ठरला.

DATDUBM6401 (Ref No : 171)

DRAFT

46 विवाह नोंदणी शुल्काची रक्कम तसेच विवाह मंडळाचे नोंदणी शुल्क व नुतनिकरणाची रक्कम शासनाकडे जमा न केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :34 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम 1999 मधील नियम 3 नुसार निबंधकाच्या स्थानिक अधिकार क्षेत्रातील विवाह मंडळे यांची नमुना 3 मध्ये नोंदणी करून नोंदणी व नुतनीकरण मनपा अमरावतीस याकरिता वर्ष 2014 -15 या वर्षामध्ये एकूण रु.192490 प्राप्त झाले असून सदर रक्कम शासनाकडे अद्याप भरणा करण्यात आली नाही.

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम 1999 नुसार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र का-13 /रवका/विवाह नोंदी दिनांक 21.4.2008 अन्वये विवाह नोंदणी करण्याचे काम दि.01.मे 2008 पासून नगरपालिका/महानगरपालिकांकडे हस्तांतरित झालेले आहे. अमरावती शहर महानगरपालिका कार्यालयामार्फत विवाह नोंदणी व नुतनिकरणाची फी वसूल केली जात असून वर्ष 2014-15 चे अंदाजपत्रकामध्ये विवाह नोंदणी फी जमा या लेखा शिर्षाखाली रु. 1,42,490/- ही रक्कम प्रत्यक्ष जमा असल्याचे दिसून येते. परंतु ती रक्कम शासनाकडे जमा करण्यात आलेली नाही.

विवाह नोंदणीचे काम दि.1.5.2008 पासून मनपा मार्फत होत असल्यामुळे त्यासाठी मनपा कडे शुल्क जमा होत असते ह्याबाबतचा जमा महसूल राज्य शासनाकडे कोषागारामार्फत जमा होणे आवश्यक आहे. सन 2014-15 मध्ये विवाह नोंदणी साठी जमा झालेल्या शुल्काची रक्कम रु. 1,92,490/- शासनाकडे जमा करण्यात आली नाही. उपरोक्त रकमा शासनाकडे जमा न करणे तसेच शासन निधी लेख्याबाहेर ठेवणे ही गंभीर स्वरुपाची अनियमितता आहे तरी कार्यवाहीसह अनुपालन सादर करावे.

सदर प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.83 दि 19.3.2018 व क्र.121 दि.6.4.2018 नुसार संबधित विभागास विचारणा केली असता त्यांचे कडून कोणताही खुलासा प्राप्त झाला नसल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 83)

48 आरोग्य विभागातील कर्मचारी यांना निलंबित केल्यानंतर त्यांचा निलंबन कालावधी नियमित केला नसताना त्यांना कालबद्ध पदोन्नती व नियमित वेतनवाढी प्रदान करण्यात आल्या.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

महानगरपालिका, अमरावती येथील आरोग्य विभागात कार्यरत डॉ.फिरोजखान असदखान, इंचार्ज हकीम तसेच श्री.प्रदीप मोतीराम बन्सोड, आरोग्य कर्मचारी यांना त्यांचे सेवाकाळात निलंबित करण्यात आले होते. निलंबन कालावधी नियमित सेवाकाळ केला नसताना त्यांना नियमबाह्यपणे नियमित वेतनवाढी तसेच कालबद्ध पदोन्नतीचा लाभ प्रदान करण्यात आला.

अ) श्री.फिरोजखान असदखान हे इंचार्ज हकीम या पदावर कार्यरत असताना त्यांना कौटुंबिक हिंसाचाराच्या गुन्ह्यात अटक झाल्यामुळे त्यांना दिनांक 25.03.2007 पासून सेवेतून निलंबित करण्यात आले होते व त्यानंतर न्यायालयाचे अंतिम आदेशाचे अधीन राहून त्यांना 25.05.2007 पासून सेवेत रुजू करून घेण्यात आले.

न्यायालयाचे अंतिम आदेशाचे अधीन राहून निलंबनानंतर सेवेत रुजू करून घेण्यात आले असतांना व निलंबन कालावधी नियमित केला नसतांना त्यांना कालबद्ध पदोन्नतीचा लाभ तसेच नियमित वेतनवाढी देण्यात आल्याचे त्यांचे सेवापुस्ताकावरून निदर्शनास येते.

ब) तसेच श्री प्रदीप मोतीराम बन्सोड हे एमपीडब्लू या पदावर कार्यरत असतांना त्यांना दि.15.02.1989 ते 31.07.1993 या कालावधीत निलंबित करण्यात आले होते .निलंबन कालावधी नियमित केल्याची सेवापुस्ताकामध्ये नोंद नाही. निलंबन कालावधी नियमित सेवा कालावधी मंजूर केला नसतांना त्यांना नियमित वेतनवाढी तसेच प्रथम व दुसरी कालबद्ध पदोन्नती मंजूर करून त्याबाबतचे आर्थिक लाभ देण्यात आले असल्याची नोंद सेवापुस्ताकामध्ये आहे.

तरी उक्त श्री फिरोजखान असदखान यांचा न्यायालयाचा अंतिम निकाल झाला असल्यास किंवा विभागीय चौकशी पूर्ण होऊन उक्त कर्मचारी निर्दोष असल्यास त्यांचा निलंबन कालावधी नियमित सेवा कालावधी म्हणून नियमित करण्याबाबत कार्यवाही करून त्याबाबतची नोंद सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी. जर सदरहू कर्मचाऱ्याचा निलंबन कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून मंजूर होत नसल्यास त्यांना देण्यात आलेले कालबद्ध पदोन्नतीचे आर्थिक लाभ किंवा अनुषंगिक इतर लाभ कमी करण्याबाबतची कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

या संदर्भात लेखापरीक्षण पथकाचे अर्धसमास पत्र क्र.28 दिनांक 6.2.2018 नुसार संबधित

DRAFT

विभागास विचारणा केली असता त्यांचेकडून कोणताही खुलासा प्राप्त झाला नसल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 28)

56 स्थानिक संस्था करनिर्धारण कंत्राटदाराचे देयकातून आयकराची वसुली न करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :397 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

मनपा, अमरावतीचे स्थानिक संस्था कर विभागाने कर निर्धारणाचे कामाकरिता मे.ए.एस.कुळकर्णी ॲण्ड असोसिएटस् (Chartered Accountant) ची नियुक्ती केली असून त्यांना सदर कामाबाबत प्रदान केलेल्या देयकातून नियमानुसार आयकर कपात करण्यात आला नाही. तसेच सदर देयकावर त्यांना सेवाशुल्क 12.36% प्रमाणे एकूण रु.47750/- प्रदान करण्यात आला. सदर सेवाशुल्क संबंधित फर्मनी शासनास भरणा केला किंवा नाही, याबाबतचा कोणताही अभिलेख लेखापरीक्षणास सादर करण्यात आला नाही.

मनपा, अमरावतीचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणात स्थानिक संस्था कर विभागाने कर निर्धारणाचे कामाकरिता मे.ए.एस.कुळकर्णी ॲण्ड असोसिएटस् (Chartered Accountant) ची नियुक्ती केली असून त्यांना स्थानिक संस्था कराचे व्यापारी प्रतिष्ठानाचे कर निर्धारण करण्याचे काम प्रति प्रकरण रु.505/- प्रमाणे खालील प्रमाणकान्वये अदा केलेले आहे.

1. महाराष्ट्र शासन, वित्त वि.शा.परि क्र.आयकर 1009/प्र.क्र.40/कोषा-प्र-5, दिनांक 10.12.2013 नुसार व्यवसाय फी चे रकमेतून 10% आयकराची कपात करुनच देयक अदा करणे आवश्यक असतांना नियमानुसार आयकराची कपात न करताच देयकाचे प्रदान करण्यात आले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

मे.ए.एस.कुळकर्णी ॲण्ड असोसिएटस् (Chartered Accountant) (लेखाशिर्ष-397)

अ.क्र.	प्रमाणक क्रमांक व दिनांक	करनिर्धारण प्रकरणांची संख्या (प्रति प्रकरण @ 505/- प्रमाणे)	प्रदान केलेली रक्कम	कपात करण्यात न आलेली 10% आयकराची रक्कम
1	6553, दि.21.10.2014	196	98980/-	9898/-
2	1299, दि.23.5.2014	246	139585/- सेवाशुल्कासह	12423/-
3	1300, दि.23.5.2014	271	153770/- सेवाशुल्कासह	13686/-

4	6464, दि.18.10.2014	90	51068/- सेवाशुल्कासह	4545/-
5	6465, दि.18.10.2014	158	89652/- सेवाशुल्कासह	7979/-
			एकूण	**48531/-**

2. तसेच वरील प्रमाणकान्वये प्रदान केलेल्या देयकावर मे.ए.एस.कुळकर्णी ॲण्ड असोसिएटस् यांना सेवाशुल्क 12.36% प्रमाणे एकूण रु.47750/- प्रदान करण्यात आला. सदर सेवाशुल्क संबंधित फर्मनी शासनास भरणा केला किंवा नाही, याबाबतचा कोणताही अभिलेख लेखापरीक्षणास सादर करण्यात आला नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.172, दिनांक 09.05.2018 नुसार अनुपालन मागविले असता कोणतेही उत्तर प्राप्त झाले नसल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 172)

57 सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या मानधनाचे देयकातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :263 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ड

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतील समुह संघटकांचे मानधन देयकातील प्रत्यक्ष बेरीज रु.87675/- ऐवजी रु.103050/- येत असून अनुदानाच्या तपशीलात सदर देयकातील रक्कम चुकीची दर्शविण्यात आल्यामुळे मनपाचा झालेला प्रत्यक्ष खर्च व दर्शविण्यात आलेला खर्च यामध्ये तफावत येत असून अंदाजपत्रकातील प्रत्यक्ष आकडेवारीमध्येसुध्दा चुकीचा प्रत्यक्ष खर्च नोंदविल्याचे दिसून येते.

मनपा, अमरावतीचे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतील समुह संघटकांचे मानधन देयकांची तपासणी केली असता देयकातील रक्कम चुकीची परिगणीत करुन देयकाचे प्रदान करण्यात आले. तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	कर्मचा-यांचे नांव	प्रमाणक क्रमांक व दिनांक	देयकाची रक्कम	प्रत्यक्षात बेरीज
1	श्रीमती सुषमा किनगावकर	3466, दि.6.8.2014	18375/-	
2	श्रीमती छाया खंडारे	3467, दि.6.8.2014	18375/-	
3	श्रीमती मिना वर्धेकर	3468, दि.6.8.2014	17775/-	
4	श्रीमती वनिता सौदागरे	3469, दि.6.8.2014	18375/-	
5	श्रीमती उज्वला मेश्राम	3470, दि.6.8.2014	15375/-	
6	श्रीमती प्रतिभा इंगळे	3471, दि.6.8.2014	14775/-	
		एकूण	**87675/-**	**103050/-**

सदर देयकाची बेरीज रु.103050/- येत असताना वरील तपशीलानुसार देयकाची बेरीज रु.87675/- दर्शविण्यात येवून मनपाचे लेखाशिर्ष 263 – सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतील मंजूर अनुदान रु.26,00,000/- मधून रु.87675/- एवढे अनुदान खर्ची पडल्याचे दर्शविण्यात आले. रोखपुस्तकाची तपासणी केली असता पृ.क्र.134, दि.6.8.2014 नुसार प्रत्यक्षात रु.103050/- चे प्रदान करण्यात आले. परंतू अनुदानाच्या तपशीलात सदर देयकातील रक्कम चुकीची दर्शविण्यात आल्यामुळे मनपाचा झालेला प्रत्यक्ष खर्च व दर्शविण्यात आलेला खर्च यामध्ये तफावत येत असून अंदाजपत्रकातील प्रत्यक्ष आकडेवारीमध्येसुध्दा चुकीचा प्रत्यक्ष खर्च नोंदविल्याचे दिसून येते. सबब लेख्यात सुधारणा करुन अनुपालन सादर करावे.

DATDSTM7301 (Ref No : 175)

61 महानगरपालिकेच्या आरोग्य तसेच कर विभागातील आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार परिपूर्ण व आवश्यक नोंदी न घेतल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 0

लेखा शीर्ष :00 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

मनपाचे आरोग्य व कर विभागातील कर्मचा-यांचे महाराष्ट्र नागरी सेवा सर्वसाधारण शर्ती नियम १९८१ मधील क्र. 16, 38 व 45 नुसार प्रत्येक सेवा विषयक घटनेची नोंद सेवापुस्तकात घेणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारच्या नोंदी सेवापुस्तकामध्ये घेण्यात आल्या नाही. संगणक परीक्षा उत्तीर्ण असल्याची नोंद सेवापुस्तकात नसतांना वेतनवाढी मंजूर करणे तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसतांना पदोन्नतीचा लाभ देणे इत्यादी प्रकारच्या अनियमितता लेखापरीक्षणा दरम्यान आढळून आल्या.

महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभाग तसेच वित्त विभागाने कर्मचाऱ्यांचे सेवाविषयक बाबीसबंधी वेळोवेळी अधिसूचना तसेच शासन निर्णय निर्गमित केले असून त्यानुसार कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तकात आवश्यक नोंदी घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार सेवाविषयक घटनेची नोंद सेवा पुस्तकात घेणे आवश्यक असून अमरावती महानगर पालिकेचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणा दरम्यान आरोग्य व कर या विभागातील कार्यरत कर्मचाऱ्याच्या निवडक सेवापुस्तकांची तपासणी केली असता सेवापुस्तके अद्यावत नसल्याचे आढळून आले. यासंबधाने पुढील तरतुदी असणे आवश्यक आहे.

1. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. मभाप-1002 /प्रक्र 38 /02/ 20ब दिनांक

8.05.2003 तसेच सामान्य प्रशासन विभागाचे दि.30.12.1987,दि.7.02.2001,व दि.1.01.1993 नुसार आदेश अधिसूचना परिपत्रके निर्गमित केले असून एतदर्थ मंडळाच्या मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळणे याबाबतचे संबधित कार्यालयाचे नियुक्ती अधिकारी यांनी आदेश काढून सेवापुस्तकात तशी नोंद घेणे आवश्यक आहे.

2. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती)नियम 1981 मधील नियम क्र.38 नुसार वेतन वाढीची नोंद सेवापुस्तकामध्ये घेतांना सक्षम अधिकाऱ्याने वेतन वाढी मंजुरीबाबत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

3. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती)नियम 1981 मधील नियम क्र.38 नुसार रजेची नोंद नियमित सेवापुस्तकात घेणे आवश्यक आहे. रजा मंजुरीच्या नोंदी सेवापुस्तकात घेण्यात आल्या परंतु मंजुरीबाबत विभाग प्रमुखाची स्वाक्षरी नाही.

4. . महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती)नियम 1981 मधील नियम क्र.45 नुसार सेवापुस्तकाची पडताळणी प्रत्येक वर्षीच्या मे महिन्यात होणे आवश्यक आहे. परंतु अश्या प्रकारची पडताळणी केल्याचे दिसून आले नाही.तसेच काही सेवा पुस्तकातील नोंदी अद्यावत नसल्याचे आढळून आले.

5. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती)नियम 1981 मधील नियम क्र.16 नुसार कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी झाली आहे आणि तो पात्र आहे असे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्याविषयीची नोंद सेवा पुस्तकात घेणे आवश्यक आहे..

लेखापरीक्षणा दरम्यान सेवापुस्तकात आढळून आलेल्या त्रुट्या खालीलप्रमाणे आहेत-

अ.क्र.	कर्मचाऱ्यांचे नांव व पदनाम	नियुक्तीचा दिनांक	सेवापुस्ताकातील नोंदी नसलेल्या बाबी
1	2	3	4
1	श्री.विक्रांत सुरेश राजूरकर, सहा वै.अ.	01.02.2005	1) मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 2) संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 3) नामनिर्देशनाची प्रत सेवापुस्तकासोबत जोडली नाही. 4) वैद्यकीय तपासणीची नोंद सेवापुस्तकात नाही. 5) पोलीस पडताळणी झाल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही अथवा तसे प्रमाणपत्र सेवापुस्तकात जोडलेले नाही. 6) जात पडताळणी प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही.

DRAFT

			7) स्थायित्व प्रमाणपत्राची नोंद नाही.
2	श्री.फिरोजखान असदखान, इंचार्ज हकीम	01.02.2002	1) मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 2) संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 3) नामनिर्देशनाची प्रत सेवापुस्तकासोबत जोडली नाही. 4) वैद्यकीय तपासणीची नोंद सेवापुस्तकात नाही. 5) पोलीस पडताळणी झाल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही अथवा तसे प्रमाणपत्र सेवापुस्तकात जोडलेले नाही. 6) जात पडताळणी प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही. 7) स्थायित्व प्रमाणपत्राची नोंद नाही.
3	डॉ.प्रतिभा कृष्णराव आत्राम	11.09.2002	1) मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 2) संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 3) नामनिर्देशनाची प्रत सेवापुस्तकासोबत जोडली नाही. 4) जात पडताळणी प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही. 5) स्थायित्व प्रमाणपत्राची नोंद नाही.
4	श्री.शरीफ रजा मोहम्मद इशांक, एमपीडब्लू	24.01.1986	1) मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 2) संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 3) नामनिर्देशनाची प्रत सेवापुस्तकासोबत जोडली नाही. 4) पोलीस पडताळणी झाल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही अथवा तसे प्रमाणपत्र

DRAFT

			सेवापुस्तकात जोडलेले नाही. 5) स्थायित्व प्रमाणपत्राची नोंद नाही.
5	श्रीमती विद्या रामेश्वर बारसे, पीएचएन	10.07.2008	1) मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 2) संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 3) नामनिर्देशनाची प्रत सेवापुस्तकासोबत जोडली नाही. 4) वैद्यकीय तपासणीची नोंद सेवापुस्तकात नाही. 5) पोलीस पडताळणी झाल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही अथवा तसे प्रमाणपत्र सेवापुस्तकात जोडलेले नाही. 6) स्थायित्व प्रमाणपत्राची नोंद नाही.
6	श्रीमती वैशाली भरत शेंडे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ.	22.02.2008	1) मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 2) संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 3) नामनिर्देशनाची प्रत सेवापुस्तकासोबत जोडली नाही. 4) वैद्यकीय तपासणीची नोंद सेवापुस्तकात नाही. 5) पोलीस पडताळणी झाल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही अथवा तसे प्रमाणपत्र सेवापुस्तकात जोडलेले नाही. 6) स्थायित्व प्रमाणपत्राची नोंद नाही.
7	श्री.सुधीर श्यामराव कडू, एमपीडब्लू.	7.01.1985	1) मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 2) नामनिर्देशनाची प्रत सेवापुस्तकासोबत जोडली नाही. 3) वैद्यकीय तपासणीची नोंद सेवापुस्तकात नाही. 4) पोलीस पडताळणी झाल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही अथवा तसे प्रमाणपत्र सेवापुस्तकात जोडलेले नाही.

DRAFT

8	श्री.प्रदीप मोतीराम बन्सोड, एमपीडब्लू	5.01.1985	1) मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 2) संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 3) नामनिर्देशनाची प्रत सेवापुस्तकासोबत जोडली नाही. 4) वैद्यकीय तपासणीची नोंद सेवापुस्तकात नाही. 5) पोलीस पडताळणी झाल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही अथवा तसे प्रमाणपत्र सेवापुस्तकात जोडलेले नाही.
9	श्री.भीमराव नारायण जोगी, मोहरील (कर विभाग)		1) मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 2) संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 3) नामनिर्देशनाची प्रत सेवापुस्तकासोबत जोडली नाही. 4) वैद्यकीय तपासणीची नोंद सेवापुस्तकात नाही. 5) पोलीस पडताळणी झाल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही अथवा तसे प्रमाणपत्र सेवापुस्तकात जोडलेले नाही. 6) जात पडताळणी प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही. 7) स्थायित्व प्रमाणपत्राची नोंद नाही.
10	श्रीमती सविता पाटील, कनिष्ठ लिपिक (कर विभाग)		1) मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 2) नामनिर्देशनाची प्रत सेवापुस्तकासोबत जोडली नाही. 3) वैद्यकीय तपासणीची नोंद सेवापुस्तकात नाही. 4) पोलीस पडताळणी झाल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही अथवा तसे प्रमाणपत्र सेवापुस्तकात जोडलेले नाही.
11	श्री.नरेन्द्रकुमार भास्कर	2.01 1985	1) मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून

DRAFT

	केचे, एमपीडब्लू		सूट मिळाल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 2) संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याची नोंद सेवापुस्तकात नाही. 3) नामनिर्देशनाची प्रत सेवापुस्तकासोबत जोडली नाही. 4) वैद्यकीय तपासणीची नोंद सेवापुस्तकात नाही. 5) पोलीस पडताळणी झाल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही अथवा तसे प्रमाणपत्र सेवापुस्तकात जोडलेले नाही.

वर नमूद प्रकरणे नमुन्यादाखल असून सर्व सेवा पुस्तकात आवश्यक नोंदी घेऊन व तसे केल्याचे प्रमाणपत्रासह अनुपालन सादर करावे.

DATVVBM6301 (Ref No : 33)

62 सार्वजनिक संडासाची दुरुस्तीमधील अनियमिततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :200 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 3222624.00 /-

मनपाचे सार्वजनिक संडासाच्या दुरुस्तीचे प्रथम धावते देयकाची तपासणी केली असता निविदेतील अटी व शर्तींनुसार कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. मोजमाप पुस्तिकेवर दिनांक नमुद नाही. कंत्राटदाराने गौण खनिजाबाबत नाहरकत प्रमाणपत्र संबंधित अभियंत्यांकडे सादर केल्याचे दिसून येत नाही. तसेच अंदाजपत्रकातील नमुद बाबींपेक्षा 25% चे वरील कामाकरीता सुधारित प्राकलन तयार करुन सुधारित तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी घेण्यात आली नाही.

मनपा, अमरावतीचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणात लेखाशिर्ष-200 "सार्वजनिक संडासाची दुरुस्ती" मधून मनपाचे हद्दीतील सार्वजनिक संडासाच्या दुरुस्तीकरिता निविदा प्रक्रिया करुन सदर कामाचा कार्यादेश कंत्राटदार जुबेर सैफी यांना देण्यात आला. कामाचा कालावधी निविदेनुसार सहा महिन्यांचा ठरविण्यात आला. सदर कामाचे प्रथम धावते देयक प्रमाणक क्र.7008(2), दिनांक 28.10.2014, रक्कम रु.32,22,623/- नुसार मंजूर करण्यात आले आहे. याबाबतचा अभिलेख तपासला असता खालील त्रुटी आढळून आल्यात :-

1. मोजमाप पुस्तिका क्र.158, पृ.क्र.84 ते 95 मधील मोजमापासमोर दिनांक नमूद करणे आवश्यक असताना दिनांक नमूद केलेला नाही.

2. बाब क्र.13,31,34 मधील काम हे प्राकलनापेक्षा बरेच ज्यादा झालेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

Item No.	दर	प्राकलनाप्रमाणे परिमाण	मोजमाप पुस्तिकेतील परिमाण	एकूण मुल्यांकन	प्राकलनापेक्षा कमी/जादा %
13	4409.40	30 Cum	63.15 Cum	278453.61	110% जादा
31	2294.25	200 Sqm	559.93 Sqm	1284619.40	180% जादा
34	96600	3 Cum	3.91 Cum	377706	30% जादा

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 2004/प्र.क्र.85/रस्ते 1, दिनांक 11.6.2004 मधील परिच्छेद क्र.3.4 व 3.5 नुसार वरील तक्त्यामधील कामाचे बाबनिहाय 25 टक्केचे वरील परिमाणाकरिता सुधारित प्राकलन (Estimate) तयार करण्यात आले नसून सुधारित तांत्रिक/प्रशासकीय मंजूरी घेतल्याचे दिसून येत नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.128, दिनांक 16.4.2018 नुसार खुलासा मागविला असता अनुपालन प्राप्त झाले नसल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 128)

68 रमाई आवास योजनेतंर्गत मंजूर प्रकरणातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :363 शासन निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 200000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 200000.00/-

महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, शासन निर्णय क्र. बीसीएच-2009/प्र.क्र. 159/ मावक-2 दि.9.03.2010 नुसार रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्याचे सर्वेक्षण करणे, योजनेचे मार्गदर्शन करणे, निवड झालेल्या लाभार्थ्याचे प्रकरण तयार करणे, जुन्या कच्च्या घराचे व जागेचे मोजमाप करणे तसेच नवीन घराचा आराखडा तयार करणे इत्यादीसाठी मानधन तत्वावर स्थायी समिती ठराव क्र. 223 दि.31.01.2012 नुसार मंजूरी दिल्यानुसार मे.पेव्हटेक कंसल्टंट पुणे यांची प्रकल्प व्यवस्थापक नेमणूक केली असून व्यवस्थापकाने सादर केलेल्या Biometric Survery अहवालात त्रुटया असतांनासुध्दा लाभार्थीला योजनेचा अनियमित लाभ दिल्याचे दिसून आले.

महानगरपालिका अमरावती अंतर्गत कार्यकारी अभियंता-2 या विभागाकडील अनुसुचीत जाती व नवबौध्द घटकासाठी रमाई आवास घरकुल योजने अंतर्गत लाभार्थींना वाटप करण्यात आलेल्या घरकुल प्रकरणाची पडताळणी केली असता महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, शासन निर्णय दिनांक 9.03.2010 नुसार रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करणे, योजनेचे मार्गदर्शन करणे, निवड झालेल्या लाभार्थ्यांचे प्रकरण तयार करणे, जुन्या कच्च्या घराचे व जागेचे मोजमाप करणे तसेच नवीन घराचा आराखडा तयार करणे इत्यादी प्रकरणी शासन निर्णयानुसार कार्यवाही झाली नसल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झाले आहे.

याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे:-

1. रमाई आवास योजना अंतर्गत श्रीमती शकुंतला शामराव बागडे घर क्र. 1316 वार्ड क्र.72 दारिद्र्य रेषेखालील क्रमांक 18656 माताफैल जुनी वस्ती यांना घरकुलाचे बांधकामासाठी निधी वाटप करण्यात आला. त्यांना निधीचे वाटप खालीलप्रमाणे केले आहे.

प्रथम हप्ता 50% रु. 1,00,000/- प्रमाणक क्र. 606 दिनांक 17.04.2013

दुसरा हप्ता 40% रु. 80,000/- प्रमाणक क्र.9623 दिनांक 4.02.2014

तिसरा हप्ता 5% रु. 10,000/- प्रमाणक क्र. 841 दिनांक 30.08.2014

घर टॅक्स पावती लाभार्थीच्या नावाने नाही. असे असतांना पेव्हटेक कसंल्टंट, पुणे यांनी Biometric Survey मध्ये स्वत:ची जागा असल्याचे प्रमाणित केले आहे.

2. सदर कामाचा प्रतिज्ञालेख पेव्हटेक कसंल्टंट, पुणे यांनी प्रमाणित केलेला नाही.
3. लाभार्थीचे नाव श्रीमती शकुंतला शामराव बागडे असून बि. पी. एल. प्रमाणपत्र श्रीमती शकुंतला शामराव बगले नावाचे सादर केलेले आहे.
4. Biometric Survey चा प्रथम अहवालासोबत जोडलेला जुन्या घराच्या फोटोमध्ये बाधंकाम असलेले घर सिमेंट, विटा व स्लॅबचे असल्याचे दिसून येते. असे असतांना पेव्हटेक कसंल्टंट, पुणे यांनी Biometric Survey अहवालात लाभार्थ्यांचे घर कच्चे बांधकाम असल्याचे दर्शविले असून योजनेची 50% रक्कम रु.100000/- चा निधी वितरीत करण्यात आला.

5.योजनेचा 40% निधी मंजूर करतेवेळी बांधकामाचा प्रगती अहवाल सादर करतांना सादर केलेल्या फोटोमध्ये दाराची फ्रेम लाकडी असून बाजूलाच पक्के बांधकाम असल्याचे फोटोत दिसते. तसेच दुस-या फोटोत खिडकीला लावलेली लोखडी ग्रीलची डिझाईन वेगळी असून अंतीम अहवालासोबत सादर केलेल्या फोटोमध्ये ग्रीलची डिझाईन वेगळी दिसून येते. सादर केलेल्या बांधकाम फोटोमध्ये दर्शनी भागामध्ये खिडकी डाव्या बाजूला असून अंतीम अहवालासोबत सादर केलेल्या फोटोमध्ये खिडकी दर्शनी भागाच्या उजवीकडे असून दरवाज्याची फ्रेम सिमेंटची दिसत आहे. बांधकामध्ये बदल दिसून येत असून पेव्हटेक कसंल्टंट पुणे यांनी सादर केलेला अहवाल चुकीचा असतांना सुध्दा मनपाच्या कार्यकारी अभियंता-2 यांनी कुढलीही खातरजमा न करता योजनेचा लाभ दिल्याची शक्यता वाटते.

6. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय परिपत्रक क्र. सीबीएस-10/2010/ प्र.क्र. 356/मावक-5 दिनांक 12.08.2010 नुसार जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच पात्र लाभधारकास सदनिकेचा ताबा देणे अपेक्षित आहे. परंतु लाभार्थ्यांने जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्राची पडताळणी न करताच घरकुलाचा ताबा दिल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झाले आहे.

DRAFT

याबाबत अर्धसमास पत्र क्र.135 दि.16.04.2018 व पत्र क्र. 171 दि.05.05.2018 अन्वये आवश्यक ते अभिलेख्यासह खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु संबंधीत विभागाकडून आवश्यक अभिलेख व आक्षेपित मुद्यावरील खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे

DATDUBM6401 (Ref No : 171)

74 बांधकाम विभागातील सन 2014-15 चा आकस्मिक खर्चाचा अभिलेख लेखापरीक्षणास सादर न करणे तसेच मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :216 म.न.पा. निधी

अनियमितता कलम : 9ङ

गुंतलेली रक्कम रु. 1163600.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1163600.00/-

बांधकाम विभागाचे लेखाशिर्ष-216 - आकस्मिक खर्च मधून रु.11,63,000/- एवढा खर्च करण्यात आला असून सदर खर्चाबाबतचा अर्धसमास पत्राव्दारे तसेच फोनव्दारे वारंवार अभिलेखाची मागणी करुनही कोणताही अभिलेख लेखापरीक्षणास सादर करण्यात आला नाही. तसेच अंदाजपत्रकात मंजूर तरतुद रु.8,00,000/- असताना रु.11,63000/- एवढा खर्च करण्यात आला असून तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास सर्वसाधारण सभेची मंजूरी घेतली किंवा कसे ते समजून येत नाही.

मनपा, अमरावतीचा बांधकाम विभागाचा सन 2014-15 चा आकस्मिक खर्च (लेखाशिर्ष-216) रु.11,63,600/- एवढा झालेला असून सदर खर्चाबाबतचा संपूर्ण अभिलेख, नस्ती, प्रमाणके, निविदा प्रक्रिया, शासन निर्णय, ठराव इ.अभिलेख लेखापरीक्षणास तपासणीस त्वरीत सादर करणेबाबत अर्धसमास पत्र क्र.56, दिनांक 23.2.2018 नुसार तसेच वारंवार फोनव्दारे अभिलेखाची मागणी करण्यात आली. तसेच अर्धसमास पत्र क्र.90, दिनांक 28.3.2018 नुसार पुन:श्च अभिलेखाची मागणी करुनही अभिलेख सादर करण्यात आला नाही.

सन 2014-15 चे सुधारित अंदाजपत्रकात लेखाशिर्ष 216 - बांधकाम आकस्मिक खर्चाकरिता रु.8,00,000/- अनुदान मंजूर असतांना सन 2014-15 चा प्रत्यक्ष खर्च रु.11,63,600/- इतका दर्शविण्यात आला. याबाबत लेखापरीक्षणास कोणताही अभिलेख तपासणीस सादर केला नसून अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास सर्वसाधारण सभेची मंजूरी प्राप्त केली किंवा कसे हे समजून येत नसल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 90)

75 महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी मनपास बंधनकारक असलेल्या प्रशासकीय सुधारणात्मक बाबींवर अंमल न होणेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :318 शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी शासन अनुदानासह मनपाचा हिस्सा आवश्यक आहे. त्या दृष्टीने मनपा आर्थिक व प्रशासकीयदृष्ट्या सक्षम होण्यासाठी काही सुधारणांच्या अंगीकार करण्यास मनपास बंधनकारक केले आहे. परंतु त्यापैकी महत्वाच्या सुधारणा म्हणजेच मालमत्ताकराचे पुनःमुल्यांकन व 80% वसुली ई-गव्हर्नन्स, घनकचरा व्यवस्थापन, द्विनोंद लेखापद्धती यावर पुरेशी अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे योजनेचा हेतू साध्य होण्यास अडथळा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शा.नि. क्र. एमयुआर-2008/प्र.क्र.203/नवि-33, दि.20.02.2010 अन्वये नागरी भागांच्या दीर्घकालीन गरजांचा विचार करून त्यांचा सुनियोजित विकास साधण्याच्या दृष्टीने "महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महा अभियान" नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मार्फत राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या महाअभियानांतर्गत राज्य शासन व मनपाचा हिस्सा या माध्यमाने निधीची उभारणी करण्यात येते.

सदरचे सर्वसमावेशक महाभियानाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :-

1. शासनाच्या विहित मानकाप्रमाणे शहरात विविध मुलभूत सुविधा पुरविणे.
२. शैक्षणिक व आरोग्य विषयक पायाभूत सुविधांची निर्मिती करणे.
3. शहरातील सामाजिक सुविधा व सौंदर्य आकर्षणामध्ये वृद्धी करणे.

उपरोक्त उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थाना त्या प्रशासकीय व आर्थिकदृष्ट्या मजबूत असणे आवश्यक असल्याने त्यासाठी वर नमूद दि. 20.02.2010 चा शासन निर्णय तसेच शासन निर्णय क्र. नगरो-2014/प्र.क्र. 119/ नवि-33 दि. 21.08.2014 अन्वये काही सुधारणांचा अंगीकार करणे स्थानिक स्वराज्य संस्थाना बंधनकारक करण्यात आले आहे. त्या सुधारणांचा लेखापरिक्षणादरम्यान आढावा घेण्यात आला.

या महाअभियानाची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी मनपास प्रशासकीय व आर्थिकदृष्ट्या मजबूत असणेसाठी ज्या सुधारणात्मक बाबी बंधनकारक करण्यात आल्या आहेत त्या सुधारणा प्रत्यक्षात परिपूर्णरित्या करण्यात आल्या नाहीत, असे आढळून आले. सदर वस्तुस्थिती मनपा आयुक्तांनी नगरपरिषद

प्रशासन संचालनालयास सादर केलेल्या अहवालावरूनही अधोरेखित झाली आहे (अहवाल-पत्र क्र. अमनपा/आयु/करवि/5004/2016 /श.अ. दि. 17.03.2016).

त्यापैकी महत्वाच्या आवश्यक सुधारणा व त्याची प्रत्यक्षात पूर्तता/अंमलबजावणीची स्थिती पुढील प्रमाणे आहे.

1. महानगरपालिकेच्या कामकाजाचे ई-गव्हर्नन्स,लेखा, जन्म-मृत्यू नोंद या बाबी संदर्भात 100% संगणकीकरण करणे.

अंमलबजावणी - ई-गव्हर्नन्स - मनपा आयुक्त यांनी विधी अधिकारी मनपा अमरावती यांना पाठविलेले पत्र/आदेश क्र. अमनपा/साप्रवि/आयुक्त/6437/2018 दि. 02.04.2018 नुसार ई-गव्हर्नन्स प्रकल्पावरील झालेल्या कामाचा मनपातील कोणत्याही विभागास फायदा झाला नाही व त्यामुळे आर्थिक फसवणूक होऊन झालेला खर्च रु. 1.33 कोटी व्यर्थ ठरला आहे.

अभिप्राय - ई-गव्हर्नन्स या प्रशासकीय सुधारणेचा 100% अंमल झाला नाही.

2. उपभोक्ता कर वसुली 80% होणे आवश्यक आहे.

अंमलबजावणी- मनपा च्या वर उल्लेखित दि. 17.03.2016 च्या पत्रानुसार मालमत्ता कराची वसुली 80% न होता अधिकतम 55.60% एवढीच झाली आहे.

वर्षवार वसुली पुढीलप्रमाणे आहे :

अनु.क्र.	वर्ष	वसुलीची टक्केवारी
1	2012-2013	48.64
2	2013-2014	42.07
3	2014-2015	47.01
4	2015-2016	55.60

अभिप्राय :- मालमत्ता कर हा मनपाच्या उत्पन्नाचा मोठा स्त्रोत असताना मागणीच्या तुलनेत उत्पन्नाची टक्केवारी खूप कमी दिसते. त्यामुळे महाअभियानाची उद्दिष्टे साध्य होण्याच्या दृष्टीने व त्यासाठी मनपा हिस्सा उभारणीच्या दृष्टीने मनपा आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्याने वित्तीय संस्थाकडील कर्जावर सदर योजनेची अंमलबजावणी अवलंबून आहे.

3. मालमत्ता कराचे पुनः मुल्यांकन करणे बंधनकारक असणे.

अंमलबजावणी - पुनःमुल्यांकन करण्यात आले नाही.

अभिप्राय :- मालमत्ता कराच्या पुनः मुल्यांकन न झाल्यामुळे वाढीव कराद्वारे प्राप्त होऊ शकणारा महसूल मनपास अप्राप्त आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास आवश्यक सुधारणेवर अंमल झालेला नाही.

DRAFT

4. घनकचरा व्यवस्थापन

अंमलबजावणी - शहरातील घराघरातून गोळा केलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी मे. इकोफिल टेक्नॉलॉजीज इंडिया प्रा.लि., नवी मुंबई या कंपनीस दि. 08.01.2014 रोजी लेटर ऑफ इंटेट देण्यात आला. पुढे सदरचे कंत्राट दि. 20.10.2015 रोजी रद्द करण्यात आले.

त्यानंतर प्रक्रिया प्रकल्पाचा डीपीआर लेखापरिक्षणाचे दिनांकापर्यंतही मंजूर करण्यात आलेला नाही.

अभिप्राय :- प्रक्रिया प्रकल्प अद्याप सुरु होणे बाकी असल्याने सदरची सुधारणात्मक बाबीची पूर्तता झालेली नाही.

5. द्विनोंद लेखा पद्धतीचा अवलंब न करणे.

अंमलबजावणी :- मनपाच्या उपरोल्लेखित दिनांक 17.03.2016 च्या पूर्तता अहवालानुसार 2010-11 ते 2014-15 मधील लेख्याचे द्विनोंद लेखापध्दतीमध्ये रुपांतर करण्यात आले असले तरी लेख्याच्या पारदर्शकतेसाठी चालू नोंदी सुध्दा याच द्विनोंद पध्दतीने घेणे आवश्यक असताना आर्थिक वर्ष संपल्यानंतर त्या नोंदीचे रुपांतर करण्यात येते असे दिसते.

अभिप्राय :- लेखाविषयक सुधारणात्मक बाबींची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

वरील वस्तुस्थितीचा विचार केल्यास महाअभियानाची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी मनपाने बंधनकारक असलेल्या प्रशासकीय व वित्तीय सुधारणाचा पुरेपूर अंगीकार न केल्यामुळे शासनाच्या योजनेचा मूळ हेतू साध्य होण्यास अडथळा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

DATABWM6901 (Ref No : 200)

86 अपंगाकरीता वैयक्तिक लाभ योजनावर विहित प्रमाणात खर्च न करण्याची अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

आक्षेपाधीन रक्कम रु. 49723512.00/-

मनपा अमरावती यांनी वर्ष 2014-15 या वर्षात प्राप्त झालेल्या महसुली उत्पन्नापैकी अपंगाकरीता वैयक्तिक लाभ योजनेकरिता 3% निधी खर्च केल्याचे दिसून आले नाही. या प्रयोजनासाठी रु.12 लाखाची तरतूद केली असताना केवळ रु.79170/- एवढाच खर्च करण्यात आला.

मनपा अमरावती येथील वर्ष 2014-15 ला लेखापरिक्षणाकारिता मनपाने उपलब्ध केलेल्या अभिलेखावरील महानगरपालिकेचा सन 2014-15 मध्ये एकूण 166 ,00,89,390/- महसुली उत्पन्न प्राप्त झाल्याचे आढळून

आले. प्राप्त झालेल्या महसुली निधीमधून अपंग व्यक्तीसाठी समान संधी सरंक्षण व समान सहभाग कायदा 1995 मधील कलम 40 , 42 व 43 नुसार महानगरपालिका क्षेत्रामध्ये वाटपास असलेल्या अपंगाकरीता वैयक्तिक लाभ योजनेवर 3% खर्च करणे आवश्यक होते. परंतु 2014-15 मध्ये महानगरपालिकेने अपंगाकरीता वैयक्तिक लाभ योजनेवर खर्च केल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे अर्धसमास पत्र क्र.153, दि.21.04.2018 ला अनुसरून समाज कल्याण अधिकारी यांनी वर्ष 2014-15 या वर्षामध्ये रु.12 लक्ष तरतूद केली व त्यामधून रु.79170 खर्च झाल्याचे कळविले.

तथापि, अपंगाकरीता वैयक्तिक लाभ योजनेवर वर्ष 2014-15 मध्ये प्राप्त झालेले महसुली उत्पन्न रु.166,00,89,390 असल्याने महसुली उत्पन्नाच्या 3% रकम रु.4,98,02,682/- खर्च करणे आवश्यक होते. परंतु मनपाने वर्ष 2014-15 यावर्षात 12 लक्ष तरतूद केली व रु.79,170/- एवढाच खर्च केलेला आहे. ही बाब शासन निर्देशाचे उल्लंघन असून विशिष्ट समाज घटकाच्या उत्थानासाठी आवश्यक निधी अन्य खर्चासाठी वळविण्यात आल्यामुळे 49802682 (-) 79170 म्हणजेच रु.4,97,23,512/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

DATVVBM6301 (Ref No : 153)

87 ऑप्टीकल फायबरसाठी मार्गाच्या हक्काच्या परवानगीचे नुतनीकरण न झाल्याने रु.1.54 कोटीच्या परवाना शुल्काची हानी होणेबाबत व 2014-15 मध्ये या प्रयोजनावरील प्राप्त रु.18.37 कोटीच्या महसुलाचे उचित लेखांकन न होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 203738932.00 /-

रस्ता खोदकामासाठी मनपास वर्ष 2014-15 मध्ये रु.18.37 कोटी प्राप्त झालेल्या महसुलाचे अंदाजपत्रकात कोणत्या लेखाशिर्षात समावेश करण्यात आले ते स्पष्ट होत नाही. विहित मुदतीत रस्ता खोदकामाचे काम पूर्ण न झाल्यामुळे शासनाकडून मार्गाच्या हक्कांचे नुतनीकरण करणे आवश्यक होते. पण ते न केल्याने नुतनीकरणपोटी संभाव्य परवाना शुल्काची हानी झाली आहे.

अमरावती मनपा क्षेत्रात ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासाठी दूरसंचार कंपन्यांना व वीजवाहिन्यासाठी तसेच अन्य प्रयोजनासाठी अन्य संस्था व खाजगी व्यक्तींना रस्ता खोदकाम करण्यास वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये मनपाकडून परवानग्या देण्यात आल्या. त्या अनुषंगाने रस्ता दुरुस्ती **खर्च शुल्काचा** सर्वसाधारण सभेने ठराव क्र. 22 दि.18/02/2014 अन्वये **ठरविलेल्या दरानुसार धनादेश व धनाकर्षा** द्वारे वसुली करण्यात आली असे रिलायन्स जियो इन्फोकॉम **लि**. या कंपनीशी सबंधित नस्तीत उपलब्ध विवरणावरून लक्षात येते.

त्यानुसार मंजुरीची एकूण प्रकरणे व प्राप्त महसूलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

वर्ष	विविध संस्थाना परवानगी दिल्याची प्रकरणे	रस्ता दुरुस्ती खर्च, मनपा परवाना शुल्क व सुपरव्हिजन शुल्काच्याद्वारे प्राप्त महसूल (रु.)
2013-14 2014-15	12 14	6,22,67,580/- 20,37,38,932/-

वरील उत्पन्नामध्ये मे. रिलायन्स जीयो इन्फोकॉम लिमिटेड यांचेकडून ऑप्टीकल फायबरसाठी रस्ता खोदकामास परवानगी देल्याचे प्रकरणात मनपास पुढीलप्रमाणे महसूल प्राप्त झाला. :-

वर्ष 2013-14

1.	परवानगी क्र.8, दि.24/09/2013 (संदर्भ मनपा क्र.1483/13 दि.10/09/2013)	रस्ता दुरुस्ती खर्च मनपा परवाना शुल्क सुपरव्हिजन शुल्क	2,96,64,000 1,04,54,040 निरंक
2.	परवानगी क्र.12, दि. 04/03/2014	रस्ता दुरुस्ती खर्च इतर	2,00,00,000 निरंक
			6,01,18,040

वर्ष 2014-15

1.	परवानगी क्र (अनुपलब्ध)	रस्ता दुरुस्ती खर्च इतर	2,91,56,501 निरंक
2.	परवानगी क्र (अनुपलब्ध)	रस्ता दुरुस्ती खर्च इतर	14,23,04,858 निरंक
3.	परवानगी क्र (अनुपलब्ध)	बँक गॅरंटी	2,00,00,000
(बँक गॅरंटी वगळून एकूण उतपन्न)			17,14,61,359

यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.:-

महाराष्ट्र शासन सा.प्र. विभाग माहिती व तंत्रज्ञान संचालनालय यांचे आदेश क्र. GAD/मा.तं.सं-065/73/2013-DIR-DIT (MH) दि. 01/11/2013 अन्वये मे. रिलायन्स जियो इन्फोकॉम ली. यांना अमरावती मनपा क्षेत्रात ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासाठी एकूण 65 मार्गांचे हक्क परवाना शुल्क आकारून (50% शासन व 50% मनपास देय) देण्यात आले होते. या परवानगीची मुदत 1 वर्षापर्यंत असून मुदतीपर्यंत काम पूर्ण न झाल्यास नुतनीकरण करणे आवश्यक करण्यात आले होते. सदर आदेशात स्पष्ट उल्लेख नसला तरी नुतनीकरणासाठी परवाना शुल्काची नव्याने आकारणी अभिप्रेत आहे.

DRAFT

या प्रयोजनासाठी अंदाजपत्रकात स्वतंत्र लेखाशीर्ष उपलब्ध नाही. अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक पुस्तकातील 2014-15 च्या प्रत्यक्ष जमा बाजूस ‘ लेखाशीर्ष 73, किरकोळ उत्पन्न’ रु. 43.38 कोटी व अनुदाने वगळता कोणत्याही अन्य लेखाशिर्षात वरील तक्त्यातील महसूला एवढ्या उत्पन्नाची नोंद नाही. मनपाने लेखाशीर्ष 73 खाली दर्शविलेल्या रु. 43.38 कोटी या उत्पन्नाचा तपशील (Break up) उपलब्ध केलेला नाही. त्यामुळे रस्ता खोदकामासाठी 2014-15 मध्ये प्राप्त झालेल्या एकूण महसूल रु. 18.37 कोटी (रु.2 कोटी बँक गॅरंटी वगळून) मनपाचा निधीमध्ये अंतिमतः जमा झाल्याची खात्री करता आली नाही.

वरील तक्त्यात रस्ता खोदकामापोटी प्राप्त झालेल्या महसूल धनाकर्ष / धनादेशाद्वारे प्राप्त झाला असून त्याच्या पावत्या व तत्सम अभिलेख उपलब्ध करण्यात आल्या नाहीत.

एकूण 65 मार्गापैकी मनपाने सन 2013-14 व 2014-15 मध्ये क्र. 2737 दि. 11/11/2013 व क्र. 1351,दि.18/07/2014 क्र.6027, दि. 05/02/2015 अन्वये अनुक्रमे 11, 6 व 23 मार्गावर खोदकामास परवानगी दिली. त्याप्रमाणे एक वर्षाचे आत खोदकाम करून काम पूर्ण होणे आवश्यक होते. परंतु अतिरिक्त शहर अभियंता, मनपा यांनी सदर कंपनीस पाठविलेल्या क्र. AMC/WD/ CE/1211/2015, दि. 06/10/2015 वरील पत्रानुसार पत्राचे दिनांकापर्यंत काम पूर्ण झाले नसल्याने खोदकामाच्या सुधारित दरामुळे निर्माण झालेल्या तफावतीची रकम भरण्यास सूचना केल्याचे दिसून येते.

यावरून शासनाच्या वरील दि. 01/11/2013 च्या परवानगी आदेशातील एकवर्ष मुदतीची अट पूर्ण झाले नसल्याचे स्पष्ट होते. (मनपाने परवानगी दिलेल्या 40 मार्गापैकी मुदतीत काम पूर्ण झालेल्या प्रकरणाच्या नस्तीत स्पष्ट उल्लेख आढळत नाही.) त्यामुळे या मार्गासाठी शासनाकडून उचित परवाना शुल्क भरून परवानाची नुतनीकरण करणे गरजेचे होते. सदर बाब मनपानेही संबंधित कंपनीच्या निदर्शनास आणून दिल्याचे आढळत नाही. पर्यायाने नुतनीकरणा अभावी परवाना शुल्काची वसुली झालेली नाही.

सन 2013-14 मध्ये मनपास मे. रिलायन्स जियो इन्फोकॉम ली. यांचेकडून परवाना शुल्कापोटी रु. 1,04,54,040/- व सन 2014-15 मध्ये निरंक उत्पन्न प्राप्त झाले (नस्तीतील उपलब्ध माहितीप्रमाणे) (मनपाने खात्री करावी) त्यामुळे नुतनीकरणा अभावी मनपाची परवाना शुल्काची तेवढीच म्हणजे रु. 1.05 कोटी (50%) व शासनाची रु. 1.05 कोटी (50%) चे हानी झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच 2014-15 मध्ये 6 व 23 याप्रमाणे एकूण 29 मार्गासाठी खोदकामास परवानगी देताना परवाना शुल्काची आकारणी केल्याचेही दिसून येत नाही.

DATABWM6901 (Ref No : 216)

88 मनपाकडील बांधकामाचा व त्यावर लावलेल्या कामगाराचा विमा न काढल्यामुळे मनपाच्या आर्थिकहिताचे व कामगारांचा विमा संरक्षण न होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 शासन व मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ड

शासनाच्या निर्देशानुसार मनपाच्या आर्थिक हिताचे संरक्षण होण्याचे दृष्टीने बांधकामाचा मनपा व कंत्राटदाराच्या नावाने शासनासकडे संयुक्त विमा काढणे आवश्यक आहे. तसेच संबंधित बांधकामावर नियुक्त कामगाराचाही शासनाकडे विमा काढणे आवश्यक आहे. असे असताना विमा संरक्षणच्या मूळ हेतू कडे दुर्लक्ष करून विमा न काढता कंत्राटदाराच्या देयकातून 1% विमा शुल्क कपात करून शासना भरणा करण्यात येत आहे.

मनपाकडील बांधकामाचा संदर्भात कंत्राटदाराच्या संपूर्ण जोखमीचे विमापत्र, उभारणी जोखिम इत्यादीसह बांधकामावर नियुक्त कामगाराचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे संदर्भात शा.नि .वित्त.विभाग क्र. विकास 1098/प्रक्र.2889/शासनहमी दि.19/08/1998 व शासनपत्र नगरविकास विभाग क्र. 1098/1357/प्र.क्र.165/98/नवी24, दि. 01/02/1999 यांना अनुसरून शासन पत्र क्र. GEN/1098/1357/प्र.क्र.165/98/नवी24, दि. 03/11/2003 अन्वये सर्व महानगरपालिका आयुक्तांना पुढील सूचना देण्यात आल्या होत्या.

1. कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडे करणे व तशी शक्तीची अट संबंधित करारनाम्यात अंतर्भूत करणे.
2. कंत्राटदराने अन्य विमा कंपनीकडून विमा उतरवल्यास त्याचा कामाच्या देयकातून विमा संचालनालयाने कळवलेली रकम वसूल करणे.
3. प्रत्येक कंत्राटी कामाच्या कार्यादेशाची प्रत शासकीय विमा निधी या कार्यालायास निर्गमित करणे.
4. विशिष्ट परिस्थितीत कंत्राटदारास कंत्राटी कामाची देय रक्कम प्रदान करण्याची आवश्यकता भासल्यास देयकातून 1% रक्कम वसूल करणे.

या वरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.:-

मनपाकडील बांधकाम, विदयुत व इतर कंत्राटी कामाचे लेखापरीक्षण करताना वरील सुचनांचे विरूद्ध कार्यपध्दती अमंलात आणली जात आहे असे दिसून आले. कामाचा विमा काढण्याचा शासकीय धोरणाचा मूळ उद्देश “बांधकामाच्या संभाव्य नुकसानीपासून मनपाचे आर्थिक सुरक्षितता व कामगारांना विमा संरक्षण पुरविणे“ हा आहे. त्यामुळे कंत्राटदारांनी बांधकामाच्या कालावधीसाठी विमा उतरविणे बंधनकारक आहे. परंतु मनपाकडील कोणत्याही कामाचा कंत्राटदारांनी विमा काढल्याचे दिसून आले नाही.

DRAFT

कंत्राटदाराने कामाचा विमा काढला नसल्यास त्यास कामाच्या मूल्याचे प्रदान करता येत नाही. परंतु विमा काढला नसतानाही विशिष्ट परिस्थितीत असे प्रदान आवश्यक असल्यास 1% विमा रक्कम कपात करणे आवश्यक आहे. म्हणजेच अपवादात्मक प्रकरणातच देयकातून रकमेचे कपात करता येत. परंतु प्रत्येक प्रकरणात 1% रक्कम कपात करण्यात येत असल्याने विमा संरक्षणापासून मनपा व कामगारांना वंचित ठेवण्यात येत असल्याचे स्पष्ट होते.

वास्तविक या योजेनेचा 'महसूल प्राप्त करणे' हा प्राथमिक हेतू नसल्याने विमा न काढता थेट 1% रक्कम कपात करण्याची कार्यवाही अयोग्य असल्याचे दिसून येते.

DATABWM6901 (Ref No : 217)

89 शासन अनुदानाच्या शिल्लक रकमेवर बँकेकडून प्राप्त व्याज रु. 37.75 लाख शासनास परत न करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :318 शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 3779935.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3779935.00/-

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत विविध विकास कामासाठी प्राप्त शासन अनुदानावर संबंधित बँकेने रु. 37.75 लाख एवढे व्याज खात्यामध्ये जमा केले आहे. सदर रकम शासन अनुदान किंवा मनपा निधीचा भाग नसताना शासनास परत करण्यात आलेले नाही.

अमरावती मनपास महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत शहरात विविध विकास का करण्यासाठी राज्य शासनाकडून 2012-13 पासून वेळोवेळी अनुदान प्राप्त झाले आहे. सदरच्या अनुदानासा मनपाने HDFC बँकेत क्र.50100016663977 वर स्वतंत्र खाते उघडले आहे.

सदर खाते पुस्तकानुसार मनपास शासनाकडून प्राप्त झालेला निधी व शिल्लक रकमेवर बँकेकडून वेळोवेळी प्राप्त झालेले व्याज पुढील प्रमाणे आहे.

अ.क्र.	दिनांक	प्राप्त अनुदान (रु.)	बँकेकडून प्राप्त व्याज (रु.)
1	12.04.2012	85.00,000	--
2	23.11.2012	7,62,00,000	--
3	25.06.2013	7,62,00,000	--
4	28.09.2013	1,11,10,000	--
5	30.09.2013	--	7,88,258
6	31.03.2014	--	20.26.952

7	30.09.2014	--	6,28,801
8	31.03.2015	--	70,099
9	01.10.2015	--	2.61.825
एकूण			**37,75,935/-**

यावरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1. शासनाने मनपाच्या बांधकामाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अनुदानाचे वाटप केले असले तरी मनपाच्या बँक खात्यावर अनुदानाच्या रकमेवर जमा झालेले व्याज हे शासन अनुदानाचा तसेच मनपाच्या उत्पन्नचा भाग होत नाही. त्यामुळे सदर व्याजाची रकम शासनास परत करणे आवश्यक होते. परंतु दि.30.09.2013 ते 01.10.2015 पर्यंत जमा झालेले व्याज रु.37,79,935/- अद्याप शासनास परत करण्यात आलेले नाही. त्यामुळे शासनाच्या अधिकारातील रकम मनपाने अकारण बँकेत अडकवून ठेवली असल्याचे स्पष्ट होते.

2. या संदर्भात मनपास खुलासा मागविला असता तो प्राप्त झालेले नाही. सबब सदर शासन महसुलाचा गैरविनियोग टाळण्याच्या दृष्टीने रु.37.75 लाख शासन खात्यात भरणा करून अनुपालन सादर करावे. तसेच विविध योजनांसाठी शासनाकडून प्राप्त अनुदानांसाठी ठेवलेल्या विविध बँक खात्यांवर जमा असलेल्या व शासनास परत केलेल्या व्याजाचा तपशील व सर्व बँक खाते पुस्तके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे त्याचाही आढावा घेऊन वरीलप्रमाणे अत्यावश्यक कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

DATABWM6901 (Ref No : 195)

90 उचित स्पर्धा न होता बांधकामाच्या एकल निविदा (Singal tender) स्विकारणे बाबत व रु. 50 लाखावरील निविदांना स्थायी समितीने स्विकृती देणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 मनपा व शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 57779934.00 /-

निविदा प्रक्रियेत उचित स्पर्धा होण्यासाठी किमान तीन निविदा आवश्यक असताना एक निविदा प्राप्त होऊन फेरनिविदा न बोलविता ती स्विकृत करणे व रु.50 लाखावरील निविदांना सर्वसाधारण सभेऐवजी स्थायी समितीने मंजुरी देणे या अनियमितता आढळून येतात.

सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील नियम क्र.204, 208 व 210 मधील तरतुदीनुसार कोणत्याही बांधकामाच्या निविदा प्रक्रियेमध्ये उचित स्पर्धा होऊन मनपास किफायतशीर दराचा लाभ होण्याच्या दृष्टीने किमान निविदा प्राप्त होणे आवश्यक आहे.

मनपा अमरावतीच्या स्थायी समितीच्या ठराव पुस्तिकातील इतिवृतांचे वाचन करताना त्यामधील उताऱ्यानुसार काही बांधकामासाठी मागविलेल्या ई-टेंडरच्या अनुषंगाने एकच निविदा प्राप्त झाल्याचे व ती स्विकृत करण्यात आल्याचे निदर्शनास आले. या संदर्भात किमान तीन निविदांच्या अटीची पूर्तता झाली किंवा कसे याची खातरजमा करण्यासाठी अर्धसमासाद्वारे आयुक्त, मनपा यांचे निदर्शनास आणून खुलासा मागविण्यात आला होता. परंतु खुलासा व संबंधित नस्त्या प्राप्त झाल्या नाहीत.

त्यामुळे पुढील कामाच्या बाबतीत नियमबाह्यपणे केवळ एक निविदा प्राप्त होऊन ती स्विकारल्यामुळे स्पर्धात्मक दराच्या लाभ झाला नाही अशी शक्यता आहे.

(रकमा रुपयांत)

अ. क्र.	स्थायी समिती ठराव क्र.	कामाचे नाव	प्राकलन मूल्य	कंत्राटदार व त्यांचा निविदा दर	वाटाघाटीनंतर स्विकृत निविदा दर
1	150 18/02/2015	कौंडेश्वर ऑक्ट्राय नाका येथे बस डेपोचे बांधकाम (JNNURM)	15763933	गुजर सैफी 12% जादा	9.5% जादा
2	65 07/06/2013	जुना ऑक्ट्राय नाका येथे एल.बी.टी. इमारत बांधणे	17162781	गुजर सैफी 12% जादा	9.5% जादा
3	165 26/02/2015	प्रभाग क्र.12 मध्ये विविध कामे करणे	4970644	सुनील चांडक 14.51% जादा	9.00% जादा
4	166 26/02/2015	प्रभाग क्र.15 मध्ये विविध कामे करणे.	4970644	एस.एम. खंडेलवाल 14.49% जादा	9.00% जादा
5	167 26/02/2015	प्रभाग क्र.13 मध्ये विविध कामे करणे.	4970644	एस.एम. खंडेलवाल 14.49% जादा	9.00% जादा
6	168 26/02/2015	प्रभाग क्र.02 मध्ये विविध कामे करणे.	4970644	सुनील चांडक 14.51% जादा	9.00% जादा
7	169 26/02/2015	प्रभाग क्र.33 मध्ये विविध कामे करणे.	4970644	राजीव मित्तल 12% जादा	9.00% जादा

2. महाराष्ट्र मनपा अधिनियमातील प्रकरण 7 (संविदा) कलम 73(क) नुसार रु.25 लाख ते 50 लाखापर्यंत संविदा करण्यापूर्वी स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे. परंतु त्यावरील म्हणजेच रु.50 लाखावरील

कामाचे बाबतीत वित्तीय अधिकार सर्वसाधारण सभेकडे असल्याने क्र.1 वरील तक्त्यातील प्रथम व दुसऱ्या क्रमांकावरील अनुक्रमे रु.1.57 कोटी व रु.1.71 कोटीच्या निविदा स्विकृतीस स्थायी समितीने दिलेली मंजुरी अनियमित ठरते.

DATABWM6901 (Ref No : 178)

97 एकाच कामाच्या नऊ देयकांच्या मोजमापाच्या नोंदी एका मोजमाप पुस्तिकेत व त्याच्या गोषवाऱ्यांसह प्रदानाच्या नोंदी अन्य पुस्तिकेत घेण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 43230776.00 /-

कामाच्या मोजमाप नोंदवहया अत्यंत काळजीपूर्वक व अचूक ठेवणे आवश्यक असून दुबार प्रदान टाळण्याच्या दृष्टीने कोणत्याही कामाच्या तपशीलवार मोजमाप नोंदी, मोजमापाचा गोषवारा, प्रदानार्थ मंजुरी आदेश या सर्व बाबी एकाच मोजमाप पुस्तिकेत सलग नोंदविणे आवश्यक असताना नगरोत्थान महाभियानातर्गत 'बाबा रेस्टॉरंट ते लेखुमल मिठीवाला चौक' या रस्त्याच्या सुधारणेच्या कामाच्या एकूण नऊ देयकांच्या तपशीलवार नोंदी मोजमाप पुस्तिका क्र.57 व त्याच्या गोषवारासह प्रदानार्थ मंजुरी आदेश पुस्तिका क्र.59 मध्ये नोंदविलेले आहेत.

प्रमाणक क्र.366 दि.23.04.2014, रु.28,88,168/- 'बाबा रेस्टॉरंट ते लेखुमल मिठीवाला चौक या रस्त्याची सुधारणा' हे रु.3,74,52,500/- प्राकलन मूल्याचे काम मे.एस.एल.खत्री या कंत्राटदारास दि.22.04.2013 च्या कार्यादेशान्वये 7.09% कमी दराने देण्यात आले. सन 2014-15 या लेखापरिक्षण वर्षात कामाचे पाचवे व सहावे धावत्या देयकाच्या प्रदानासह सन 2016-17 पर्यंत एकूण नऊ देयकान्वये रु.4,32,30,776/- चे प्रदान करण्यात आले. या कामासाठी दोन मोजमाप पुस्तिका ठेवण्यात आल्या असून त्यावरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील परिशिष्ट 24 मध्ये मोजमाप नोंदवहया ठेवण्याबाबतचे नियम मांडण्यात आले आहेत. त्यामधील निर्देशांचे पालन करण्यात आल्याचे दिसत नाही. मोजमाप नोंदवहया न्यायालयात पुरावा म्हणून दाखल कराव्या लागण्याची शक्यता असल्यामुळे त्यांना अतिशय महत्वाचे लेखाविषयक अभिलेख म्हणून समजण्यात येते. त्यामुळे त्या अत्यंत काळजीपूर्वक, व्यवस्थितपणे व अचूकपणे ठेवणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेतल्यास मोजमापाच्या नोंदी, त्यांचा गोषवारा व त्यावरील प्रदानार्थ मंजुरीचे आदेश (स्वाक्षऱ्या) या सर्व बाबी एकाच मोजमाप पुस्तिकेत सलगपणे असणे अभिप्रेत आहे, जेणे करून दुबार प्रदानाची शक्यता पूर्णपणे टाळता येऊ शकते.

परंतु सदर बांधकामाच्या एकूण नऊ देयकांच्या मोजमापांच्या तपशीलवार नोंदी मोजमाप पुस्तिका क्रमांक 57 मध्ये व मोजमापाचे गोषवारे (प्रदानार्थ मंजुरीसह) 59 मध्ये नोंदविण्यात आले आहेत. देयकाचे प्रत्यक्ष प्रदान झाल्यावर मूळ नोंदीवर (पुस्तिका क्र.57) तशा नोंदी घेतलेल्या नाहीत.

सदरची पध्दत चुकीची असून मूळ नोंदीच्या आधारे रकमांची दुबार व अनियमित उचल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

DATABWM6901 (Ref No : 222)

98 श्री.सुहास चव्हाण, उपअभियंता यांना पूर्वलक्षी प्रभावाने दिलेल्या पदोन्नतीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :392 म.न.पा. निधी
अनियमितता कलम : 9ड

श्री.सुहास नंदकिशोर चव्हाण यांची कनिष्ठ अभियंता या विमुक्त जाती भटक्या जमातीचे राखीव पदावर नियुक्ती करण्यात आली असून सेवापुस्तकात जात पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही. जात पडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध नसताना विजा/भज या संवर्गात पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नती देण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही. यासंबंधाने बिंदुनामावलीची मंजूर प्रत लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही.

मनपा, अमरावतीचे बांधकाम/सामान्य प्रशासन विभागातील कर्मचा-यांचे सेवापुस्तकांची पडताळणी केली असता श्री.सुहास नंदकिशोर चव्हाण यांचे सेवापुस्तकात खालील त्रुटी आढळून आल्यात :-

1. मनपा, अमरावतीचे नियुक्ती आदेश क्र.अमनपा/साप्रवि/1915/2002, दिनांक 2.9.2002 नुसार श्री.सुहास नंदकिशोर चव्हाण यांना (विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील) कनिष्ठ अभियंता या पदावर नियुक्ती देण्यात आली असून आदेशातील अट क्र.2 नुसार त्यांना दिलेली नियुक्ती मागासवर्गीयांचे आरक्षित पदावरील असल्याने जातीच्या दाखल्याची तीन महिन्याचे आत संबंधित समितीकडून तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यांचे सेवापुस्तकाची तपासणी केली असता जात पडताळणी प्रमाणपत्राची नोंद दिसून येत नसून जात पडताळणी प्रमाणपत्राची प्रत सेवापुस्तकाला जोडलेली नाही. तसेच सेवापुस्तकात चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र/वैद्यकीय प्रमाणपत्रांच्या नोंदी आढळून येत नाही.

2. मनपा, अमरावतीचे आदेश क्र.अमनपा/साप्रवि/आयु/3362/16, दिनांक 28.1.2016 नुसार श्री.चव्हाण, सहा.अ.(विजा/भज) यांना उपअभियंता या पदावर दिनांक 21.4.2008 पासून बिंदुनामावलीनुसार पदोन्नती देण्यात आली आहे. श्री.चव्हाण यांना मनपाचे आदेश दिनांक 28.1.2016 पासून पूर्वलक्षी प्रभावाने उपअभियंता या पदावर पदोन्नती देण्यात येवून त्यांची सुधारीत वेतननिश्चिती करण्यात आली. यासंबंधाने अर्धसमास पत्र क्र.100, दि.28.3.2018 अन्वये बिंदुनामावली लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यास सामान्य प्रशासन विभागास

कळविले होते. परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. त्यामुळे पूर्वलक्षी प्रभावाने दिलेल्या पदोन्नतीची पात्रता तपासता आली नाही.

DATDSTM7301 (Ref No : 151)

105 राष्ट्रीयकृत बँके ऐवजी सहकारी बँकेचे रु. 1 कोटीचे हमीपत्र स्विकृत करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 07

लेखा शीर्ष :17 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

वसूलपात्र रक्कम रु. 17000.00/-

निविदा सूचना स्थायी समिती ठराव नुसार सांस्कृतिक भवन चालविण्यासाठी स्विकृत कंत्राटदाराने सादर केलेली रु. 1 कोटीची बँकेची हमी (Bank guarantee) रिजर्व्ह बँकेच्या निर्देशाप्रमाणे नसल्याने ती वैध असल्याची खात्री होत नाही. मनपानेही त्याची खात्री केलेली नाही. त्यामुळे आकस्मिक प्रसंगी मनपाचे आर्थिकहित असुरक्षित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

Indian Contract Act चे कलम 126 नुसार बँकग्यारंटी ही त्रिपक्षीय कराराच्या स्वरुपात आवश्यक असून ती भारतीय रिजर्व्ह बँकच्या mastar circular DBOD no. Dir BC-2/ 13.3.00/12-13 dated 02.07.2012 मधील मार्गदर्शक तत्वाप्रमाणे असणे जरुरीचे आहे. (www.rbi.org.in)

मनपाच्या मालकीचे संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन चालविण्यासाठी मे. आनंद कॅटरर्स यांना रु.56,20,300/- प्रती वर्ष दराने आदेश क्र. 03.06.2013 अन्वये देण्यात आले असून कंत्राटदाराने रु. 1 कोटी मुल्यांची बँकगॅरंटी मनपाकडे सादर केली आहे.

<u>बँकगॅरंटीचा तपशील</u>

6) जारी करणाऱ्या बँकेचे नाव - अभिनंदन अर्बन को. ऑप. बँक लिमिटेड. मेन ब्रांच प्रभात चौक अमरावती.

7) (i) बँकगॅरंटी अनुक्रमांक निरंक दि. 14.05.2013 - रु. 80 लाख
(ii) बँकगॅरंटी अनुक्रमांक निरंक दि. 14.05.2013 - रु. 20 लाख
========
रु. 1 कोटी

8) वैधतेचा कालावधी - दि. 14.05.2013 ते 13.05.2018

यावरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहे :-

1. या कामाची निविदा सूचना व स्थायी समितीने कामास प्रशासकीय मान्यता देताना ठराव क्र. 151 दि. 24.05.2013 अन्वये राष्ट्रीयकृत बँकेकडीलच हमी प्राप्त करण्याचे निर्देश दिले होते. केंद्रीय दक्षता आयोगाकडील सूचनानुसार सुध्दा राष्ट्रीयकृत किंवा अनुसूचित बँकांचीच हमी स्विकारण्याचे निर्देश आहेत. असे असताना त्याचे बाजार व परवाना विभाग आणि मनपाने उल्लंघन करून कंत्राटदारास अवाजवी मुभा दिली आहे.

2. भारतीय रिजर्व्ह बँकेच्या वरील परिपत्रकातील परिच्छेद क्र.2.2.4 नुसार "In order to prevent unaccounted issue of guarantees, as well as take guarantees, as suggested by IBA, BG should be issued in serially numbered security forms."

वरीलप्रमाणे बँकगॅरंटीवर बँकेने जारी केल्याच्या अनुक्रमांक नमूद असणे आवश्यक असताना दोन्ही गॅरंटीवर तो नोंदविलेला नाही. त्यामुळे बँकेच्या अभिलेख्यात त्यांच्या नोंदी असल्याची खात्री होत नाही.

3. परीपत्रकातील 2.2.5 नुसार रु. 50000/- वरील बँकगॅरंटी बँकेच्या दोन अधिकाऱ्यांच्या संयुक्त स्वाक्षरीने जारी होणे आवश्यकता असताना दि. 14.05.2013 रोजी एकाच अधिकाऱ्याने स्वाक्षरी केल्याचे आढळते.

4. सदर परिपत्रकातील 2.2.7.2 मधील (i) नुसार सदर गॅरंटीची सत्यता निश्चित होण्याच्या दृष्टीने त्यावर स्वाक्षरी करणाऱ्या दोन अधिकाऱ्याची नावे, पदनाम व त्यांचे बँकेतील कोड क्रमांक नमूद असणे आवश्यक आहे. परंतु या प्रकरणात एकाच अधिकाऱ्याची केवळ स्वाक्षरी व पदनाम आढळून येते.

5. परिपत्रकातील 2.2.7.2 (ii) नुसार मनपाने सदर बँकगॅरंटीची सत्यता तपासण्यासाठी संबंधित बँकेकडून न चुकता confrirmation प्राप्त करणे अत्यंत आवश्यक असताना मनपाने तशी खात्री केली नाही.

6. बॉम्बे स्टॅम्प ॲक्ट नुसार गॅरंटी मूल्याच्या रु. 10 लाखाच्या रकमेपर्यंत 0.1% व त्यापुढील रकमावर 0.2% दराने स्टॅम्प ड्युटी भरणे आवश्यक असताना केवळ दि. 14.05.2013 रोजी केवळ रु 1000/- च्या स्टॅम्प ड्युटीच्या फ्रान्कींगद्वारे भरणा करण्यात आला आहे. त्यामुळे रु. 17000/- ची राज्य शासनाची हानी झाली आहे.

BG - रु. 80 लाख -	रु. 10 लाख पर्यंत (0.1%)	= रु. 1000/-
	रु. 10 ते 80 लाख (0.2%)	= रु. 14000/-
रु. 20 लाख -	रु. 10 लाख पर्यंत (0.1%)	= रु. 1000/-
	रु. 10 ते 20 लाख (0.2%)	= रु. 2000/-
		==========
	आवश्यक स्टॅम्प ड्युटी	रु. 18000/-

यामुळे 18000 - 1000 याप्रमाणे रु. 17000/- ची शासन महसुलाची हानी झाली आहे.

या संदर्भात अर्धसमासपत्राद्वारे खुलासा मागविण्यात आला होता परंतु तो प्राप्त झाला नाही. त्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत असून सदरची बँक हमीपत्रे सत्य असल्याची खात्री करावी व ती तात्काळ परत करून राष्ट्रीयकृत बँकेची हमीपत्र प्राप्त करावे व तसे अनुपालन सादर करावे.

DATABWM6901 (Ref No : 58)

109 महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील तरतूदीनुसार निवृत्तीवेतन प्रदानासंबंधीच्या विहित नमुन्यातील नोंदवहया न ठेवणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 06

लेखा शीर्ष :105 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ङ

महाराष्ट्र कोषागार नियम 1968 च्या नियम 325 नुसार नमुना 34 मध्ये निवृत्तीवेतन प्रदान आदेश नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना अशी नोंदवही न ठेवणे, निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यूनंतर प्रदान झालेल्या निवृत्ती वेतनाची धनाकर्षाव्दारे परत आलेली निवृत्तीवेतन रक्कमेची नोंद घेण्यासाठी धनाकर्ष नोंदवही न ठेवणे, मृत निवृत्तीवेतनधारकाच्या पात्र वारसदारास कुटुंब निवृत्तीवेतन सुरू करताना ओळखपरेड न करणे, निवृत्तीवेतन अतिप्रदान रक्कम वसुलीची नोंदवही न ठेवणे, उपदानाची स्वंतत्र नोंदवही न ठेवणे इत्यादी अनियमितता लेखापरिक्षणादरम्यान निदर्शनास आल्या.

महानगरपालिका, अमरावती अंतर्गत लेखा शाखेतील निवृत्तीवेतन कार्यालसनाकडील सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान अभिलेख्याची पडताळणी केली असता महाराष्ट्र कोषागार नियम 1968 च्या नियमातील तरतूदीनुसार विहित नमुन्यातील नोंदवहया ठेवणे आवश्यक असताना अशा नोंदवहया लेखापरिक्षणास प्राप्त झाल्या नाही. संबंधीत कार्यासनाकडे याबाबत विचारणा केली असता विहित नमून्यातील नोंदवहयाच ठेवण्यात आल्या नसल्याचे सांगण्यात आल

याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे:-

1. महाराष्ट्र कोषागार नियम 1968 च्या नियम 325 नुसार नमुना 34 मध्ये निवृत्तीवेतन प्रदान आदेश नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-याच्या निवृत्ती प्रदान आदेशाची नोंद अशा नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. परंतु मनपा अमरावती कार्यालयामध्ये अशा प्रकारची नोंदवहीच ठेवण्यात आली नसल्याचे लेखा विभागातील संबंधीत कर्मचा-यांने सांगितले. त्यामुळे निवृत्तीवेतनधारकास मंजूर झालेल्या निवृत्तीवेतनाचा वाढिव दर व सर्वसाधारण दर तसेच कुटुंबनिवृत्ती वेतनाचा दर याबाबतची तपासणी करता आली नाही. नमुना 34 मध्ये निवृत्तीवेतन प्रदान आदेश नोंदवही ठेवून त्यात संपूर्ण निवृत्तीवेतनधारकांची आवश्यक माहितीची नोंद घेवून व तशी नोंदवही अद्यावत करुन अनुपालन करावे.

2. महाराष्ट्र कोषागार नियम 1968 च्या नियम 326 नुसार निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यूबद्दलची माहिती मिळाल्यावर ती वस्तुस्थिती नोंदवहीत व निवृत्तीवेतन प्रदान आदेशाच्या संवितकाच्या भागावर नोंदवून निवृत्तीवेतनधारकास मृत्यू दिनांकानंतर प्रदान करण्यात आलेले निवृत्तीवेतन संबंधीत बँकेकडून परत मागवून प्राप्त झालेल्या धनाकर्ष रकमेची नोंद निवृत्तीवेतन प्रदान आदेशात व धनाकर्ष

नोंवहीत घेणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही होत असल्याचे लेखापरिक्षणादरम्यान आढळून आले नाही. त्यामुळे मृत पावलेल्या निवृत्तीवेतनधारकास मृत्यू दिनांकानंतर झालेल्या प्रदानाची रक्कम परत आली किंवा नाही, याबाबतची पडताळणी करता आली नाही.

3. महाराष्ट्र कोषागार नियम 1968 च्या नियम 359 नुसार निवृत्तीवेतनधारक तसेच कुटुंबनिवृत्ती वेतनधारकाने सक्षम आहरण व संवितरण अधिका-यासमक्ष हजर राहून ओळखपरेड झाल्यानंतरच निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन सुरू करणे आवश्यक आहे. परंतु मनपा अमरावतीमध्ये मृत निवृत्तीवेतन धारकाच्या वारसदारास कुटुंब निवृत्तीवेतन सुरू करतांना कुटुंब निवृत्तीवेतन धारकांची साक्षांकित नमुना स्वाक्षरी, कुटुंबनिवृत्तीवेतनधारकाचे छायाचित्र व बोटाचे ठसे घेवून नामनिर्देशित पात्र कुटुंब निवृत्तीवेतनधारकास कुटुंब निवृत्तीवेतन सुरू करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही न करता वारसदारास नियमबाहयपणे कुटुंब निवृत्तीवेतन सुरू करण्यात येते.

4. सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतनधारकास देय होणारी उपदान प्रदानासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना अशी नोंदवही ठेवण्यात आली नाही. त्यामुळे निवृत्तीवेतनधारकास प्रदान करण्यात आलेले तात्पुरते उपदान, प्रदान करण्यात आलेले सेवानिवृत्ती उपदान/मृत्यू उपदान तसेच सुधारित उपदानाचे प्रदान इत्यादीबाबतची पडताळणी करता आली नाही.

5. निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्ती वेतनाचा वाढीव दर व सर्वसाधारण दर बदलाबाबत विहित नमुन्यातील प्रमाणित नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. एक साधी नोंदवही ठेवण्यात आली असून त्यामध्ये पांढरी शाई लावून खाडाखोड केलेली आहे. व त्यावर विभाग प्रमुखाच्या स्वाक्षरी नाही. अशी प्रमाणित नोंदवही ठेवण्यात न आल्याने निवृत्तीवेतनातील बदलाबाबतची माहिती उपलब्ध होत नाही. त्यामुळे अतिप्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

6. निवृत्तीवेतन दरात बदल झाल्याने अथवा मुदती कुटुंब निवृत्तीवेतन विहित कालावधीनंतरही चालू राहिल्याने निवृत्तीवेतनात अतिप्रदान होते. अतिप्रदानाची वसुली हप्तेवारीने करावयाची असल्याने त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी निवृत्तीवेतन अतिप्रदान नोंदवही ठेवणे आवश्यक असताना अशी नोंदवही ठेवण्यात आली नाही. त्यामुळे अतिप्रदानाची वसुली नियमितपणे होत आहे किंवा नाही, याबाबतची खात्री होत नाही.

निवृत्तीवेतन प्रदानाचे अनुषंगाने नियमानुसार ठेवावयाच्या विहित नमुन्यातील नोंदवहया तपासणीस उपलब्ध करुन देणेबाबत तसेच त्या अनुषंगाने अभिलेख पुरविणेबाबत अर्धसमास पत्र क्र.86 दि.26.03.2018 नुसार कळविण्यात आले होते. परंतु विहित नमुन्यातील नोंदवहया लेखापरिक्षणास प्राप्त झाल्या नाही. याबाबत विचारणा केली असता अशा प्रकारच्या नोंदवहयाच ठेवण्यात आल्या नसल्याचे संबंधीताकडून सांगण्यात आले. नियमानुसार विहित नमुन्यात ठेवावयाच्या नोंदवहया अद्यावत करुन व आवश्यक नोंदी घेवून अनुपालन करावे.

DATDUBM6401 (Ref No : 86)

111 मनपा अमरावतीच्या भांडार विभागाने साहित्य खरेदी करताना शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही न केल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झाल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 08

लेखा शीर्ष :243 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

महानगरपालिका, अमरावतीचे सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान भांडार विभागाने मनपाच्या विविध विभागासाठी जसे शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, नगर सचिव विभाग इत्यादीसाठी साहित्य खरेदी केली असून महाराष्ट्र शासन, शासन निर्णय- उद्दयोग उर्जा व कामगार विभाग क्र. भां.ख.स. 1084/2512/उद्दयोग-6 दि.2 जाने.1992 नुसार खरेदी करताना त्यातील तरतूदीनुसार कार्यवाही न करणे, साठा नोंदवही अद्यावत न ठेवणे, वाटप केलेल्या साहित्याची साठा नोंदवहीत नोंद न घेणे, खरेदी समितीची स्थापना न करणे, खर्चाची प्रमाणके व निविदा नस्ती लेखापरिक्षणास सादर न करणे, त्यामुळे खरेदी प्रक्रिया नियमानुसार न राबविल्याने अनियमितता घडून येण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र शासन, शासन निर्णय- उद्दयोग उर्जा व कामगार विभाग क्र. भां.ख.स. 1084/2512/उद्दयोग-6 दि.2 जाने.1992 नुसार शासकीय विभाग, महामंडळे व निमशासकीय संस्था यांनी वस्तू खरेदी करतांना शासन निर्णयातील तरतूदीचे काटेकोरपणे पालक करणेबाबत कार्यवाही विषद केली आहे. भांडार विभागाने वस्तू खरेदी करण्यासाठी खरेदी समिती स्थापन करुन समितीव्दारे दरकरार करून खरेदीची कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु मनपाच्या भांडार विभागाने साहित्य खरेदी करतांना शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यप्रणालीचा अवलंब न केल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले. याबाबत लेखापरिक्षणावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे.

1. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 नियम 98 च्या तरतुदीनुसार दरवर्षी 30 जून रोजी साठा नोंदवही- नुसार प्रत्यक्ष शिल्लक असलेल्या भांडार साहित्याची सक्षम प्राधिका-यांनी तपासणी करुन त्याचा ताळमेळ घेवुन प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारची कार्यवाही भांडार विभागाकडून होत असल्याबाबतचे ताळमेळ प्रमाणपत्र लेखापरिक्षणास आढळून आले नाही. सबब भांडार साहित्याची पडताळणी होत नसल्याचे दिसून आले. त्यामुळे मनपाच्या वेगवेगळया विभागांना आवश्यक असलेल्या साहित्यापेक्षा जादा प्रमाणात साहित्य खरेदी केल्याचे दिसून आले.

2. शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग दि. 2 जाने. 1992 मधील परिच्छेद क्र. 5 परिशिष्ट 3 नुसार राखीव असलेल्या महा. लघुउद्योग विकास महामंडळामार्फत करावयाच्या खरेदीबाबत केलेली कार्यवाही तसेच सदर नियमतील परिच्छेद क्र.6 परिशिष्ट 4, परिशिष्ट 5 तसेच परिशिष्ट 11 मधील तरतुदीनुसार त्या त्या लघुउद्योजकांना दिलेले प्राधान्य विचारात घेवून केलेल्या कार्यवाहीबाबत आवश्यक ती कागदपत्रे नस्तीमध्ये दिसून आली नाही. त्यामुळे शासन निर्णयाचे पालन होताना दिसून आले नाही.

3. भांडार विभागाकडून महानगरपालिकेतील विविध विभागाकरीता आवश्यक स्टेशनरी, उपस्कर व फर्निचर खरेदीची नस्ती तपासणीस उपलब्ध झाली नाही. तसेच उक्त शासन निर्णयातील मुद्दा क्र. 8.4 प्रमाणे परिशिष्ट आठ मध्ये दर्शविलेल्या संस्थाकडून मालाच्या दर्जाबाबत तपासणी करुन खरेदी केलेल्या वस्तुचे तपासणी अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही. साठा नोंदवही तपासणीस प्राप्त झाली परंतु साठा नोंदवही अद्दयावत नसून साहित्य वाटप केल्याच्या नोंदी नोंदवहीत घेण्यात आल्या नाही. त्यामुळे साहित्याची प्रत्यक्षात खरेदी करुन साहित्य संबंधीत विभागांना वाटप करण्यात आल्याबाबतची खात्री होत नाही. साहित्य प्राप्त झाल्याबाबत शिक्षण विभागाकडील विभाग प्रमुखांच्या स्वाक्षरी साठा नोंदवहीत घेण्यात आल्या नाही.

4. मनपातील शिक्षण विभाग, आरोग्य विभाग व नगर सचिव विभाग इत्यादी विभागासाठी करण्यात आलेली खरेदी अत्यावश्यक असल्याबाबत मागील वर्षीचा शिल्लक साठा व संबंधीत विभागाकडून प्राप्त झालेली मागणी इत्यादीबाबतचा आढावा घेवून त्यानुसार संबंधीत विभागाकडून आलेली मागणी योग्य व वाजवी असल्याबाबतची खात्री केल्याबाबतची आवश्यक अभिलेख लेखापरिक्षणास पुरविण्यात आले नाही.

5. दिनांक 31.03.2015 पर्यंत खरेदी करण्यात आलेल्या व विभागनिहाय वाटप केलेल्या साहित्य व विभागाकडे शिल्लक साहित्य याचे परिमाण व लेखापरिक्षण कालावधीत खरेदी केलेल्या साहित्यावरील खर्चाचा तपशिल मागणी करुनही प्राप्त झालेला नाही. तसेच भांडार विभागाने खरेदी केलेल्या साहित्याबाबत पुरवठादारांना करण्यात आलेले प्रदानाबाबतची खर्चाची प्रमाणके मागणी करुनही लेखापरिक्षणास पुरविण्यात आली नाही.

6. भांडार विभागामार्फत विविध विभागांना पुरविण्यात आलेली स्टेशनरी, उपस्कर व फर्निचर तसेच त्या विभागाकडून वापरायोग्य नसलेल्या व परत आलेल्या साहित्याची नोंद घेतलेली नोंदवही तसेच खरेदी केलेले साहित्य व शिल्लक साहित्य साठा याबाबतच्या ताळमेळ संबंधीत विभाग प्रमुखांने घेणे आवश्यक आहे. याबाबतचे ताळमेळ विवरणपत्र व नोंदवही तपासणीस प्राप्त झाली नाही.

7. वापरायोग्य नसलेल्या वस्तुचे निर्लेखन तसेच त्याची विल्हेवाट निर्लेखित मुल्यासह नमूद केलेले दर व निर्लेखन मुल्यासह नमुद केलेले दर व निर्लेखन अथवा विल्हेवाट लावलेल्या मालमत्तेची विभागवार संख्या व परिणाम नोंदवहीत नमुद करणे आवश्यक आहे. तसेच मालमत्तेच्या विक्रीपासून प्राप्त झालेली किंमत आणि सदर रक्कम मनपा निधीत जमा केल्याचा तपशिल याबाबतची नोंदवही तपासणीस सादर करण्यात आली नाही.

8. मुंबई वित्तीय नियम 1959 नुसार जडसंग्रह साहित्याचे पडताळणीबाबत विभागप्रमुखाने कार्यवाही केली आहे किंवा कसे, याबाबत खुलासा केलेला नाही. वास्त:विकता स्थायी व टिकाउ स्वरुपाच्या जंगम मालमत्तेची सूची जंगम मालमत्तेच्या पुस्तकात, प्राधिकृत अधिका-याच्या आद्याक्षरीनिशी नमूद केली पाहिजे. जेव्हा मालमत्ता विक्रीने अथवा अन्य मार्गाने अंतिम: निकालात काढली जाते, तेव्हा

अशा विल्हेवाटीचा तपशिल पुर्वोलिखीत अधिका-याच्या स्वाक्षरीनिशी नमूद केला पाहिजे. महानगरपालिकेल्या मालकीच्या जंगम मालमत्तेच्या पुस्तकात संपूर्ण आलेख नमूद असणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही मनपाच्या भांडार विभागाकडून होत असल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त बाबी लक्षात घेता लेखापरिक्षण वर्षात स्टेशनरी व साहित्य खरेदी करताना वित्तीय औचित्याचे पालन झाले नसल्याचे दिसून आले. महानगरपालिकेच्या निधीतून खर्च करताना खर्चाबाबत सर्वसाधारण समजूतदार व्यक्ती स्वत:च्या पैशातून खर्च करताना जेवढी दक्षता बाळगतो तेवढीच काळजी घेणे संबंधीत अधिका-याची जबाबदारी आहे. सन 2014-15 या वित्तीय वर्षात खरेदी करण्यात आलेल्या व विभागनिहाय वाटप केलेले साहित्य व विभागाकडे शिल्लक साहित्याचा साठा तसेच लेखापरिक्षण कालावधीत एकूण खर्चाबाबतचा तपशिल विहीत नमुन्यामध्ये लेखापरिक्षणास सादर करण्याविषयी अर्धसमास पत्र क्र.152 दि.21.04.2018 अन्वये कळविण्यात आले होते. त्याबाबतची माहीती अप्राप्त असल्याने विभागाने अवास्तव खरेदी केल्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त मुद्याची माहिती व अभिलेख तसेच नोंदवहया लेखापरिक्षणास प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 152)

119 मनपाच्या शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध मंजूर नसणे व वेतन देयकातील त्रृटयाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :235 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

महानगरपालिका अमरावतीच्या सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान शिक्षण विभागाकडील मासिक वेतन देयकाची पडताळणी केली असता शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा आकृतीबंध मंजूर नसल्याचे दिसून आले. तसेच वेतन देयकामध्ये मंजूर पदाची संख्या, कार्यरत पदे व रिक्त पदे किती व त्या पदांना लागू करण्यात आलेली वेतनबँड व ग्रेड-पे देयकात नमूद करण्यात आला नाही. जिल्हा परिषदेतून अतिरिक्त ठरलेल्या किंवा मनपाकडे वर्ग केलेल्या शिक्षकांची संख्या नमूद न करताच वेतन देयके मंजूर करण्यात आली.

DRAFT

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 29 नियम, उपविधी, विनियम आणि स्थायी आदेश, कलम 457(3) नुसार मनपा अधिकारी/ कर्मचारी (अ) ज्या जागेवर नेमणूक करण्याचा अधिकार मनपा विहित असेल त्या जागेसाठी आवश्यक असलेली अर्हता आणि त्या जागेवर नेमणूक करण्याची पध्दती (ब) अन्य जागेवर नेमणूक करण्याची पध्दती ठरविण्याबाबत नियम करण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहे. सदर नियमास कलम 455 अन्वये शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे. मनपा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 51(1ते3) प्रमाणे शिक्षण विभागाचा आकृतीबंध मंजूर नाही. त्याप्रमाणे मनपाने शासनाची मंजूरी घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 51(1ते3) प्रमाणे अदयाप मनपाने आकृतीबंध मंजूरीचा प्रस्ताव शासनास सादर केलेला नाही.

मनपाने सन 2016 मध्ये प्रस्तावित केलेल्या आकृतीबंधामध्ये एकुण 469 पदे नमूद केलेली आहे. त्याशिवाय जिल्हा परिषद, अमरावतीकडून अतिरिक्त ठरलेली शिक्षकांची पदे तसेच शिक्षण सेवकाची पदे याबाबतची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिली नाही.

अ.क्र.	पदाचा तपशिल	वेतनश्रेणी	ग्रेड-पे	कार्यरत व प्रस्तावित पदे
1	शिक्षणाधिकारी (राज्य संवर्ग)	15600-39100	5400	1
2	सहा.अधिक्षक	9300-34800	4200	1
3	शाळा निरीक्षक	9300-34800	4200	3
4	मुख्याध्यापक (माध्यमिक)	9300-34800	4800	5
5	सहा.शिक्षक (माध्यमिक)	9300-34800	4300	32
6	मुख्याध्यापक (प्राथमिक)	9300-34800	4200	25
7	सहा.शिक्षक (प्राथमिक)	5200-20200	2800	249
8	वरिष्ठ लिपीक	5200-20200	2400	3
9	कनिष्ठ लिपीक	5200-20200	1900	10
10	शिपाई	44400-7740	1300	140
	एकुण			469

सन 2014-15 चे लेखापरिक्षणादरम्यान शिक्षण विभागाकडील वेतन देयकाची पडताळणी केली असता वेतन देयकामध्ये मंजूर पदाची संख्या नमूद केली नाही. शिक्षण विभागातील सवंर्गनिहाय मंजूर पदे, कार्यरत पदे व रिक्त पदे तसेच पदाच्या वेतनश्रेणी नमूद केली नाही.

99 मराठी शिक्षकाचे वेतन देयक माहे जुलै-2014 देय ऑगस्ट-2014 प्रमाणक क्र.5542 दि.1.10.2014 रु.3314458/- नुसार प्रदान करण्यात आले. सदर देयक माहे जुलै-2016 चे तयार करण्यात आले असून देयकावर प्रमाणक क्र.5542 दि.1.10.2014 नमूद केला आहे. देयकातून कपात केलेल्या रकमा आयकर, जिवण विमा पॉलिसी, आवर्ती जमा व सहकारी पत संस्थेची कर्ज कपात इ. संबंधीत कार्यालयाकडे जमा केल्याचे परिशिष्ट देयकासोबत जोडले नाही. त्यामुळे कपात करण्यात आलेल्या रकमा त्या-त्या कार्यालयाकडे जमा केल्याची खात्री होत नाही. प्रदान करण्यात आलेल्या देयकावर शिक्षणाधिकारी व मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

DRAFT

उपरोक्त प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.167 दि.04.05.2018 नुसार अभिलेख, माहिती नमूद मुद्यावरील खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले होते. परंतु लेखापरिक्षण संपेस्तोवर अभिलेख व खुलासा प्राप्त झाला नाही. परिणामी आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDUBM6401 (Ref No : 167)

120 महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिराती प्रसिद्ध करण्याचे आदेश, संबंधित वृत्तपत्रांना जाहिराती प्रसिद्ध झाल्यानंतर निर्गमित केल्याने झालेली अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा.नि. क्र.पीयुवी-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.1 मे 2001 यातील परि.क्र. 6 अन्वये महानगरपालिकेच्या वर्गीकृत जाहिराती तसेच दर्शनी जाहिराती शासन धोरणाप्रमाणे वृत्तपत्रांना परस्पर वितरीत करण्याचे अधिकार आहेत.तथापि,त्यांनी आपल्या जाहिरातीच्या वितरणासाठी शासनमान्य वृत्तपत्रांच्या यादीचा तसेच शासनमान्य दराचा अंगीकार करून शासन धोरणाप्रमाणे त्या त्या वर्गातील वृत्तपत्रांमध्ये करावयाच्या समान तत्वावरील वाटपाच्या धोरणाचा कटाक्षाने अंमल करावा असे नमूद आहे. मात्र अमरावती महानगरपालिकेने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्याच्या तपासणीत सन 2014-15 मध्ये महानगरपालिकेनी दिलेल्या अनेक जाहिराती ह्या संबंधीत वृत्तपत्रात अगोदर प्रकाशित झाल्यात व नंतर जाहिरात प्रसिद्ध करण्याबाबत संबंधीत वृत्तपत्रांना आदेश देण्यात आले.यामुळे जाहिरात देतांना रोष्टर पद्धत डावलून विशिष्ट वृत्तपत्रांना लाभ पोहोचविण्याच्या दृष्टीने मुद्दाम जाहिरात प्रसिद्धीनंतर आदेश दिले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

महानगरपालिका, अमरावतीचे सन 2014 -15 चे लेखापरीक्षणात मनपाच्या जाहिरात विभागाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या अभिलेख्याच्या तपासणीत पुढील प्रमाणकांच्या सोबत संलग्न वृत्तपत्रांमध्ये आधी जाहिरात प्रसिद्ध झाली असून नंतर जाहिरात प्रसिद्धीचे आदेश संबंधितांना देण्यात आल्याचे निदर्शनास आले.

प्रमाणक क्रमांक 13180/ दि.20-03-2015 रु.14008/-.

अ.क्र	वृत्तपत्राचे	जाहिरात प्रसिद्धीबाबतचे आदेश	संबंधीत	जाहिरात प्रसिद्ध

	नाव तथा संबंधीत विभाग	क्रमांक व त्यात नमूद जाहिरातीचा दिनांक	वृत्तपत्रात प्रत्यक्ष प्रकाशित जाहिरातीचा दिनांक	केलेबाबत देयकासोबत संलग्न पावतीचा क्रमांक, दिनांक व रक्कम तथा पावतीवर नमूद जाहिरात प्रकाशनाचा दिनांक
1	"विदर्भ मतदार" नगररचना विभाग	क्र.अमनपा/जसावि/230/2014 दि.13-11-2014. 14-11-2014	14-11-2013	क्र.5118/दि.23-11-2013 रु.1088/- 14-11-2013
2	"विदर्भ मतदार" बाजार परवाना विभाग	क्र.266/दि.07-12-2014 08-12-2014	09-12-2013	क्र.5179/दि.10-12-2013 रु.4080/- 09-12-2013
3	"विदर्भ मतदार" अतिक्रमण विभाग	क्र.265/दि.04-12-2014. 05-12-2014	05-12-2013	क्र.5172 दि.10-12-2013 रु.4080/- 05-12-2013
4	"विदर्भ मतदार" महिला व बालकल्याण विभाग	क्र.251/दि.26-11-2013 (वर्ष 2014 खोडल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.) 27-11-2013	27-11-2013	क्र.5145 दि.30-11-2013 रु.2040/- 27-11-2013

प्रमाणक क्रमांक 13181/ दि.20-03-2015 रु.18360/-.

अ.क्र	वृत्तपत्राचे नाव तथा संबंधीत विभाग	जाहिरात प्रसिद्धीबाबतचे आदेश क्रमांक व त्यात नमूद जाहिरातीचा दिनांक	संबंधीत वृत्तपत्रात प्रत्यक्ष प्रकाशित जाहिरातीचा दिनांक	जाहिरात प्रसिद्ध केलेबाबत देयकासोबत संलग्न पावतीचा क्रमांक, दिनांक व रक्कम तथा पावतीवर नमूद जाहिरात प्रकाशनाचा दिनांक
1	"विदर्भ मतदार"	क्र.372/ दि.15-2-2014, 16-02-2014	16-01-2014	क्र.5334 दि.13-02-2014 रु.4080/-

DRAFT

	नगररचना विभाग			

3)प्रमाणक क्रमांक 13229/ दि.23-03-2015 रु.16524/-.

अ.क्र	वृत्तपत्राचे नाव तथा संबंधीत विभाग	जाहिरात प्रसिद्धीबाबतचे आदेश क्रमांक व त्यात नमूद जाहिरातीचा दिनांक	संबंधीत वृत्तपत्रात प्रत्यक्ष प्रकाशित जाहिरातीचा दिनांक	जाहिरात प्रसिद्ध केलेबाबत देयकासोबत संलग्न पावतीचा क्रमांक, दिनांक व रक्कम तथा पावतीवर नमूद जाहिरात प्रकाशनाचा दिनांक
1	"बातमीपत्र" नगरसचिव विभाग	क्र.373/ दि.16-2-2014 17-02-2014	16-02-2014	क्र.230 दि.16-02-2014 रु.6480/- 16-02-2014

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा.नि. क्र.पीयुवी-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.1 मे 2001 यातील परि.क्र. 6 अन्वये महानगरपालिकेच्या वर्गीकृत जाहिराती तसेच दर्शनी जाहिराती शासन धोरणाप्रमाणे वृत्तपत्रांना परस्पर वितरीत करण्याचे अधिकार आहेत.तथापि,त्यांनी आपल्या जाहिरातीच्या वितरणासाठी शासनमान्य वृत्तपत्रांच्या यादीचा तसेच शासनमान्य दराचा अंगीकार करून शासन धोरणाप्रमाणे त्या त्या वर्गातील वर्गातील वृत्तपत्रांमध्ये करावयाच्या समान तत्वावरील वाटपाच्या धोरणाचा कटाक्षाने अंमल करावा असे नमूद आहे. मात्र अमरावती महानगरपालिकेने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्याच्या तपासणीत सन 2014-15 मध्ये महानगरपालिकेनी दिलेल्या अनेक जाहिरात संबंधीत वृत्तपत्रात अगोदर प्रकाशित झाल्यात व नंतर जाहिरात प्रसिद्ध करण्याबाबत संबंधीत वृत्तपत्रांना आदेश देण्यात आले.यामुळे जाहिरात देतांना रोष्टर पद्धत डावलून विशिष्ट वृत्तपत्रांना लाभ पोहोचविण्याच्या दृष्टीने मुद्दाम जाहिरात प्रसिद्धीनंतर आदेश दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

याबाबत अर्धसमास क्र.26 दि.05/02/2018 अन्वये खुलासा मागविण्यात आला.मात्र खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 26)

121 बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंत्यांना पूर्वलक्षी प्रभावाने नियुक्तीचा लाभ प्रदान करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.अमपा-1004/82/प्र.क्र.36/नवि-25, दिनांक 27.12.2004 नुसार मनपाचे विविध आस्धापनेवरील 59 रोजंदारी/कंत्राटी/कार्यव्ययी कर्मचा-यांना मनपाचे वेगवेगळया आदेशान्वये मनपाच्या सेवेत सामावून घेण्यात आले असून नियुक्ती दिलेल्या कनिष्ठ अभियंत्यांना नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एए1480 /321/सी आर -35 दि. 9 मार्च 1989 मधील तरतुदीनुसार कार्यव्ययी आस्थापनेवरील सेवा जोडून पूर्वलक्षी प्रभावाने वेतनश्रेणीचा लाभ स्थायी समितीने ठराव क्र.21, दि.31.07.2009 अन्वये मंजूर केलेला दिसतो. परंतु सदर सेवा पूर्वलक्षी प्रभावाने जोडून घेण्याकरिता शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास अद्याप मंजुरी प्राप्त झाली नसल्याचे दिसून येते.

अमरावती महानगरपालिकेच्या विविध आस्धापनेवरील 59 रोजंदारी/कंत्राटी/कार्यव्ययी कर्मचाऱ्यांना मनपाच्या सेवेत सामावून घेणेबाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभा ठराव क्र.77, 86 व 102, दिनांक 19.7.2003 शासनाकडे मनपाचे पत्र क्र.अमनपा/साप्रवि/1490/2004, दिनांक 20.7.2004 नुसार सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.अमपा-1004/82/प्र.क्र.36/नवि-25, दिनांक 27.12.2004 नुसार मंजूरी प्रदान आल्याची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात दिसून येते.

उपलब्ध केलेल्या महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय दिनांक 27.12.2004 नुसार अशा कर्मचा-यांना कार्यरत पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता विचारात घेवून सेवेत सामावून घेण्यात आले आहे. या कर्मचाऱ्यांमध्ये म्युनिसिपल नगररचना, बांधकाम व विद्युत विभागातील अभियंत्यांचाही समावेश आहे. मनपा, अमरावती, सामान्य प्रशासन विभागाचे नियुक्ती आदेश क्र.अमनपा/साप्रवि/उपआ/3861/05, दि.1.2.2005 तसेच आदेश क्र.अमनपा/साप्रवि/उपआ/3944/05, दि.7.2.2005 नुसार समावेशन करताना पूर्वलक्षी प्रभावाने नियमित सेवेचे कोणतेही लाभ देण्यात येणार नाही, अशी अट ठेवण्यात आली. परंतु वरीलपैकी पुढील काही अभियंत्यांच्या सेवापुस्तकाची पडताळणी करताना त्यांच्या कार्यव्ययी आस्थापनेवरील सेवा नियमित सेवा म्हणून आश्वासित प्रगती योजनेसाठी अर्हताकारी सेवा म्हणून गृहीत धरण्यात आली आहे असे दिसून आले.

1. श्री.आशिष अनंत अवसरे
2. श्री.आनंद सुरेशराव जोशी
3. श्री.अविनाश प्रभाकर रघटाटे
4. श्री.नंदकिशोर नामदेवराव तिखीले
5. श्री.नितीन महादेवराव बोबडे
6. श्री.नितिन प्रल्हादराव भटकर

7.श्री.पी.एम.वानखडे

8. श्री.प्रमोद विठ्ठलराव इंगोले

9.श्री.सुधीर विठ्ठलराव गोटे

या संदर्भात आयुक्त, मनपा, अमरावती यांनी उपरोक्त प्रकरणांतील अभियंत्यांची कार्यव्ययी आस्थापनेवरील सेवा अखंडित समजण्यास शासनाची मान्यता मिळावी, या आशयाचा प्रस्ताव नगर विकास विभागाकडे क्र. अमनपा/साप्रवि/उपा/179, दि. 22 जानेवारी 2010 अन्वये पाठविण्यात आला असल्याचे उपलब्ध झालेल्या प्रस्तावाच्या प्रतीवरून लक्षात येते. त्यामध्ये उल्लेखिल्यानुसार नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.एए1480 /321/ सी आर-35, दि. 9 मार्च 1989 मधील तरतुदीनुसार कार्यव्ययी आस्थापनेवरील कालावधी नियमित सेवेस जोडून नियुक्तीपासून वार्षिक वेतनवाढी मंजूर करण्याच्या सदर अभियंत्यांच्या विनंतीस अनुसरून स्थायी समितीने ठराव क्र.21, दि.31.07.2009 अन्वये वार्षिक वेतनवाढीसह दि. 9 मार्च 1989 च्या शासन निर्णयातील तरतुदी लागू करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला होता.

सदर ठराव व दि. 9 मार्च 1989 च्या शासन निर्णयाची प्रत उपलब्ध झाली नाही. तथापि, त्यामधील तरतुदी लागू करून संबंधितांना कार्यव्ययी आस्थापनेवरील सेवेचा काल्पनिक लाभ प्रदान स्थायी समितीने मंजूर केला असला तरी शासनाकडे सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावास मंजुरी प्राप्त होणे आवश्यक वाटते.

DATDSTM7301 (Ref No : 105)

123 अतिक्रमणाचे कामावरील वाहनांच्या वापरातील अनियमितता तसेच लॉगबुकावरील दैनंदिन नोंदीसमोर स्वाक्षऱ्या नसणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता सं ख्या : 01

लेखा शीर्ष :202 महानगरपालिका स्व-निधी निधी

अनियमितता कलम : 9ङ

मनपाने अतिक्रमण विभागाकरिता लावलेल्या वाहनांच्या लॉगबुकावरील दैनंदिन नोंदींसमोर वाहन वापरणाऱ्यांच्या तसेच जबाबदार अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या नाहीत. तसेच वाहनाचे सन 2014-15 या वर्षात सुरुवातीपासून शेवटपर्यंत सारखाच ॲव्हरेज दर्शविल्यामुळे वाहनाचा व इंधनाचा योग्यरित्या वापर करण्यात आल्याबाबत खात्री पटत नाही.

मनपाचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणात अतिक्रमण विभागाने शहरातील रस्त्यावरील अतिक्रमण काढणे, अनधिकृत बांधकाम पाडणे, शहरातील लहान मोठे नाले साफ करणे इ.कामाकरिता खालील वाहनांचा वापर केल्याचे उपलब्ध अभिलेख व लॉगबुकावरील नोंदींवरुन दिसून येते.

(1) वाहन क्र.जेसीबी 3D सुपर मशीन – वाहन चालक श्री.लक्ष्मण तिहिले
(2) वाहन क्र.एमएच-27-सी-533 – वाहन चालक श्री.कन्हैय्या जयस्वाल
(3) वाहन क्र.जेसीबी जेडी-315 मशीन – वाहन चालक श्री.सुरेंद्र वानखडे
(4) वाहन क्र.एमएच-27-ए-3821 – वाहन चालक श्री.वासुदेव काठोडे

(1) वाहन क्र.जेसीबी-जेडी-315 चे लॉगबुकाची तसेच पेट्रोल लेखा रजिष्टरची तपासणी केली असता सदर वाहनाचे माहे एप्रिल-2014 ते डिसेंबर-2014 या कालावधीत सुरुवातीचे रिडींग 2110 असून माहे डिसेंबर-2014 चे रिडींग 3041 म्हणजेच या दरम्यान सदर वाहन एकूण 931 तास वापरण्यात आल्याचे लॉगबुकावरील नोंदीवरुन दिसून येते. सदर कालावधीत एकूण 6517 लिटर इंधनाचा वापर केल्याचे दिसून येते. म्हणजेच प्रति तास 7 लिटर नियमित इंधनाचा वापर झाल्याचे दिसून येते. वास्तविक कामाचे स्थळ लक्षात घेता इंधनाचा ॲव्हरेज कमी जादा होणे आवश्यक आहे. परंतु नियमित 7 लिटर प्रति तास याप्रमाणे इंधनाचा वापर झाल्याचे दिसून येते. सदर ॲव्हरेज सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेला नाही.

(2) वाहन क्र.एमएच-27-ए-3821 चे लॉगबुकाची तसेच इंधन लेखा रजिष्टरची तपासणी केली असता सदर वाहनाचे माहे एप्रिल-2014 ते जून-2014 या कालावधीत सुरुवातीचे रिडींग 26685 असून माहे जून-2014 अखेर रिडींग 29118 म्हणजेच या दरम्यान सदर वाहन एकूण 2433 कि.मि. वापरण्यात आल्याचे लॉगबुकावरील नोंदीवरुन दिसून येते. सदर कालावधीत एकूण 811 लिटर इंधनाचा वापर केल्याचे दिसून येते. म्हणजेच प्रति लिटर नियमित 3 कि.मि. ॲव्हरेजने इंधनाचा वापर झाल्याचे दिसून येते. वास्तविक कामाचे स्थळ लक्षात घेता इंधनाचा ॲव्हरेज कमी जादा होणे आवश्यक आहे. परंतु नियमित 3 कि.मि. प्रतिलिटर याप्रमाणे इंधनाचा वापर दिसून येते. तसेच माहे जुलै-2014 ते फेब्रुवारी-2015 या कालावधीत मिटर रिडींगची नोंद घेण्यात आली नसून केवळ इंधनाच्या वापराची नोंद लॉगबुकावर करण्यात आली.

(3) वाहन क्र.एमएच-27-533 चे लॉगबुकाची तसेच इंधन लेखा रजिष्टरची तपासणी केली असता सदर वाहनाचे माहे एप्रिल-2014 ते मार्च-2015 या कालावधीत सुरुवातीचे रिडींग 173080 असून माहे मार्च-2015 अखेर रिडींग 187845 म्हणजेच या दरम्यान सदर वाहन एकूण 14765 कि.मि. वापरण्यात आल्याचे लॉगबुकावरील नोंदीवरुन दिसून येते. सदर कालावधीत एकूण 2951 लिटर इंधनाचा वापर केल्याचे दिसून येते. म्हणजेच प्रति लिटर नियमित 5 कि.मि. ॲव्हरेजने इंधनाचा वापर झाल्याचे दिसून येते. वास्तविक कामाचे स्थळ लक्षात घेता इंधनाचा ॲव्हरेज कमी जादा होणे आवश्यक आहे. परंतु नियमित 5 कि.मि. प्रति लिटर याप्रमाणे इंधनाचा वापर झाल्याचे दिसून येते.

यावरुन वाहनांच्या वापराबाबत वास्तविक नोंदी न करता वाहनाचा सातत्याने ॲव्हरेज कायम ठेवण्याकरिता नोंदी केल्याचे दिसून येत असून सक्षम अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष दिसून येत असून वाहनाचा दुरुपयोग झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

वाहनांचे लॉगबुकची तपासणी केली असता वाहन वापराच्या दैनंदिन नोंदींसमोर वाहन चालकाच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या नसून सदर नोंदी बरोबर असल्याबाबत जबाबदार अधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या घेण्यात

DRAFT

आल्या नाहीत.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.192, दिनांक 30.05.2018 तसेच अर्धसमास पत्र क्र.194, दि.31.05.2018 नुसार खुलासा मागविला असता कोणतेही अनुपालन प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 194)

126 खाजगी बांधकामाचे संबंधात कामगार कल्याण उपकराची रकम शासनाचे बँक खात्यात परस्पर भरणा केल्यानंतर मनपाकडून त्याची सत्यता व तपासणी न होण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 शासननिधी निधी
अनियमितता कलम : 9ड

खाजगी बांधकामधारकांना परवानगी देण्यापूर्वी कामगार कल्याण उपकराची आकारणी करून मनपानेच वसूल करणे व शासन खाती जमा करणे बंधनकारक असताना बांधकामधारकांना परस्पर रकम बँकेत भरण्याची मुभा देणे व अश्या रकमांची बँक स्क्रोल किंवा कोणत्याही पध्दतीने खात्री न करणे यामुळे 2014-2015 मधील उपकराच्या मागणीच्या एकूण रु.2.58 कोटी रकमेच्या शासन भरण्या विषयी शंका निर्माण होते. या प्रकरणात शासन निर्णय दि. 17.6.2010 व महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम 98 (5) मधील तरतुदीचे उल्लंघन झाले आहे.

इमारत व इतर बांधकाम (रोजगार विनियम व सेवाशर्ती) अधिनियम 1996 (केंद्रीय अधिनियम 27/1996) आणि त्याअंतर्गत इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम 1996 (केंद्रीय अधिनियम 27/1996) हे कायदे केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम क्षेत्रात कार्यरत असलेल्या बांधकाम मजुरांच्या कल्याणकारी उद्देशाने प्रस्तापित झाले असून केंद्रशासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम 1998 अंमलाने आणलेले आहेत. मुख्य अधिनियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने बीसीए 32003/सीआर-146/कामगार-7, दि.05.02.2007 अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) नियम 2007 तयार केले आहे.त्याअनुषंगाने राज्याच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.17.06.2010 च्या शासन निर्णयान्वये सदरचा उपकर वसूल करण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली नाही. san 2014-15 या वर्षात एकूण रु.2.58 कोटी रकमेची मागणीपत्रे निर्गमित केल्याचे संबंधित नोदवहीवरून दिसून आले. सदरची रक्कम जमा करण्यासाठी खाते क्र.004220110000153 बँक ऑफ

इंडिया येथे उघडण्यात आला आहे. तथापि, वर्षभरात किती रकम सदर खात्यामध्ये परस्पर जमा करण्यात आली याची माहिती उपलब्ध झाली नाही.

सदर शासननिर्णयानुसार बांधकामास परवानगी देणाऱ्या मनपाने बांधकाम मूल्यावर 1% उपकर वसूल करून तशी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. शासन निर्णयातील व परिच्छेद क्र. 5 नुसार मनपाने शासन खात्यात नियमितरीत्या जमा करून प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेपूर्वी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांचेकडे जमेची मासिक विवरणपत्रे सादर करावयाची आहेत.

यावरील लेखा परीक्षणचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1. मनपा अमरावती अंतर्गत 2014-2015 मध्ये खाजगी बांधकामांना नकाशा मंजुरीसह प्रारंभ प्रमाणपत्र जारी केले आहेत. सदर बांधकामाचे संदर्भात परवानगी नोंदवही ठेवली असून कामगार कल्याण उपकारापोटी रकमा मनपाने स्वत: वसूल करून शासन खात्यात जमा करणे आवश्यक होते. जेणे करून शासनाच्या महसूल प्रत्यक्ष बँकेत जमा झाल्याबाबतची खात्री बँक स्क्रोल किंवा बँक प्रमाणपत्राच्या माध्यमाने करणे शक्य झाले असते.

   परंतु बांधकाम प्रमाणपत्र देण्यापूर्वी संबंधिताना सदर उपकाराची रकम भरण्याबाबत सूचना पत्र देवून बँकेतील संबंधित खात्यात परस्पर जमा करण्याचे निर्देशित करण्यात येते. अश्या जमेच्या चलनाच्याप्रती / छायाप्रती सादर केल्यानंतर बँकेकडून प्रत्यक्ष खात्री न करता परवानगी देण्याची पुढील कार्यवाही करण्यात येते. परंतु महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम 98 (5) नुसार संबधित सेवा देण्यापूर्वी सदर रकमा प्रत्यक्ष बँकेत जमा झाल्याची बँक स्क्रोल वरून खात्री करणे आवश्यक आहे. त्यामुळे बँकेच्या स्क्रोल/ प्रमाणपत्र / जमेचे विवरण प्राप्त न करता व पर्यायाने शासन महसूल स्वत: वसूल न करता नागरिकांकडून परस्पर भरणा करण्याची मुभा दिल्याने प्रत्यक्ष भरणा न करता खोटी चलने सादर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. अश्या परिस्थितीत मनपाच्या दुर्लक्षामुळे शासन महसुलाची हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
2. मनपाने उपकराचा भरणा करण्यासाठी पाठविलेल्या मागणी पत्राची एकूण रकम व प्रत्यक्ष बँक खात्यात जमा झालेली रकम यांचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. त्यासाठी शासन निर्णयातील परिच्छेद क्र. 3 नुसार मंडळास मासिक विवरणपत्रे मनपाकडूनच सादर होणे जरुरीचे आहे.

   परंतु याप्रमाणे कार्यवाही होत असल्याचे आढळून येत नाही.
3. या संदर्भात उपकरापोटी 2014-2015 मधील मागणीच्या रकमा प्रत्यक्ष बँकेमार्फत शासनास / मंडळास प्राप्त झाल्याबाबत ताळमेळासह मंडळाकडून प्रमाणपत्र प्राप्त करावे. अन्यथा ताळमेळा अभावी व शासन निर्णयातील निर्देशाचे विरुध्द कार्यपद्धतीचा अमल केल्यामुळे शासन महसुलाचे नुकसान संभवते
4. शासन निर्देशाप्रमाणे बांधकाम मूल्यावर 1% उपकराची आकारणी करण्या ऐवजी बांधकाम क्षेत्रावर प्रती चौ.मी. रु.102/- प्रमाणे उपकराची आकारणी करण्याबाबतचे स्पष्टीकरण मनपाने सादर केले नाही.

DATABWM6901 (Ref No : 97)

DRAFT

130 अखेरच्या शिलकेचा ताळमेळ न घातल्याने व बँक खात्यातील शिल्लक रोखपुस्तकापेक्षा कमी असल्याने अंदाजे रु. 125.94 कोटीचा खर्च रोखपुस्तकात न नोंदविता थेट बँकेतून झाल्याच्या शक्यतेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :00 म.न.पा. व शासन निधी
अनियमितता कलम : 9ड

मनपा अमरावतीच्या लेखापरीक्षण कालावधीत महानगरपालिकेच्या मनपा व शासन निधीच्या संयुक्त रोखवहीतील जमा व खर्च रकमांची पडताळणी केली असता 2014-15 मध्ये वर्षअखेरीस रोखवहीची, बँकखाते पुस्तिकेतील दि.31-03-2015 अखेरच्या रकमांशी ताळमेळ केल्याचे दिसून आले नाही. वर्षअखेर रोखवहीतील शिल्लक ही बँक पासबुकातील शिल्लकेपेक्षा रु.125.94 कोटीने जास्त आहे. मनपातील लेखा विभागाने सदर तफावतीचे व ताळमेळ न होण्यामागील कारण स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे सदर रकमेच्या खर्चाची नोंद रोखवहीमध्ये न नोंदविता थेट बँकेतून झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

National Municipal Accounts Manualयातील प्रकरण 30 मध्ये नमूद कार्यपद्धतीनुसार प्रत्येक महिन्याच्या शेवटी किंवा कमी कालावधीच्या अंतराने रोखवहीत जमा व खर्च रकमांची जुळवणी करून तशी नोंद रोखवहीत नोंदवून सदर रकमांची बँक पासबुकातील शिल्लक रक्कमेशी पडताळणी करून तफावत रकमांचा सविस्तर तपशील नोंदवून ताळमेळ घेणे आवश्यक आहे व तशी नोंद संबंधित रोखपुस्तकात करून पडताळणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित विभागातील विभाग प्रमुखाचे किंवा अन्य सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्वाक्षरीनिशी नोंदविणे आवश्यक आहे.

महानगरपालिका, अमरावतीच्या लेखा विभागाकडे एकूण बँक खात्यांची व खातेपुस्तीकांबाबत अर्धसमास क्र 227 दि.10/07/2018 अन्वये विचारणा केली असता दि.21/07/2018 च्या खुलाशानुसार 43 एवढीच संख्या असल्याचे दिसून आले. सदर विवरणात नमूद 9 खाते हे सन 2014-15 नंतरच्या वर्षातील असून उपलब्ध करून दिलेल्या बँक खाते पुस्तिका तथा बँक स्क्रोल यातील 10 खात्यांचा उल्लेख विवरणपत्रात नाही.अशा प्रकारे 43-9+10=44 खातेपुस्तीकेतील सन 2014 -15 अखेरच्या शिल्लकेची तपासणी केली असता रोखवहीतील जमा व खर्च रकमांची,बँक पासबुकातील रकमेशी ताळमेळ घेण्यात आलेला नाही असे दिसून आले.

महानगरपालिकेच्या संयुक्त रोखवहीतील शिल्लक व बँक खात्यात असलेली शिल्लक यात पुढील

तपशिलात दर्शविल्याप्रमाणे तफावत आहे. (रकमा रुपयात)

अ.क्र.	आर्थिक वर्ष	रोखवहीप्रमाणे वर्ष अखेरची (दि. 31/3/15 अखेर) एकूण शिल्लक	उपलब्ध बँक स्क्रोल प्रमाणे वर्ष अखेरची(दि.31/3/15 अखेर) शिल्लक	तफावत (3-4)
1	2	3	4	5
1	2014-15	**188,55,86,606.00**	**62,61,69,189.00**	**125,94,17,417.00**

उपरोक्त रकाना क्र. 4 मध्ये दर्शविलेल्या एकूण शिल्लक रकमेसंबंधी,योजनानिहाय उघडण्यात आलेली व लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेली एकूण बँक खाती व त्यात असलेली दि.31/03/2015 अखेरची शिल्लक बाबतचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	योजनेचे नाव	बँकेचे नाव	खाते क्रमांक	दि.31/03/2015 अखेर खात्यात असलेली शिल्लक रक्कम
1	अंबादेवी व एकवीरादेवी	इंडियन बँक अमरावती	962012003	1,12,47,250.00
2	मुलभूत	सेन्ट्रल बँक,अमरावती	3106977973	24,73,906.00
3	अग्नीसुरक्षा निधी	इंडियन बँक अमरावती	942702850	26,88,374.00
4	आधार योजना	इंडियन बँक अमरावती	952043452	40,14,952.00
5	जनगणना आर्थिक व सामाजिक जाती निहाय	इंडियन बँक अमरावती	6005807652	3,82,066.00
6	शासन विशेष अनुदान	युनियन बँक,अमरावती	323302010063860	7,80,686.00
7	उर्जा संवर्धन	युनियन बँक,अमरावती	323302010062253	2,58,446.00
8	खासदार फंड (श्री आनंदराव अडसूळ)	आयडीबीआय बँक,अमरावती	50710010172695	3,30,758.00
9	त्रिवेणी	आयडीबीआय बँक,अमरावती	507104000070072	1,25,29,563.00
10	रस्ते अनुदान	आयडीबीआय	50710010001993	5,27,78,134.00

DRAFT

		बँक,अमरावती		
11	अंबा नाला	आयडीबीआय बँक,अमरावती	50710010001970	47,827.00
12	खासदार 2	आयडीबीआय बँक,अमरावती	50710010001981	3,71,620.00
13	नगरोत्थान	आयडीबीआय बँक,अमरावती	507104000070063	22,27,796.00
14	स्वीपर वेलफअर फंड	आयडीबीआय बँक,अमरावती	50710010000630	3,16,709.00
15	दलित वस्ती सुधारणा	आयडीबीआय बँक,अमरावती	50710010002269	3,62,15,046.00
16	12 वा वित्त आयोग	आयडीबीआय बँक,अमरावती	50710010002268	55.10
17	बीआरजीएफ	आयडीबीआय बँक,अमरावती	50710010002267	39,06,210.00
18	विदर्भ वैधानिक विकास मंडळ	आयडीबीआय बँक,अमरावती	507104000070115	23,14,035.00
19	अग्निशमन बळकटीकरण	आयडीबीआय बँक,अमरावती	507104000070106	2,95,29,816.00
20	जिल्हा नियोजन समिती	आयडीबीआय बँक,अमरावती	507104000080228	50,77,659.00
21	रमाई घरकुल योजना	देना बँक, एमआयडीसी,अमरावती	125810033840.00	1,03,10,000.00
22	एसबीजीओएस	एक्सीस बँक,अमरावती	914010011424326	8,64,25,578.00
23	नैसर्गिक आपत्ती	एक्सीस बँक,अमरावती	914010009224967	1,07,61,671.00
24	एसबीजीओएस	एक्सीस बँक,अमरावती	914010003279033	1,08,57,304.64
25	अल्पसंख्याक अनुदान	एक्सीस बँक,अमरावती	914010009133188	24,03,727.00
26	एएमसी डे केअर सेंटर 13 वा वित्त आयोग	एक्सीस बँक,अमरावती	913010031229638	14,08,656.00
27	एएमसी आंगणवाडी कॉम्प्युटर वेटिंग	एक्सीस बँक,अमरावती	913010031431833	5,25,961.00
28	भीमटेकडी सौंदर्यीकरण	एक्सीस बँक,अमरावती	914010003509758	11,34,762.00
29	एसबीजीओएस	एक्सीस बँक,अमरावती	913010014676314	3,42,88,044.00

DRAFT

30	स्पर्धा परीक्षा	एक्सीस बँक,अमरावती	911010024956020	61,840.00
31	जीआयएस प्रणाली	एक्सीस बँक,अमरावती	911010024949860	18,60,554.00
32	सिंकींग फंड	एक्सीस बँक,अमरावती	911010036128187	10,83,799.00
33	युआयडीएसएमटी	एक्सीस बँक,अमरावती	265010100107006	1,97,940.56
34	सीए गव्ह. ऑर्गनायझेशन	एक्सीस बँक,अमरावती	265010200001540	5,50,12,694.08
35	नैसर्गिक आपत्ती अतिवृष्टी	एचडीएफसी बँक, अमरावती	50200004274673	1,25,61,999.00
36	भुयारी गटार योजना	एचडीएफसी बँक, अमरावती	50100129008233	36,79,221.00
37	प्रॉपर्टी टॅक्स	एचडीएफसी बँक, अमरावती	27317620000020	8,02,12,971.74
38	आयडीएसएमटी	आयडीबीआय बँक,अमरावती	50710010002295	9.00
39	अंशदान निवृत्तीवेतन योजना	आयडीबीआय बँक,अमरावती	507104000089122	2,000.00
40	स्थानिक स्वराज्य संस्था कर	एक्सीस बँक,अमरावती	912010045753973	38,18,622.00
41	प्राथ.शाळा अनुदान	एचडीएफसी बँक, अमरावती	50200003418591	30,72,070.00
42	दुर्बल घटकांसाठी स्वच्छता गृहे बांधणे	एचडीएफसी बँक, अमरावती	27311450000024	7,97,84,202.00
43	प्राथ.सोयी सुविधा	एचडीएफसी बँक, अमरावती	50100016663964	1,88,20,025.00
44	नगरोत्थान प्रकल्प	एचडीएफसी बँक, अमरावती	50100016663977	4,03,94,630.00
			TOTAL	**62,61,69,189.00**

वरील विवरणातील आकडेवारीवरून रोखवहीपेक्षा बँक खात्यामधील शिल्लक (रु.1885586606.00(-)626169189.00) = रु. 1259417417.00 ने कमी असल्याचे दिसते.सदर बाब गंभीर असूनही बँक ताळमेळाबाबतची आवश्यक कार्यवाही अद्याप दुर्लक्षित आहे. उपरोक्त 44 व्यतिरीक्त अन्य बँक खाती असल्यास ती लेखापरीक्षणास पुरविलेली नाही. उपरोक्तप्रमाणे आढळून

DRAFT

आलेल्या विसंगतीमुळे बँकेतील व्यवहारात पारदर्शकतेचा अभाव संभवतो.बँक खात्यांची 44 एवढीच संख्या असल्यास त्यामधील एकत्रित अखेरची शिल्लक संयुक्त रोखवहीतील शिलकेपेक्षा वरीलप्रमाणे कमी असल्याने रु. 125.94 कोटीचा खर्च रोखवहीमध्ये न नोंदविता नियमबाह्यपणे थेट बँकेतून झाला असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

यासंदर्भात अर्धसमास क्र.227 दि. 10/07/2018 नुसार विचारणा केली असता संयुक्तिक खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 227)

131 महानगरपालिकेच्या मोटार कार्यशाळा विभागाकडील दहा वर्षाहून अधिक कालावधी झालेली वाहने निर्लेखित करून नविन वाहने खरेदीकरिता सुयोग्य नियोजन करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :173 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग शा.नि.क्र.संकीर्ण 2007/वाहन खरेदी / प्र.क्र.27/2008/नवी- 26 दि.18 फेब्रुवारी 2008 नुसार अवजड वाहनांसाठी 10 वर्षाचे आयुष्य किंवा 2,00000 कि.मी. धावसंख्या तसेच हलकी वाहनांसाठी 10 वर्षाचे आयुष्य किंवा 240000 कि.मी. धावसंख्या यापैकी जे नंतर पूर्ण होईल.याप्रमाणे निरुपयोगी ठरवून निर्लेखनाची कार्यवाही अमरावती महानगरपालिकेने केलेली नाही.त्यामुळे अशा वाहनांच्या देखरेख व दुरुस्तीवर प्रचंड खर्च करण्यात येत आहे.तसेच सर्व चल-अचल संपत्तीवर घसारा आकारून तेवढी रक्कम स्वतंत्ररित्या घसारा निधीत जमा करणे अनिवार्य असताना उपरोक्त वाहनांचे बाबतीत तशी कार्यवाही केली गेली नाही. राखीव निधी उपलब्ध नाही त्यामुळे मनपाला नवीन वाहने खरेदी करण्यास आर्थिकदृष्ट्या नियोजन करण्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग शा.नि.क्र.संकीर्ण 2007/वाहन खरेदी/प्र.क्र.27/2008/नवी-26 दि.18फेब्रुवारी2008 नुसार महानगरपालिकेची वाहने निरुपयोगी ठरविण्याकरिता अवजड वाहनांसाठी 10 वर्षाचे आयुष्य किंवा 200000 कि.मी. धावसंख्या तसेच हलकी वाहनांसाठी 10 वर्षाचे आयुष्य किंवा 240000 कि.मी. धावसंख्या यापैकी जे नंतर पूर्ण होईल त्याअनुषंगाने वाहने निर्लेखानाबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश आहेत. त्यामुळे सदर वाहने निरुपयोगी ठरवून निर्लेखित करणे आवश्यक आहे व त्याऐवजी नविन वाहने खरेदी करण्याची कार्यवाही करावयाची आहे. ज्यामुळे वाहन दुरुस्तीवर येणारा अवाजवी संभाव्य खर्च टाळता येईल.

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) <u>जुन्या वाहनांचे निर्लेखन न करणे</u>

महानगरपालिकेच्या सन 2014-15 चे लेखापरीक्षणात मोटार कार्यशाळा विभागाकडील तपासणीत एकूण कार्यरत 48 वाहने,1मोबाईल टॉयलेट व 134 हायड्रोलिक ऑटो इत्यादी प्रकारच्या वाहनांपैकी 4 वाहनांना दहा वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेला आहे. सदर वाहनांची वयोमर्यादा संपल्यामुळे सदरील वाहने निर्लेखित करून नवीन वाहने खरेदीबाबत कार्यवाही होणे आवश्यक असताना अद्याप विभागात कार्यरत असल्याचे निदर्शनास आले.

निर्लेखनयोग्य वाहनांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	वाहन क्र.	खरेदी दिनांक	वाहनांची खरेदी किंमत
1	MH-27 H-6808	11/05/2004	4,50,621.00
2	MH-27 C-533	07/08/2003	70,5,711.00
3	Bobcat No.1	29/04/2002	14,79,000.00
4	Loder Ex cavater ck-72	30/04/2001	28,44,880.00

2) <u>वाहनांवर घसारा निधी न उभारणे</u>

मनपाने सर्व चल-अचल संपत्तीवर घसारा आकारून तेवढी रक्कम स्वतंत्ररित्या घसारा निधीत जमा करणे अनिवार्य असताना उपरोक्त वाहनांचे बाबतीत तशी कार्यवाही केली गेली नाही. तथा यादृष्टीने पर्याप्त प्रयत्नही केले नसल्याचे दिसून येते. घसारा निधीच्या स्वरूपात मनपाकडे राखीव निधी उपलब्ध नाही त्यामुळे मनपाला नवीन वाहने खरेदी करण्यास आर्थिकदृष्ट्या नियोजन करण्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

तरी मनपाने कालबाह्य झालेली वाहने निकालात काढून नविन वाहने खरेदीबाबतचे धोरण निश्चित करावे.

DATMMSM6701 (Ref No : 163)

132 सामान्य प्रशासन विभागामधील कर्मचाऱ्यांना चुकीच्या दराने स्थानिक पूरक भत्त्याचे प्रदान व वेतन देयकातून भविष्य निर्वाह निधी/डीसीपीएस वर्गणी कपात न करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :79 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

सामान्य विभागाच्या माहे 11/2014 च्या वेतन देयकात अनेक अनियमितता आढळून आलेल्या आहेत. काही

अधिकारी/ तृतीय श्रेणी कर्मचारी व चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना प्रदान करण्यात आलेल्या स्थानिक पुरक भत्त्याच्या रकमेत तफावत दिसून येत आहे. काही अधिकारी/ तृतीय श्रेणी कर्मचारी व चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांची भविष्य निर्वाह निधीची वर्गणी किंवा डीसीपीएस यापैकी कुठलीही वर्गणी कपात केलेली नाही. तसेच काही कर्मचाऱ्यांना इतर भत्ते या रकान्या अंतर्गत रक्कम प्रदान केलेली आहे परंतु सदर रक्कम कशाची याचा उल्लेख देयकात नाही.

सामान्य प्रशासन विभागाच्या माहे 11/2014 च्या वेतन देयकाची **अधिकारी/तृतीय श्रेणी कर्मचारी** (प्रमाणक क्र.9803 दि.15.01.2015) व **चतुर्थ श्रेणी कर्मचारी** (प्रमाणक क्र.9779 ते 9782 दि.15.01.2015, रु.660397/-) तपासणी केली असता पुढीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आलेल्या आहेत.

1) स्थानिक पूरक भत्त्याचे दरातील तफावत.

सहावे वेतन आयोगाचे शिफारसीनुसार दि.1.1.2006 पासून कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन लागू असले तरी शासन निर्णय वित्त विभाग दि.11.12.1998 अन्वये देय स्थानिक पूरक भत्त्याचे दरात कुठलीही वाढ करावयाची नसल्याने दि.1.1.2006 पूर्वीच्या जुन्या वेतन श्रेणीवर लागू असलेल्या दरानेच स्थानिक पूरक भत्ता प्रदान करावयाचा आहे. पाचव्या वेतन आयोगाचे शिफारसीनुसार कर्मचाऱ्यांचे असलेले मूळ वेतन याबाबतची नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे त्यांना त्यांच्या वेतनानुसार देय स्थानिक पुरक भत्त्याचे निश्चित दर उपलब्ध नाही.तथापि एकाच संवर्गातील कर्मचाऱ्यांचे एकाच वेतन टप्प्यातील अपेक्षित वेतन विचारात घेतल्यास त्यांच्या स्थानिक पुरक भत्त्याच्या दरातही साम्य असणे अपेक्षित होते. परंतू माहे 11/2014 च्या वेतन देयकाच्या तपासणीत पुढील कर्मचाऱ्यांना दिलेल्या स्थानिक पुरक भत्त्याच्या रकमेत तफावत असल्याचे दिसून आले.

DRAFT

<u>वरिष्ठ लिपीक</u>

1. श्री दुर्गादास मिसाळ मुळ वेतन रु.13740/- - स्था.पु.भत्ता रु.120/-.
2. श्री सुधीर बपोरीकर मुळ वेतन रु.14860/- - स्था.पु.भत्ता रु.80/-.
3. श्रीमती संगीता बोरकर मुळ वेतन रु. 8240/- - स्था.पु.भत्ता रु.120/-.
4. श्रीमती सोनाली चिचे मुळ वेतन रु.8770/- - स्था.पु.भत्ता रु. 65/-.

कनिष्ठ लिपीक

1. श्रीमती प्रतिभा मानकर मुळ वेतन रु. 8940/- - स्था.पु.भत्ता रु. 120/-.

2. श्रीमती रंजना जोशी मुळ वेतन रु 10130/- - स्था.पु.भत्ता रु.65/-.

चतुर्थ कर्मचारी

1. श्री दिनेश कुंबालकर - मुळ वेतन रु. 6900/- रु. 120/-.
2. श्री अविनाश पाटील - मुळ वेतन रु. 6900/- रु 35/-.
3. श्री. अमोल साकुरे - मुळ वेतन रु. 6010/- रु. 120/-.
4. तौहीद अ. वहीद - मुळ वेतन रु. 6010/- रु. 35/-.
5. श्री प्रकाश खंडेतोड - मुळ वेतन रु. 9230/- रु. 65/-.

अशा प्रकारची तफावत अनेक कर्मचाऱ्यांच्या वेतनात आढळून आली आहे.

2) <u>इतर भत्ता रकान्यात दर्शविलेल्या रकमेबाबतचा तपशील नसणे.</u>

वेतन देयकातील इतर भत्ता या रकान्यात पुढील कर्मचाऱ्यांना त्यासमोर दर्शविल्याप्रमाणे रक्कम प्रदान करण्यात आली आहे.सदर रक्कम कशाची आहे नमूद नाही.

अ) श्री बोरकर, रोखपाल रु. 300/-

ब) श्री विनोद निचत, क.लि. रु. 200/-

क) मो. मुमताज,वाहन चालक रु. 200/-

ड) श्री विनय हस्तक रु. 300/-.

3) <u>वेतन देयकातून भविष्य निर्वाह निधी/डीसीपीएस कपात न करणे.</u>

पुढील अधिकारी/कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची वर्गणी किंवा डीसीपीएस यापैकी कुठलीही वर्गणी कपात केलेली नाही.

11) **<u>अधिकारी/तृतीय श्रेणी कर्मचारी</u>**

अ) श्री योगेश पीठे,सांख्यिकी अधिकारी

ब) श्री नरेंद्र वानखेडे, महिला व बाल विकास अधिकारी

क) श्री अशोक राठोड, उपलेखापाल

ड) श्री दिलीप पाठक, व.लिपीक याशिवाय 21 इतर कर्मचारी.

2) **<u>चतुर्थ कर्मचारी</u>**

एकूण 26 कर्मचारी.

उपरोक्त अनियमितताबाबत अर्धसमास क्र.76 दि. 12/03/2018 अन्वये खुलासा मागविण्यात आला.मात्र खुलासा प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 76)

DRAFT

133 अनुदान नोंदवही विहित नमुन्यात न ठेवणे,नोंदवहीत अपूर्ण नोंदी घेणे व योजनानिहाय स्वतंत्र रोखपुस्तक न ठेवणे याप्रमाणे आढळून आलेल्या त्रुट्याबाबत..

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 03

लेखा शीर्ष :00 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ङ

महानगरपालिका, अमरावती मध्ये National Municipal Accounts Manual यातील प्रकरण 3 व 17 मध्ये नमूद कार्यपद्धतीनुसार अनुदान नोंदवही नमुना G-1 या नमुन्यात ठेवलेली नाही.ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत अपूर्ण नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. खर्चाच्या नस्त्या लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेल्या नाही. तसेच योजना किंवा अनुदाननिहाय स्वतंत्र रोखपुस्तक ठेवण्यात आले नाही. त्यामुळे प्राप्त अनुदान व त्यातून होत असलेला खर्च त्या-त्या मंजूर योजनांशिवाय अन्य बाबींवर करण्यात येत नाही याची खात्री होत नाही. तसेच अनुदान शिलकेवर नियंत्रण ठेवता येत नाही.

National Municipal Accounts Manual यातील प्रकरण क्रमांक 17 (अनुदान) यातील G-1 या विहित नमुन्यात अनुदान नोंदवही ठेवावयाची असून त्यात ज्या योजनेकरिता अनुदान प्राप्त झाले आहे :-

1) त्या योजनेचे नाव
2) प्राप्त अनुदान व दिनांक
3) अनुदानातून केलेल्या खर्चाचा प्रमाणक क्र. व दिनांक
4) अखर्चित राहिलेल्या अनुदानाची रक्कम
5) अखर्चित रक्कम परत केल्याचा दिनांक

याप्रमाणे रकानानिहाय नियमित नोंदी घेणे आवश्यक आहे.

तसेच National Municipal Accounts Manual यातील परिच्छेद क्रमांक 17.17(b) नुसार विविध योजनेकरिता प्राप्त अनुदानाच्या अनुषंगाने प्रत्येक योजनेकरिता स्वतंत्र रोखपुस्तक नमुना GEN-1 या नमुन्यात ठेवणे आवश्यक आहे.या महानगरपालिकेत विविध योजनांसाठी स्वतंत्र बँक खाते उघडण्यात आले असून शासकीय अनुदानाचे योजनानिहाय स्वतंत्र रोखपुस्तके ठेवण्यात आली नाहीत. एकाच रोखपुस्तकात सर्व योजनांच्या जमा खर्चाचा एकत्रित हिशोब ठेवण्यात येतो. त्यामुळे शासकीय अनुदानातून होत असलेला खर्च त्या-त्या मंजूर योजनांशिवाय अन्य बाबींवर करण्यात येत नाही याची खात्री होत नाही.

DRAFT

सन 2014-15 मध्ये मनपास प्राप्त झालेल्या शासन अनुदानाचे लेखा विभागाकडील विवरण अप्राप्त आहे. लेखापरीक्षणास उपलब्ध अनुदान नोंदवही व अंदाजपत्रकातील प्रत्यक्ष आकडेवारीशी तूलना केली असता त्यामध्ये बरीच तफावत आढळते.

(रक्कम रुपयात)

अनुदान नोंद्वहीनुसार प्राप्त एकूण शासकीय अनुदान	अंदाजपत्रकातील प्रत्यक्ष आकडेवारीनुसार प्राप्त एकूण शासकीय अनुदान
13,89,48,570/-	56,61,49,960/-
13,89,48,570/-	56,61,49,960/-

सदरची तफावत लक्षात घेता प्राप्त अनुदानाबाबत लेखा शाखेकडेच परिपूर्ण माहिती उपलब्ध नाही असे दिसते. परिणामत: लेखा शाखेने संपूर्ण मनपास प्राप्त अनुदान, त्यामधून प्रमाणकनिहाय केलेला खर्च, शिल्लक / अखर्चित अनुदान यावर नियंत्रण म्हणून आवश्यक असलेली अनुदान नोंदवही व अनुदाननिहाय स्वतंत्र रोखपुस्तकाचे व्यवस्थापन केले नाही ही बाब स्पष्ट होते. सदर बाब पारदर्शक व अचूक लेखांकनाचे दृष्टीने गंभीर आहे असे वाटते.

National Municipal Accounts Manual यातील प्रकरण 3 व 17 यात नमूद कार्यपद्धतीनुसार कार्यवाही केल्यास तसेच अनुदान नोंदवही नमुना G-1 व प्रत्येक योजनेकरिता स्वतंत्र रोखपुस्तक (सध्या ठेवण्यात येत असलेल्या सामान्य रोखपुस्तकशिवाय) नमुना GEN-1 या नमुन्यात ठेऊन त्यात नियमित नोंदी घेण्यात आल्यास संभाव्य वित्तीय अनियमितता टाळता येतील. मात्र अमरावती महानगरपालिकेत याप्रमाणे कार्यवाही होत नाही.

महानगरपालिका, अमरावतीच्या सन 2014-15 मधील लेखापरीक्षणात सन 2014-15 मध्ये विविध योजनेखाली प्राप्त अनुदान व खर्चाची आकडेवारी असलेली अद्यावत नोंदवही तथा खर्चाच्या नस्त्या मनपाच्या लेखा विभागास अर्धसमास क्रमांक 08/दि.23-01-2018,139/दि.16-04-2018,185/दि.23-05-2018 व क्र. 227/दि.10-07-2018 अन्वये मागविण्यात आल्या होत्या. परंतू उक्तप्रमाणे नोंदवही अद्यावत नसल्याने तथा मागणी करूनही नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATMMSM6701 (Ref No : 227)

135 महानगरपालिकेच्या सर्व चल व अचल संपत्तीवर घसारा आकारून घसारा निधीची उभारणी न केल्यामुळे निर्लेखनयोग्य चल व अचल संपत्तीची नव्याने उभारणी करण्यास आर्थिक अडचण येत असलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :34 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

महानगरपालिकेच्या सर्व चल व अचल संपत्तीवर घसारा आकारून त्याप्रमाणे घसारा राखीव निधीची उभारणी न केल्यामुळे चल/अचल संपत्तीचे मूल्य निश्चित करता येत नाही.तसेच निर्लेखनयोग्य चल व अचल संपत्तीची नव्याने करण्यास मनपास आर्थिक अडचणी येत आहेत.

महानगरपालिकेच्या चल व अचल संपत्ती उभारणीच्या वर्षापासून संपत्तीवर होत असलेल्या घसा-याबाबत वार्षिक आकारणी केल्याची नोंदवही लेखापरीक्षणास सादर करणेबाबत कारखाना विभाग तथा लेखा विभागास (अर्धसमास क्र. 8/दि.23-1-18,63/दि.27-2-18,139/16-4-18व 185/23-5-18) कळविण्यात आले मात्र नोंदवही उपलब्ध करण्यात आली नाही.त्यामुळे प्रत्यक्ष भेटून नोंदवहीची मागणी केली असता अशी घसारा नोंदवही ठेवण्यात आली नसल्याचे दोन्ही विभागाकडून सांगण्यात आले. याशिवाय अग्निशमन विभागाकडे अर्धसमास क्र.154 दि.23/04/2018 अन्वये विचारणा करण्यात आली. परंतू अग्निशमन विभागाकडेसुद्धा घसारा नोंदवही ठेवण्यात आली नसल्याचे सांगण्यात आले.

शासनाने नगर विकास विभाग, शा.नि.क्र.लेखासु.10.2004/71/प्र.क्र.5/04/नवि.31दि.6 जुलै 2005 अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपरिषदांमध्ये दुहेरी नोंद लेखापद्धतीची अंमलबजावणी करून त्यानुसार लेखे ठेवणे बंधनकारक केले आहे. त्यानुषंगाने राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियम पुस्तीकेमधील परि.21.18 मध्ये नमुद्नुसार महानगरपालिकेतील सर्व अचल संपत्तीची नोंद जीईएन-30 व चल संपत्तीची नोंद जीईएन-31 मधील नोंदवहीत घेऊन परि.क्र.21.17 मध्ये तक्ता क्र.21.1 नुसार सर्व चल व अचल संपत्तीवर घसारा आकारून त्याप्रमाणे द्विनोंद लेखा पद्धती लेख्यांमध्ये संपत्ती दर्शविणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेने सर्व चल-अचल संपत्तीवर घसारा आकारून तेवढी रक्कम नियमितरीत्या घसारा निधीमध्ये जमा केल्यास नवीन चल व अचल संपत्ती उभारणीकरिता सुयोग्य नियोजन करणे शक्य होईल. मात्र महानगरपालिकेने घसारा निधीची उभारणी केलेली नाही तथा याद्दष्टीने पर्याप्त प्रयत्नही केले नसल्याचे दिसून येते. राखीव निधी उपलब्ध नाही व मनपाच्या कमकुवत आर्थिक स्थितीमुळे नवीन चल व अचल संपत्तीची उभारणी शक्य दिसून येत नाही.त्यामुळे अकार्यक्षम व निर्लेखनयोग्य वाहनांना सुस्थितीत ठेवण्यासाठी जुन्या वाहनावर जास्तीचा खर्च करावा लागत आहे. तसेच मोडकळीस आलेल्या इमारती व फर्निचर इत्यादीची सुधारणा अथवा नव्याने उभारणी करता येत नाही. मात्र मनपाने सदर बाबीकडे पूर्णत: दुर्लक्ष केल्याचे दिसते. सन 2016-17 च्या अंदाजपत्रकाची पाहणी केली असता सन 2012-13 ते 2014-15 या कालावधीत घसारा निधीसाठी तरतूदही केलेली नाही.

महानगरपालिकेने अधिनस्त चल व अचल संपत्तीची विहित नमुन्यात नोंद असलेली नोंदवही सादर न केल्यामुळे चल,अचल संपत्तीची आजच्या परिस्थितीत असलेली किंमत तसेच त्यावरील घसा-याच्या रकमेबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.तरी विभागाने विहित नमुन्यात घसा-याची नोंदवही तयार करून त्यात सर्व चल,अचल संपत्तीच्या नोंदी घेऊन नोंदवही अद्यावत करावी तसेच घसारा राखीव निधी उभारण्याच्या दृष्टीने तात्काळ उपाययोजना कराव्यात व उचित कार्यवाहीअंती

अनुपालन सादर करावे.

DATMMSM6701 (Ref No : 185)

136 कर्जनिवारण निधीमध्ये रकम जमा न करणे,उपलब्ध रकमांची गुंतवणूक न करणे याप्रकारे निधीच्या चुकीच्या व्यवस्थापनाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 02

लेखा शीर्ष :34 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 113,114 नुसार कर्ज देणाऱ्या संस्थांना जेवढी रक्कम अदा केलेली आहे तेवढ्या सममूल्य रकमेचा भरणा तरतूद करून कर्जनिवारण निधी खात्यात केलेला नाही. फक्त अंदाजपत्रकात रु.50.00 लक्षाची तरतूद केलेली आहे. कर्जनिवारण निधी बँक खात्याच्यासन 2014-15 च्या विवरणपत्राची पडताळणी केली असता या वर्षात कुठल्याही रकमेचा भरणा केलेला नसल्याचे दिसून आले. तसेच या निधीखालील बँक खात्यातील रकमांची गुंतवणूक करण्यात आली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 112 नुसार महानगरपालिकेत कर्जनिवारण निधीची स्थापना करणे आवश्यक असून कलम 113 व 114 नुसार कर्जनिवारण निधीमधील रकमांची गुंतवणूक करून कलम 115 नुसार कर्जनिवारण निधीची तपासणी होणे आवश्यक आहे.

तसेच नियमानुसार कर्ज देणाऱ्या संस्थांना जेवढी रक्कम अदा केलेली आहे तेवढ्या सममूल्य रकमेचा भरणा,अंदाजपत्रकात तरतूद करून कर्जनिवारण निधी खात्यात करणे आवश्यक आहे. सन 2014-15 च्या अंदाजपत्रकात रु. 50.00 लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.मात्र प्रत्यक्षात कर्जनिवारण निधी बँक खाते पुस्तिका व अंदाजपत्रकाची तपासणी केली असता सन 2013-14 ते 2015-16 या कालावधीत मनपाने बँक खात्यात कुठल्याही रकमेचा भरणा केलेला नाही.

महाराष्ट्र मनपा अधिनियम 113(2) नुसार अशा कर्जनिवारण निधीतील रकमेची गुंतवणूक करून त्यावरील प्राप्त व्याज व अन्य रकमा कर्ज निवारण निधीत भरणा करण्यात येतील आणि त्या मिळाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, पोटकलम (1) मध्ये विहित केलेल्या रितीने गुंतवल्या जातील अशी तरतूद आहे.कर्जनिवारण निधीचे Axis Bank, Amravati खाते क्र.911010036128187 मध्ये सन 2014-15 च्या सुरुवातीची शिल्लक रु.10,41,510/-, त्यावरील सन 2014-15 मध्ये प्राप्त व्याज रु.42289/- याप्रमाणे सन 2014-15 च्या अखेरीस रु.10,83,799/- शिल्लक होते.उक्त नियमानुसार त्याची गुंतवणूक करणे आवश्यक होते.परंतू तसे न केल्याने मनपाने कर्जनिवारण निधी (Sinking Fund) ची योग्य प्रकारे उभारणी व व्यवस्थापन केले नसल्याचे स्पष्ट

होते .

DATMMSM6701 (Ref No : 185)

143 JNNURM अतंर्गत शहर बस खरेदीस मंजूरी प्राप्त असून मनपाकडून बस खरेदीस विलंब झाल्याने शहर बसेसचा लाभ नागरिकांना न मिळणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 01

लेखा शीर्ष :284 शासन निधी निधी
अनियमितता कलम : 9ड

शासकीय योजना जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिनीवल मिशन अंतर्गत दि.20.02.2014 ला मिनिस्ट्री ऑफ डेव्हलपमेंट निर्माण भवन, नवि दिल्ली येथे बैठक होऊन त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने सादर केलेल्या D. P. R. चे अनुषंगाने अमरावती महानगरपालिका, अमरावतीला JNNURM योजनेतून 50 बसेस खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यास मंजूरी प्रदान करण्यात आली.परतुं शहर बस खरेदेकरीता महानगरपालिका अमरावतीकडून प्रशासकीय कार्यवाही करण्यास विलंब झाल्याने बसेस खरेदी करता आल्या नाही.

महानगरपालिका अमरावती शहरातील शहर बस वाहतुक अधिक सक्षम करण्याच्या हेतूने शासकीय योजना जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीव्हल मिशन अतंर्गत शहर बस वाहतुकीकरीता लागणा-या 64 बसेचचा D. P. R. तयार करुन तसा प्रस्ताव दि.18.11.2013 ला महाराष्ट्र शासनास सादर केला.

महाराष्ट्र शासनाने सदर उपक्रमाच्या 64 बसेस उपलब्ध करुन देण्याकरीता दि.25.01.2014 रोजी मुंबई येथे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची बैठक घेवून D. P. R. ची तपासणी करुन मंजूरीसह प्रस्ताव केन्द्र शासनाकडे पाठविला. नवी दिल्ली येथे दि.20.02.2014 रोजी मिनिस्ट्री ऑफ अर्बन डेव्हलपमेंट निर्माण भवन नवी दिल्ली येथे JNNURM योजनेमधून 64 बसेस उपलब्ध करुन देण्याकरीता बैठक झाली. सदर बैठकीत D P R तपासून पत्र क्र. K-14011/30/2012-UT-1 दिनांक 26.02.2014 चे पत्रान्वये JNNURM योजनेतून 50 बसेस महानगरपालिका अमरावतीला देण्याचे निश्चित करण्यात आले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी पत्र क्र.जेएनएनयुआरएम/ महानगरपालिका/144/2014 दिनांक 29.05.2014 अन्वये महानगरपालिका अमरावतीने शहर बस खरेदीकरीता निविदा प्रक्रिया पुर्ण करुन बस खरेदी कार्यवाही करावी, असे निर्देशित केले. त्यानुसार मनपा अमरावतीने ई-निविदा मागविल्या
असून पुढील कंपनीकडून प्रती बस दर प्राप्त झाले.

(अ) अशोक लेलॅन्ड रु.25,19,000/- प्रती बस
(ब) SML ISUZU Ltd रु.24,65,000/- प्रती बस
(क) टाटा मोटर्स रु.24,50,488/- प्रती बस

प्राप्त झालेल्या निविदा दरापैकी टाटा मोटर्स यांनी दिलेले दर रु.24,50,488/- प्रती बस कमी असल्याने आयुक्त मनपा, अमरावती 50 शहर बसेस खरेदी करण्याकरीता एकुण रु.24,50,488/-X50 बसेस = रु.12,25,24,400/- एवढया खर्चास दि.10.06.2014 मंजूरी देवून स्थायी समितीकडे मंजूरीसाठी प्रकरण सादर केले. स्थायी समितीने जून-2014 मध्ये प्रशासकीय विषयास व टिपणीचे अनुषंगाने प्रती बस रु.24,50,488/- प्रमाणे 50 शहर बसेस खरेदी करण्याकरीता व खर्चास मान्यता प्रदान करण्यात आली.

परंतु मनपा अमरावती प्रशासनाकडून बस खरेदीकरीता अनुदानासाठी शासनाकडे पाठपुरावा न करणे तसेच खरेदीबाबत स्थायी समितीची मंजूर घेण्यास तसेच खरेदी प्रक्रिया पुर्ण करण्यास शासनास दि.18.11.2013 ला प्रस्ताव सादर केल्यापासून ते दि.10.06.2014 पर्यंत स्थायी समितीची मंजूरी घेण्यास विलंब झाला. दरम्यानच्या काळात JNNURM योजना अंतर्गत निधी वाटप करणे बंद झाल्याने मनपास निधी प्राप्त झाला नाही. परिणामी मनपा अमरावतीला सदर योजनेमधून प्राप्त होणा-या बसेसपासून वंचित राहावे लागले. पर्यायाने अमरावती शहरातील नागरिकांना शहर बस सेवेचा लाभ मिळाला नाही.

DATDUBM6401 (Ref No : 74)

151 अभिलेखे / माहिती उपलब्ध न करण्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015
अनियमितता संख्या : 00

लेखा शीर्ष :00 मनपानिधी निधी
अनियमितता कलम : 9ड

मनपा अमरावतीच्या सन 2014-15 च्या लेखापरिक्षणासंबंधाने महत्वाच्या नस्त्या, अभिलेख, माहिती तपशील लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून देण्यात आले नाहीत.

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 (सुधारित अधिनियम 2011) नुसार मनपा अमरावतीचे सन 2014-15 चे लेखापरिक्षण करण्यात आले असून उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार लेखापरीक्षण पथकाने मागणी केलेली माहिती/तपशील वरील उपलब्ध करून देणे आवश्यक होते. असे असूनही पुढील अर्धसमासांना अनुसरून आवश्यक पूर्तता करण्यात आली नाही.

अ. क्र.	अर्धसमास क्र.	दिनांक	सादर न केलेल्या बाबीचा तपशील

1	15	30/01/2018	रहदारी पास कंत्राटबाबत नस्ती
2	22	02/02/2018	1. शासनाकडून हस्तांतरीत व मनपाच्या मालकीच्या मालमत्तांच्या वापर/विनियोगाचा तपशील 2. न्यायालयीन प्रकरणांतर्गात गुंतलेल्या मालमत्तांची यादी, सद्यस्थिती व नस्त्या
3	43	16/02/2018	कर महसुलाची मागणी व वसुली, मालमत्तांची संख्या पुन:मुल्यांकित मालमत्तांची संख्या, अनादरित धनादेशाचा तपशील.
4	100	28/03/2018	बिंदू नामावली
5	119	06/04/2018	TDR Zone च्या रचनेबाबत मुद्यावरील खुलासा
6	177	09/05/2018	घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी मे. इफोफिल टेक इंडिया प्रा.लि. यांची मंजूर निविदा व कारनामा नस्ती.
7	207	21/06/2018	1. व्यवसायिकांच्या परवान्यांपासून वसुली. 2. व्यवसायिकांच्या सर्वेक्षणासाठी मे.सिमॅक प्रा.लि. अमरावती याची मंजूर निविदाबाबत नस्ती.
8	208	21/06/2018	जे एंड डी मॉलपासून 2006 ते 2018 पर्यंत प्राप्त उत्पन्नाबाबत.
9	226	10/07/2018	प्रियदर्शिनी व्यापार संकुल नव्याने केलेला करारनाम्यांबाबत मुद्द्यांवरील खुलासा.

मनपा अमरावतीचे लेखापरीक्षण सुरु करण्यापूर्वी उपसंचालक (मनपालेप) स्थानिक निधी लेखापरीक्षा , औरंगाबाद उपविभाग क्र.3 , औरंगाबाद यांनी मनपा आयुक्तांना पाठविलेल्या सूचनापत्रात लेखापरीक्षेसाठी लेखे उपलब्ध करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकारणाची असल्याबाबत व ते सादर न केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतूद असल्याचे उपरोक्त अधिनियमातील कलम 4, 6 व 7 च्या उल्लेखासह निदर्शनास आणून दिलेले होते. त्याशिवाय पथक प्रमुखांनी दि. 17.01.2018 रोजी मनपा आयुक्तांकडे झालेल्या एन्ट्री कॉन्फरन्स दरम्यानही त्यासंबंधात सूचना दिलेली होती. लेखापरीक्षण पथकाचे पत्र क्र. स्था-18/ब/मनपालेप/अमरावती/02 /2018 दि. 25.01.2018 अन्वये अर्धसमासांना अनुसरून अभिलेखे उपलब्ध होत नसल्याचे मनपा आयुक्तांना कळवितांना वरील दंडात्मक तरतुदींची संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना जाणीव करून देण्याचीही सूचना करण्यात आली होती. असे असतांना वरील अर्धसमासातील बाबींचे अनुपालन करण्यात आले नाही. सबब मनपा आयुक्तांनी वरील तरतुदींनुसार आवश्यक कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

DATABWM6901 (Ref No : 15)

लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र

नाव	परिच्छेद क्रमांक
अतुलकुमार भाऊराव वासनिक, सहाय्यक संचालक	100, 101, 102, 103, 104, 105, 124, 125, 126, 127, 128, 129, 151, 153, 23, 33, 39, 4, 40, 41, 42, 43, 5, 6, 75, 76, 77, 78, 79, 80, 81, 82, 83, 87, 88, 89, 90, 91, 96, 97, 99
दिपक शंकरराव ठाकरे, लेखापरिक्षा अधिकारी	121, 122, 123, 18, 19, 24, 26, 27, 56, 57, 58, 62, 7, 73, 74, 9, 98
विलास उदेभानजी बोधनकर, लेखापरिक्षा अधिकारी	10, 106, 107, 108, 109, 110, 111, 112, 113, 116, 117, 118, 119, 12, 139, 140, 141, 142, 143, 144, 145, 146, 147, 148, 149, 150, 152, 17, 28, 31, 32, 34, 35, 36, 38, 63, 64, 65, 66, 67, 68, 69, 70, 71, 72, 93, 94, 95
श्री. महेंद्र मदन सुखदेवे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी	11, 120, 13, 130, 131, 132, 133, 134, 135, 136, 137, 14, 15, 16, 49, 50, 51, 52, 53, 54, 55
वजिय विश्वनाथ बागडे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी	114, 115, 138, 25, 37, 44, 45, 46, 47, 48, 60, 61, 8, 84, 85, 86
शैलेंद्र प्रभाकर पुरी, कनिष्ठ लेखापरिक्षक	20, 21, 22, 29, 30

DRAFT

परिच्छेदनिहाय अनुक्रमणिका

प. क्र.	परिच्छेद शीर्षक	कलम	पृष्ठ क्र.
4	महसुलाचा प्रमुख स्त्रोत असलेल्या मालमत्ता कराच्या थकीत मागणीबाबत.	(9अ)	4
5	शासनाने विहित केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे वार्षिक लेखे तयार करून ते लेखापरीक्षणास प्रमाणिकरणाकरिता सादर न करणे.	(9अ)	5
6	समाजमंदिरा पासून रु. 70 लाखाच्या अवैध वसुली प्रकरणावर कार्यवाही न होणेबाबत.	(9ब)	90
7	वेतनातून आयकराची दरमहा कपात न करता एकत्रित कपात करणेबाबत.	(9ड)	257
8	आरोग्य विभागातील कार्यरत श्रीमती वैशाली व.भुयार (शेंडे) प्रयोगशाळा तंतज्ञ यांची वेतननिश्चिती करताना चुकीची वेतनवाढ देवून मूळ वेतनात रु.58440/- व त्यावरील भत्ते एवढे अतिप्रदान केल्याबाबत.	(9अ)	7
9	कर निर्धारणानंतर स्थानिक संस्था कराची रु.23.46 लाख एवढी रक्कम अद्याप वसूल न होणेबाबत.	(9ब)	90
10	सहकारी बँकेकडून अथवा पतसंस्थेकडून कर्ज घेतांना कर्मचा-यांची एकूण वित्तलब्धी तसेच सहकार कायदयातील तरतूदी विचारात न घेता विभाग प्रमुखाने बेजबाबदारपणे हमी देण्याची अनियमितता.	(9ड)	258
11	सन 2014-15 मध्ये महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिरातीसाठी संबंधित वृत्तपत्रांना शासन मान्य दरापेक्षा अधिक दराने रक्कम अदा केल्याने मनपाचे झालेले नुकसान रु.104076/- बाबत.	(9ब)	92
12	आयकर अधिनियम 1961 कलम 192 च्या तरतूदीनुसार मनपा सेवेतून सेवानिवृत्ती झालेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनातून आयकर कपात न करणेबाबत.	(9अ)	8
13	सन 2014-15 मध्ये शासनाच्या वतीने शिक्षण कर,रोजगार हमी उपकर व मोठया निवासी इमारतीवरील कर अंतर्गत नागरिकांकडून वसूल केलेली रक्कम रु.5.01 कोटी शासन खात्यात विलंबाने भरणा करण्यात आल्याबाबत.	(9ब)	96
14	सन 2014-15 या आर्थिक वर्षात प्रदान केलेल्या रु.11.57 लाख इतक्या अग्रीमाचे प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या बिजकांसह समायोजन न झाल्याने मनपा निधीच्या झालेल्या संभावित हानीबाबत.	(9ब)	98
15	सन 2014-15 च्या भांडार तथा छपाई विभागाचे लेखापरीक्षणात आढळून आलेल्या अनियमितताबाबत.	(9ड)	261
16	कर्जनिवारण निधी खात्यातील जमा रकमा दीर्घ मुदतीसाठी गुंतवणूक न करता बचत खात्यात ठेवल्याने 2014-15 मध्ये अंदाजे रु 48843/ व्याजाचे नुकसान	(9ब)	100

DRAFT

प. क्र.	परिच्छेद शीर्षक	कलम	पृष्ठ क्र.
	होणेबाबत.		
17	मनपाच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या सेवापुस्तकातील नोंदी अद्दयावत नसणे तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार आवश्यक नोंदी न घेणेबाबत.	(9ड)	265
18	क्रिडा विभागातील क्रिडा रत्न पुरस्काराच्या खर्चामधील अनियमिततेबाबत.	(9ड)	269
19	मनपाचे कर विभाग/म्यु.नगर रचना विभागातील कर्मचा-यांचे सेवापुस्तकातील अनियमिततेबाबत.	(9ब)	101
20	स्थायी समिती ठरावाद्वारे निश्चित केलेल्या परवाना शुल्काच्या रकमेपेक्षा कमी दराने वसुली केल्याने रु.22000/- च्या महसुलाच्या हानीबाबत.	(9ब)	105
21	सेवाकराची आकारणी न केल्यामुळे व विहित मुदतीत सेवाकराचा भरणा न केल्यामुळे रु. 29.00 लाख एवढ्या संभाव्य दंडनीय व्याजाची जबाबदारी निश्चित करून वसुली होणेबाबत.	(9ब)	107
22	जाहिरातीवरील कर वसुलीचे काम कंत्राट तत्वावर दिल्याने विहित मुदतीत कराची रक्कम मनपास प्राप्त होत नसल्याने त्यावर आकारण्यात येणाऱ्या व्याजाची एकूण रक्कम रु. 10048500/- चे मनपाचे नुकसान होणेबाबत.	(9ब)	108
23	बांधकाम परवानगी जारी करण्यापूर्वी स्थानिक संस्था कराच्या बँकेत परस्पर भरलेल्या रकमांची बँक स्क्रोलवरून तपासणी न केल्याने मनपा महसुलाच्या हानीच्या शक्यतेबाबत	(9ड)	271
24	स्थानिक संस्था कर निर्धारण रक्कम विलंबाने भरणा केल्यास व्याज व दंडाची रक्कम न आकारणेबाबत.	(9ड)	273
25	महानगरपालिका अमरावती कार्यालयातील आरोग्य विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतनामधून भविष्य निर्वाह निधी किंवा डीसीपीएस ची कपात न केल्याबाबत.	(9ड)	274
26	स्थानिक संस्था कराच्या प्राप्त रकमेतील आढळून आलेल्या तफावतीचा ताळमेळ न घेणेबाबत.	(9ब)	110
27	स्थानिक संस्था कराची एकाच व्यापा-यांनी दुबार नोंदणी केल्याबाबत.	(9अ)	9
28	अधिकारी/कर्मचारी यांनी संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर न करताही नियमित वेतनवाढी मंजूरीबाबतची अनियमितता.	(9ड)	275
29	भाडेपट्टीने दिलेल्या दुकान, गाळेधारकाकडून विलंबाने वसूल केलेल्या थकबाकीच्या रकमेवर शास्तीची आकारणी न केल्यामुळे मनपाचे रु. 70123/- चे नुकसान होणेबाबत.	(9ब)	112
30	महात्मा गांधी संकुल नुतनीकरण / नवीन लीजप्रक्रिया न राबविता 30 वर्षापेक्षा कालावधी होऊनसुद्धा सुरूच असणेबाबत.	(9ड)	278
31	आयुर्विमा महामंडळाकडून घेतलेल्या कर्जाची हमी शुल्क रक्कम तसेच त्यावरील व्याज व दंडणीय व्याजाबाबत.	(9ब)	114
32	रमाई आवास (घरकुल) योजनेसाठी शासनाकडे निधी मागणीचा प्रस्ताव सादर न केल्याने योजनेपासून लाभार्थी वंचित राहणेबाबत.	(9ड)	278

DRAFT

प. क्र.	परिच्छेद शीर्षक	कलम	पृष्ठ क्र.
33	शहरातील अनाधिकृत मोबाईल टॉवर्समुळे अंदाजे रु. 2. 27 कोटी एवढे मनपाचा महसुल, वाढीव मालमत्ता कर तसेच पर्यावरणविषयक हानी होणेबाबत.	(9ब)	116
34	श्रीमती उर्मिला अटाळकर सेवानिवृत्त कनिष्ठ लिपीक यांना सेवेत सामावून घेताना आवश्यक असणा-या प्रमाणपत्राची पुर्तता न करता वरिष्ठ पदावर सेवेत सामावून घेणे व इतर अनियमिततेबाबत.	(9ब)	118
35	दैनदिन साफसफाईच्या कामाला मुदतवाढ देणे तसेच विहित मुदतीत नविन निविदा प्रक्रिया न राबविणे व सेवा शुल्काचे प्रदानातील अनियमिततेबाबत..	(9ब)	120
36	झोन क्र. 1 मधील कार्यक्षेत्रात येणा-या मालमत्तेचे करनिर्धारण तसेच खुल्या भुखंडावर आकारणी न केल्याने मनपाच्या होत असलेल्या हानीबाबत.	(9ब)	124
37	प्रथम कालबद्ध पदोन्नती अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणी मध्ये वेतन निश्चित न करता चुकीची वेतनश्रेणी लागू केल्याने झालेल्या रु.70600 व त्यावरील भत्त्याचे अतिप्रदानाबाबत.	(9अ)	11
38	मनपाच्या नगर सचिव विभागाकडील चहापान खर्च, आकस्मिक खर्च, सादिल खर्च तसेच सदस्यांचे मानधन व वाहन भत्यावरील खर्चातील अनियमितता व अरिच्चेत निधीबाबत.	(9ब)	126
39	सन 2013 व 2014 च्या शीघ्र सिद्धगणकातील दराच्या तफावतीनुसार जमीनवापर मूल्याची अतिरिक्त रक्कम रु. 1.17 लाख वसूल न करणे व विशिष्ट हेतूसाठी प्राधिकृत नसलेल्या संस्थेस त्या हेतूसाठी भूखंड वाटप करणे बाबत.	(9ब)	128
40	पदे मंजूर नसल्यामुळे दवाखान्याच्या दोन (सुतिकागृह) इमारती बंद अवस्थेत पडून असतांना व पद निर्मिती संबंधाने नियोजन न करता नविन दवाखाना इमारती वरील खर्च झालेला रु. 83.56 लाख एवढा 13 व्या वित्त आयोगातील निधी अडकवून ठेवण्याबाबत.	(9अ)	13
41	मंजूर अभिन्यासातील खुल्या जमिनीच्या वाटपाची प्रक्रिया पूर्ण झाली नसतांना स्वयंसेवी संस्थेद्वारे सदर जमिनीचा वापर सुरु असणेबाबत.	(9अ)	14
42	बांधकाम परवानगी देताना भूखंडधारकाकडून प्राथमिक विकास खर्चापोटी रु. 90/- प्रती चौ.मी. ऐवजी रु.20/- प्रमाणे वसूल केल्याने रु. 2.72 लाखाच्या महसुलाची हानी होण्याबाबत.	(9ब)	130
43	मनपाच्या नुकसान भरपाईच्या रु. 240825/- पैकी रु. 140489/- एवढी रकम कर्मचाऱ्यांकडून वसूल न होणेबाबत.	(9ब)	132
44	वैद्यकीय अधिकारी यांना नियमबाह्य व्यवसाय रोध भत्त्याचे रु. 4,18,053/- एवढे अतिप्रदान झाल्यामुळे.	(9अ)	16
45	न्यायालयीन प्रकरणात महानगरपालिकेला सेवा देणाऱ्या अधिवक्त्याच्या शुल्कातून आयकराची कपात न केल्याबाबत.	(9ब)	133

DRAFT

प. क्र.	परिच्छेद शीर्षक	कलम	पृष्ठ क्र.
46	विवाह नोंदणी शुल्काची रक्कम तसेच विवाह मंडळाचे नोंदणी शुल्क व नुतनिकरणाची रक्कम शासनाकडे जमा न केल्याबाबत.	(9ड)	280
47	कर विभागातील कार्यरत श्रीमती सविता भगवंत पाटील, कनिष्ठ लिपिक यांची वेतननिश्चिती करताना चुकीची वेतनवाढ देवून मूळ वेतनात रु35400/- व त्यावरील भत्ते एवढे अतिप्रदान केल्याबाबत.	(9अ)	18
48	आरोग्य विभागातील कर्मचारी यांना निलंबित केल्यानंतर त्यांचा निलंबन कालावधी नियमित केला नसताना त्यांना कालबद्ध पदोन्नती व नियमित वेतनवाढी प्रदान करण्यात आल्या.	(9ड)	280
49	सन 2014 -15 मध्ये कंत्राटदार, पुरवठादार यांच्या देयकातून कपात केलेल्या रु.1.82 कोटी एवढया कार्यकंत्राट कर रकमेचा शासन खात्यात विलंबाने भरणा करण्यात आल्याबाबत.	(9ब)	134
50	कारखाना विभागाकडील भंगार ठरलेल्या वाहनांच्या विक्री प्रक्रियेतील विलंबामुळे मनपाचे झालेले नुकसान रु. 1,53,000/- बाबत.	(9ब)	136
51	महानगरपालिकेच्या हद्दीतील प्रवेश नाक्यावर खाजगी सुरक्षा रक्षक पुरविण्याचे आदेश होण्यापूर्वीच्या कालावधीतील पारिश्रमिक अदा केल्याने झालेले अतिप्रदान रु.67560/-बाबत.	(9ब)	137
52	अधिकच्या दराने सुरक्षा रक्षकांची नेमणूक केल्याने मनपाचे दरमहा होत असलेले नुकसानीबाबत.	(9ब)	138
53	महानगरपालिका अमरावती येथे शासन निर्देशानुसार बंधनकारक असलेल्या दुहेरी नोंद पध्दतीने लेखे न ठेवणेबाबत.	(9अ)	20
54	मा.राज्यमंत्री यांच्या सत्कार समारंभासाठी गरजेपेक्षा अधिक व अवास्तव दराने शाल खरेदी केल्यामुळे वित्तीय औचित्याचा भंग होणेबाबत.	(9अ)	22
55	सन 2014-15 मध्ये महानगरपालिकेच्या अधिकारी वर्गाकरिता भाडेतत्वावर घेतलेल्या खाजगी वाहनांच्या मासिक भाडे देयकांच्या तपासणीत आढळून आलेल्या अनियमिततांबाबत.	(9ब)	139
56	स्थानिक संस्था करनिर्धारण कंत्राटदाराचे देयकातून आयकराची वसुली न करणेबाबत.	(9ड)	282
57	सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या मानधनाचे देयकातील अनियमिततेबाबत.	(9ड)	283
58	अतिक्रमण विभागातील मजूरांना रोखीने प्रदान केलेल्या मजूरीसंबंधी मजूरांच्या स्वाक्षऱ्या नसतांना दर्शविण्यात आलेल्या रु.47352/- एवढया प्रदानातील अनियमिततेबाबत.	(9ब)	143
60	श्री. सुधीर श्यामराव कडू, आरोग्य कर्मचारी यांना चुकीची वेतननिश्चिती केल्यामुळे अतिप्रदान झाल्याबाबत.	(9अ)	23
61	महानगरपालिकेच्या आरोग्य तसेच कर विभागातील आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार परिपूर्ण व	(9ड)	284

DRAFT

प. क्र.	परिच्छेद शीर्षक	कलम	पृष्ठ क्र.
	आवश्यक नोंदी न घेतल्याबाबत.		
62	सार्वजनिक संडासाची दुरुस्तीमधील अनियमिततेबाबत	(9ड)	289
63	कु. उर्मिला एम. कासदेकर ए.एन.एम. आरोग्य विभाग यांना चुकीची वेतनवाढ लागू केल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत तसेच उपभोगलेली रजा खात्यात कमी खर्चीटाकण्यातील अनियमितता.	(9अ)	24
64	रमाई आवास योजनेतंर्गत पेव्हटेक कन्सल्टंट, पुणे यांना निविदा मुल्यापेक्षा जादा रकमेचे नियमबाहय प्रदान तसेच बांधकामातील त्रृटया व करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याबाबत.	(9अ)	26
65	मनपा हद्दितील प्रभागनिहाय दैनदिन साफसफाईचे कामाचे कंत्राटदारांना मासिक देयकाचे प्रदानातील अनियमिततेबाबत.	(9ब)	147
66	दैनदिन साफसफाईचे कंत्राटदारांना प्रदान करतांना 13.5% सेवा शुल्क अदा केल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत.	(9ब)	151
67	नाली कामगार व सफाई कामगारांना लागू करण्यात आलेल्या नियमबाहय ग्रेड-पे बाबत.	(9ब)	153
68	रमाई आवास योजनेतंर्गत मंजूर प्रकरणातील अनियमिततेबाबत.	(9ड)	290
69	रमाई आवास घरकुल योजनेतंर्गत लाभार्थ्यांना निवास वाटपातील अनियमितता.	(9ब)	156
70	मनपाच्या कर्मचा-यासाठी सेवानिवृत्तीनंतरच्या दायित्वासाठी तसेच मासिक निवृत्ती वेतनाची अदायगीसाठी निवृत्तीवेतन अशंदान निधीची स्थापना न करणेबाबत.	(9ब)	159
71	श्री. अविनाश कात्रे लसटोचक यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ नियमबाहय लागू केल्याने झालेल्या अतिप्रदान तसेच अर्हताकारी सेवेबाबत.	(9अ)	29
72	श्री. टि. एस. भोसले से. नि. क्रीडा अधिकारी यांना बडतर्फ कालावधीतील नियमबाहय वेतनाचे प्रदानाबाबत.	(9अ)	33
73	अतिक्रमणाचे काम केले नसलेल्या (कामावर अनुपस्थित असलेल्या) दिवसांची रु.1.18 लाख एवढे मजूरीचे प्रदान करणेबाबत.	(9ब)	161
74	बांधकाम विभागातील सन 2014-15 चा आकस्मिक खर्चाचा अभिलेख लेखापरीक्षणास सादर न करणे तसेच मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च करणेबाबत.	(9ड)	292
75	महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी मनपास बंधनकारक असलेल्या प्रशासकीय सुधारणात्मक बाबींवर अंमल न होणेबाबत	(9ड)	293
76	आर्थिक क्षमतेपेक्षा तिप्पट मुल्यांची शासन निधीतील बांधकामे एकाच कंत्राटदारास मंजूर करणेबाबत.	(9अ)	36
77	कंत्राटपध्दतीने चालविण्यास दिलेल्या सांस्कृतिक भवनापासून ठराविक रकमांच्या तुलनेत दोन स्वतंत्र अभिलेख्यानुसार वेगवेगळी व कमी रकम प्राप्त होणेबाबत.	(9ब)	167
78	तातडीची बाब नसताना तसे दर्शवून निविदा न मागविता रु.8.25 लाख मूल्याचे आराखडा तयार करण्याचे व समन्वयक पदाचे काम एकाच सल्लागारास	(9अ)	38

DRAFT

प. क्र.	परिच्छेद शीर्षक	कलम	पृष्ठ क्र.
	देण्याबाबत.		
79	ऑप्टीकल फायबर केबलचे जाळे टाकणे व अन्य भूमिगत कामासाठी वापरलेल्या जमिनीवरील भाडे रकमांवर रु. 5.87 कोटीचा सेवाकराची आकारणी व वसूली न करण्याबाबत.	(9ब)	169
80	शासनास भरणा करावयाच्या रॉयल्टी रकम कंत्राटदाराकडून वसूल करावयाची असताना मनपा/शासन निधितून 2014-2015 मध्ये रु. 74.16 लाख खर्च करण्याबाबत.	(9अ)	40
81	10% पेक्षा कमी दराच्या निविदेचे दर विश्लेषण व अंदाजपत्रकाची पुन:मांडणी न करता 15 ते 37% ने कमी दराच्या निविदा स्विकृत करणेबाबत.	(9अ)	46
82	राजापेठ उड्डाणपूलच्या बांधकाम सल्लागारास होणाऱ्या प्रदानातील अनियमितता मुळे शासननिधीचे होत असलेल्या नुकसानीबाबत.	(9ब)	170
83	दीर्घमुदतीसाठी भाडेपट्टीवर दिलेल्या वडाळी तलाव व छत्री तलावापोटी कंत्राटदाराकडून सेवाकराची रु.5.18 लाख एवढी रकम वसूल न करणेबाबत.	(9ब)	175
84	छत्री तलाव सुशोभित व सौंदर्य करण्यासाठी दिलेले एजन्सीद्वारे रक्कम उशिराने मनपा खात्यात जमा केल्याबाबत.	(9ब)	176
85	मनपा अमरावती क्षेत्रा अंतर्गत मोकाट जनावरे पकडण्याकरिता वाहन भाडे यावरील केलेल्या अनावश्यक खर्चा बाबत.	(9ब)	178
86	अपंगाकरीता वैयक्तिक लाभ योजनावर विहित प्रमाणात खर्च न करण्याची अनियमितता.	(9ड)	295
87	ऑप्टीकल फायबरसाठी मार्गांच्या हक्काच्या परवानगीचे नुतनीकरण न झाल्याने रु.1.54 कोटीच्या परवाना शुल्काची हानी होणेबाबत व 2014-15 मध्ये या प्रयोजनावरील प्राप्त रु.18.37 कोटीच्या महसुलाचे उचित लेखांकन न होणेबाबत.	(9ड)	296
88	मनपाकडील बांधकामाचा व त्यावर लावलेल्या कामगाराचा विमा न काढल्यामुळे मनपाच्या आर्थिकहिताचे व कामगारांचा विमा संरक्षण न होणेबाबत.	(9ड)	299
89	शासन अनुदानाच्या शिल्लक रकमेवर बँकेकडून प्राप्त व्याज रु. 37.75 लाख शासनास परत न करणेबाबत.	(9ड)	300
90	उचित स्पर्धा न होता बांधकामाच्या एकल निविदा (Singal tender) स्विकारणे बाबत व रु. 50 लाखावरील निविदांना स्थायी समितीने स्विकृती देणेबाबत.	(9ड)	301
91	खोदकामातील मातीचे जादा परिमाण दाखवून वाहतुकीवर झालेल्या अतिप्रदानाबाबत.	(9अ)	50
93	रमाई आवास योजनेतंर्गत शासनाकडून प्राप्त निधीवरील व्याज तसेच अखर्चित निधी शासनाकडे जमा न करणे व इतर अनियमिततेबाबत.	(9ब)	180
94	सार्वजनिक शौचालयाच्या साफसफाईच्या कामाच्या कंत्राटाची निविदा प्रसिध्द न करता जुन्याच कंत्राटदाराला मुदतवाढ देण्याबाबत.	(9ब)	185
95	व्यावसायीक प्रतिष्ठानांतील कचरा गोळा करणा-या कंत्राटदाराने करारनाम्यातील	(9ब)	187

DRAFT

प. क्र.	परिच्छेद शीर्षक	कलम	पृष्ठ क्र.
	अटी व शर्तीनुसार रॉयल्टी रकमेचा भरणा न केल्यामुळे मनपाच्या झालेल्या हानीबाबत.		
96	विभागीय आयुक्तांच्या सक्षम प्रशासकीय मान्यतेशिवाय शासन निधीतील शिल्लक रकमेतून रु.45.32 लाखाचे रस्ता डांबरीकरणाचे काम करण्याबाबत.	(9अ)	51
97	एकाच कामाच्या नऊ देयकांच्या मोजमापाच्या नोंदी एका मोजमाप पुस्तिकेत व त्याच्या गोषवाऱ्यांसह प्रदानाच्या नोंदी अन्य पुस्तिकेत घेण्याबाबत.	(9ड)	303
98	श्री.सुहास चव्हाण, उपअभियंता यांना पूर्वलक्षी प्रभावाने दिलेल्या पदोन्नतीबाबत.	(9ड)	304
99	मनपा नाक्याची इमारत व्यावसायिक प्रयोजनासाठी दीर्घमुदतीसाठी नाममात्र दराने देणेबाबत.	(9अ)	53
100	प्रशासकीय प्रस्ताव नसताना वेळेवरील विषय म्हणून तसेच वित्तीय मर्यादेनुसार अधिकार नसताना दुकान गाळ्यांचे हस्तांतरण या अर्थविषयक बाबीस स्थायी समितीने मान्यता देण्याबाबत.	(9अ)	54
101	जमीन वापर मूल्याची तफावतीची रकम रु.2.15 लाखाच्या वसुलीकडे दुर्लक्ष करणेबाबत.	(9ब)	190
102	रु. 44.17 लाख मूल्य असलेल्या भूखंडाचे स्वयंसेवी संस्थाना नियमबाह्यपणे वाटप करणेबाबत.	(9अ)	56
103	सर्वसाधारण सभेचा धोरणात्मक निर्णय असताना नविन अभिन्यासातील विकास कामासाठी त्यामधील दर्शनी भागातील भूखंडाचे अधिग्रहण न करण्याबाबत.	(9ब)	192
104	मंजूर आकृतीबंधानुसार उपलब्ध पदोन्नतीचे पद डावलून पदोन्नती व त्यानुषंगाने त्या वरील वेतनश्रेणी मध्ये सुधारित आश्वासित प्रगती योजनेंतर्गत चुकीचे ग्रेड वेतन मंजूर केल्यामुळे दि. 01.03.1993 पासून वेतनाचे झालेले अतिप्रदानाबाबत.	(9अ)	59
105	राष्ट्रीयकृत बँके ऐवजी सहकारी बँकेचे रु. 1 कोटीचे हमीपत्र स्विकृत करणेबाबत.	(9ड)	305
106	मनपातील पदाधिकारी/अधिकारी यांना सन 2014 व 2015 मध्ये पुरविण्यात आलेल्या दैनदिनी छपाईतील अनियमितेबाबत.	(9ब)	194
107	सक्षम मान्यता प्राप्त न करता 80 वर्ष व त्यावरील निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना निवृत्तीवेतनात 10% वाढ लागू करण्याबाबत.	(9ब)	196
108	मनपा शाळेतील गरीब मुला-मुलींसाठी पटसंख्येपेक्षा जादाची टाय व बेल्ट खरेदी केल्याने अवाजवी खर्च झाल्याबाबत.	(9अ)	61
109	महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील तरतूदीनुसार निवृत्तीवेतन प्रदानासंबंधीच्या विहित नमुन्यातील नोंदवहया न ठेवणेबाबत.	(9ड)	307
110	मनपा शाळेतील वर्ग 1 ते 7 मधील गरीब मुला-मुलींसाठी गणवेश शिलाई करुन वाटप करण्यातील अनियमितता.	(9ब)	198
111	मनपा अमरावतीच्या भांडार विभागाने साहित्य खरेदी करताना शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही न केल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन	(9ड)	308

DRAFT

प. क्र.	परिच्छेद शीर्षक	कलम	पृष्ठ क्र.
	झाल्याबाबत.		
112	मनपातील पदाधिकारी यांचेकडील खाजगी सचिवांच्या नियमबाह्य नेमणुकीबाबत.	(9ब)	203
113	मनपा शाळेतील वर्ग 1 ते 7 मधील गरीब मुला-मुलींसाठी गणवेश कापड खरेदी करतांना गरजेपेक्षा जादा कापडाची खरेदी केल्याने मनपावर रु.893923/- एवढया अनावश्यक खर्चाचा भार पडल्याबाबत.	(9ब)	205
114	कोंडवाडा विभागांतर्गत प्रत्यक्ष खरेदी झाली नसताना रु.19.43 लाख एवढा खर्च संबंधित लेखाशिर्षाखाली नोंदविल्याने खर्च केलेल्या रकमेच्या गैरविनियोगाच्या शक्यतेबाबत.	(9अ)	63
115	आरोग्य व पर्यवेक्षण विभागातील स्वास्थ/स्वच्छता निरीक्षक यांना रु.4300 ऐवजी रु.4800 असे चुकीचे ग्रेड वेतन देऊन अतिप्रदान केल्याबाबत.	(9अ)	64
116	मनपा शाळेचे इमारत बांधकाम, देखभाल व दुरूस्ती यावरील खर्चाचे नस्त्या व अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न देणेबाबत.	(9ब)	209
117	पशुसवंर्धन विभागाने लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे तसेच पाळीव प्राणी परवाना शुल्क वसुल न केल्याने मनपा निधीची हानी झाल्याबाबत.	(9ब)	213
118	मनपाच्या शाळेतील वर्ग 9 व 10 च्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके पुरविणेबाबत.	(9ब)	215
119	मनपाच्या शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध मंजूर नसणे व वेतन देयकातील त्रृटयाबाबत.	(9ड)	311
120	महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिराती प्रसिद्ध करण्याचे आदेश, संबंधित वृत्तपत्रांना जाहिराती प्रसिद्ध झाल्यानंतर निर्गमित केल्याने झालेली अनियमितता.	(9ड)	313
121	बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंत्यांना पूर्वलक्षी प्रभावाने नियुक्तीचा लाभ प्रदान करणेबाबत.	(9ड)	315
122	अतिक्रमण विभागाने घेतलेल्या अग्रिमाचा वापर प्रलंबित कालावधीतील मजूरी प्रदानाकरिता करणेबाबत तसेच मोठया प्रमाणात रोख काढून त्याचा गैरवापर करणेबाबत.	(9ब)	216
123	अतिक्रमणाचे कामावरील वाहनांच्या वापरातील अनियमितता तसेच लॉगबुकावरील दैनंदिन नोंदीसमोर स्वाक्षऱ्या नसणेबाबत.	(9ड)	317
124	GIS Database तयार करणे या योजनेच्या अंमलबजावणी मधील अनियमिततांमुळे 13 व्या वित्त आयोगातील रु.1.33 कोटी एवढया खर्चाची उपयोगिता शून्य ठरणेबाबत.	(9अ)	65
125	कनिष्ठ अभियंता या पदावरून शाखा अभियंता पदावर दर्जावाढ मंजूर केली असताना पदोन्नती समजून वेतन निश्चिती केल्याने मूळ वेतनात झालेले रु.143520 व त्यावरील भत्ते एवढ्या अतिप्रदाना बाबत.	(9अ)	70
126	खाजगी बांधकामाचे संबंधात कामगार कल्याण उपकराची रकम शासनाचे बँक	(9ड)	319

DRAFT

प. क्र.	परिच्छेद शीर्षक	कलम	पृष्ठ क्र.
	खात्यात परस्पर भरणा केल्यानंतर मनपाकडून त्याची सत्यता व तपासणी न होण्याबाबत.		
127	बाजार ओटयांच्या भाडे रकमेत स्थायी समितीच्या ठरावानुसार भाडेवाधीची अंमलबजावणी न केल्याने 2014-2015 मध्ये मोठ्या महासुलाचे चे नुकसान होणेबाबत.	(9ब)	218
128	बांधकाम परवानगी धारकाकडून स्थानिक संस्था कर वसूल न करता प्रतिज्ञापत्रे प्राप्त न केल्याने कराच्या महसुलाची हानी होणेबाबत.	(9ब)	220
129	कर अधिकाऱ्याच्या कक्षासाठी दरपत्रके न मागविता नियमबाह्य अग्रीमातून वित्तीय औचित्याबाहेरील अवाजवी खर्च करणेबाबत.	(9अ)	72
130	अखेरच्या शिलकेचा ताळमेळ न घातल्याने व बँक खात्यातील शिल्लक रोखपुस्तकापेक्षा कमी असल्याने अंदाजे रु. 125.94 कोटीचा खर्च रोखपुस्तकात न नोंदविता थेट बँकेतून झाल्याच्या शक्यतेबाबत.	(9ड)	321
131	महानगरपालिकेच्या मोटार कार्यशाळा विभागाकडील दहा वर्षाहून अधिक कालावधी झालेली वाहने निर्लेखित करून नविन वाहने खरेदीकरिता सुयोग्य नियोजन करणेबाबत.	(9ड)	325
132	सामान्य प्रशासन विभागामधील कर्मचाऱ्यांना चुकीच्या दराने स्थानिक पूरक भत्त्याचे प्रदान व वेतन देयकातून भविष्य निर्वाह निधी/डीसीपीएस वर्गणी कपात न करणे.	(9ड)	326
133	अनुदान नोंदवही विहित नमुन्यात न ठेवणे,नोंदवहीत अपूर्ण नोंदी घेणे व योजनानिहाय स्वतंत्र रोखपुस्तक न ठेवणे याप्रमाणे आढळून आलेल्या त्रुट्याबाबत..	(9ड)	329
134	जिल्हा नियोजन विकास निधीमधील सन 2014-15 अखेर रु.50.78 लाख एवढी अखर्चित रक्कम शासनास परत न केल्याबाबत.	(9ब)	221
135	महानगरपालिकेच्या सर्व चल व अचल संपत्तीवर घसारा आकारून घसारा निधीची उभारणी न केल्यामुळे निर्लेखनयोग्य चल व अचल संपत्तीची नव्याने उभारणी करण्यास आर्थिक अडचण येत असलेबाबत.	(9ड)	330
136	कर्जनिवारण निधीमध्ये रकम जमा न करणे,उपलब्ध रकमांची गुंतवणूक न करणे याप्रकारे निधीच्या चुकीच्या व्यवस्थापनाबाबत.	(9ड)	332
137	शासन निर्णय वित्त विभाग दि. 03.07.2009 नुसार दि. 01.01.2006 नंतर आगाऊ वेतनवाढ अनुज्ञेय नसताना श्री मिराणी व.ली. तथा श्री भूषण पुसनकर,क. लि. यांना आगाऊ वेतनवाढ दिल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत.	(9अ)	73
138	गांधी चौक वाहनतळ पार्किंगची जागा स्वस्त दराने भाडेतत्वावर देऊन मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत.	(9अ)	75
139	महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविण्यासाठी महसुली उत्पन्नाच्या 5% तरतूदीमधून खर्च करण्यातील अनियमितता.	(9ब)	223

DRAFT

प. क्र.	परिच्छेद शीर्षक	कलम	पृष्ठ क्र.
140	अमरावती शहर बस वाहतुक उपक्रम अभिकर्त्याने रॉयल्टीचा भरणा विलंबाने करणे तसेच वाहतुक उपक्रम हस्तांतरणबाबत.	(9ब)	224
141	31 नालाकुली(वर्ग-4) कर्मचा-यांना पुर्वलक्षी प्रभावाने नियमबाहयपणे वरिष्ठ पदावर सेवेत सामावून घेणे व या प्रभावावरील सेवा आश्वासित प्रगती योजनेसाठी विचारात घेऊन प्रारंभापासून वेतनाचे अतिप्रदान होत असल्याबाबत.	(9अ)	76
142	मनपा शाळेतील वर्ग 1 ते 10 पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिता डेस्क व बेंच खरेदीतील अनियमिततेबाबत.	(9क)	247
143	JNNURM अतंर्गत शहर बस खरेदीस मंजूरी प्राप्त असून मनपाकडून बस खरेदीस विलंब झाल्याने शहर बसेसचा लाभ नागरिकांना न मिळणेबाबत.	(9ड)	333
144	मनपाच्या मालकीच्या जागेवरील बस पार्किंगचे भाडे वसुल न केल्याने मनपाची हानी झाल्याबाबत.	(9ब)	226
145	मनपा अमरावतीची पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावती यांचेकडे सोपविली असतांना आस्थापना खर्चावर तसेच सार्वजनिक नळाच्या पाणीपुरवठा देयकावर फार मोठया प्रमाणातील खर्चाबाबत.	(9ब)	228
146	शालेय पोषण आहाराबाबत प्राप्त तांदुळाची प्राथमिक शाळेच्या साठा नोंदवहीत नोंद नसणे तसेच अंदाजपत्रकातील खर्चाबाबत.	(9ब)	230
147	भांडार विभागाने मनपाच्या विविध विभागासाठी खरेदी केलेल्या साहित्य खरेदीतील अनियमितता.	(9ब)	232
148	शिक्षण विभागातील वर्ग 4 च्या कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता विचारात न घेतल्याने नियमबाह्य आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करणेबाबत.	(9अ)	81
149	सामान्य प्रशासन विभागातील कर्मचा-यांना वाढीव ग्रेड-पे दिल्याने झालेले अतिप्रदान तसेच सेवापुस्तकातील अनियमिततेबाबत.	(9ब)	237
150	शिक्षण विभागाने शाळा इमारत भाडयाचे केलेले अतिप्रदान व आकस्मिक खर्चाचे मंजूरीतील अनियमिततेबाबत.	(9ब)	242
151	अभिलेखे / माहिती उपलब्ध न करण्याबाबत.	(9ड)	334
152	जिल्हापरीषदेकडून समायोजनाने मनपाकडे वर्ग झालेल्या शिक्षकांच्या संबंधाने जिल्हापरीषदेकडून सेवानिवृत्ती अंशदान प्राप्त न करणे व प्रदानातील इतर त्रृटयांबाबत.	(9ब)	243
153	मनपा अमरावतीच्या आर्थिक वर्ष 2014-15 चा अर्थसंकल्प, जमा-खर्च व आर्थिक स्थितीवरील अभिप्राय.	(9अ)	84

DRAFT

Not Approved

DRAFT

कलम 9 अ खालील आक्षेप

परिच्छेद क्र.	परिच्छेद शीर्षक	स्थिती	लेखापरीक्षक क्र.
92	मे. पुजा कन्स्ट्रक्शन, वर्धा यांना अमरावती शहरातील दैनदिन कचरा उचलने कंत्राटाला नियमबाहयपणे मुदतवाढ देणे तसेच दरवाढ मंजूर करण्यातील अनियमितता.	Delete	DATDUBM6401

कलम 9 ब खालील आक्षेप

---------- निरंक ----------

कलम 9 क खालील आक्षेप

---------- निरंक ----------

कलम 9 ड खालील आक्षेप

परिच्छेद क्र.	परिच्छेद शीर्षक	स्थिती	लेखापरीक्षक क्र.
59	महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील वाहनाचा घसारा आकारणी व याबाबत नोंदवही न ठेवल्याबाबत	Delete	DATVVBM6301

DRAFT